सरसवाङ्मयरत्नमाला–रत्न ८३ वें.

# आयर्लंडचे राष्ट्रवीर परकाया–प्रवेश

पुणे नगर वाचन मंदिर
021923

21923

लेखकः–


[illegible] केळकर
[illegible] व पांगळ

[illegible],
[illegible]क मंडळी, पुणें.

[ किं. ४॥ रु.

21923

हेंच तें ) **कामिनिया ऑइल** ( केंस वाढविणारें




जर तुमचे केस कमी होत असतील, पिकत असतील किंवा गळून पडत असतील, परंतु त्याच्या मुळांना जर धक्का लागला नसून जर ते जीव धरून असतील, तर **तुमचे केंस खात्रीनें पुन्हां वाढतील** त्याकरितां केंसांना जरुर तेंच अन्न पुरवा, पण तें देतांना त्याची योग्यता पहा कारण '**केंसांचें संवर्धन.** करणारेंच व 'केंसाचें अन्न' असलेलें एक

हेंच ] **कामिनिया ऑईल ( रजिस्टर्ड )** सुगंधी तेल [ आहे.

ह्यांत केंसांना जरूर असलेल्या अन्नाचाच अंश मोठ्या प्रमाणांत असतो. जाड, वळकट, रेशमाप्रमाणें मऊ व पुष्कळ केंस मुळापासून जोरानें वाढण्यास लागणाऱ्या उत्तम तेलाचा व वनस्पतींचा उपयोग फक्त कामिनिया ऑईलमध्येंच केलेला असतो. अशक्त झालेल्या पेशीला नवजीवन देऊन केंस भरपूर वाढतात, इतकेंच नव्हे तर तें डोक्याला थंडावा आणतें. केंसांची जोपासना करण्याकरितां लागणाऱ्या निरनिराळ्या **सदतीस** वस्तूंची यांत योजना केलेली आहे. या सदतीस वस्तु मस्तकांत भिनण्यानें आपल्याला अज्ञात असलेलें केशसौंदर्य निर्माण होईल. त्वरा करा. आजच विकत घ्या कारण **कामिनिया ऑईलनेंच** केस वाढतात. १ बाटलीची किंमत १ रु. व्ही. पी. चार्ज ६ आणे निराळा. ३ बा. २-१०-० व्ही.पी. चार्ज १२ आ. नि.

पत्ता:—**धी अँग्लो इंडियन ड्रग आणि केमिकल कंपनी,**
**जुम्मा मशीद, मुंबई नं. २.**

रजिस्टर्ड

सेंट चा राजा



ओटो दिलबहार

याच्या सर्वोत्तम सुगन्धाची कोणासही नक्कल करतां येत नाहीं, हेंच त्याच्या सर्व हिंदुस्थानामधील वाढत्या मागणीचें निदर्शक होय. हातरुमालावर याचे थोडेसे थेंब टाकले म्हणजे प्रत्यक्ष जाई, जुई, डेझी वगैरे फुलांसारखा अखंड टिकणारा मधुर सुवास येत आहे असेंच वाटतें.

लग्न व मांगलिक प्रसंगीं मित्रमंडळीस खूप करण्यासाठीं **ओटो दिलबहार** वापरून आपल्या खर्च केलेल्या पैशाचा पूर्ण मोबदला मिळवा.

अर्ध्या औंसाचे बाटलीस रु. २-०-० पाव औंस बाटलीस रु. १-४-०
१ ड्रामच्या बाटलीस रु. ०-१२-० सँपल बाटली...रु. ०-२-०
सुगंधी कार्ड प्रत्येकीं रु. ०–१–० व्ही. पी. खर्च निराळा.

**धी अँग्लो इंडियन ड्रग आणि केमिकल कंपनी, जुम्मा मशीद, मुंबई नं. २**

सुभाष्येन गीतेन युवतीनां च लीलया । यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः ॥

सरसवाङ्मयरत्नमालेचें ८३ वें रत्न.

# आयर्लंडचे राष्ट्रवीर

( भाग १-२ )

लेखक

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर

संपादक-केसरी.

व

श्रीयुत पांडुरंग वासुदेव गाडगीळ, वाङ्मयविशारद.

प्रकाशक

तात्या नेमिनाथ पांगळ

चालक-सरसवाङ्मय प्रसारक मंडळी

८०९ रविवार पेठ, पुणें शहर.

मुद्रकः-श्रीपाद रघुनाथ राजगुरु

'राजगुरु आणि कंपनीज्' प्रेस, ५१३ शनवार पेठ, पुणें २.

[ या पुस्तकासंबंधी सर्व हक्क का. न. केळकर यांचे स्वाधीन. ]

आक्टोबर १९३० ] वर्ष ३० वें.

किंमत दीड रुपया.

[ ग्रंथक्रमांक १४१ आवृत्ति २ री.

# दोन शब्द

—०—

ज्यांच्या निःस्वार्थ देशसेवेनें आयर्लंडला " स्वराज्य लाभ " झाला; देशसेवा करित असतांना ब्रिटिश नोकरशाहीकडून नाना प्रकारचा छळ झाला तरी ज्यांनीं आमरण मातृभूमि-सेवाव्रत, कसल्याहि लोभाला भुलून अथवा यमतुल्य यातनांनाहि कंटाळून सोडलें नाहीं; आणि ज्यांनीं पारतंत्र्यांत परकीयांपुढें माना तुकविण्याऐवजीं कारागृहांत मरण बरें, असा उदात्त बाणा आमरणान्त दर्शविला, त्या आयर्लंडला सदैव ललामभूत झालेल्या सुप्रसिद्ध स्वातंत्र्यवीरांचीं चरित्रें, सन्मान्य देशभक्त केसरीकार श्रीयुत **न. चिं. केळकर** यांनीं मननपूर्वक लिहिलेलीं, आम्हीं प्रस्तुत वाचकांना सादर करीत आहोंत. हल्लीं भारतस्वातंत्र्याचा लढा चालू असल्यानें, समोरच्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याशीं लढतांना कसकशा घोर व दारुण आपत्ति कोसळतात, व त्याला कोठपर्यंत कसें चिकाटीनें तोंड दिलें पाहिजे, याची जाणीव असावी म्हणून, असलीं सनदशीर व बेसनदशीर चळवळ्या राष्ट्रभक्तांचीं स्फूर्तिजनक, तसेंच बोधप्रद चरित्रें प्रत्येक देशभक्त हिंद पुत्रांच्या परिचयाचीं असणें आवश्य आहे. कारण "घी देखा पण बडगा नही देखा" ही एक आपणाकडे म्हण आहे. तद्वत स्वराज्य हें नांव चटकन बरें वाटतें पण तें मिळवितांना खऱ्या व चिकाटीच्या देशभक्ताना कसें अखेर पावेतों यातनापूर्ण जीवन व्यतित करावें लागतें, याचीहि जाणीव प्रत्येकाला असणें जरूर आहे. देशभक्त **तात्यासाहेब केळकर** यांनीं रसाळतेनें आणि स्फूर्तिजनक ओजस्वी भाषेंत रेखाटलेलीं हीं चरित्रें वाचकांना बोधप्रद व मनोरंजकहि वाटतील असा आम्हांस विश्वास आहे.

तरी नवीन ग्राहकांचें साह्य पाठवून या साहित्य सेवेस रसिक व उत्साही हितेच्छु वाचक साह्यदान करतील अशी आमची आशा व सर्वत्रास विनंति आहे. श्रीयुत बापुराव राजगुरु यांनींहि प्रस्तुत पुस्तकाच्या बाबतींत साह्य दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें आवश्यक आहे.

पुणें शहर.
ता. २।१०।३८

आपला साहित्यसेवक

**तात्या नेमिनाथ पांगळ.**

# ‘आयर्लंडच्या इतिहासा’च्या प्रथमावृत्तींतील ‘चरित्रमाले’ची

# प्रस्तावना.

कोणत्याही देशांतील लोकांच्या चारित्र्याची कल्पना त्या देशांतील ठळक व्यक्तींच्या चरित्रांवरून करितां येण्यासारखी असते. व आयर्लंडसंबंधानें तर ही गोष्ट विशेषच लागू पडते. कारण आयर्लंडचा इतिहास हा संस्थांचा इतिहास नसून व्यक्तींचाच इतिहास आहे असें म्हटलें तरी चालेल. आयरिश राष्ट्रांतील लोकांच्या गुणदोषांचें वर्णन मागें आठव्या भागांत थोडेंबहुत करण्यांत आलेलेंच आहे; व पुढील चरित्रमाला वाचतांना समष्टिरूप समाजांतील गुणदोष व्यष्टिरूपानें या निरनिराळ्या सुप्रसिद्ध व्यक्तींमध्यें कसे उतरले होते हें वाचकांनीं नीट न्याहाळून पहावें. ही चरित्रमाला कालानुक्रमानें दिलेली आहे व त्याचें कारण उघडच आहे. परंतु दुसऱ्याही एका रीतीनें तींतील व्यक्तींचा अनुक्रम लावितां येतो; व तो राजकीय चळवळीच्या पद्धतीच्या दृष्टीनें. या अनुक्रमाच्या तत्त्वाप्रमाणें पाहतां आयझॅक बट हा प्रथम येतो, त्यानंतर चार्लमाँट, नंतर ग्रॅटन, नंतर डॅनियल ओकॉनेल, नंतर पार्नेल, नंतर स्मिथ ओब्रायन, नंतर वुल्फटोन व शेवटीं रॉबर्ट एमेट असे येतात. व अशा रीतीनें अगदीं शास्त्रशुद्ध व निर्भेळ अशी कायदेशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांपासून अगदीं निर्भेळ व शास्त्रशुद्ध बेकायदेशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांपर्यंतची मालिका तयार होते. वास्तविक चारित्र्य, दानत, शहाणपण किंवा देशभक्ति यांचे दृष्टीनें पहातांही वरीलच अनुक्रम सुलट किंवा उलटही लागेल असें मात्र नाहीं. परंतु कोणत्याही रंगाच्या जशा निरनिराळ्या छाया असतात, व त्यापैकीं एक दुसरीपेक्षां हटकून चांगली असें सप्रमाण सिद्ध करण्यास साधन नसतां रुचिवैचित्र्यामुळें त्यापैकीं कोणास एक तर कोणास दुसरी छाया जशी पसंत पडते, तोच प्रकार वरील चरित्रमालेंतील निरनिराळ्या पुरुषांच्या आवडीनावडीसंबंधानें घडण्याचा संभव उघड आहे.

दधि मधुरं मधु मधुरं द्राक्षा मधुरा सुधापि मधुरैव
तस्य तदेव हि मधुरं यस्य मनो यत्र संलग्नम् ।

हें एकजात मधुर पदार्थसंबंधानें झालें. परंतु जेवणांत आपण असाही प्रकार पहातोंच कीं नाहीं कीं, कोणास अगदीं गोड गोड अदमुऱ्याचें कालवण आवडतें, तर कोणास तीन तीन दिवसांचें आंबट ताक असल्याशिवाय चालत नाहीं. वरील सर्व व्यक्तींस देशभक्ति हा धर्म साधारण होता असें घेऊन चाललें म्हणजे मग त्यांनीं पत्करलेल्या निरनिराळ्या मार्गांतील भेदांस केवळ रुचिवैचित्र्याशिवाय दुसरें कांहीं कारण नाहीं असेंच म्हणावें लागतें. परंतु ग्रॅटन यानें केवळ कायदेशीर चळवळीचा पुरस्कार केला म्हणून त्याची देशभक्ति कमी प्रतीची होती, व रॉबर्ट एमेट यानें एकदम बंड करण्यास धांव घेतली म्हणून त्याची देशभक्ति श्रेष्ठ दर्जाची होती असा मात्र अर्थ नाहीं. मूर्खपणाच्या उतावळ्या धाडसाला ज्याप्रमाणें कित्येक वेळां उज्ज्वल देशभक्तीचें खोटें श्रेय मिळण्याचा संभव असतो, त्याचप्रमाणें खऱ्या व कळकळीच्या दूरदर्शीपणावर भ्याडपणाचा व्यर्थ दोषारोप येण्याचाही संभव असतो. देशप्रीति हा गुण मनुष्याच्या केवळ एखाददुसऱ्या कृत्यावरून पारखावयाचा नसून त्याच्या एकंदर जीवितक्रमावरूनच तो त्याचे अंगीं आहे अगर नाहीं हें ठरवावें लागतें.

प्रस्तुत चरित्रमालेंत आयर्लंडच्या इतिहासांतील सन १७४० पासून १८९० पर्यंत म्हणजे १५० वर्षांच्या काळांतील सर्व प्रमुख पुढाऱ्यांचा समावेश केलेला असून त्या सर्वांची मिळून एक प्रकारची सांखळी बनलेली आहे. चार्लमॉंट व ग्रॅटन हे समकालीन होते. ग्रॅटनच्या मध्यवयाचे सुमारास वुल्फटोन व एमेट यांचीं बंडें झालीं. ग्रॅटनला डॅनियल ओकॉनेल यानें पाहिलें होतें, व या वृद्धतरुण देशभक्तांच्या जोडीचीं संभाषणेंही झालेलीं होतीं. स्मिथ ओब्रायन हा ओकॉनेलचा प्रतिपक्षी व अर्थात् समकालीन होता. आयझॅक बट हा ओकॉनेल यास नातवासारखा शोभणारा पण समकालीन होता. आणि पार्नेल यानें आयझॅक बटच्या उतारवयांत त्यास आयरिश पक्षाच्या पुढारीपणापासून पदच्युत केलें होतें. अर्थात् या आठ व्यक्तींचा इतिहास म्हणजे आयर्लंडचा १५० वर्षांचा इतिहास होय. न. चिं. केळकर.

# प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तकाचे दोन भाग आहेत. मीं १९०९ सालीं 'आयर्लंडचा इतिहास' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें, त्यांतील 'चरित्रमाला' हा या पुस्तकांतील पहिला भाग होय. त्या चरित्रमालेला तेव्हां मीं जी प्रस्तावना लिहिली ती जशीच्या तशी यांत उतरून घेतली आहे; व तिचा विशेष उल्लेख येथें करण्याचें कारण असें कीं ती समग्र वाचली असतां 'आयर्लंडचे राष्ट्रवीर' हें या पुस्तकाचें नांव वाचून कदाचित् जो थोडा गैरसमज या चरित्रनायकांसंबंधानें होण्याचा संभव आहे तो टळावा. 'राष्ट्रवीर' याचा अर्थ राष्ट्रकार्यांत लढलेले लोक असा उघडच होतो. पण 'त्यांनीं राष्ट्रकार्यांत केलेली ही लढाई कशा प्रकारची होती?' या प्रश्नानें दर्शविला जाणारा संशय किंवा भ्रम शिल्लकच राहतो. वीर म्हणजे प्रायः प्रत्यक्ष रणांगणावर लढणारी व्यक्ती. राष्ट्रकार्याची लढाई मनुष्याला ईश्वराची जशी देणगी असेल त्याप्रमाणें तरवारीसारखीच लेखणीनें, जिव्हेनें किंवा केवळ बुद्धिप्रभावानेंही लढतां येते. पण कोणच्याही राष्ट्राचा इतिहास घेतला असतां त्यांत यांपैकीं कोणत्याही केवळ एकाच साधनाचा जय झालेला आढळत नाहीं; तर त्या सर्व साधनांच्या सामुदायिक सहकारितेचाच तो जय होता असें आढळतें. चाणक्याला नंदकुलसंहार करावयाचा होता. आणि ज्या आपल्या बुद्धीचें वर्णन त्यानें 'सेनाशतेभ्योऽधिका' असें केलें त्या बुद्धीला चन्द्रगुप्ताच्या तरवारीचें प्रत्यक्ष साहाय्य घेतल्याशिवाय कार्य निस्तारतां आलें नाहीं. शंभर सेनांच्या योग्यतेच्या आपल्या बुद्धीच्या जोडीला चन्द्रगुप्तानें जुळविलेली व सजविलेली हिमालयांतील वनवीरांची एक सेना भरतीला घालून त्यांची संख्या एकशें एक करावीच लागली. उलटपक्षीं चन्द्रगुप्ताच्या तरवारीनेंच नंदकुलसंहार प्रत्यक्ष घडून आला तरी स्फूर्तीचें श्रेय हें कांहीं वेगळेंच आहे. व म्हणूनच पराक्रमाची स्फूर्ति उत्पन्न करणाऱ्या चाणक्याला गुरुस्थानीं मानून चन्द्रगुप्तानें त्याची सेवा केली.

इटलीच्या इतिहासांतही हाच प्रकार दिसून येतो. येथेंही ग्यॅरिबाल्डीची तरवार, मॅझिनीची बुद्धिमत्ता, काउन्ट काव्हूर याची मुत्सद्दीगिरी व व्हिक्टर इमॅन्युएल याचें निर्भय देशप्रेम या निरनिराळ्या साधनांनीं मिळून इटलीच्या स्वातंत्र्याचें कार्य पार पाडलें. याकरितां त्या चौघांनाही 'इटलीचे राष्ट्रवीर' यथार्थतेनें म्हणतां येईल.

अशा रीतीनें 'राष्ट्रवीर' या एकाच नांवानें संबोधण्याला योग्य असे अनेक पुरुष एकाच देशांत होऊन जात असतां त्यासंबंधीं आवडनिवड ही मात्र स्वतंत्र शिल्लक राहतेच. जनतेंतील सर्व व्यक्तींना देशांतील सर्व राष्ट्रपुरुष सर्वदा सारखेच आवडले असें कधीं घडलें नाहीं. रुचिभेदाची ही विशेष गोष्ट लक्षांत घेऊनच निरनिराळ्या स्वभावाच्या व चरित्राच्या आयरिश राष्ट्रवीरांचा समावेश एकाच चरित्रमालेंत मीं कां केला याविषयीं खुलासेवजा इषारा मी त्या प्रस्तावनेंत केलाच आहे; व ती चरित्रमाला आणखी चार आयरिश राष्ट्रवीरांच्या चरित्रांची भर घालून रा. गाडगीळ यांनीं वाढविली असली तरी रुचिभेदाच्या जाणीवेचा तोच इषारा या अधिक चरित्रांचे बाबतींतही अवश्यच आहे. कारण या चार पुरुषांचीं चरित्रेंही पुष्कळशीं वेगवेगळ्या स्वरूपाचीं असतांही रा. गाडगीळ यांनीं त्यांना राष्ट्रवीर या एकाच संज्ञेंत गोंविलें आहे. यावरून ही गोष्ट दिसून येते कीं 'राष्ट्रवीर' शब्द मीं पूर्वीच्या चरित्रमालेविषयीं योजला नव्हता तरी वाढविलेल्यासकट प्रस्तुत चरित्रमालेंतील पुरुषांच्या संबंधानें माझी आणि गाडगीळ यांची भावना, व त्या पुरुषांचें राष्ट्रवीरत्व ओळखण्याची कल्पना एकच आहे. पराक्रम, वीरवृत्ति हे शब्द लाक्षणिक अर्थानें घेतले असतां तेजस्विता, ओजस्विता यांच्या सर्व प्रकाराला सारखेच लागतात. मग ती ओजस्विता तरवार किंवा लेखणी किंवा जिव्हा किंवा बुद्धी यांपैकीं कोणच्याही द्वारानें प्रगट झालेली असो. फक्त तिचा हेतु राष्ट्रकार्य हा असला म्हणजे पुरे.

माला म्हटली म्हणजे ती दोन्ही टोकें गाठून पुरी झालेली, अशी एक

कल्पना आपोआप मनांत येत असते. पण कोणत्याहि देशांतील महापुरुष-चरित्रमाला ही केव्हांहि पुरी न होणारी अशी वस्तु असते. मीं आपल्या मालेंत मूळ आठ पुष्पें गोविलीं होतीं. त्यांत रा. गाडगीळ यांनीं आणखी चार पुष्पांची भर घालून एकंदर मालेला सुगंधाच्या ताजेपणाचा लाभ मिळवून दिला आहे. कोणीं तरी हें काम करावयास पाहिजेच होतें. पण तें करण्यास मला सवड नव्हती म्हणून तें केल्याबद्दल रा. गाडगीळांचा मी आभारी आहें. इतिहासांत तौलनिक ज्ञानाचेंच खरें महत्त्व असतें. म्हणून हिंदुस्थानच्या चालू राजकारणाचे दृष्टीनें या एकंदर चरितमालेचें समग्र मनन करणारांस बराच बोध घेण्यासारखा आहे असें मला वाटतें.

पुणें ता. १५।१।२०

न. चिं. केळकर

# दुसऱ्या भागासंबंधीं दोन शब्द

या भागांतील व्यक्ति अगदीं अलीकडील असल्यामुळें त्यांसंबंधीं माहिती देणारें वाङ्मय अजून फारसें उपलब्ध नाहीं. ग्रिफिथचा एक सहकारी व स्नेही ओहॅगार्थी यांचीं सिनफेन चळवळीवरील दोन पुस्तकें मला चांगलीं उपयोगी पडलीं. ग्रिफिथ, कॉलिन्स व व्हॅलेरा यांजसंबंधीं बरीच वैयक्तिक माहिती मीं या पुस्तकांतून घेतली आहे. सिनफेन चळवळीचा इतिहास प्रो. हेन्री यांच्या ' इव्होल्युशन ऑफ सिनफेन ' या पुस्तकांत सांपडतो. याच पुस्तकांतून सिनफेन चळवळीची मिळाली ती माहिती संक्षेपानें मीं ग्रिफिथच्या चरित्रांत दिली आहे. ' ग्रिफिथच्या आठवणी ' या नांवाचेंहि एक लहानसें पुस्तक आहे. पण त्यांत महत्वाची अशी फारशी माहिती नाहीं. एनसायक्लोपेडिया ब्रिटानिका यांतील चरित्रें त्रोटक पण वाचनीय आहेत.

जानेवारी १९३०

पां. वा. गाडगीळ

# अनुक्रमणिका

## भाग १ ला


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| अर्ल ऑफ् चार्लमॉट | १--७ |
| हेनरी ग्रॅटन | ८-२५ |
| वुल्फटोन | २६-३२ |
| रॉबर्ट एमेट | ३३-३४ |
| डॅनियल ओकॉनेल | ३५-८२ |
| विल्यम स्मिथ ओब्रायन | ८३-८७ |
| आयझॅक बट | ८८-९२ |
| पार्नेल | ९३-१२८ |


## भाग २ रा


| | |
|---|---|
| जॉन रेडमंड | १--६ |
| आर्थर ग्रिफिथ | ७-३४ |
| मायकेल कॉलिन्स | ३५-४३ |
| डी व्हॅलेरा | ४४-४६ |

# आयर्लंडचे राष्ट्रवीर

## भाग १ ला

# आयर्लंडचे राष्ट्रवीर

## अर्ल ऑफ चार्लमॉंट

अठरावे शतकाचे अखेरीस आयर्लंडांत झालेल्या राष्ट्रीय चळवळीमध्यें ज्या राष्ट्रभक्तांनीं पुढाकार घेतला होता त्यांपैकीं चार्लमॉंट हा एक प्रमुख सरदार होता. ग्रॅटन, फ्लड्, वगैरे मुत्सद्दी वक्ते या नात्यानें प्रसिद्ध होते, तरी चार्लमॉंट याचा समाजांतील उच्च दर्जा, त्याची श्रीमंती वगैरे गोष्टींमुळें त्यास एक प्रकारचें विशेष महत्त्व स्वाभाविकपणें आलेलें होतें. श्रीमंत, घरंदाज वगैरे लोक सार्वजनिक कामांत सहसा पडत नाहींत, परंतु खऱ्या मनानें जर ते अशा कामांत पडले तर त्यांस अग्रपूजेचा मान मिळण्यास मुळींच विलंब लागत नाहीं हा अनुभव सर्वत्र आहे. मोठ्या घराण्यांतील लोकांस त्यांच्या हातून कांहीं होत नसतांही बहुमान देण्याची प्रवृत्ति साधारणतः जनसमाजांत नेहमींच आढळते. मग त्यांतूनही लोकहिताकडे लक्ष घालणारा एखादा लक्ष्मीपुत्र अगर संस्थानिक अगर अमीर उमराव निघाला तर त्याच्या लोकसेवेचें चीज व कौतुक इतरांहून अधिक व्हावें यांत नवल नाहीं. एक तर असे लोक अशा कामांत पडत नाहींत, यामुळें अपूर्वाई वाटते; सार्वजनिक कामांत पडल्यापासून मनुष्याची जी स्वहिताची हानि प्रायशः होते ती, मोठ्यांचें सर्वच मोठें या न्यायानें, अशा लोकांची इतरांहून अधिक होते; शिवाय कार्यसिद्धीच्या दृष्टीनें

पहातांही अशा लोकांनीं हातीं धरलेल्या कामास नामरूप इतरांपेक्षा फार त्वरित येतें. अर्ल ऑफ चार्लमॉट यानें केलेल्या राष्ट्रकार्याकडे वरील दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे.

चार्लमॉटचा जन्म डब्लिन येथें सन १७२८ सालीं झाला. याच्या घराण्यामध्यें व्हायकाउंटची पदवी पूर्वी चार पिढ्यांपासूनची चालत आलेली होती व घरचा जमीनजुमला मोठा असल्यामुळें हें घराणें फार धनसंपन्न असे. चार्लमॉट याच्या गर्भश्रीमंतीस विद्याभिरुचीची जोड मिळाल्यामुळें लहानपणापासूनच त्याचें चरित्र सतेज व लोकचित्ताकर्षक असे झालें होतें. त्यानें आपले तारुण्याचे दिवस सर्व युरोपखंडभर प्रवास करण्यांत व प्रत्येक देशांतील प्रमुख विद्वान् लोकांचा स्नेह संपादण्यांत घालविले. तो स्वतः सुबुद्ध, हरहुन्नरी, अष्टपैलू, विद्या व कला यांचा मार्मिक भोक्ता व आश्रयदाता असल्यामुळें त्याची छाप सर्व लोकांवर पडत असे. विद्वान् मनुष्य श्रीमंत व स्वतंत्र असला म्हणजे अर्थात् दुधांत साखर पडल्यासारखेंच होतें. प्रवासाहून परत आल्यावर त्याच्या वयाचे सव्विसावे वर्षीच विद्यापीठाकडून त्यास एल्. एल्. डी. ची पदवी मिळाली, व आर्मा या प्रांताचा त्यास गव्हर्नर नेमण्यांत आलें. परंतु अधिकार गाजविण्यापेक्षां लोकसेवा करण्याची त्याला अधिक आवड होती; यामुळें लवकरच तो त्या वेळच्या आयरिश लिबरल पक्षांत सामील झाला. सन १७६० सालीं आयर्लंडच्या उत्तरभागांत बंड झालें त्या वेळीं आपल्या स्वामिनिष्ठेस अनुसरून आपलें स्वतःचें असें लहानसें सैन्य जमवून बेलफास्ट शहराचें रक्षण करण्यास त्यानें मदत केली. तो मनाचा मोठा असल्यामुळें प्रॉटेस्टंट लोकांप्रमाणें क्याथोलिक लोकांवरही ते स्वदेशबांधव म्हणून तो प्रेम करी. आणि त्यांना लष्करी शिक्षण द्यावें, व लष्करांत त्यांचा समावेश व्हावा याविषयीं त्यानें बरीच खटपट केली. सन १७६२ सालीं फिरून उत्तर आयर्लंडांत प्रॉटेस्टंट लोकांचें बंड झालें. त्या वेळीं फिरून त्यानें राजपक्षास चांगली मदत केली. व त्याच्या कामगिरीकरितां त्यास ' अर्ल ' ही पदवी देण्यांत आली. परंतु राजनिष्ठेपेक्षा

त्याची लोकनिष्ठाच अधिक बलवत्तर होती. व त्यामुळें आयरिश पार्लमेंटची सुधारणा व्हावी, कांहीं कालावधीनें जुने सभासद रद्द होऊन नवे निवडून देण्यांत यावे, सभासद निवडून देण्याचा हक्क पुष्कळ लोकांस व त्यांच्या महत्वाच्या प्रमाणानें मिळावा, अशाविषयीं होणाऱ्या वादविवादांत व खटपटींत त्यानें प्रजापक्षीय पुढाऱ्यांस उघडपणें मदत दिली, व राजपक्षास नाखुष करण्याचें धाडस केलें. सन १७७३ सालपर्यंत इंग्लंड व आयर्लंड या दोन देशांत तो जाऊन येऊन रहात असे व इंग्लंडांत असतां बर्क, जॉन्सन, ह्यूम, गोल्डस्मिथ, रॅनॉल्डस, होगार्थ, वगैरे प्रसिद्ध विद्वान् व कलाभिज्ञ लोकांच्या निकट परिचयांत त्याचा नित्य काल जाई.

परंतु या सालापासून पुढें तो बहुधा आपला सर्व काळ स्वदेशांतच घालवूं लागला. कारण आयर्लंडांतील राष्ट्रीय चळवळ याच सुमारास चांगली जोरावर आली होती. आयरिश राष्ट्रभक्तांच्या मनांत आपली पार्लमेंट स्वतंत्र असावी अशी आकांक्षा उत्पन्न होण्यास, व अमेरिकेमध्यें पराजय होऊन इंग्लंडास पायबंद लागण्यास एकच गांठ पडली. अर्थात् आपली चळवळ नेटास लावण्याची खरी हीच वेळ आहे, असें जाणून गरीब व श्रीमंत, क्याथोलिक व प्रॉटेस्टंट लिबरल व कॉनझर्व्हेटिव या सर्वांचा मिलाफ होऊं लागला. अमेरिकेंत कुमक पाठविण्याची आवश्यकता असल्यामुळें होतें नव्हतें तें इंग्रज सैन्य आयर्लंडांतून प्रधानमंडळानें काढून नेलें होतें, एवढेंच नव्हे तर खुद्द आयर्लंडवरही परचक्र येत कीं काय, अशी भीति असल्यामुळें देशांतल्या देशांत राजनिष्ठ अशा स्वयंसेवकांचें सैन्य उभारल्याशिवाय गत्यंतर नाहीं असेंही त्यांना दिसून आलें; व हें सैन्य उभारण्याचें एकदां ठरल्याबरोबर देशभक्तीची लाट उसळून हां हां म्हणतां साठ हजार स्वयंसेवकांचें सैन्य जय्यत तयार झालें. लवकरच त्यांना कवाईत शिकविण्याची वगैरे व्यवस्था झाली. त्यांच्या पलटणी बनविल्या गेल्या, त्यांचे स्वयंसेवक अधिकारी नेमले गेले, व अनेक वर्षांच्या परिश्रमानेंच जणुं काय तयार झालेलें हें सैन्य एकसूत्री बनून देश-

कार्याच्या वाटेल त्या योजनेंत गारद होण्यास तयार झालें. यानंतर लवकरच असें दिसून आलें कीं, देशांत बंड वगैरे होण्याची अगर परचक्राची भीति उरलेली नाहीं. तथापि हें सैन्य उभारणें जितकें सोपें होतें, तितकें तें मोडणें सोपें नव्हतें. या सैन्यांत पगारदार लोकांची खोगीरभरती नव्हती, तर हे स्वयंसेवक आपलें खाऊन देशाचें काम करण्यास प्रवृत्त झालेले होते. त्यांनीं हातीं शस्त्र घेतलें होतें त्यास राजाज्ञेपेक्षां स्वदेशभक्ति व स्वयंस्फूर्ति हीच अधिक कारणीभूत होती. हें सैन्य जमविल्यानें पुष्कळ राजकार्य तर झालेंच, परंतु लोककार्य त्याहून अधिक झालें. कारण स्वदेशाखातर देहपतनापर्यंत हानि सोसण्यास साठ हजार लोकांचा जमाव होऊं शकतो, हें लोकांचें लोकांस पूर्वी कळलें नव्हतें तें आतां कळून आलें. हा जमाव जमतांना सैनिकांनीं राजकार्य करण्याची शपथ घेतली होती, परंतु त्याजबरोबर देशकार्य करूं नये अशी शपथ मात्र त्यांनीं घेतलेली नव्हती. अर्थात् राजकार्य सिद्ध झाल्यावर म्हणजे आयर्लंडवरील परचक्राची भीति नाहींशी झाल्यावर राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं या नवीन संघटनेचा फायदा देशकार्याकडे करून घ्यावा असें सहजच ठरविलें. या सैन्याच्या अधिकारी वर्गांत राष्ट्रांतील बहुतेक पुढारी सामील असून आपापल्या योग्यतेप्रमाणें निरनिराळ्या हुद्यांच्या जागा त्यांनीं पत्करिल्या होत्या. व दिवसा हातांत लेखणी घेऊन उत्कृष्ट लेख लिहिणारा अगर रात्रीं पार्लमेंटमधील वादविवादांत आपल्या वक्तृत्वानें इतरांस दिपवून टाकणारा असा आयरिश देशभक्त, सकाळीं पहावें तों मैदानावर कमरेस तलवार लटकावून आपल्या कनिष्ठांकडून कवाईत व सलामी घेत आणि वरिष्ठास कवाईत व सलामी देत उभा असलेला दृष्टीस पडे. अशा लोकांनीं जर राजकीय स्वातंत्र्य मागितलें तर तें वावगें असें तरी कोण म्हणेल ? व तें देण्यास नाकबूल तरी कोणास कसें होतां येईल ? या सैन्याचा व त्याच्या अधिकाऱ्यांचा निश्चय ठरलेला होता कीं, ज्याप्रमाणें आपण परचक्राची भीति नाहींशी केली, त्याचप्रमाणें आपल्या पार्लमेंटची ही गुलामगिरी देशांतून नाहींशी करूं तेव्हांच शस्त्र खालीं

ठेवूं; व एकंदर परिस्थितीच्या मानानें हा त्याचा मनोरथ सिद्धीस जाण्याची बळकट आशा होती. अशा या सैन्याचा मुख्य पुढारी व चालक चार्लमाँट हा होता. सन १७८० सालीं त्यास या सैन्याचा अधिपति निवडण्यांत आलें व पुढें हें सैन्य अस्तित्वांत असेपर्यंत हा अधिकार त्याजकडेसच होता. चार्लमाँट ह्याचा या वेळचा मुख्य सहायकर्ता ग्रॅटन हा होता, व अशा या दोन देशभक्तांच्या मैत्रीनें राष्ट्रकार्यास विशेषच बळकटी आलेली होती. या दोघांच्या सल्लामसलतीनें व पुढाकारानें पुढें कांहीं दिवसपर्यंत स्वयंसेवक सैन्याच्या सभा, कॉन्फरन्सें वगैरे भरून अखेर सन १७८२ सालीं आयरिश पार्लमेंटला स्वातंत्र्य मिळून व्यापारविषयक कायदे रद्द करवितां आले.

परंतु स्वयंसेवकांचें हें अवतारकृत्य संपल्याबरोबर या सैनिकांच्या उत्साहास अर्थातच कमीपणा येऊं लागला; व नंतर क्याथोलिक लोकांना स्वातंत्र्य देण्याच्या बाबतींत आयरिश पुढाऱ्यांच्यामध्यें मतभेद माजल्यामुळें स्वयंसेवक सैन्याच्या घटनेचीं बंधनेंही शिथिल झालीं. पार्लमेंटचें स्वातंत्र्य मिळवूं व ती सुधारूं असा चार्लमाँट वगैरे लोकांचा जो संकल्प होता, त्यांपैकीं फक्त पहिला भाग साध्य होऊन स्वतंत्र झालेली पार्लमेंट सुधारण्याचे पूर्वी हें सैन्य बरखास्त झालें. लोकपक्षांत थोडीशी शिथिलता आलेली पहातांच अधिकाऱ्यांनीं संधि साधली. 'पार्लमेंटच्या डोक्यावर नागवी तलवार अहोरात्र खडी ठेवणारें हें सैन्य कोण ? तसें करण्यास त्याला काय अधिकार ? व तलवारीच्या दहशतीनें मागितलेली मागणी कबूल करणें हा नादानपणा असल्यामुळें आम्ही ती कधींही देणार नाहीं !' असा कांगावा राजपक्षाचे लोक करूं लागले. हें स्वयंसेवकांचें सैन्य व हा पुढाऱ्यांचा मेळ जर आणखी कांहीं दिवस टिकता तर क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य पांचपंचवीस वर्षें आधीं मिळतें. १७९८ सालीं झालेलें वुल्फटोनचें बंड झालें नसतें, व आयरिश पार्लमेंट सभा मोडली ती मोडली नसती असें कित्येक विचारी ग्रंथकारांचें मत आहे. परंतु या गोष्टी घडून येणें हें एकावरच

स्वलंबून नव्हतें. शिवाय पुढें पुढें ग्रॅटन व चार्लमॉंट यांचेंही पटेनासें होऊन त्यांचा बरेच दिवसांचा स्नेह तुटला व अशाश्वततेच्या ठराविक कारणामुळें, १८ व्या शतकाच्या अखेरीस झालेल्या राष्ट्रीय चळवळीमुळें आयर्लंड व इंग्लंड यांचा संबंध कदाचित् कायमचा तुटावयाचा तो कायमचाच जडला. १७९१ सालीं चार्लमॉंट यानें वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं न बनल्यामुळें आर्मा प्रांताच्या गव्हर्नरच्या जागेचा राजीनामा दिला. याच सुमारास सुप्रसिद्ध ' व्हिग क्लब ' या नांवाच्या लिबरल संस्थेची त्यानें स्थापना केली. प्रथम कांहीं दिवसांपर्यंत या क्लबाचा सभासद या नात्यानें वुल्फटोन हा चार्लमॉंटचा सहकारी असे. परंतु एडमंड बर्कप्रमाणें चार्लमॉंट याच्या मनावरही फ्रान्स-मधील राज्यक्रांतीच्या योगानें विपरीत परिणाम घडला. या राज्यक्रांतीच्या योगानें मनुष्यस्वातंत्र्याच्या खऱ्या तत्त्वाची वाढ न होतां त्यांतील अत्याचा-रांनीं त्या तत्त्वाची पीछेहाट होण्यासच अधिक मदत झाली असा चार्लमॉंट याच्या मनाचा ग्रह झाला. शिवाय या राज्यक्रांतीस क्याथोलिक लोकांचें धर्मवेड कारणीभूत आहे असें वाटून आयरिश क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य देण्याचे कामीं त्याचें मन कचरूं लागलें. व या अनेक कारणांमुळें त्याच्या हातून सार्वजनिक कार्य हळू हळू कमी होऊं लागलें. कारण कोणाच्याही उत्साहास अखेर ओहोटी लागतेच. परंतु देशसुधारणेचे आपले प्रयत्न व्हावे तितके सफल झाले नाहींत या विचारानें त्याचे मनावर निराशेचें पटल आलें. १७९८ सालीं झालेलें बंड व त्यामुळें झालेली देशाची वाताहत पाहून तर त्याचें प्रेमळ मन अगदीं विदीर्ण झालें. मात्र आयरिश पार्लमेंट मोडून आयरिश राष्ट्राचें सौभाग्य चिन्ह पुसून टाकलेलें डोळ्यांनीं पाहण्याचें दुःख जें पुढें वाढून ठेविलें होतें, व जें ग्रॅटन वगैरे त्याच्या इतर सहायकर्त्यांस भोगावें लागलें, त्याची वेळ येण्यापूर्वींच सुदैवानें १७९९ सालीं चार्लमॉंट याचा अंत झाला. अखेरपर्यंत त्याची विद्याभिरुचि, त्याचा विविधकलाव्यासंग लोकसेवा करण्याची बुद्धि, लोकप्रियता वगैरे कायम राहिलीं होतीं. परंतु सर्व

जन्मभर एकाच प्रकारचा अनुभव येणें व कोणत्याही प्रकारच्या यशाची दिवसानुदिवस अबाधित बढती होणें ही गोष्ट मनुष्यकोटींतील प्राण्यांच्या लागीं नसल्यामुळें इतर लोकांप्रमाणें नशिबाच्या चढउताराचा अनुभव चार्लमॉट यासही घ्यावा लागला. परंतु विद्या, पैसा, स्वतंत्रता व समाजांतील उच्च दर्जा यांचा उपयोग चार्लमॉट याचे हातून देशकार्याकडे निरपेक्षबुद्धीनें जितका झाला, तितका झाल्यावर मग कोणाही मनुष्यव्यक्तीस जगांतील इतर अनुभव कसेही आले असले तरी मरतांना स्वतःस सुखी व धन्य म्हणवून घेण्यास कांहीं हरकत आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

# हेनरी ग्रॅटन

स्वानदशीर रीतीनें चळवळ करणाऱ्या आयरिश राष्ट्रभक्तांत हेनरी ग्रॅटन याची प्रमुखत्वानें गणना करितात. याचा जन्म सन १७४६ सालीं झाला. जॉन ग्रॅटन, प्रस्तुत चरित्रनायकाचा बाप, हा राजकीय पक्षाचा असून त्याचे वेळीं चालू असलेल्या स्वातंत्र्याचे चळवळीस तो प्रतिकूल होता; हेनरी ग्रॅटन याचा विद्याभ्यास आयर्लंडांतच झाला. विद्यार्थी या नात्यानें तो मेहनती, हुषार व तरतरीत असून बालपणापासून निश्चय व करारीपणा यांबद्दल त्याची ख्याती असे. असें सांगतात कीं, लहानपणीं त्याचा स्वभाव थोडासा भित्रा असे; व या गोष्टीची लाज वाटून, हा दोष काढून टाकण्याकरितां, तो रात्रीं अपरात्रीं स्मशानांत जाई व थडग्यांवर बसून बराच वेळ काढी. या युक्तीनें त्यानें आपल्या अंगचा भित्रेपणा निश्चयानें काढून टाकिला. भाषाविषय हा त्याचा आवडता असे व विद्यार्थीदशेंत ग्रीक व लॅटिन ग्रंथकारांचीं केलेलीं पारायणें पुढें वक्ता या नात्यानें त्यास फार उपयोगीं पडलीं. ग्रॅटन याचा बाल्यावस्थेंतून तारुण्यावस्थेंत प्रवेश होण्याचे वेळीं डॉक्टर ल्यूकस व हेनरी फ्लड हे सार्वजनिक कामांतील पुढारी होते व 'फ्रीमन्स जर्नल' या नांवाच्या उत्तम वर्तमानपत्राच्या द्वारें त्या वेळच्या तरुण पिढीस राजकीय शिक्षण मिळत असे. फ्लड हा ग्रॅटनपेक्षां वयानें दहा-पंधरा वर्षे वडील असून या वेळीं तो आपल्या तरतरीच्या ऐन उमेदींत होता. त्यामुळें ग्रॅटनला फ्लडबद्दल कांहीं विलक्षण आदर व प्रेम वाटे. परंतु पुढें

कांहीं वर्षांनीं कर्मधर्मसंयोगानें असें घडून आलें कीं, फ्लड व ग्रॅटन यांचा पूज्यपूजकसंबंध जाऊन त्याचे जागीं प्रतिपक्षीयांचा संबंध आला; व आयरिश पार्लमेंटमध्यें हे दोघे देशभक्त दोन पक्षांचे पुढारी या नात्यानें परस्परांशीं विरोधभक्तीनें व हेव्यादेव्यानें बरींच वर्षें वागले. प्रसंगविशेषीं एकमेकांनीं एकमेकांवर इतकी बेसुमार कडकपणाची, अन्यायाची व अपशब्दपूर्ण टीका केली कीं, पुढें तिची त्यांनाही लाज वाटूं लागली. राजकीय वादविवादांत व इतर सार्वजनिक कामांत लोक पडले म्हणजे त्यांच्यांतील नुसता वयाचा भेदचसा काय, परंतु इतर अनेक प्रकारचे उच्चनीचपणाचे भेदही नाहींसे होऊन ते सर्व एकाच पायरीवर येतात ! व हा अनुभव कोणत्याही राष्ट्रास, कोणत्याही पिढींत आढळून येईल. असो. डॉक्टर ल्यूकस हा प्रजापक्षी होता एवढेंच नव्हे, तर त्या वेळचा अग्रगण्य जहाल होता. अर्थात त्याच्या मताचा पगडा आपल्या मुलावर बसलेला जॉन ग्रॅटन यास पहावेना. परंतु केवळ आपल्या बापास खुष करण्याकरितां आपलीं राजकीय मतें सोडून देण्यास अगर लपवून ठेवण्यास हेनरी ग्रॅटन हा तयार नसल्यामुळें बापलेकांचा बेबनाव झाला, व बापानें आपल्या मिळकतीवरील मुलाचा वारसा रद्द करून टाकला. सन १७६७ सालीं ग्रॅटन हा इंग्लंडमध्यें कायद्याचा अभ्यास करण्याकरितां गेला. परंतु बॅरिस्टरीच्या ' टर्मस 'भरीत असतां कायद्यापेक्षां त्याचें लक्ष इतर अनेक विषयांकडे वेधलेलें होतें. एक तर त्याला नाटकें, काव्य व संगीत यांचा फार नाद असे; व त्याहूनही विशेष म्हटलें म्हणजे राजकारणाचा नाद तर त्यास बेसुमारच होता. कायद्यावरील व्याख्यानें ऐकण्याचें होतां होईतों टाळून तो पार्लमेंटच्या सभागृहांत जाऊन तेथील वादविवाद ऐकण्यांत तासांचे तास घालवी. आणि घरीं परत आल्यानंतर, चांगलीशी चांदणी रात्र असल्यास, बागेंत हिंडतां हिंडतां आपल्याशींच संभाषण करी. व केव्हां मौजेखातर तर केव्हां वक्तृत्व शिकण्याचे हौसेनें, एखाद्या लट्ठशा वृक्षाच्या खोडाला अथवा मोठ्याशा दगडाला सभाधिपति कल्पून

त्यास उद्देशून आवेशयुक्त अशीं मोठमोठीं भाषणें करी. ही त्याची लीला पाहून ज्या कित्येकांस तिचें मर्म कळत नसे, त्यांस हा खरोखरच भ्रमिष्ट झाला असें वाटे. याच कालावधींत त्याचा व फ्लड याचा परिचय झाला. अशा तऱ्हेनें कांहीं काल अप्रस्तुत व्यवसायांत व कांहीं मनाच्या उदासीनतेमध्यें काढून परंतु अखेरीस बॅरिस्टरीची परीक्षा देऊन, सन १७७२ सालीं तो आयर्लंडास परत गेला. परंतु वाकिलीच्या धंद्याचा त्याला मनापासून तिटकारा असे. अगदीं पहिला खटला त्यानें घेतला त्यांत त्यास अपयश आलें, म्हणून त्यानें अशीलाकडून घेतलेले निम्मे पैसे परत केले; व राजधानीचें शहर सोडून स्वभावतः प्रिय अशा एकांतवासांत राहण्याकरितां कोठें तरी निघून जावें असें त्यानें ठरविलें. एकांतवासांत राहिल्यानें जी शांतता, जें समाधान व जो आनंद प्राप्त होतो त्याचा तो भोक्ता होता व वास्तव, कांहीं आकस्मिक कारणांनीं लवकरच त्याचा राजकारणांत प्रवेश झाला नसता तर, त्याचें पुढील आयुष्य कशा प्रकारें गेलें असतें हें सांगणें कठिण आहे.

सन १७७५ सालीं आयरिश पार्लमेंटमध्यें नव्या निवडणुकी झाल्या, त्या वेळीं देशभक्तिपूर्ण व प्रतिष्ठित जमीनदार चार्लमाँट याचे साहाय्यानें ग्रॅटनची निवडणूक अनायासानें झाली. या नवीन पार्लमेंटांत फ्लडला त्याच्या योग्यतेनुरूप मंत्रिमंडळांत जागा मिळाली होती, व ग्रॅटन हा प्रजापक्षाकडे असल्यानें फ्लडची नेहमींची जागा रिकामी झाली ती ग्रॅटन यास मिळाली. कारण पार्लमेंट सुरू होतांच अल्पकाळांत ग्रॅटन याचें वक्तृत्व व राजकारणपटुत्व यांची छाप लोकांवर पडून, पार्लमेंट सभेमध्यें लोकपक्षाचा पुढारी होण्यास हाच लायख आहे असें आपोआपच ठरून गेलें. हा विवक्षित काल इंग्लंड व आयर्लंड यांच्यामधील झटापटीचा होता. इंग्लंडच्या प्रधानमंडळानें केलेले व्यापारविषयक कायदे अन्यायाचे असून आयरिश कारागिरांस ते दुःसह झाले होते व आपली अप्रीति व्यक्त करण्याकरितां त्यांनीं इंग्रजी

मालावर बहिष्कार घातलेला होता. आयर्लंडवर परचक्र येण्याची भीति असून, मनांतून ज्यांची बंडाकडे प्रवृत्ति आहे अशा कित्येक आयरिश देशभक्तांचें व फ्रान्समधील स्वातंत्र्यप्रिय पुढाऱ्यांचें सूत याच वेळेस जमलेलें होतें; व देशांत स्वयंसेवक सैनिकांचीं पलटणें तयार होऊन त्यांच्या कवाइती उघडपणें व पद्धतशीर रीतीनें चालू असून हरप्रयत्नानें वर सांगितलेले व्यापारसंबंधीं कायदे रद्द करवून देशी कारागिरांचें हित साधावें अशाविषयीं प्रजापक्षीय पुढाऱ्यांमध्यें बहुधा एकमत झालेलें होतें. या प्रसंगीं ग्रॅटन याचें मत असें होतें कीं, काय वाटेल तें झालें तरी हें भांडण हातघाईवर आणूं नये, व बेकायदेशीर-पणा व रक्तपात याविरुद्ध त्यानें आपला अभिप्राय देऊन तशा आशयाचीं उघड भाषणेंही केलीं. सुदैवानें रक्तपाताचा हा प्रसंग टळला व लॉर्ड नॉर्थ या मुत्सद्याचे शाहाणपणानें हे अन्यायाचे कायदे रद्द होऊन आयरिश कारागि-रांचे जे हात आज सुमारें शंभर वर्षेपर्यंत जखडले गेले होते ते मोकळे झाले. आयर्लंड देशामध्यें लोकांचा समज मात्र असा पक्का होऊन राहिला कीं, हे कायदे रद्द होऊन देशी कारागिरीच्या पायांतील बिडी तुटली, ती वास्तविक इंग्रजी प्रधानमंडळाच्या उदारबुद्धीनें नसून केवळ आयरिश स्वयंसेवकांच्या सैन्यानें आपल्या म्यानांतील तलवार अर्धीअधिक उपसून दाखविल्यामुळें. अशा रीतीनें आत्मनिष्ठतेचें फळ त्यांस गोड लागल्यामुळें त्यांच्या मानसिक धैर्यांत व उत्साहांत भर पडली. अशा उत्साहाचे प्रसंगीं राष्ट्राची मजल एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर व दुसरीवरून तिसरीवर त्वरित जाते. 'आयरिश कारागिरांनः आज स्वतंत्रता मिळाली खरी, परंतु चंचल मनाच्या इंग्रजी प्रधानमंडळाचें घ्या काय? रद्द झालेले कायदे उद्यां हे फिरून अमलांत आणून पुन्हां देशी कारागिरीचे पायांत जुनी बिडी अडकविणार नाहींत कशावरून? तेव्हां हे कायदे नुसते रद्द होऊन भागणार नाहीं तर फिरून ते अमलांत आणले जाणार नाहींत अशाबद्दल कांहीं तरी लायख जामिनकी मिळाली पाहिजे. आयरिश पार्लमेंट सभेंत आयर्लंडमधील लोकांच्या सुखदुःखाच्या संबं-

षाचे कायदे आपल्या मुखत्यारीवर करतां यावे व या बाबतींत इंग्रजी प्रधानमंडळाचा शक अगर त्यांची सत्ता चालूं नये असें होण्यास आयरिश पार्लमेंट-सभेचें स्वातंत्र्य ब्रिटिश पार्लमेंट सभेनें कबूल केलें पाहिजे.' अशी कल्पना आयरिश पुढाऱ्यांचे डोक्यांत आली व हीच युक्ति खरोखर बिनतोड आहे अशी त्यांची खात्री झाली. ग्रॅटन यांस ही कल्पना आवडली इतकेंच नव्हे, तर ती प्रत्यक्ष घडवून आणण्याचे मागें एकदम लागलें पाहिजे असें तो प्रतिपादन करूं लागला. कित्येक मुत्सद्यांच्या मतें ही वेळ आयरिश लोकांनीं फक्त कृतज्ञता व्यक्त करण्याची होती, अधिक मागण्या मागण्याची नव्हती. ग्रॅटनचा आग्रह पाहून एडमंड बर्क यास ग्रॅटन हा कोणी वेडापीर आहे असें वाटलें. त्यानें आपला आग्रह सोडावा अशाबद्दल मोठमोठे लोक त्यास भिडा घालूं लागले, परंतु त्या ऐकण्याची ग्रॅटनची इच्छा नसल्यामुळें, त्यांचें मन दुखविण्याचा प्रसंगच येऊं नये म्हणून, तो पार्लमेंटच्या सुटींत डब्लिन शहर सोडून लांब एकांतवासांत जाऊन राहिला. कृतज्ञतेच्या दिखाऊ सोंगांत कांहीं अर्थ नाहीं व कांहीं कांहीं गोष्टींबद्दल कृतज्ञता वाटली तरी राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या उद्योगाचे आड कृतज्ञता येऊं शकत नाहीं; पूर्वी दिलेल्या देणग्यांबद्दल कृतज्ञता वाटली तर ती खुशाल व्यक्त करा; परंतु पूर्वीच्या देणग्या खरोखर उपयुक्त करण्यास आणखी इतर देणग्यांची जर आवश्यकता असेल तर त्या मागण्यास मागेंपुढें पाहण्याचें कारण नाहीं, असें त्याचें मत असे.

पार्लमेंटच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आयरिश पार्लमेंटमध्यें सन १७८१ सालीं त्यानें प्रथम आणला; परंतु स्वयंसेवकांच्या सैन्याचे मदतीशिवाय त्याच्या प्रयत्नास यश आलें नसतें. स्वयंसैनिकांचा कायदेशीरपणानें वागण्याचा बाणा असे; परंतु त्यांची सर्व देशभर पसरलेली घटना, त्यांची लष्करी कवाईत व त्यांचा मेळ पाहून अधिकाऱ्यांस दहशत वाटूं लागली होती. पार्लमेंटच्या स्वातंत्र्यासंबंधानें लोकमताचें एकीकरण करण्याकरितां देशांतील स्वयंसेवक प्रतिनिधींची एक सभा १७८२ च्या फेब्रुआरीच्या पहिल्या तारखेस डब्लिन

येथें भरविण्यांत आली. या सभेस १४३ निरनिराळ्या संस्थांकडून २४४ प्रतिनिधी आले होते. सभेंत दंगाधोपा होऊं नये व भलतेसलते फाजीलपणाचे ठराव आणले जाऊं नयेत याबद्दल आगाऊ खासगी रीतीनें तरतूद करण्यांत आली होती व शेवटीं पार्लमेंटचें स्वातंत्र्य व क्याथोलिकांचे हक्क यांविषयीं ठराव पास करण्यांत आले. १७८२ च्या एप्रिल महिन्यामध्यें हा विषय आयरिश पार्लमेंटमध्यें निघून ग्रॅटनची सूचना १६ व्या तारखेस पास झाली व हा दिवस जसा ग्रॅटनच्या आयुष्यांत त्याचप्रमाणें आयर्लंडच्या इतिहासांत अजरामर होऊन राहील यांत शंका नाहीं. कारण या दिवशीं आयर्लंड देशामध्यें लोकमताचें जितकें ऐक्य दिसून आलें, तितकें त्यापूर्वी अगर त्यानंतर केव्हांही दिसून आलें नाहीं. आयर्लंडच्या पार्लमेंटचें स्वातंत्र्य नष्ट झालें होतें. तें परत मिळविण्याकरितां ग्रॅटन, चार्लमॉट व स्वयंसेवक यांची ही सर्व खटपट होती, ती आयर्लंडमध्यें तर साधलीच; परंतु ब्रिटिश पार्लमेंटनें आपण केलेला कायदा आपण होऊन रद्द केल्याशिवाय नुसत्या आयरिश पार्लमेंटनें केलेल्या ठरावास किंमत काय? परंतु सुदैवानें या वेळीं इंग्लंडांत फॉक्स हा मंत्रिमंडळांत आयर्लंडचा स्टेटसेक्रेटरीही होता. ग्रॅटन व फॉक्स यांचा स्नेह असून ते उभयतां एकमेकांचे चहाते होते. ग्रॅटन यानें खाजगी पत्र लिहून फॉक्स यास स्पष्टपणें असें कळविलें कीं, बऱ्या बोलानें ब्रिटिश पार्लमेंटनें पूर्वीचा कायदा रद्द केला तर बरी गोष्ट आहे, नाहीं तर हत्यार हातीं घेण्यास मी स्वयंसेवकांचे सैन्यास मोठ्या नाखुषीनें सल्ला देईन व मग काय होणें असेल तें होईल. फॉक्स हा मनानें उदार होता व त्याचें सर्व आयुष्य स्वतंत्रेच्या पवित्र कार्याकरितां पार्लमेंटमध्यें राजपक्षाशीं भांडण्यांत खर्च झालें होतें. त्याच्या सांगणीवरून पूर्वीचा कायदा रद्द करून आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्याबद्दलचा हक्क ब्रिटिश पार्लमेंटनें मान्य केला, व यामुळें आयर्लंडांत जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. लोकांनीं दीपोत्सव केले, मिरवणुकी काढल्या, राष्ट्रास स्वातंत्र्याची सनद मिळवून दिल्याबद्दल ग्रॅटनचे सर्व राष्ट्रानें जाहीर रीतीनें आभार मानले येवढेंच

नव्हे, तर त्याला देणगीदाखल पन्नास हजार पौंड रक्कम पार्लमेंट सभेनें मंजूर केली. ग्रॅटन हा अशा प्रकारची देणगी स्वीकारण्यास कबूल नव्हता, परंतु ' तुम्ही वकिलीचा धंदा जर करीत नाहीं, तर तुमच्या निर्वाहाचें कायमचें साधन प्राप्त करून देण्याचें राष्ट्राचें कर्तव्य आहे; व यापुढें इतर व्यवसाय न करतां अखंड चित्तानें राष्ट्रकार्य करण्यास तुम्हांस मोकळा वेळ मिळावा व तुम्हांस कोणावर अवलंबून राहण्याचें कारण पडूं नये हा काय तो सदरहू देणगी देण्यांत राष्ट्राचा हेतु आहे, ' असें त्याच्या वजनदार मित्रांनीं त्यास समजावून सांगितल्यावर त्या देणगीचा त्यानें स्वीकार केला. त्या पैशानें त्यानें एक जमीनदारी विकत घेतली. पुढें लौकरच त्याचा विवाह झाला, आणि तो व त्याची पत्नी हीं दोघें पार्लमेंट चालू असतां डब्लिन येथें व सुट्टीमध्यें या जमीनदारीच्या गांवीं येऊन राहूं लागलीं.

या वेळीं ग्रॅटन याचें वय अवघें छत्तीस वर्षांचें होतें व पार्लमेंट सभेंत त्याचा प्रवेश होऊन फक्त सातच वर्षें झालीं होतीं. या स्वल्प कालावधींत तो लोकप्रियतेच्या शिखरावर चढला असें म्हणण्यास हरकत नाहीं. यापुढें त्याच्या आयुष्याचीं आणखी बरींच वर्षें गेलीं व मरेपर्यंत एकसारखा तो सार्वजनिक काम करण्यांत गढलेला होता. परंतु १७८२ सालची त्याची लोकप्रियता पुढें अव्याहत टिकली नाहीं. याचें कारण उघड आहे. १७८२ सालीं कर्मधर्मसंयोगानें सर्व राष्ट्राचें एकमत झालेलें होतें व सर्व राष्ट्रास प्रिय अशी गोष्ट त्याचे हातून सिद्धीस गेली. परंतु शुक्लपक्षांत पौर्णिमेचे दिवशीं सर्व सोळा कलांचा अवतार झाल्यावर त्यापुढेंही प्रत्यहीं पूर्णबिंब असाच चंद्र दृष्टीस पडावा अशी आपली इच्छा असते, तथापि तसें घडून येऊं शकत नाहीं. राष्ट्रांतील अगर समाजांतील पुढाऱ्यांच्या सत्कीर्तीची व लोकप्रियतेची गोष्ट अशीच आहे. सन १७८१ सालीं आयरिश पार्लमेंट सभेस स्वातंत्र्य प्राप्त होऊन लोकांनीं ग्रॅटनचे आभार मानिले, त्याचे धन्यवाद गाइले, व ' नवीन स्वतंत्र पार्लमेंट सभेचा जनक ' असें त्याचें नांवही पडलें. परंतु यानंतर थोडे

दिवस जातात न जातात तोंच त्याच्या उपकाराचा विसर पडून लोकांमध्यें असंतोष उत्पन्न झाला व कुरबुर सुरू झाली. कित्येकांस ग्रॅटनचा हेवा वाटूं लागला व त्यानें केलेल्या राष्ट्रकार्याचें महत्त्व ज्या कोणत्या उपायांनीं कमी होईल ते उपाय ते योजूं लागले. त्यांनीं असा एक नवीन वूट काढिला कीं, ज्याच्या योगानें आयरिश पार्लमेंट सभेला स्वातंत्र्य मिळालें असें म्हणणें आहे, तो तरी ब्रिटिश पार्लमेंट सभेनें केलेलाच कायदा कीं नाहीं ? सन १७४६ चा कायदा त्यांनीं होऊन नवीन उपस्थित केला होता तोच आतां फक्त रद्द केला, याहून अधिक तें काय मिळालें? आज सकृद्दर्शनीं पार्लमेंटला मिळालेलें स्वातंत्र्य जर खरोखरच निरंतर टिकावें असें असेल, तर ब्रिटिश पार्लमेंट सभेनें 'आयरिश लोकांवर बंधक होईल असा कायदा करण्याचा आपल्यास बिलकूल अधिकार नाहीं व या बाबतींत आयरिश पार्लमेंट सभा निखालस स्वतंत्र आहे,' असें स्पष्ट नवीन कायदा करून ठरवावें ! हा अशा प्रकारचा युक्तिवाद करणाऱ्यांचा वर्ग हळू हळू वाढत चालला व प्रसिद्ध पुढारी हेनरी फ्लड हाही याच वर्गांत सामील झाला. असें करण्यांत फ्लडचे हेतु अनेक होते. एक तर ग्रॅटनबद्दल त्यास निःसंशय हेवा वाटत होता. ग्रॅटनच्यापूर्वी पार्लमेंटमधील पुढारीपणा फ्लड याजकडे होता व तो दोघांमध्यें वडील होता असें असतां ग्रॅटन हा मागाहून येऊन पुढें सरसावला व लोकप्रियतेची आणि विजयश्रीची माळ वास्तविक आपल्या गळ्यांत पडावयाची ती ग्रॅटन याचे गळ्यांत पडली, याबद्दल त्यास विषाद न वाटणें अशक्य होतें. परंतु असंतुष्ट वर्गाचा पुढाकार घेण्यांत याहून अधिक चांगला असा त्याचा दुसराही एक हेतु होता. तो हा कीं, पार्लमेंटच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाची वेळींच कड लावून न घेतली तर पुढें मागें तो हातचा जाईल, यास्तव तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे असें त्याच्या मनानें घेतलें. मात्र हा तवा तापण्यास लोकमताची ज्वाला पेटविण्याचे कामीं त्यानें ग्रॅटनइतका खरोखर पुढाकार घेतला नव्हता. वेळ पडल्यास आयरिश स्वयंसेवकांस हातांत शस्त्र धारण करण्याची सल्ला देण्या-

पर्यंत ग्रॅटनची एक वेळ मजल गेली होती, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. अशा आणीबाणीचे वेळीं फ्लडनें निःसंशय कच खाल्ली होती, म्हणून राजकारणाचा तवा तापविण्याचें श्रेय त्याकडे तितकें येत नाहीं. परंतु एवीतेवी तवा तापला आहे खरा व ग्रॅटननें त्याजवर एक पोळी भाजून घेतली आहे, तेव्हां आपण तरी दुसरी पोळी भाजून कां घेऊं नये असें फ्लड यास वाटणें साहजिक होतें. केवळ कायद्याचे दृष्टीनें पाहातां त्याची बाजू सयुक्तिकही होती. ती अशी कीं, आयरिश पार्लमेंट सभेस स्वातंत्र्य देण्याचें ब्रिटिश पार्लमेंट सभेच्या मनांत जर खरोखरीच होतें, तर आयर्लंडसंबंधीं कायदे करण्याचा आपल्यास अधिकार नाहीं असा स्पष्ट व विधायक कायदा हीच आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्याची खरी व कायदेशीर जामीनकी होती. परंतु ग्रॅटन याचें म्हणणें वेगळें होतें. तो म्हणे कीं, जुना कायदा रद्द करणें व फ्लडच्या म्हणण्याप्रमाणें स्पष्ट असा नवीन कायदा करणें या दोहोंची फलश्रुति वास्तविक एकच आहे. जुना कायदा रद्द झाला या गोष्टीचा भरपूर फायदा घेऊन तो आपण पचनीं पाडला म्हणजे मग पार्लमेंटच्या स्वातंत्र्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीही छाती होणार नाहीं. शिवाय वरिष्ठाकडून कनिष्ठास स्वातंत्र्य मिळावयाचें असतां तें कांहीं गौरवानें, कांहीं गूढार्थानें असेंच मिळवावें लागतें. केवळ हमरीतुमरीवर येऊन, कायद्याचें साल काढून अगर अर्थाचें ताक घुसळून मिळविण्याचे भरीस सहसा पडूं नये. कारण त्याचा परिणाम चांगला होत नाहीं. अप्रत्यक्ष शब्दांनीं व कृतीनें म्हणजे जुना कायदा रद्द करून, स्वातंत्र्याची देणगी देणें हेंच ब्रिटिश पार्लमेंटला जितकें जड जाईल त्याहूनही आपला पराभव स्पष्ट शब्दांनीं कबूल करणें हें अधिक जड जाईल! पहिल्या गोष्टीनें ब्रिटिश पार्लमेंट सभेच्या हातचा फक्त अधिकार गेला, परंतु दुसरीनें आपला अपमान झाला असें कदाचित् तिला वाटण्याचा संभव आहे. कायद्याच्या दृष्टीनें फ्लडचें म्हणणें बरोबर असेल, परंतु व्यवहाराचे दृष्टीनें आपलें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे अशी ग्रॅटनची तक्रार होती. हा त्रास एक वर्षभर जारीनें चालला होता. फिरून पूर्वीसारखी स्वयं-

सेवकांची चळवळ सुरू झाली, सभा भरूं लागल्या, अर्ज झाले व अखेर लोकमतास मान देण्याकरितां आणि आयरिश लोकांच्या मनांत विनाकारण शंका व अविश्वास राहूं नये म्हणून सन १७८३ सालीं ब्रिटिश पार्लमेंट सभेनें स्पष्टार्थक असा नवीन कायदा करून आयरिश पार्लमेंटचें स्वातंत्र्य कबूल व जाहीर केलें. अशा रीतीनें सुमारें शंभर वर्षांपूर्वी म्हणजे सन १६८८ सालीं इंग्लंडांत जी एक प्रकारची राजकारणांतील क्रांति घडून आली, तशाच प्रकारची ही आयर्लंदांतील क्रांति घडून आली.

परंतु या क्रांतीचें फळ आयरिश लोकांस फार दिवस उपभोगण्यास सांपडलें नाहीं. जें पार्लमेंट स्वतंत्र झालें, त्यांतील कित्येक सभासदांनींच त्याचें शत्रुत्व आरंभिलें. शिवाय आयरिश पार्लमेंट सभेच्या दोऱ्या कांहीं अंशीं इंग्रजी प्रधानमंडळाच्या हातीं पूर्वीप्रमाणेंच राहिल्या. कारण प्रत्यक्ष हुकूम करून जें साधण्यासारखें नव्हतें, तें लांचलुचपत वगैरे देऊन व इतर रीतींनीं आयरिश सभासदांस वश करून घेऊन त्यांस साधतां येत असे. आयरिश लॉर्डांच्या सभेंत नवीन लॉर्ड नेमणें ही सर्वस्वी राजाच्या स्वाधीनची गोष्ट होती. तसेंच आयरिश हाउस ऑफ कॉमन्स सभेंतील सभासद नेमून देण्याच्या कित्येक 'वार्डांत' अगदीं थोडे म्हणजे केव्हां केव्हां दहा पांचही मतदार असल्यामुळें त्यांस वश करून घेऊन त्यांजकडून राजपक्षास अनुकूल असे सभासद निवडून आणणें हेंही अगदीं सोपें काम होतें. याच सुमारास आयरिश पार्लमेंटची सुधारणा करण्याची चळवळ सुरू झाली. या सुधारणेचा अर्थ असा होता कीं, देशांतील जितक्या अधिक लोकांस मत देण्याचा हक्क मिळवून देतां येईल तितका द्यावा व मतदारांच्या निरनिराळ्या वर्गांकडून होतां होईतों संख्येशीं यथाप्रमाण इतके सभासद निवडून देतां यावे. म्हणजे सभेंतील प्रतिनिधित्वाचा फायदा देशांतील लोकांस सरसकट सारखा मिळावा. एकाचेच अगर थोडयांचे हातीं पुष्कळ सत्ता असा प्रकार होऊं नये. हें सुधारणेचें तत्त्व ग्रॅटन, फ्लड, चार्लमॉंट या सर्वांस सारखेंच पसंत होतें. परंतु किरकोळ

गोष्टींवर त्यांचें ऐकमत्य होईना. याच सुमारास ग्रॅटन व फ्लड यांजमधील चुरस व बेबनाव अधिकच वाढला व शेवटीं मजल येथपर्यंत गेली कीं, भर पार्लमेंट सभेमध्यें त्यांनीं एकमेकांस कधींही वापरूं नये असे शब्द वापरले. त्यांचें हत्यारें घेऊन द्वंद्वयुद्धच व्हावयाचें; परंतु तें उभय पक्षांच्या मित्रमंडळाचे मध्यस्थीनें वांचलें. या वेळीं स्वयंसेवकांचें चालकत्व चार्लमॉंट याजकडे होतें. त्याचा व ग्रॅटन याचा संबंध हळू हळू सुटत चालला होता. सन १७८३ सालीं सप्टेंबरच्या आठव्या तारखेस पूर्वीप्रमाणें स्वयंसेवकांचें जंगी संमेलन भरलें. या संमेलनास त्यांच्या २७२ पलटणींकडून पांचशें प्रतिनिधी आले होते, व या सभेनें पार्लमेंट सभेच्या सुधारणेसंबंधानें केलेले ठराव पार्लमेंट सभेपुढें मांडण्यास फ्लडची नेमणूक केली. अशा रीतीनें ग्रॅटन हा अर्थात्च मागें पडला. खुद्द पार्लमेंटमध्यें ग्रॅटन ह्यानें उदार मनानें फ्लडच्या वतीनें व सुधारणेच्या तत्त्वास अनुकूल असेंच भाषण केलें. परंतु फ्लडची सूचना पार्लमेंट सभेनें नामंजूर केली. स्वयंसेवकांनीं केलेल्या चळवळीचा असा मोड झाला व आपला हेतु तडीस नेण्याचे कामीं त्यांनीं यापुढें योग्य ती चळवळ चालू न ठेविल्यामुळें सुधारणेचें काम तसेंच पडून राहिलें. स्वयंसेवकांबद्दल लोकांमध्यें जो एक प्रकारचा आदर, बहुमान व आब वाटत होता, तो नाहींसा होऊन लवकरच ग्रॅटन व चॉर्लमॉंट यांचा फार दिवसांचा स्नेहही तुटला. याच सुमारास आयर्लंडमधील ब्रिटिश लष्कर वाढविण्यासंबंधाच्या मंत्रिमंडळाच्या सूचनेस ग्रॅटन ह्यानें आपलें कर्तव्य म्हणून संमति दिली व त्यामुळें तर लोकांच्या मनांतून तो बराच उतरला.

सन १७८२ पासून पुढें आयरिश पार्लमेंटास स्वातंत्र्य मिळाल्यामुळें तिच्या रचनेंत सुधारणा होऊन तिची कीर्ति व कार्यकुशलता वाढावी ती न वाढतां सुधारणेच्या वादाच्या भोंवऱ्यांत सांपडून अठरा वर्षांच्या आंतच ती रसातळास गेली व अखेर सन १८०० सालीं नामशेष झाली. हा अनिष्ट परिणाम घडून येण्यास प्रधानमंडळाकडून होणाऱ्या लाचलुचपतीची भरती हें

एक कारण तर खरेंच, परंतु देशांतील पुढाऱ्यांचा आपसांतील बेबनाव व त्यांनीं परस्परांच्या महत्त्वाची केलेली हानि हें एक कारण होतें. यानंतर व्यापारविषयक कायद्याचा वादही फिरून उपस्थित झाला. आपल्या नूतन स्वातंत्र्याचा उपयोग करून इंग्लंडाहून येणाऱ्या मालावर जकात वगैरे बसवून संरक्षणाचे तत्त्वावर आयरिश कारागिरीस मदत करावी, असें फ्लड याचें म्हणणें होतें. ग्रॅटनचें म्हणणें असें पडलें कीं, इंग्लंडांतील मंत्रिमंडळास पराभूत करावयाचें तर आयरिश लोकांनीं लिबरल पक्षाशीं सूत व संधान राखिलें पाहिजे. व ज्या अर्थीं हल्लीं लिबरल पक्ष अनियंत्रित व्यापार पद्धतीच्या बाजूस आहे त्या अर्थीं आयरिश लोकांनींही ती बाजू सहसा सोडूं नये. इंग्लंडशीं होतां होईतों मैत्री राखावी. त्या देशांतील सर्वच पक्षांशीं वांकडें होणें नीट नव्हे असें तो आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत असे. परंतु इंग्लंडांतील दोन्ही पक्ष सारखेच लबाड आहेत, व आयरिश लोकांना भोळे समजून त्यांच्या हातांवर गुळखोबरें देऊन ते आपला कार्यभाग साधितात, व हें त्यांचें कपट ग्रॅटनसारख्या मंदबुद्धि पुढाऱ्यांस कळत नाहीं, असें फ्लड याचें म्हणणें होतें. अखेरीस आयात मालावर कर बसविण्याची सूचना फ्लड यानें पार्लमेंटपुढें आणिली व ती नामंजूर झाली. सुधारणेची चळवळ व आयात मालावर जकात बसविण्याची सूचना या दोन्ही गोष्टींमुळें मुख्य मंत्री विलियम पिट हा रागावून ईर्षेस चढला; आणि भस्मासुराप्रमाणें, स्वतंत्र आयरिश पार्लमेंटाचा घातक हस्त तिच्याच डोक्यावर ठेवून तिचा नाश करण्याचा त्यानें संकल्प केला. ग्रॅटन हा स्वतः प्रॉटेस्टंट पंथाचा होता; परंतु क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य व समान हक्क द्यावे या मताचा तो प्रथमपासून असून मागें एके ठिकाणीं सांगितलेला टाईथचा कर रद्द करण्याबद्दलची सूचना त्यानेंच प्रथम आयरिश पार्लमेंट सभेपुढें आणिली, परंतु ती नापास झाली. अशा रीतीनें आयरिश लोकांच्या हिताच्या प्रत्येक कार्यास या स्वतंत्र पार्लमेंटाचे हातून पदोपदीं अडथळाच होऊं लागला; व इतक्या श्रमानें मिळविलेल्या स्वातंत्र्याचें

चीज होईना, यामुळें पार्लमेंट सभेविषयीं लोकांची अनास्था व अप्रीति वाढूं लागली. इकडे ही सभा समूळ नाहींशी करण्याचे पिटचे प्रयत्न जोरावर येऊं लागले. याच सुमारास फ्रान्समध्यें क्रांतिकारक तत्त्वांचा फैलाव होऊं लागून त्या तत्त्वाबद्दलचें प्रेम आयर्लंडच्या उत्तर भागांतील प्रॉटेस्टंट लोकांत दिसून येऊं लागलें व धर्मद्वेष थोडथोडा कमी होऊं लागला. धर्मा-हूनही अधिक ईश्वरसंमत अशा राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय लोकां-मध्यें होऊं लागल्यामुळें धर्मपंथांतील क्षुद्र भेदांचा त्यांना विसर पडूं लागावा हें स्वाभाविकच होतें; परंतु धर्मद्वेषांचा हा निरास पाहून मंत्रिमंडळास भीति व विषाद वाटूं लागला. आणि सरकाराबद्दल लोकांचा ग्रह चांगला होऊन त्यांजमधील परस्पर वैमनस्य कायम रहावें या हेतूनें 'क्याथोलिक लोकांस योग्य हक्क देण्यास आम्हीं कधीं मागें घेत आहों ? ते आम्हीही देणारच आहोंत,' असें बोलण्यास त्यांनीं सुरुवात केली. इकडे धर्माच्या बाबतींत एकी होण्याची वेळ आली तों राजकीय मतांत लोकांमध्यें फूट पडण्यास आणखी एक कारण उत्पन्न झालें. लिबरल व कॉन्झ-र्व्हेटिव्ह, सुधारणावादी व सुधारणाद्वेष्टे, सुनियंत्रित व अनियंत्रित व्यापाराचे भोक्ते, क्याथोलिक स्वातंत्र्याचे शत्रु व मित्र असे हे भेद पूर्वीचे होतेच; परंतु फ्रान्समधील राज्यक्रांतीमुळें क्रांतिवादाचे शत्रु व मित्र, म्हणजे राजसत्ताक व प्रजासत्ताक राज्यपद्धतीचे पुरस्कर्ते, अशा प्रकारचें नवीन एक भेदलक्षण उत्पन्न झालें. या संधींत त्यांतल्यात्यांत सुखाचे असेही दोन दिवस निघून गेले. हिंदुस्थानांतील लोकांस ज्याप्रमाणें लॉर्ड रिपन हे प्रिय आहेत, त्याच-प्रमाणें आयरिश लोकांस प्रिय असलेले व्हाइसरॉय लॉर्ड फिट्झविलियम यांची व्हाइसरॉय या नात्यानें आयर्लंडांत नेमणूक झाली, व त्यांचे अमदानींत ग्रॅटन हा कांहीं दिवस आयर्लंडांतील प्रधानपदावर आरूढ झाला. फिट्झ विलियम याच्या मनांत ग्रॅटनबद्दल अत्यंत आदरबुद्धि होती, व आय-र्लंडच्या राज्यकारभारांत मनःपूर्वक मदत करण्याचें अभिवचन त्यानें इंग्लंडा-

हून येण्याचे पूर्वीपासून ग्रॅटनकडून घेतलें होतें. परंतु फिट्झ विलियम याचा व पिटचा बेबनाव झाल्यामुळें त्यांस लवकरच आपली जागा सोडून परत जाणें भाग पडलें. फिट्झ विलियम व ग्रॅटन यांचा मिलाफ असतांही त्यांचे हातून आयरिश पार्लमेंटकडून रोमन क्याथोलिक लोकांचें अगर आयरिश राष्ट्राचें हित साधेल असें कोणतेंही काम करवून घेतां येईना. १७९२ सालीं क्याथोलिक लोकांस हक्क देण्याचें बिल आयरिश सभेपुढें आणिलेलें तिनें नामंजूर केलें, यामुळें क्याथोलिक लोकांनीं चिडून दंगा केला. क्याथोलिक व प्रॉटेस्टंट लोकांच्या मारामाऱ्या होऊन अधिकारीवर्गानें प्रॉटेस्टंट लोकांची कड घेऊन सुमारें तेराशें क्याथोलिक लोकांस इनसाफ न करतां हद्दपार केलें. पुढील सालीं अधिकारीवर्गानें नवीन अधिकार घेण्यासंबंधाचें बिल आणिलें व पास करून घेतलें. या बिलाचा ग्रॅटन व त्याचे साहाय्यकर्ते यांनीं अत्यंत जोराचा निषेध केला व असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, देशांतील असंतोष कमी व्हावा असें असेल तर असले दडपशाहीचे कायदे करून चालणार नाहीं, तर ज्यांस हक्क नसतील त्यांस हक्क व जे न्याय मागतील त्यास न्याय दिला पाहिजे. क्याथोलिक लोकांस समान हक्क देण्यासंबंधानें ग्रॅटन ह्यानें फिरून एक बिल पुढें आणिलें; व तें फिरून नामंजूर झालें. पुढील सालीं वूल्फटोन यानें बंड केलें व फ्रेंच लोकांचें आरमार घेऊन तो आयर्लंडावर आला; परंतु वादळ होऊन हें आरमार उध्वस्त झालें आणि आयर्लंडांतील लोकांकडून वूल्फटोनचा पाठपुरावा व्हावा तसा झाला नाहीं. ग्रॅटन हा बंडाविरुद्ध होता व त्याचा तो उघडपणें निषेधही करी, परंतु ' ही परिस्थिति लक्षांत घ्या व अझून तरी डोळे उघडा,' असें तो अधिकारीवर्गास सांगे; तथापि त्याचा कांहीं एक उपयोग होईना. या स्थितीस तो इतका कंटाळला कीं, पुढील सालीं पार्लमेंटच्या नव्या निवडणुकी झाल्या तेव्हां तो पार्लमेंट सोडून देऊन घरीं बसला, परंतु एवढ्यानेंही अधिकारीवर्गाचें समाधान होईना. तो बंडांत सामील असल्याचा कसा तरी पुरावा करून त्यास गोत्यांत आणण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले. शेवटीं देशात राहणें

त्याला इतकें धोक्याचें झालें कीं, आर्थर ओकॉनेल या नांवाच्या त्याच्या मित्रा-वर खटला चालू असतां त्याच्यातर्फेनें तो इंग्लंदांत साक्ष देण्याकरितां गेला, ही संधि पाहून त्याच्या मित्रांनीं त्यास तेथेंच ठेवून घेतलें. सन १७९९ सालीं बंडाची धामधूम मोडल्यावर तो आयर्लंडांत परत गेला. पार्लमेंटांत प्रवेश कर-ण्यास प्रथम त्यास कांहीं दिवस अडचण पडली, परंतु अखेर सुमारें बाराशें पौंड खर्च करून 'विकलो' येथील वार्डांकडून त्यानें आपली निवडणूक करून घेतली. पुढील सालीं आयरिश पार्लमेंट सभेचे स्वातंत्र्यावर किंबहुना अस्तित्वावर पिटनें उघड घाला घातला. आपल्या हातानें महत्प्रयासानें रोविलेल्या स्वातंत्र्यरूपी वृक्षावर अधिकारीवर्ग निर्दयपणें कुऱ्हाड चालवीत आहे, हें पाहून ग्रॅटननें आपलें सर्व वक्तृत्व, सर्व शक्ति व सर्व आवेश खर्ची घालून आयरिश पार्लमेंट मोडण्याच्या प्रयत्नास प्रतिरोध केला; परंतु पिटनें चारलेल्या लांचानें आयरिश सभासदांचें तोंड मिटलें होतें एवढेंच नव्हे, तर त्यांच्या कानठळ्याही बसल्या होत्या. यामुळें ग्रॅटन याचें दिव्य व अमोघ वक्तृत्व पालथ्या घड्या-वरील पाण्याप्रमाणें फुकट गेलें. या वादविवादांत त्यानें मंत्रिमंडळाची सर्व बिंगें बाहेर काढून, लांचलुचपतीच्या साहाय्यानें त्यांनीं आरंभिलेल्या कुकर्माचा हिडिसपणा व्यक्त करून दाखविला. हें दोषाविष्करण मंत्रिमंडळास इतकें झोंबलें कीं, त्यांच्यातर्फें कॉरी या नांवाच्या प्रधानानें दुसरे दिवशीं ग्रॅटन यास द्वंद्व युद्धास बोलाविलें. ग्रॅटन हा जसा सभाशूर तसाच रणशूरही होता. त्यानें द्वंद युद्धाचें निमंत्रण स्वीकारलें व कॉरी यास जखमी केलें. तारीख १ आगष्ट सन १८०० रोजीं ग्रॅटन याच्या निराशेचा कळस झाला. १६० विरुद्ध ११७ मतें पडून आयरिश पार्लमेंट सभेनें आत्मघाताचा ठराव पास केला, व अशा रीतीनें शंभर कोसांवरून सूत्रें चालविणारा मायावी सूत्रधार विलियम पिट याच्या प्रयत्नास यश येऊन आयर्लंडची पार्लमेंट सभा सुधारण्याच्या ऐवजीं कायमचीच नष्ट झाली.

पार्लमेंट सभा आयर्लंडांतून गेल्यावर ग्रॅटन हा चार वर्षें घरींच राहिला.

स्वदेशी पार्लमेंट मोडल्यावर ब्रिटिश पार्लमेंट सभेंत शिरावें किंवा कसें यासंबंधानें त्याचें मन बरेंच संशयग्रस्त झालें होतें. परंतु शेवटीं 'आयर्लंडांत स्वस्थ बसून तरी करावयाचें काय? तिकडे गेल्यास झाला तर कांहीं उपयोगच होईल!' असा निश्चय करून सन १८०५ सालीं यॉर्क कॉउन्टींतील एका वार्डातर्फें तो पार्लमेंटमध्यें निवडून आला. तेथपासून त्याच्या मरणापर्यंत मुख्यतः दोन चळवळी पार्लमेंटांत व आयर्लंदांत चालू होत्या. एक क्याथोलिक लोकांच्या हक्कांबद्दल व दुसरी नष्ट झालेली आयरिश पार्लमेंट सभा फिरून प्रस्थापित करण्याबद्दल. यांपैकीं एकही चळवळ ग्रॅटनचे डोळ्यांदेखत पूर्ण यशस्वी झाली नाहीं. मात्र पहिल्याच चळवळीस बरेंच रूप आलें होतें. सन १८०५ पासून १८१८ पर्यंत बहुधा प्रत्येक वर्षीं क्याथोलिक लोकांच्या हक्कांचा प्रश्न, अर्ज, ठरावाची सूचना अगर बिल यांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें वादविवादास निघे. पैकीं ठरावाच्या सूचना कित्येक वेळां पास झाल्या. कायदा असा त्याचे हयातींत झाला नाहीं. मात्र या तेरा वर्षांच्या चळवळीनें इतका फायदा झाला कीं, या प्रश्नास अनुकूल असें मत पार्लमेंट सभेंत दिवसेंदिवस बळावूं लागलें. सन १८१४ चे सुमारास कायदाही होण्याचा रंग आला होता, परंतु क्याथोलिक पंथाचे बिशप राजानें नेमावे किंवा रोम येथील पोपनें नेमावे, यासंबंधानें ग्रॅटन व ओकॉनेल प्रभृति क्याथोलिक पुढारी यांमध्यें मतभेद होऊन बिल पास होण्यास हरकत आली. सन १८१८ सालीं आपसांतील हा मतभेद मिटला व ग्रॅटन हा डब्लिनतर्फें नवीन निवडणुकींत निवडून आला. या निवडणुकीचे दिवशीं घरीं परत येत असतां वाटेंत दंगा होऊन कोणी एका बदमाष मनुष्यानें ग्रॅटन यास लांकूड फेकून मारिलें. त्यामुळें त्यास बरीच जखम झाली. परंतु 'हा सगळा धर्मवेडाचा परिणाम' असें म्हणून त्यानें तें प्रकरण उदारपणें तसेंच सोडून दिलें. दरम्यान सन १८१० सालीं डब्लिन येथें सभा भरून नष्ट झालेली पार्लमेंट सभा फिरून प्रस्थापित करण्यासंबंधानें चळवळ सुरू झाली. या सभेस ग्रॅटन हजर होता; परंतु या अखेरच्या सालांत मना-

वरील निराशापटल इतकें वाढत गेलें कीं, या चळवळीस यश येईल असें त्याची मनोदेवता त्यास सांगेना ! सन १८१८ सालानंतर ग्रॅटनची प्रकृति दिवसेंदिवस फारच क्षीण झाली. शेवटीं शेवटीं उभें राहवत नसल्यामुळें बसून बोलण्याची परवानगी अध्यक्षाकडून घेऊन तो पार्लमेंट सभेमध्यें भाषणें करी; परंतु अखेरपर्यंत त्यानें आपलें कर्तव्य निश्चयानें बजाविलें.

ग्रॅटनच्या अंगचे मुख्य गुण म्हटले म्हणजे अत्युत्कट देशाभिमान, तीव्र बुद्धिमत्ता व पराकाष्ठेचा निःस्पृहपणा. देशकार्यासाठीं त्यानें वकिलीचा धंदा पहिल्यापासून जन्मभर सोडून दिला, हें मागें सांगितलें आहेच. परंतु त्याहून लक्षांत ठेवण्याची गोष्ट ती ही कीं, लाचलुचपतीनें बुजबुजलेल्या त्या काळामध्यें आयरिश पार्लमेंट सभेमधून ग्रॅटनइतका निर्मळ व निकोप असा त्याचा तोच निघाला. पार्लमेंट सभेंतील त्याच्या कारकीर्दीच्या बहुतेक भागांत प्रधानमंडळापैकीं एकाद्या प्रधानाइतकें वजन त्याच्या शब्दाला व मताला नेहमीं असे. परंतु प्रत्यक्ष प्रधानकीचें काम असें त्यानें फक्त एकच वेळ केलें. पण प्रजापक्षीय पुढाऱ्यांच्या नशिबीं नुसती टीका व चळवळ करीत बसण्याचें यावें, प्रत्यक्ष राज्यकारभाराचा अनुभव त्यांस फारसा मिळूं नये, हा अनुभव परकीय अंमलाखालीं असणाऱ्या देशभक्तांस सर्व देशांत नेहमींच येणारा आहे. तो निःस्पृह असल्यामुळें अधिकारी वर्गाची मर्जी संपादन करण्याकडे जितकें त्याचें दुर्लक्ष असे, तितकेंच लोकप्रियता संपादण्याकडेही त्याचें दुर्लक्ष असे. कोणत्याही बाबतींत त्याचीं मतें चोख व ठाम असत, व तीं बोलून दाखविण्यास तो कधींही मागें घेत नसे. मग त्याचे योगानें अधिकारीवर्ग व समाज यांचा राग होवो वा लोभ होवो. मात्र त्याचीं मतें चोख व स्पष्ट असत म्हणून तो दुराग्रही होता असें नाहीं. कोणत्याही मतभेदाचे प्रसंगीं प्रत्यक्ष कृतीच्या संबंधांत शक्य तितकें मिळतें व मिटतें घ्यावें, असें त्याचें नेहमीं धोरण असे. परंतु प्रतिपक्षाचा केवळ राग अगर खासगी स्नेह्यांची भीड यांस त्यानें कधींही भीक घातली नाहीं. सार्वजनिक कामकाजांत तरतरीत बुद्धीप्रमाणें उज्ज्वल

अशा वक्तृत्वाची त्यास मदत होई; व आजमितीस सर्व आयरिश वक्त्यां-मध्यें त्याची गणना प्रमुखत्वानें करितात. त्याच्या शरिराची ठेवण व रूप यांत अलौकिक असें कांहींच नव्हतें. आवाज असावा तितका गोड नव्हता व केव्हां केव्हां त्याचे हातवारे हसूं येण्यासारखे होत. पण त्याच्या भाषण-प्रसंगीं पहिलीं दोनचार मिनिटें प्रस्तावनेदाखल जाऊन, मग उत्कृष्ट अलंकार व रम्य विचारसरणी यांनीं ओतप्रोत भरलेल्या अशा त्याच्या अमोघ वक्तृत्वा-चा अस्खलित प्रवाह एकदां सुरू झाला, म्हणजे श्रोतृवृंद तासांचेतास तल्लीन होऊन ऐकत बसे. त्याचें वक्तृत्व अशिक्षितापेक्षां सुशिक्षितांनाच अधिक आवडण्यासारखें होतें. कारण त्यामध्यें ग्राम्यपणा मुळींच नसून सु-संस्कृतीची लकाकी भरलेली असे, व ब्रिटिश पार्लमेंटमधील नांवाजलेले वक्तेही त्याचें भाषण ऐकतांना प्रेमानें तल्लीन होत. त्याची कल्पनाशक्ति फारच विशाल होती, व भाषेंतील अलंकार योजणें हा त्याच्या हातचा नुसता मळ होता. यामुळें कोणत्याही विषयासंबंधानें उत्कृष्ट शब्दचित्र रेखाटून त्यांतील देखावे कोटीबाज व खुसखुशीत शब्दांनीं त्याला दाखवितां येत असत. ग्रॅटन हा आयरिश मुत्सद्दी व वक्ते यांमध्यें मूर्धाभिषिक्तच होऊन गेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# वूल्फटोन

इंग्रजांशीं निव्वळ दंडेली करून आपल्या राष्ट्रास निर्भेळ स्वातंत्र्य मिळवून देण्याची आकांक्षा ज्या कांहीं थोड्या अविचारी अशा आयरिश देशभक्तांनीं मनांत धरून प्रत्यक्ष उद्योग केला होता, अशांमध्यें वूल्फटोन हा मुख्य आहे. वूल्फटोनचा जन्म सन १७६४ मध्यें झाला. त्याचें शिक्षण समाप्त झाल्यावर तो लवकरच राजकारणांत शिरला, आणि त्याची बुद्धिमता, उद्योगप्रियता, धैर्य, साहसबुद्धि व घटनाशक्ति हीं कांहीं अलौकिक असल्यामुळें ज्या गोष्टी त्याच्या बरोबरीच्या अथवा त्याच्याहून वडील व अनुभवी अशा लोकांच्या मनाला आकलन करतां आल्या नाहींत, त्यांची स्फूर्ति त्याच्या मनांत होऊन टोन यानें उद्योगांत सर्वांच्याही पुढें भरारी मारली. सन १७९१ सालीं त्यानें बेलफास्ट येथें 'संयुक्त आयरिश राष्ट्रमंडळ' या नांवाची सभा स्थापित केली. प्रथमतः या सभेचा उद्देश व तिनें योजिलेला कार्यक्रम केवळ कायदेशीर पद्धतीनें देशांतील राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्यासंबंधाचा होता. तिनें आपल्या हातीं जें पहिलें काम घेतलें तें, रोमन क्याथोलिक लोकांचा छळ करणारे जे अमानुष कायदे त्यावेळीं अस्तित्वांत होते त्यांविरुद्ध चळवळ करून ते रद्द करविणें हें होय. टोन हा स्वतः प्रॉटेस्टंट पंथाचा होता, तथापि तारुण्याच्या उत्साहानें आणि शुद्ध स्वदेश भक्तीनें त्याचें मन उज्ज्वल झालेलें होतें, यामुळें राष्ट्राच्या पुनर्जीवनाकडे पहातां, आपल्या देशबांधवांपैकी, एका मोठ्या वर्गाचीं दुःखें प्रथम त्याच्या दृष्टीस पडलीं व तीं घालविण्याचा

उपक्रम करून राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्याचा खरा प्रारंभ आपण केला असें त्यास वाटलें व ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ज्यांस निव्वळ माथेफिरू किंवा अराजक असें म्हणतां येईल अशांपैकीं टोन हा नव्हता. त्याच्या मनावर खऱ्या स्वातंत्र्यप्रेमाचा संस्कार उत्कृष्ट घडलेला होता. परंतु सामाजिक दुःख निवारण करण्याच्या कामाच्या मार्गांत ज्या अडचणी सभेस येऊं लागल्या, त्या टोन यास दुःसह वाटल्या; आणि जगांत इतरत्र राजकारणामध्यें ज्या प्रचंड घडामोडी त्यावेळीं सुरू होत्या, त्याजकडे त्याचें लक्ष वेधलें.

कायदेशीर चळवळ करणारी सभा असें जें लक्षण 'संयुक्त आयरिश राष्ट्रमंडळा'चें ह्या वेळेपर्यंत कायम होतें, त्यापासून तें हळू हळू भ्रष्ट होऊं लागलें. या वेळीं आयरिश पार्लमेंटची स्थिति फारशी चांगली नव्हती. ग्रॅटनसारख्या सात्त्विक देशभक्तानें यापूर्वी पंधरा सोळा वर्षांपासून पार्लमेंट सुधारण्याचे जे प्रयत्न चालविले होते, ते जवळ जवळ निष्फळ होऊन तिच्यांतील सभासदांवर ग्रॅटनच्या वक्तृत्वापेक्षां पिटच्या लाचलुचपतीचाच परिणाम अधिक झाला होता. यामुळें अशा पार्लमेंटच्या हातून देशसुधारणा कसची घडून येणार? असें वाटून निराशेच्या शल्यानें त्याचें मन विदीर्ण झालें असतां त्यांतच फ्रान्स व अमेरिका या देशांतील चळवळी पाहून निर्भेळ स्वातंत्र्य मिळविण्याच्या अद्‌भुतरम्य अशा कल्पनेचें बीज रुजलें गेलें. जी गोष्ट अमेरिका व फ्रान्स या देशांमध्यें लोकांस साध्य झाली, तीच आयरिश लोकांसही साध्य झाली पाहिजे असा त्यानें तर्क केला. परंतु आपल्या भोंवतालच्या विशेष प्रकारच्या परिस्थितीची अटकळ त्यास बरोबर न करतां आल्यामुळें त्याचा तर्क अखेर खोटा ठरला. 'संयुक्त आयरिश मंडळा'च्या स्थापनेपासून तीन वर्षांतच तिच्या स्वरूपांत स्थित्यंतर झालें, व सन १७९४ सालीं सभेमध्यें वादविवाद व मतभेद होऊन नेमस्त मताची मंडळी तींतून निघून गेली, व बाकी राहिलेल्यांनीं सभेस क्रांतिकारक गुप्तमंडळी बनविलें. या नवीन मंडळांत टोन, टॉमस, एमेट, निलसन, रसेल, नॅपर टॅन्डी, आणि

डब्लिन वगैरे प्रमुख शहरांतील कांहीं तरुण लोक प्रमुख होते. टोन हा स्वतः प्रॉटेस्टंट असल्यामुळें अलस्टर वगैरे प्रांतांत, म्हणजे जेथे राजनिष्ठ प्रॉटेस्टंट लोकांचें वर्चस्व होतें, तेथेंही सदर सभेस बरेच अनुयायी मिळाले. या सभेचा सभासद होण्यास गुप्त शपथ घ्यावी लागे. व ही शपथ घेऊन नवीन सभासद मिळविण्याची जबाबदारी जुन्या सभासदांवर असे.

कर्मधर्मसंयोगानें सन १७९४ सालीं प्रजासत्ताक अशा फ्रेंच राजमंडळाकडून विलियम जॅकसन या नांवाचा एक गृहस्थ आयर्लंडमध्यें आला. तो स्वतः प्रॉटेस्टंट धर्मोपदेशक असल्यामुळें त्यानें आणलेला क्रांतिकारक संदेश ' संयुक्त राष्ट्रमंडळा ' स विशेषच ग्राह्य वाटला, परंतु जॅकसन हा भोळवट व उथळ मनाचा असल्यामुळें, त्याचे सर्व बेत कोकेन नांवाच्या गृहस्थास कळले व कोकेन हा लोभी असल्यामुळें अर्थात् अधिकारीवर्गाकडून त्याची नेमणूक गुप्त पोलिसांत झाली. सन १७९४ चे एप्रिलांत जॅकसन यास अधिकाऱ्यांनीं कैद करून फांशी देण्याचें ठरविलें, परंतु त्यानें स्वतःच विष खाऊन आत्महत्या केली. टोन व जॅकसन यांचा गुप्त संबंध अधिकाऱ्यांस माहीत असल्यामुळें टोन याजवरही फाशीचाच प्रसंग यावयाचा; परंतु तो अमेरिकेस निघून गेला व नंतर तेथेंच त्यानें आपल्या कामास सुरवात केली. या ठिकाणीं त्यास त्याच्या आयरिश साथीदारांकडून उत्साहपूर्ण व आशाजनक अशीं पत्रें येऊं लागल्यामुळें त्यानें फिलाडेल्फिया येथून फ्रेंच राजमंडळाशीं पत्रव्यवहार सुरू केला; व फ्रेंच सैन्य आयर्लंडांत पाठविण्यांत येईल तर आयरिश लोकांकडूनही उचल होईल असें त्यानें त्यांस सुचविलें. इतर आयरिश लोकांप्रमाणें टोन हा अमेरिकेंत जाऊन कामधंदा करून अगर सैन्यांत नोकरी धरून राहता तर झटकन नांवारूपास आला असता. परंतु त्यानें आरंभिलेला उद्योगच त्यास अधिक प्रिय वाटून तो आपल्या पराक्रमी स्त्रीसहवर्तमान पॅरिस येथें आला; व त्या वेळचा फ्रेंच युद्धमंत्री कार्नो याच्याशीं त्यानें बोलणें लाविलें. टोन यानें कार्नो याची अशी खात्री करून दिली कीं,

जरकरितां फक्त वीस हजार फ्रेंच सैन्य आयर्लंडांत उतरलें तर आयरिश लोकांच्या बंडास जरूर तेवढी मदत होऊन आयर्लंड स्वतंत्र होईल. कार्नो यानें ती गोष्ट मान्य करून सैन्य पाठविण्याचें ठरविलें. सन १७९६ चे डिसेंबरचे १६ तारखेस ब्रेस्ट येथून लहान मोठीं अशीं तीस जहाजें, पंधरा हजार सैन्य, आयरिश लोकांस पुरविण्याकरितां हत्यारें घेऊन आयर्लंडवर स्वारी करण्यास निघालें. टोन यास फ्रेंच सैन्यांतील ॲडज्यूटंट जनरल असा हुद्दा देण्यांत आला होता. आरमारावर ॲडमिरल हॉच नांवाचा अधिकारी मुख्य होता. हें सर्व सैन्य आयर्लंडच्या किनाऱ्यावर जाऊन पोहोंचतें तर कदाचित् टोन याच्या कल्पनेप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्याही असत्या. परंतु आरमाराच्या दोन भागांची चुकामूक झाली. एक भाग टोन व हॉच यांसह बॅन्ट्रीबे नांवाच्या उपसागरांत येऊन बरेच दिवस मुक्काम करून राहिला; पण या एकाच भागांतील सहा सात हजार लोकांनीं किनाऱ्यावर उतरून आपल्या कामास प्रारंभ करावा किंवा नाहीं, याविषयीं कांहीं दिवस वाटाघाट चालली. इतक्यांत मोठें वादळ झालें, जहाजांचे नांगर तुटले व या आरमारास फ्रान्स येथें परत यावें लागलें. यामुळें टोन याची अत्यंत निराशा झाली; परंतु त्यानें धीर सोडला नाहीं. सन १७९७ सालीं डच लोकांनीं स्थापिलेल्या प्रजासत्ताक मंडळानें टोन यास मदत देण्याचें कबूल करून पूर्वीएवढें आरमार व सैन्य त्याचे स्वाधीन केलें. परंतु फिरून पूर्वीप्रमाणेंच वाऱ्याच्या प्रतिकूलतेमुळें स्वारी करण्याचा बेत फसला. फिरून १७९७ सालीं फ्रान्स येथील मंत्रिमंडळानें इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां सैन्य तयार करून त्यावर जनरल बोनापार्ट यास मुख्य नेमिलें. हें पाहून तर टोन यास अधिकच आशा उत्पन्न झाली, आणि त्याच्या व बोनापार्ट याच्या कित्येक भेटी होऊन संभाषणही झालें. परंतु अगदीं आयत्या वेळेस इंग्लंडवर स्वारी करण्याचा बेत रहित होऊन पुढील सालीं मे महिन्यांत, जमलेलें सैन्य घेऊन बोनापार्ट हा इजिप्तवर स्वारी करण्यास

निघून गेला. यामुळें टोन यास ' वरंडलंब्बूक इव दूरमुत्क्षिप्य पातितः ' असें होऊन तो निराशेनें जवळजवळ वेडा झाला. आयर्लंडांतील अधिकाऱ्यांनींही, कांहीं तरी तजवीज लवकरच केली पाहिजे, नाहीं तर बंडावा फैलावेल, असा विचार करून लॉर्ड एडवर्ड फिडझरल्ड व टोन याचे आणखी कित्येक सहकारी पकडले. इकडे आयरिश शेतकऱ्यांमध्यें बेबंदशाही माजली होती व त्यांजवर होणारा जुलूम व जाच त्यांना असह्य वाटूं लागला होता. या सर्व कारणांचा एकदम परिणाम होऊन बोनापार्ट हा इजिप्तवर स्वारी करण्यास निघाल्यापासून तीन दिवसांचे आंत आयर्लंडमध्यें उघड रीतीनें बंड सुरू झालें, व टोन हा उतावीळ होऊन ' हीच वेळ आहे, तरी या वेळेस काय मिळेल तें सैन्य आयर्लंड-वर धाडा' असें सांगण्याकरितां फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांकडे खेपा घालूं लागला. फिरून स्वारी करण्याच्या बेताची वाटाघाट होऊं लागली. जनरल हम्बर्ट नांवाचा एक फ्रेंच लष्करी अंमलदार थोडीशी युद्धाची सामग्री घेऊन टोनसहवर्तमान अधिकाऱ्यांच्या हुकुमाची वाट न पाहतां फक्त एक हजार सैन्यानिशीं आयर्लंडच्या किनाऱ्यावर जाऊन उतरला, व तोंड देण्यास आलेल्या इंग्रजी सैन्याचा पराभव करून तो पुढें चाल करून जाऊं लागला. परंतु जनरल लेक हा वीस हजार सैन्यानिशीं आडवा येऊन त्यानें त्याचा पराभव केला. हें पाहतांच आणखी पांच हजार सैन्य देऊन हारडी नांवाच्या सरदारास टोन याजबरोबर आयर्लंडास पाठविण्यांत आलें. या छोट्या आरमाराची व इंग्रजी आरमाराची गांठ पडून तुंबळ युद्ध झालें, व शेवटीं फ्रेंच आरमाराचा पराभव झाला. मुख्य जहाजावर टोन हा फ्रेंच लष्करी अधि-काऱ्याचा पोषाख घालून लढत होता व आपल्या हातानें तोफांस सरबत्ती देत होता. टोन यास प्रथम कोणी न ओळखिल्यानें त्यास इतर फ्रेंच अधिकाऱ्यां-प्रमाणें प्रथमतः लष्करी सन्मानानें वागविण्यांत आलें. परंतु दुर्दैवानें लव-करच त्याच्या एका आयरिश मित्रानें त्यास ओळखिलें, व लगेच आयरिश बंडखोर या नात्यानें टोन यास वागविण्यास सुरुवात होऊन त्यांनीं त्याच्या

पायांत बिड्या घातल्या. पण यांत फ्रेंच लष्करी पोषाखाचा अपमान होत आहे तो होऊं नये म्हणून त्यानें तो पोषाख अंगावरून काढून फेंकून दिला, व ' सन्मानाच्या किताबाचा बिल्ला लटकविणाऱ्या सोन्याच्या साखळीपेक्षां मला स्वदेशहिताकरितां पायांत पडलेल्या बिड्याच अधिक प्रिय वाटतात, ' असें म्हणून त्या लोखंडी सांखळ्यांचें त्यानें चुंबन घेतलें.

सन १७९८ च्या नवंबरचे दहावे तारखेस त्याची डब्लिन येथें लष्करी कोर्टामार्फत चौकशी होऊन त्यास देहांत शिक्षा ठरविण्यांत आली. सदर चौकशीचे वेळीं दोषारोपांतील सर्व गोष्टी त्यानें एकदम कबूल केल्या व लिहून आणलेलें सणसणीत भाषण कोर्टापुढें वाचून दाखविलें. तें भाषण अत्यंत प्रेमळ व आवेशयुक्त असें होतें. त्याच्या भाषणांतील मुख्य मुद्दा असा होता कीं, " मीं स्वदेश स्वतंत्र करण्याकरितां उघड लढाई केली ही गोष्ट खरी आहे, परंतु हें सर्व मीं देशांत चाललेले मूर्ख अत्याचार, गुप्त वध वगैरे बंद व्हावे एवढ्याकरितांच आरंभिलें होतें. मी वाशिंग्टनप्रमाणें यशस्वी झालों असतों तर मला खचित कोणीं नांवें ठेविलीं नसतीं. परंतु माझे प्रयत्न केवळ निष्फळ झाले एवढ्याकरितांच मला बंडखोर अगर गुप्त वध करणारा वगैरे अपमानकारक विशेषणें लावणें गैर होईल. " हें भाषण चाललें असतां न्यायपीठावर बसलेले लष्करी अधिकारी व टोन यांजमध्यें बरींच प्रश्नोत्तरें झालीं, व त्यावरून टोन याचा पाणीदारपणा कळून आला. तसेंच आपल्या भाषणांत त्यानें क्याथोलिक लोकांविषयीं जी अत्यंत कळकळ व जो प्रेमभाव उदारपणानें व्यक्त केला, तो पाहून या आयरिश देशभक्ताच्या देशभक्तीचा विस्तार खरोखर किती व्यापक होता, व त्याचें मन किती मोठें होतें हें कोणासही तेव्हांच दिसून येईल. अखेर शिक्षा सांगण्याचे वेळीं आपणास गोळी घालून मारण्याचा लष्करी मान तरी मिळावा अशी त्यानें कोर्टाची विनवणी केली, परंतु शेवटीं त्यास फांशी देण्याचीच शिक्षा लॉर्ड कॉर्नवालीस यानें ठरविली. दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे तारीख १२ रोजीं त्यास फांशी

देणार तों, आदले दिवशीं रात्रीं तुरुंगाच्या अंधार कोठडींत कोणास न कळत त्यानें चाकूनें आपली रक्तवाहिनी शीर कापण्याइतकी जबर जखम गळ्यास करून घेतली, व भयंकर रक्तस्राव होऊन तो उजाडेपर्यंत आसन्नमरण होऊन पडला. ही बातमी बाहेर कोणास कळली नाहीं. इकडे १२ वे तारखेस सकाळीं त्या वेळचा प्रसिद्ध वक्ता व वकील क्यूरन हा गडबडीनें हायकोर्टा-पुढें उभा राहून त्यानें अशी तक्रार केली कीं, टोन याचा गुन्हा बंड करण्याचा जरी असला, तरी त्याची चौकशी लष्करी कोर्टामार्फत होणें हें बेकायदेशीर आहे, व ही तक्रार मान्य करून हायकोर्टानें टोन यास तुरुंगांतून काढून आपणासमोर हजर करण्याबद्दल 'शेरिफ' यास तांतडीचा हुकूम व वारंट सोडलें. कारण कीं, कदाचित् हुकूम पोहोंचण्याचे आधींच फांशीच्या शिक्षेची अंमलबजावणी व्हावयाची! शेरिफ तुरुंगांत जाऊन पहातो तों, टोन जखमी होऊन पडलेला. ही बातमी हायकोर्टास लागतांच हायकोर्टाच्या चीफ् जज्जानें त्याच्या फांशीची शिक्षा तहकूब केली, व नंतर सात दिवसपर्यंत अत्यंत कष्ट होऊन तो तारीख १९ नवंबर सन १७९८ रोजीं तुरुंगांतच मरण पावला. अशा रीतीनें आयर्लंडचा एक उत्कृष्ट देशभक्त मोहरा अकालीं खर्ची पडला.

टोन यानें आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी बॅरिस्टरीची परीक्षा दिली होती. परंतु वकिली वगैरे न करतां सार्वजनिक कामास वाहिलेल्या त्याच्या आयुष्याचा अंत पुढें नऊ वर्षांतच अशा अद्भुत व अकल्पित रीतीनें व्हावा असा ईश्वरी संकेत होता व तसेंच घडून आलें.

---

# रॉबर्ट एमेट

याचा जन्म १७७८ त झाला. याचा बाप डॉक्टर एमेट हा प्रख्यात व लोकमान्य असा वैद्य असे. याचा विद्याभ्यास ट्रिनिटी कॉलेजांत झाला. त्या वेळीं याचा सहाध्यायी व परम मित्र थॉमस मूर हा होता. हा मूर पुढें आयर्लंडांतील उत्कृष्ट कवि म्हणून प्रसिद्धीस आला. एमेट हा आपल्या वेळीं कॉलेजांतील अत्युकृष्ट वक्ता म्हणून नाणावला होता. परंतु त्याचीं राजकीय मतें अत्यंत प्रखर असल्यामुळें त्यास कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं कॉलेजांतून काढून टाकलें होतें. आपणाविषयीं सरकारास संशय आला असें वाटल्यावरून तो युरोपांत गेला, व तेथें त्यास पुष्कळ राजकीय गुन्हेगार भेटले. सन १८०० सालीं आयरिश पार्लमेंट सभा मोडल्याचें ऐकून त्यास फार वाईट वाटलें. एमेट हा फ्रान्समध्यें गेला तेव्हां बोनापार्टची व त्याची गांठ पडली; व फ्रान्स व इंग्लंड यांजमध्यें युद्ध सुरू होतांच फ्रेंच सैन्य आयर्लंडांत उतरेल असें बोनापार्ट यानें एमेट यास सांगितलें. १८०२ च्या आक्टोबर महिन्यांत एमेट हा आयर्लंडांत परत आला व तें युद्ध सुरू होतांच मोठ्या आशेनें त्यानें हत्यारें व दारुगोळा यांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. ता. २३ जुलै १८०३ रोजीं बंडास सुरुवात व्हावयाची, परंतु इतर ठिकाणीं लोकांची जमवाजमव न झाल्यामुळें डब्लिन येथें बंडास सुरुवात झाल्यापासून एक तासाचे आंतच त्याची परिसमाप्ति झाली. त्या दिवशीं सायंकाळीं त्याच्या लोकांनीं चरकी बाण सोडून ठरलेली इशारत दिली, व तितक्यांत मुख्य न्याया-

धीश लॉर्ड किलवारडेन हा त्यांच्या हातीं चुकून सांपडतांच त्यांनीं त्याचीच कत्तल केली. अर्थात् चहूंकडे धराधरी झाली व रात्रीचे दहा वाजण्याचे आंतच हें बंड संपलें! रॉबर्ट एमेट यास गुप्त स्थळीं छपून रहावें लागलें. तो तसाच एक महिनाभर लपून होता; परंतु प्रख्यात वकील क्यूरन याची मुलगी व एमेट यांचें परस्पर प्रेम होतें, तिला भेटून मग देशांतर करावें, अशा विचारांत तो असतां फसगमतीनें पकडला जाऊन ठराविक रीतीनें त्याचा शेवट झाला. त्यानें कोर्टास उद्देशून केलेलें भाषण अत्यंत वक्तृत्वपूर्ण व धैर्यशीलपणाचें आहे. त्यास ता. २० सप्टेंबर १८०३ रोजीं फांशी देण्यांत आलें. आपल्या भाषणात त्यानें लोकांस अशी विनंति केली कीं, 'माझ्या थडग्यावर कोणी कांहीं लिहूं नये, मला कीर्ति व नांव यांची चाड नाहीं' व लोकांनींही त्याच्या इच्छेप्रमाणेंच केलें.

------

# डॅनियल ओकॉनेल

कायदेशीर चळवळ करणाऱ्या आयरिश पुढाऱ्यांपैकीं ग्रॅटनच्या तोडीचा परंतु कांहीं निराळ्या प्रकारचा असा डॅनियल ओकॉनेल हा प्रख्यात देशभक्त होऊन गेला. ग्रॅटनला जरी सर्व लोक मान देत, तरी त्याचा अनुयायी वर्ग म्हटला म्हणजे फक्त सुशिक्षित व वरिष्ठ प्रतीचे लोक हे होते. ओकॉनेल हा स्वतः या वर्गापैकींच एक होता, तरी त्याचे अनुयायी वरिष्ठ वर्गापेक्षां कनिष्ठ वर्गातच अधिक होते. ओकॉनेल ह्याचा पोटाचा धंदा वकिली हा असल्यामुळें एक तर त्याला समाजांतील सर्व दर्जाच्या लोकांमध्यें मिसळावें लागत असे; परंतु विशेषतः त्याच्या बोलण्याची ढब, मनाची ठेवण व चळवळीचें धोरण समाजांतील वरिष्ठ वर्गापेक्षा मध्यम व कनिष्ठ वर्गास अधिक पसंत पडेल असेंच होतें. एका दृष्टीनें पाहतां ग्रॅटनपेक्षां ओकॉनेल यानेंच लोकशिक्षणाचें काम अधिक केलें व लोकसमाज अधिक खळबळून सोडला. ग्रॅटन यास जसा 'पार्लमेंट सभेचा जनक' अशी बहुमानाची पदवी समाजाकडून मिळाली, तशीच क्याथोलिक लोकांचा 'उद्धारकर्ता अवतार' अशी पदवी ओकॉनेल यास देण्यांत आलेली आहे.

ओकॉनेल याचा जन्म तारीख ६ आगस्ट सन १७७५ सालीं आयर्लंडचे नैर्ऋत्येस समुद्रकांठीं एका लहानशा गांवीं झाला. त्याचें घराणें शेंदोंनशें वर्षांचें असून क्याथोलिक धर्माचे कट्टे अभिमानी अशी या घराण्यांतील पुरुषांची ख्याति असे. आयर्लंडांत धर्मच्छळास सुरुवात झाल्यानंतर समुद्रकांठीं

ग्लेन कॉर्लचे आसपास उंच डोंगराळ प्रदेशांत लहानशी जमीनदारी करून, प्रॉटेस्टंट लोकांचा त्रास होऊं नये म्हणून डॅनियलचा आजा रहात असे. ह्या घराण्यापैकीं मॉर्गन व मॉरीस या भावांपैकीं, डॅनियल हा मॉर्गनचा मुलगा त्याचा चुलता मॉरिस यानें दत्तक घेतला. त्या दोघांचीही व्यापारानें व इतर रीतीनें कामावलेली मिळकत डॅनियल यास मिळाली. लहानपणापासून डॅनियल याची तरतरीतपणाबद्दल प्रख्याती असे. त्याची स्मरणशक्ति उत्कृष्ट असून बुद्धि तीव्र असे. सगळें धुळाक्षर तो अवघ्या दीड दिवसांत शिकला. दहावे वर्षी त्यानें एक चिमकुलें नाटक लिहिलें. सन १७८८ चे सुमारास क्याथोलिक लोकांस शाळा घालण्याची अर्धवट सवलत मिळाल्यामुळें नवीन उघडलेल्या एका शाळेंत त्याचें दुय्यम प्रतीचें शिक्षण झालें. परंतु वरिष्ठ शिक्षणाची सोय स्वदेशांत नसल्यामुळें तो आपल्या भावासह सन १७९१ सालीं फ्रान्समध्यें सेन्ट ओमर नांवाच्या कॉलेजांत शिकण्याकरितां गेला. फ्रान्समधील राज्यक्रांतीची धामधूम अद्यापि थांबली नव्हती व फ्रान्समध्यें असतांना या धामधुमीचा कांहीं भाग डॅनियल यास प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहातां आला. परंतु जी धामधूम त्यानें पाहिली, तिजमध्यें स्वातंत्र्यप्रियतेपेक्षां बदमाषगिरीच त्याला अधिक दिसून आली. यामुळें कांहीं अंशीं राजपक्षास अनुकूल अशींच त्याचीं मतें बनलीं. सन १७९३ सालीं फ्रान्सहून परत आल्यावर तो कायद्याचा अभ्यास करण्याकरितां इंग्लंडास गेला, व हा अभ्यास करतांना इंग्लंडांतील राजकारण वगैरेंचें सूक्ष्म निरीक्षण करून सन १७९८ सालीं आयर्लंडमध्यें बॅरिस्टरीच्या धंद्यास त्यानें सुरुवात केली.

पहिलीं तीनचार वर्षें त्याचा धंदा विशेष चालला नाहीं. या सालांत त्याच्या प्राप्तीची मजल सालीना दोनतीनशें पौंडापलीकडे गेली नाहीं. परंतु वकिलीच्या धंद्याची त्याला मनापासून आवड असल्यामुळें त्या धंद्यास तो तसाच चिकटून राहिला व पुढें लवकरच उदयास आला. कोर्टांतील न्याय इनसाफाच्या कामीं गम्मत वाटणें व वादिप्रतिवादींचा खेळ खेळून त्यांत आनंद

मानणें हें कोणत्याही समाजाच्या अवनतीचें एक लक्षण म्हणून खुशाल समजावें· व हें लक्षण आयरिश समाजावर या वेळीं पूर्णपणें उमटलें होतें. कधीं देवळांत अगर नाटकगृहांत जी गर्दी जमावयाची नाहीं, ती कोर्टांतून जमलेली आढळून येई, व वादीप्रतिवादींची छक्कड, साक्षीदारांचे डावपेंच व विनोद वकिलांच्या कोट्या व वक्तृत्व वगैरेपासून श्रोत्यांस व प्रेक्षकांस अगदीं अस्सल सुखाचा गड्डा आपणांस उपभोगावयास मिळाला कीं काय असें वाटे. अर्थात् हुशार व तरतरीत वकील जितका लोकप्रिय, तितका समाजांत दुसरा कोणीही लोकप्रिय असणें शक्य नव्हतें. सार्वजनिक कामांतील पुढाकारही वकीलवर्गाकडेच असे. यामुळें या वेळच्या तरुण बॅरिस्टर व वकील लोकांना स्वार्थ व परमार्थ यांचा उत्कृष्ट मेळ घालतां येई, व ते समाजाचे पुढारी स्वाभाविकपणेंच बनत. डॅनियलच्या अंगीं वकिलीस लागणारे सर्व गुण पुरे होते. वक्तृत्व हा त्याचा हातचा मळ असून प्रसंगानुसार सर्व कोर्टास खदखदां हंसावयास किंवा ढळढळां रडावयास लावण्याचें सामर्थ्य त्याच्या वाणींत व नाटकी अंगविक्षेपांत होतें. शिवाय साक्षीदाराची उलटतपासणी करण्यांत त्याचा हातखंडाच असे. कसलाही बिलंदर साक्षीदार पुढें आला तरी त्याला पापडासारखा भाजून, किंवा त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागून व त्याच्या पोटांत शिरून त्याला तो तेव्हांच आपलासा करी; व मग त्याचे तोंडून काय वाटेल तें काढून घेई. परंतु याहूनही दुसरे एकदोन गुण त्याच्या लोकप्रियतेस कारणीभूत झाले होते. पैकीं एक हा कीं, जरूरीप्रमाणें खुद्द न्यायाधिशाचे अंगावरही बेमुरवत तोंड टाकण्याचें त्याचें धैर्य होई व वकीललोकांचें जीवित न्यायाधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असतें आणि त्यांतूनही आपण रोमन क्याथोलिक पंथाचे म्हणून सर्वथा निराश्रित असे असतां उगाच तोंड टाकून आपल्या पायावर कुऱ्हाड घालून कां घ्यावी, अशा तऱ्हेचा विचार त्याच्या मनास केव्हांही शिवला नाहीं. तो कसें, केव्हां कोणावर तोंड टाकून त्याला लोळवील याचा नेम नसल्यानें, पक्षकारापासून तों न्यायधिकाऱ्यापर्यंत सर्व लोक त्यास भिऊन वागत. दुसरा विशेष गुण

म्हटला म्हणजे गरीब लोकांचीं कामें तो केव्हां केव्हां फुकट चालवी. काम खरें व बाजू न्यायाची, आणि त्यांतल्या त्यांत अधिकारी वर्गावर चार शिंतोडे उडण्यासारखी अशी त्याची खात्री झाली म्हणजे, दीन व अनाथ अशा लोकांस तो एक पैही न घेतां मदत करी. यास्तव थोडया दिवसांतच लोकांत अशी प्रसिद्धी होऊन गेली कीं, ज्या कोणास वाली नसेल त्याचा वाली ओकॉनेल, त्याजकडे जावें व आपलें काम खुशाल करून घ्यावें. अधिकाऱ्यांच्या शिरजोरपणाच्या व धर्मच्छलाच्या अशा त्या काळीं जनतेचा असा एखादा वाली हवाच होता, व ती उणीव ओकॉनेल यानें निःसंशय भरून काढली होती. त्यावेळीं डब्लिन शहरांत 'वकील' याचा अर्थ डॅनियल ओकॉनेल असाच असे व शहराचे कोणत्याही भागांत 'वकिलाचें घर कोठें आहे ?' असें कोणीं विचारलें म्हणजे ते ओकॉनेलच्या घराचा पत्ता सांगत.

ओकॉनेल याचें लक्ष स्वार्थाइतकेंच परार्थाकडेही होतें. सार्वजनिक कामाची त्याला स्वभावतः मोठी हौस असे व वकिलीच्या धंद्यामुळें जी लोकप्रियता व जें वजन त्याला मिळालें, त्याचा उपयोग त्यानें सार्वजनिक कामाकडे प्रामाणिकपणानें केला. सार्वजनिक कार्यकारी या नात्यानें त्याच्या आयुष्यांतील पहिलीं पहिलीं वर्षें त्याचें धोरण ठरलेलें नव्हतें. या वेळीं ग्रॅटन, फ्लड व चार्लमॉंट हे लोकांचे पुढारी असून ओकॉनेल हा त्यांचा चाहता भक्त होता. परंतु या लोकांशिवाय वूल्फटोनप्रभृति लोक दुसऱ्या पक्षाचे पुढारी असून या पक्षाची खटपट स्वातंत्र्य मिळविण्यासंबंधाची होती. प्रथम प्रथम कोणत्या पक्षास मिळावें याविषयीं त्याचा निर्णय व निश्चय होईना. परंतु एकदम संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट नुसत्या सनदशीर चळवळीपेक्षां अननुभवी मनुष्यास तारुण्याच्या ऐन उमेदीच्या काळीं अधिक उदात्त व ग्राह्य वाटावी हें स्वाभाविकच असल्यामुळें 'युनायटेड आयरिशमेन' अथवा 'संयुक्त आयरिश मंडळ' या नांवाची जी एक सभा स्वातंत्र्यवादी पक्षानें स्थापन केल्याचें मागें सांगितलें आहे तिची शपथ घेऊन ओकॉनेल हा तिचा सभास-

दही झाला. परंतु लवकरच त्याचें मन विटण्यासारख्या एक दोन गोष्टी त्याचे नजरेस पडल्यामुळें, त्याच्या मनानें माघार घेतली. वर सांगितलेल्या मंडळामध्यें हजारों तरुण मुलांचा समावेश झालेला होता. यापैकीं कांहीं मुलें एके दिवशीं रस्त्यानें जाणाऱ्या एका गरीब मुलीची टवाळी करीत आहेत असें त्याला आढळलें. अर्थात् तिला त्यांच्यापासून सोडविण्याकरितां ओकॉनेल हा पुढें झाला. तेव्हां त्या टारग्या पोरांनीं त्याजवर हल्ला करून इतकें त्यास बेदम मारिलें कीं, जखमा होऊन त्यास कांहीं दिवस अंथरुणांत पडून रहावें लागलें; नंत हीं टवाळ मुलें संयुक्त आयरिश मंडळांतील आहेत असें त्यास कळल्यावर त्याला फार खेती वाटली. तसेंच या मंडळाचीं गुप्त कारस्थानें काय आहेत व देशभक्तीच्या नांवावर त्यांच्या हातून अचरटपणाचीं कसकशीं कामें होतात, यांच्या कृतीचे काय परिणाम होतात, याची त्याला चांगलीशी माहिती नव्हती, तीही त्याच्या घरवाल्यानें त्यास करून दिली. परंतु हें सर्व होण्याच्या पूर्वींच त्याचे हातून मंडळाचा सभासद या नात्यानें थोडेंबहुत काम होऊन गेलें होतें. प्रत्येक सभासदास कांहीं तरी नवीन सभासद आपल्या खटपटीनें मिळवावयाचे असत; व असे कांहीं सभासद ओकॉनेल यानें शपथा देऊन मिळविलेही होते. पुढें बंडाचो भुमका उठून देशांत जारीनें चौकशी सुरू झाली. गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला. या अशा धामधुमींत तो अवचित एखादे वेळीं पकडला जाण्याचा संभव होता. परंतु त्याच्या सुदैवानें तो त्याच सुमारास आजारी झाला, व बरेच दिवस अंथरुणास खिळून पडला होता, यामुळें बाहेर फिरकणें टळलें. या अवधींत पोक्त विचाराअंतीं बंडाच्या चळवळीविरुद्ध त्याचें मत बनलें. बरा होतांच त्यानें मंडळाचा सभासदपणा सोडून दिला, इतकेंच नव्हे तर देशाचें रक्षण करण्याकरितां खासगी लोकांचें एक स्वयंसेवक सैन्य उभारलें गेलें त्यामध्यें डब्लिन येथील लोकांनीं तोफखान्याची एक तुकडी तयार केली, तिजमध्यें ओकॉनेल हा सामील झाला.

बंडाचा मोड झाल्यानंतर शांततेचे दिवस आले व शांततेच्या दिवसांत

सनदशीर चळवळीचा फिरून उपक्रम झाला. या वेळीं चळवळीचा सर्व भर क्याथोलिक लोकांस समान हक्क व धर्मस्वातंत्र्य मिळवून देण्यावर होता. आणि ओकॉनेल हा स्वतः क्याथोलिक धर्माचा असल्यामुळें स्वधर्मीयांना मदत करण्यास त्यास सहजच स्फूर्ति झाली. या चळवळीस सन १७६० सालीं प्रथम सुरवात झाली, व त्या सालीं ' क्याथोलिक असोसिएशन ' नांवाची सभा स्थापन होऊन उघड व पद्धतशीर रीतीनें क्याथोलिक लोकांच्या हक्कासंबंधीं पूर्वपक्ष करण्यांत येऊं लागला. या सभेच्या उद्योगानें व लोकमतांत थोडाबहुत फरक पडत चालल्यानें सन १७७६ सालीं कांहीं कांहीं बाबतींत कायद्यानें क्याथोलिक लोकांचीं बंधनें ढिलीं होण्यास सुरवात झाली. या काळचा क्याथोलिक लोकांचा पुढारी जॉन किआघ या नांवाचा एक मोठा अब्रूदार व निस्सीम देशभक्त असा श्रीमंत व्यापारी होता. त्यानें सन १७६० पासून पुढें सुमारें वीसपंचवीस वर्षेंपर्यंत पैसे मिळविण्याचा आपला सर्व धंदा सोडून क्याथोलिक लोकांच्या वतीनें चळवळ करण्याचा उद्योग पत्करला. त्यानें आयर्लंडांत लोकमत जागृत केलें एवढेंच नव्हे, तर इंग्लंडास खेपा घालून तेथील पुढाऱ्यांमार्फत प्रधानमंडळाच्या मुलाखती घेऊन आपली बाजू कानावर घातली, व त्यांजकडून 'प्रिव्हीकौन्सिल' मार्फत आयरिश पार्लमेंटास कायद्याचीं बिलें धाडून किरकोळ बाबतींतील क्याथोलिक लोकांचीं बंधनें तोडण्याचा उद्योग चालविला व त्या बिलांस अनुसरूनच पुढें सन १७७६,१७९१,१७९३ वगैरे सालीं आयरिश पार्लमेंट सभेचे कायदे होऊन क्याथोलिक लोकांचा जाच पुष्कळ कमी झाला. या बाबतींत वास्तविक १७९३ सालच्या कायद्यानें इतकें काम झालें होतें कीं, त्या मानानें पुढें ओकॉनेल याचे हातून होण्याचें काम फारच थोडें राहिलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु किओघ यानें वीसपंचवीस वर्षें त्यास शक्य तितकी खटपट करून तितकें फळ मिळविलें असतांही पुढें त्याचा वृद्धापकाळ झाल्यामुळें त्याच्या हातून पुढारीपणाचें काम होईना. शिवाय लोकमताची मजल पुढें गेली असल्यामुळें या जुन्या पुढाऱ्याचें धोरण तरुण लोकांस भित्रे-

पणाचें असें वाटूं लागलें, व त्यानें पूर्वी केलेल्या कामगिरीची त्यांची आठवण हळूहळू बुजत जाऊन त्याबद्दलची कृतज्ञताही मावळूं लागली! क्याथोलिक लोकांकरितां सर्व बाबतींत प्रॉटेस्टंट लोकांच्या बरोबरीनें हक्क मिळविणें हें त्य वेळच्या चळवळीचें अंतिम साध्य होतें. असें असतां, किओघ हा हें साध्य साधण्याकरितां म्हणून इंग्लंडास लोकांच्या वतीनें गेला व तेथील मुत्सद्यांच्या बहुमानास व गुळचट थापांस भुलून फक्त स्थानिक स्वराज्याचें गुळखोबरें पदरांत घेऊन हात हालवीत परत आला, असा तरुण मंडळींनीं त्याजविरुद्ध गिल्ला केला. अशा या संधीस क्याथोलिक लोकांस नवीन पुढारी हवा असें वाटूं लागणें स्वाभाविक होतें, व कर्मधर्मसंयोगानें तसा पुढारी त्यांस मिळण्यासारखाही होता; हा पुढारी डॅनियल ओकॉनेल हा होय. डॅनियल ओकॉनेल याचा तोंड टाकून बोलण्याविषयीं हातखंडा होताच. त्यानें सभांमधून जॉन किओघच्या नेभळ्या धोरणाची टर उडविण्यास सुरुवात केली, व या वृद्धतरुण देशभक्तांच्या अंगची उद्योगशीलता व त्यांच्या मतांमधील तत्कालीन ओजस्विता यांतील फरक पाहून लोकांनीं सहजच ओकॉनेल यास पुढें ओढलें व किओघ यास मागें सारलें. ग्रॅटन हा या वेळचा पुढारी होताच, व आपल्या परीनें त्याचीही खटपट क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याची चालूच होती. परंतु त्याचें सर्व काम पार्लमेंट सभेमध्यें होई. समाजांत वावरण्यास व लोकांत मिसळण्यास एखाद्या तरुण पुढाऱ्याची व विशेषतः स्वतः रोमन क्याथोलिक पंथी मनुष्याची गरज होती. ती गरज ओकॉनेलसारखा पुढारी मिळाल्यानें भागणारी होती. शेवटीं सन १८०९ सालीं एक नवीन क्याथोलिक असोसिएशन स्थापन करून ओकॉनेल यानें स्वतः होऊन पुढारीपणास हात घातला, व सन १८११ सालीं क्याथोलिक लोकांचा यापुढें पुढारी कोण याविषयींचा संशय नाहींसा झाला.

पुढारीपणाच्या कामाबरोबर त्याच्या स्वार्थत्यागासही सुरवात झाली. व नवीन स्थापिलेल्या सभेचा खर्च त्यानें तीन वर्षेपर्यंत अंगावर सोसला. परंतु

१८११ सालीं ही सभा बेकायदेशीर असें ठरवून तिच्या सभासदांच्या निवडणुकीस अधिकाऱ्यांनीं ठिकठिकाणीं प्रतिबंध केला. हे अन्यायाचे हुकूम क्याथोलिक लोकांनीं निमूटपणें मानले; मात्र लगेच एक जाहीर सभा भरवून सदरहु हुकुमांचा त्यांनीं निषेध केला. क्याथोलिक लोकांचें भांडण इकडे इतर लोक पार्लमेंट सभेंत भांडतच होते. त्यांत ग्रॅटन वगैरे आयरिश व लॉर्ड ग्रॅनव्हिल, क्यानिंग वगैरे इंग्रजी मुत्सद्दी प्रमुख होते. १८१२ सालीं क्याथोलिक लोकांसंबंधाचा जो ठराव क्यानिंगनें पार्लमेंट सभेपुढें आणिला तो पास झाला, व त्याचे बाजूस १२९ मतें उलट बाजूहून अधिक मिळालीं. इतकें मोठें बहुमत आजपर्यंत या प्रश्नास कधींही मिळालेलें नव्हतें, व अशा रीतीनें इंग्लंडांतील लोकमत हळूहळू अनुकूळ होत चालल्यानें क्याथोलिक लोकांच्या त्रासाच्या राहिलेल्या बाबी लवकरच दूर करतां येतील अशी ग्रॅटन यास आशा वाटूं लागली. दुसरीही एक गोष्ट क्याथोलिक लोकांस या वेळीं अनुकूळ होती ती अशी. ही वेळ नेपोलियन बोनापार्टाच्या भाग्योदयाची होती. त्याचा सर्व युरोपखंडावर दरारा बसून गेला होता व त्याच्या सैन्यांत इंग्लंडवर नाराज झालेल्या सर्व प्रकारच्या लोकांची भरती होत चालली होती. या लोकांमध्यें आयरिश क्याथोलिक लोकांचा भरणा बराच होता व इंग्लंडवर पुढें मागें स्वारी होण्यास हे लोक कारणीभूत होतील अशी पिट वगैरे मुत्सद्यांस भीति पडल्यानें, क्याथोलिक लोकांस संतुष्ट राखण्यांतच इंग्लंडचें हित आहे असें त्यांना वाटूं लागलें होतें; यामुळें क्याथोलिक लोकांस त्यांचे हक्क या संधीस सर्वच मिळून जावयाचे; परंतु तिसरा जॉर्ज हा करारी, द्वेषी व धर्मवेडा असल्यामुळें जेव्हां जेव्हां क्याथोलिक लोकांच्या हिताची कोणतीही गोष्ट प्रधानमंडळ पुढें आणी, तेव्हां तेव्हां त्यांच्या आड तो येई, व प्रधान लोकांनीं आपला हट्ट नच सोडला तर त्यांचा राजीनामा घेऊन बेलाशक दुसरे प्रधान नेमीत असे. यामुळें ती इष्ट गोष्ट इतकी लांबणीवर पडली. सन १८१३ सालीं ग्रॅटननें क्याथोलिक लोकां-

बद्दल पार्लमेंट सभेपुढें बिल आणिलें. त्यावेळीं मुख्य वाद बिशप लोकांची नेमणूक कोणीं करावी, राजानें किंवा पोपनें, याविषयीं निघाला, व तो फारच माजला. एवढ्याशा किरकोळ बाबतींत क्याथोलिक लोकांनीं ग्रेटन याचें ऐकिलें असतें व प्रधानमंडळाच्या इच्छेप्रमाणें बिशप लोकांची नेमणूक राजानें करण्यास संमति दिली असती, तर पुढें पंधरा वर्षांनीं त्यांस जें पूर्ण स्वातंत्र्य मिळालें तें तितकें आधीं मिळतें. परंतु ओकॉनेल यास पुढें करून क्याथोलिक लोकांनीं असा आग्रह धरला कीं, काय वाटेल तें झालें तरी बिशप लोकांची नेमणूक पोपनेंच केली पाहिजे. त्यांची नेमणूक करण्याचें काम राजाकडे राहिलें म्हणजे तो होतां होईतों दुबळे, नेभळे, हरामखोर, क्याथोलिक लोकांचे हितशत्रु असेच बिशप नेमील व मग धर्माचा नाश होईल, असा युक्तिवाद त्यांनीं चालविला. ग्रॅटनला प्रधानमंडळाच्या अनुकूलतेची आवश्यकता वाटल्यामुळें त्यानें ओकॉनेलचें म्हणणें अमान्य केलें. तेव्हां ओकॉनेलनें ग्रॅटनची उघड निंदा आरंभिली. आणि ग्रॅटन व पार्लमेंटांतील मूठभर लोक यांना क्याथोलिक राष्ट्रासंबंधानें बोलण्याचा काय अधिकार पोंचतो असा प्रश्न उपस्थित केला. हा युक्तिवाद ग्रॅटन याची निंदा करण्यास सोईचा वाटून क्याथोलिक लोकांनीं ठिकठिकाणीं सभा भरवून ग्रॅटन याचा निषेध सुरू केला; व देशांत दुफळी माजून राहिली. इकडे प्रधानमंडळानें क्याथोलिक लोकांवर अन्य रीतींनीं वजन पाडण्याकरितां थेट पोपशीं राजकारण सुरू केलें व त्याच्या सल्लागारास वश करून घेऊन त्याजकडून असें आज्ञापत्र आणविलें कीं, क्याथोलिक लोकांस जर संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार असेल तर मग–बिशप लोकांना नेमण्याची बाब जर राजा आपणाकडे रहावी असा हट्ट धरीत असेल तर–ती त्याजकडेसच रहाण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें प्रत्यक्ष पोपची संमति मिळाल्यावर तरी क्याथोलिक लोकांनीं थांबावयाचें होतें. परंतु उलट पोपवरच आग पाखडण्यास त्यांनीं सुरुवात केली व ज्या पोपच्या अधिकाराच्या अभिमानाखातर त्यांनीं लढा माजविला होता, तो अधिकार आतां

स्वतःच धाब्यावर बसविण्याचा त्यांनीं निश्चय केला ! ते म्हणूं लागले कीं, आपला स्वयंसिद्ध अधिकार नाहींसा करण्यास पोपला अधिकारच नाहीं. शिवाय या बाबतींत त्याला जातीनें कांहीं करतां येत नाहीं. त्याच्या सल्लागार मंडळानें अशा प्रकारच्या आज्ञापत्रास अनुमति दिली पाहिजे व सर्वांहून मुख्य हें कीं सदरच्या आज्ञापत्रावर त्याची स्वदस्तुरची सही नाहीं, त्याच्या कारभाऱ्याची आहे. तात्पर्य, ' शंकराचार्य खरे, पण सशास्त्र ठराव देतील तो मात्र आम्हांस कबूल ' अशा युक्तिवादानें शंकराचार्यांचा अधिकार न जुमानण्याची युक्ति क्याथोलिक लोकांनीं केली. एवढ्यावर ते थांबले नाहींत. त्यांनाही वशिला पोपच्या दरबारीं होता. तेव्हां त्याचा फायदा घेऊन पूर्वींचें आज्ञापत्र रद्द करण्याची त्यांनीं खटपट केली व ती सिद्धीसही गेली, व ओकॉनेलला आपल्या पक्षास आतां अमोघ शक्ति उत्पन्न झाली असें वाटूं लागलें.

परंतु दैवाचा खेळ निराळ्या रीतीनें चालला होता, तो ओकॉनेल यास काय ठाऊक ! कारण हें सर्व होतें तों इकडे नेपोलियनचा पराभव झाला; युरोपियन राष्ट्रांचें सैन्य पॅरिसमध्यें शिरलें; इंग्लडवर स्वारी होण्याची भीती नाहींशी झाली, प्रधानमंडळाच्या मनावर ज्या चिंतेचा अहोरात्र ताण पडला होता तो लयास गेला; व असें होतांच ' तुम्हांस निमेशिमें घ्यायचें नाहीं तर मुळीं काहींच देत नाहीं जा, ' असा धिःकारपूर्वक जबाब त्यांना क्याथोलिक लोकांस निर्भयपणें देतां आला ! क्याथोलिक असोसिएशन ही बेकायदेशीर कामाकरितां भरलेली सभा आहे, असा जाहीरनामा लावून ती त्यांनीं पार उधळून टाकिली, व ओकॉनेल आणि क्याथोलिक लोक यांस निव्वळ चुरमुरे खात बसण्याची पाळी आली. या वेळीं दुफळी झाल्यामुळें कार्याची जी घडी एकदां बिघडली ती फिरून तशी बसण्यास चौदा वर्षें लागलीं, व या गोष्टीबद्दलचा दोष व जबाबदारी विचारी इतिहासकर्ते व ओकॉनेलचे चरित्रकार त्याच्याच पदरीं बांधितात. ओकॉनेलच्या तर्फे असें सांगण्यांत येतें कीं, या वेळीं वाद न मिटता घेण्याचें तसेंच कांहीं कारण होतें. वाद मिटता घेतला

असता तर क्याथोलिक लोकांस त्यांचें पूर्ण स्वातंत्र्य चौदा वर्षे आधीं मिळालें असतें हें खरें; परंतु हा वाद न मिटतां चालू रहावा हेंच आयरिश लोकांस त्या वेळीं इष्ट होतें. त्यांना क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्यापलीकडे मजल मारावयाची होती. ही मजल मारण्यास लोकांच्या अंगीं त्वेष व आवेश शिल्लक राहणें आवश्यक होतें. वाद मिटता घेतला असता तर त्यांचें समाधान होऊन हा आवेश शिल्लक राहता ना, व स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधतें ना! परंतु हा युक्तिवाद बरोबर नाहीं. केवळ पुढील एका कारणाकरितां आवेश पाहिजे म्हणून आज होणारी सुधारणा पदरांत पाडून घ्यावयाची नाहीं व असंतोषाचा 'हाचा' अंक अशा रीतीनें धरून ठेवावयाचा ही गोष्ट नेहमींच योग्य असते असें नाहीं. शिवाय एका कामाचा आवेश दुसऱ्या कामास उसना घेतलेला कधींही उपयोगी पडत नाहीं; ज्या त्या प्रश्नाच्या गुणदोषाप्रमाणेंच ज्या त्या वेळीं जरूर तितका आवेश उत्पन्न व्हावा लागतो, व वास्तविक मागणें सयुक्तिक असेल तर तो उत्पन्न होतोही. परंतु कृत्रिम व शिलकी राहिलेल्या आवेशाची हुंडी शिक्यावर चढूं शकत नाहीं, हें पुढें ओकॉनेल यासच स्वानुभवानें कळून आलें. असो; या आवेशाचा फायदा घेऊन सन १८०० चा कायदा रद्द होऊन आयर्लंडास पूर्वीप्रमाणें स्वतंत्र पार्लमेंट मिळावें अशाविषयीं त्यानें नवीन चळवळ सुरू केली. परंतु एका कार्याचा आवेश जरी दुसऱ्या कार्यास उपयोगी पडत नाहीं तरी एका कार्यांत झालेली दुफळी मात्र दुसऱ्या कार्याच्या आड आल्याशिवाय राहत नाहीं, हा अनुभव सर्व देशांत एकसारखाच येणारा आहे. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्यापेक्षां पार्लमेंटच्या स्वातंत्र्यासंबंधानें राष्ट्राचा मतभेद कमी असावा; परंतु वास्तविक तो तसा असतांही, पूर्वी माजलेल्या दुहीमुळें नवीन चळवळीसंबंधानें लोकांचा मिलाफ होईना. ग्रॅटन हा क्याथोलिक लोकांचाच प्रश्न अद्यापि घेऊन बसल्यामुळें त्याच्या अनुयायांनीं आयर्लंडांत सभा भरविण्याचें काम सुरू ठेविलें होतें. परंतु अशा या सभा भरवून खोटें लोकमत हे मूठभर लोक जाहीर करतात, या सबबीवर अशा

सभांत घुसून त्या उधळून लावण्याचें त्यानें योजिलें. सन १८१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत अशा प्रकारची सभा भरविण्यांत आली असतां ओकॉनेल हा आपले कांहीं अनुयायी घेऊन सभेंत घुसला. सभेच्या दिवाणखान्याच्या दारांत त्यांस असें बजावण्यांत आलें कीं, बिशप लोकांची नेमणूक राजानें करण्यास हरकत नाहीं असें मत ज्यांचें असेल अशा लोकांचीच ही सभा आहे, इतरांस येण्यास मनाई आहे. तथापि ओकॉनेलनें आपलें पाऊल मागें घेतलें नाहीं. त्यानें सभेंत शिरून दणकावून भाषण केलें व अशा रीतीनें सभेच्या कामांत बखेडा झाला. ओकॉनेलच्या या दांडगाईनें त्याच्या कृत्यास कांहीं फायदा झाला नाहीं व १८१७ हें साल क्याथोलिकांस निराशेचें असेंच गेलें.

पुढील सालीं ओकॉनेलच्या लोकप्रीतींत भर पडण्यास आणखी एक कारण झालें. कांहीं प्रसंगानें डब्लिनच्या म्युनिसिपल कमिटीसंबंधानें बोलतांना त्यानें अपमानकारक असे शब्द वापरले. तेव्हां कमिटींतील एक सभासद डीएसटेरी नांवाचा एक माजी लष्करी अंमलदार होता तो रागावून त्यानें ओकॉनेल यास द्वंद्वयुद्धास पाचारण केलें. ओकॉनेल यास या भानगडीची मनापासून हौस नव्हती, यामुळें त्यानें आपल्या प्रतिपक्षाच्या दोन तीन पत्रांस उत्तरच पाठविलें नाहीं. तेव्हां डीएसटेरी यानें असें प्रसिद्ध केलें कीं, कमिटीचें बदनाम करणाऱ्या या भ्याड भागुबाईस आपण एक दोन दिवसांत गांठ पडेल तेथें वेताच्या छडीनें अंगभर मार देणार आहों. तेव्हां ओकॉनेल यानेंही या धमकावणीला भीक न घालतां 'मी द्वंद्व युद्धास तयार आहें,' असें जाहीर केलें. तेव्हां मॅजिस्ट्रेटनीं शांततेचा भंग न करण्याबद्दल त्याजपासून भक्कम जामीन मागितला, परंतु त्याच्या प्रतिपक्षाचें समाधान होईना. शेवटीं डब्लिनपासून १२ मैलांवर एका जमीनदाराच्या बागेंत कोणाला न कळत जाऊन युद्ध करावें असें दोघांनीं ठरविलें व त्याप्रमाणें दोघांनीं दोन पिस्तुलें घेऊन एकमेकांवर बार काढले. पैकीं ओकॉनेलची गोळी डीएसटेरी याच्या मांडींत शिरून बसली व रक्तपातामुळें तो बेशुद्ध झाला. ओकॉनेल हा

गुप्तपणें परत येणार तों युद्धाची बातमी लोकांत आगाऊ पसरून हजारों लोक त्यास वाटेंत भेटले, व त्यांनीं त्याचा जयजयकार करण्यास सुरुवात केली. लोकांनीं त्या दिवशीं रात्रीं गांवांत वाद्यें वाजविलीं व दीपोत्सवही केला. दुसरे दिवशीं डीएसटेरी यावर शस्त्रप्रयोग करण्यांत आला, परंतु गोळी न निघाल्यामुळें तो मरण पावला. या गोष्टीबद्दल ओकॉनेल यास फार वाईट वाटलें, व फिरून द्वंद्वयुद्ध करावयाचें नाहीं अशी त्यानें शपथ वाहिली. परंतु लोकांस टाकून बोलावयाचें नाहीं अशी शपथ त्याचबरोबर घ्यावयास तो विसरला व यामुळें लोकांचा अपमान करण्याचे व त्यांनीं त्यास द्वंद्वयुद्धास पाचारण करण्याचे पुष्कळ प्रसंग पुढें आले. खुद्द इंग्लंडचा मुख्य प्रधान पील याचें व ओकॉनेलचें द्वंद्वयुद्ध होण्याची एकदां वेळ आली होती; परंतु अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळें तो प्रकार टळला. इतर कित्येक प्रसंगीं त्यानें मुळीं निमंत्रणेंच पत्करलीं नाहींत व यामुळें त्यास कित्येक लोक भ्याड, भित्रा वगैरेही म्हणत. परंतु तें न जुमानतां त्यानें यापुढें युद्ध न करण्याचा शहाणपणाचा निश्चय कायम ठेविला.

सन १८२० सालीं ग्रॅटन हा मृत्यू पावला व पार्लमेंटमधील आयरिश पुढाऱ्याच्या जागीं प्लंकेट याची योजना झाली. पुढील सालीं क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्याचा आणखी हप्ता मिळाला. या वेळीं इंग्लंडांतील परिस्थिति पाहतां कामकरी वर्ग पुढें येत चालला आहे, सबब त्याची सहानुभूति मिळवावी असा ओकॉनेल हा क्याथोलिक लोकांस उपदेश करूं लागला. परंतु इंग्लंडांतील कोणत्याही पक्षावर अवलंबून रहाण्यांत अर्थ नाहीं असें क्याथोलिक लोकांचें मत असल्यामुळें, ओकॉनेल यानें मागें ग्रॅटन याची निंदा चालविली होती, तशीच शीलनामक तरुण पुढाऱ्यानें ओकॉनेलची निंदा चालविली; व अशा रीतीनें दुफळी कायम राहिली. याच सुमारास चौथा जॉर्ज राजा आयर्लंडांत आला. त्यावेळीं डब्लिन येथें लोकांनीं त्यास मानपत्रें वगैरे दिलीं. त्यांत क्याथोलिक लोकांनींही एक दिलें. तें अर्पण करतांना ओकॉनेलनें गुडघे टेकून

राजास पुष्पहार समर्पण केला; व राजा निघून गेल्यावर, फिरून येऊन त्यानें आयर्लंडांत रहावें याकरितां आयर्लंडांत राजवाडा बांधण्याची चळवळ त्यानें सुरू केली व फंड गोळा करण्याचें ठरविलें. परंतु साधारण एखाद्या भिकार नाल्यावर पूल बांधतां येईल इतकीही वर्गणी त्या फंडास जुळली नाहीं. कशी जुळणार ? कारण हॅनोवर घराण्याचे सर्व राजे क्याथोलिकांचे कट्टे शत्रू असत व ओकॉनेलला जें क्षणभर राजभक्तीचें भरतें आलें त्याचे योगानें लोकांत त्याचें हंसें मात्र झालें. बरें, राजा तरी सुप्रसन्न झाला म्हणावें तर तसेंही नाहीं. कारण लवकरच पुढें ओकॉनेल हा लंडनला गेला असतां राजाच्या ( लेव्हीला ) धूळभेटीच्या समारंभास गेला. त्या वेळीं राजानें नाक मुरडलें व 'हा रे बदमाश सैतानाचा अवतार इथें कशाला आला ?' असें लोकांस ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें बोलून दाखविलें !

सन १८२३ सालीं ओकॉनेलनें आणखी एक नवी क्याथोलिक सभा काढली. ही काढण्याचा उद्देश असा होता कीं, कनिष्ठ प्रकारच्या व गरीब लोकांनींही तिचे सभासद व्हावें, व वर्गणी देऊन तिच्या कामकाजांत लक्ष घालावें. एक दीड वर्षभर तिच्याकडे कोणी ढुंकूनही पाहीना व वार्षिक सभेस तिचें 'कोरम' न झाल्यामुळें ओकॉनेल यास रस्त्यांतील लोक धरून आणून कोरमची भरती करून घ्यावी लागली. सभेचा हा असा थाट पाहून लोक हसूं लागले. परंतु आणखी एक वर्ष खटपट करतांच त्याची ही नवी सभा लोकप्रिय झाली, व दर आठवड्यास सभेची वर्गणी सातशें पौंड जमूं लागली. या सभेच्या बैठकींतून व इतर ठिकाणीं ओकॉनेल हा जोराजोरांत येऊन बोलूं लागला. कायदेशीरपणा व बेकायदेशीरपणा यांचा बेमालुम सांधा जुळविण्याची हातोटी त्याला अत्युत्तम साधली होती, व क्याथोलिक लोकांनीं जरूर तर, परंतु केव्हांही केवळ आत्मसंरक्षणाकरितां आपल्या शक्तीचा उपयोग करून आपलें स्वातंत्र्य व हक्क मिळवावे असें तो या भाषणांतून लोकांस सांगे. अर्थात् अधिकाऱ्यांचा त्याजवर डोळा राहून

खटला करण्याचा त्यांनीं निश्चय केला. तारीख १६ डिसेंबर १८२४ रोजीं एका जाहीर सभेमध्यें नेहमींप्रमाणें त्यानें भाषण केलें, व लगेच दुसरे दिवशीं राजद्रोहासंबंधानें खटला करण्याकरितां त्याला अटक करून त्याजकडून जामीन घेण्यांत आला. पुढें सरकारतर्फे पुरावा आणण्याकरितां वर्तमानपत्राच्या रिपोर्टरांच्या साक्षी काढण्यांत आल्या; परंतु रिपोर्टर सरकारी नसल्यानें कांहीं रिपोर्टरांनीं कानावर हात ठेवले, कांहींनीं सांगितलें कीं, ओकॉनेल हा अतिशय जलद बोलणारा असल्यामुळें आम्हांस मुळीं टिपणेंच करतां आलीं नाहींत. कांहीं म्हणाले कीं, फिर्यादींतील शब्द बोलण्याची वेळ आली त्या वेळीं आम्हांस मुळीं झोंपच आली ! तात्पर्य, कोणी कांहीं कोणी कांहीं सांगून रिपोर्टर लोकांनीं ओकॉनेलचा बचाव केला.

पुढील सालीं इंग्लंडास क्याथोलिक लोकांचेतर्फे डेप्युटेशन गेलें, त्यांत ओकॉनेल हा एक होता. डेप्युटेशनच्यातर्फे त्यानें पार्लमेंटपुढें वकील या नात्यानें उत्तम भाषण केलें. त्यास मेजवान्या झाल्या व बॅरिस्टर या नात्यानें लॉर्डांच्या अपील कोर्टापुढें त्यानें कांहीं खटलेही चालविले. फिरून क्याथोलिक लोकांची चळवळ बळावून सभाविध्वंसक कायदा करण्यांत आला; परंतु या कायद्याची फजिती करण्याचा या वेळीं त्यानें निश्चय केला. नवीन कायद्याखालीं एक सभा मोडली कीं लगेच दुसरें नांव देऊन त्यानें दुसरी सभा स्थापावी. तीही नोटीस काढून मोडली कीं तिसरी, असा अधिकाऱ्यांकडून सभा मोडण्याचा व नांवें बदलून दुसऱ्या सभा स्थापण्याचा ओकॉनेलचा क्रम कित्येक दिवसपर्यंत चालू होता. शेवटची सभा स्थापन केली तिचें नांव ' कायद्यानें निषिद्ध न केलेलें कार्य करणारी सभा ' असें होतें. हेतु हा कीं, त्या सभेंत नांवाच्या गुणावरून कोणास कांहींच हरकत घेतां येऊं नये. शिवाय एक ठिकाणची सभा मोडली तरी निरनिराळ्या ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून १५०० वर लहान सभा भराव्या; इतकी क्याथोलिकांची चळवळ करण्याची तयारी होती. क्याथोलिक फंडही पन्नास हजार पौंडांपर्यंत जमला व

आठ लक्ष सह्यांचा एक अर्ज तयार झाला. लॉर्ड कॅनिंग यानें खासगी रीतीनें ओकॉनेलला असें कळविलें कीं, इंग्लंडांत पार्लमेंटमध्यें क्याथोलिक लोकांचे वतीनें मीं चळवळ चालू ठेवली आहे, तरी मला मदत म्हणून तुम्हीं एवढें करा कीं, क्याथोलिक असोसिएशनचें काम जरा नेमस्तपणानें चालवा. परंतु क्याथोलिक लोक तें ऐकेनात.

या सुमारास क्लेअर नांवाच्या आयरिश परगण्यांतील पार्लमेंटच्या सभासदांची जागा खालीं झाली तेव्हां अधिकाऱ्याविरुद्ध असणाऱ्या अशा क्याथोलिक गृहस्थाची निवडणूक, तेथील प्रॉटेस्टंट जमीनदार फिडझरल्ड याच्या नाकावर टिचून आपण करूं अशी तेथील प्रमुख मतदारांनीं ईर्षा धरली. व हा बेत सिद्धीस जाण्यास सर्वांत अधिक लोकप्रिय असा क्याथोलिक उमेदवार उभा राहणें जरूर आहे असें ठरल्यावरून, ओकॉनेलनें उभें राहावें असा आग्रह झाला. आपण निवडून आलों तरी पार्लमेंट सभेमध्यें प्रत्यक्ष प्रवेश होण्यास शपथेची अडचण येणार, हें ओकॉनेल यास माहीत असल्यामुळें, प्रथम त्याचे मन घेईना; परंतु पुढें काय होईल तें होईल, उमेदवार तरी आपल्या मतासारखा निवडून देऊं, असा लोकांनीं आग्रह धरल्यावरून तो कबूल झाला. मग काय विचारतां! क्याथोलिक धर्माच्या उमेदवाराची ही पहिलीच निवडणूक असल्यामुळें सगळा समाज दणाणून गेला. क्लेअर परगण्यामध्यें तर धामधूम व दंगेही सुरू झाले; परंतु निवडणुकीच्या कामीं कोणीही मारामारी वगैरे करून इष्ट कार्य नासूं नये अशी ओकॉनेल यानें आपल्या स्नेह्यांस सक्त ताकीद दिली. त्याच्या निवडणुकीच्या खर्चाकरितां डब्लिन शहरांत पहिल्या दिवशीं दोन हजार व पुढील दहा दिवसांत मिळून चौदा हजार पौंड वर्गणी जमा झाली. निवडणुकीच्या जागेच्या आसपास एखाद्या सैन्याचा तळ पडल्याप्रमाणें झालें होतें. निवडणुकीचें काम पांच दिवस चाललें होतें. कारण मतदारांची संख्या सुमारें आठ हजार होती. व्यवस्थेकरितां जागेवर तीनशें पोलीस व दोन हजार लष्करी शिपाई ठेवण्यांत आले होते. पांचव्या दिवशीं प्रतिपक्षीय उमेदवार ' पोल '

सोडून निघून गेला; व मग विजय पावलेल्या ओकॉनेलच्या लोकांनीं किती मिरवणुकी काढल्या, समारंभ काय केले, शिखरें काय पाजळलीं व मेजवान्या किती दिल्या, याची गणनाच नाहीं! हा क्याथोलिक पक्षास नवीन जय मिळाल्यावर लवकरच पार्लमेंटनें एक नवीन बिल पास करून क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्याचा आणखी एक हप्ता दिला व त्याच्या भिडेस्तव राजानें त्यास आपली संमतिही दिली. हा कायदा पास झाल्यानंतर ज्यांची निवडणूक झाली त्यांस पार्लमेंटमधील शपथेची अडचण उरली नाहीं. परंतु ओकॉनेलची निवडणूक कायदा पास होण्याचे आधीं झाल्यामुळें त्याला या नवीन कायद्याचा फायदा घेतां येण्यासारखा नव्हता. तथापि पार्लमेंटमध्यें बसण्यास जावें, मग तेथें काय होईल तें होईल असें ओकॉनेल यानें ठरविलें. त्याप्रमाणें लंडन येथें जाऊन तो हाऊस ऑफ कॉमन्स सभेमध्यें स्पीकर ( सभाधिपति ) याचे समोर जाऊन उभा राहिला. परंतु ठराविक शपथेचा कागद त्याजपुढें टाकण्यांत आला. त्याप्रमाणें शपथ घेण्याचें त्यानें नाकारलें, अर्थात् सभागृह सोडून जाण्याचा त्यास हुकूम करण्यांत आला. तेव्हां वकील लोकांच्या बोलण्याच्या जागेवर उभें राहून त्यांनें भाषण केलें. तथापि त्यानें ठराविक शपथ घेतल्याशिवाय त्यास सभासद होतां येत नाहीं असें ९० विरुद्ध ११६ मतें पडून ठरलें. प्रधान पक्षास असें वाटलें कीं, फिरून ओकॉनेलची निवडणूक मतदारांकडून कसची होणार ? परंतु तावडतोब ओकॉनेल आयर्लंडास परत आला; क्याथोलिक सभेनें त्याच्या निवडणुकीकरितां पांच हजार पौंड वर्गणी देऊं केली; फिरून धामधूम होऊन पूर्वींच्याच वॉर्डाकडून त्याची निवडणूक झाली; व १८३० सालीं तो पार्लमेंटचा सभासद या नात्यानें काम करूं लागला. परंतु त्याचे आधीं एक वर्षभर १८२९ सालीं पार्लमेंटनें व्यापक असा कायदा करून क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देऊन टाकलें !

१८३१ सालीं फिरून एक सभाविध्वंसक कायदा पास करण्यांत आला, व कोणत्याही नांवाखालीं हक्कांकरितां भांडणाऱ्या सभा स्थापूं नयेत असें ठर-

विलें गेलें. ' फक्त कायद्यानें प्रतिबंध न केलेल्या कामाकरितां स्थापलेली सभा हें किंवा असलीं नांवें घेऊन चालविलेल्या सभाही यापुढें चालणें शक्य नव्हतें. तेव्हां ओकॉनेलनें निराळीच युक्ति योजिली. त्यानें आपल्या घरीं ३०० लोकांस जेवावयास बोलाविलें. परंतु जेवण हा मुख्य उद्देश नसून सभा भरविणें हाच मुख्य उद्देश होता व मेजवानीच्या मिषानें सभा भरविली, या आरोपा-वरून सरकारानें त्याजवर खटला केला. लोकांत चळवळ झाली. त्याच्या बचावाकरितां सात हजार पौंड ( सत्तर हजार रुपये ) फंड जमला. डिफेन्सतर्फे कांहीं वादग्रस्त गोष्टी प्रांजळपणें कबूल करण्यांत आल्या. मंडळी बोलावली होती व तेथें अमुक एका प्रकारचें कामही करण्यांत आलें असें ओकॉनेलनें कबूल केलें. परंतु घडलेल्या गोष्टी बेकायदेशीर नाहींत व त्यांवरून आरोप लागू होत नाहीं अशी तक्रार त्यानें केली. ज्यूरीपुढें खटला जाऊन त्यावर दोषारोप लागू होतो असा अभिप्राय पडला. मात्र निकाल सांगण्याचें काम न्यायाधीशानें पुढें टाकलें. या अवधींत ओकॉनेल हा लंडन येथें गेला. लिबरल पक्षाच्या पुढाऱ्यांच्या व त्याच्या गांठी पडल्या व सरकारतर्फे खासगी रीतीनें असेंही कळविण्यांत आलें कीं, स्वतंत्र पार्लमेंट मागण्याची खटपट व चळवळ जर ओकॉनेल सोडून देण्याचें वचन देईल, तर त्याजवरचा खटला काढून घेण्यांत येईल. परंतु त्यानें ती गोष्ट साफ नाकबूल केली. या अवधींत पार्लमेंट सभेची बैठक असल्यामुळें त्यानें त्या सभेंत सभासद या नात्यानें भाषणेंही केलीं. या वेळीं ब्रिटिश पार्लमेंट सभेची सुधारणा करण्याचें बिल ( १८३२ चें ) पार्लमेंटपुढें होतें. त्यावर ओकॉनेलनें अत्यंत सुंदर असें भाषण केलें, त्यामुळें प्रधानमंडळाचाही ग्रह त्याजबद्दल चांगला झाला. व त्याजवरील खटला काढून घेण्याचें आंतल्याआंत ठरून न्यायधिशानें अशा बेतानें निकालाची तारीख लांबविली कीं, दरम्यान सभाविध्वंसक काय-द्याची मुदत संपली व ही मुदत संपल्यानें त्या कायद्याअन्वयें केलेला खटला

रद्द करावा लागला. अशा रीतीनें ज्युरीने प्रतिकूल निकाल सांगितला असतां-हि शिक्षेच्या गंडांतरांतून ओकॉनेल हा कर्मधर्मसंयोगानें सुटला.

यानंतर टाइथचा कर ( मागें ६३ व्या पृष्ठांत याचें वर्णन आलेंच आहे ) व प्रॉटेस्टंट धर्ममंडळ यासंबंधानें ओकॉनेलनें चळवळ सुरू केली. ता. १४ जुलई १८३२ रोजीं ' नॅशनल पोलिटिकल असोशिएशन ' ला पत्र लिहून त्यानें प्रसिद्धपणें असा उपदेश केला कीं, टाइथचा कर कोणहि आपखुषीनें देऊं नये, अगर तो कर आपखुषीनें न दिल्याकारणानें अधिकाऱ्यांनीं कोणाची मिळकत जप्त केली असतां ती मिळकत लिलावांत कोणीं घेऊं नये; व अशा रीतीनें, टाइथच्या कराचा अन्याय लोकांच्या व सरकारच्या नजरेस आणावा. ही सूचना होतांच लोकांनीं तिचा अम्मल करण्यास एकदम सुरुवात केली. व मग असें होऊं लागलें कीं, आपखुषीनें असा कोणीही कर देईना व करवसुलीकरितां कोणाच्या मालाची जप्ती केली असतां तो कोणी विकत घेईना एके दिवशीं अशीही गंमत झाली कीं, एका कुळाची गाय जप्त केल्याची बातमी पसरतांच आतां पुढें काय होतें हें पहाण्याकरितां लोकांची गर्दी जमली. आपल्या हातून बळजबरीनें लोक गाय सोडवून घेऊन जातील या भीतीनें जप्तीदारांनीं पोलीस बोलाविले. पोलीस आल्याबरोबर आणखी लोक जमले. आणखी लोक जमल्यामुळें लष्करचे शिपाई बोलावले; व ते जप्तीदार, ते शिपाई, ते पोलीसचे जवान, ते लोक, व ती गाय हा सगळा घोळकाचा घोळका गुरांच्या बाजाराकडे गेला. बाजारांत ते बराच वेळ तिष्ठत उभे राहिले तरी गिऱ्हाईक कोणी येईना व गाय मागेना. जप्तीचा माल म्हटला म्हणजे त्या चळवळीच्या वेळीं लोकांस प्लेगसारखा वाटे व ते त्यापासून पळून दूर जात. कित्येक ठिकाणीं याहून भयंकर प्रकारही होत. १८३२ सालीं एका जिल्ह्यांत टाइथच्या कराचे पायीं ९ हजार गुन्हे नेहमींहून अधिक झाले व त्यापैकीं दोनशें तर नुसते खून होते.

यानंतर पार्लमेंटच्या नवीन निवडणुकी झाल्या. त्यावेळीं ओकॉनेल यानें फार मेहनत घेऊन लहान लहान पत्रें व पत्रकें प्रसिद्ध करून लोकांस आपलीं नांवें मतदारांच्या यादींत कशीं नोंदवून घ्यावीं, मतदार या नात्यानें आपले हक्क कसे बजावावे यांविषयीं चांगलें शिक्षण दिलें. तो स्वतः, त्याचे दोन मुलगे व त्याचे दहावीस हस्तक इतकी मंडळी त्या निवडणुकींत निवडून आली. किंबहुना आयर्लंडांत निवडून आलेल्यांपैकीं निमे सभासद त्याचे हस्तक होते म्हटलें तरी चालेल. नवीन पार्लमेंटनें प्रथमच दडपशाहीच्या कायद्याचें बिल पुढें आणलें व तें पासही झालें. परंतु ओकॉनेलच्या उपसूचनेवरून चार दिवस वादविवाद गाजत होता. पार्लमेंटनें नांवाला क्याथोलिक लोकांचीं बंधनें कमी केलीं खरीं, परंतु त्यास दिलेल्या वचनांचा प्रत्यय आणून देण्याचे नांवानें मात्र आंवळ्याएवढें पूज्य. क्याथोलिक मनुष्यास वाटेल ती जागा देण्यास हरकत नाहीं असें कायद्यानें ठरलें, परंतु नांव घेण्यासारखी एकही जागा क्याथोलिक मनुष्यास आज इतक्या दिवसांत त्यांनीं दिली नाहीं; तोंडानें मात्र क्याथोलिकांस समान हक्क देण्यांत आले आहेत असें म्हणण्यास इंग्रज मोकळे आहेत ही गोष्ट त्यानें पार्लमेंट सभेच्या नजरेस आणली. त्याचा व लॉर्ड स्टॅनेल याचा खूप खडाजंगीचा वाद झाला; परंतु बिल पास झालें. या बिलामुळें अधिकाऱ्यांना पुष्कळ नवीन अधिकार मिळाले. जिल्हेचे जिल्हे दंगेखोर म्हणून ठरविणें, व अशा जिल्ह्यांत सर्व तऱ्हेच्या सभा बंद करणें, दिवस मावळल्यावर कोणास रस्त्यांत हिंडूं न देणें, हत्यारांकरितां झडती घेणें, लष्करी कायदा सुरू करणें, कोर्टमार्फत न्याय न करतां लष्करी इनसाफ करून शिक्षा देणें वगैरे गोष्टी अधिकाऱ्यांस आपल्या इच्छेप्रमाणें करण्याची मोकळीक मिळाली.

परंतु सन १८०० पासून पुढें तीस वर्षेंपर्यंत स्वतंत्र आयरिश सभासदांचा असा पक्ष अस्तित्वांत आलेला नव्हता, तो १८३४ सालीं या सर्वांमुळें प्रथम अस्तित्वांत आला. या पक्षाचे जोरावर सुटीनंतर पार्लमेंट उघडतांना, ओकॉनेल यानें राजास विनंति करण्याकरितां म्हणून सूचना आणली. या सूचनेसंबंधानें

त्यानें पार्लमेंट सभेमध्यें सात तास भाषण केलें. इंग्लंडकडून आज ३४ वर्षांत आयर्लंडास न्याय मिळाला नाहीं, व पुढेंही तो मिळण्याची आशा नाहीं सबब, आयर्लंडास पूर्वीचें स्वतंत्र पार्लमेंट बहाल करावें, अशा अर्थाची ही विनंति उर्फ सूचना होती. ही सूचना पुढें मांडतांना तिच्या समर्थनार्थ, त्यानें असें सिद्ध केलें कीं, इंग्लंडची व आयर्लंडची पार्लमेंट सभा एक झाल्यापासून आयर्लंडचा सर्वस्वीं तोटा व इंग्लंडचा सर्वस्वी नफा झालेला आहे. या अवधींत आयरिश लोकांवरील कराचा बोजा दुप्पट वाढला व लोकसंख्या मात्र कमी झाली. आयर्लंडचें कर्ज वाढलें, व पत कमी झाली. देशांत दारिद्र्याची वाढ झाली, व त्राण कमी झालें. इंग्लंडच्या लोकांवरीस ४$\frac{3}{8}$ कोटी पौंडांचा बोजा या चौतीस वर्षांत कमी झाला; या अवधींत आयर्लंडच्या स्थितीची चौकशी करण्याकरितां सात सबकमिट्या व एकशें चौदा कमिशनें नेमण्यांत आलीं. परंतु आयर्लंडच्या दुःस्थितीचें निराकरण होण्याचा ओनामाही गिरविला गेला नाहीं. चौतीस वर्षांपैकीं जवळ जवळ पंचवीस वर्षे आयर्लंडांत कायद्याचें बंधन नसल्याप्रमाणें अधिकाऱ्यांनीं वर्तन केलें. इंग्लंडला फायदेशीर असा हा संयोग घडून यावा याकरितां आयर्लंडांत १७९८ सालीं बंड होणार त्याची कच्ची माहिती त्यांच्या हातांत असतां अधिकाऱ्यांनीं मुद्दाम बंड होऊं दिलें; व बंडाचा फायदा घेऊन, सभासदांस लांच चारून आयर्लंडाची सभा मोडून टाकली, इत्यादि गोष्टी त्यानें वक्तृत्वपूर्ण भाषेनें पार्लमेंट सभेस ऐकविल्या; परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. त्याच्या बाजूस फक्त ३८ मतें मिळालीं व त्या अडतिसांत फक्त एकच काय तो इंग्रज होता; विरुद्ध मात्र ५२३ होते.

यानंतर लवकरच आयर्लंडांतील ' ॲटर्नी जनरल ' म्हणजे ' ऍडव्होकेट जनरल ' ची जागा रिकामी पडली व ती ओकॉनेल यास देण्याची बोलवा होती, व मिळती तर ओकॉनेलनें पत्करलीही असती असें म्हणत. कारण त्या जागेमुळें त्याला स्वतःला जरी फारसा मान मिळण्यासारखा

नव्हता, तरी अशा जागीं क्याथोलिक मनुष्याची नेमणूक होणें यांत कांहीं विशेष मुद्दा आहे असें त्याचें मत होतें. परंतु राजाचे कानावर या नेमणुकीची बातमी गेली व त्यानें त्या गोष्टीस हरकत घेतली. यामुळें ती रहित झाली. तथापि लॉर्ड मेलबोर्न या लिबरल पक्षाच्या प्रधानाचें ओकॉनेलबद्दल मत चांगलें होतें, व त्याच्या अमदानींत आयर्लंडासंबंधानें कोणताही प्रश्न निघाला तरी तो त्यावर डॅनियल ओकॉनेलचें मत खासगी रीतीनें नेहमीं घेत असे. यास्तव या वेळच्या प्रधानमंडळास त्याच्या प्रतिपक्षानें ' ओकॉनेलचें प्रधानमंडळ ' असें नांव थट्टेनें दिलें होतें; व खरोखरच आयर्लंडांतील हुद्याच्या व मोठ्या पगाराच्या जागांवर मनुष्यें नेमण्याचें काम या वेळीं जवळ जवळ ओकॉनेलच्याच शिफारशीवर अवलंबून असे. लॉर्ड मेलबोर्न यास मदत करण्याकरितां ओकॉनेल हा स्कॉटलंडमध्यें कांहीं दिवस फिरत होता, व त्यानें पुष्कळ ठिकाणीं प्रधानमंडळाच्या वतीनें भाषणें केलीं व त्याचा बहुमानही झाला. परंतु कॉन्सर्व्हेटिव्ह अगर लिबरल यांपैकीं कोणाच्याही कच्छपी लागावयाचें नाहीं व स्वतंत्र राहून अडवणुकीच्या मार्गानेंच आपलें कार्य साधावयाचें, असें त्यानें नुकतेंच यापूर्वीं जाहीर केलें असल्यामुळें आयरिश लोकांचा त्याजवर राग होत चालला. ते म्हणूं लागले कीं, हा बुडत्याचा पाय खोलांत जात आहे. आधींच फूट व दुफळी याचें आयरिश लोकांस बाळकडू. त्यांस कांहीं तरी निमित्त मिळालें कीं पुरे. लोक म्हणूं लागले कीं, 'दहा वर्षांत यानें बारा सभा स्थापल्या व बारा सभा मोडल्या याचा भरंवसा काय धरावा ? व आतां तर हा लिबरलपक्षाच्या गोटांतच शिरूं पहातो; प्रथम स्वतंत्र पार्लमेंट पाहिजे असा आग्रह धरून फिरून लवकरच आयर्लंडास कोणीकडून तरी न्याय मिळाला म्हणजे झालें अशी अल्पसंतुष्टवृत्ति तो दाखवूं लागला.' जमीनदार म्हणूं लागले कीं, ' याचें क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याचें व स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचें वेड येऊन जाऊन आमच्या मुळावर मात्र आलें; आम्हांस बाजूस सारून आमच्या जागीं धर्म-

वेड्या भिक्षुकवर्गास स्थापून कुळांना सधन व उपयोगी असा धनी होता त्याचे जागीं दरिद्री धनी करून दिला यांत राष्ट्राचा तो काय फायदा झाला ? ' भिक्षुकवर्ग म्हणूं लागला कीं, ' टाईथबिलाचे कामीं दाखवावा तितका नेट ओकॉनेलनें न दाखविल्यामुळें नुकसान झालें. ' कारागीर म्हणूं लागले कीं, ' आम्ही आपापसांत संप करून आपला बचाव करितों त्याविरुद्ध ओकॉनेलनें कां बोलावें ? कायदेशीरपणाची याला एवढी हौस कशाकरितां ? ' व शेतकरी म्हणूं लागले कीं, ' पार्लमेंट स्वतंत्र असो वा परतंत्र असो, आमच्या मागचें कराचें ओझें व आमचें दारिद्र्य हीं रतिमात्र कमी न होतां उलट दडपशाहीचे कायदे होऊन अपराध्याबरोबर निरपराधी चिरडून जातात यास ओकॉनेलकडून कांहींच प्रतिबंध कसा होत नाहीं ? ' तात्पर्य, लोकप्रियतेचा कांटा फार नाजूक असतो; तो वाऱ्यानें किंवा फुंकरानें उडणाऱ्या केरानेंही चंचल होतो. आपलें वजन कमी होत आहे असें पाहून ओकॉनेलनें लोकांमध्यें चळवळ उत्पन्न करण्याची दुसरीच तोड काढली. त्यानें इंग्लंडच्या मालावर बहिष्कार घालण्याचा उपदेश सुरू केला. हा बहिष्कर फार थोडे दिवस टिकला. कारण श्रीमान् लोक आयरिश माल म्हणून घेईनात; गरीब लोक तो महाग म्हणून हा बहिष्कार घेईनात व बहिष्काराच्या चळवळीचा फायदा घेऊन इंग्रज व्यापारी 'आयरिश' ( स्वदेशी ) असा छाप मारून वाटेल तो माल आणून आयर्लंडांत विकून नफा मिळवूं लागले. तेव्हां हळू हळू बहिष्कारही मागें पडला. अशी ही स्थिति १८४० पर्यंत टिकली.

परंतु ओकॉनेलच्या चरित्रनाटकापैकीं शेवटचा व कांहीं अंशीं विशेष मनोरंजक व बोधप्रद असा अंक अद्यापि व्हावयाचा राहिला असून तो १८४० पासून पुढें चार वर्षेंपर्यंत होत होता. ओकॉनेलची लोकप्रियता व अप्रियता यांच्या लाटा एकामागून एक उठत असत. १८४० चे सुमारास तो बराच अप्रिय झाला होता. परंतु फिरून त्याच्या लोकप्रियतेची लाट उठली. त्यानें पुन्हां एकवार एक ' रिपील असोसिएशन ' स्थापिली. एक वर्षभर कसेंबसें

काढल्यावर एकदम ती सभा लोकप्रिय होऊं लागली, व नवीन नवीन लोक येऊन तिला मिळूं लागले. प्रथम प्रथम दर आठवड्यास १५० पौंड वर्गणी जमत असे, ती आतां दोन दोन हजार जमूं लागली. व सभेचें इतकें मोठें प्रस्थ माजलें कीं, तिच्या ऑफिसांत अठ्ठेचाळीस कारकून कामास लागत. पत्रव्यवहार व कागदपत्र यांचे भारेच्या भारे जमले. पांच हजार लोक जमूं शकतील एवढी जागा आठवड्याच्या सभांकरितां भाड्यानें घेतली गेली. रिपील सभेनें आपले स्वतःचे पोलीसही ठेविले, व तिच्या मदतीनें ठिक-ठिकाणीं खासगी लवाद कोर्टें चालू लागून सरकारी न्यायकोर्टें ओस पडण्याची वेळ आली. सभेचा नवीन सभासद होणें हा एक बहुमानाचा समारंभ होऊन बसला. या सभासदांच्या सनदेवर स्वदेशी कलाकुसरीचें उत्कृष्ट काम केलेलें असून ही सनद म्हणजे एक संग्राह्य अशी वस्तु करण्यांत आली. स्वदेशी नांवें, पदव्या, निशाणें, कविता, पवाडे वगैरे निर्माण होऊं लागून रिपील सभेकडून त्यांचा सररास उपयोग होऊं लागला. व जंगी जाहीरसभांची सुरुवात होऊन एकाहून दुसऱ्या सभेस गर्दी, दुसरीहून तिसरीस, अशी श्रोत्यांची व प्रेक्षकांची संख्या भराभर वाढूं लागली. या सभा एकंदर पंधरा महिने चालू होत्या; व त्यांपैकीं शेवटीं सात महिने या सभांस नुसता ऊत आला होता. सभेस दहा किंवा पांच हजार लोक जमणें म्हणजे कांहींच नाहीं असें होऊन गेलें. अखेर अखेर सभेच्या प्रेक्षकांची संख्या पांच लाखांपर्यंतही गेली होती. तारागडावरील सभेंत साडेसात लाख लोक जमले होते असें म्हणतात. या सभेचें वर्णन वाचतांना असें वाटतें कीं, जणूं काय पंढरपूरच्या दोन तीन यात्रांची गर्दी एकत्र जमली होती. परंतु इतकी गर्दी जमूनही लोक अगदीं शांतपणानें, शिस्तीनें, कांहीं एक दंगाधोपा न होतां कायदेशीरपणानें वागत. तारागडच्या सभेंत शेंकडों ठिकाणीं उपासनापीठें मांडून त्यावर धर्मोपदेशक प्रार्थना करीत होते. सभा जवळ जवळ दिवसभर चालली होती. तिसरे प्रहरीं ओकॉनेल हा दहा हजार घोडेस्वारांच्या लव्याजम्यानिशीं सभेस आला,

व शेवटचा अर्धकोश चालून जाऊन सभास्थानास पोंचण्यास त्याला दोन तास लागले! व या सभेनंतर राथ गांवाच्या सभेचें काम संपल्यानंतर आयर्लंडच्या या अनभिषिक्त राजाचा राहिलेला तेवढा अभिषेकाचा समारंभ करून टाकून त्याच्या भक्तांनीं त्याच्या लोकप्रियतेची व बहुमान्यतेची पूर्णता केली. कांहीं उत्साही तरूण मंडळींनीं अस्सल स्वदेशी तऱ्हेचा हिरव्या रंगाचा असा एक मुकुट किंवा किरीट तयार करून त्याचे मस्तकावर घातला. परंतु दैवयोगानें त्या दिवशींचा मुकुटधारणसमारंभ हाच त्याच्या आयुष्यांतील शेवटचा असला मोठा समारंभ ठरला.

या सभांमधून ओकॉनेल जीं भाषणें करी तीं, एक पाय कायद्याचे सीमेच्या आंत व दुसरा पाय त्या सीमेवर ठेवून करी व ती मर्यादा उल्लंघिल्याचा त्याला भास झाला कीं तें पाऊल तो लगेच आंत घेई. अशा प्रचंड सभांमध्यें उभें राहून बोलतांना कायद्याचें भान रहाणें अर्थातच कठिण असतें ! परंतु ओकॉनेल यास कायद्याच्या ज्ञानाप्रमाणें वक्तृत्वही वश असल्यामुळें कायद्याच्या तारेवर नाचण्याची कसरत डोळे न फिरतां तो करूं शके. 'रिपील' च्या सभेचा अध्यक्ष व पुढारी जरी तो स्वतः होता तरी, सभेमध्यें 'नेशन' वगैरे राष्ट्रीय आणि स्वातंत्र्यवादी पक्षाच्या तरुण पुढाऱ्यांचें प्राबल्य फार होतें. वर्तमानपत्रांतून, खासगी भाषणांतून वगैरे सर्वत्र 'रिपील' बरोबर स्वातंत्र्याचीही चर्चा सररास होत असल्यामुळें श्रोत्यांचे कानास तेंच ऐकण्याची संवय झाली होती. ' लाखो लोक एकदिलाचे झाले व अमुक एक गोष्ट त्यांच्या मनानें हवी असें घेतलें म्हणजे मग इंग्लिश पार्लमेंट सभेस ती नाहीं म्हणतां येणें कठिण आहे. या लाखों लोकांचे मनांत कायद्याचें उल्लंघन करण्याचें अगर हातीं शस्त्र घेण्याचें नाहीं. परंतु अधिकारीवर्ग आपण होऊनच जर दांडगाई करूं लागला व कायदा मोडूं लागला तर लोकांस आत्मसंरक्षणार्थ जरूर ते सर्व उपाय योजावे लागणें स्वाभाविक आहे, अशी या सभेंतील लोकांच्या मनांतली विचारसरणी असे व सभेंतील वक्तेही

त्याच गोष्टीचा उघड अनुवाद करीत. ' नेशन ' वगैरे वर्तमानपत्रांनीं ही विचारसरणी घोटघोटून इतकी उत्कृष्ट शिकविली होती कीं, ती सोडून किंवा तिला बाधक असें अथवा रतिभर कमीपणाचें असें यत्किंचितही बोलण्याची वक्तृत्याची सोय नसे. परंतु या विचारसरणीचीं मनावर पुटावर पुटें बसल्यानें अधिकारीवर्ग व लोक यांच्यांतील हा तंटा कोणत्या वेळेस हातघाईवर येईल याचा नियम नसून, पुढें मागें लवकरच तो हातघाईवर आलाच पाहिजे आणि राष्ट्रास आत्मरक्षणार्थ शस्त्र हातीं घ्यावें लागणार अशी ज्याच्या त्याच्या मनास खात्री वाटूं लागली होती. या होणाऱ्या गोष्टी लक्षांत घेऊन, लढाई जुंपली असतां देशांत माऱ्याच्या बिकट जागा कोणत्या, शत्रूस जेर कोठें करतां येईल, घोडेस्वार व पायदळ यांस अनुकूळ व प्रतिकूळ अशा गोष्टी कोणत्या, शस्त्रांचा पुरवठा कमी पडल्यास ती उणीव तात्पुरती कशानें भरून निघते, वगैरे बाबींची चर्चा पत्रांतून निमित्तानें व प्रसंगानुसार होऊं लागली. लाखों आयरिश लोकांस डोळ्यांसमोर असें दिसूं लागलें कीं, लवकरच अधिकारीवर्गांकडून आगळीक होणार व मग लोकांच्या निश्चयाचें व बलाचें पाणी दाखविण्याकरितां ' आतां वेळ आली आहे, पुढें व्हा, माघार घेऊं नका' असा हुकूम ओकॉनेल फर्मावणार. परंतु ओकॉनेल हा खरा शांततावादी होता हें त्या बिचाऱ्यांस काय ठाऊक ! कायद्याच्या तारेवर उभें राहून त्यानें केलेल्या कसरतीवरून त्यांचें त्याजबद्दल कांहीं निराळेंच मत झालें होतें; व त्या मताप्रमाणें त्यांच्या स्वतःवर जी जबाबदारी पडावयाची ती संभाळण्यास व पुरी पाडण्यास त्यांची स्वतःची तयारी होती. कारण ओकॉनेलनें हातांत शस्त्र धरण्यास सांगण्याचा अवकाश कीं त्यांनीं तें धरलेंच; मग परिणाम कांहींही होवो, असा त्यांचा आपले ठिकाणीं भरंवसा होता.

परंतु लोकक्षोभाची तार चढविणें जितकें सोपें असतें तितकें ती उतरविणें सोपें नसतें, व आयर्लंडच्या दुर्दैवानें या गोष्टीचा प्रत्यय ओकॉनेल यास व त्याच्या अनुयायांस लवकरच आला. सात आठ महिन्यांपर्यंत या जंगी

जाहीरसभांचा धुमाकूळ आयर्लंडांतील अधिकाऱ्यांनीं निमूटपणें सहन करून त्यांनीं आपल्या वरिष्ठांकडे कागाळी केली. पार्लमेंट सभेंत प्रश्न होऊन सदर सभांस प्रतिकूळ अशीं उत्तरें प्रधानमंडळाकडून देण्यांत येऊं लागलीं. व इतर काय वाटेल तें संकट येवो तें आपण सोसूं परंतु आयर्लंडास स्वतंत्र पार्लमेंटसभा देऊन एकजीव झालेल्या राज्याचीं शकलें करण्यास आपण केव्हांही तयार होणार नाहीं असें सरकारी रीतीनें जाहीर करण्यांत आलें. ज्या ऑनररी मॅजिस्ट्रेट लोकांनीं रिपिलच्या सभांतून वगैरे काम केलें होतें, त्यांस एकदम बडतर्फ करण्यांत आलें. जाहीर सभांस फ्रान्स व अमेरिका या देशांमध्यें जाऊन राहिलेल्या आयरिश लोकांच्या झुंडीच्या झुंडी आयर्लंडास येऊं लागल्यामुळें बंडाव्याचा वणवा केव्हां पेटेल याचा नियम नाहीं अशा समजुतीनें इंग्लंडमधून आयर्लंडमध्यें पसतीस हजार सैन्य पाठविण्यांत आलें. आयर्लंडांतील गड, किल्ले, गढ्या, बुरूज, पाणवठे वगैरे सर्व माऱ्याच्या व आश्रयाच्या ठिकाणांची डागडुजी करण्यास सुरुवात झाली. अशा धामधुमीच्या वेळीं जाहीर सभा भरविणें हें धोक्याचें आहे असें ओकॉनेल यास स्वतःस हळूहळू वाटूं लागलें होतें; परंतु या सभा कोणत्या सबबीवर थांबवाव्या हेंच त्यास कळेना. शेवटीं त्यानें व त्याच्या अनुयायांनीं असें ठरविलें कीं, आजपर्यंत न झालेली अशी आणखी एक जंगी जाहीर सभा भरवून मग सभांचें काम कांहीं दिवस थांबवावें, व त्याप्रमाणें पुढील सभा क्लॉनटार्फ या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं लवकरच भरविण्याचें मुक्रर ठरून देशोदेशीं निमंत्रणचिठ्या जाऊन लोक येऊंही लागले. ही सभा शेवटची असली तरी खास बंद करावयाची असें अधिकाऱ्यांनीं ठरवून पुढील योजनेचे गुप्त हुकूम सोडले. सभेचा जो कार्यक्रम पूर्वीं प्रसिद्ध करण्यांत आला होता, त्यामध्यें स्वयंसेवकांच्या घोडेस्वारांच्या पलटणीनें सभेचे प्रसंगीं कसें वागावें याविषयीं हुकूम देण्यांत आले होते. त्याचा फायदा घेऊन या सर्व लष्करी थाटाचा हेतु जमाव जमवून सरकारास दहशत घालण्याचा आहे, सबब सभा बेकायदेशीर ठरवितां येते अशी सल्ला

सरकारच्या कायदेपंडितांनीं दिली. परंतु त्या सल्ल्याप्रमाणें सभेस प्रतिबंध करण्याचा जाहीरनामा फार वेळ आगाऊ प्रसिद्ध केला तर गंमत बिघडणार, यास्तव सभेच्या आदले दिवसापर्यंत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला नाहीं परंतु सभेस अटक होणार ही बातमी आधीं एकदोन दिवस दाट पसरली होती व पुढें काय करावें या विवंचनेंत ओकॉनेल हा पडला. वेळ पडल्यास लढण्याची ज्यांची तयारी अशा लोकांच्या सभेस प्रतिबंध, व तोही बेकायदेशीर प्रतिबंध होण्याची अफवा! व अशी ही नुसती अफवा उठल्याबरोबर सभा कशी थांबवावी? बरें, न थांबवावी तर क्षणोक्षणीं लोकांचा जमाव अधिकाधिक जमत चालला असून सभा होणार या भिस्तीवर तयारीही कडेकोट होत चालली आहे! परंतु प्रत्यक्ष जाहीरनामा प्रसिद्ध होईपर्यंत काम आहे तसेंच चालू ठेवावें असा निश्चय करून सभेच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं रिपीलच्या कचेरीच्या खलबतखान्यांत ओकॉनेल व सभेची चालक मंडळी चिंतेनें व गंभीरपणानें वाटाघाट करीत बसली होती. इतक्यांत एकजण हातांत एक नुकताच छापलेला व अर्धवट ओला असा कागद घेऊन धांवत धांवत आला व धापा टाकीत त्यानें तो कागद मंडळीसमोर टेबलावर टाकला. पहातात तों तो सभाप्रतिबंधाचा जाहीरनामा! बराच वेळपर्यंत कोणाच्याही तोंडून शब्द निघेना. परंतु तेथें जमलेल्या तरुण मंडळीचे उद्गार लवकरच बाहेर पडूं लागले. सभा भरविलीच पाहिजे. मग काय होईल तें होवो असें मग ते प्रतिपादन करूं लागले. तीस वर्षेपर्यंत कायदेशीर चळवळीचा उघडपणें अंगीकार व बेकायदेशीरपणाचा निषेध केलेल्या आणि साठी उलटून सत्तरी जवळ आलेल्या या महानुभाव देशभक्ताचें मन या वेळीं विद्युच्चंचल अशा विचारतरंगांनीं भरून गेलें असल्यास नवल नाहीं. परंतु अखेर मनुष्यचारित्रांत अत्यंत दुरतिक्रम म्हणून प्रसिद्ध असलेला जो स्वभाव त्याचीच सरशी होऊन ओकॉनेल यानें आपली वळलेली मूठ मेजावर आपटून निकाल सांगितला. ‘सभा बंद झालीच पाहिजे. पुढील गोष्टींचा विचार पुढें!’ इतकें बोलून तो

कामास लागला. प्रथम दोन मनुष्यें सभेच्या जागीं पाठवून सभेकरितां तयार केलेला जंगी' प्लॅटफॉर्म ' उखळून टाकण्याचा त्यानें हुकूम केला. व ' अमुक अमुक कारणाकरितां सभा भरविण्याचें रहित केलें आहे, सबब यापुढें कोणीही सभास्थानीं जाऊं नये व जात असतील अगर गेले असतील त्यांनीं परत फिरावें, अशी चालकांची विनंति आहे ' अशा आशयाचीं हस्तपत्रकें व मोठमोठ्या जाहिराती छापवून, व जासूदजोड्या रवाना करून मशाली लावून रातोरात क्लॉनटार्फच्या आसपास दहा वीस मैलपर्यंत चवाठ्यावर त्या डकविण्याची त्यानें योजना केली. इकडे अधिकारीवर्गानेंही आपली तयारी कडेकोट ठेविली होती. पोलीस व लष्करच्या तुकड्या ठिकठिकाणीं उभ्या करून सभास्थानाच्या जवळ एक सबंद पलटण उभें केलें असून, सर्वांस चोवीस तास पुरण्याइतकें अन्न व भरपूर काडतुसें वगैरे वांटण्यात आलीं होतीं. सभास्थानावर मारा करतां येईल अशा ठिकाणीं दोन तीन तोफाही आणवून घोडे सोडून ठेवून दिल्या होत्या. परंतु या सर्व तयारीचा उपयोग होण्याचें कारण पडलें नाहीं. सभेचा बेत चालकांनीं रहित केला ही वातमी तारायंत्राप्रमाणें हातोहात तेव्हांच पसरली. यामुळें कांहीं लोक जागच्या जागींच थबकले, कांहीं निम्म्या वाटेवरून परतले व कांहीं सभास्थानापर्यंत जाऊन जागेस पाय लावून सभा होत नाहीं म्हणून निराशेनें खिन्न होऊन परत आले. अशा रीतीनें एका टीचभर कागदानें चालत्या बोलत्या अशा लाखों लोकांच्या उत्साहाचा समुद्र शोषून टाकिला !

ओकॉनेल ह्यानें केलेली गोष्ट वाजवी अगर गैरवाजवी याचा निर्णय आज करणें फारसें कठिण नाहीं; परंतु सभाबंदीनंतर प्रथम प्रथम कांहीं दिवसपर्यंत या बाबतींत मतभेदाचीं रणें पडावीं, व साधकबाधक विचारांचा पाऊस पडावा हें स्वाभाविकच आहे. 'रिपील' सभेंतील तरुण मंडळीस ओकॉनेलचा विचार अर्थातच पसंत पडण्यासारखा नव्हता. ते म्हणूं लागले कीं, या लाखों लोकांच्या जंगी जाहीर सभा भरविण्यांत अर्थातच कांहीं तरी हेतु होता; ' ती

कांहीं निव्वळ गंमत ह्मणून केलेली नव्हती किंवा तो खेळ खेळावयाचा नव्हता. सभा भरविणें हें कायदेशीर असलें तर प्रतिबंध करणें हें बेकायदेशीर असलेंच पाहिजे. निदान आज इतके महिने चाललेल्या सभा कायदेशीर असतां आजच एकाएकीं त्या बेकायदेशीर कशा झाल्या ? सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, सभा कायदेशीर असोत, अगर बेकायदेशीर असोत, राष्ट्रानें अंगीकृत केलेल्या रिपीलच्या चळवळीचें जर सभा हें एक मुख्य अंग आहे तर तें केवळ अधिकाऱ्यांना पसंत नाहीं एवढ्याकरितां छाटून टाकावें कीं काय? प्रतिबंधाचा जाहीरनामा लाविला असतांही सभा भरविली तर कोणाचें करणें अन्यायाचें अगर बेकायदेशीर हें ठरविण्यास संधि तरी मिळेल. पण ती नच भरविली तर जाहीरनामा बेकायदेशीर होता असा दावा मांडण्यास फिर्यादीस कारण कोठें घडणार ? अधिकाऱ्यांनीं लष्करी सामर्थ्याच्या जोरावर सभा उधळून टाकिली असती हें खरें आहे; परंतु पूर्वीच्या धोरणाप्रमाणें पाहिलें तर निदान तेथपर्यंत तरी मजल येऊं देणें जरूर होतें. त्याच्यापूर्वींच मोहरा फिरविण्यांत कमीपणा येणारा होता, व शेवटीं गोष्ट हातघाईवर येतीच तर प्रजापक्षाकडे लाखों लोक असल्यामुळें फार तर कांहीं बळी पडते. परंतु अखेर संख्याबलाचाच विजय होऊन हत्याराचें कांहीं चालूं नये असा प्रकारही संभवनीय होता. रक्तपात होऊं नये हें उत्तम. परंतु एवढी मोठी व इतक्या थराला आलेली राष्ट्रकार्याची चळवळ केवळ रक्तपाताच्या भीतीनें टीचभर जाहीरनाम्याच्या बुजगावण्यास भिऊन खड्ड्यांत लोटून द्यावी, हें शहाणपण कोठचें? अशा अर्धवटपणानें कोणत्याही चळवळीपासून राष्ट्रकार्याची मजल पुढें जाण्याच्या ऐवजीं मागेंच येते ! ' ओकॉनेल यानें लोकांच्या चित्तक्षोभाची तार ज्या रीतीनें हळू हळू चढवीत नेली होती, त्या रीतीवरून विचार करतां त्याच्या तरुण आक्षेपकांचें ह्मणणें थोडेंबहुत सयुक्तिकही होतें. ही तार चढवितांना शेवट मजल कदाचित् कोठवर जाईल याचा अजमास ओकॉनेल यानें आपल्या मनाशीं केला नसेल असें नाहीं. परंतु त्यानें केलेला अजमास मात्र चुकला यांत शंका नाहीं.

त्याच्या बोलण्यावरून व आवेशावरून त्याच्या अनुयायांनीं केलेलाच अजमास अधिक बरोबर होता, व ते अनुयायी स्वतः जें बोलत व प्रतिपादन करीत त्याप्रमाणें काय वाटेल तें झालें तरी आचरण करण्यास ते तयार होते. अशा रीतीनें एका बाजूस प्रामाणिक, सुसंगत परंतु अननुभविक असें तरुण पिढीचें मत, व दुसरे बाजूस अनुभवानें व कायद्याच्या शिक्षणामुळें हवें तें मत हवें तेव्हां, हवें तसें सजवून सयुक्तिक भासविण्याचें सामर्थ्य अंगीं येण्याइतक्या कसलेल्या तीव्र बुद्धीच्या त्यांच्या पुढाऱ्याचें मत—असा हा मोठा कठिण व दुर्धर असा विरोध उत्पन्न झाला. या विरोधाच्या तीक्ष्ण धारेमुळें क्लॉनटार्फच्या सभेच्या तारखेचे सुमारास लोकमताच्या तंतूची जी भरींव व पीळदार अशी रेशमी दोरी वळून गेली होती तिचे दोन तुकडे झाले. ओकॉनेलच्या तरुण अनुयायांस सभा बंद झाल्याचें वाईट वाटलें, परंतु आपल्या जबाबदारीवर फिरून त्यांनीं सभा भरविल्यास फिरून लोक येतील असें राष्ट्रांत त्यांचें वजन नव्हतें. राष्ट्राला पुष्कळ दिवस काम केलेला मनुष्य माहीत असतो व त्याचे धोरणावर त्यांचा विश्वास राहतो. प्रसंगविशेषीं त्याच्याही धोरणांत चूक होऊन त्याशीं विरोध करणाऱ्या एखाद्या तरुण मनुष्याचें धोरण अधिक बरोबर ठरण्याचा संभव असतो. परंतु खऱ्याखोट्याचा, युक्तायुक्ताचा असा सूक्ष्म भेद करून पूर्वीं मळलेलें वळण एका क्षणांत बदलून अननुभविक तरुणांस आपले पुढारी करण्यास समाज कधींही कबूल होत नाहीं. यामुळें या सभेच्या चालकांपैकीं तरतरीत मंडळीचें मत जरी ओकॉनेल याच्या मताविरुद्ध होतें, तथापि त्याच्या मताप्रमाणेंच निर्णय ठरून सभा मोडली.

परंतु झालेल्या गोष्टीचें ओकॉनेल यासही वाईट वाटलें. अधिकाऱ्यांचा टीचभर जाहीरनामा व लोकमताचा समुद्र यांच्या प्रत्यक्ष बलाबलासंबंधानें जो एका क्षणांत त्याला अनुभव आला त्याचें अंजन डोळ्यांत पडून त्याची अंतर्दृष्टि साफ झाली. परंतु त्या दृष्टीनें त्याला स्वतःचा झालेला अपमान दिसूं लागला व तो अपमान त्याच्या मनांत खुपूंही लागला. गेली बाजू

पुन्हां सांवरावी याविषयीं त्यानें अत्यंत परिश्रम चालविले. झाला प्रकार हा कांहींच लक्षांत घेण्यासारखा नाहीं असें आपलें मत आहे असें सफाईनें लोकांस भासवून त्यानें दर आठवड्यास होणाऱ्या 'रिपील' सभेच्या बैठकीस सुरुवात केली. परंतु 'बुंदसे गयी हौदसे आती नहीं' या म्हणीप्रमाणें त्याच्या उद्योगाचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. एक मोठी सभा भरूं देत नाहींत असें पाहून पुष्कळ ठिकाणीं एकदम लहान सभा भरण्याची युक्ति त्यानें काढली. परंतु त्या फुटकळ सभांसही जोर येईना. कर्तासवरता वीस वर्षांचा तरुण मुलगा हवा अशी इच्छा असणाऱ्या बापास वीस वर्षांचे एका मुलग्याऐवजीं दोन मुलगे दहा दहा वर्षांचे घेऊन चालीव असें म्हटलें तर त्याचें समाधान कसें होणार? तात्पर्य, उडालेली छाप बसवण्याकरितां ओकॉनेलनें पुष्कळ खटपट केली, परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

इकडे ओकानेल लोकांचे मनांतून उतरला असें पाहून त्याचा फायदा घ्यावा व त्याला तुरुंगांत पोंचवावें म्हणजे त्यास व इतर लोकांस चांगलाच वचक बसेल अशा हेतूनें त्याजवर खटला करण्याची अधिकाऱ्यांनीं तयारी केली. ता. १४ ऑक्टोबर १८४३ रोजीं ओकॉनेल यास वॉरंटानें पकडून त्याचा जामीन घेण्यांत आला. त्याजबरोबर त्याचा मुलगा जॉन, त्याचे दोन तीन मदतगार, नेशन पत्राची मंडळी, वगैरे इतर आठ मंडळीवरही खटला करण्यांत आला. 'ग्रॅन्ड ज्यूरी' कडून खटला 'सेशन्स कमिट' झाल्यावर ता. १५ जानेवारी १८४४ रोजीं तीन जज्ज व बारा ज्यूरर यांच्यासमोर खटल्यास सुरवात झाली. व तीन आठवडेपर्यंत खटल्याचें काम सुरू होतें. निरनिराळ्या आरोपींवर एकंदर ४३ कृत्यें मिळून अकरा गुन्हे केल्याचे आरोप ठेवण्यांत आले; व सर्वांस एका माळेंत गोंवून एकत्र चौकशी व्हावी म्हणून, सरकारास दहशत घालण्याचा कट केल्याचा आरोप सर्वांस लागू केला होता. आरोप ठेवण्याचा कागद ( चार्ज-शीट )

हाच कित्येक यार्ड लांब होता. उभय पक्षांकडून प्रसिद्ध प्रसिद्ध असे बॅरिस्टर देण्यांत आले होते. सरकारी वकिलानें सुरुवातीचें भाषण करण्यास दोन दिवस घेतले. पुराव्याचें काम सात दिवस झालें. डिफेन्सतर्फे भाषणास सात दिवस लागले. व सरकारी वकिलानें उत्तरादाखल केलेल्या भाषणास तीन दिवस घेतले. अखेरच्या दिवशीं ज्यूरीला खटला समजावून देतांना फार उशीर झाला व ज्यूरीचा निर्णय होण्यास रात्रीं बारा वाजले ! तोंपर्यंत कोर्टांतील एकही माणूस हालला नाहीं. ज्यूरी आपलें मत बनवून आली, परंतु ९ आरोपी, ११ गुन्हे व ४३ कृत्यें इतक्यांचा मेळ ज्यूरीस बसवितां येईना. कोणी म्हणे रात्र झाली आतां खटला तहकूब करा, कोणी म्हणे खटला तहकूब करणें बेकायदेशीर होईल; कोणी म्हणे ज्यूरीला कोंडून ठेवा. शेवटीं खटला तहकूब करून ज्यूरीस घरीं जाण्यास परवानगी मिळाली. पुढच्या तारखेस ज्यूरीनें सर्वांवर आरोप शाबीत असा निकाल दिला. परंतु शिक्षा सांगण्याचें काम न्यायाधिशांनीं लांबणीवर टाकलें, व जामिनावर असलेले आरोपी आपापल्या घरीं गेले. खटल्याचे अखेरीचे दिवशीं ज्यूरीचा अभिप्राय ऐकून त्याची बातमी लंडनला नेण्याकरितां ' किंग्ज टाऊन ' बंदरांत स्पेशल आगबोट तयार होतीच, तिनें ताबडतोब ज्यूरीच्या अभिप्रायाची बातमी लंडनला पोंचविली; व दुसरे दिवशीं ती लंडन टाइम्समध्यें प्रसिद्ध झाली.

ज्यूरीचा अभिप्राय व निकाल यांजमध्यें बरेच महिने गेले. त्या अवधींत ओकॉनेलनें ' रिपील ' सभेच्या बैठकी ठराविक रीतीप्रमाणें भरविण्याचें काम सुरू केलें. खटल्यासंबंधानें या बैठकींतून बराच वादविवाद झाला, व वर्तमानपत्रकार सभेचे सभासद असतां वाटेल ते आपल्या वर्तमानपत्रांत लिहितात व त्याचा परिणाम सभेला भोगावा लागतो अशी ओकॉनेलनें तक्रार केली. त्यावरून भांडण होऊन नेशन पत्राच्या व इतर वर्तमानपत्रांशीं संबंध असलेल्या सभासदांनीं सभासदांच्या

जागांचे राजीनामे दिले. तसेंच, यापुढें सभा व खाजगी लवाद कोर्टें यांचाही संबंध ठेऊं नये असें ठरविण्यांत आलें. तेव्हां लवाद कोर्टें वेगळीं केलीं. परंतु 'रिपील' सभेच्या लोकप्रियतेवर सदर कोर्टांचीही लोकप्रियता अवलंबून असल्यामुळें वर वर्णिलेल्या घटस्फोटानें या कोर्टांचा मुख्य आधार जाऊन तीं मोडलीं. अशा रितीनें सभेची वाताहात होण्यास सुरुवात झाली. नंतर ओकॉनेल हा इंग्लंडास गेला. तेथें त्यास मेजवान्या वगैरे देण्यांत आल्या. तो तेथें असतां एक मुद्दा इंग्लंडांत विशेष चर्चेस निघाला. खटल्यांत सरकारानें एकंदरीनें जी गैरवर्तणूक केली ती इंग्लंडांतील न्यायप्रिय मनुष्यांस पसंत पडली नाहीं. मुख्यतः ज्यूरीची याद तयार करतांना शेरिफच्या 'ऑफिसां' त जो दगलबाजपणा झाला त्याची तर त्यास चीडच आली. ज्यूरर लोकांची याद तयार होतांना शेंकडों मनुष्यांचीं नांवें त्यांतून मुद्दाम गाळण्यांत आलीं होतीं. व त्यामुळें सर्व बाराचे बारा ज्यूरर लोक प्रॉटेस्टंटच निवडून आले. हे लोक धर्मदृष्ट्या ओकॉनेलचे प्रतिपक्षी असल्यामुळें त्यांनीं निःपक्षपातीपणानें निकाल देणें शक्य नव्हतें, व म्हणून या खटल्यांत न्यायाचा खून झाला, असें ते उघड म्हणूं लागले! झालेल्या खटल्याचें काम रद्द होऊन फिरून नवीन काम चालावें असाही कोणीं मुद्दा काढला. परंतु अखेर त्या प्रकारची विशेष कांहीं खटपट न होतां ठराविक तारखेस कोर्टापुढें आरोपीस आणून कोर्टानें शिक्षा सांगितली. शिक्षा सांगण्याचें काम बर्टन नांवाच्या जज्जाकडे आलें. बर्टन हा ओकॉनेलच्यापुढें पोर शोभेल असा होता. शिवाय तो पूर्वी बॅरिस्टर असल्यानें केव्हां ओकॉनेलच्या बाजूस त्यानें मदत केलेली व केव्हां प्रतिपक्षी होऊन त्याजबरोबर दोन हात केलेले असा त्यांचा पूर्वीचा संबंध असल्यामुळें, बर्टन यास शिक्षा सांगतांना गळा भरून गहूं आलें. शिक्षा सांगतांच ओकॉनेल हा उठून उभा राहिला, व त्यानें दोन तीन वाक्यांचें लहानसें भाषण करून असें सांगितलें कीं, कोर्टानें निकाल दिल्यावर न्यायमूर्तीस

उत्तर द्यावें अगर निकालावर टीका करावी असा माझा हेतु नाहीं; परंतु झाला हा न्याय झाला नाहीं एवढें मात्र सांगणें जरूर आहे व मी तें उघडपणें सांगतों.

ओकॉनेल यास एक वर्ष साधी कैद, दोन हजार पौंड दंड व हजार पौंडाचा पांच वर्षें चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन अशी शिक्षा फर्मावण्यांत आली. इतर आरोपींस नऊ नऊ महिने शिक्षा झाल्या. ओकॉनेल यास शिक्षा होतांच अधिकाऱ्यांना आपणास काय हवें होतें तें मिळालें असें वाटलें, व त्यांचें समाधान होऊन पुढील क्रमांत मात्र ओकॉनेल यास त्रास द्यावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें. सर्व आयर्लंडातील वाटेल तो तुरुंग तुम्ही पाहून पसंत करा असें त्यास खाजगी रीतीनें सांगण्यांत आलें. व त्याप्रमाणें त्याच्या स्नेह्यांनीं रिचमंड येथील तुरुंग पसंत केला. त्याचें कारण असें होतें कीं, रिचमंडच्या तुरुंगाची व्यवस्था डब्लिन येथील म्युनिसिपालिटीकडे व तिच्या पैशातून होत असे. व ओकॉनेल हा डब्लिन म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष ऊर्फ लॉर्ड मेयर असल्यानें या तुरुंगांत त्याची व्यवस्था उत्तम राहील हें सांगावयास नकोच होतें. खटला चालू असतां ओकॉनेल हा लॉर्ड मेयरच्या रथांत बसून मागेंपुढें म्युनिसिपालिटीचे पट्टेवाले घेऊन दणदणत कोर्टांत येत असे व शिक्षा झाल्यावरही तो तसाच तुरुंगांत गेला. त्याजबरोबरच्या इतर कैद्यांसही त्याच्याचबरोबर रिचमंड तुरुंगांत ठेविलें होतें. ओकॉनेल तुरुंगांत जाण्याचे सुमारास तुरुंगाचे कचेरींत 'व्हिजिटर' लोकांची सभा अनायासेंच भरली होती, तेव्हां त्यांनीं ओकॉनेल यास अर्थातच सभेंत बोलाविलें. तो येतांच उठून त्यांनीं त्याचा सत्कार केला. तुरुंगांत जी कोणती सोईची व चांगली जागा असेल ती त्यास द्यावी असें ठरविलें. व जेलर यासच त्याचे बंगल्यांतून दुसरीकडे घालवून जेलरचा बंगला ओकॉनेल व त्याचे लोक यांचे स्वाधीन करण्यांत आला. मग या ठिकाणीं त्यांचा ऐटदार संसार थाटला. या राजमान्य कैद्यांस बाहेरून सर्व

खाना उत्तम प्रतीचा तयार होऊन येत असे. चहा, फराळ, फळफळावळ यांची नित्य चंगळी उडे. ओकॉनेलकडून ' मी पळून जाणार नाहीं, व मला दिलेल्या सवलतीचा दुरुपयोग करणार नाहीं, ' असें वचन तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं घेतल्यावर सर्व तुरुंगाचे आवारांत त्यास अनिरुद्धपणें संचार करण्यास मोकळीक मिळाली. तुरुंगांतील बाग त्यास व्यायाम घेण्याकरितां व करमणूक करण्याकरितां बहाल करण्यांत आला होता. व तेथें तो आपलीं नातवंडें घेऊन फुलांच्या ताटव्यांत खेळत बसे. त्यास भेटण्याकरितां नित्य लोकांची गर्दी जमे, व त्याच्या भेटी करविणे हेंच तुरुंगावरील अधिकाऱ्यांचें मुख्य काम होऊन बसलें होतें. बागेंत बसून तो टपाल वगैरे वाची आणि भेटण्यास आलेल्या लोकांच्या गांठी घेई, व त्यांस चहापार्ट्या करी. रोज नवा धर्मोपदेशक येऊन त्याची सकाळ संध्याकाळची धर्मोपासना चालवी. व मी आधीं, मी आधीं, अशी या कामास जाण्यासंबंधानें धर्मोपदेशकमंडळांत अहमहमिका सुरू झाली होती. तुरुंगांतल्या अधिकाऱ्यांनीं नाहीं म्हणावयाला एका गोष्टीस हरकत घेतली. कॉर्क, वॉटरफर्ड, लिमरिक, किलकेनी वगैरे शहरांच्या म्युनिसिपालिटयांनीं ओकॉनेल यास मानपत्रें देण्याचें ठरवून तीं सुंदर करंड्यांत घालून सभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे हातीं त्यास तुरुंगांत सादर करण्यास पाठविलीं होतीं. परंतु तुरुंगांतील कैद्यास मानपत्रें घेऊं देणें म्हणजे तुरुंगवासाची अगदीं उघड थट्टा केल्यासारखीच होईल या हेतूनें अधिकाऱ्यांनीं हे मानपत्रसमर्पणाचे समारंभ करूं दिले नाहींत. ओकॉनेल-बरोबरच्या इतर कैद्यांसही सर्व तऱ्हेची सवलत देण्यांत आलेली होती. त्यामध्यें वर्तमानपत्राच्या धंद्यांतले बरेच लोक असल्यामुळें, त्यांनीं तुरुंगातल्या तुरुंगांत ' जेलखाना-गॅजेट ' नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें. जाहीरसभांवांचून त्यांस चैन पडण्यासारखें नसल्यानें बागेंतल्या एका उंचवटयास ' तारागड ' हें नांव देऊन फावल्यावेळीं त्यावर एकानें उभें राहून बोलावें, व इतरांनीं खालीं उभें राहून तें भाषण ऐकावें असा क्रम त्यांनीं चालवून दुधाची

हौस कशी तरी ताकावर भागवून घेतली ! या सर्व सरदारी कैद्यांवर बाहेरून चहात्या भक्तांकडून व मित्रांकडून भेटीचा व देणग्यांचा वर्षाव होत असे. एका संगीतप्रिय मनुष्यानें, तुरुंगांतल्या या आपल्या मित्रांचा आत्मा गायन-वादनाच्या ओलाव्याविणें सुकून जाईल असें समजून, प्रत्येकीं एक एक अशी हार्मोनिअमची पेटी नजर पाठविली. इतक्या विचारानें व प्रेमानें पाठविलेल्या भेटीचा सत्कार तसाच करणें जरूर होतें. या हार्मोनियमच्या पेट्या तुरुंगांत जाऊन पोंचतांच त्या नऊही पेट्या त्यांनीं एकदम उघडून वाजविण्यास सुरुवात केली. व आपल्या बंदीजनांच्या आपत्तीची ही सुरेल वार्ता कानीं पडतांच हा काय प्रकार आहे म्हणून तुरुंगाचे अधिकारी पहावयास धांवून आले !

ओकॉनेल वगैरे कैदी तुरुंगांत असतां त्यांचें अपील इंग्लंडांतील अपील-कोर्टाकडे दाखल करण्यांत आलें होतें. वरिष्ठ कोर्टाच्या वकिलांनीं मुद्दे काढण्याची शर्थ केली. चार्जच्या प्रत्येक वाक्यागणिक एक एक मुद्दा निघाला होता म्हटलें तरी चालेल. ज्यूरीचे बाबतींत झालेल्या अन्यायाचा डंका सर्व इंग्लंड-भर आगाऊच वाजला होता. शिवाय ‘ रिपील ’ सभेचें काम थांबल्यामुळें राजकारणसंबंधीं पूर्वीची भीति प्रधानमंडळास उरली नव्हती. यामुळें आरोपींच्या अपीलाचें काम सोपें झालें. लॉर्ड लोकांत मतभेद झाला व खालील कोर्टाची शिक्षा ज्या ज्यूरीचे निकालावर अवलंबून होती ती ज्यूरीच मुळीं गैरवाजवी रीतीनें निवडली गेली होती. सबब शिक्षा रद्द असें अखेर मत ठरून त्याप्रमाणें निकाल सांगण्यांत आला. अपीलकोर्टाचा निकाल आयर्लंडांतील लोकांस लवकर कळविण्यांत यावा याकरितां बंदरांत स्पेशल बोट ठेविली होती. तिजमध्यें ओकॉनेलचा सॉलिसिटर क्षणाचाही विलंब न करतां उडी मारून बसला व बोट चालू झाली. जातां जातां त्यांनीं बोटीवर निशाण चढविलें व ‘ ओकॉनेल दोषमुक्त झाला ’ अशीं अक्षरें कातरून त्या फडफडणाऱ्या निशाणावर लाविलीं. डब्लिन येथें पोंचतांच तो सॉलिसिटर धांवत धांवत तुरुंगांत गेला व ओकॉनेल

व इतर मंडळी भोजनास बसली होती त्यांस पाहून ' दोषमुक्त ' अशीं अक्षरें त्यानें दुरूनच ओरडून उच्चारलीं. त्याच रात्रीं कैद्यांची बंधमुक्तता झाली. परंतु समारंभाकरितां फिरून त्यास तुरुंगाकडे नेऊन त्यांची मिरवणूक तेथून काढून गांवभर मिरविण्यांत आली ! ओकॉनेलच्या उघड्या गाडीवर, जुनीं आयरिश राष्ट्रीय गीतें व पवाडे म्हणणारा एक गवई व सारंग्या बसविलेला असून, मागें पुढें डब्लिनमधील छप्पन्न धंद्यांचे लोक चालत होते, व ओकॉनेलच्या जयजयकाराबरोबरच ब्रिटिश न्यायदेवतेच्या जयजयकाराचा प्रचंड ध्वनि, आपण काय करतों याचा विसर पडूनच कीं काय, त्या मिरवणुकींत हजारों लोकांच्या तोंडांतून बाहेर पडत होता. अशा रीतीनें तो आनंदाचा दिवस ओकॉनेलच्या भक्तांनीं उत्साहपूर्वक साजरा केला. परंतु या उत्साहाच्या शीण उतरतांच दुसरे दिवसापासून, त्यांस क्लॉनटार्फच्या सभेची आठवण होऊं लागली. व सभाबंदीच्या जाहीरनाम्याच्या एका पुर्ज्यानें ओकॉनेल व रिपील यांच्या अवतारसमाप्तीचें जें थोडेंबहुत काम खटल्याच्या धामधुमीच्या दिवसांत शिल्लक ठेवलें होतें, तें ब्रिटिश न्यायदेवतेचा जयजयकार व धन्यवाद यांनीं पुरें करून टाकलें. इंग्लंडातील अपीलकोर्टानें न्याय केला, परंतु त्या दिवसापासून ओकॉनेल हा जगांत आहे व नाहीं सारखाच झाला. रिपील सभेचा नाश होण्यास इतरही कित्येक, परंतु याहून अधिक चमत्कारिक कारणांची मदत झाली. मुख्य प्रधान पील यानें जमिनीसंबंधाचें बिल पुढें आणून जमीनदार व कुळें यांमध्यें विरोध उत्पन्न केला. क्याथोलिक लोकांच्या संस्थांस मदत करण्याकरितां एक लक्ष पौंड देऊं केले. यामुळें क्याथोलिक लोकांच्या तोंडास पाणी सुटलें व हातचें सोडून पळत्याचे पाठीमागें लागण्यांत फायदा नाहीं असें त्यांस वाटूं लागलें. आयरिश कॉलेजांसंबंधानें बिल पुढें आलें. त्याबद्दल ओकॉनेल व नेशनपत्राची संपादक मंडळी यांजमध्यें धार्मिक कोण व अधार्मिक कोण हाच वाद माजून शिक्षणाचा प्रश्न बाजूस पडला. व ओकॉनेल हा धर्मवेडा असून म्हातारपणीं आतां त्यास क्याथोलिक लोकांचें वर्चस्व स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली

असें त्याचे प्रॉटेस्टंट प्रतिपक्षी त्याचेवर आरोप करूं लागले. इंग्लिश पार्लमेंट-मधील लिबरल पक्षास आयरिश सभासदांनीं मिळावें कीं नाहीं याबद्दलचा जुना वाद पुन्हा सुरू झाला. परंतु इतकें होऊनही जो कांहीं थोडाबहुत मेळ रिपील सभेंत राहिला होता तो ओकॉनेलचा मुलगा जॉन यानें आपल्या मूर्खपणानें नाहींसा करून टाकिला. त्यानें 'रिपील' सभा सोंवळी करण्याचे हेतूनें नवीन एक शपथ तयार केली व 'मी कधींही सनदशीरपणा सोडून कोण-तीही चळवळ करणार नाहीं' अशी शपथ प्रत्येक सभासदानें घेतली पाहिजे असा ठराव तिजकडून पास करून घेतला. या शपथेमुळें सभेंतून बरीच मंडळी निघून गेली व सभा मोडली. याच सुमारास बटाट्याचे पिकावर सर्व देशभर भयंकर दुष्काळ सुरू झाला. व जे देशभक्त पार्लमेंटचें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां व कागदी घोडे नाचविण्याकरितां आकाशपाताळ एक करीत होते त्यांना, आपल्या देशबांधवांची आपत्ति व उपासमार दिसत अस-तांही गरीबांस अन्न देऊन त्यांचे प्राण वांचविण्याची बुद्धि होत नाहीं असें पाहून, 'धिःकार असो तुम्हांला व तुमच्या चळवळीला' असें शेतकरी लोक म्हणूं लागले. ओकॉनेलच्या पक्षाचे धिंडवडे होण्याचें आतां बाकी राहिलें नव्हतें. परंतु दैवदुर्विपाक परिपूर्ण व्हावयाचा होता म्हणूनच कीं काय, ओकॉ-नेलच्या वजनाचें दडपण कमी होतांच निंदकांची हलकी जिव्हा स्वैरपणें नाच करूं लागली. कोणी त्याचेवर 'रिपील' सभेचे पैसे खाल्ल्याचा आरोप करूं लागले; कोणी त्याला म्हातारचळ लागून चेष्टा आठवूं लागल्या असें म्हणूं लागले. खरोखर निंदकांनीं तरी काय करावें ? जें दिसे तें ते बोलत. ओकॉने-लला याच सुमारास थोडेंसें वेड लागल्यासारखें झालें होतें व ही गोष्ट पुढें दोन वर्षांनीं उघडकीस आली. त्याचा मगज बिघडून त्याच्या हातून एरव्हीं सहसा न होतील अशा गोष्टी होऊं लागल्या. शेवटीं मुळींच तो आयर्लंड सोडून इंग्लंडास गेला. या खेपेस त्याची छाप पार्लमेंटमध्यें मुळींच पडली नाहीं. त्याच्या तोंडातून शब्द स्पष्ट उमटत नाहींसे झाले. प्रथम प्रथम जरी लोक

गंभीरपणानें त्याचें बोलणें ऐकण्याचा प्रयत्न करीत, तरी पुढें लवकरच त्याचे बोलण्याचा त्यांस कंटाळा आला. मग कांहीं दिवस तो पारिस येथें व नंतर रोमला गेला. त्याचे मनांत रोमची यात्रा करण्याची इच्छा होती, ती सफळ झाली. रोमहून परत आल्यावर जिनोआ शहरीं ता० १५ मार्च सन १८४७ रोजीं त्यास मृत्यु आला. मृत्युपत्रांत त्यानें आपलें काळीज कापून काढून रोम येथील पवित्र भूमींत पुरावें असें लिहिलें होतें. त्याप्रमाणें करण्यांत येऊन त्याच्या मुलांनीं त्याचें शरीर आयर्लंडास परत नेलें व मोठ्या जंगी समारंभानें त्याचा दफनविधि करण्यांत आला. पुढें १८६९ सालीं आयरिश लोकांनीं वर्गणी केली व १६५ फूट उंचीचा एक सुंदर मनोरा त्या जागेवर बांधून त्याचें त्यांनीं स्मारक केलें.

ओकॉनेलच्या स्वभावांत गुणदोषांची सरमिसळ झालेली होती; तथापि याच्या एकंदर चरित्रावरून पाहतां त्याचे दोष आठवण्यापेक्षां किंवा उगाळीत बसण्यापेक्षां गुणच घ्यावे अशा प्रकारचा तो मनुष्य होता यांत शंका नाहीं. चरित्रक्रमास सुरुवात होण्याचे वेळीं तो दरिद्री नव्हता; साधारण संपन्नच होता म्हटलें तरी चालेल. त्याच्या एक दोन चुलत्यांकडून त्यास बरीच इस्टेट मिळाली होती. पुढें पुढें त्यास वकिलीचे धंद्यांतही चांगलेच पैसे मिळूं लागले. म्हातारपणीं तो बेताचे खटले व पुष्कळ फी घेत असे, परंतु जशी जसा तसाच त्याचा खर्च असे. त्याची राहण्याची पद्धति थाटदार असे. पहिल्यापासून त्यानें घरची गाडी ठेविलेली असून उत्तम पोषाख करून ही स्वारी तींतून डब्लिनचे राजरस्त्यानें हिंडावयास निघाली कीं, 'वकीलसाहेबांची स्वारी निघाली' असें म्हणून लोक त्याजकडे आदरानें एकमेकांस बोटें दाखवीत. त्याच्या घरचा खर्च फारच मोठा असे. डब्लिनमध्यें एक, लंडन येथें एक व खेड्यास एक अशीं त्याचीं तीन घरें व तीन संसार असत. घरची मंडळीही पुष्कळ. चार मुलगे व तीन मुली अशीं त्याचीं स्वतःचीं मुलें होतीं. शिवाय मामे, काके सुमारें पंचवीस होते व लग्न झालेल्या बहिणी सात असा हा मोठा

प्रपंच होता. सकाळ संध्याकाळ घरचा बाहेरचा, आला गेला, मिळून सुमारें तीस पानें भोजनास असत. पैशाचे कामांत ओकॉनेल हा दक्ष नसे. तो खर्चिक तर खराच, पण हिशेबीही नव्हता. त्यास कर्जबाम नाहीं असें बहुधा झालें नाहीं. त्यामुळें व हिशेबाठिशेब असावे तितके चोख नसत. यामुळें त्याजवर लोक तो सार्वजनिक पैशांतील पैसा खातो असा आरोप केव्हां करीत. व कांहीं कांहीं गोष्टी त्यांनीं असा आरोप केला असतां सकृद्दर्शनीं शोभतील अशाच होत्या. उदाहरणार्थ, तो रिपील सभेची वर्गणी व इतर पैसे आपल्या नांवें आपल्या बँकेंत ठेवी व त्यांतून सभेचा खर्च आपल्या मनाला येईल तसा करी. सभेच्या जमाखर्चाचा हिशेब तो वेळच्यावेळीं प्रसिद्ध करीत नसे. याबद्दल सभेचे लोक त्याजवर नाखूष असत. पार्लमेंटच्या निवडणुकी करविणें पुष्कळ वेळां त्याचे हातीं असे; व उमेदवारास मदत करून त्यांजकडून तो पैसे घेतो असाही एक वेळ त्याजवर आरोप आला होता. दुसरी एक गोष्ट त्याच्यासंबंधानें कित्येकांस गौण अशी वाटत असे, ती ही कीं, आपल्याकरितां साल दरसाल लोकांकडून वर्गणी जमवून तिचा तो स्वीकार करीत असे. तिला ' ओकॉनेलची वर्गणी असें म्हणत. साल दरसाल त्याच्या चहात्या भक्तांपैकीं कोणी तरी पुढाकार घेऊन ही वर्गणी वसूल करण्याची खटपट करी. वर्गणीची वेळ आली कीं एखाद्या उत्तम लेखकास पैसे देऊन त्याजकडून ओकॉनेलच्या स्तुतीनें भरलेला असा उत्तम लेख तयार करून वाटावयाचा व मग वर्गणी गोळा करण्यास निघावयाचें, असा परिपाठ असे. या वार्षिक वर्गणीचे दरसाल सुमारें पंधरा हजार पौंड जमत. त्यांतील खर्चवेंचाचे सुमारे पांच हजार पौंड वजा जाऊन त्यास दहाएक हजार पौंड सालीना रहात. या गोष्टीस अनुलक्षून त्याच्या प्रतिपक्षीयांनीं ओकॉनेल याचें नांव ' बडा भिकारी' असें ठेविलें होतें अशा तऱ्हेनें सालोसाल लोकांकडून आपल्या नांवानें वर्गणी जमवून त्या पैशाचा उपयोग आपल्या प्रपंचाकडे करणें हें फारसें शिष्टसंमत होईल असें आम्हांस वाटत नाहीं; व या गोष्टीमुळें

ओकॉनेलविषयीं त्याच्या स्वतःच्या व विरुद्ध पक्षांतील, विशेषतः इंग्लंडांतील लोकांचे मनांत त्याजविषयींच्या मान्यतेस कमीपणा आलेला होता. क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यावर ओकॉनेल यानें परकार्यांत पांचपंचवीस वर्षे देह झिजवून अत्यंत मेहनत घेतली या त्याच्या उपकारऋणाचें थोडें बहुत तरी उतराई व्हावें या हेतूनें क्याथोलिक लोकांनीं पन्नास हजार पौंड वर्गणी जमवून ती रक्कम पूर्वींच त्यास नजर केली होती. परंतु त्याबद्दल कोणी आक्षेप घेत नसे. कारण विशेष कामगिरी-करितां विशेष बक्षीस देण्याची रीत सर्वत्रच आहे. निरनिराळ्या देशांतूनही अशा प्रकारच्या देणग्या दिल्याघेतल्याचीं अनेक उदाहरणें सांपडतात. सार्वजनिक कार्य करण्यास ज्यानें खरोखर आपला सर्व काळ वाहिलेला आहे, व खासगी प्रपंचाची चिंता ज्याचे मागें राहिली असतां त्यांत एकंदरीनें त्या व्यक्तीपेक्षां समाजाचेंच अधिक नुकसान आहे, अशा व्यक्तीच्या निर्वाहाची सोय परस्पर करून पोट भरण्यापेक्षां अधिक महत्त्वाचें काम करण्यास त्याचे हात मोकळे ठेवणें या व्यवस्थेंत फारसें नांव ठेवण्यासारखें कांहीं नाहीं. कोणा-वरही एक पैसा भार न घालतां स्वकष्टानें चरितार्थ चालवून वरती लोकसेवा साधणें हा अर्थातच उत्तम पक्ष. याच्या खालोखालची पायरी म्हटली म्हणजे लोकांनीं आपल्या चरितार्थाची योजना करावी व केवळ निर्वाहास अवश्य म्हणून हा मोबदला स्वीकारून त्यांची सेवा सर्व वेळ व सर्व शक्ति खर्चून करणें ही होय. अशा प्रकारचीं उदाहरणें खुद्द आयर्लंडांतच ओकॉनेलच्या पूर्वी व नंतर घडून आलेलीं होतीं. सुप्रसिद्ध आयरिश देशभक्त ग्रॅटन यास व पुढें पार्नेल यास त्यांच्या कामगिरीबद्दल अशीच पन्नास व तीस हजार पौंडांची देणगी सार्वजनिक पैशांतून देण्यांत आलेली होती. परंतु ती घेतल्यावर पुढें ग्रॅटन हा बॅरिस्टरी वगैरे करून पैसे मिळविण्याचे आशेस गुंतला नाहीं. ओकॉनेल याची गोष्ट वेगळ्या प्रकारची होती. एकदम मिळालेली पन्नास हजार पौंडांची देणगी तर त्यानें घेतलीच परंतु वर सांगितल्याप्रमाणें सालोसाल उभारलेली

वर्गणीही तो निःशंकपणें घेत असे व इतक्यानेंही तृप्ति न होतां वकिलीचा धंदाही त्यानें चालू ठेविला होताच. या सर्व गोष्टींचा मेळ उत्तम रीतीनें बसण्यासारखा नसल्यामुळें कांहीं कांहीं लोक त्यास सहजच नांवें ठेवीत. आतां दुसऱ्या बाजूस एकच गोष्ट जमेस धरण्यासारखी आहे, व ती ही कीं, ओकॉनेल यास तीस पसतीस वर्षेंपर्यंत त्यानें अंगीकारलेलें हें सार्वजनिक काम पुढारीपणा घेऊन करावें लागलें. कर्तृत्ववान आणि हौशी अशा पुढाऱ्यास आपल्या कामांत पैसा पाण्यासारखा खर्च करावा लागतो, व कित्येक वेळां तर पैशाचा हात आखडून धरला असतां कार्य नासतेंही. ओकॉनेल याचा स्वभाव हिशेबी नव्हता, एवढी त्याच्या स्वभावासंबंधानें मुख्य अशी गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे तो ' रिपील ' सभेचे पैसे पेढीवर आपल्या नांवानें कां जमा करीत असे वेळच्यावेळीं हिशेब कां प्रसिद्ध होत नसत, व वार्षिक वर्गण्यांचा स्वीकार तो कां करित असे, या सर्व गोष्टींचा उलगडा बहुधा होण्यासारखा आहे.

ओकॉनेल हा क्याथोलिक पंथाचा होता व खरोखरच त्याचे ठिकाणीं धर्मश्रद्धा होती. तो स्वतः मोठा कर्मठ होता असें नाहीं. परंतु धर्माच्या बाबतींत भाविक होता. धर्मोपदेशक वर्गावर त्याची मनापासून भक्ति असे. मात्र धर्मश्रद्धेचा सामाजिक नीतिमत्तेशीं मेळ ज्यांत नाहीं अशा प्रकारचा मनुष्यस्वभावाचा नमुना अनेक ठिकाणीं दृष्टीस पडतो. ओकॉनेल याच्या मनाची रचनाही याच नमुन्याबरहुकुम झालेली होती. तरुणपणीं चरित्रक्रमास सुरुवात होण्याच्या वेळीं तो विषयी व चैनी असा होता; व लवकरच सार्वजनिक कामाची हौस त्याला न लागती तर मद्यपानाच्या संवयीचा पगडा त्याच्या मनावर बसण्याचा संभव होता. तरुणपणीं स्त्रीमोहाचें फळ म्हणजे अपत्यही त्यास प्राप्त झालें होतें. परंतु त्या दुर्दैवी अपत्याचा व त्याच्या मातेचा परामर्ष उदारपणानें त्यानें घ्यावयास पाहिजे होता तसा घेतला नाहीं असा त्याजविरुद्ध एक लोकापवाद असे. पैशाचे बाबतींत त्याचें मन नाजूक नसून ढोबळ असे हें

वर सांगितलेंच आहे. नीतिदृष्ट्या तिसराही एक दोष त्याजमध्यें असे तो हा कीं, खऱ्याखोट्याची चाड त्याच्या योग्यतेच्या मनुष्यानें जितकी धरावी, तितकी त्यास नसे. प्रतिपक्षाशीं वाद करितांना, ' मी त्याजवर दोषारोप करितों ते कदाचित् खोटे असतील ' असा संशयही त्यास येत नसे व आला तरी तो मानीत नसे. शिवाय तोंड टाकून बोलणें व शिव्या देणें ही संवय तर अगदीं त्याच्या हाडास खिळलेली होती. रस्यांत तोंडाळ बागवानीण अगर घोड्यावर चढलेला मद्यपी यांच्याशीं भांडावयाचें असो, अगर भर पार्लमेंट सभा बसली असतां तिजमध्यें मुख्य प्रधानावर हल्ला करावयाचा असो, त्याची जीभ सारखीच चाले. कोणास काय बोलूं अगर कोणतीं विशेषणें लावूं याचा विचारही त्याचे डोक्यांत येत नसे. मग शब्दाचें औचित्य अथवा सौष्ठव हें साधण्याकडे वेळ कोण खर्च करणार? त्याचें तोंड म्हणजे एक शिव्यांचें मोठें गटारच होतें. त्यांतून वेळीं अवेळीं काय वाहील याचा नेम नसे. अथवा तें तोंड म्हणजे आतषबाजीचा एक घडाच होता; एकदां आंत ठिणगी पडली म्हणजे मग घडा फुटून त्यांतून एक बारीपासून सातबारीपर्यंत किती फटाके किंवा तोटे निघतील याचा नियम नसे. या त्याच्या तोंडाळपणाला प्रतिपक्षी स्वाभाविकपणें थोडेबहुत वचकत; परंतु त्याच्या शिव्यामध्यें कायमचा डाग लावण्याची अगर घरें पाडण्याची शक्ति असल्यामुळें त्यानें अनेक शत्रू करून घेतले होते, व त्या काळीं द्वंद्वयुद्धाची चाल असल्यामुळें त्याजकडून अपमान पावलेल्या शत्रूंकडून त्यास युद्धाचीं बरींच बोलावणीं आलीं; व तीं नाकारण्याचा निश्चय पहिल्यापासून त्यानें केला नसता तर त्याच्या चरित्राची परिसमाप्ति कदाचित् तरुणपणींच झाली असती !

परंतु ओकॉनेलचा एकंदरीनें स्वभाव गोड होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच्या घटनेमध्यें सत्त्वगुणापेक्षां रजोगुण व तमोगुण अधिक होता. तो उत्साही असून लहान मुलांचा साधेपणा व केव्हां केव्हां पोरकटपणाही त्याचे अंगीं दिसून येई. अहंकारानें तो बराच अवलिप्त असे. तथापि किर-

कोळ बाबतींतील मतभेदाकडे दुर्लक्ष करून कमी दर्जाच्या सहकाऱ्यांस तो होता होईतों संभाळून घेई. परंतु स्वतंत्रपणें अगर निर्भिडपणें त्याजवर कोणीं टीका केली असतां मग तेथें क्षमा न होतां आगीचा शिव्यांचा, वगैरे वर्षाव होऊन त्याचा छळ करण्यास सुरुवात होई. एरवीं तो गोडीनें वागे.

त्याचा नित्यक्रम म्हटला म्हणजे पहांटे चार वाजतां उठून आपल्या हातानें विस्तव पेटवून चहा वगैरे घेऊन पांच वाजतां कामास बसावयाचें. दहा वाजण्याचे सुमारास अल्पाहार करून कोर्टांत न्यायाधीश येण्याचे वेताला दोन मैल जलद चालत जाऊन तो पोहोंचत असे. कोर्टांतील काम आटोपून चार वाजण्याचे सुमारास परत येतां येतां सार्वजनिक कामकाजाच्या कचेरींत जाऊन किरकोळ कामकाज उरकून तो घरीं येई. नंतर तास दोन तास मुलांमाणसांत घालवून फिरून कामकाज पाहून दस घंट्याला आंथरुणांत पडून घोरावयासही लागे. त्याचें तोंड सुंदर असे; परंतु नाक आंखूड असल्यामुळे एकंदरीनें हा मनुष्य बुद्धिवान्, तेजस्वी परंतु थोडासा लफंगा व हलका असा वाटे. तो शरिरानें खूप बळकट असे. त्याची उंची जवळ जवळ सहा फूट असून खांदे पिळदार व छाती भरीव असल्यामुळें त्यास पाहतांच त्याजबद्दल उग्रता व भीति वाटे. तरुणपणीं वकिलीचे कामावर बाहेरगांवीं जावयाचें असल्यास तो घोड्यावरून एका दमानें साठ साठ मैल मजल मारून जाई. अगदीं वृद्धापकाळापर्यंत त्यानें शिकारीचा क्रम कायम ठेविला होता' सुटीच्या दिवसांत मित्रमंडळी घेऊन खेड्यावर त्याचा मुक्काम असतां, पहांटे सर्वांचे आधीं उठून भली मोठी काठी हातांत घेऊन पाहुण्यांना अंथरुणांतून ओढून काढण्यास स्वारी स्वतः जावयाची. अशा रीतीनें सत्तर वर्षेंपर्यंत त्यानें सुखाचें आयुष्य भोगलें.

या सत्तर वर्षांपैकीं सुमारें पसतीस अगर चाळीस वर्षें सार्वजनिक काम करण्यांत त्यानें घालविलीं असून सुमारें पंचवीस वर्षेंपर्यंत तरी मूर्द्धाभिषिक्त पुढारी या नात्यानें सर्व कार्यभार त्यानें आपल्या अंगावर घेतलेला होता.

चळवळ करण्याचा एक नवीन पंथच त्यानें स्थापिला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पंथाचें मुख्य लक्षण हें कीं, 'सार्वजनिक चळवळ करण्याचे कामीं फक्त वरिष्ठ दर्जाचे लोकांवर भिस्त न ठेवतां ती थेट समाजाच्या कनिष्ठ वर्गापर्यंत नेऊन भिडवावयाची व तिजमध्यें सर्व तऱ्हेच्या लोकांचा समावेश करावयाचा.' अज्ञ समाजास भुलविण्यास योग्य असें वक्तृत्व त्याजपाशीं असल्यामुळें सुशिक्षितांपेक्षां अशिक्षित वर्गांतच त्याचे अनुयायी अधिक असत व लोकाराधन करण्याची हातोटी त्यास चांगली साधली होती. धीर, निश्चय, आत्मप्रत्यय वगैरे गुण त्याचे अंगीं असल्यामुळें एकदां हातीं घेतलेलें काम काय वाटेल तें झालें तरी तडीस नेण्याची उमेद तो बाळगी व पुष्कळ वेळां तडीस नेईही. त्याच्या हातून पुष्कळ चुका झाल्या. १८४० सालापासून स्वतंत्र पार्लमेंट परत मिळविण्याची जी चळवळ त्यानें अंगीकारिली, व ज्या रीतीनें ती चालविली ती सर्व चुकांची एक परंपराच होती. परंतु एका गोष्टीच्या अनुभवावरून सारासार विचार न करतां मनुष्य दुसरीही गोष्ट तशीच करण्याचे भरीस पडला असतां अशा तऱ्हेची चूक सहजच होते. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याबद्दल त्यानें केलेली चळवळ यशस्वी झाली. परंतु स्वतंत्र असें पार्लमेंट मिळविण्याची त्याची चळवळ फसली, याचें मुख्य कारण असें आहे कीं, क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न पूर्वींच शिजून तयार झालेला होता, व त्याची पूर्णता करण्यास ओकॉनेल यानें केलेली खटपट उपयोगी पडली व ती सफळही झाली. क्याथोलिक लोकांस इतरांप्रमाणें समान हक्क असावे हें तत्त्व आयर्लंडांतील त्याचे प्रतिपक्षी प्रॉटेस्टंट लोक, व तसेंच इंग्लंडमधील लोक यांना बहुतेक मान्य झालेलें होतें. जी काय अडचण उरली होती ती इतकीच कीं, राजाची व तशीच कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षांतील कांहीं लोकांची प्रतिकूळताही धाब्यावर बसवून केवळ बहुमताचे जोरावर क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्याचा कायदा पार्लमेंट सभेमध्यें पास होणें ही. परंतु स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचा प्रश्न याहून फार बिकट होता. त्या

कामीं इंग्लंडमधील सर्व लोकांची प्रतिकूलता होती एवढेंच नव्हे, तर खुद्द आयर्लंडमध्येंही या बाबतींत एकमत झालेलें नव्हतें, व यास्तव ओकॉनेल यास लाखों लोकांच्या सभा जरी भरवितां आल्या, तरी त्यांवरून लोकमताची खरी स्थिति समजण्यासारखी नव्हती. शिवाय ओकॉनेलचें चळवळीचें धोरण भलत्याच दिशेनें गेलें. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे असे वजनदार पुढारी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें होते व यापैकीं कांहीं खुद्द प्रधानमंडळांतही समाविष्ट होण्याच्या लायकीचे होते. परंतु रिपीलच्या चळवळीस ब्रिटिश पार्लमेंट सभेंत कांहीं आयरिश लोकांखेरीज कोणीही अनुकूल नव्हतें. अशा स्थितींत केवळ लाखों लोकांच्या सभा भरवून त्यांजमध्यें धाकदपटशाहा दाखविण्याचीं भाषणें करणें यापासून फारसें हित साधण्याचा संभव नव्हता. सर्वांत विशेष गोष्ट ही कीं, अधिकारीवर्गानें प्रकरण हातघाईवर मुद्दाम होऊन आणलें असतां लोकांनीं कोठपर्यंत जावयाचें हें ओकॉनेल यानें सयुक्तिक रीतीनें स्वतःच्या मनाशीं अगर लोकांशीं ठरविलें नव्हतें. यामुळें प्रत्यक्ष प्रसंग आल्यावर त्याच्या मनानें कचर खाल्ली, व लोकांची फसगंमत होऊन चळवळीचा पोकळपणा व पुढाऱ्यांचा कमकुवतपणा त्यांचे नजरेस अशा रीतीनें आला कीं, फिरून ती चळवळ पुढें हातीं घेण्यास त्यांचें त्यांना कसेंसेंच वाटूं लागलें. अशा प्रकारची ही ढोबळ चूक ओकॉनेलच्या हातून घडल्यामुळें पूर्वचरित्रांत त्यानें मिळविलेल्या यशावर व कीर्तीवर बरेंचसें पाणी पडलें. हेतु, भाषा व आचरण ह्यांतील विसंगतपणा कुशाग्र बुद्धीच्या मनुष्यास अघळपघळ युक्तिवादानें कितीही सफाईनें अगर बेमालूमपणानें झांकून टाकतां आला, तरी कालांतरानें तो लोकांच्या प्रत्ययास आल्याशिवाय रहात नाहीं. ओकॉनेलच्या या चळवळींतील भाषणांत हातावर शिरकमल घेऊन युद्धास निघालेल्या वीराची ऐट त्याची नेहमीं असे; व सभांतील समाज हें एक लष्करी सैन्यच आहे अशी आपल्या भाषणानें तो भावना उत्पन्न करी. परंतु

सभाबंदीचा टीचभर पुरजा भिंतीस डकलेला पाहतांच त्यास कायदा आठवला. हातावरील शिरकमल फिरून खांद्यावर जाऊन बसलें व आपण वाघ, लांडगे आहोंत अशी भावना लोकांचे मनांत ज्यानें होऊन उत्पन्न केली, त्यानें होऊनच त्यांस, युद्धाचा क्षण प्राप्त होतांच, निरुपद्रवी मेंढ्या होण्याची सल्ला द्यावी आणि लाखों लोकांच्या समक्ष लाक्षणिक राजमुकुट धारण करणाऱ्या राजानें, एका पोलिस शिपायानें आपली करंगळी वर उचलल्याबरोबर, मांत्रिकानें भारलेल्या मनुष्याप्रमाणें त्याचे मागें जेलखान्यांत जाऊन चढण्यास तयार व्हावें या सर्व व्यवहारांत अनुभवास येणारी विसंगतता इतकी ढोबळ होती कीं, लोकांस ओकॉनेलची अगर त्याच्या मागून जाणाऱ्या स्वतःची क्षणभर लाज वाटली असल्यास नवल नाहीं. राजकीय चळवळींत निरपराधी मनुष्याचें एक थेंब रक्त सांडल्यानें राष्ट्रास कायमचें स्वातंत्र्य मिळणारें असेल तरीही तें त्याज्य होय असें उघडपणें किंबहुना दिखाऊपणें प्रतिपादन करणें यामध्यें उत्तम नीतिमत्ता व उदात्तपणा हीं निःसंशय आहेत. परंतु हें उच्च तत्त्व प्रतिपादन करणाऱ्यानें, केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर आत्मरक्षणाचा शब्द मधून मधून वापरून वस्तुतः लोकांस बंड करण्यास प्रवृत्त करणें हें कधींही शोभणार नाहीं व म्हणूनच ओकॉनेललाही तें शोभलें नाहीं आणि अशा रीतीनें अपेशाचें किंबहुना मूर्खपणाचें माप पदरीं न घेतां १८२९ सालीं, रोमन क्याथोलिक लोकास स्वातंत्र्य मिळवून देण्याची चळवळ यशस्वी करितांच त्याच्या चरित्राचा शेवट होता तर फार चांगलें होतें असे त्याच्या कित्येक स्नेह्यांनीं व भक्तांनीं उद्गारही काढलेले आहेत. परंतु एकंदरीनें पहातां ओकॉनेलच्या चुका लक्षांत घेऊनही आयर्लंडच्या अलीकडील इतिहासांत तो एक कर्ता व अलौकिक असा पुरुष होऊन गेला असेंच कोणालाही म्हणावें लागतें.

# विलियम स्मिथ ओब्रायन

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यभागीं आयर्लंडमध्यें जी चळवळीची मोठी लाट येऊन गेली, तिच्यांतील प्रमुख पुढाऱ्यांपैकीं ओब्रायन हा एक होता. याचें घराणें मोठें असून वयाचे तेविसावे वर्षापासून ( १८२६ ) त्यास पार्लमेंटच्या सभासदाची जागा मिळाली होती. १८३० सालीं त्यानें आयर्लंडांतील ' दारिद्र्य ' या विषयावर एक उत्तम लेख प्रसिद्ध केला होता व पुढील चौदा वर्षांत हळूहळू तो पुढारी या नात्यानें प्रसिद्धीस आला. १८४० चे सुमारास डॅनियल ओकॉनेल यानें सुरू केलेली रिपीलची चळवळ उदयास येऊं पहात होती, परंतु खुद्द ओकॉनेल याजबद्दल ओब्रायन याचे मनांत फारसा आदर नसल्यामुळें तो सदर चळवळींत एकदम सामील झाला नाहीं. परंतु एखाद्या चळवळींत लोकप्रियतेचें तत्त्व इतकें कांहीं चमत्कारिक असतें कीं, ती उदयास आल्याखेरीज रहात नाहीं; व हा तिचा उदयकाल जवळ येतांच राष्ट्रांतील निरनिराळ्या पुढाऱ्यांचे सूक्ष्म मतभेद लयास जाऊन लोकमताच्या ओघांत सर्व सारखेच सामील होतात. १८४४ सालीं रिपीलचे चळवळीस ओब्रायन हा येऊन मिळाला; व यापूर्वीं प्रतिकूल परिस्थितीशीं आपण निश्चयानें जो झगडा केला त्याचें फळ ओब्रायन आल्यानें मिळालें असें ओकॉनेल यास वाटलें. ओब्रायन याचें वजन लोकांत स्वतः ओकानेलच्या खालोखाल होतें; व या दोघांच्या उद्योगानें ही चळवळ इतकी नेटास लागली कीं, १८४४ सालीं सरकारास तिजमध्यें हात घालणें जरूर

वाटलें. ओकॉनेल तुरुंगांत जाऊन आल्यानंतर या चळवळीचे वाताहतीस प्रारंभ झाला व अखेर १८४६सालीं आयर्लंडांतील तरुण मंडळीनें ओकॉनेल-वर नाखुष होऊन व त्यास मवाळ ठरवून सदर चळवळींतून आपलें अंग काढून घेतलें. या तरुण मंडळींत सुप्रसिद्ध 'नेशन' पत्राशीं संबंध असलेले तरतरीत लोक असून ओब्रायन हा त्यांचा पुढारी झाला; व पुढें दोन वर्षे-पर्यंत दुष्काळ वगैरे आपत्तींनीं आयर्लंडांतील लोक फार गांजून गेल्यामुळें व रिपीलसारख्या कायदेशीर चळवळीची सरकारी अधिकाऱ्यांनीं दडपशाही काय-द्याचे योगानें वाताहत केल्यामुळें निराशेचा जो ठराविक परिणाम व्हावयाचा तो होऊन १८४८ सालीं युरोपांतील इतर देशांप्रमाणें आयर्लंडमध्येंही बंडाळीचा उपक्रम झाला. या नवीन चळवळीचा थोडाबहुत पुरस्कार करण्याकरितां ओब्रायन, मीघर वगैरे पुढारी पॅरिस येथें गेले, व लॅमार्टिन वगैरे प्रजापक्षीय पुढाऱ्यांकडून आयर्लंडास कुमक मिळविण्याची त्यांनीं खटपट केली. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी वुल्फटोन याची फ्रान्सकडून मदत मिळण्याबद्दल जशी निराशा झाली, तशीच या वेळेस स्मिथ ओब्रायन याचीही झाली. फ्रान्समधून परत जातांना ओब्रायन हा इंग्लंडला गेला; व आपण चालविलेल्या खटपटीसंबंधानें पार्लमेंटमध्यें त्यानें उघडपणें असें सांगितलें कीं, ' इंग्लंडच्या राणीची सत्ता मला कबूल आहे, परंतु इंग्रजी पार्लमेंटची आयर्लंडवरील सत्ता मला कबूल नाहीं, व ती नाहींशी करून आयर्लंडची स्वतंत्र अशी पार्लमेंट पुन्हां स्थापित करण्याचे कामीं मी जन्मभर खटपट केल्याशिवाय रहाणार नाहीं. मग त्या कामीं मला प्राण खर्ची घालावे लागले तरी फिकीर नाहीं. ' १८४८ सालच्या मे महिन्यामध्यें लोकांस बंड करण्यास उत्तेजन देण्यासारखीं भाषणें करण्याबद्दल त्याजवर खटला करण्यांत आला, परंतु ज्यूरीमध्यें मतभेद होऊन तो सुटला. परंतु नंतर लौकरच अधिकाऱ्यांचे अधिकार वाढविण्यासारखे नवीन कायदे पार्लमेंटनें पास करून दिल्यामुळें, सरकाराचा ज्यांच्यावर वहीम होता अशांचे अंगा-

वर हात टाकून त्यांना आपल्या मार्गांतून कांहीं दिवसपर्यंत काढण्याची सह-जच सोय झाली. पण क्रियेबरोबरच प्रतिक्रियाही वाढत जाते, व दडपशा-हीच्या कायद्यास लोकांनीं प्रत्यक्ष बंडाळी करून रोखठोक जबाब दिला. ओब्रा-यन, डिलन, ओगार्मन, मीघर वगैरे पुढाऱ्यांनीं लोकांस हातांत शस्त्र धरण्याचा उपदेश उघडपणें सुरू केला. जुलई महिन्यामध्यें सुमारें तीन चार हजार लोकांचा जमावही त्यानें तयार केला; परंतु यांपैकीं हत्यारें अशीं फक्त तीन चारशें लोकांजवळच काय तीं होतीं व द्रव्याची अनुकूलताही असावी तशी नव्हती. ओब्रायन ह्यानें स्वतःजवळ होता नव्हता तेवढा पैसा खर्च केला परंतु अशा कामास एका व्यक्तीचा पैसा कितीसा पुरवणार ! या देशभक्त-सैन्यास लवकरच उपास काढण्याची पाळी येऊं लागली, व कोणी तरी पुढा-कार घेतला असतां त्यास एकंदर जनसमाजाचें पाठबळ मिळेल अशी ओब्रायन वगैरेंची जी अटकळ होती ती खोटी ठरली; आणि या बंडाची अखेर एक दोन दिवसांच्या चकमकीनें झाली. प्रत्यक्ष लढाईचे वेळीं ओब्रायन याजजवळ फक्त दोनशें लोकच उरले होते, व ही लढाई म्हणजे तरी त्याला पोलीस व लष्करी लोकांनीं पकडण्याच्या वेळची झटापट ही होय. या झटापटीचे अखेरीस ओब्रायन हा आपला बचाव करण्याकरितां निसटून गेला. सरकारनें त्यास धरून देण्याबद्दल पांचशें पौंडांचें बक्षीस जाहीर केलें. तो लपूनछपून रहात असतां वेळोवेळीं त्याच्या हालचालीची बातमी देऊन पुष्कळ लोकांनीं आपलें कल्याण करून घेतलें, व शेवटीं अज्ञातवासाचा कंटाळा येऊन राजरोसपणें तिकिट घेण्याकरितां रेल्वेस्टेशनवर तो आला असतां पकडला गेला. पुढें त्याचा इनसाफ होऊन त्यास फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. परंतु ती रद्द होऊन त्यास काळे पाण्यावर धाडिलें. मेरिया नांवाच्या बेटांत असतां सुटून जाण्याचा त्यानें प्रयत्न केल्यावरून त्याजवरचा पहारा अधिक कडक झाला, व अखेर प्रकृति नीट नसल्यामुळें मी पळून जाणार नाहीं अशी शपथ घेऊन त्यास आपली तात्पुरती मोकळीक करून घ्यावी लागली. पुढें १८५४ सालीं १८४८

झालच्या बंडांतील लोकांस माफी देण्याचा उपक्रम झाला, व ओब्रायन यास माफी मिळाल्यामुळें तो स्वदेशास परत आला. वाटेंत मेलबोर्न येथें इंग्रज लोकांनीं त्याचें मोठें स्वागत करून एक हजार पौंडांचे किंमतीचा एक सोन्याचा प्याला त्यांनीं त्यास नजर केला. १८५६ सालीं युरोपांत कांहीं दिवस घालवून त्यानें राजकीय विषयावर एक दोन पुस्तकें लिहिलीं. १८५६ च्या मे महिन्यांत त्याजवरील सर्व बंधनें नाहींशीं होऊन त्यास सर्वस्वी माफी मिळाली व तो आयर्लंडांत फिरून दाखल झाला. यापुढें त्याचे हातून प्रत्यक्ष कार्य असें फारसें झालें नाहीं; तथापि त्याचीं मतें अद्यापि कायम होतीं व एक वर्षपर्यंत अमेरिकेंत हिंडून व व्याख्यानें देऊन तीं तेथील वसाहतवाल्या आयरिश लोकांस समजावून देण्याचा उद्योग त्यानें केला व अखेर १८६४ सालीं तो मरण पावला. ओब्रायन हा जरी मोठा वक्ता नव्हता, तरी स्वभावानें उदात्त व मनानें सुसंस्कृत आणि मोकळा असल्यामुळें लोकांना तो फार आवडे व त्याच्या देशभक्तीबद्दल कोणास कधींही शंका येण्यासारखी नसल्यामुळें त्याचें वजन अर्थातच फार वसलें होतें. तो जसा देशभक्त तसाच स्वार्थत्यागीही होता. १८४८ सालचे सुमारास, आपल्या आयुष्यक्रमास येथून निराळी दिशा लागण्याचा संभव आहे असें पहातांच त्यानें आपली सगळी मिळकत पंचांचे स्वाधीन करून दिली, व तिच्या उत्पन्नांतून स्वतःकरितां सालीना फक्त हजार रुपये खर्चाकरितां घ्यावयाचे असें त्यानें ठरविलें. सुप्रसिद्ध इतिहासकार 'लेके 'यानें ओब्रायनाविषयीं फार चांगलें मत दिलें आहे. त्यानें असें म्हटलें आहे कीं, १८४८ सालीं ओब्रायन हा बंड करण्यास प्रवृत्त झाला ही त्याच्या हातून चूक झाली हें तर खरेंच, तथापि हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, खऱ्या मनानें व कळकळीनें काम करणाऱ्या मनुष्याची इतर अनेक तऱ्हेनें निराशा झाली असतां अशा चुका त्याचे हातून केव्हां केव्हां स्वाभाविकपणें होतात. ओब्रायनची खटपट खऱ्या मनाची व स्वार्थत्यागाची होती; व स्वहित साधण्याकरितां देशाचें अनहित करणाऱ्या लोकांचा जसा त्यास तिटकारा असे, तसाच देश-

भक्तीचे नांवावर वृथा वल्गना व बडबड करणारांचाही तो तसाच निषेध करी. अखेर अखेर त्यास असें दिसून येऊं लागलें होतें कीं, फ्रेंच लोकांची मदत घेऊन अगर क्याथोलिक लोकांच्या धर्मगुरूंचें नसतें प्रस्थ माजविल्यानें देशाचा फायदा नसतां उलट तोटाच आहे. हीं त्याचीं मतें त्या काळीं लोकप्रिय होण्या-सारखीं नाहींत हें उघड दिसत असतांही खरें दिसलें तेंच सांगण्यांत त्यानें जन्मभर मिळविलेली लोकप्रियता गमावण्याचा संभव दिसत होता तरी, तो धोका आनंदानें पत्करून आपलीं प्रामाणिकपणाचीं मतें लोकांस शिकविण्याचा क्रम त्यानें अबाधितपणें ठेविला होता.

# आयझॅक बट

ओकॉनेलचा अस्त व पार्नेलचा उदय या दरम्यानच्या काळीं ज्या पुढाऱ्याकडे पार्लमेंटमधील आयरिश पक्षाचें नेतृत्व होतें त्याचें नांव आयझॅक बट. याचा जन्म १८१३ सालीं झाला. हा एका प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकाचा मुलगा होता. याचें शिक्षण डब्लिन येथें ट्रिनिटी कॉलेजांत झालें व तें मिळवीत असतांच त्याची बुद्धि, तरतरी वगैरे गुण दृष्टोत्पत्तीस आले. वयाचे विसावे वर्षींच त्यास डब्लिन विश्वविद्यालयांतील अर्थशास्त्राच्या प्रोफेसराची जागा मिळाली. १८३८ सालीं तो बॅरिस्टर झाला व १८४२ सालीं त्याला 'क्वीन्स कौन्सेल' ही पदवी मिळाली. वयाच्या २९ वे वर्षी ज्यास ही पदवी मिळाली असा हाच काय तो एक झाला. कॉलेजांत असल्यापासूनच कायदा व राजकारण यांची त्यास गोडी होती व तो वक्ताही चांगला असे. १८४४ सालीं ओकॉनेल यानें डब्लिन येथील म्युनिसिपालिटीपुढें रिपीलचा प्रश्न वादविवादाकरितां आणला त्या वेळीं आयर्लंड व इंग्लंड यांचें ऐक्य आहे तसेंच रहावें हें प्रतिपादन करणाऱ्या लोकांचें पुढारीपण आयझॅक बट याजकडे देण्यांत आलें होतें. व ओकॉनेलसारख्या अनुभविक, प्रसिद्ध व लोकप्रिय वक्त्याच्या भाषणास बट यानें जें उत्तर दिलें तें इतकें उत्तम होतें कीं ओकॉनेलचा प्रतिपक्षी या नात्यानें प्रॉटेस्टंट व 'यूनिअनिस्ट' पक्षाचा कायमचा पुढारीपणा त्याजकडे गेला. मात्र त्याच्या मनाची रचना व युक्तिवादाची सरणी लक्षांत आणून वादविवादाचे अखेर ओकॉनेलनें त्याची उघड स्तुति केली; पण असें

भविष्यही केलें कीं, पुढेंमागें ज्या कार्याचा प्रतिपक्ष मंडित करण्याचें काम आज बट यांजकड आलें आहे, त्याच पक्षाचें खंडन करून स्वतंत्र पार्ल-मेंट मागणाऱ्या लोकांचें पुढारीपण त्याजकडे एक दिवस खास येणार ! व हें भविष्य १८७० सालीं म्हणजे पुढें सव्वीस वर्षांनीं खरें झालें.

१८५२ सालीं बट हा पार्लमेंटमध्यें शिरला, परंतु प्रथम प्रथम त्याचा भर वकिलीकडे असे व त्या धंद्यांत त्यानें पहिल्या प्रतीचें नांव व हवा तितका पैसा मिळविला. १८४४ व १८४८ या सालीं राजकीय स्वरूपाचे जे खटले आयर्लंडात झाले त्यांत बहुधा प्रत्येक आरोपीच्या तर्फे त्याचें वकीलपत्र दाखल असे. व फिरून १८६०-७० यांचे दरम्यान फीनियन लोकांचे गुन्हे झाले त्या प्रसंगीं कांहीं आरोपींचें काम त्यानें थोडाबहुत स्वार्थत्याग करून केलें. कारण, एक तर या दंग्याधोप्याचे दिवसांत पुष्कळांवर खोटे आरोप येत व बट हा व्यक्तिस्वातंत्र्याचा भोक्ता असल्यानें कोणाही मनुष्यावर अधि-काऱ्यांकडून नाहक जुलूम होऊं नये याविषयीं त्याचा फार कटाक्ष असे. तसेंच फीनियन लोक जरी अत्याचार करीत, तरी त्यांच्यासंबंधानें बटसारख्या काय-देशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांचे मनांतही एक प्रकारची सहानुभूति कांहीं काळ उत्पन्न झाली होती. याचें कारण असें कीं, साठ वर्षेपर्यंत आयरिश व ब्रिटिश पार्लमेंट सभांचें ऐक्य झालें असूनही त्याचे चांगले परिणाम लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येण्यासारखे मुळींच झाले नव्हते यामुळें आयरिश लोकांच्या मनांत अत्यंत असंतोष उत्पन्न झाला होता, व देशकार्याकरितां म्हणून जे अग्निकुंडांत उडी घालण्यास तयार झालेले दिसत, त्यांजबद्दल लोकांस स्वाभा-विकपणेंच आदर वाटे. बट हा सनदशीर चळवळ करणारा होता. पार्लमेंट, त्यांतील कामकाज करण्याची रीति, व एकंदर कायदाकानू याजबद्दल बट याचे मनांत नेहमीं आदर असे. व त्या सभागृहांत त्याची विचारीपणाची, गंभीरपणाची अशी जी वागणूक असे, तिच्या योगानें पार्लमेंट सभेंतील सभासदांच्या मनांत त्याजबद्दल फार आदर उत्पन्न होई. आयझॅक बट बोलावयास उठला असतां

सर्व सभागृह मोठ्या शांतपणानें व लक्ष लावून त्याचें भाषण ऐकत असे. त्याच्या मागें अनुयायी वर्ग जरी मोठासा नव्हता, तरी त्याच्या भाषणापासून प्रत्यक्ष असा फायदा बराच होई. अशा रीतीनें सनदशीर चळवळीचा पुरस्कर्ता असें नांव पडलेलें असतांही १८६८ सालीं पुष्कळ फीनियन लोकांचे खटले त्यानें चालविले, व एक प्रकारचा तो त्यांचा वालीच होऊन बसला. शेंकडों लोक तुरुंगांत गेल्यामुळें राजकीय गुन्हेगारांना सर्वांस माफी मिळावी अशाविषयीं खटपट करण्याकरितां १८६९ सालीं 'ॲम-नेस्टी असोशिएशन ' या नांवाची सभा आयर्लंडांत स्थापन झाली, तेव्हां तिचें अध्यक्षस्थान त्यानें उत्साहानें पत्करलें व लगेच पुढील सालीं रिपीलच्या चळ-वळीचाही तो पुढारी बनला. १८६७–६९ सालीं प्रॉटेस्टंट धर्ममंडळाचा खर्च बंद करण्यासंबंधाची जी मोठी चळवळ झाली, तिच्या योगानें खुद्द प्रॉटेस्टंट लोकांचे मनावरही चांगला परिणाम झाला व आजपर्यंत धर्माखातर क्याथो-लिक व प्रॉटेस्टंट यांनीं परस्पर विनाकारण घातपात व रक्तपात केला व राष्ट्रीय-त्वाची हानि करून घेतली तेवढी बस्स झाली असें उभय पक्षांचे मनानें घेतलें; व उभयतांनीं मिळून राष्ट्राचा उद्धार केला तरच तो होणार आहे अशा खात्रीनें त्यांनीं त्या मंगलकार्यास हात घातला.

१८७० सालीं मेच्या १९ वे तारखेस डब्लिन येथील बिल्टन हॉटेल नामक उपाहार–गृहांत एक खासगीसारखी सभा भरली. तिला उभय पंथांचे प्रतिष्ठित व्यापारी, उदमी, धंदेवाले व सुखवस्तु लोक आले होते. त्यांच्यापुढें आयर्लंडच्या राजकीय स्थितीचा विचार करणें हाच मुख्य प्रश्न होता. तेथें जो वादविवाद व संभाषणें झालीं त्यांत असें दिसून आलें कीं, आततायीपणाचा व बंडाळीचा मार्ग जरी कोणास प्रिय नव्हता तरी, राष्ट्रीयत्वाच्या स्वातंत्र्याची कल्पना सर्वांसच सारखी प्रिय होती. आयर्लंडची इतिहासपरंपरा अगर त्रिकाला-बाधित असा ईश्वराचे घरचा न्याय, कोणत्याही दृष्टीनें पाहतां हें विशिष्ट स्वातंत्र्य आयरिश लोकांना मिळणें हेंच योग्य आहे, तें मिळविण्याचा त्यांचा

हक्क आहे; व तें मिळविण्यास इंग्रजी राजाची सत्ता झुगारून देण्याची गरज नसल्यामुळें त्या वादांत न पडतां, किंवा अराजनिष्ठ न होतां पूर्वी जशा प्रकारचें स्वतंत्र पार्लमेंट आयर्लंडमध्यें होतें, तशा प्रकारचें पार्लमेंट परत मिळविण्यास सर्व पक्षांनीं व पंथांनीं मिळून कंबर बांधिली पाहिजे असें सर्वानुमतानें ठरलें व वादविवादांत ज्यानें पुढाकार व स्वतंत्र पार्लमेंट मागण्याविषयीं आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें, तोच ओकॉनेलला रिपीलच्या चळवळींत विरोध करणारा आयझॅक बट हा होय. व या रीतीनें ओकॉनेलचें भविष्य अघटितघटनाप्रिय अशा कालाच्या कलाटणीनें खरें ठरलें. सदर सभेंत फीनियन लोकांच्या चळवळीचा उल्लेख झाला, त्यास अनुलक्षून बट यानें सणसणीत व कळकळीचें भाषण केलें. तो म्हणाला:—" राष्ट्रीय स्वतंत्र्याच्या गोष्टी सर्व लोक बोलूं लागले म्हणजे कित्येक जणांनीं अविचार करावा असेंही होत नाहीं असें नाहीं. म्हणून त्याकरितां त्या गोष्टीच बोलूं नये असें मात्र नाहीं. त्या गोष्टी बोलून शिवाय त्या अमलांत आणण्यास योग्य व कायदेशीर अशा उपायांची योजना करून राष्ट्रांत जोम उत्पन्न करण्याचें काम पुढाऱ्यांचें आहे. पण तें काम नाजूक असल्याकारणानें करूंच नये असें म्हणण्यापेक्षां सावधगिरीनें व होतां होईतों बिनचूक करण्याचा प्रयत्न करावा असेंच म्हणणें अधिक सयुक्तिक होय, व पुढाऱ्यांचें पुढारीपण याजवरच अवलंबून असतें. फीनियन लोक अत्याचारी झाले ही गोष्ट वाईट झाली खरी, पण ते तसे कां झाले? तर सनदशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांनीं आपली जबाबदारी ओळखून आपलें कर्तव्य करावें तितकें नेटानें व उद्योगशीलतेनें केलें नाहीं म्हणून!" बटच्या या एका भाषणानें सर्व काम झालें. स्वतंत्र पार्लमेंट मागण्याचा ठराव तेथें जुळलेल्या निरनिराळ्या पंथांच्या, धर्मांच्या व पक्षांच्या लोकांनीं एकमतानें 'टाळ्यांच्या गजरानें' पास केला व त्या तारखेस 'होम रूल' ह्या चळवळीचा जन्म झाला.

१८७३ साली हजारों आयरिश गृहस्थांच्या सह्या घालून एक निमंत्रणपत्र प्रसिद्ध झालें, व त्यावरून ता. १८ नोव्हेंबर रोजीं व पुढें चार दिवस राष्ट्रीय संमेलन भरविण्यांत आलें. शंभर वर्षांपूर्वी चार्लमाँटच्या अध्यक्षतेखालीं याच दिवाणखान्यांत स्वयंसैनिकांचें संमेलन भरून आयर्लंडांत त्यावेळीं विद्यमान असलेल्या पार्लमेंटवरील ब्रिटिश पार्लमेंटची हुकूमत नाहींशी करण्याची चळवळ झालेली होती. संमेलनास देशांतून नऊशें प्रतिनिधी आले होते. व या प्रसंगीं जुनी ' होम गव्हर्नमेंट ' नांवाची सभा मोडून ' आयरिश होमरूल ' नांवाची नवीन सभा स्थापण्यांत आली. १८७४ साली झालेल्या नवीन निवडणुकीमध्यें होमरूलच्या पक्षाचे साठ सभासद निवडून आले; त्यांपैकीं बट, जॉन मार्टिन, मिचेल, हेनरी विलियम शॉ, सर जॉन ग्रे वगैरे प्रमुख असून त्यांचें पुढारीपण आयझॅक बट याजकडे होतें. क्याथोलिक व प्रॉटेस्टंट हा भेदभाव नाहींसा झाला, व लिबरल पक्षाशीं मिळून अगर दूर राहून केव्हां देऊन केव्हां घेऊन जमेल त्या रीतीनें होमरूलचा गाडा पुढें ढकलण्यास सुरुवात झाली. पण बट हा वृद्ध झालेला असून त्याचे हातून नेटानें काम होईनासें झालें व पार्लमेंटमधील परिस्थितिही काम करण्यास फारशी अनुकूल नव्हती यामुळें पार्लमेंटमध्यें काम करण्याच्या रीतीबद्दल जरी अद्यापि आयरिश लोकांत हौस उरली होती तरी, बटबद्दलचा लोकांचा सद्ग्रह हळू हळू कमी होत चालला होता. व अखेर पार्नेलसारखा तरुण नेता मिळतांच बटला पार्लमेंटरी पक्षाचे पुढारीपणापासून पदच्युत व्हावें लागलें. ह्यासंबंधाची हकीकत पुढें पार्नेलच्या चरित्रांत दिलेलीच आहे. ही पदच्युति व वार्धक्य यांच्यामुळें क्षीण होऊन तो ता. ५ मे १८७९ रोजीं वारला.

# पार्नेल

एकोणिसाव्या शतकांत ओकॉनेलनंतर आयरिश लोकांचा नामांकित असा पुढारी पार्नेल हाच झाला. पार्नेलचें घराणें पुष्कळ जुनाट असून त्याच्या पूर्वजांमध्यें उत्कृष्ट कवि व मुत्सद्दी होऊन गेले होते. आयरिश पार्लमेंटच्या ऐन भरभराटीच्या काळीं पार्नेलचा एक पूर्वज प्रधानमंडळांत असून, आयरिश लोक व इंग्रजी प्रधानमंडळ या दोहोंच्याही विश्वासास तो सारखाच पात्र झाला होता. या त्याच्या पूर्वजानें आयरिश पार्लमेंटसभा मोडण्याचे प्रसंगीं राजपक्षाशीं निकरानें टक्कर दिलेली होती. पार्नेलचा आजा हा आपल्या भावी नातवाप्रमाणेंच इंग्रजांचा पराकाष्ठेचा द्वेष्टा असून त्यानें ओकॉनेल यास धर्मस्वातंत्र्याचे चळवळींत पुष्कळ मदत केली होती. खुद्द पार्नेलची आई ही मोठी हुषार, धाडशी व राजकारणी स्त्री होती व तिच्या माहेरघरचे वाडवडील बरेच दिवस अमेरिकेंत राहिल्यानें त्यांच्या मनांत इंग्रजांचा द्वेष अगदीं खोल मुरला होता. खुद्द पार्नेल याजमध्यें या द्वेषबुद्धीचा अखेर कळस झाला व वास्तविक सूक्ष्म दृष्टीनें त्याचें चरित्र पहाणाराला असें कबूल करावें लागेल कीं पार्नेलच्या अंतःकरणांत खऱ्या राष्ट्रभक्तीपेक्षां इंग्रजांचा द्वेषच अधिक प्रभावी झालेला होता!

पार्नेलची वडिलार्जित संपत्ति बरीच होती. त्याचें घराणें जमीनदारांचें असून त्याच्या वाटणीस जमीनजुमल्याचें उत्पन्न इतकें येण्यासारखें होतें कीं, पोट भरण्याकरितां कोणताही धंदा करण्याचें त्यास कारण नव्हतें. त्याच्या

जमीनदारीचा गांव रॉकडूम नांवाचा असून आयर्लंडची राजधानी जें डब्लिन शहर तेथून या गांवीं सुमारें दीड तासांत आगगाडीनें जातां येतें. हें गांव विकलो नामक जिल्ह्यांत असून सर्व आयर्लंडमध्यें सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें उत्कृष्ट असा कांहीं भाग या गांवचे आसपास पाहाण्यास मिळतो. या गांवापासून जवळच ॲव्हानडेल नांवाची वाडी असून त्यांत पार्नेलच्या वाडवडिलांचें घर आहे. घरापासून सुमारें पांच सात मिनिटांचे रस्त्यावर एक नदी असून चोंहों-बाजूनें झाडीनें हिरव्या गार दिसणाऱ्या टेंकड्या आहेत. याच वाडीमध्यें पार्नेल हा सन १८४६ मध्यें जूनच्या २७ व्या तारखेस जन्मला. लहानपणापासूनच तो गंभीर व मितभाषणी असा असे. त्याला घर सोडून खेळगड्यांत मिसळणें आवडत नसे; तथापि घरच्या बहीणभावंडांशीं तो मन मोकळें करून खेळे. शाळेंत असतांना तो आळशी व निरुद्योगी असा बहुतेक काळ घालवी; इतर मुलांचें व त्याचें पटत नसे. शिक्षकांशींही तो बेपर्वाइनेंच वागे. आपण म्हणूं तें खरें व त्याचेंच समर्थन करावयाचें हा जो त्याचा गुण किंवा दुर्गुण, तो लहानपणींही त्याचे अंगीं इतका दृढ होता कीं, वेळ पडल्यास आपले शिक्षक व सर्वमान्य ग्रंथ हे साफ चुकले आहेत, असें म्हणण्यासही त्यास दिक्कत वाटत नसे. शिक्षणांत गणित व खेळांत क्रिकेट हे त्याचे आवडीचे विषय असत. लहानपणापासून झोंपेंतून उठून चालूं लागण्याची त्यास खोड असे, व या खोडीचा अंश मोठेपणींही त्याचे अंगीं थोडाबहुत राहिला होता. जात्या तो शूर असे; परंतु प्रसंगविशेषीं कोठेंही एकटें रहाण्याचें त्याला भय वाटे व मोठेपणीं देखील ही गुप्त भीति कांहीं अकल्पित कारणानें त्याचे डोक्यांत खिळून राहिलेली एखादे वेळीं दिसून येई !

सन १८६९ सालीं केंब्रिज येथील कॉलेज सोडून पदवी वगैरे न घेतां शिक्षणक्रम पूर्ण होण्याचे आधींच पार्नेल परत घरीं येऊन राहिला. केंब्रिज येथें असतांना कांहीं स्नेह्यांबरोबर तो एक वेळ फिरावयास गेला होता; त्या

प्रसंगीं दारू पिऊन धुंद झालेल्या कांहीं इसमांशीं त्याची मारामारी झाली, व न्यायाधीशानें त्यास मारामारीबद्दल दोषी ठरविलें. वास्तव, कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं पार्नेल यास कांहीं दिवस कॉलेज सोडून घरीं बसण्याची शिक्षा दिली, व या शिक्षेमुळें तो जो एकदां घरीं आला तो फिरून गेलाच नाहीं. अशा रीतीनें त्याचा शिक्षणक्रम कोणत्याही दिशेनें विशेष शिक्षण न मिळतां संपला व पोटाकरितां शिकण्याचें त्यास कारण नसल्यामुळें तो संपवावा अशीही कळकळ त्यास नव्हती; शिवाय मनानेंही तो विद्येचा मोठा भोक्ता होता असें नाहीं. चालचलाऊ शिक्षण मिळवून घरच्या जमीनदारीची वहिवाट करून ख्यालीखुशाली व शिकार यांजमध्यें सुखानें दिवस घालवावे, यापलीकडे त्याची महत्त्वाकांक्षा कधींही गेली नव्हती. तो इंग्रजांचा द्वेष्टा होता खरा, तथापि आपला देश म्हणजे काय, त्याचा पूर्वेतिहास काय आहे वगैरे साधारण गोष्टीसुद्धां त्यास चांगल्याशा माहीत नव्हत्या. आयरिश राष्ट्राच्या इतिहासाचें त्याचें अज्ञान इतकें कांहीं भयंकर होतें कीं कोणास तें सांगितलें असतां खरेंही वाटणार नाहीं. देश राहिला; परंतु खुद्द आपल्या वाडवडिलांनीं काय काय केलें हें समजावून घेण्याचाही प्रयत्न त्यानें कधीं केला नाहीं. सन १७९८ सालीं कांहीं आयरिश देशभक्तांनीं बंड केलें होतें, ही गोष्ट त्यास नुसती ऐकून माहीत होती. आपल्या आयुष्याचीं पहिलीं वीस वर्षें त्यानें केवळ ख्यालीखुशालींत घालविलीं. क्रिकेट खेळांत तो आपल्या टीमचा 'कॅप्टन' होई व रानांत शिकार करणें, मासे मारणें वगैरे गोष्टींत तो प्रवीण असे; परंतु साधारण लहान मुलांमध्येंही जी एक प्रकारची उथळ कां होईना, परंतु उज्वल देशभक्ति असते, तिचा लवलेशही पार्नेलमध्यें वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत दिसून आला नाहीं. राजकारणाच्या गोष्टी बोलणें हें विद्यार्थ्यांस फार आवडतें; तथापि पार्नेल यास या गोष्टीचें अगदीं वावडें असे.

अशा मनोवृत्तीचा मनुष्य पुढें लवकरच राजकारणांत पडून राष्ट्रीय पुढारी बनावा, ही एक केवळ अघटित घटनाच म्हणण्यास हरकत नाहीं. पार्नेलचें

लक्ष राजकारणांत प्रथम जाण्यास आयर्लंडमधील फीनियन लोकांची चळवळ मुख्यतः कारणीभूत झाली. सन १८६७ साली मँचेस्टर येथें मारामाऱ्या, खून, फांशी वगैरे प्रकार घडून आल्याचें वर्णन पूर्वी सातव्या भागांत आलेलेंच आहे. येथें मुख्यतः सांगावयाची गोष्ट हीच कीं, मँचेस्टर येथें घडलेल्या या प्रकारांनीं सर्व आयर्लंड देशभर मोठीच खळबळ उडून गेली. कित्येक दिवसपर्यंत लोकांचे तोंडीं बोलण्यास दुसरा विषयच नव्हता. मँचेस्टर येथें घडलेल्या प्रकारांचें इंग्रज लोक 'खून' या तिरस्कारदर्शक शब्दानें वर्णन करीत; परंतु या गोष्टीची आयरिश लोकांस मोठी चीड येई. ते म्हणत दिवसाढवळ्या सशस्त्र व सावध असलेल्या पोलिसांशीं लगट करून आपले सोबती सोडवून घेण्याचे प्रयत्नांत जर फीनियन लोकांकडून प्राणहानि झाली, तर त्यास खून म्हणणें गैरशिस्त होईल. अशा शूर आयरिश लोकांस खुनी हें नांव ठेवून आयरिश लोकांबद्दलचें आपलें वैर मात्र इंग्रज लोक निष्कारण प्रकट करीत आहेत असें ते म्हणत; व कोणीं खून केला असेलच तर तो या फीनियन लोकांस शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशांनींच केला असाही कोटिक्रम ते लढवीत. पार्नेल यास राजकारण जरी अवगत नव्हतें, तरी वरील वादांत त्याचें मत आयरिश लोकांप्रमाणेंच होतें, व वादाचा प्रसंग आला असतां तो फीनियन लोकांचें समर्थन मोठ्या आवेशानें करी. तथापि फीनियन चळवळीनें त्याच्या मनांत उत्पन्न झालेली राजकारणाची आवड क्षणिकच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८७२ सालीं पार्लमेंटसंबंधीं नवीन निवडणुकी झाल्या, त्या वेळीं पार्नेल व त्याचा भाऊ जॉन यांच्या मनांत राजकारणांत पडण्याची कल्पना एक वेळ येऊन गेली. याच सालीं होमरूलच्या चळवळीचा नामकरणविधि झाला होता. फीनियन चळवळीनंतर थोडे दिवसांनीं गुन्हेगारास सरसकट माफी मिळण्यासंबंधाची चळवळ आयर्लंडांत झाली व या चळवळींत नेमस्त, मवाळ, जहाल, प्रागतिक, स्वामिभक्त या सर्व प्रकारच्या व पक्षांच्या लोकांनीं आपापले भेदभाव विसरून जाऊन एकदिलानें खटपट केली होती. त्यामुळें राष्ट्रीय ऐक्याची

ज्योत आयर्लंडांत प्रदीप्त होऊन, राष्ट्रास स्वतंत्र पार्लमेंट मिळावें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली व आयझॅक बट यानें पुढाकार घेऊन होमरूलच्या चळवळीचा पाया घातला. या चळवळीचें काम खुद्द आयर्लंडप्रमाणें ब्रिटिश पार्लमेंटमध्येंही व्हावयाचें असल्यामुळें पार्लमेंटच्या निवडणुकीस कांहीं विशेष प्रकारचें महत्त्व या सुमारास अर्थातच आलें होतें. १८७४ सालीं होमरूलला अनुकूल असे ५९ सभासद आयर्लंडमध्यें निवडले गेले; व पार्लमेंटमध्यें काम करण्याची हौस आयरिश लोकांमध्यें इतकी उत्पन्न झाली कीं, 'पार्लमेंटरी चळवळीपासून कांहींएक निष्पन्न होणार नाहीं व जो काय कार्यभाग होणें तो युद्ध करूनच होईल,' असें म्हणणारा फीनियन लोकांचा पक्ष या वेळीं मागें पडला. व अशा या निवडणुकीची धामधूम सुरू असतां कांहीं आकस्मिक कारणानें पार्लमेंटमध्यें शिरण्याची स्फूर्ति पार्नेल यास झाली.

पार्नेल हा इंग्रजांचा कट्टा द्वेष्टा होता, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. द्वेष हा साधारणतः दोषच होय, यांत शंका नाहीं. परंतु पार्नेल यास तो गुणाप्रमाणें उपयोगी पडला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, पार्लमेंटमध्यें शिरून काम करण्याविषयीं आयरिश लोकांच्या मनामध्यें एक प्रकारची उत्सुकता जरी उत्पन्न झालेली होती तरी तिच्याच बरोबर हेंही सांगितलें पाहिजे कीं, लिबरल पक्षावर भिस्त ठेऊन राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल अशा भरंवशाचे दिवस गेले होते आणि ब्रिटिश पार्लमेंट ही संस्था जरी परकीय होती, तरी तिजमधील सभासद या नात्यानें आपले जे काय हक्क असतील ते हरतऱ्हेनें बजावून साधेल तो कार्यभाग साधून घ्यावा, असें वाटण्याचे दिवस आले होते. आयझॅक बट हा होमरूलच्या चळवळीचा व पार्लमेंटमधील आयरिश सभासदांचा जरी अभिषिक्त पुढारी होता तरी तो असावा तितका दृढ ऊ नसल्यानें, पार्लमेंटमध्यें आयरिश सभासदाचें कांहीं एक चालत नाहीं व यामुळें ते असून नसल्यासारखे होतात, अशी तक्रार त्या वेळीं प्रचलित होती. बट हा चारित्र्यानें प्रतिष्ठित व दिलदार असून त्याचे स्वभावांत एक प्रकारचा गोडवेपणा

होता व त्याचे हातून प्रतिपक्षास निकरानें व टाकून बोलवत नसे. आयरिश पार्लमेंट सभा मोडण्यामध्यें इंग्रज लोकांनीं अत्यंत अन्याय केला, असा जरी त्याचा पक्का भरंवसा होता तरी, पार्लमेंट सभेमध्यें शिष्टाचारानें वागण्याच्या नियमाचें जें दडपण पडे त्यांतून त्यास आपली मान वर काढतां येत नसे. ही मान वर काढण्याचें काम, ज्याचे मनांत इंग्रजांविषयीं पक्का द्वेष व तिरस्कार बिंबलेला असेल, अशाउच त्या वेळीं साधण्याजोगें होतें. पार्नेलच्या अंगचा द्वेषाचा हा गुण व वेळेचा गुण हे दोन्ही एकवटल्यामुळें पार्लमेंटमध्यें शिरल्यापासून लवकरच तो पुढारीपणास पात्र झाला.

सन १८७४ सालीं पार्नेल हा डब्लिन शहरातर्फें एक उमेदवार म्हणून उभा राहिला; परंतु त्यास या प्रसंगीं यश आलें नाहीं. सार्वजनिक काम करण्यास तो या वेळीं अगदीं अनभ्यस्त होता. उमेदवार या नात्यानें मतदारांच्या सभेपुढें उभा राहून त्यानें जें पहिलें भाषण केलें तें अत्यंत गचाळ होतें. सुसंगत रीतीनें त्यास धड चार शब्दही बोलतां येईनात व राजकीय प्रश्नासंबंधाचें त्याचें अज्ञान केवळ अगाध होतें. यामुळें सार्वजनिक आखाड्यांतील त्याची ही पहिली कुस्ती पाहून लोकांना एक प्रकारें त्याची कींवच आली. कोणी म्हणूं लागले कीं, अरे, हा मुलस्तंभ ठोंब्या पार्लमेंटमध्यें शिरून काय दिवे लावणार ? तर दुसरे कित्येक म्हणत कीं, हे बोवा पार्लमेंटमध्यें शिरल्यावर वाघाच्या शिकारीची तयारी करून कसेंबसें तरी एखादें कोल्हें मारतील. अर्थात् यांचें पहिलें भाषण होऊन गेलें म्हणजे पुढ या बुवांचें बहुधा कोणास नांवही ऐकूं येणार नाहीं ! परंतु पार्नेलची निवडणूक केवळ त्याच्या भाषणावर अवलंबून नव्हती. त्याच्या जिल्ह्यांत त्याच्या घराण्याला फार मान होता व पुढील म्हणजे १८७५ साली मीथ या भागातर्फें त्यानें आरंभलेली उमेदवारी साधून त्याचा पार्लमेंटमध्यें प्रवेश झाला. या वेळीं होमरूलकरितां मत देण्याची शपथ घेतलेले असे ५९ आयरिश सभासद ब्रिटिश पार्लमेंटमध्यें निवडून आलेले होते व आयझॅक बट हा त्यांचा पुढारी होता. पार्लमेंटसभेमध्यें कांटेतोल शिस्तीनें

वागणें हें आपलें कर्तव्य आहे, असें बट यानें भर पार्लमेंटमध्यें बोलून दाख-विलें असल्यानें इंग्रज सभासदांची त्याजवर मर्जी असे; परंतु या मर्जीचा प्रत्यक्ष प्रसाद अगर फळ आयझॅक बट यास आपल्या राष्ट्राला आजपर्यंत मिळवून देता आलें नव्हतें. शिवाय केवळ गोड स्वभावाच्या मनुष्याबद्दल कालां-तरानें आदरमिश्रित असा एक प्रकारचा अनादर हळूहळू उत्पन्न होत असतो तसा पार्लमेंटमध्यें आयझॅक बट याजबद्दल होऊं लागला होता. ही एकंदर परिस्थिति सर्व आयरिश सभासदांना पसंत होती असें नाहीं; परंतु बट यास जशी पार्लमेंट-सभेची शिस्त मोडणें अवघड वाटत असे, त्याचप्रमाणें त्याच्या अनुयायांनाही बटच्या विरुद्ध वागण्याचें व उघड बोलण्याचें अवघड वाटे. तथापि या एकुण-साठमध्यें एक आयरिश सभासद कर्मधर्मसंयोगानें असा होता कीं, त्यास कोणा-लाहि टाकून बोलणें हा केवळ तळहाताचा मळ वाटे. याचें नांव जोसेफ बिगर असें होतें. कालांतरानें पार्नेल यानें बिगरपुढेंही आघाडी मारली. तरी प्रारंभीं बिगर हा पार्नेलला गुरुस्थानीं होता. बिगर हा निस्पृह व स्पष्टवक्ता तर होताच, परंतु स्पष्टवक्तेपणापेक्षांही त्याच्या स्वभावांतील धैर्य व भाषेंतील आडमुठेपणा, याचाच उपयोग प्रसंगविशेषीं अधिक होई. एवढी मोठी प्रतिष्ठित पार्लमेंट सभा, पण ती त्याला निर्माल्यवत् वाटे! या इंग्रज लोकांनीं आपलें ऐकावें अशी इच्छा कोणास असेल तर त्याचा गोड बोलून कधींही निभाव लागणार नाहीं; शब्दाचे दोन दणके घेण्यास व देण्यास त्यानें कंबर कसली पाहिजे, व जो सारासार विचार या इंग्रजांचे अंगीं कांटेरी जिभेच्या खराट्यानें घांसून भिनविता येईल, तेवढाच काय तो त्यांच्या कातडीखालीं उतरेल, या इंग्रजांशीं मऊ बोलणें व पालथ्या घागरीवर पाणी ओतणें दोन्हीही सारखींच फलप्रद आहेत; असा बिगर याचा सिद्धांत ठरून चुकला होता. इंग्रज लोक व त्यांच्या संस्था याजबद्दल त्यास काडीचाही आदर वाटत नसे, व यामुळें वेळ अवेळ दोन्ही समान लेखून शिष्टाचाराच्या नियमांस धाब्यावर बसवून कोणीकडून तरी या इंग्रजांचे बोडक्यावर एक तडाका कसा मारतां येईल, याची संधि तो

पद्धत असे. त्याचे अंगीं वक्तृत्व मुळींच नव्हतें; सुसंगत बोलणें कशाशीं खातात हें त्याच्या गांवींही नव्हतें. पुस्तकांतील आधार देणें हें रिकामटेकड्या लोकांचें काम असून, लोकांच्या विचारांचा आधार आपल्या भाषणास घेण्यांत पुरुषार्थ तो कोणता, असें तो म्हणे. एकून जाऊन त्याजवळ दोन मुख्य गोष्टी होत्या. एक धिटाई व दुसरी चिकाटी. या दोन गुणांच्या जोरावर पार्लमेंटमध्यें त्यानें थोडीबहुत चळवळ उडवून दिली होती, आणि शिष्ट व अशिष्ट यांची अवचित् गांठ पडली असतां जो एक प्रकारचा गोंधळ उडून जातो, तशा प्रकारचा गोंधळ बिगर याच्या भाषणानें पार्लमेंटमध्यें केव्हां केव्हां उडून जाई; व असा गोंधळ उडालेला पाहिला म्हणजे आपण आज कृतकृत्य झालों, राष्ट्राची आपल्या हातून थोडीबहुत सेवा घडली खास, असें त्यास वाटे. बिगर बोलावयास उठला म्हणजे इंग्रज सभासद कपाळास आठ्या घालीत, खांदे उडवीत, तोंडानें संतापदर्शक चीत्कार करीत व आपापल्या जागीं चुळबुळत; परंतु सभासद बोलावयास उठला म्हणजे त्यास थांबविण्याचा अधिकार कोणासच नसल्यामुळें बिगर याचें कडू भाषण कडू औषधाप्रमाणें तोंड वाईट करीत परंतु गटागटां त्यांना प्यावें लागे. बट व बिगर हीं दोन निरनिराळ्या प्रकारचीं ठळक उदाहरणें पार्नेल याच्या डोळ्यापुढें पहिल्या-पासून असल्यामुळें त्यांपैकीं कोणाचें अनुकरण करावें, याविषयींची त्याची शंका फार वेळ टिकली नाहीं. त्याला स्वतःला पार्लमेंटसभेंतील वादविवादाचे नियम चांगलेसे माहीत नव्हते; तथापि नियमांचें उल्लंघन करणें हा त्या नियमांचें शिक्षण घेण्याचा एक राजमान्य मार्गच आहे, असा युक्तिवाद आपल्या मनाशीं करून बिगर यानें घालून दिलेल्या मार्गानेंच जावयाचें, असा पार्नेल यानें लवकरच निश्चय केला.

पार्नेल यानें सन १८७५ सालीं एप्रिलच्या २२ व्या तारखेस पार्लमेंटचा सभासद या नात्यानें शपथ घेतली; परंतु तारीख ३० जूनपर्यंत त्यास सभेच्या कामांत कांहीं विशेष बोलण्याची संधि मिळाली नाहीं. सदरहु तारखेस आय-

बॅक बट याचा होमरूलसंबंधाच्या ठरावावर वादविवाद चालला असतां सर मायकेल हिक्स बीच यानें मँचेस्टर येथें घडलेल्या प्रकारास उद्देशून फीनियन लोकांना खुनी असें उघड म्हटलें, व या वेळीं मात्र पार्नेल याच्यानें गप्प बसवेना; व तो ' छे, छे, तो शब्द बरोबर नाहीं, ' असें एकदम मोठ्या आवेशानें ओरडून म्हणाला. त्याबरोबर सर्व सभागृह दचकल्यासारखें झालें. हिक्स बीच हा गहन गांभीर्याचा आविर्भाव आणून पार्नेल याजकडे बोट दाखवून खोल आवाजानें म्हणाला, ' खुनाचें समर्थन करणारा असा एक सभासद या सभागृहांत आहे, याबद्दल मला खेद होतो ' व तो हे शब्द बोलतांच सर्व सभागृहांतून पार्नेल यास उद्देशून आपले शब्द परत घ्या, आपले शब्द परत घ्या, असा एकदम ध्वनि उठला. परंतु या वादळास न जुमानतां पार्नेल हाही गंभीरपणानें उभा राहिला व म्हणाला, ' मँचेस्टर येथें घडलेल्या प्रकारांत कांहींही झालें असलें तरी तेथें कोणींही कोणाचाही खून केलेला नाहीं असें माझें ठाम मत आहे. हें माझें मत यापुढेंही कायम राहील, व हें माझें मत जितक्या प्रसिद्धपणें मला बोलून दाखवितां येईल तितक्या प्रसिद्ध-पणें मी तें बोलून दाखविण्यास नेहमीं तयार असेन. ' पार्नेलच्या या उत्त-राचें सर्व आयरिश सभासदांनीं टाळ्यांच्या गजरानें समर्थन केलें, व इतकी झटापट झाल्यानंतर तो विषय तसाच सोडून देऊन हिक्स बीच होमरूल-संबंधानें पुढें बोलूं लागला.

या लहानशा प्रसंगानें पार्नेल याचें एक मोठेंच कार्य घडून आलें; तें असें कीं, पार्लमेंटमधील इंग्लिश सभासद व आयर्लंडमधील फीनियन लोक या दोघांचेंही लक्ष त्याजकडे एकदम वेधलें व या दोहोंचाही उपयोग त्याला पुढारीपण मिळण्याचे कामीं झाला. इंग्रज सभासदांस असें दिसून आलें कीं, जोसेफ बिगर या विक्षिप्त व्यक्तीची परंपरा चालविणारा एक नवीन प्राणी उत्पन्न झाला. इकडे फीनियन लोकांसही बटसारख्या गोडव्या पुढाऱ्याचा कंटाळा आलेला असल्यानें त्याचें उघडपणें समर्थन करणारा एक सभासद

मिळाल्यामुळें त्यास आनंद झाला. वर वर्णन केलेल्या प्रसंगाबद्दल फीनियन लोकांमध्यें पार्नेलसंबंधानें बरीच अनुकूल चर्चा झाली, व हा तरुण मनुष्य देशाचे कार्यास बराच उपयोगी पडेल अशी त्यांनीं आपल्या मनाशीं गांठ घालून यापुढें त्याजवर नेहमीं लक्ष ठेविलें. सन १८७६ च्या नोव्हेंबर महिन्यांत लिव्हरपूल येथें भाषण करतांना त्यानें असें उघड बोलून दाखविलें कीं आयरिश लोकांमध्यें आत्मप्रत्यय असावा तितका नाहीं, एवढ्यानेंच सर्व नडतें आहे. तो उत्पन्न झाला असतां होमरूल मिळण्यास कांहीं एक अडचण पडणार नाहीं व तो मिळविल्याशिवाय कोणाही आयरिश मनुष्यानें संतुष्ट रहातां कामा नये.

इ. स. १८७७ सालीं पार्नेल हा पार्लमेंटमधील वादविवादांत अधिकाधिक मिसळूं लागला. त्यानें आपलें मुख्य धोरण असें ठेविलें होतें कीं, सभेच्या कामास होतां होईल तितका—पण पद्धतशीर रीतीनें—अडथळा करावयाचा. तो आपल्या सूचना व उपसूचना अशा खुबीदार रीतीनें सजवी कीं सहज पहाणारास असें वाटावें कीं इंग्रज लोकांविषयीं हितबुद्धि मनांत बाळगूनच त्या तयार केलेल्या आहेत. तसेंच आपल्या भाषणांतही तो असा आविर्भाव आणी कीं येऊन जाऊन सभेपुढें आलेल्या कामाची चांगली शहानिशा होऊन तें तडीस लागावें, इतकाच काय तो वाद वाढविण्यांत आपला हेतु आहे; परंतु खरें वर्म वेगळेंच असे. कोणीकडून तरी सभेचा वेळ मोडावा, कोणत्याही कामीं अनेक तर्ककुतर्क निघावे व सभासदास कामाचा कंटाळा यावा, एवढीच त्याची व बिगर याची इच्छा असे. ही अवडणुकीची पद्धति बट यास पसंत नव्हती व तिचा भर पार्लमेंटमध्यें निषेध करून, आयरिश पक्षाचा पुढारी या नात्यानें आपल्या अनुयायांवर शिस्त चालवून हा निव्वळ अडवणुकीचा प्रकार बंद करावा असाही त्यानें प्रयत्न करून पाहिला; परंतु आपलें करणें शिस्तीस सोडून नाहीं व आपण अनुयायी असलों तरी आपणासही मतस्वातंत्र्य असलें पाहिजे असें प्रतिपादून पार्नेलनें आपलें समर्थन केलें.

हा असा प्रकार कांहीं दिवस चालल्यावर पार्लमेंटमधील वादविवादाच्या नियमांत दुरुस्ती केल्याशिवाय भागत नाहीं, असें इंग्रजी प्रधानमंडळास वाटूं लागलें, आणि दक्षिण आफ्रिकेसंबंधीं एका बिलावरील वादविवादांत ' वरील कारणाकरितां प्रधानमंडळाच्या हेतूचे सिद्धीस इतर्‍हेनें अडथळा करण्यांत मला विशेष प्रकारचें समाधान वाटतें ' या त्याच्या तोंडून निघालेल्या शब्दांचा फायदा घेऊन सर स्टॅफर्ड नॉर्थकोट यानें वादविवादाचे नियमांत फेरबदल करवून घेतले. शिस्त सोडून वागणाऱ्या सभासदास बाहेर घालवून देतां यावें व विनाकारण अडथळा करण्याचे हेतूनें आणलेल्या सूचना वगळतां याव्या, अशी त्याची योजना होती. तथापि या योजनेचा फारसा उपयोग झाला नाहीं. कारण, कायदा मोडणाराचें चातुर्य नेहमीं कायदा करणाऱ्यांच्या चातुर्यापुढें धांव घेत असतें असा नेहमींचाच अनुभव आहे. वरील योजनेनंतर चारच दिवसांनीं जो एक वादविवाद झाला, त्यामुळें पार्लमेंट सभेची बैठक एकसारखी सव्वीस तासपर्यंत चालली. या व अशा गोष्टींमुळें ते पार्नेलचा द्वेष करूं लागले व अर्थात् त्याचप्रमाणानें आयर्लंडमध्यें त्याची लोकप्रियता वाढूं लागली. पुढील म्हणजे १८७८ सालीं आयरिश होमरूल सभेचें अध्यक्षस्थान आयझॅक बट याजकडून निघून पार्नेलकडे आलें. हें स्थित्यंतर होण्यास फिनियन लोकांची त्यास पुष्कळ मदत झाली. वास्तविक तो स्वत: फिनियन नव्हता; तथापि, फिनियन लोकांच्या चळवळीपासूनही जी अंत:स्फूर्ति उत्पन्न होते तिचा फायदा पार्लमेंटमध्यें चळवळ करणाऱ्या लोकांनीं घेतला पाहिजे; दोहोंचीं प्रत्यक्ष कार्यें व साधनें जरी भिन्न असलीं तरी राष्ट्राचे कार्यास दोघेही आपापल्या समजुतीप्रमाणें व शक्तीप्रमाणें मदत करीत असतात; एकाचें काम जरी दुसऱ्यास साधणार नाहीं, म्हणून एकानें दुसऱ्याचे कामांत ढवळाढवळ करूं नये हें जरी योग्य असलें तरी दोघांनींही एकमेकाचें शत्रुत्व धरतां कामा नये; व विनाकारण गैरसमज उत्पन्न न होऊं देतां एकापासून दुसऱ्यास जेवढी मदत मिळणें शक्य असेल तितकी त्यानें जरूर घ्यावी, असें

त्याचें मत होतें. यामुळें पार्नेल हा स्वतः केव्हांही जरी फिनियन सभांचा सभासद झाला नाहीं, व पार्लमेंटच्या कामांत त्यानें फिनियन लोकांस फारशी ढवळाढवळ करूं दिली नाही, तरी त्यांशीं मिळूनमिसळून वागण्याचें अथवा त्यांची स्फूर्ति व त्यांचा उद्योग यांचा राष्ट्रीय चळवळीस फायदा करून घेण्याचें त्यानें नाकारलें नाहीं. फिनियन लोकांच्या मतें पार्लमेंट हें एक निव्वळ खेळणें असून तेथील काम व वादविवाद हा एक प्रकारचा चावटपणा किंवा वेळ दवडण्याचा उपाय आहे असें ते म्हणत. पार्नेल असें म्हणे कीं, 'नुसत्या बेकायदेशीर चळवळीनें तरी कोणतें कार्य आजपर्यंत नांवारूपास आलें अगर सिद्धीस गेलें? केवळ दांडगाईच्या चळवळी आयर्लंडांत आजवर फसल्याच कीं नाहीं? तात्पर्य, तुमचा मार्ग तुम्ही चालवा, आमचा आम्ही चालवितों. तुमच्या मार्गांत जशी आम्ही आडकाठी आणीत नाहीं, तसा आमच्या या उघड चळवळीच्या मार्गांत अडथळा आणूं नये.' आयझॅक बट व ओकॉनेल यांनींहा जवळजवळ असेंच म्हटलें असतें; परंतु फीनियन लोकांशीं सार्वजनिक कामांत मिसळण्यास ते भीत व ते देशाचे हितशत्रु असल्याप्रमाणें त्यांस वागवीत. पार्नेलचा प्रकार वेगळा होता. समाजांतील अवयव या नात्यानें तो त्यांच्याशीं खुशाल दळणवळण ठेवी व आपल्या चळवळींत बिनदिक्कत उपयोग करून घेई; तथापि त्यांचा पगडा आपल्यावर बसूं नये, अशी तो चांगली खबरदारी घेई; यामुळें कोणास अंगीं लावत' येईल, अशा रीतीचा संसर्ग फिनियन लोकांशीं न ठेवतांही त्यांचें प्रेम पार्नेल यास संपादन करतां आलें. या सुमारास डिव्हॉय व डेव्हिट या दोन फिनियन पुढाऱ्यांशीं पार्नेल याचें दळणवळण सुरू झालें. तथापि वर सांगितल्याप्रमाणें आपली छाप त्यांच्यावर ठेऊन त्यानें आपल्या म्हणजे उघड चळवळीकडेसच त्यांस ओढलें. इंग्रजांना त्रासच द्यावयाचा व वाऊच दाखवावयाचा, परंतु तो पार्लमेंटवरील वादविवाद व आयर्लंडमधील उघड चळवळ यांच्या योगानेंच आपण दाखवूं अशी त्यानें फिनियन लोकांची समजूत घातली. आजपर्यंत राष्ट्रीय चळवळ

म्हणजे येऊन जाऊन हत्यार उपसून उठणें, अशी जी फिनियन लोकांची समजूत होती ती त्यानें घालविली. हत्यार उपसणें म्हणजे जिवावर उदार होणें व जिवावर उदार होणारे लोक कोणत्याही समाजांत थोडेच असणार. थोड्या लोकांनीं केलेली चळवळ साध्य होत नाहीं, व बहुजनसमाजाला केवळ मानसिक ध्येय पटत नसून त्यांच्या नफ्यातोट्याच्या ज्यांत प्रत्यक्ष संबंध आहे, अशी चळवळ केली तरच ती त्यांना समजते, व तींतच ते अंशभागी होऊं शकतात. यास्तव आयरिश शेतकरीवर्ग हातीं घेऊन केलेली चळवळ गेली तर सिद्धीस जाईल, असा युक्तिवाद मनाशीं करून सन १८७९ सालीं आक्टो-बरचे २१ व्या तारखेस आयरिश लँडलीग नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचा हेतु आयरिश शेतकऱ्यावरील बोजा कमी करून इंग्रज जमीनदारापासून त्यांचें रक्षण करावयाचें व ते कालांतरानें आपल्या जमिनीचे मालक होतील असे कायदे पार्लमेंट सभेकडून करवावयाचे असा होता.

पुढील सालीं पार्नेल हा लँडलीगचीं तत्वें समजुन सांगण्याकरितां अमे॰रिकेंत गेला. या सफरींत दोन महिन्यांचे अवधींत त्यानें सुमारें अकरा हजार मैल जमीनीवरील प्रवास केला, बासष्ट शहरीं व्याख्यानें दिलीं व तेथून आपल्या संस्थेस सुमारें चार लक्ष रुपये वर्गणी गोळा करून आणली. ठिकठिकाणीं लोकांनीं व अमेरिकन अधिकाऱ्यांनीं त्याचा बडेजाव व सत्कार केला व अखेर अमेरिकेमध्यें लँडलीगची एक शाखा स्थापन करून तो आयर्लंडास परत आला. त्याच सालीं एप्रिल महिन्यामध्यें पार्लमेंटच्या नवीन निवड-णुकी झाल्या, त्यामध्यें मीथ, मेयो व कॉर्क या तीन शहरांनीं पार्नेल यास आपला सभासद म्हणून निवडून दिलें. नंतर लगेच पार्लमेंटमध्यें त्यानें आय-रिश शेतकऱ्यांचे विषयाची चर्चा सुरू केली. या चळवळीस आयर्लंड-मधील लँड लीग सभेच्या चळवळीची फार मदत झाली. तारीख १९ सप्टेंबर १८८० रोजीं एनिस येथें शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल भाषण करतांना, शेतकऱ्यांच्या हितशत्रूंस लोकांनीं कसें वागवावें याची त्यानें चर्चा केली; व

अशा लोकांस सार्वत्रिक बहिष्कार घालावा असें सांगितलें. या उपदेशाचा प्रथम परिणाम कॅप्टन बॉयकॉट नांवाच्या एका जमीनदाराच्या मुखत्यारावर झाला. तो असा कीं, खुद्द त्याच्या चाकरांनींही त्याजवर बहिष्कार घातला. सर्व समाज आपणास एखाद्या महारोग्याप्रमाणें दूर ठेवीत आहे व अस्पृश्य मानीत आहे अशी प्रतीति त्यास पटली. या एका उदाहरणामागून अशींच शेंकडों उदाहरणें होऊं लागलीं. आयरिश शेतकरी व त्यांचे साहाय्यकर्ते यांस आपल्या हातीं एक अश्रुतपूर्व अर्थे अस्त्रच लाधलें असें वाटूं लागलें. सर्व देश सभा व बहिष्कारार्चीं व्याख्यानें यांनीं खळवळून गेला व या चळवळीची अधिक उपेक्षा करतां येत नाहीं असें ठरवून पार्नेल, डिलन, बिगर वगैरे चवदा असामींवर बेकायदेशीर कृत्यास चिथावणी दिल्याचे आरोपावरून खटला करण्यांत आला. हा मुकदमा दोन न्यायाधीश व ज्यूरी यांजपुढें एकवीस दिवस चालून, तारीख १५ जानेवारी १८८१ रोजीं ज्यूरींतील १२ पैकीं १० असामींनीं आरोपी निर्दोषी आहेत असा अभिप्राय दिला. अर्थात् सर्व आरोपींस सोडून द्यावें लागलें. यामुळें न्यायकोर्टाखेरीज अन्य रीतींनीं लोकांस पकडून तुरुंगांत टाकतां यावें असे अधिकार आयर्लंडचे व्हाइसरॉय लॉर्ड कूपर यांनीं पार्लमेंटाकडून मिळविले व त्यांच्या जोरावर आयरिश अधिकाऱ्यांनीं १८८१ सालीं शेंकडों आयरिश गृहस्थांस तुरुंगांत घातलें.

मुख्य प्रधान ग्लॅडस्टन यास आयर्लंडची स्थिति माहीत नव्हती असें नाहीं व त्यानें आपण होऊन आयरिश शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां १८८० सालीं जमिनीबाबत कायदा पार्लमेंटमध्यें पास करून घेतलेला होता; तथापि त्यांतील कलमें आयरिश लोकांस सर्वस्वी मान्य नसल्यामुळें, त्या कायद्यांत दिलेल्या सवलतींचा फायदा होतां होई तों न घेतां शेतकऱ्यांनीं आपल्या जुन्या म्हणजे स्वावलंबनाच्या पद्धतीनें आपला न्याय करून घ्यावा अशी शिकवणी लँड लीगच्या चालकांनीं दिल्यावरून फिरून पूर्ववत् अस्वस्थता माजली व दंगेधोपे सुरू झाले. पार्नेलच्या या कृत्याचा ग्लॅडस्टन यानें जोरानें निषेध केला,

व पार्नेल वगैरे मंडळीस तुरुंगांत घातल्याशिवाय नवीन कायद्याची अंमलबजावणी नीट होणार नाहीं, असें मनाशीं ठरविलें. तारीख १२ आक्टोबर १८८१ रोजीं वारंटावर सह्या होऊन लगेच त्यास पकडून किल्माईनहॅम येथील तुरुंगांत टाकण्यांत आलें. पार्नेल व त्याचे साथीदार यांस तुरुंगांत टाकल्यानें आयर्लंडांत शांतता होईल असें अधिकाऱ्यांस वाटत होतें; परंतु ही त्यांची अटकळ चुकली. पार्नेलनेंही तुरुंगांतून आपल्या लोकांस असा निरोप पाठविला कीं, माझी सुटका तुरुंगांतून लवकर झाल्यास आयरिश लोकांनीं आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं असें मी समजेन. पार्नेल यास तुरुंगांत घालून कांहीं दिवस लोटतात तोंच शेतकऱ्यांनीं जमीनदारांस मुळीं धाराच देऊं नये, अशा शिकवणीचा जाहीरनामा लँडलीगच्या चालकांनीं प्रसिद्ध केला. त्यावर पार्नेल वगैरे पुढाऱ्यांच्या सह्या असल्यामुळें त्याला महत्त्व आलें. तुरुंगांत गेलेल्या आपल्या पुढाऱ्यांची ही एक पवित्र आज्ञाच असें समजून लोकांनीं जाहिरनाम्याप्रमाणें वर्तन सुरू केलें. अधिकाऱ्यांच्या वर्तनामुळें त्वेष येऊन कुलस्त्रियाही या चळवळींत सामील झाल्या. दडपशाहीच्या कायद्यापूर्वीं राजकीय गुन्हे घडत ते या कायद्यानें न थांबतां त्यांची संख्या उलट तिप्पट वाढली. ठिकठिकाणीं लँडलीगच्या शाखा स्थापन होऊन इतकी जोरानें चळवळ सुरू झाली कीं, एक मनुष्य कैद झाल्याबरोबर त्याच्या पावलावर पाऊल ठेऊन तेंच काम चालविण्यास दुसरा मनुष्य आपोआप उत्पन्न होऊं लागला व अखेर खुद्द ग्लॅड्स्टन यांसही आपलें धोरण बदलावें असें वाटूं लागलें. पार्नेल व ग्लॅडस्टन दोघांसही तडजोड करावी अशी एकसमयावच्छेदेंकरून इच्छा उत्पन्न होऊन मध्यस्थांच्या खटपटीनें उभयतांचा तह ठरला. या तहाचीं मुख्य कलमें तीन होतीं. १८८० सालच्या जमीनीसंबंधीच्या कायद्याची व्याप्ति पूर्वींहून अधिक विस्तृत करावी; शेतकऱ्यांचे डोक्यावरचा शिलकी खंडाचा बोजा खरोखर असह्य असल्यामुळें त्याची फेड परस्पर होईल अशी वाटेल ती तोड अधिकाऱ्यांनीं काढावी, व वरील दोन गोष्टी ग्लॅडस्टनसाहेब करण्यास तयार असतील तर पार्नेलप्रभृतींनीं

शेतकऱ्यांनीं खंड न देण्यासंबंधाचा काढलेला जाहिरनामा परत घ्यावा. अशा रीतीचा तह झाला असता दंगेधोपे आपोआपच कमी होतील असें पार्नेल याचें म्हणणें होतें. पार्नेलची सुटका होणें ही एक अट म्हणून जरी या तहांत घातली नव्हती, तरी अशा रीतीनें सलोखा झाल्यानंतर पार्नेल यास तुरुंगांत ठेवणें बरोबर होणार नाहीं असें ग्लॅडस्टनसाहेबांस वाटणेंही स्वाभाविक होतें. हा तह ठरल्यावर पार्नेल याची सुटका करण्याचा ब्रिटिश प्रधानमंडळानें हुकूम सोडला व त्याची सुटका झाली. परंतु ही गोष्ट आयरिश सेक्रेटरी मि. फॉर्स्टर यास पसंत न पडल्यामुळें त्यानें आपल्या प्रधानकीच्या जागेचा राजीनामा दिला. परंतु इतक्या महत्प्रयासानें घडून आलेला हा तह फार दिवस टिकला नाहीं. कारण, तारीख ६ मे रोजीं आयर्लंडचा नवीन मुख्य सेक्रेटरी लॉर्ड फ्रेड्रिक क्याव्हेंडिश व मि. बर्क या गृहस्थांचे, फिनिक्स पार्क नांवाच्या बागेंत सरकारी बंगल्याजवळ दिवसाढवळ्या कोणीं दुष्टांनीं सुऱ्या चालवून खून केले व या खुनांनीं सर्व इंग्लंडभर क्रोधाची आग इतकी जबरदस्त उठली कीं, तिच्या ज्वालांनीं व धुरानें शत्रू, मित्र यांचीं मनें धुंद होऊन जाऊन प्रगतीचा मार्ग एकदम खुंटला. वास्तविक या क्षणीं पार्नेल याच्या सुयशाचा कळस झाला होता. कारण, आपल्या चळवळीच्या सामर्थ्यानें त्यानें मुख्य प्रधानाचें धोरण सर्वस्वी बदलून टाकलें होतें, आयरिश लोकांस खुष करण्याकरितां प्रधानमंडळाला आपल्यापैकीं एक मोहरा खर्ची घालणें भाग पडलें होतें, व प्रगतीचा मार्ग किंचित उजळला होता. या स्थितीचा फायदा शांतता टिकती तर पार्नेल यास चांगलाच घ्यावयास सांपडला असता, परंतु पार्नेलच्या सिद्धिरूपी अमृताच्या पेल्यांत अगदीं आयत्या वेळीं अशा रीतीनें विष कालविलें गेलें. बेजबाबदार माथेफिरू लोकांनीं क्याव्हेंडिश व बर्क यांजवर खरा घाला घातला नसून तो आपल्यावर घातला गेला, असें वाटून त्याच्या मनास फार मोठा धक्का बसला. या खुनानें आपण रचलेली सर्व इमारत ढांसळून जाणार, असें त्यास वाटलें. अशा अघटित घटना दैव घडवून आणूं लागलें तर मनुष्य-

प्रयत्न कोठवर सुरळीत चालणार ? पुढाऱ्यांनीं हरप्रयत्नानीं एक पाऊल पुढें टाकावें, तर अनुयायी म्हणविणाऱ्या भलत्याच लोकांनीं दुसरें पाऊल मागें ओढावें ! तस्मात् हें पुढारीपणही नको व ही सार्वजनिक चळवळही नको, ही सोडून देऊन घरीं जाऊन स्वस्थ बसावें असें वाटण्याइतकें वैराग्य त्यास एकदम आलें. व ग्लॅडस्टनसाहेबास पत्र लिहून त्यानें असें कळविलें कीं, मला सार्वजनिक कामाचा वीट आलेला आहे व पार्लमेंटमधील आयरिश सभासदांच्या पुढारीपणाचा राजीनामा देण्याचें मीं योजिलें आहे. परंतु ग्लॅडस्टन, चेंबरलेन वगैरे गृहस्थांनीं त्यास सहानुभूतिपूर्वक असें कळविलें कीं अशा वेळीं राजीनामा देणें युक्त नाहीं; कारण त्यापासून गैरसमज मात्र होण्यासारखा आहे. सबब राजीनाम्याचा बेत रहित करावा.

तारीख ६ मे रोजीं पार्नेल, डिलन व डेव्हिट या तिघांनीं आपल्या सहीनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो एकंदर आयरिश लोकांस उद्देशून लिहिलेला होता. त्यामध्यें खुनांचा अत्यंत तिरस्कारपूर्वक निषेध करून असें म्हटलें होतें कीं, ' गेल्या पांचपन्नास वर्षांत आयर्लंडमध्यें सामाजिक व राजकीय अस्वस्थता जरी माजलेली होती, तरी असला नीच प्रकारचा गुन्हा कोणींही केला नव्हता. गुन्हेगारांचा पत्ता लागून त्यांस कडक शासन होईपर्यंत एकंदर आयरिश लोकांच्या तोंडास लागलेला काळिमा कशानेंही पुसला जाणार नाहीं.' ता. ८ मे रोजीं पार्नेल पार्लमेंट सभेमध्यें आला त्यावेळीं तो अत्यंत खिन्न, उदास व निस्तेज असा दिसत होता. त्यानें लहानसें भाषण करून खुनाचा निषेध तर केलाच; परंतु असेंही प्रांजलपणें बोलून दाखविलें कीं, अशा गुन्ह्यांच्या योगानें अधिकाऱ्यांस जर सक्तीचे उपाय योजावे लागले तर त्यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं. खुनांच्या योगानें ग्लॅडस्टन व पार्नेल या दोघांसही खालीं पहावें लागलें. फॉर्स्टर यास आपला माथा उजळ झाला असें वाटलें व लॉर्ड कूपर यास दडपशाहीचें धोरण सुरू करणें सुलभ झालें. सर वुइल्यम हारकोर्ट यानें राजकीय गुन्ह्याबाबतचा एक नवीन कायदा पार्लमेंटपुढें आणला. परंतु

त्यांतील कांहीं कलमें अन्यायमूलक असल्यामुळें आयरिश सभासदांनीं तें बिल पास होण्याचे कामीं अडवणुकीची शिकस्त केली. कित्येक रात्रीच्या रात्रीं वाद-विवादांत खर्ची पडल्या; व अठरा आयरिश सभासदांना पार्लमेंटची शिस्त मोडण्याच्या गुन्ह्याबद्दल अध्यक्षानें ' सस्पेंड ' केलें. तथापि ग्लॅड्स्टन यानें मोठ्या धैर्यानें अशा स्थितींतही शेतकऱ्यांच्या खाराबाकीच्या फेडीसंबंधाचें बिल पुढें आणलें व अखेर तें जुलई महिन्यांत पासही झालें ! तथापि पार्नेलच्या मनावरचा खुनाचा परिणाम अद्यापि कमी झाला नव्हता; व आयर्लंडांत परत येतांच राजकीय चळवळ कांहीं दिवस तरी बंद करण्याची ही वेळ आहे, असा आपल्या अनुयायांस त्यानें आग्रहानें उपदेश केला. हा त्याचा उपदेश त्याच्या सहकारी लोकांस पसंत पडला नाहीं कित्येक लोक त्यास ' आतां हा मवाळ बनला—याचें अवतारकृत्य संपलें—हा जळता निखारा पिचून याची राख झाली—यापुढें दुसरा एखादा जहाल पुढारी पाहिला पाहिजे ' असें म्हणूं लागले. कित्येक फीनियन लोक तर त्याच्या शांततेच्या धोरणास कंटाळून अमेरिकेंत निघून गेले. तथापि पार्नेल याचा अगदींच स्वस्थ बसण्याचा विचार नव्हता. जमिनीबाबतची चळवळ कांहीं दिवस थांबवून तिच्या ऐवजीं राष्ट्रीय स्वातंत्र्याची अर्थात् होमरूलची चळवळ फिरून सुरू करावी असें त्यानें योजिलें. ता. १६ आगस्ट रोजीं डब्लिन येथील म्युनिसिपालिटीनें त्यास नागरिकत्वाचे हक्क नजर केले, त्या वेळीं आपली योजना लोकांपुढें उघड रीतीनें त्यानें मांडली. ही योजना सफल करण्याकरितां ता. १७ आक्टोबर १८८२ रोजीं नॅशनल लीग (राष्ट्रीय मंडळ) नांवाची संस्था स्थापण्यांत आली. स्वतंत्र पार्लमेंट व जमिनीची मालकी हें या संस्थेचें साध्य व सनदशीर राजकीय चळवळ हें तिचें साधन, असें यथा-विधिपूर्वक प्रसिद्ध करण्यांत आलें. इंग्रज लोक काय म्हणतील याबद्दल त्यानें केव्हांही फिकीर केली नाहीं; परंतु राजकीय चळवळींत पुढाऱ्याचें काम बेजबाब-दार अनुयायांनीं आपल्या हातीं घेतलें म्हणजे मात्र घडगत नाहीं असें तो

म्हणे. परंतु डिलिट व डेव्हिट हे दोघेही यावेळीं पार्नेलपेक्षां अधिक जहाल होते; व पार्नेलनें अशा वेळीं चळवळीच्या यंत्राचा वेग कमी केला ही गोष्ट त्यांस आवडली नाहीं. १८८२ सालापासून पुढें त्याचें व आत्यंतिक जहाल लोकांचें याच कारणावरून मधून मधून भांडण होऊं लागलें. तो लिबरल पक्षाच्या कह्यांत गेला, असल्या प्रकारचा आरोप त्याजवर आणणें शक्य नव्हतें; तसेंच त्याच्या पाठीवर हात फिरवून व त्याला गोंजारून त्याच्या अंगावरचे कांटे काढून टाकण्यास व अशा रीतीनें त्याला निरुपद्रवी करण्यास मी समर्थ होईन असें कोणाचे स्वप्नींही येत नव्हतें; तथापि गाणाऱ्याला अगर वक्त्याला ज्याप्रमाणें आपल्या स्वरांत चढउतार करावा लागतो, त्याचप्रमाणें राजकीय पुढाऱ्यांसही वेळवखत पाहून चळवळीच्या यंत्राची गति कमजास्त करावी लागते, ही गोष्ट अदूरदर्शी अनुयायांच्या लक्षांत न आल्यामुळें ते पुढाऱ्यांस नांवें ठेवतात, तोच प्रकार पार्नेलचाही झाला.

पार्लमेंट सभेमध्यें फॉर्स्टरप्रभृति लोकांनीं पार्नेलवर उघड व आडून वृथा-रोपाच्या बऱ्याच गोळ्या झाडल्या. परंतु या आरोपास त्यानें तुच्छ लेखिलें व त्यास उत्तर देण्याच्या भानगडींत तो फारसा पडला नाहीं. किंबहुना असें म्हणतां येईल कीं, वर सांगितलेल्या जाहिरनाम्यामध्यें थोडक्याच परंतु शेलक्या व सणसणीत शब्दांनीं अत्याचारांचा जो निषेध केला होता, त्याखेरीज भाष-णानें अगर लेखनानें निषेधाची भर घालण्याचे भरीस तो पडला नाहीं. अत्याचारांचा निषेध व्यक्त करणें हें जरी राजकीय पुढाऱ्यांचें कर्तव्य असलें तरी उठल्या सुटल्या तेंच रडगाणें दिवसभर त्यांनीं गात बसावें हें त्यास पसंत नव्हतें. देशांत शांतता राखणें अगर गुन्ह्यांचा निरोध करणे हें सरकारचें काम आहे व त्या बाबतींत लोकांची अपेक्षा कांहीं मर्यादेपलीकडे सरकारनें करणें अगर तें करीत नाहींत म्हणून लोकांस नांवें ठेवणें हें योग्य नाहीं असें त्याचें मत होतें. असो; पार्लमेंटमधील एकतर्फी वादविवादावरच सर्व थांबलें. पुढील सालीं पार्लमेंटच्या निवडणुकीचे व इतर खर्च भागविण्याकरितां आय-

रिश लोकांनीं वर्गणी करून ३० हजार पौंडांची थैली पार्नेल यास नजर केली व अशा रीतीनें पुढारी या नात्यानें त्यानें केलेल्या कामाबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. सन १८८५ सालीं आयरिश मतदारांकडून नवीन निवडणुकीमध्यें होमरूलला अनुकूल असे जावयाचे तितके सभासद निवडून दिले गेले. परंतु पार्लमेंटमध्यें टोरीपक्षाचें बहुमत झालें ही गोष्ट आयर्लंडास एका प्रकारें फायद्याचीच झाली. कारण त्यास विरोधी असे ग्लॅडस्टन, चर्चिल व चेंबरलेन वगैरे पुढारी असून त्यांच्या हातून आयरिश राष्ट्रीय पक्षास फायदेशीर अशीं कामें चुरशीनें घडून येण्याचा संभव होता व ही गोष्ट लवकरच प्रत्ययास-ही आली. ही स्थिति लक्षांत घेऊन लिबरल पक्षाच्या मदतीनें टोरी प्रधान मंडळास त्रास देण्यास पार्नेल यानें सुरुवात केली. या सुमारास टोरी व लिब-रल हे पक्ष जवळजवळ समबल असून आयरिश पक्षाचें वजन ज्या पारड्यांत पडेल तें पारडें जड व्हावयाचें अशी वस्तुस्थिति असल्यामुळें, आळीपाळीनें प्रत्येक पक्षास मदत करून चढउताराची लीला करण्यांत पार्नेल यास मौज वाटे व त्यांत त्याच्या राष्ट्राचा फायदाही होई. सन १८८५ मध्यें अधिकारा-रूढ झालेल्या टोरी प्रधानमंडळानें आयरिशपक्षाचे उपकार स्मरून दडपशाही-च्या कायद्यांची वार्षिक पुनरावृत्ति केली नाहीं. हा फायदा पदरांत पाडल्या-नंतर लॉर्ड कार्नेरव्हॉन यांचेमार्फत होमरूलासंबंधाची वाटाघाट लिबरपक्षाशीं करण्यास त्यानें सुरुवात केली. लवकरच पार्लमेंटरी निवडणुकीची फिरून तयारी झाली व मतदारांस उद्देशून लिबरल मुत्सद्यांनीं व विशेषत: ग्लॅडस्टन-साहेबांनीं जे जाहिरनामे प्रसिद्ध केले त्यांजवरून होमरूलचा प्रश्न पार्लमेंटपुढें लवकरच येणार असें उघड दिसूं लागलें. सदर निवडणुकींत ३३५ लिबरल व २४९ कान्झर्व्हेटिव असे सभासद निवडून आले. अर्थात् ग्लॅडस्टनसाहे-बांच्या पक्षास ८६ मतें म्हणजे सभासद अधिक होते. परंतु याच निवडणुकींत १०३ आयरिश सभासदांपैकीं ८५ होमरूल पक्षाचे व एकजुटीनें काम कर-णारे असल्यामुळें पार्नेल हा ज्या पक्षास मिळेल त्याचीच सरशी होणार हें

उघड होतें. अर्थात् लिबरल पक्षास मिळालेली सत्ता गमवावयाची नसेल तर त्यांनीं होमरूलच्या प्रश्नाचें समर्थन केलें पाहिजे याशिवाय गत्यंतर नव्हतें व अखेर १८८६ सालीं एप्रिलच्या ८ व्या तारखेस ग्लॅडस्टनसाहेबांनीं होमरूल बिल पुढें आणिलें. परंतु पार्नेलच्या मार्गांत अनपेक्षित अशी एक अडचण आली. कित्येक लिबरल मुत्सद्यांस होमरूलचा प्रश्न इतका अप्रिय झाला कीं, लिबरल प्रधानमंडळ फिरून स्थानभ्रष्ट झालें तरी बेहेत्तर आहे, परंतु आयर्लंडला स्वतंत्र पार्लमेंट म्हणून द्यावयाचें नाहीं असा निश्चय त्यांनीं केल्यामुळें लिबरल पक्षांत फूट झाली व तारीख ७ जून रोजीं ३१३ विरुद्ध ३४३ मतें पडून होमरूल बिल नापसंत झालें. लिबरल प्रधानमंडळानें राजीनामा दिला व फिरून निवडणुकीची धामधूम सुरू झाली. या पराभवामुळें पार्नेलच्या मनांत अत्यंत खिन्नता आली. तथापि एकंदर लोकमताच्या दृष्टीनें झालें इतकेंही कार्य कांहीं थोडें नाहीं व यापूर्वीं ८० वर्षेपर्यंत आयरिश पुढाऱ्यांच्या हातून जितकी कामगिरी झाली नव्हती तितकी एकट्या पार्नेलनें १० वर्षांत केली असें शत्रु व मित्र हे दोघेही म्हणूं लागले. नवीन निवडणुकींत होमरूल पक्षास अनुकूल असे ८५ सभासद फिरून निवडून देण्यांत आले आणि नवीन पार्लमेंट सभेंत जमिनीचा व होमरूलाचा असे दोन्ही प्रश्न फिरून वादविवादासाठीं आणण्याची तयारी झाली. जमिनीसंबंधाचें पार्नेलनें आणलेलें बिल पार्लमेंटनें नापास केल्यामुळें स्वत: पार्नेल जरी फारसा अनुकूल नव्हता तरी विलियम ओब्रायन वगैरे तरुण पुढाऱ्यांनीं फिरून चळवळ सुरू केली. दुर्दैवानें त्याच सालीं धान्य स्वस्त झाल्यामुळें शेतकरी लोकांचा तोटा होऊन किरकोळ दंग्याधोप्यास फिरून सुरुवात झाली; परंतु मुख्य चळवळीला जोर राहिला नाहीं.

सन १८८७ सालीं पार्नेलची मान्यता वाढण्यास एक बाह्य आगंतुक कारण उत्पन्न झालें. लंडन टाईम्स हें प्रमुख वर्तमानपत्र पार्नेलचें पहिल्यापासून हितशत्रुत्व करीत होतें. हें शत्रुत्व साधण्याची मुख्य विद्या अशी होती

कीं, देशांत घडणारे अत्याचार व देशांतील राजकीय पुढारी यांचा संबंध आहे असें हरप्रयत्नानें दाखवावयाचें. टाईम्सचें धोरण असें असल्यामुळें त्याचा फायदा घेऊन पार्नेलवर सूड उगवावा व आपलीही तुंबडी भरावी, अशा दुहेरी हेतूनें पिगट नांवाच्या एका देशद्रोही अधमानें कांहीं बनावट पत्रें तयार केलीं. त्यांतील एक दोन पत्रांवर पार्नेलच्या खोट्या सह्या बनवून, फिनिक्स पार्कमध्यें झालेले खून त्यास मनांतून पसंत होते असें सिद्ध करण्यासारखा मजकूर त्यांत लिहिलेला होता. हीं पत्रें हातोहात लांबतां लांबतां आपणास अमेरिकेंत महत्प्रयासानें मिळालीं असें पिगट यानें टाईम्सच्या व्यवस्थापकास भासवून या बनावट पत्रांचें मूल्य वाढविलें व अखेर ८५० पौंडास तीं त्यास विकलीं. असलें अमोघ शस्त्र हातीं येतांच त्याचा पार्नेलवर उपयोग टाईम्स पत्रानें मोठ्या आढ्यतेनें केला. पार्नेलचीं खुद्द स्वदस्तुरचीं पत्रें प्रसिद्ध झाल्यामुळें अत्याचारी लोकांस तो सहाय्य करितो हा जो त्याच्यावर आक्षेप होता, त्याच्या पुराव्याचें माप त्याच्या पदरांत बिनतोड बांधलें गेलें. असें झाल्यानें सर्व देशभर एकच चळवळ उडून गेली. या बनावट पत्रांपैकीं एकांतील मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

“ विनंति विशेष—आपले स्नेही रागावले याचें मला कांहीं आश्चर्य वाटत नाहीं; परंतु ते काय व तुम्ही काय दोघांनींही हें ध्यानांत आणिलें पाहिजे कीं, खुनांचा उघड निषेध करण्याखेरीज मला दुसरा मार्गच नव्हता. खुनांचा निषेध तात्काळ करणेंच त्या वेळीं खरें शहाणपण होतें, हें अगदीं उघड आहे. परंतु मी तुम्हांस असें सांगतों कीं, लॉर्ड क्याव्हेंडिश यांना जो विनाकारण अपघात झाला, त्याजबद्दल जरी मला खेद होतो, तरी बर्क यास मात्र झालें तें शासन यथायोग्य झालें; त्यांत कांहींएक वावगें झालें नाहीं असें माझें मत आहे व माझें हें असें मत असल्याबद्दल ज्यांना ज्यांना म्हणून कळविण्याचें अगत्य असेल त्यांस तुम्ही खुशाल कळवा. आणि तसेंच जे तुमच्या विश्वासांतले असतील, त्यांना खुशाल दाखवा, त्यास

माझी कांहीं हरकत नाहीं. तथापि, माझा पत्ता मात्र कोणासच कळूं देऊं नका. आपला

चार्लस स्टुअर्ट पार्नेल ''

हें पत्र तारीख १८ एप्रिल रोजीं प्रसिद्ध झालें, व त्या एका पत्रानें सर्व होमरूलच्या चळवळीचें कांडात काढलें असें जो तो म्हणूं लागला. त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत पार्नेलला त्या पत्राची बातमीच समजली नव्हती. संध्याकाळीं पार्लमेंटमध्यें गेल्यावर त्यानें तें पत्र पाहिलें, व लगेच हें पत्र निखालस बनावट आहे व हें अगर अशा अर्थाचें दुसरें एखादें पत्र मीं केव्हांही कोणास लिहिलेलें नाहीं, असें गंभीर शब्दांनीं त्यानें जाहीर केलें. पार्नेलच्या शत्रूसही हें त्याचें विधान निव्वळ खोटें असें मानण्याची छाती नस-ल्यामुळें सकाळीं पत्र प्रसिद्ध झाल्यापासून त्यास प्रतिकूल अशी जी मानसिक क्रिया लोकांमध्यें सुरू झाली होती, तिला पार्नेलच्या तोंडच्या या उत्तरानें एकदम आळा बसला व प्रतिक्रियाही सुरू झाली. तथापि पार्नेल व टाईम्स या दोघांचीही इभ्रत सारखीच असल्यामुळें या दोहोंतून कोणी तरी खोटा असें सप्रमाण शाबित झाल्याशिवाय या कोड्याचा उलगडा होणें शक्य नाहीं, हें उघड होतें. हें कोडें कसें उलगडणार व या दोन महारथ्यांपैकीं कोण पडणार याकडे सर्व लोकांचे डोळे लागून राहिले. तथापि पुढें पाऊल कोणच्या रीतीनें टाकावें याचा निर्णय लवकर होईना, यामुळें सुमारें तीन महिनेपर्यंत विशेष म्हणण्यासारखें कांहीं एक घडून आलें नाहीं. परंतु ओडॉ-नेल या नांवाच्या एका आयरिश सभासदानें टाईम्सविरुद्ध केलेल्या अब्रु-नुकसानीच्या फिर्यादीच्या कामीं सरकारी वकील सर रिचर्ड वेबस्टर यांनीं फिरून पार्नेलवर जुने आरोप आणले व आयरिश पुढारी लोक अत्याचारास मदत करतात असा उघड सवाल टाकला. त्यावरून आतां अधिक उपेक्षा करितां कामा नये असा पार्नेल यानें निश्चय करून पार्लमेंट सभेनें पोटकमिटी नेमून माझ्यावरील आरोपांची चौकशी करावी, अशी उघड मागणी केली. परंतु

पोटकमिटीचे ऐवजीं तीन न्यायाधीशांचें स्वतंत्र कमिशन नेमण्याचें सभेनें ठरविलें व त्याकडे एकंदर राजकीय चळवळ व अत्याचार यांचा संबंध कितपत सिद्ध करितां येतो हें पुराव्यानें ठरविण्याचें काम दिलें.

बाकीच्या आरोपांबद्दल पार्नेल यानें फारशी फिकिर केली नाहीं. ते शाबीद झाले काय किंवा नाशाबीद झाले काय, त्याची त्यानें फारशी पर्वा केली नाहीं. परंतु वर दिलेल्या पत्रासंबंधानें मात्र त्याच्या मनाला अत्यंत रुखरुख लागली होती व हा बनावट कागद करणारा गुन्हेगार कसा सांपडेल, या गोष्टीकडे त्याचें सर्व लक्ष लागून राहिलें होतें. पत्रांत कांहीं अक्षरें पार्नेलच्या हस्ताक्षराहून अगदीं निराळ्या वळणाचीं होतीं व एक दोन शब्द तर अगदीं अशुद्ध लिहिलेले होते. ह्या गोष्टीवरून गुन्हेगाराचा पत्ता लागावा असा अजमास होता व तोच खरा ठरला. पार्नेलचा सहकारी व लँडलीगचा एक सेक्रेटरी पॅट्रिक ईगन नांवाचा आयरिशमन होता. त्याजजवळ पिगट यानें लिहिलेलीं दुसरीं कांहीं पत्रें होतीं व त्या पत्रांमध्यें नेमक्या वर सांगितलेल्या चुकाच केलेल्या होत्या. या गोष्टीवरून पिगटवरील आपला संशय ईगन यानें पार्नेल व त्याची मित्रमंडळी यांना सांगितला. त्यावरून पिगट यास प्रतिवादीतर्फे साक्षीसमन्स काढण्यांत आलें. तारीख २० फेब्रुवारी १८८९ रोजीं पिगट याची कमिशनपुढें साक्ष झाली. त्या प्रसंगीं पार्नेलचा वकील सर चार्लस रसेल यानें पिगट यास उलट तपासणीमध्यें पापडासारखा भाजून काढिला. आपण हीं पत्रें बनावट केलीं ही गोष्ट स्पष्ट नाहीं तरी पर्यायशब्दानें त्यास कबूल करावी लागली व पिंजर्‍यांतून खालीं उतरतांना त्याचा निस्तेज व घामानें डबडबलेला चेहरा पाहतांच कोर्टांतील प्रत्येक मनुष्यानें खटल्याचा निकाल आपल्या मनाशीं दिला. त्या दिवसापासून पुढें खटला ऐकण्यास कोर्टांत गर्दी व्हावयाची तीही होईनाशी झाली. तारीख २६ फेब्रुवारी रोजीं कोर्टांत हजर राहण्याची त्यास ताकीद होती, परंतु तो हजर झाला नाहीं. त्याचा लेखी कबुलीजबाब मात्र कोर्टांत दाखल झाला; अर्थातच टाईम्सला सदरहु पत्रें बनावट

आहेत असें कबूल करून आपले आरोप परत घ्यावे लागले. पिगट याजवर खोटे कागदपत्र केल्याबद्दल वारंट सोडण्यांत आलें. परंतु पॅरिस येथील एका खाणावळींत तो रहात होता, त्या ठिकाणीं वारंट घेऊन त्रेलिफ जाऊन धडकतांच कपडे करण्याच्या मिषानें तो आपल्या खोलींत गेला व पिस्तुलानें आपल्या डोक्यांत गोळी घालून त्यानें आत्महत्या केली. पिगट याचा सर्व जन्मच देशद्रोही व इतर अनेक प्रकारचीं अधम कृत्यें करण्यांत गेलेला असून लोकांस धमकी देऊन पैसे उकळण्याचा धंदा त्यानें जन्मभर केलेला होता. तेव्हां त्याला असें मरण आलें तें यथायोग्यच आलें; परंतु राजकीय पुढाऱ्यांवर कोणीकडून तरी गदा आणण्याची सरकारी अधिकाऱ्यांची इच्छा प्रकट होतांच देशद्रोही लोकांची पोळी कशी पिकते, चांडाळ ग्रामकंटकांस पोटापाण्याचा एक नवीन धंदा कसा उत्पन्न होतो, विशेषतः शहाणेसुरते लोकही विकारवश होऊन आपल्या शहाणपणाचें गाठोडें अशा अधमांचे हातीं देण्यास कसे तयार होतात, हें पिगटच्या या हकीकतीवरून लक्षांत येण्यासारखें आहे. दुष्ट कृत्यें करून मनुष्य ज्या प्रकारचें अजरामरत्व मिळवितो तें पिगट यास खचित मिळालेलें आहे.

तारीख १३ फेब्रुवारी १८९० रोजीं कमिशननें आपला रिपोर्ट सादर केला. त्यांत चळवळीसंबंधाचे किरकोळ आरोप शाबीद धरले होते; परंतु ‘ फिनिक्सपार्कमध्यें व इतर ठिकाणीं झालेल्या अत्याचाराशीं पार्नेल वगैरे मंडळींचा आंतून संबंध होता व अत्याचारी लोकांस लॅन्डलीगच्या व इतर सार्वजनिक फंडांतून पैशाची मदत ते करीत, ’ असा जो मुख्य आरोप होता, तो कमिशननें सर्वस्वी नाशाबित ठरविला. तथापि, हा निकाल रीतसर प्रसिद्ध होण्यापूर्वींपासूनच पार्नेलवर चोहोकडून अभिनंदनाचा वर्षाव होऊं लागला होता. मोठ्यामोठ्या मेजवान्यांचे प्रसंगीं त्यास आमंत्रणें येऊं लागलेलीं असून इंग्रजसमाज व लिबरल पक्षाचे मोठमोठे मुत्सद्दी यांजकडून त्याचा गौरव होऊं लागला. अशा रीतीनें सुमारें १५ वर्षांच्या कारकीर्दीत राजकीय पुढारी या नात्यानें त्यानें जी कामगिरी केली तिच्या योगानें मिळा-

लेल्या किर्तीच्या सोपानपरंपरेनें तो शत्रु व मित्र यांच्या मनांत मान्यतेच्या शिखरास जाऊन पोहोंचला.

मात्र त्याच्या यशाचा हा कळसच झाला. कारण, लवकरच या यशाचें न्हासास सुरुवात झाली. यापुढील त्याच्या मृत्यूपर्यंतचा काळ जरी अवघा दोन वर्षांचा होता, तरी तो फार त्रासांत व दुःखांत गेला. कारण, ता. २४ डिसेंबर १८८९ रोजीं कॅप्टन ओशिया नामक आयरिश सभासदानें आपल्या बायकोवर घटस्फोटाचा दावा कोर्टांत आणून त्यामध्यें पार्नेल यास प्रतिवादी केलें होतें. अर्थात् पिगटच्या साक्षीनंतर लोकमताचा प्रवाह त्याला अनुकूल अशा दिशेनें जितक्या जोरानें वाहूं लागला होता तितक्याच जोरानें त्यानें आतां उलट खाली व खोट्या राजकीय आरोपामुळें सहानुभूतीचें जें माप पार्नेलच्या पदरीं पडलें होतें तें सव्याज सव्वापटीनें आतां परत मिळणार हें पाहून त्याच्या शत्रूस आनंद झाला. सदरहू नवीन दाव्यांतही पार्नेल आपल्या बचावाचा प्रयत्न करील, अशी लोकांची अर्थातच अपेक्षा होती; परंतु त्यानें या कामीं अखेरपर्यंत मौन स्वीकारलें व कोर्टानें वादीचा दावा देवविला. तेव्हां लोक आश्चर्यचकित झाले. त्या तारखेपासून त्याच्या प्रत्येक हितशत्रूनें आपल्याला उचलवेल तेवढा मोठा दगड घेऊन त्याजवर टाकण्यास सुरुवात केली. जिकडून तिकडून पार्नेल यानें आयरिश पक्षाच्या पुढारीपणाचा राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यांत येऊं लागली व होमरूल पक्षाचा पुढारी या नात्यानें त्याच्याशीं संसर्ग ठेवणें म्हणजे होमरूलच्या पवित्र कार्यास अपाय करण्यासारखें आहे असे मानभावी लोक दिमाखानें म्हणूं लागले. या बाबतींत कित्येक पापभीरु लोकांच्या शंका खऱ्या मनानें घेतलेल्या होत्या व अशा लोकांमध्ये ग्लॅड्स्टन हा प्रमुख होता. खासगी व सार्वजनिक वर्तनाचा संबंध जोडण्यास कांहीं नियमित मर्यादा अर्थात असलीच पाहिजे; परंतु होमरूलसारख्या महत्त्वाच्या प्रश्नाचा व पार्नेलसारख्या प्रमुख पुढाऱ्याचा लोकांच्या डोळ्यांवर येणारा हितसंबंध गुंतला गेल्यामुळें या प्रसंगीं ही मर्यादा ठरविणें स्वाभाविक-

पणें कठिण तर होतेंच; परंतु होमरूलच्या सर्व प्रकारच्या शत्रूंनीं हा प्रसंग साधून एकदिलानें लगट केली व ग्लॅड्स्टनसारखा सच्छील व पापभीरु मनुष्य त्याच्या हातीं मिळाल्यामुळें पार्नेल व त्याचबरोबर होमरूल दोन्ही रसातळास पोहोंचविण्याचें त्यांचें काम सोपें झालें. पार्नेल याच्या मनांत पुढारीपणाचा राजीनामा द्यावयाचें नव्हतें. त्यास तो तीन मुख्य कारणें सांगे. आजपर्यंत त्यानें देशाची जी चाकरी केली, ती लक्षांत घेतली असतां लोकांनीं होऊन त्यास राजीनामा देण्यास सांगणें योग्य नव्हतें. कारण, राजकीय बाबतींत सारासार विचाराची पात्रता त्याजमध्यें अद्यापि होती, असें गृहित धरून चालणें जरूर होतें. दुसरें कारण असें कीं, पार्नेलनें राजीनामा द्यावा असें इंग्रज म्हणत होते, त्याचा अनुवाद आयरिश लोकांनीं करणें हें कमकुवतपणाचें लक्षण होतें. इंग्रजांना काय ! त्यांचें त्यांत हितच होतें. आयरिश लोकांनीं मात्र आपल्या घरचा विचार आपण नीट करावयास पाहिजे होता. तिसरें कारण असें कीं, होमरूलची चळवळ इतक्या आणीबाणीला येऊन पोहोंचलेली असल्यामुळें तिच्या चालकाचें काम अशा वेळीं एकाकडून काढून दुसऱ्यास देणें ही गोष्ट त्या चळवळीला अहिताची होती. परंतु या युक्तिवादांत खरोखर सत्य कितपत होतें व तो पार्नेलच्या आत्महितबुद्धीनें कितपत दूषित झाला होता, हें ठरविणें या वेळीं कठिण होतें. कसेंही असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, या मुद्यावर त्याच्या अनुयायांमध्येंच दोन तट झाले. घटस्फोटाच्या दाव्याचा निकाल लागल्याबरोबर त्याच्या अनुयायांचा पहिला विचार त्याला पदभ्रष्ट करूं नये असाच होता. डिलन, ओब्रायन, ओकॉनर, मॅकार्थी, हीली वगैरे सर्व दुय्यम प्रतीचे पुढारी वरील मताचे होते. परंतु लवकरच आयर्लंड व इंग्लंड या दोन्ही देशांत सद्धर्मशीलतेकरितां प्रसिद्ध असलेल्या बऱ्याच लोकांनीं उचल केली व जॉन मोर्ले वगैरे लोकांमार्फत ग्लॅडस्टन याचें मन वळविण्याची व पार्नेल यास पदभ्रष्ट करण्याचे कामीं त्याचेकडून पुढाकार घेण्याविषयीं खट-

पट त्यांनीं केली व ती सिद्धीसही गेली. ग्लॅडस्टन यानें प्रथम खासगी रीतीनें खटपट करून पाहिली; परंतु तिचा उपयोग होत नाहीं असें पाहिल्यावर त्यानें आपल्या सहीवर स्टँडर्ड पत्रामध्यें एक पत्र प्रसिद्ध केलें. या पत्रानें आयरिश लोकांच्या मनावर विलक्षण परिणाम होऊन कच्चया मनाच्या पुष्कळ लोकांनीं पगडी फिरविली. यामुळें भांडण विकोपास गेलें. ग्लॅडस्टनच्या पत्रास पार्नेल यानें ता. २९ नोव्हेंबर रोजीं एक लांबलचक व जळजळीत उत्तर लिहिलें. परंतु वास्तविक पाहतां ' शेषं कोपेन पूरयेत् ' या वचनाप्रमाणें वादाचा मुख्य मुद्दा सोडून तो ग्लॅडस्टनवर व लिबरल पक्षावर विनाकारण घसरला. त्याचा परिणाम असा झाला कीं, ता. १ डिसेंबर रोजीं पार्लमेंटच्या इमारतींतील एका बाजूस दालनांत आयरिश सभासदांची एक सभा मुद्दाम भरविण्यांत आली. अध्यक्षस्थानीं पार्नेल याचीच योजना झालेली होती. एका सभासदानें ' पार्नेलच्या पुढारीपणाची मुदत संपली ' असा ठराव पुढें आणला, परंतु कांहीं औपचारिक सबबीवर पार्नेलनें तो लाथाडून टाकिला. नंतर वादग्रस्त गोष्टीचा विचार डब्लिन येथें सभा भरवून करावा, अशी सूचना आली, तीही बहुमतानें नामंजूर झाली व अखेर ' पार्नेल यास पदभ्रष्ट केल्यामुळें ग्लॅडस्टन हा आयरिश लोकांस देणार तरी काय ? हें शक्य असेल तर नक्की करावें आणि मग पार्नेलच्या पुढारीपणाचा प्रश्न फिरून वादास काढावा, ' असें ठरलें. परंतु वादामध्यें दिशाभूल करण्याची ही एक युक्ति होती, इतकेंच काय तें. कारण, होमरूलसंबंधानें यापुढें आपले बेत अमुकच आहेत, ही गोष्ट ग्लॅडस्टनसाहेब उगाच वाटेच्या वाटसराला सांगावयास तयार होतील, हें शक्य नव्हतें. व कोणीकडून तरी खुंटीस गवाळें अडकवून द्यावें एवढाच पार्नेलयाचा हेतु होता व तो कांहीं अंशानें सिद्धही झाला. कारण, ठरल्याप्रमाणें ग्लॅड्स्टन याचें मत समजून घेण्याकरितां त्याजकडे एक डेप्युटेशनही पाठविण्यांत आलें; परंतु नवीन होमरूल बिल पुढें आणण्याची वेळ आली असतां त्यांतील कलमें योग्य वेळीं तुम्हांस कळविण्यांत येतीलच, असें मोघम आश्वासन त्यानें दिलें. नंतर वाद-

प्रस्त प्रश्नाचा विचार करण्याकरितां आयरिश सभासदांची सभा पुन्हां भरविण्यांत आली; परंतु तींत तंटे होऊन जस्टिन मॅकार्थी व त्याजबरोबर आणखी २६ सभासद सभा सोडून निघून गेले. अशा रीतीनें पार्नेलचा जय झाला; परंतु या जयानें वादाचा खरा निकाल लागण्यासारखा नव्हता. व ज्या घातक अंत:कलहप्रियतेविषयीं आयरिश लोकांची ख्याति आहे, ती सर्व आर्लंडभर यापुढें दिसून येऊं लागली. डेव्हिट, डिलन वगैरे लोकांनीं यापूर्वींच पार्नेलचा पुढारीपणा झुगारून दिलेला होता. ज्या ज्या लोकांच्या मनांत पार्नेलविषयीं यत्किंचितही द्वेषबुद्धि होती, त्यांनीं या वेळीं आपला डाव साधून घेतला. आयर्लंडमध्यें त्यास तरुण फीनियन लोकांचा मात्र आधार होता; व रेडमंडसारखे कित्येक अनुयायी पार्नेल मरेपर्यंत त्यास सोडण्यास तयार नव्हते. यामुळें दर गांवीं पार्नेलच्या पक्षाचे व त्याच्या विरुद्ध पक्षाचे असे दोन तट होऊन यादवी सुरू झाली. डेव्हिटसारखे स्वत: एकवेळ फीनियन चळवळींत पडलेले लोकही पार्नेल हा फीनियन लोकांस उत्तेजन देतो व त्यांची मदत घेऊन बेबंदशाही माजवितो असा उघड आरोप करूं लागले. कोणाच्या हातांत कोणचा सार्वजनिक फंड आहे, तो कोण कसा खर्चतो व त्यावर ताबा कोणाचा असावा, असले व्यक्तिविषयक नवीन मुद्देही अशा वेळीं पुढें निघावयाचेच, ते निघून भांडणास पुष्टि येऊं लागली. परंतु यापुढें एक वर्षभर अंत:कलहाचा आयर्लंडांत जो बुजबुजाट होऊन गेला, त्याचें आविष्करण करण्यापेक्षां त्याजवर पांघरूण टाकलेलेंच बरें. व्यक्तिविषयक भांडणाची फार मोठी देणगी ईश्वरानें आयरिश लोकांस दिलेली आहे व तिचा उपयोग या वर्ष सव्वा वर्षांत त्यांनीं भरपूर केला एवढें सांगितलें असतां पुरें होईल. या मुदतींत पार्नेल यानें शेकडों ठिकाणीं जाऊन सभांतून व्याख्यानें देऊन व भांडणें भांडून आपली पदभ्रष्टता टाळण्यासाठीं नुसतें जिवाचें रान केलें. परंतु विसकटलेली घडी फिरून बसण्याचा संभव फारच कमी होता. व अशा स्थितींतच त्याचा अंत झाल्यामुळें पुढें होणाऱ्या त्याच्या यातना बऱ्याच टळल्या. दगदगीनें व काळजीनें त्याचे

शरीरावर आधींच परिणाम झालेला होता व तारीख ३१ सप्टेंबर १८९१ रोजीं तो जो अंथरुणास खिळून राहिला तो फिरून उठला नाहीं. तारीख १० आक्टोबर रोजीं त्यास ब्रायटन येथें मृत्यु आला. त्याच्या स्नेह्यांनीं त्याचा देह तारीख ११ आक्टोबर रोजीं आगबोटींत घालून डब्लिन येथें नेला व त्याच दिवशीं प्रसिद्धपणें लाखों लोकांसमक्ष त्याचा दफनविधि करण्यांत आला.

पार्नेलच्या अंगीं असलेल्या मुख्य गुणावगुणांचें दिग्दर्शन वरील हकीकतींत झालेलेंच आहे. तो घरचा जमीनदार व त्याचें घराणें प्रसिद्ध असल्यामुळें सार्वजनिक कामांत त्यानें पडण्याची इच्छा केल्याबरोबर त्यास पार्लमेंटचा सभासद होतां आलें. तरी पण सभासद झाल्यापासून अवघ्या पांच चार वर्षांत तो एकंदर आयरिश पक्षाचा राष्ट्रीय पुढारी कसा झाला ही गोष्ट मात्र सकृद्दर्शनीं आश्चर्य करण्याजोगी आहे. पार्नेल अत्यंत सुबुद्ध होता; तथापि वक्तृत्वगुणाच्या दृष्टीनें पूर्वकालीन पुढारी ओकॉनेल अगर समकालीन पुढारी आयझॅक बट यांच्या पासंगासही तो पुरण्यासारखा नव्हता. विद्वत्ता म्हणावी तर ती त्याचे अंगीं मुळींच नव्हती. कारण त्याचें शिक्षण अपुरें होतें व एरवींही त्यास विद्याव्यासंग असा मुळींच नव्हता. राजकीय पुढाऱ्यास पूर्वकालीन इतिहासाची जी माहिती लागते, तिच्या नांवानें त्याचेजवळ आंवळ्याएवढें पूज्य होतें. असें असतां आयझॅक बटसारख्या पुढाऱ्यास बाजूस सारून त्याला पुढारीपणाची जागा इतक्या लवकर पटकावितां आली, याचें कारण फक्त एकच आहे व तें हें कीं, पार्नेल याजमध्यें नखशिखांत इंग्रज लोकांचा द्वेष भरलेला होता व तो सार्वजनिक कामांत पडला ती वेळ अशीच कांहीं होती कीं, जो कोणी इंग्रजद्वेष्टा असेल त्याच्या म्हणण्यासच लोकांकडून मान मिळणें शक्य होतें. किरकोळ चिल्लर लोकांच्या मनांतही इंग्रजांचा द्वेष पार्नेलप्रमाणेंच होता; परंतु सर्व प्रकारच्या आयरिश राष्ट्रीय चळवळींचें मुख्य स्थान व सर्व व्यक्तींच्या महत्त्वाचें केंद्र म्हटलें म्हणजे पार्लमेंटचें सभागृह हें होतें. अर्थात् ह्या ठिकाणीं जो कोणी हा द्वेष व्यक्त करून दाखविण्याची छाती करील, त्याची पाठ आयरिश

लोकांनीं थोपटली असती हें उघड आहे. इकडे पार्लमेंटच्या चळवळीला आयरिश लोक जरी कंटाळून गेले होते; तरी त्या पार्लमेंटची थट्टा व तिची उघड अवहेलना करणें एवढाच काय तो उपाय त्यांस राहिलेला होता. हा उपाय पार्नेल यास सर्वस्वी संमत होता व त्यानें तो प्रथमत: धाडसानें व चातुर्यानें अमलांत आणला. अशा रीतीनें आपल्याच कामांत गर्क व मग्न असणाऱ्या ब्रिटिश पार्लमेंटचें तोंड त्यानें खेंचून आयर्लंडकडे वळविलें हीच त्याची मुख्य देशसेवा होय. तो पुढें येईपर्यंत ब्रिटिश पार्लमेंटमधील लिबरल व कान्झरव्हेटिव या पक्षांच्या आपमतलबी भांडणाच्या नगाऱ्यापुढें आयरिश सभासदांच्या चळवळीची टिमकी कोणास ऐकूंच जात नसे. हा नगारा कांहीं वेळ बंद पाडून उलट ही टिमकीच त्यानें कांहीं काळपर्यंत जगास ऐकावयास लाविली, ही गोष्ट एका दृष्टीनें पाहतां खरोखरच फार महत्त्वाची होती. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आयरिश सभासद म्हणून कोणी असतात किंवा नसतात, अशी जी अपमानास्पद स्थिति होऊन राहिली होती ती पार्नेल यानें घालविली व आयरिश हिताहिताच्या प्रश्नाविषयीं पार्लमेंटच्या समरभूमीवर तुंबळ रणें माजावीं व प्रधानमंडळें उलथींच्यापालथीं व्हावीं, इतकें महत्त्व पार्नेल यानें त्या प्रश्नास कांहीं काळ आणून दिलें ही गोष्ट खरोखरच कौतुक करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. हें सर्व घडवून आणण्यास पार्लमेंटला तुच्छ लेखणारा, गवगव्याची भीति न बाळगतां उलट तो होईल तितका बराच असें मानणारा, आपल्या सभोंवार आपला द्वेष करणारे व आपल्याविषयीं वाईट मत असणारे शेकडों लोक बसलेले आहेत या जाणीवेच्या योगानें खेदापेक्षां समाधानच अधिक मानणारा व आयरिश सभासदांच्या बाजारबुणग्यावर सेनापतीप्रमाणें करडी हुकमत गाजविणारा असा—एवंगुणविशिष्ट कोणी तरी पुढारी यावेळीं हवा होता व कर्मधर्मसंयोगानें पार्नेल या व्यक्तीमध्यें हे गुण एकवटले होते, हीच कायती त्याच्या सर्व सुयशाची गुरुकिल्ली होय असें म्हणावें लागतें. लोकनायक होण्यास त्याला बऱ्याच गोष्टी अनुकूल होत्या.

कोणतीही गोष्ट त्याच्या लक्षांत चट्दिशीं भरे. परिस्थितीचें मर्म ताडणें व तिला सर्वांत अधिक अनुकूल अशा उपायाची योजना करणें, या कलेंत त्याचा हातखंडाच होता. फार बोलण्याचा त्यास कंटाळा असे, यामुळें अर्थात् तो जे थोडे शब्द बोले त्यांत कांहीं विशेष व अनिर्वाच्य महत्त्व आहे, असें मानण्याची संवय त्यानें लोकांस लाविली होती. त्याचे स्वतःचे विचार ठरेपर्यंत ते कोणास कळत नसत, पण तोंडांतून ते बाहेर पडले म्हणजे ते वज्रलेप होत. पार्नेल याचें मन वळविण्याचा असा प्रयत्न कोणी करीत नसे व केल्यास तो फारसा कोणास साधत नसे. केवळ स्वतःच्या सारासार बुद्धीनें इतराच्या मतांस तो जो काय मान देईल तेवढाच मिळावयाचा. त्यानें नेहमीं लोकांस हुकूम करावा, त्याला हुकूम करण्याची महत्त्वाकांक्षा कोणीं बाळगूं नये, अशी स्थिति त्यानें लवकरच करून सोडली. पार्लमेंटमध्यें आयरिश सभासदांचा एक गठ्ठा करून त्याला व्यक्तिशः शिस्तीचा पीळ घालून, आजपर्यंत वाऱ्यावारीं दशदिशांना भुरभुर उडणाऱ्या दोऱ्यांचें त्यानें दोरखंड बनविलें या दोरखंडाच्या काचणीची रग ब्रिटिश पार्लमेंट सभेस जेव्हां सोसेनाशी झाली, तेव्हां मात्र थांबून मागें वळून पाहून, ' तुम्हांला हवें तरी काय ! तुमचा संतोष तरी कशानें होणार ?' असें आयर्लंडच्या प्रतिनिधींना विचारण्याची तिला बुद्धि झाली. हे गुण त्याच्या अंगीं नसते तर पार्नेल या नांवाचा कोणी सभासद पार्लमेंटमध्यें आहे किंवा नाहीं, हें इतर ग्लॅडस्टनसारख्या सभासदांच्या लक्षांतही कदाचित् आलें नसतें. कुचेष्टे-शिवाय प्रतिष्ठा वाढत नाहीं, ही मराठी म्हण पार्नेल यानें आयरिश राजकारणास अक्षरशः लाविली व परिणामावरून पहातां ती उत्कृष्ट लागूही पडली.

एवढें सांगितलें असतां पार्नेलच्या महत्त्वाच्या मीमांसेविषयीं दुसरें कांहीं सांगण्याचें कारण नाहीं. व मौज अशी आहे कीं, एवढें सांगून झालें असतां त्याच्या महत्त्वाविषयीं सांगण्यासारखें असें शिल्लकही कांहीं उरत नाहीं. राजकीय बाब सोडली असतां लोकांनीं त्यास बहुमान द्यावा अगर त्याजवर प्रीति

करावी असे गुण त्याजमध्यें बहुधा नव्हते असें म्हटलें तरी चालेल. द्वेष, द्वेष, द्वेष ! या एकतारीचा एकेरी आवाज मात्र त्याच्या हृदयांत घुमत होता व या आवाजाशिवाय दुसरें कांहीं त्याला स्वतःला अथवा दुसऱ्याला ऐकूं येण्यासारखें नव्हतें. विद्या, कला, धर्म, नीति, परोपकार, तत्त्वज्ञान, व्यावहारिक लोकोपयोग इत्यादि बाबतींत त्याच्या मनाची फारशी गति नव्हती व असली तरी ती कोठेंही फलद्रूप झाल्याचा पुरावा दिसत नाहीं. त्याचीं चरित्रें वाचणारास या एकेरी राजकारणाखेरीज समाजहितसंबंधीं इतर अमुक एका गोष्टीशीं त्याची सहानुभूति असावी असें दिसूनच येत नाहीं; व कांहीं अंशीं तो मनुष्यसमाज द्वेष्टा होता, असेंच उलट दिसून येतें. या सर्व गोष्टींमुळें त्याचा देशाभिमान कोणत्या दर्जाचा होता, याविषयीं त्याच्या हयातींत व त्याच्या मरणोत्तर पुष्कळ लोकांनीं उघड शंका काढल्या, व चिकित्सक बुद्धीनें चर्चाही केली. परंतु त्यानें जें केलें तेवढें त्याच्या राष्ट्रास उपयोगी पडलें, ही मात्र गोष्ट निर्विवाद आहे !

ओकॉनेल व पार्नेल यांच्यामधील साधर्म्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दोघेही मुख्यतः पार्लमेंटांत कायदेशीर असेंच काम करणारे होते. आपलें कार्य अखेर पार्लमेंटाच्या द्वारें व तिच्याच हातून घडून येणार असा त्यांचा भरंवसा होता व तेंच घडवून आणण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. पार्लमेंट ही शत्रुपक्षाचे प्रतिनिधींनीं भरलेली सभा आहे; सबब त्यांजकडून आपखुषीनें असें कांहीं मिळणार नाहीं; व याकरितां त्यांच्याशीं कायद्यास धरून तो ओढून ताणूनही भांडलें पाहिजे असें दोघांसही वाटे. दोघांनींही पार्लमेंट सभेला आपण भितों अगर तिचा आपणाला बाऊ वाटतो असें कधींही दाखविलें नाहीं. तर आपणास नांवें ठेवणाऱ्या, निंदा करणाऱ्या व पाण्यांत पाहणाऱ्या पांचशें सभासदांवर ते दोघेही तुटून पडत व 'लांडगेतोड' करीत. दोघांचीही इच्छाशक्ति, करारीपणा व धैर्य हीं कांहीं विलक्षण होतीं; परंतु या दोघांमध्यें फरकही पुष्कळ होता.

ओकॉनेल हा अधिक बुद्धिवान् व लोकांत खरोखर मिळून मिसळून काम कर-णारा होता. ओकॉनेलच्या पाठीमागें सर्व आयर्लंड असे, तथापि प्रत्यक्ष पार्लमेंटमध्यें त्याला आपल्या बरोबर मत देण्यास ३०।४० पेक्षां अधिक आयरिश सभासद सहसा मिळत नसत. परंतु पार्नेलच्या शब्दाबरहुकूम वागण्यास व तो सांगेल तशी कवाईत करण्यास कमींत कमी ८० सभासद नेहमीं सज्ज असत. ओकॉनेल आपल्या वक्तृत्वानें आयरिश लोकांस नुसता नाचवीत असे, व कित्येक वेळां आपल्या मनाच्या लहरीप्रमाणें त्यांजकडून परस्पर विसंगत अशा गोष्टीही करवी. आज त्याच्या भाषणाचा ओघ राजरस्त्यानें वळला, आणि अधिकार, कायदेकानू, सनदशीर चळवळीचे मार्ग वगैरे गोष्टींविषयीं तो बोलूं लागला म्हणजे सर्व समाजांत राजनिष्ठेचा पूर आल्यासारखा दिसून आयरिश लोक अधिकारी लोकांचा सत्कार करून, केवळ प्रेमानें त्यांच्याशीं भांडत असून मोहबतीनेंच काय मिळेल तें घेतील असें वाटे. परंतु दुसरे दिवशीं जर तो ओघ जरा निराळ्या दिशेनें वळला, म्हणजे मग समाज खळबळून जाऊन चार दोन दिवसांत बंडाचा झेंडा उभारण्यांत येणार अगर लढाईचें बिगुल फुंकलें जाणार असें वाटे. पार्नेलचें धोरण नेहमीं एका प्रकारचें असे. पार्लमेंट अधिकारीवर्ग हे आयर्लंडचे हितशत्रु असून अडवून घेतल्याशिवाय कांहीइतकेंही कांहीं कधीं ते देणार नाहींत अशी त्याची पक्की खात्री असे. त्यांच्या विरुद्ध त्याची तलवार नेहमीं उपसलेली असे; तथापि कायदेशीर अगर सनदशीर मार्ग सोडून आपण कधींही कांहीं करणार नाहीं असें त्याचें ब्रीद होतें. कारण बंडाळी वगैरे करण्यास देश असावा त्या स्थितींत नाहीं, म्हणजे लोकांत संपत्ति, त्राण, ऐक्यबळ व भांडणास लागणारी इतर सामग्री नसून केवळ बंडाळीनें लोकांचीं दुःखें मात्र वाढतील असें त्यास वाटे. फिनीयन वगैरे लोकांशीं मिळून तो लँड लीगचें काम करी. कारण जो तो मनुष्य आपापल्या पुरता जबाबदार असतो. आपलें कर्म व कर्मफळ याचा ज्याचा तो मालक व मुखत्यार असतो असें तो म्हणे. लँडलीग ही कायदेशीर आहे, सबब तींत मिळून जो त्या

संस्थेचें कार्य करील त्यास तींत घेण्यास तो कांहीं प्रत्यवाय करीत नसे. ओकॉनेलचें तसें नव्हतें. बेकायदेशीर अशा कोणत्याही चळवळींत कोणी उघडपणें अगर गुप्तपणें काम करीत असला तर त्याच्याशीं ओकॉनेल हा संबंध ठेवण्यास राजी नसे व आपल्या ' रिपील ' सभेंत अशा माणसांचा शिरकाव होऊं नये अशाविषयीं त्याचा मोठा कटाक्ष असे. पार्नेलचें म्हणणें असें असे कीं, काम झाल्याशीं कारण, मग तें कोणीही करो. ओकॉनेल हा आपल्या मताप्रमाणें लोकमतास वळण लावण्याचा प्रयत्न करी, पार्नेल लोकमतास धरून चाले व लोकांस आपणापेक्षां बरें वाईट अधिक कळतें, त्यांस सांगायला नको असें तो म्हणे. ओकॉनेल हा पार्लमेंटसभेंत भांडणारा खरा, तरी पण होतां होईतों लिबरल पक्षास मिळून व संभाळून काम करणारा होता. पार्नेल यानें लिबरल पक्षास स्वतः होऊन कधींही अनुकूलता दाखविली नाहीं, तर आपल्या बाजूस बहुमत व्हावें म्हणून अगर आयर्लंडच्या हिताकरितां पुढें आणलेल्या बिलास आयरिश लोकमत अनुकूल व्हावें म्हणून लिबरल प्रधानमंडळच त्याची खुशामत करी असें दिसे. ओकॉनेल हा पार्लमेंटमध्यें एकादे वेळेस तरी ख्यालीखुशालींत व खेळीमेळींत येई. पण पार्नेल हा नेहमीं रुसलेला, उद्विग्न व घाव घालण्यास हत्यार सांवरून बसलेला असा असे. ओकॉनेलला संधि मिळती तर तो प्रधानमंडळांत शिरता, अगर विशिष्ठ कार्याकरितां नोकरीही धरता. एक वेळ जवळ जवळ तसा प्रसंग आलाही होता; परंतु पार्नेल हा जर प्रधानमंडळांतील एखादें पद स्वीकारता तर त्यास लोकांनीं बहुधा ठोणमारच केला असता. इतकें पार्लमेंटविरुद्ध त्याच्या वेळीं आयरिश लोकमत क्षुब्ध झालें होतें ! ओकॉनेलचा असा प्रयत्न असे कीं, आपल्या मताखेरीज इतर मत देशांत प्रचलित असूंच नये. पार्नेलचें तसें नव्हते. तो लोकमताचा मुख्य प्रवाह तेवढा धरून बसे, मग अवांतर कोणी कांहीं ज्याच्या त्याच्या मताप्रमाणें केलें तर त्यांत तो मन घालीत नसे. ओकॉनेलला प्रामाणिकपणानें असें वाटे कीं, इंग्लंडचा व आयर्लंडचा संबंध राहणें यांतच आय-

लंडचें खरोखरच हित आहे. पार्नेल या बाबतींत मुळीं लक्षच घालीत नसे. तो म्हणे कीं अमुक एक गोष्टी आयर्लंडास मिळाल्या पाहिजेत, मग त्या हा संबंध राहून मिळोत अगर त्या मिळण्यांत हा संबंध तुटण्याचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं. ओकॉनेलच्या मताप्रमाणें 'रिपील' करणें अगर न करणें ही गोष्ट उभय राष्ट्रांच्या सलोख्यानें होतां होईतों व्हावी; पार्नेल म्हणे कीं, आयर्लंडचें स्वतंत्र पार्लमेंट इंग्लंडनें बुडविलें त्याअर्थी आयरिश लोकांना काय हवें व काय नको हें त्यांचें त्यांनीं ठरविलें पाहिजे व ते मागतील तें इंग्लंडनें दिलें पाहिजे. ओकॉनेल हा गुप्त मंडळ्यांचा उघड निषेध करी व त्या त्यास मनापासून आवडतही नसत. पार्नेल यासही गुप्त मंडळ्या व गुप्त वध यांचा मनापासून तिटकारा असे; परंतु त्याचें धोरण असें असे कीं तो त्यांजविरुद्ध मुद्दाम होऊन उघडपणें बोलत नसे. तो म्हणे तें काम सरकारचें आहे, आपलें नाहीं. 'आयरिश लोकमताच्या पुढाऱ्यांची मदत घेतल्याशिवाय अधिकाऱ्यांस, तीनशें वर्षें अमल चालवूनही, जर शांतता राखितां येत नाहीं तर त्यांनीं आपल्या कामाचा राजिनामा द्यावा व राज्यकारभाराचें काम या पुढाऱ्यांकडे सोपवावें. परंतु आपण अधिकार गाजविणार व त्याच्या दुष्परिणामापासून होणारा शांतताभंग वांचविण्याचा प्रयत्न करून पुढाऱ्यांनीं मात्र आपणास लोकनिंदेस पात्र करून घ्यावयाचें हा न्याय कुठला ?' असें तो विचारी. ओकॉनेल याला आपण नुसता पुढारी नसून राजा आहें असें वाटे व लोकां-वर निग्रहानुग्रह करण्याचा अधिकार पुढाऱ्यास येतो असें तो समजे. पार्नेलचें मत असें होतें कीं, पुढाऱ्यांनीं चळवळ करण्याचें आपलें काम आपण करावें. 'जोंपर्यंत अनुग्रह करण्याचें आपले हातीं नाहीं तोंपर्यंत पुढाऱ्यांनीं निग्रह करण्याचे भानगडींत तरी कां पडावें ?'

पार्नेलच्या वेळीं आयरिश पक्ष पार्लमेंटांत जितका प्रबल होता तितका तो पूर्वी कधींही नव्हता. १८९० सालीं आयरिश पक्षांत भांडणें होईपर्यंत पार्नेलनें आयरिश सभासदांची अशी कांहीं विलक्षण जूट ठेविली होती कीं, ते सर्व मिळून

# IRISH CHOW-CHOW.

——:o:——

" A Nation's liberty could not be meted and parcelled out in gratitude. No man could be grateful at the expense of his conscience ; no woman at the expense of her honour; no nation at the expense of its liberty."

—H. GRATTAN.

" Mr. Gladstone said that Fenianism taught him the intensity of Irish disaffection. It taught me more and better things. It taught me the depth, the breadth, the sincerity of that love of fatherland, that misgovernment had tortured into disaffection, and misgovernment, driving men to despair, had exaggerated into revolt."

—ISSAC BUTT.

" Parnell appreciated the energy and earnestness of the Fenians, but turned these qualities to the account of his own movement. He did not try to weaken the force of Fenianism but he diverted it into a channel of his own choosing." —B. O'BRIEN.

"The Irish Union was atrocious in its principles and abominable in its means." —C. J. FOX.

" I know no blacker or fouler transaction in the history of man than the making :of the union between England and Ireland." —W. E. GLADSTONE.

" The time has come to substitute the present political policy by one akin to that pursued by the Hungarians, by the Finns, the Poles and other peoples, in political circumstances like to ours." —SINN FEIN.

" We can govern India; we cannot govern Ireland. Be it so. Then let Ireland be free. She is miserable because she is unruled."

" Ireland would neither resist courageously nor would she honourably submit. "

—J. A. FROUDE.

# आयर्लंडचे राष्ट्रवीर

भाग २ रा

# जॉन रेडमंड

जॉन रेडमंड हा पार्नेलमागूनचा पार्लमेंटमधील आयरिश पक्षाचा पुढारी होय. पार्नेलचें कर्तृत्व याचे ठिकाणीं मुळींच नव्हतें. आणि पार्नेलप्रमाणें परिस्थितीची अनुकूलताही याला मिळाली नाहीं. यामुळें आरंभापासून अखेरपर्यंत अपमान, उपहास व अपयश हींच याच्या नशिबीं आलीं.

घटस्फोटाच्या प्रकरणामुळें पार्नेल अप्रिय झाल्यापासून व विशेषतः त्याच्या मृत्यूनंतर पार्लमेंटरी पक्षांतील संघटना मोडून तो पक्ष विस्कळित झाला. ग्लॅड-स्टनचें दुसरें होमरूल बिल नापास झाल्यानंतर त्यानें वार्धक्यामुळें राजकारण सोडलें व पुढें त्याच्या लिबरल पक्षांतूनच, आयर्लंड व इंग्लंड यांचा संयोग मोडूं नये एवढ्याच मुद्द्यावर, लिबरल युनिअनिस्ट (संयोगवादी) पोटपक्ष निघाला. यामुळें आयर्लंडला होमरूल देऊं नये म्हणणाऱ्या कॉन्झर्वेटिव्ह पक्षाचें पारडें अधिक जड झालें. पार्नेलला ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आपला पक्ष विशेष पुढें आणतां आला याचें कारण असें होतें कीं लिबरल व कॉन्झर्वेटिव्ह हे पक्ष तेव्हां बहुधा तुल्यबल असत व लिबरल पक्ष कॉन्झर्वेटिव्ह पक्षावर सरशी करण्या-करितां आयर्लंडच्या पक्षांना उचलून धरुन आयरिश सभासदांचीं मतें आपल्या पक्षास मिळवूं पाही. आणि पार्नेलचा आयरिश पक्ष त्याच्या अगदीं हुकुमांत असल्यामुळें लिबरल पक्षाशीं हा सौदा करणें त्याला साधत असे. पण लिबरल पक्षांतील एक फार मोठा भाग युनियनिस्ट होऊन कॉन्झर्वेटिवांना मिळाल्यामुळें

अत्यंत दुर्बल झालेला लिबरल पक्ष आयरिश पक्षास निरुपयोगी म्हणून विचारीनासा झाला. पार्नेल व ग्लॅडस्टन या दोघांच्या मृत्यूनें आयरिश व लिबरल या दोन्ही पक्षांची कंबर खचली. कायद्यांतील खुसपटें काढून पार्नेलनें अडवणुकीचे धोरणानें ब्रिटिश सरकारास बराच त्रास दिला होता. पण पुन्हा अशी अडवणूक कोणास करतां येणार नाहीं असे कायदे करून ब्रिटिश पार्लमेंटनें आयरिश पक्षाचें अडवणुकीचें अस्त्रही मोडून काढलें.

अशा रीतीनें दुर्बल झालेल्या आयरिश पक्षाची संघटना करण्याचा रेडमंड यानें १९०० सालापासून प्रयत्न केला. पण दहा वर्षेपर्यंत त्यास यश आलें नाहीं. १९१० सालीं हौस ऑफ लॉर्डसचें महत्त्व कमी करण्यासाठीं लिबरल पक्षास आयरिश पक्षाची जरूर वाटली. तेव्हां होमरूलचें वचन घेऊन रेडमंड यानें आपल्या पक्षाचा पाठिंबा लिबरल पक्षास दिला. पूर्वींच्या होमरूल बिलाचे वेळीं लॉर्डसनीं विरोध केला असल्यामुळें लॉर्ड्सचें महत्त्व कमी करण्यांत आयरिश पक्षाचें आपण चांगलेंच हित साधलें असें रेडमंड यास वाटलें. कबूल केल्याप्रमाणें लिबरल पक्षानें होमरूलची वाटाघाट सुरू केली व बिल तयार करतांना वेळोवेळीं रेडमंडचा पुष्कळच सल्ला ऐकला. या बिलाअन्वयें डब्लिनमध्यें आयर्लंडचें एक पार्लमेंट स्थापन व्हावयाचें असून तें इंग्लंडच्या पार्लमेंटच्या खास नियन्त्रणाखालीं रहावयाचें होतें. पुष्कळशा वरिष्ठ नोकऱ्या ब्रिटिश पार्लमेंटच्या हातीं राहावयाच्या असून आर्थिक सत्ता व खजिना हींही इंग्लडचेच स्वाधीन राहावयाचीं होतीं. शिवाय आयर्लंड संयुक्त राज्याचा मोठा घटक म्हणून ब्रिटिश पार्लमेंटांतही आयर्लंडचे प्रतिनिधी बसावयाचे होतेच.

रेडमंड यास हें बिल पूर्णपणें मान्य होतें. हें होमरूल बिल १९१२ च्या एप्रिलमध्यें पार्लमेंटपुढें आलें. पूर्वींच्या दोन्ही बिलांचे वेळीं इंग्लंडमधील कॉन्झर्वेटिव्ह पक्षानें विरोध केला होता. पण आतां या बिलाचे वेळीं आयर्लंडला घरच्याच अडचणी उत्पन्न झाल्या. आयर्लंडमधील अल्स्टर या उत्तरेकडील प्रांतांत मोठमोठ्या भांडवलवाल्यांची वस्ती असून ते बहुतेक प्रॉटेस्टंट

आहेत. त्यांना दक्षिण आयर्लंडच्या कॅथोलिक व गरीब लोकांच्या पार्लमेंटमध्यें अल्पमतानें आपण राहिलों असतां आपला छळ होईल व आपल्या धंद्यावर—भांडवलावर गदा येईल अशी भीति वाटली. या भीतीनें आयर्लंडला स्वतंत्र एक पार्लमेंट घेऊन ब्रिटिश पार्लमेंटमधून फुटण्यास आम्ही तयार नाहीं असें अल्स्टरवाले म्हणूं लागले. नुसतें तोंडीं म्हणूनच ते थांबले नाहींत. अल्स्टरवाल्यांचा पुढारी कार्सन यानें एका मोठया जाहीर सभेंत होमरूलला कसून विरोध करून अल्स्टरकरतां एक स्वतंत्र राज्यघटना तयार केली व ब्रिटिश सरकारनें आयर्लंडला होमरूल दिलेंच तर ब्रिटिश पार्लमेंटचा हुकुम धाब्यावर बसवून आम्ही अल्स्टरमध्यें आपलें स्वतंत्र राज्य स्थापूं अशी त्यानें ब्रिटिशपार्लमेंटला उघड धमकी दिली आणि जरूर तर ब्रिटिशांशीं लढूनही या नव्या राज्याचें रक्षण करण्याकरितां कार्सन यानें स्वयंसेवक दलें उभारून परदेशांतून भरपूर दारूगोळा व शस्त्रेंही आणवून ठेविलीं; या स्वयंसेवकांच्या कवाइती अल्स्टर प्रांतांत उघडपणें सुरू झाल्या. अल्स्टरवाले होमरूलच नको असें एकीकडून म्हणत असतां बहुतेक अथवा संपूर्ण स्वायत्तता मागणारे जे सिनफेन, रिपब्लिकन, मजूर वगैरे पक्ष दक्षिण आयर्लंडांत प्रबळ होत होते त्यांनीं पार्लमेंटांत रेडमंडच्या शिफारशीनें आलेलें अर्धेंबोबडें नकली स्वराज्य आम्हांस नको म्हणून त्याचा व रेडमंडचा धिःकार केला. सामान्य जनतेचें रेडमंड यास पाठबळ होतें. पण अल्स्टर पक्षास आयरिश होमरूलचे शत्रू असलेल्या कॉंझर्वेटिवांचा उघड पाठिंबा असल्यामुळें लिबरल पक्षास होमरूल बिलाचे कामीं यश येईना. अल्स्टरला व दक्षिण आयर्लंडला वेगळीं वेगळीं पार्लमेंटें देऊन भांडण मिटविण्याची शक्कल निघाली. पण आयर्लंडचीं शकलें होणें ठीक नाहीं म्हणून रेडमंडनें ती कल्पना झिडकारिली. लॉर्डांची सत्ता कमी करण्याकरितां १९११ सालीं जो पार्लमेंट ॲक्ट झाला होता त्यांत एक कलम असें होतें कीं 'लॉर्डस् सभेला तिनें वाटल्यास एखादें बिल दोन वर्षेपर्यंत पुनः पुनः फेटाळावें व नंतरही तें कॉमन्सनीं पास केल्यास मात्र लॉर्डांच्या हरकतीस न जुमानतां

सदर बिलाचा अंमल व्हावा. या सवलतीचा फायदा या वेळीं घ्यावयाचें ठरवून निदान कालहरण करण्याकरितां आयरिश स्वराज्याचे शत्रु हौस ऑफ लॉर्डस् यांनीं १९१२ सालचें होमरूल बिल आपल्या अधिकाराच्या जोरावर दोन वर्षें लोळविलें. अशाप्रकारें तिसऱ्यांदा होमरूल बिल पुढें येऊन पुन्हा तें कुजत पडलेलें पाहून रेडमंडचे अनुयायीही कंटाळल्यासारखे झाले.

१९१४ सालीं युरोपांत महायुद्ध सुरू होऊन इंग्लंडला त्यांत पडावें लागलें. इंग्लंडला या वेळीं सर्व पक्षांच्या ऐक्याची अत्यंत गरज होती. व तशी विनंति इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री एडवर्ड ग्रे यांनीं पार्लमेंटमध्यें केली असतां रेडमंड यानें उठून आयर्लंडतर्फे "साम्राज्याच्या या संकटप्रसंगीं आयर्लंड सर्व वैरभाव विसरून साम्राज्यास मदत करील, आयर्लंडांतून सर्व सैन्य रणांगणावर गेल्यास आयर्लंडचे सुपुत्र आपल्या किनाऱ्याचें रक्षण जर्मनीविरुद्ध स्वतः शस्त्रें घेऊन व प्राण अर्पून करतील" अशी ग्वाही दिली. या औदार्याबद्दल रेडमंडची इंग्रजांनीं वाहवा केली खरी, पण याचा आयर्लंडावर भलताच परिणाम झाला. दक्षिण आयर्लंडास खूष करण्याकरितां लिबरल प्रधान मंडळानें होमरूल बिल कसेंबसें पास करून घेतलें. पण इकडे अल्स्टरवाल्यांना खूष करण्याकरितां या होमरूलची बजावणी युद्धसमाप्तीपर्यंत तहकूब करून वर अल्स्टरवाल्यांना हव्या असतील अशा दुरुस्त्याही त्यांत करूं असें अल्स्टरवाल्यांना आश्वासन दिलें. एका हातानें आज देऊं करून दुसऱ्या हातानें उद्यां परत घेण्याच्या प्रधान मंडळाच्या या वर्तनांतील फसवाफसवी साध्या डोळ्यालाही दिसण्याइतकी उघड होती. यामुळें होमरूल हवें म्हणणारी मवाळ आयरिश जनताही चिडून गेली व रेडमंड यानें आयर्लंडला न विचारतां इंग्लंडला मदतीचें आश्वासन दिलें याबद्दल जहाल पक्षानें त्यास दोष दिला. सिनफेन, प्रजासत्ताक वगैरे हे जहाल पक्ष पहिल्यापासूनच सनदशीर पार्लमेंटरी चळवळीविरुद्ध असून रेडमंडची व त्याच्या पक्षाची निंदा व थट्टा करीत. त्यांत आतां सर्व जनताही हळूं हळूं सामील होऊं लागली. देशांत स्वातंत्र्याचें

व इंग्रजविरोधी वातावरण रोज बळावत होतें. अल्स्टरचें पाहून सिनफेन व प्रजासत्ताक पक्षानेंही स्वयंसेवक दळें उभारलीं होती. हीं दळें उभारण्याचे कामीं रेडमंडनें काडीइतकेंही सहाय केलें नव्हतें. पण या स्वयंसेनकांनीं आतां इंग्लंडला मदत करावी असें रेडमंड म्हणूं लागला. या पथकांच्या कार्यकारी मंडळांत रेडमंडनें आपलीं माणसें घुसडण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्यास थोडें यशही आलें. इंग्लंडला युद्धांत मदत करावी असें लोकमत अजून बरेंच होतें व पुष्कळसें स्वयंसेवक युद्धावर गेलेही. पण याच सुमारास म्हणजे १९१६ च्या इस्टर सणांत प्रजासत्ताक पक्षानें बंड उभारून इंग्लंडबद्दल आयरिश लोकांस वाटणाऱ्या राजनिष्ठेस अखेरची आग लावून दिली. बंडामुळें रेडमंडच्या अंतःकरणास फार मोठा धक्का बसला. आयर्लंडला यापुढें आशा नाहीं म्हणून तो निराश झाला. बंडानंतर सरकारानें धारण केलेल्या क्रूर वृत्तीनें बंडखोरांबद्दल लोकांत सहानुभूति वाढून रेडमंडच्या साम्राज्यवादी पक्षाबद्दल लोक तिटकारा दाखवूं लागले. लोकांतील त्याचें वजन गेल्यामुळें ब्रिटिश पत्रेंही त्याच्या कमकुवतपणाबद्दल त्याची निंदा करूं लागलीं. आयर्लंडांत लष्करी अमलाचा जुलुम होऊं लागला म्हणून १९१६च्या आक्टोबरमध्यें " युरोपांत ज्या तत्वाकरतां तुम्ही लढतां त्याचीच आयर्लंडमध्यें तुम्ही पायमल्ली करतां" असा पार्लमेंटमध्यें रेडमंडनें सरकारावर निंदाव्यंजक ठराव आणला. तो अर्थातच नापास झाला. पुढील सालीं आम्ही अडवणुकीचें धोरण स्वीकारूं अशी त्यानें सरकाराला धमकी दिली. पण याच्या मागें अयरिश राष्ट्र नाहीं हें इंग्लंडला माहीत होतें; यामुळें त्याचें हसें मात्र झालें. लॉइड जॉर्जच्या सांगण्यावरून त्यानें एक सर्वपक्षीय परिषद भरवून आयर्लंड–इंग्लंडचा झगडा मिटविण्याचा प्रयत्न केला. पण एकीकडून अल्स्टरवाले व दुसरीकडून सिनफेनर्स यांनीं हा प्रयत्न हाणून पडला. स्वदेशावर रोज एकेक नव्या येणाऱ्या संकटांनीं रेडमंडचा धीर खचला. अल्स्टरचा हट्ट, सिनफेनर्सची स्वातंत्र्याची रोज वाढणारी चळवळ व इंग्लंडची बेफिकिरी आणि लपंडाव या सर्व गोष्टी पाहून

निराशेनें त्याचें अंतःकरण भंगलें. सिनफेनर्स रोज अत्याचार करूं लागलेले पाहून प्रधानमंडळानें सर्व आयर्लंडभर लष्करी अंमल सुरू करण्याचा निश्चय केला वं ६ मार्च १९१८ रोजीं टिप्परेरी कौंटी लष्करी अमलाखालीं म्हणून जाहीर करण्यांत आला. याच दिवशीं रेडमंड याचें देहावसान होऊन लष्करी अमलांत पुढें झालेले अनर्थ पाहण्याचें त्याचें दुर्दैव टळलें. रेडमंड हा अतीशय आशावादी व यत्नवादी देशभक्त होता. १९१६ सालच्या संयुक्त प्रधानमंडळांत त्यास जागा देण्यांत आली असतां इंग्लंड आयर्लंडला योग्य दर्जास चढवीत नाहीं म्हणून त्यानें हा वैयक्तिक सन्मान नाकारला, यांत त्याचें नीतिधैर्य चांगलेंच प्रगट झालें. पण लोकमताचा ओघ व परकी सरकारचा स्वभाव अजमावून तो वागला असता तर त्याचा त्याच्या देशास अधिक उपयोग झाला असता.

# आर्थर ग्रिफिथ

विसाव्या शतकाच्या आरंभीं सुरू होऊन अवघ्या १८ वर्षांत ज्या चळवळीची कीर्ति व स्फूर्ति जगाच्या अगदीं दूरदूरच्या कोनाकोपऱ्यांपर्यंत जाऊन पोचली व ज्या चळवळीनें युरोप खंडांतील महायुद्धांत विजयी ठरलेल्या इंग्लंडला आयर्लंडसारख्या चिमुकल्या व परतंत्र राष्ट्रापुढें नमतें घ्यावयास लाविलें त्या यशस्वी सिनफेन चळवळीचा जनक, चालक व जीवनदाता या नात्यानें आर्थर ग्रिफिथ याची योग्यता एकंदर आयर्लंडच्या इतिहासांत फार मोठी आहे.

आर्थर ग्रिफिथ याचा जन्म १८७२ त झाला. तो विद्यार्थी असतां पार्नेलची चळवळ जोरांत होती. त्या वेळीं पार्नेलच्या तडफदार धोरणाचा त्याच्या मनावर फार चांगला परिणाम होऊन त्याला पार्नेल प्रमाणेंच इंग्रजाबद्दल तीव्र द्वेष वाटूं लागला व त्याची आयरिश राजकारणावर भक्ति जडली. घरची अतीशय गरीबी असल्यामुळें प्रथम तो एका छापखान्यांत नोकरी करून आपला चारितार्थ चालवूं लागला. पार्नेलच्या घटस्फोटाच्या प्रकरणांत धार्मिक पुरोहितांनीं त्यास धर्मभ्रष्ट ठरवून त्याजकडून राजकीय पुढारीपण काढून घेण्याची खटपट चालविली असतां ग्रिफिथ पुरोहितांचे विरुद्ध पार्नेल पक्षास मिळाला होता. पण तत्कालीन राजकीय पक्षांतील व्यक्तिद्वेष व घाणेरडीं कारस्थानें पाहून त्या वेळच्या बहुतेक तरुणाप्रमाणें ग्रिफिथचेंही मन विटल्यासारखें झालें. पुढें त्याची नोकरी सुटली व देशांत काम मिळेना म्हणून उद्योग पाहाण्याकरितां १८९६ चे सुमारास तो दक्षिण आफ्रिकेस गेला.

दक्षिण आफ्रिकेंत असतां त्याच्या इंग्रजद्वेषास व स्वदेशाभिमानास पुष्कळच उत्तेजन मिळालें. दक्षिण आफ्रिकेंत त्या वेळीं बोअर लोक इंग्रजांविरुद्ध असंतुष्ट झाले असून, असे कांहीं असंतुष्ट लोक ग्रिफिथच्या मित्रमंडळींत होते. एके दिवशीं एका दिवाणखान्यांत दक्षिण आफ्रिकेंतील इंग्रजांची बोअर लोकां-विरुद्ध एक सभा भरली असतां ग्रिफिथ हा आपल्या जॉन मॅक्ब्राईड नामक स्नेह्यासह व्यासपीठावर चढला. तेथें इंग्रजाचें 'यूनियन जॅक' निशाण उभें केलें होतें. त्याकडे पाहून सभेंत असणाऱ्या कांहीं आयरिश लोकांस (हे इंग्रजी बोलणारे असल्यानें त्यांना दक्षिण आफ्रिकेंत इंग्रज म्हणूनच ओळखीत) "हें यूनियन जॅक पाहून गेलीं शंभर वर्षें आयर्लंडमध्यें चालू असणाऱ्या रक्तपात व अराजकता यांची तुम्हांस आठवण होत नाहीं काय?" असा ग्रिफिथनें करडा सवाल केला व सर्वांसमक्ष तेथल्या तेथें त्यानें आपल्या हातानें त्या यूनियन जॅकच्या फाडून फाडून चिंधड्या केल्या.

स्वदेशाबाहेर मनास चैन पडेना म्हणून १८९९ चे सुमारास ग्रिफिथ आयर्लंडास परत आला. यावेळीं आयरिश राजकारणास एक निराळाच रंग चढूं पहात होता. प्रथम पार्नेल व नंतर ग्लॅडस्टन यांच्या मृत्यूनें आयरिश पक्ष ब्रिटिश पार्लमेंटांत व आयर्लंडांतही निस्तेज झाला असून सनद-शीर चळवळींचें अगदीं अखेरचें अडवणुकीचें शस्त्रही वापरून वाया गेल्या-मुळें राजकारणाचा एकादा नवा मार्ग निघण्याविषयीं जनतेंत आकांक्षा उत्पन्न होऊं लागली होती. १८९३सालीं गॅलिक लीग नामक एक संस्था स्थापिली गेली होती. तिच्या द्वारां आयर्लंडच्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचें पुनरुज्जीवन करण्याची चळवळ मोठ्या जोमानें चालू झाली. ही संस्था राजकारणापासून अत्यंत अलिप्त ठेवण्याचें धोरण चालकांनीं स्वीकारल्यामुळें सरकारला ही संस्था अनिष्ट वाटत असूनही तिचा नाश करतां येईना. आणि राजकारण वगळून-- ही इतर क्षेत्रांत या संस्थेस करण्यासारखें काम पुष्कळच होतें.

इ. स. १८०० सालीं आयर्लंडची पार्लमेंट मोडून इंग्लिश पार्लमेंटांत सामील केल्यानंतर आयर्लंडला राजकीय पारतंत्र्य आलें खरें. पण यानें झालेल्या राजकीय नुकसानापेक्षां आयर्लंडचें जें सांस्कृतिक नुकसान झालें तें फारच घातक होतें. पार्लमेंटांच्या 'संयोगा'पूर्वी सर्व आयर्लंडभर आयर्लंडची राष्ट्र-भाषा—गॅलिक भाषा—बोलली जात होती. त्या भाषेंत त्यांच्या प्राचीन वीरांच्या कथा, पोवाडे, प्रेम व भक्ति यांनीं भरलेलीं पुराणें होतीं. यामुळें प्रति-कूल कायदे अस्तित्वांत असूनही आयर्लंडला आपल्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची स्वतंत्र संस्कृतीची जाणीव ठेवतां आली होती. पण आयरिश पार्लमेंट इंग्लं-डांत गेल्यावर आयर्लंडमध्यें इंग्रजी भाषेला महत्त्व येऊं लागलें. इंग्रजी खेरीज ज्या इतर भाषा त्या अडाणी भाषा अशी इंग्रजांची समजूत असल्यामुळ त्यांनीं आय-र्लंडांत इंग्रजी शिक्षणाच्या शाळा घातल्या. तेथें इंग्रजी भाषा, इंग्रजी इतिहास इंग्रजी विचार यांचेंच शिक्षण मिळत गेल्यानें व विद्वत्तेनें पुढें येण्यास इंग्रजी भाषा हेंच प्रमुख साधन झाल्यानें बुद्धिमान वर्ग आयरिश भाषा, आयरिश विचार व इतिहास यांस पारखा झाला. जगांतील इतर भागांतही आयरिश लोकांस इंग्रजी बोलण्यामुळें इंग्लिशमेन असेंच समजण्यांत येऊं लागलें. स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा प्रत्यहीं होत चाललेला हा ऱ्हास देशभक्तांच्या नजरेस येण्यास ९३ वर्षें जावीं लागलीं. हा ऱ्हास थांबविण्याकरितां गॅलिक लीग या संस्थेनें १८९३ पासून जोमानें व पद्धतशीर यत्न सुरू केला. राजकीय अथवा धार्मिक पक्षभेदांत सामील न होतां आयर्लंडच्या संस्कृतीचा उद्धार करून आयरिश लोकांत स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा अहंकार उत्पन्न करणें हें या संस्थेनें आपलें ध्येय ठरविलें. आयरिश भाषेचा उद्धार हें कार्य या संस्थेनें प्रथम हातीं घेतलें. व अनुषंगानें आयरिश कला, आयरिश संगीत, आयरिश उद्योगधंदे यांचाही उद्धार करण्याचे प्रयत्न या संस्थेनें केले. सर्व आयर्लंडभर या संस्थेनें आपली चळवळ पसरविली. पुरोहितांच्या मुलखापांविरुद्ध समाजास जागृत करणें, तसेंच अधिकाऱ्यांच्या जुलमाविरुद्ध कडक टीका करणें हीं कार्येंही या संस्थेनें केलीं.

आयरिश लोकांचें ऐहिक हित साधावें व आपणास स्वतंत्र राष्ट्रीयत्व आहे असें मतपरिवर्तन व्हावें या दोन गोष्टींवर या चळवळीचा मुख्य भर होता. प्रत्यक्ष राजकारणांत या गॅलिक लीगनें भाग घेतला नाहीं खरा, पण स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची भावना उदित करून या संस्थेनें जनतेच्या आकांक्षेचें क्षितिज विस्तृत केलें व सर्व देशाचा दृष्टिकोनच बदलून टाकला. स्वातंत्र्यप्रेमाचा जो फार मोठा वृक्ष पुढील वीस वर्षांत जोरानें फोफावला त्याचीं बीजें या संस्थेनेंच लोकांच्या अंतःकरणांत पेरून ठेविलीं होतीं आणि हें ओळखूनच पुढें झालेल्या ईस्टरच्या बंडांतील प्रसिद्ध पुढारी व नामांकित लेखक पॅट्रिक पीयर्स यानें या संस्थेसंबंधीं क्रांतिकारक विचार उत्पन्न करणाऱ्या सर्व संस्थांमध्यें गॅलिक लीगचा नंबर पहिला लागेल " असा आपला अभिप्राय देऊन ठेविला आहे. आर्थर ग्रिफिथ राजकारणप्रेमी असून गॅलिक लीग राजकाणापासून फटकून वागणारी असल्यामुळें आफ्रिकेंतून आयर्लंडला परत आल्यावर तो लीगला मिळाला नाहीं. पण गॅलिक लीगनें उत्पन्न केलेल्या वातावरणाचा परिणाम त्याच्या अंतःकरणावर व्हायचा तो झालाच. देशांत स्वत्वाची जाणीव उत्पन्न करून स्वावलंबनाच्या मार्गानें राष्ट्राचा उद्धार करतां येईल असे विचार त्याचे मनांत घोळूं लागले व याच वातावरणामुळें त्याच्या मनांत पुढें सिनफेन तत्त्वाची प्रेरणा झाली.

इ. स. १८९८ सालीं वुल्फटोनच्या बंडास शंभर वर्षें पूर्ण झाल्यामुळें सदर बंडाचा शतसांवत्सरिक उत्सव सर्व आयर्लंडांत मोठ्या थाटानें साजरा झाला. यावेळीं स्वातंत्र्यप्रेमाची जी एक लाट उसळली ती टिकविण्याकरितां पुढाऱ्यांनीं 'अठ्याण्णव–संघ' नांवाचे संघ चोहोंकडे स्थापन केले व मतप्रचाराकरितां 'युनायटेड आयरिशमन' पब्लिशिंग कंपनी स्थापन होऊन 'युनायटेड आयरिशमन' या नांवाचें एक साप्ताहिक वर्तमानपत्र आर्थर ग्रिफिथ याचे संपादकत्वाखालीं चालू झालें. १८४८ सालीं मिकेल याचें याच नांवाचें एक पत्र चालू होतें. अत्यंत कायदेशीरपासून अत्यंत बेकायदेशीर-

पर्यंत कोणत्याही एक किंवा मिश्र मार्गांनें देश स्वतंत्र करणें हें मिकेलचें ब्रीद असून त्याच्याच पत्राचें नांव आपल्या पक्षास घेण्यांत त्याच्या धोरणाची सूचना देण्याचा चालकांचा एक हेतू होता.

वर्तमानपत्राच्या नांवावरून आगाऊ सूचित केलेलें अथवा झालेलें धोरण असें व्यापक असलें तरी पत्र सुरू झाल्यावर ग्रिफिथ यानें आपल्या राजकयि धोरणाच्या मर्यादा हळूहळू जाहीर केल्या. ब्रिटिश पार्लमेंटांत बसून राजकारण करण्याच्या तो अगदींच विरुद्ध होता. "शंभर वर्षें ब्रिटिश पार्लमेंटमध्यें बसून आपण काय मिळविलें? आमची लोकसंख्या घटून चालली, आमचें दारिद्र्य वाढलें व कर मात्र पूर्वीच्या दहापट वाढला आहे. आमच्या हितसंबंधास जेथें काडीचेंही महत्त्व मिळत नाहीं त्या पार्लमेंटांत यापुढें बसायचें नाहीं; त्यास आपली मदत द्यायची नाहीं असें वागण्यानेंच युरोपांत आयर्लंडचा दर्जा वाढेल. होमरूलचें बिल दोन वेळ फेटाळलें गेल्यावर आयरिश सभासदांत कांहीं पाणी असतें तर त्यांनीं यापुढें कोणीही आयरिशानें ब्रिटिश पार्लमेंटांत बसूं नये असें सांगितलें असतें. कारण आयरिश सभासदांनीं ब्रिटिश पार्लमेंटांत बसणें म्हणजे पैशाचा व कालाचा अपव्यय असून त्यांत स्वराष्ट्राचा अधःपात आहे..." अशा प्रकारची टीका तो रेडमंड पक्षाविरुद्ध करूं लागला. पार्लमेंटरी सनदशीर चळवळीस ग्रिफिथ विरुद्ध होता, तसाच उलट तो प्रजासत्ताक पक्षाच्याही विरुद्ध होता. पूर्वी एके काळीं 'आयरिश प्रजासत्ताक बंधु समाजाचा' ग्रिफिथ सभासद असला तरी या समाजाचें ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य व साधन सशस्त्र प्रतिकार :हीं त्यांस अप्रयोजक वाटूं लागल्या, मुळें सदर बंधुसमाजांतून त्यानें आपलें नांव काढून घेतलें. प्रजासत्तावाल्यांचे लेख 'युनायटेड आयरिशमन' मध्यें पुष्कळ येत व त्यांत त्यांच्या मताचें उघड प्रतिपादन असे. पण हे लेख आपल्या पत्रांत छापण्यांत ग्रिफिथचा उद्देश पार्लमेंटरी राजकारणावरून लोकांचें मन उडवून स्वावलंबनाकडे वेधावें एवढाच होता. जुन्या परावलंबी—इंग्रजावलंबी पंथावर कडक टीका करून स्वावलंबनाकडे लोकांचें

चित्त लावणें एवढेंच शैक्षणिक काम ग्रिफिथ यास आरंभीं करावयाचें होतें. ' आठ्याण्णव क्लब ' हे स्वातंत्र्यवाद्याचें होतें. त्या संबधीं लिहितांना ग्रिफिथ लिहितो, " जुन्या लोकांच्या राजकारणानें राष्ट्राची नीतिमत्ता खालावली आहे, ती या क्लबांच्या शिक्षणानें वाढून राष्ट्रीय बाणा देशांत उत्पन्न होईल. या क्लबाच्या चळवळीनें आत्मविश्वास वाढत आहे. अशा आत्मविश्वासाशिवाय कोणतेंही राष्ट्र कधींच वर येणार नाहीं. आणि आमचें भवितव्य तरुणांवर अवलंबून असून त्यांना शिकवण्याचें व तयार करण्याचें काम हे क्लब करीत आहेत, या दृष्टीनें आम्ही त्यांकडे पहातों." पण या क्लबांचें संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय त्यास मान्य नव्हतें. इंग्लंडसारख्या बलशाली राष्ट्राशीं सशस्त्र युद्धास उभे रहाण्याचा विचार त्याला कधींच पटला नाहीं. एका बाजूस बोलघेवडे पार्लमेंटवाले व दुसऱ्या बाजूस शस्त्रवादी प्रजासत्तावाले या दोहोंमधला व दोहोंहून भिन्न असा स्वतः ग्रिफिथचा पंथ होता. ग्रिफिथ आपल्या पंथास 'सनदशीर' पंथ म्हणत असे. १७८२ सालीं आयर्लंडच्या पार्लमेंटास सर्वाधिकार दिल्यावर आयर्लंडच्या मनांत संशयाचा किंतू न रहावा म्हणून १७८३ सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें ' रेनन्सिएशन ऍक्ट' नांवाचा कायदा केला व त्यायोगें 'यापुढें ब्रिटिश पार्लमेंटला आयर्लंडला बंधनकारक असा कोणताही कायदा करण्याचा हक्क नाहीं' असें इंग्लंडनें स्वतःस कायद्यानें बांधून घेतलें. ग्रिफिथ म्हणे कीं, आयर्लंला ही खरी आणि कायमची सनद मिळाली आहे. ती केव्हांहि अभंग आहे. पिट व कॅसलरे यांनीं आयरिश पार्लमेंट मोडली यांत त्यांनींच आपल्या पार्लमेंटचा कायदा मोडला. पण त्यांनीं कायदा मोडला म्हणून १७८३ सालीं आयर्लंडला मिळालेला अधिकार नष्ट होऊं शकत नाहीं. या तर्कशुद्ध विचारसरणीनें तो आपला पंथच खरा सनदशीर आहे असें म्हणून पिटच्या अन्यायास शरण जाणाऱ्या पार्लमेंटरी पक्षास तो नेभळट मार्गाचे ठरवी. आपलें पार्लमेंट पिटनें बेकायदा मोडलें असल्यानें तें परत स्थापण्याचा आपला हक्क आहे असें सांगून तो स्वावलंबनाचा

उपदेश करूं लागला. ग्रिफिथ लिहितो, "आपली दृष्टी लंडनकडून परत फिरवून स्वदेशांत स्थिर करा. तुम्ही स्वतंत्र आहांच; तशी कृति करा म्हणजे झालें. ब्रिटिश पार्लमेंटला प्रतिनिधी न पाठवाल तर तुह्मांला कोण सक्ती करणार आहे? आपली राष्ट्रीय सभा स्थापा. तिचे हुकुम माना. तुम्ही इंग्रजी बोललेंच पाहिजे किंवा इंग्रजी शिकलेंच पाहिजे असें मुळींच नाहीं. इंग्रजांच्या कोर्टांत न जातां आपलीं कोर्टें स्थापा. इंग्रजांचा माल घेऊं नका. आपलीं व्यापारी जहाजें बांधून त्यांतून मालाची नेआण करा. सारांश सर्वथैव स्वदेशी व्हा म्हणजे स्वातंत्र्य तुमचेंच आहे." सारांश स्वावलंबन अथवा आत्मोद्धार हेंच या नवीन पंथाचें रहस्य होतें.

गॅलिक लीगशींही ग्रिफिथचें पटलें नाहीं, प्राचीन संस्कृतीवर 'फाजील' भर, आयरिश भाषेचा 'फाजील' अभिमान आणि राजकारणाचें माल वावडें, यानें लोक सनातनाग्रही, हट्टी व परकीयांचा नेहमींच द्वेष करणारे असे होतील असें तो म्हणे. तेव्हां प्रातिनिधिक बंधुसमाज अथवा गॅलिक लीग अशा जुन्या संस्थांकडून आपल्या या नवीन पंथाचा प्रसार होणें शक्य नाहीं हें ग्रिफिथ यास दिसून येऊं लागलें. म्हणून त्यानें १९०० च्या ऑक्टोबरांत आपल्या अनुयायांसह गॉल्ससंघ ( cumannan Gaedhal ) नांवाचा एक संघ स्थापन केला. या संघाचें कामही प्रथम प्रथम निवळ शैक्षणिक असेंच होतें. पण १९०२ मध्यें या संघाच्या त्रितीय वार्षिक परिषदेमध्यें अध्यक्ष या नात्यानें ग्रिफिथ यानें जें भाषण केलें त्यांत त्यानें आपल्या स्वावलंबी पंथाचा पुकारा केला.

ग्रिफिथनें प्रतिपादिलेल्या प्रकारचा स्वावलंबनचा मार्ग हंगेरीनें ऑस्ट्रियाविरुद्ध १८६७-६८ सालीं आक्रमिला होता, तो इतिहास त्यानें 'हंगेरीचा पुनरुद्धार' व 'या धोरणाची बजावणी' या प्रसिद्ध लेखमाला आपल्या पत्रांत लिहून त्यानें आयर्लंडला शिकविला. व या इतिहासाच्या आधारावर आपलें राजकीय धोरण उभारलें. ग्रिफिथच्या या स्वावलंबी धोरणास हंगेरियन पॉलिसी असें

मूळचें नांव असून या धोरणाचें आयर्लंडला प्रिय वाटणारें आयरिश भाषेंतील जगप्रसिद्ध नांव 'सिनफेन' असें आहे. 'सिनफेन' म्हणजे 'आमचे आम्ही'; 'आमचें आम्ही पाहून घेऊं, इंग्लंडनें आमच्या कारभारांत हात घालतां कामा नये,' असा 'सिनफेन' या नांवावरून बोध घ्यावयाचा.

नवीन स्थापलेल्या गॉल्स संघाचें स्वरूप केवळ नव्हे तरी बरेंच शैक्षणिक असल्यानें राजकीय चळवळीचा जोर वाढूं लागल्यावर निवळ राजकीय कार्य करण्याकरितां नवी संस्था हवी असें वाटूं लागलें. तेव्हां त्याकरितां 'नॅशनल कौन्सिल' नांवाची संस्था एडवर्ड मार्टिन यांचे अध्यक्षतेखालीं २८ नोव्हेंबर १९०५ रोजीं स्थापन करण्यांत आली व तिचें स्वावलंबन हें धोरण ठरविण्यांत आलें. पुढें राटुंडा येथें भरलेल्या सभेचे वेळीं ३०० माणसांचें एक सरकार आपण स्थापन करून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची या सरकारास मान्यता मिळविण्याबद्दल खटपट करावी अशी आपली कल्पना ग्रिफिथनें मांडली. या दिवसापासून सिनफेन चळवळीला व पक्षाला राजकीय चळवळ व पक्ष म्हणून जाहीर मान्यता मिळूं लागली.

'युनायटेड आयरिशमन' पत्राचा संपादक या नात्यानें ग्रिफिथ यानें फार कौशल्यानें काम केलें. मार्च ४,१८९९ पासून एप्रिल १४।१९०६ पर्यंत हें पत्र चाललें. दरम्यान तेवीसदां पोस्टांतच पत्र जप्त केलें गेलें व तीनदां जाहीरपणें पत्र सरकारजमा झालें. ग्रिफिथनें या पत्रांत सिनफेन चळवळीचा उत्कृष्ट पुरस्कार व प्रसार केला. त्याची स्वतांची लेखनशैली जोरदार असून इंग्रजी भाषेवर त्याचें मोठेंच प्रभुत्व होतें. पहिल्यानें कांहीं दिवस रुड्ल्यम रूने लिहीत असे. पण पुढें १९०१ मध्यें तो मेल्यावर ग्रिफिथ सर्व संपादकीय मजकूर लिहूं लागला. संपादकीयाखेरीज इतर नामांकित लेखकांचे विविध विषयांवरील लेख या पत्रांत येत असत. स्वदेशी धंदे, संगीत, खेळ यावर चर्चा येई. आयर्लंडची खनिज संपत्ति, कालवे, रेलवे, दर्शांतर वगैरे विषयावर मुद्देसूद व माहितीपूर्ण लेख या पत्रांत येत. तसेंच जॉन मिकेलेच्या लेखांतील

उतारे व आयरिश पुराणांतील गोष्टीही यांत प्रसिद्ध होत. काव्यें, नाटकें वगैरे-वर टीका–लेख येत. युरोपियन राजकारणाचाही एक स्वतंत्र रकाना असे. हे सर्व लेखक निर्वेतन लिहीत. कारण ग्रिफिथलाच खुद्द फार थोडें वेतन मिळे. पण अशा मोठ्या योग्यतेच्या व काटकसरीनें चालविलेल्या पत्राचें सुद्धां अखेर पैशापायीं दिवाळें वाजलें. जहाल लेखनाबद्दल छापखानदारास दोनतीनदां धमक्या आल्या होत्या. पण सरकारला प्रत्यक्ष खटला करण्याची अखेर गरजच पडली नाहीं. 'युनायटेड आयरिशमन' पब्लिशिंग कंपनीला देणें फार झालें तें फिटेना तेव्हां कंपनीला पत्र बंद करावें लागलें. आणि आफ्रिकेस जातेवेळे-प्रमाणें ग्रिफिथ पुन्हा पण बेकार झाला.

पण वर्तमानपत्राचा संपादक या नात्यानें ग्रिफिथ यास आतां आत्मविश्वास वाटूं लागला असून आपण सुरूं केलेली सिनफेन चळवळ पुढें चालविण्याशिवाय त्यास त्याचें मन स्वस्थ बसूं देईना. 'युनायटेड आयरिशमन' बंद पडतांच ग्रिफिथनें स्वतांच्या जबाबदारीवर 'सिनफेन' हें आपल्या चळवळीचेंच नांव देऊन एक पत्र काढलें (१९०६). यापुढें सिनफेन चळवळीच्या कार्यक्रमाची तो तपशीलवार चर्चा करूं लागला. राष्ट्रीय वृत्ति विद्यार्थ्यांत उत्पन्न होईल अशा रीतीनें विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण दिलें पाहिजे शेतीचें व उद्योगधंद्याचें शिक्षण देण्याची कौंटी कौन्सिलनें तजवीज केली पाहिजे अशी चळवळ त्यानें सुरूं केली. प्रचलित आयरिश बँकांतून लोकांचे पांच कोटी पौंड होते व या बँका या पैशाचा इंग्रजांच्या धोरणाप्रमाणें आयर्लंडला घातक होईल असा उपयोग करीत. या बँकांनीं राष्ट्रीय वृत्ति स्वीकारून स्वदेशकार्यास पैसा लावला पाहिजे असें तो प्रतिपादूं लागला. तसेंच त्यानें संरक्षक जकातीच्या तत्त्वाचा अवलंब करून आयर्लंडचे उद्योगधंदे वाढविले पाहिजेत या संबंधानें विद्वत्तापूर्ण लेख लिहिले. १९०६ पासून दोन वर्षेपर्यंत सिनफेन चळवळीचा प्रसार नॅशनल कौन्सिलनें देशभर अनेक शाखा स्थापून केला. आपलें वजन बरेंच वाढलें असें वाटून तें नक्की अजमावण्याकरितां सिनफेन पक्षानें एक उमेदवार आपल्या तर्फे पार्ले-

मेंटास उभा केला. पण त्याचा सपशेल पराभव झाला. धनिक वर्गांत आपणास कोणी विचारीत नाहीं हें या वेळीं सिनफेन पक्षाचे नजरेस आलें. तरी पण निराश न होतां सिनफेन पक्षानें एक सहकारी पेढी उघडली. तसच स्वराज्याची एक सर्वांगीण घटना त्यांनीं प्रसिद्ध केली व इंग्लंडची सत्ता अमान्य करून या घटनेची शपथ आयर्लंडांतील लोकनियुक्त संस्थांनीं घ्यावी अशी जाहीर विनंति करण्यांत आली. पण हे व असले प्रयत्न यशस्वी होण्याचा काळ अजून दूर होता. इंग्लडांत लिबरल पक्ष अधिकारारूढ असून त्यास लॉर्ड्सची सत्ता कमी करावयाची होती. आणि त्याकरितां रेडमंडच्या मदतीची लिबरल पक्षास गरज वाटली; तेव्हां सहजच पुन्हा होमरूल बिलाची वाटाघाट चालू झाली व आयरिश जनतेचें मन आणखी एकवार आशेनें इंग्लंडकडे वेधलें.

१९०८ नंतरचीं ४।५ वर्षें सिनफेन पक्षास व पत्रास कष्टाचीं गेलीं. तरी पण ग्रिफिथची लेखणी आपलें काम एकनिष्ठेनें व तेजस्वितेनें करीत होती. या काळांत आयर्लंडच्या आर्थिक दुस्थितीबद्दल त्यानें अनेक लेख लिहिले. तसेंच आयर्लंडांत उगीचच पक्षभेदांची गर्दी होऊं नये म्हणून त्यानें आपली लेखणी कोणत्याही विशिष्ट पंथाविरुद्ध न चालवितां आपल्या पंथाच्या शिकवणींत खर्चली. १९१० सालीं रेडमंड होमरूलच्या खटपटींत असतां "त्याला वाटतें तें यश तो मिळवो आपण त्याचे वाटेस जाणार नाहीं" असें ग्रिफिथनें जाहीर केलें. पण पुढें बिलासंबंधीं बोलतांना "होमरूल मिळालें तरी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आयर्लंडचे प्रतिनिधि असावेतच" असें जेव्हा रेडमंडनें आशाळभूतपणें पार्लमेंटमध्यें भाषण केलें तेव्हां मात्र ग्रिफिथनें त्याच्या भाषणाचा फक्त उतारा देऊन त्याचा तिरस्कार केला. १९१२ सालीं आलेलें होमरूल १७८२ सालच्या पार्लमेंटचा अल्पांशही नव्हतें व त्यानें ग्रिफिथचेंच नव्हे तर फक्त रेडमंडखेरीज दुसऱ्या कोणत्याही आयरिश मनुष्याचें समाधान झालें नाहीं. असलें हें तुटपुंजें बिलही अल्स्टरच्या विरोधामुळें आयर्लंडच्या पदरांत शेवटीं

पडलें नाहींच. पण त्याची टोलवाटोलवी लॉर्ड्स व कॉमन्सनीं २ वर्षे चालविल्यामुळें लोकांच्या मनोवृत्तीस त्यानें ओढ लावून टेविली व म्हणून सिनफेन चळवळीस लोकमताचा पाठिंबा मिळणें तितका वेळ कठीण झालें.

लोकसमाजांत सिनफेन चळवळीच्या प्रसारास ग्रिफिथला अशा रीतीनें अपयश येत होतें; पण उलट ग्रिफिथनें न चिंतिलेल्या व न इच्छिलेल्या मार्गांनीं व माणसांकडून सिनफेन तत्त्वज्ञानाचा पुरस्कार, प्रसार व आचार व्हावा अशी आयर्लंडच्या दैवाची घटना इतरत्र बनत होती. ही घटना समजण्यास आयर्लंडमध्यें यावेळीं अस्तित्वांत असलेले पक्ष, त्यांचीं ध्येयें व मार्ग यांची येथें नीट माहिती करून घेतली पाहिजे.

ग्रिफिथ प्रजासत्तावादी नव्हता. "इंग्लंडमध्यें किंग, लॉर्ड्स व कॉमन्स हे राज्यसंस्थेचे तीन घटक आहेत त्याप्रमाणें आयर्लंडमध्येंही किंग, लॉर्ड्स व कॉमन्स–घटित राज्यसंस्था असावी; ती इंग्लिश पार्लमेंटपासून स्वतंत्र असावी; इंग्लंड व आयर्लंड यांचा राजा तेवढा एक असावा व या जोड राज्याच्या ब्रिटिश राज्य व आयरिश राज्य अशा दोन शाखा अथवा दोन दळें असून तीं समान दर्जाचीं असावीं," अशी ग्रिफिथच्या स्वराज्याची रूपरेखा होती. १७८३ सालीं ब्रिटिश पार्लमेंटांत रेनन्सिएशन ॲक्ट पास झाल्यानंतर आयरिश पार्लमेंटचें हेंच स्वरूप होतें व हंगेरीनें ऑस्ट्रियाशीं भांडून अशीच राज्यव्यवस्था मिळविली होती. या राज्यपद्धतीस द्विदळ राजसत्ता (Duel Monarchy) असें तो म्हणे.

पण ग्रिफिथची ही कल्पना आयर्लंडांत सर्वमान्य नसून राज्यव्यवस्थेच्या आणखी तीन कल्पना देशांत या वेळीं वावरत होत्या. ग्रिफिथची जी कल्पना तीच ओकानेलच्या 'रीपील' सभेची कल्पना होती. पण आयझॅक् बट व पार्नेल यांच्या होमरूललीगपासून आयरिश पार्लमेंटला ब्रिटिश पार्लमेंटशीं समान दर्जा मागण्याची पद्धत हळूहळू लोपून गेली. ग्लॅडस्टनचीं दोनही होमरूल बिलें १८८२ च्या पार्लमेंटहून खालच्या दर्जाचीं होतीं; व रेडमंडनें

१९११ सालीं 'आम्ही ब्रिटिश पार्लमेंटास मोठा दर्जा देऊं व प्रतिनिधी पाठवूं' अशी जाहीर कबुली दिल्यामुळें १९१२ चें ॲस्क्विथचें होमरूल बिल तशाच स्वरूपाचें झालें. अर्थात ग्रिफिथच्या कल्पनेहून हें होमरूल फारच हीन दर्जाचें होतें.

ग्रिफिथच्या स्वराज्यकल्पनेशीं बरोबरीनें स्पर्धा करणारी कल्पना आयरिश प्रजासत्ताक बंधुसमाजाची. हा समाज व त्याचे अनुयायी इंग्लंडचें अधिराज्य अथवा इंग्लिश राजाही पत्करण्यास तयार नव्हते. युरोपांतील इतर कोणत्याही राष्ट्राप्रमाणें आपणास स्वतंत्रराष्ट्रत्व असून इंग्लंडशीं युरोपांतल्या इतर राष्ट्राप्रमाणें आपले आंतरराष्ट्रीय संबंध असावेत व देशांत लॉर्ड व कॉमन्स अशा भिन्न सभा नसून एक 'प्रजासत्ताक' ( Republic )पार्लमेंट असावें असें यांचें ध्येय होतें; व योग्य संधि येतांच सशस्त्र बंड करूनही हें स्वराज्य मिळवावें असें यांचें मत होतें. बंडवाल्यांचा हा पक्ष ओकानेलच्या नंतर फेनियन ब्रदरहूड या नांवानें अस्तित्वांत आला. गुप्त कट करणें याखेरीज त्यांना कांहीं मार्ग त्यावेळीं सुचत नव्हता. यांच्या आंगीं स्वार्थत्याग, धैर्य, धडाडी वगैरे जे गुण होते त्या गुणास पार्लमेंटांतील त्या वेळचें संथ राजकारण मानवणारें नव्हतें. पण उलट गुप्त कट करून बंड करणेंही साधत नव्हतें. पार्नेलनें ही परिस्थिति ओळखून आपल्या पार्लमेंटांतील राजकारणासच तडफदारपणाचें स्वरूप दिलें व आपल्या वीरवृत्तीची भूक थोडी तरी शमविण्याची ही संधी कांहीं फिनीयनांनीं घेऊन पार्नेलच्या राजकारणास पुष्कळ हातभार लावला. पार्नेलच्या या युक्तीनें पार्नेलच्या राजकारणास तेज चढलें खरें, पण देशांतील क्रांतिकारक चळवळीस ओहोटी लागली हें दुसऱ्या कांहीं फिनियनांस आवडलें नाहीं. पुढें पार्नेलचें तेजस्वी राजकारणही अखेर निस्तेजच ठरल्यावर पूर्वीच्या फिनीयन पक्षाच्या तरुण अनुयायांनीं 'आयरिश रिपब्लिकन ब्रदरहुड' (I. R. B.) नामक संस्था आपल्या कार्याकरितां काढली. ही संस्था अनुयायी वाढविण्याची फारशी पर्वा न करतां एखाद्या युरोपीयन युद्धांत इंग्लंड पडून अडचणींत येईल तेव्हां आपण

उचल खावयाची असें मनाशीं ठरवून आपलीं हत्यारें पाजळीत व सदासर्वकाळ भावी युरोपीय युद्धाकडे आशेनें पहात बसलेली असे. १९१२–१४ च्या सुमारास पॅट्रिक एच. पीयर्स, रोजर केसमेंट, टॉम क्लार्क वगैरे विद्वान् व तडफदार तरुण या बंधुसमाजाचे पुढारी होते.

पार्लमेंटरी, सिनफेन व प्रजासत्ता ( रिपब्लिकन ) या तिहींहून अल्पमतवाला पण संघटित होऊं लागलेला पक्ष म्हणजे मजूर पक्ष. या पक्षाचें स्वातंत्र्याबरोबरच समाजसत्ता (सोशियालिझम) हें ध्येय असून त्याकरितां राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संप या साधनावर या पक्षाचा भर असे. जेम्स कॉनॉली हा या पक्षाचा पुढारी होता.

सिनफेन, प्रजासत्ता व मजूर या तीन पक्षांचें एकमेकाशीं पटत नसे. संपूर्ण स्वातंत्र्य व सशस्त्र प्रतिकार, अथवा समाजसत्ता, संप या गोष्टी ग्रिफिथला वेडेपणाच्या वाटत. प्रजासत्तावाद्यांना ग्रिफिथचा पंथ संकुचित व दुबळा वाटे. मजूर पक्षास त्यांचें म्हणणें असे कीं, इंग्रजांची सत्ता देशांतून उठून गेल्याखेरीज समाजसत्तेचा प्रश्न सुटणार नाहीं. उलट स्वातंत्र्य मिळालें तरी मजूरांचे हक्क त्यांना मिळण्याची आगाऊच तजवीज नसेल तर तें स्वातंत्र्य व आजचें पारतंत्र्य दोन्ही सारखींच असें मजूर पक्षास वाटे.

हे तिन्ही पक्ष परस्परावर नेहमीं कडक टीका करीत. पण पुष्कळ वेळां त्यांच्यांत ऐक्य उत्पन्न होण्यास एक समानाधिष्ठान मिळत असे. या तीनही पंथांस ब्रिटिश पार्लमेंटांत बसून चळवळ करणें हा मार्ग पसंत नसल्यानें रेडमंडच्या पार्लमेंटरी पक्षाचा नाश करण्याचें सर्वांचें साधारण ध्येय हें तें समानाधिष्ठान होय. या एका कामीं तीनही पक्ष एकजुटीनें वागत व पार्लमेंटरी चळवळी सोडून स्वावलंबनाचा मार्ग लोकांनीं आक्रमावा असें उपदेशीत.

दुसरें एक समानाधिष्ठान आतां या त्रिवर्गांना मिळालें.तें म्हणजे सिनफेनचा कार्यक्रम हें होय. प्रजासत्तावाल्यापुढें बंडाचा मार्ग व स्वातंत्र्याचें ध्येय असलें तरी प्रजासत्ताक राज्य व्यवहार्य व कार्यक्षम कसें करतां येईल याचा आंखीव

नकाशा त्यांचेपुढें नव्हता. विधायक कार्यक्रमाचे अभावीं एकतर बंड करावें नाहींतर पूर्वी फिनीयनांनीं पार्नेलला मदत केली तशी आतां रेडमंडला मदत करावी हे दोन मार्ग त्यांचेपुढें होते. पण एक तूर्त अशक्य व दुसरा दुबळा होता. या दोहोंहून तिसरा असा मार्ग त्यांना सिनफेनपक्षानें दाखविला.

आर्थर ग्रिफिथच्या सिनफेन पक्षाचें वैशिष्टय त्याच्या द्विदळ राजसत्तेंत नसून स्वराज्यस्थापनेच्या व्यावहारिक, सर्वांगीण विधायक कार्यक्रमांत होतें.

सिनफेन पक्षाच्या या कार्यक्रमाचा तपशील येणेप्रमाणें:--आयर्लंडचा पुनरुद्धार करण्याकरितां पहिली पायरी म्हणजे आयरिश लोकांनीं ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता अमान्य करून डब्लिनमध्यें स्वतंत्र राष्ट्रिय सभा स्थापावी व सर्व आयर्लंड मधील लोकनियुक्त संस्थांनीं ब्रिटिश पार्लमेंटऐवजीं या संस्थेचें आधिपत्य कबूल करावें. या सभेनें पुढील पद्धतीनें कामास लागावें.

या सभेनें आयर्लंडमध्यें निवडणुकी कराव्या. निवडलेल्या प्रतिनिधींनीं ब्रिटिश पार्लमेंटला न जातां व १८०० साली झालेला 'संयोगा'चा कायदाच बेकायदा आहे असें ठरवून आयर्लंडचें स्वतंत्र सरकार निर्माण करावें. या सरकारनें—

( १ ) आयरिश भाषाच राष्ट्रभाषा ठरवावी.

( २ ) आयर्लंडचें राष्ट्रीय स्वातंत्र्य व आयर्लंडची संस्कृति यांना पोषक अशी शिक्षणाची दिशा आंखावी.

( ३ ) व्यापारी मालाची ने–आण करण्यास इंग्रजी जहाजांचा उपयोग न करतां आयर्लंडचें व्यापारी आरमार काढावें.

( ४ ) आयर्लंडचीं राष्ट्रीय लवाद कोर्टें स्थापून त्यांनीं प्रचलित सरकारी न्यायकोर्टांचें लोकांतील वजन नाहींसें करावें व तीं निरुपयोगी करून टाकावीं.

( ५ ) अंतर्गत जकात कमी करावी. कालव्यांचें जाळें वाढवावें व सर्व बाजूंनीं दळणवळणाच्या सोयी वाढवाव्या.

( ६ ) परदेशांत आयर्लंडचे वकील नेमावे.

(७) कायद्यानें जकाती वाढवून व लोकांत स्वदेशीचा प्रसार करून पक्क्या मालाच्या निपजेस उत्तेजन द्यावें.

(८) खनिज संपत्तीची वाढ करावी. विशेषतः कोळसा व लोखंड याकरितां विशेष परिश्रम करावे.

(९) देशांतील भांडवल परक्यांच्या उपयोगी न पडतां त्याची वाढ होऊन स्वदेशी धंद्यांना त्याचा उपयोग व्हावा, यासाठीं मतप्रचार करून ब्रिटिश सरकारच्या किंवा अराष्ट्रीय वृत्तीच्या ब्यांकांतून पैसे ठेवण्यापासून लोकांस परावृत्त करावें; आणि नव्या आयरिश सरकारनें व स्वदेशाभिमानी धनिकांनीं ब्यांका काढून लोकांच्या ठेवी घ्याव्या व तें भांडवल कारखानदारांना पुरवावें.

(१०) गरिबाकरितां दवाखाने व दुष्काळावेळीं दुष्काळसंस्था काढून आयरिशप्रजेचें रक्षण व पोषण करावें.

सारांश, स्वराज्यसत्ता जर हवी, तर ती आपणच स्थापावी व आयरिश लोकांनीं स्वतंत्र म्हणून नांदूं लागावें. आणि हें स्वराज्य सर्वांगांनीं संघटित करून प्रजेचें रक्षण, पोषण व संवर्धन हें जें राज्यसंस्थेचें त्रिविध कर्तव्य तें करूं लागावें; म्हणजे आयर्लंडच्या राष्ट्रीय स्वराज्यास स्वयंसिद्ध अस्तित्व व लोकमान्यता मिळेल; असा हा मुख्यतः विधायक स्वरूपाचा कार्यक्रम होता.

आर्थर ग्रिफिथ यानें १४ वर्षे या कल्पनेचा सतत प्रसार केला असून निदान सुशिक्षितास तरी ती घोटून घोटून पढविली होती. या कार्यक्रमांत जें स्वावलंबनाचें तत्त्व आहे, तें प्रजासत्तावाल्यांस फारच पटलें. स्वावलंबनाच्या या तपशीलवार विधायक कार्यक्रमानें आपल्या पक्षास पूर्णता येते हें ओळखून ग्रिफिथचा सिनफेन पक्ष हा जुना सिनफेन व प्रजासत्ताक पक्ष हा नवा सिनफेन असें ते म्हणूं लागले. ग्रिफिथ हा सशस्त्र प्रतिकारास प्रतिकूल असल्यानें स्वातंत्र्यवादी प्रजासत्तापक्षास मान्यता देणारा नव्हता; पण उगीच पक्षोपपक्ष माजून शक्ती पांगूं नये म्हणून १९१० नंतर ग्रिफिथनें आपल्या द्विदळ राजसत्तेचा उच्चारही केला नाहीं. लवकरच या होम

पक्षांचीं तत्त्वें सरमिसळ होऊन या दोघांसही स्वदेशांतील व परदेशांतील लोक सिनफेन म्हणूनच ओळखूं लागले. व पुढें जेम्स कॉनॉली यानेंही या नवीन जोड पक्षास बहुधा पाठिंबाच दिला. अशा रीतीनें सामान्य जनतेचें लक्ष जरी अजून रेडमंडकडेच लागून होतें तरी देशांतील अल्पसंख्याक पण बलसंपन्न असे तीन पक्ष सिनफेन चळवळीवर एकत्र झाल्यामुळें ग्रिफिथच्या तत्त्वज्ञानास व कार्यक्रमास यशाची आशा वाटूं लागली.

ॲस्क्विथचें होमरूल बिल पार्लमेंटमध्यें आल्यापासून आयरिश राजकारण सर्व बाजूंनीं एकदम चैतन्यमय होऊं लागलें. वर सांगितल्याप्रमाणें प्रजासत्ताक, मजूर व सिनफेन हे तीन पक्ष एकजुटीनें मतप्रचार करीत असतां होमरूल बिलास विरोध करण्याच्या हेतूनें कार्सननें अल्स्टरमध्यें जीं स्वयंसेवकदळें उभारलीं त्याचा प्रातिनिधिक बंधुसमाजानें फार मुत्सद्दीगिरीनें फायदा करून घेतला. अल्स्टर पक्षीय कार्सन हा ब्रिटिश पार्लमेंटला धमकी घालण्याकरितां स्वयंसेवक दळें उभारून त्यास परदेशाहून शस्त्रास्त्रें व दारूगोळा बेधडक आणवीत होता. पण होमरूल बिलास विरुद्ध असणाऱ्या कॉन्झर्वेटिव्ह पक्षाचें कार्सन यास पाठबळ असल्यामुळें लिबरल प्रधान मंडळास कार्सन याची बेदिली बंद करण्यास धैर्य होईना. यावेळीं अल्स्टरचें अनुकरण करून आपणही स्वयंसेवक दळें उभारिल्यास सरकारास अल्स्टरचीं दळें मोडतां येत नाहींत म्हणून आपलींही दळें मोडणें अशक्य होईल व मग सहजच हीं दळें पुढेंमागें कराव्या लागणाऱ्या बंडाचे वेळीं आपणांस उपयोगी पडतील असा अंदाज बांधून प्रजासत्ता पक्षानें स्वयंसेवक दळें उभारण्याचा उपक्रम केला. सशस्त्र बंडास ग्रिफिथ अनुकूल नव्हता; तरी पण 'लष्करी शिक्षणानें तरुणांत तडफ, कर्तबगारी व शिस्त हे गुण उत्पन्न होतात व या गुणांखेरीज कोणत्याही चळवळी यशस्वी होणार नाहींत,' असा युक्तिवाद करून ग्रिफिथ यानें स्वयंसेवक दळाच्या चळवळीस चांगलाच पाठिंबा दिला. स्वयंसेवकांच्या या चळवळीस कल्पनेबाहेर यश आलें. हजारों तरुण स्वयंसेवक झाले व लवकरच स्वयंसेवकांची संख्या ४०००० वर केली.

लहान मोठ्या शहरांतून मैदानावर सर्व लोकांसमोर या दळांच्या परेडी चालू झाल्यानें लोकांचें मन पुन्हा स्वातंत्र्यप्रेमानें भरून जाऊं लागलें व पार्लमेंटरी पक्षास होमरूल मिळविणें दिवसानुदिवस बिकट होऊं लागल्यामुळें समाजांत त्या पक्षाचें वजन कमी होऊन स्वयंसेवक दळें, सिनेफन, स्वातंत्र्य वगैरेकडे लोकमत बरेंच जोरानें ओढ घेऊं लागलें. पण अजून पार्लमेंटरी पक्षास आणखी एक लोकप्रियतेची संधि मिळावयाची होती. ती युरोपांतील महायुद्धानें त्यास मिळवून दिली. मात्र ही शेवटचीच संधि ठरली.

१९१४च्या आगष्टमध्यें युरोपमध्यें महायुद्ध सुरू होऊन इंग्लंडास त्या युद्धांत पडावें लागलें तेव्हां प्रधानमंडळास सर्व पक्षांच्या ऐक्याची तीव्र गरज भासूं लागली. परराष्ट्रीय मंत्री सर एडवर्ड ग्रे यांनीं हौस ऑफ कॉमन्समध्यें भाषण करून सर्व पक्षांस मदतीस आवाहन केलें व आयरिश सभासदांची व आयरिश राष्ट्राची राजनिष्ठेकरितां तोंडभर स्तुति करून इंग्लंडच्या या अडचणीच्या प्रसंगीं संयुक्त राज्याचा प्रमुख अवयव असलेल्या आयर्लंडनें संयुक्त राज्याच्या रक्षणार्थ धावलें पाहिजे अशी आग्रहाची व प्रेमाची विंनति केली. या विंनतीनें मोहून जाऊन रेडमंडनें तेथल्या तेथें राजनिष्ठापूर्वक मदतीचें आश्वासन दिलें. मग आयर्लंडला आल्यावर त्यानें सरकारच्या मदतीनें हस्तपत्रकें, वर्तमानपत्रें, व्याख्यानें यांचा पाऊस पाडून सर्व आयर्लंडभर राजनिष्ठेचा महापूर वाहविला; व भोळी बिचारी आयरिश जनता या पुरांत वाहवलीही. आर्थर ग्रिफिथनें रेडमंडच्या या धोरणाचा कडक भाषेनें निषेध केला, पण राजनिष्ठेच्या महापर्वणींत रेडमंड व जनता यांना ग्रिफिथचा आक्रोश ऐकण्यास सवड कोठें होती! लवकरच राजद्रोही वर्तमानपत्रांची वडवड बंद करण्याकरितां सरकारनें युद्ध सुरू झाल्यानंतर तीनच महिन्यांत सर्व राष्ट्रीय वृत्तपत्रें बंद पाडलीं त्यांतच ग्रिफिथच्या सिनेफन पत्राचीही आहुति पडली.

सिनफेन पत्र बंद पडलें तेव्हां ग्रिफिथ 'सीझर्स ॲन्ड पेस्ट' (कात्री व खळ) नांवाचें पत्र आठवड्यांतून दोनदां काढूं लागला. याच्या पहिल्या अंकांतील

संपादकीय लेखांत "युरोपांत सर्व्हिया, बेल्जम वगैरे राष्ट्रं शस्त्र घेऊन स्वातंत्र्यार्थ लढत आहेत, पण आमच्या देशांत आम्ही लेखणीनें युक्तिवाद करूं म्हटलें तरी छापखाने जत होतात. अद्याप देशांत कात्री आणि खळ यांना मात्र सरकारनें प्रतिबंध केलेला नाहीं" असें लिहिलें होतें सरकारच्या तावडींतून हें पत्र सुटून आपल्या मताचा मात्र प्रसार व्हावा याकरितां ग्रिफिथनें ही एक युक्ति योजिली. सीझर्स म्हणजे कात्री व पेस्ट म्हणजे कागद चिकटविण्याची खळ. इतरत्र प्रसिद्ध होऊन सरकारनें आक्षेप न घेतलेले लेख आम्ही कात्रीनें कापून आमच्या पत्रावर खळीनें चिकटवूं—तात्पर्य या पत्रांत स्वतंत्र लेख न लिहितां आम्ही फक्त उतारे छापूं असें ग्रिफिथनें वर्तमानपत्राच्या नांवावरून सुचविलें. 'सीझर्स ॲन्ड पेस्ट' या पत्रांत पहिल्या अंकानंतर संपादकीय मजकूर मुळींच आला नाहीं. टाइम्स, डेली मेल्स मॉर्निंग पोस्ट वगैरे पत्रांतील महायुद्धाच्या बातम्या, थॉमस डेव्हिसच्या निबंधाचे उतारे वगैरे या पत्रांत येत. डेली मेलमध्यें फ्रान्तविरुद्ध बरेच लेख येत. त्याचे उतारे ग्रिफिथ छापीत असे. एक महिनाभर हें पत्र चाललें असतां एक दिवस आयरिश टाइम्स मधील एक उतारा ग्रिफिथनें छापला; त्यानें आयरिश टाइम्सला इजा न होतां ग्रिफिथच्या पत्रास मात्र देहांत प्रायश्चित्त मिळालें. वेक्सफोर्ड रोमन कॅथोलिक चर्चला १९१५ च्या जानेवारी महिन्यांत एक दिवस एक जाहिरात चिकटविली होती. तींत असा मजकूर होता—" नागरिक हो, जर्मनी आयर्लंडमध्यें येईल तर त्यास दाणापाणी देऊन मदत करा. जर्मनी त्याची भरपाई करून देईल व आपणांस इंग्रज अमलापासून सोडवील." हा मजकूर सरकार पक्षीय आ० टाइम्सनें छापला. ग्रिफिथनें त्यांतून उतारा घेतला. पण तो छापल्याबद्दल सरकारनें ग्रिफिथचें पत्र बंद पाडलें. तरी पुढें दोनच आठवड्यांत 'आयरिशवर्कर' हें मजूर पक्षाचें पत्र राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करूं लागलें आणि ग्रिफिथनेंही डब्लिनमध्यें छापखानेवाला मिळेना तरी बेलफास्ट मध्यें एका छापखानदारास गाठून 'नॅशनॅलिटी' हें पत्र सुरू केलें.

हीं एक दोन वर्षें ग्रिफिथला फार निराशेचीं गेलीं. वर्तमानपत्रें हें त्याचें

मुख्य हत्यार. पण सरकारच्या रोषामुळें त्यास छापणाराच कोणी भेटेना. दारिद्य तर आयुष्यभरच त्याच्या मागें लागलें होतें. ठिगळ लावण्याकरितां एक दिवस चांभारानें बूट नेला असतां दुसरा बूट नाहीं म्हणून त्या दिवशीं तो बाहेर न जातां नुसते पायमोजे घालून घरींच राहिला. ग्रिफिथ ध्येयवादी असल्यानें दारिद्र्याला डगमगणारा नव्हता. पण महायुद्धाचे सुरवातीपासून आयर्लंडमध्यें राजनिष्ठेचें जें खूळ माजलें होतें त्यामुळें आतां राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना उत्पन्न होण्याची त्यास आशा वाटेना. तो स्वभावाचा थंड, तर्कशील, एकांतवासी असा होता. यामुळें वर्तमानपत्रांत लिहिण्याखेरीज त्याच्या हातन दुसरें कांहीं होत नसे. त्याचें सिनफेन तत्त्व शांतपणें सुविचारानें निश्चयानें व हळू हळू प्रयत्न करून यशस्वी करतां येईल असें होतें. सामान्य जनतेचा चित्तक्षोभ करील असें भव्य व देदीप्यमान वाटण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतें. स्वयंसेवकांच्या चळवळीस त्याची सहानुभति होती, पण तींतही तो प्रत्यक्ष भाग घेईल असा त्याचा खटपट्या स्वभाव नव्हता. सतत चिकाटीनें विचारप्रसार करून मतपरिवर्तन करणें एवढेंच त्याला साधे व हें बहुमोल कार्य त्यानें सतत सोळा वर्षे दारिद्र्य पत्करून व कोणाचेंही उत्तेजनाची अपेक्षा न करितां केलें होतें. त्याचा उपयोग होऊन देशांतील कर्तबगार अशा जहाल पुढाऱ्यांनीं त्याच्या मताचा आपल्या कार्यक्रमांत समावेश करून घेतला होता. अशा प्रकारें संथपणें चालविण्याच्या मतपरिवर्तनाचा व्हायचा तेवढा उपयोग होऊन गेला होता. आतांचें काम सुशिक्षितांचें व सामान्य जनतेचें निवळ मतपरिवर्तन करण्याहून बऱ्याच निराळ्या प्रकारचें होतें. इंग्रजांनीं व पार्लमेंटरी पक्षानें चालविलेल्या खुशामतीनें व उत्पन्न केलेल्या साम्राज्यनिष्ठेनें सर्व आयर्लंड सिनफेन तत्वें व पं स्वातंत्र्य यांस विसरल्यासारखें झालें होतें. अशावेळीं परकी राज्यकर्त्यांच्या कपटी कुरवाळण्यानें मोहांध होऊन परकी सत्तेच्या कच्छपीं लागलेल्या नादान जनतेंत अकस्मात स्वातंत्र्यप्रेम पेरून त्यांस राष्ट्रीय स्वातंत्र्याचे युद्धास उद्युक्त करण्याचें कर्तृत्व उत्पातशील क्रांतिकारकांना साधतें. झपाट्यानें उसळी

मारून व देदीप्यमान आत्मयज्ञ करून अशीं माणसें समाजाच्या मनोवृत्तींचा एकदम ठाव घेतात; व त्यानें समाज खडबडून जागा होऊन त्यांत नवचैतन्य संचारतें. आयर्लंडांत असा पक्ष यावेळीं होता व त्यानें आपली कामगिरी उत्कृष्टपणें बजाविली.

आयरिश रिपब्लिकन ब्रदरहुडचे सभासद उघड बंड करण्याकरितां ज्या युरोपीय युद्धाची वाट पहात होते तें युरोपीय युद्ध १९१४ सालीं सुरू होऊन अपेक्षेप्रमाणें इंग्लंडही त्यांत सामील झालें. तेव्हां प्रजासत्ताक पक्षानें स्वयंसेवकांच्या पथकासह बंड करण्याची तयारी चालविली. देशांत राजनिष्ठेचें जें वातावरण निर्माण झालें होतें त्यानें या पक्षासही निराशा व संताप उत्पन्न झाला होता. जनतेंत राष्ट्रीय वृत्ति जागृत करण्यास कोणताही सामान्य उपाय निरुपयोगी आहे असें दिसत असल्यानें उघड बंड करून एक तर राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवूं किंवा बंड फसल्यास आत्मयज्ञानें राष्ट्रास लाजवून व आळवून त्यांत स्वातंत्र्यतेज उत्पन्न करूं अशा विचारानें प्रजासत्ताक पक्षानें बंडाचा विचार कायम केला. व रोजर केसमेंट हा बंडाकरितां जर्मनीची मदत मागण्यास गेला. ती मदत मिळणार असें कळल्यावर बंडाची तयारी जोरानें सुरू झाली. ठरल्याप्रमाणें जर्मनीची मदत आलीही, पण प्रजासत्तावाल्यांची व जर्मनांची अखेर चूकामूक झाली. जर्मन मदतीच्या अभावीं बंड अयशस्वी होणार हें ठाऊक असूनही राष्ट्रांत निदान स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत उत्पन्न व्हावी या इच्छेनें प्रजासत्तावाल्यांनीं बंड करून अखेर आत्माहुती देण्याचा निश्चय केला.

ठरल्याप्रमाणें १९१६ च्या ईस्टर सणांत म्हणजे एप्रिल २४ तारखेस सोमवारीं डब्लिनमध्यें प्रजासत्ता पक्षानें प्रजासत्ताक राज्याचा पुकारा करून बंडाचें निशाण उभारलें. बंडवाल्यांनीं ३।४ दिवस धुमाकूळ उडवून दिला. पण ज्या जनतेच्या कल्याणास्तव बंडवाले आशा चढाईस उद्युक्त झाले होते त्या राजनिष्ठ जनतेनें सरकारची कड घेऊन बंडवाल्यांवर रस्तोरस्तीं हत्यार चालविलें, व बंडवाल्यांच्या

बायकामुलांवरही हात टाकण्यास कमी केलें नाहीं. बंड जेमतेम पांच दिवस टिकलें व ता. २९ रोजीं सर्व बंडवाल्यांनीं हत्यारें खालीं ठेविलीं. या वेळीं फ्रान्सच्या रणभूमीवर संयुक्तांचा नित्य पराजय होत असल्यानें ब्रिटिश प्रधानमंडळ चिडून व वैतागून गेलें होतें. या वैतागाच्या भरांत आयरिश बंडवाल्यांचा मात्र सरकारनें क्रूरपणें सूड घेतला. वास्तवीक जनतेचा सरकारला पाठिंबा होता. बंडवाल्यांशीं थोडें दयेचें वर्तन केलें असतें तर सरकारची इभ्रत फारच वाढली असती. पण ॲस्किथच्या प्रधानमंडळाचें डोकें ठिकाणावर नव्हतें. बंडाचा मोड करण्यास जनरल मॅक्स्वेल आला. त्यानें हातीं आलेल्या बंडवाल्यांपैकीं १५ जणांस कोर्टमार्शलनें चौकशी करून गोळ्या घालून ठार मारलें; १६० लोक तुरुंगांत घातले व १८४१ लोकांना हद्दपार करून इंग्लंडमधील वेल्स प्रांतांत अटकबंदींत ठेविलें. मारले गेलेल्यांत पॅट्रिक पीयर्स, जॉन कॉनॉली, टॉमक्लार्क वगैरे विद्वान लेखक व नामांकित देशभक्त होते. ग्रिफिथ यानें अर्थातच बंडांत मुळींच भाग घेतला नव्हता. पण निवळ संशयावरून बंडानंतरच्या धरपकडींत त्यासही पकडून वेल्समध्यें नेऊन टाकण्यांत आलें.

खुद्द बंडवाल्यांचा पाडाव झाला खरा, पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणें लोकमतांत मात्र इष्ट ती खळबळ उडाली. सरकारनें दाखविलेल्या सूड बुद्धीनें लोकांना सरकारची किळस वाटूं लागून राजनिष्ठेचा पूर हळू हळू ओसरला. शॉ नामक लेखकानें डेली न्यूज पत्राच्या १० मेच्या अंकांत सरकारी धोरणावर कडक टीका करून स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. वुइल्यम ओब्रायन हा आपल्या पत्रांतून बंडवाल्यांचें उघड समर्थन करूं लागला. जॉन डिलन या पार्लमेंटमधील आयरिश सभासदानें तर संतापून जाऊन भर पार्लमेंटांत स्वातंत्र्यवादावर प्रखर व्याख्यान झोडलें. हीच वृत्ती एकंदर जनतेंतही बळावूं लागली. बंडाचे वेळीं खुद्द लोकांनीं स्वतःच बंडवाल्यांवर हत्यार चालविलें खरें, पण बंडवाल्यांना नंतर सरकारनें क्रूरपणें वागविलें म्हणून ती जनता आतां बंडवाल्यांचेंच समर्थन व जयजयकार करूं लागली. पूर्वी राजनिष्ठेस भरती आली होती, त्याहून अधिक आतां

देशनिष्ठेस आली. ज्यांनीं बंडांत भाग घेतला नाहीं व वेळीं बंडवाल्यांवर गोळ्या झाडल्या तींच माणसें बंडवाल्यांचा जयघोष करून त्यांच्या मालिकेंत खोटेंही गोवून घेण्यांत भूषण मानूं लागलीं. आतां सिनफेन पक्ष व तत्त्वें यांना महत्त्व आलें. मूळ सिनफेन पक्षाचा या बंडांत कांहींच संबंध नव्हता. पण नेहमींच सरमिसळीनें बोलण्याची सवय असणाऱ्या जनतेनें पुष्कळदा कानीं पडलेला सिनफेन शब्द आतां उचलून त्यासच बंडाच्या कर्तृत्वानें भूषविलें व सर्वत्र सिनफेनचीं तत्वें समजून घेण्याची हाकाटी सुरू झाली. इकडे प्रधानमंडळांत उलथापालथ होऊन नवीन प्रधान लॉइडजॉर्ज यांनीं आयर्लंडांतील वातावरण शांत करण्याकरितां १९१६ चे अखेर हद्दपार केलेल्या ६०० लोकांना परत आयर्लंडांत पाठविलें. त्यांत ग्रिफिथही परत आला. बंडामुळें त्यास खिन्नता आली होती. पण आतां देशांत उसळलेली स्वातंत्र्यप्रेमाची लाट पाहून तो आनंदभरित झाला. त्यानें लागलीच 'नॅशनॅलिटी' पत्र सुरू करून 'सिनफेन' ची मोहिम जोरानें सुरू केली. १९१७ सालीं लॉइड जॉर्ज यांनीं आयर्लंडांत सर्वपक्षीय सभा भरवून आयर्लंडनें आपलें काय म्हणणें आहे तें कळवावें म्हणून खटपट केली. त्याकरितां तुरुंगांतील व हद्दपार सर्व कैदी सोडून देण्यांत आले. त्यांत बंडांतील एक पुढारी डी व्हॅलेरा हा सुटला तेव्हां लोकमत अजमावून पाहण्याकरितां क्लेअर कौंटीतर्फे सिनफेन पक्षानें त्यांस आपला उमेदवार म्हणून पार्लमेंटच्या निवडणुकीस उभें केलें. व्हॅलेरा तो प्रचंड बहुमतानें निवडून आला. यामुळें आत्मविश्वास वाढून सिनफेन पक्षानें सर्वपक्षीय परिषदेवर बहिष्कार घातला.

यापुढें सिनफेन चळवळींत इतका जोम उत्पन्न झाला कीं, स्वतः ग्रिफिथ-च्याही नियंत्रणाखालीं ती राहिली नाहीं व चळवळीस अत्याचारी स्वरूप येणार असें उघड दिसूं लागलें. १९१७ सालीं सिनफेन पक्षाची जी परिषद भरली तींत आर्थर ग्रिफिथनें आपलें अध्यक्षपद डी व्हॅलेरा याचे गळ्यांत घातलें. तेव्हां तर सिनफेन पक्ष व रिपाब्लिकनपक्ष एक झाले हें उघडच झालें. आयर्लं-

डांत लष्करभरती करावी असा ठराव पार्लमेंटमध्यें पास झाला, तेव्हां आयर्लंडांतील तरुणांनीं त्यास विरोध म्हणून हातीं शस्त्र घेऊन पोलिसावर गुप्त हल्ले सुरूं केले. १९१८च्या आरंभीं ग्रिफिथ, व्हॅलेरा आणि शेकडों सिनफेनर्स यांना पकडून सरकारनें पुनः तुरुंग भरले. पण अशानें सिनफेनर्स आतां हटण्यासारखे नव्हते. १९१८ ची पार्लमेंटची जनरल इलेक्शन झाली. तींत आयर्लंडच्या १०६ जागांपैकीं ७३ सिनफेनर्स निवडून आले. यांनीं ब्रिटिश पार्लमेंटला न जातां आयर्लंडमध्यें सिनफेन तत्वानुसार 'डेल आयरेन' नांवाची आयर्लंडची स्वतंत्र पार्लमेंट स्थापन केली. हें पार्लमेंट म्हणजे सर्व आयुष्यभर ग्रिफिथच्या हृदयाशीं खिळून राहिलेल्या अमूर्त कल्पनेची मूर्त प्रतिमा होती. पण दैवदुर्विलास असा कीं या पार्लमेंटची स्थापना ग्रिफिथ यास अमान्य असलेल्या सशस्त्र प्रतिकार पक्षानें केली. ग्रिफिथ स्वतः यावेळीं तुरुंगांतच होता. व डेल आयरेनचें पुढारीपण मायकेल कॉलिन्स, कॅथल ब्रूगा यांसारख्या ईस्टर बंडांतील शस्त्रबहादर तरुणांकडे होतें. या तरुणांनीं टोळ्या टोळ्या करून पोलिस व सरकार यांजवर बेधडक हल्ले सुरूं केले. यास प्रतिकार म्हणून सरकारनेंही लष्करी कायदा पुकारून आयर्लंडांत रक्तपात व जुलूम याची मोहिम सुरूं केली. १९१८ सालीं महायुद्ध संपल्यावर सिनफेन पक्षानें तहपरिषदेकडे दाद लावून घेण्याची खटपट केली. पण तेथें त्यांस कोणीच विचारीना व अमेरिकन तहमंडळानें डेल आयरिनच्या प्रतिनिधींची गांठ घेण्याचेंही नाकारलें. इकडे १९१९ च्या फेब्रुवारींत कॉलिन्स व हॅरिबोलंड यांनीं कारस्थान करून व्हॅलेरास तुरुंगांतून गुप्तपणें सोडवून घेऊन अमेरिकेस पाठविलें. त्यानें अमेरिकेंत आयर्लंडकरितां लोकमत अनुकूल करून घेण्याची कामगिरी फारच चांगल्या प्रकारें बजाविली. त्यानें डेल आयरेनच्या नांवावर अमेरिकेंत हजारों डॉलर कर्ज उभारलें. या पैशाचा त्यावेळीं कॉलिन्स वगैरे पुढाऱ्यांस फारच उपयोग झाला. १९१९ च्या मार्चमध्यें सर्व कैदी बंधमुक्त झाले, त्यांत ग्रिफिथही सुटला. या वेळीं व्हॅलेरा डेल आयरेनचा अध्यक्ष असून तो अमेरिकेंत होता. तेव्हां ग्रिफिथ यास

उपाध्यक्ष नेमण्यांत येऊन त्याकडे अध्यक्षाची कचेरी सोपविण्यांत आली. कॉलिन्स वगैरे तरुणांनीं या वेळीं चालविलेली ठोकाठोकी ग्रिफिथ याच्या मनोवृत्तीस मानवणारी नव्हती. पण तीस आळा घालणेंही त्याच्या आवाक्यांत नव्हतें. याच वेळीं कॉलिन्स वगैरे तरुणांनीं सिनफेनच्या विधायक कार्यक्रमाचाही अमल जारीनें सुरू करण्याची खटपट चालविली होती; तिकडे ग्रिफिथनें लक्ष घातलें.

१९२० सालीं आयर्लंडला स्वराज्य देण्याचें बिल पार्लमेंटांत प्रधान मंडळानें पास करून घेतलें. यांत अल्स्टरला व दक्षिण आयर्लंडला वेगळी पार्लमेंट देण्यांत आली होती. व आर्थिक, लष्करी, आरमारी सत्ता, पोस्ट खातें हीं साम्राज्य सरकारनें आपल्याच हातीं ठेविलीं होतीं. पण मागून अर्धें मिळत नाहीं तेव्हां हिसकून सगळेंच घेण्यास सज्ज झालेल्यांना अर्ध्याकरितां झोळी पुढें करा म्हणणें आतां निव्वळ हास्यास्पद होतें. आयरिश जनतेनें या बिलाकडे नुसतें ढुंकूनही पाहिलें नाहीं. आयर्लंडमध्यें स्वयंसेवक तरुणांचे अत्याचार व लष्करची दंडुकेशाही यांचे हल्ले प्रतिहल्ले चाललेच असून कोणीच कोणास हार जाईलसें दिसेना. तिकडे डी व्हॅलेरानें अमेरिकन लोकमत अत्यंत प्रक्षुब्ध केलें. यावेळीं सर्व जगाचे आयर्लंडकडे डोळे लागून राहिले होते. डेल आयरिनच्या तरुण पुढाऱ्यांनीं आयर्लंडमधील ब्रिटिश सत्तेचीं हाडें खिळखिळीं करून टाकलींच होतीं. जगांत इतरत्रही ब्रिटिशांची नाचक्की होऊन ब्रिटिश प्रधानमंडळ बावरून गेलें होतें. आयर्लंडांत चालू असलेल्या दडपशाहींत जे लोक पकडून तुरुंगांत टाकले होते, त्यांपैकीं कित्येकांनीं तुरुंगांत राहूनही देशसेवा करण्याचें मनांत आणिलें व 'आम्ही ब्रिटिशांच्या तुरुंगांत अन्नग्रहण करणार नाहीं' असें जाहीर करून प्रायोपवेशनाचें व्रत अंगिकारिलें. यानें आयर्लंडच्या प्रश्नाचें महत्त्व सर्व जगांत अधिकच वाढलें. अशा कैद्यांपैकीं प्रख्यात लेखक व कॉर्कचा लॉर्ड मेयर टेरेन्स मॅकस्विनी यानें ७४ दिवसपर्यंत अन्नग्रहण न केल्यानें व्याकुळता येऊन १९२१ च्या मार्चमध्यें

त्याचें प्राणोत्क्रमण झालें. आतां मात्र आयर्लंडचा प्रश्न वाटेल तितकें पडतें घेऊन मिटविणें इंग्लंडला जगांतील आपल्या इभ्रतीच्या दृष्टीनें अत्यवश्यक वाटूं लागलें. त्याप्रमाणें १९२० सालीं अल्स्टरला दिलेल्या बेलफास्ट येथील पार्लमेंटच्या अनावरणप्रसंगीं राजेसाहेबांच्या भाषणांत इंग्लंडनें नमतें व मिटतें घेण्याचें ठरविलें आहे असें सूचित करून थोड्याच दिवसांत आयर्लंडांतील लष्करी सरकारनें डी व्हॅलेराशीं युद्धतहकुबीचा करार केला व लॉइड जॉर्ज यांनीं डी व्हॅलेरास आयर्लंडचा पुढारी या नात्यानें तहाची वाटाघाट करण्यास लंडनला येण्यास सन्मानपूर्वक आमन्त्रण पाठविलें; व जो स्वातंत्र्याचा लढा आयर्लंडनें यत्नांची शिकस्त करून व शेकडों सुपुत्रांचे बळी देऊन आज शतकानुशतकें चालू ठेवला होता त्या लढ्याची एकदां अखेर होऊन आयर्लंड यशस्वी होणार अशी सर्व जगांतील राष्ट्रांना आशा वाटूं लागली.

डी व्हॅलेरा व लॉइड जॉर्ज यांच्या पुष्कळ मुलाखती झाल्या, पण समेटाचें कांहीं चिन्ह दिसेना. शेवटीं लॉइड जॉर्ज, बोनार लॉ, चर्चिल वगैरे इंग्लंडचे मंत्रि व ग्रिफिथ, कॉलिन्स वगैरे आयर्लंडचे पांच प्रतिनिधी यांची बैठक होण्याचें ठरलें. डी व्हॅलेरा या बैठकीस जावयाचा नव्हता. या बैठकींत वाटाघाट पुष्कळ होऊन शेवटीं इंग्लंडनें अखेरच्या म्हणून घातलेल्या अटी आयरिश सभासदांनीं मान्य केल्या. ग्रिफिथ यास या अटी पसंत नसाव्या असें दिसतें. कारण समेटाची तार डी व्हॅलेरास करतांना "आमच्या डोक्यावर पिस्तुल रोखून अटी गळ्यांत बांधण्यांत आल्या," असें त्यानें तारेंत म्हटलें होतें. या अटींत अल्स्टर व दक्षिण आयर्लंड यांना वेगळीं वेगळीं पार्लमेंटें देण्यांत आलीं. दक्षिण आयरिश सरकारास 'आयरिश फ्रीस्टेट' असें नांव दिलें असून प्रस्तुत समेटास 'इंग्लिश पार्लमेंटनें दिलेल्या सुधारणा' असें न म्हणतां आयर्लंडचा स्वतंत्र राष्ट्र असा दर्जा मान्य केल्याचें सूचक म्हणून समेटास 'ट्रीटी' अथवा तह असें नांव दिलें होतें; पण प्रत्यक्षतः इंग्लंडच्या अंकितत्वाचा शिक्का म्हणून पार्लमेंटनें आयर्लंडचा मुख्य गव्हर्नर नेमणेचा होता. परराष्ट्रीय

संबंधांतही इंग्लंडशिवाय स्वतंत्रपणें कांहीं करण्यास सत्ता नव्हती. आरमारी व लष्करी सत्ता पांच वर्षेपर्यंत इंग्लंडकडेच राहावयाची होती. एवढ्या मर्यादेच्या आंत माल सर्वच बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. हा 'तह' घेऊन ग्रिफिथ प्रतिनिधी मंडळासह आयर्लंडला परत आला. डी व्हॅलेरास हा तह आवडला नाहीं. त्यानें डेल आयरेनच्या भरबैठकींत ग्रिफिथ–कॉलिन्सवर अधिकारातिक्रम केल्याचा आरोप केला. पण डेल आयरेनचा कल तह स्वीकारण्याकडे आहे असें पाहून डी व्हॅलेरानें अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपल्यावर तरी वृथा जबाबदारी कशाला, असें म्हणून ग्रिफिथनें 'ट्रीटी मान्य कीं अमान्य' या मुद्द्यावर नवी निवडणूक केली. तींत लोकनियुक्त बहुमतानें तहाचा स्वीकार करावा असें ठरविलें. तेव्हां १९२२ च्या आरंभीं फ्रीस्टेटची रीतसर स्थापना होऊन आर्थर ग्रिफिथ फ्रीस्टेटचा पहिला अध्यक्ष निवडला गेला.

हें अध्यक्षपद फार दिवस अथवा सुखानें ग्रिफिथला उपभोगावयास मिळालें नाहीं. आयुष्याच्या आरंभापासून दारिद्र्य, काळजी व कष्ट यांत त्याचें आयुष्य गेलें होतें, तसेंच तें शेवटपर्यंतही जावयाचें होतें. त्यानें डी व्हॅलेराशीं समेट करण्याचा प्रयत्न केला. पण 'आयरिश प्रजासत्ताकाखेरीज मी कोणाचाही प्रजाजन होणार नाहीं, माझें युद्ध अजून चालू आहे' असें त्यानें जाहीर केलें. तेव्हां फ्रीस्टेटनेंही जून १९२२ मध्यें शस्त्र हातीं धरलें. आणि मग ज्या वीरांनी एक वर्षापूर्वी खांद्यास खांदा लावून इंग्रजाशीं मोठ्या निकरानें सामना दिला त्यांनीं तितक्याच निकरानें आतां परस्परांच्या माना चिरण्यास सुरवात केली. पहिल्यानें व्हॅलेरास थोडें यश आलें, पण ७।८ महिने सतत झगडा चालवून अखेर फ्रीस्टेटनें बंडवाल्यांस शस्त्र खालीं ठेवण्यास भाग पाडिलें.

ही यादवी संपेपर्यंत ग्रिफिथ जगला नाहीं. ऑगष्ट १९२२ च्या १२व्या तारखेस आफिसला निघतांना तो जिना उतरून खालीं आला व बुटाची लेस आवळण्याकरितां खालीं वाकला, तोंच त्यास रक्ताची गुळणी आली व पुढें अर्ध्या तासानें त्याचा अंत झाला. मरणसमयीं त्याचें वय अवघें पन्नास वर्षांचें होतें.

आयरिश राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या इतिहासांत ग्रिफिथ हा संस्मरणीय पुरुष होऊन गेला यांत शंका नाहीं. वर्तमानपत्रकार या नात्यानें तो तडफदार, विद्वान व चतुरस्त्र लेखक होता. आयर्लंडसंबंधीच्या कोणत्याही प्रश्नाविषयीं आधारपूर्वक माहितीनें तो नेहमीं बोलूं शकत असे. त्याच्या वर्तमानपत्रांवर सरकारानें संकटावर संकटें आणलीं, पण त्याच्या लेखणीची तीक्ष्णता अथवा मत-प्रचाराचा व वर्तमानपत्राचा हव्यास कधींही कमी झाला नाहीं. हंगेरीच्या इतिहासांत त्यास आढळलेलें स्वावलंबी राजकारणाचें तत्त्व स्वदेशास शिकवून त्यानें आयर्लंडच्या राष्ट्रीय इतिहासांत मोठीच क्रांति घडवून आणिली. निःशस्त्र प्रतिकाराच्या त्याच्या मार्गानें त्यास त्याच्या हयातींत यश मिळालें असतें असें वाटत नाहीं. पण पन्नास वर्षें दंडवाल्यांचा पक्ष अस्तित्वांत असतां विधायक कार्यक्रमाचे अभावीं वाया चालला होता, त्यास सिनफेनच्या कार्यक्रमानें मुबलक काम मिळालें. व त्यास आवडल्या राष्ट्रसेवेस तो पक्ष उपयोगी पडला याचें बरेंच श्रेय ग्रिफिथ यासच आहे. महायुद्ध संपल्यानंतर सर्व युरोप खंडांत मोठा दुष्काळ पडला व इंग्रज अधिकारी आयर्लंडमधून इंग्लंडमध्यें धान्य वगैरे सामुग्री नेऊं लागले. पण डेल आयरिनच्या अधिकाऱ्यांनीं ठिकठिकाणीं दुकानें घालून आयरिश शेतकऱ्यांचें धान्य विकत घेतलें व आयरिश लोकांसच तें पुरविलें आणि मतप्रसार, धाक अथवा दंडुके-शाही यांनीं स्वदेशांतून धान्य बाहेर जाण्यास चांगलाच प्रतिबंध केला. या लोकोपयोगी कार्यक्रमानें ब्रिटिशसरकारची इभ्रत आयर्लंडांत कमी होऊन डेल आयरेन आयर्लंडांत फारच प्रिय झाली. आर्थर ग्रिफिथच्या पूर्वीं अशा प्रत्यक्ष लोकोपयोगाच्या कल्पना दंडवाल्यांना सुचत वा पटत नसत. प्रत्यक्ष कर्तृत्वाचे फारसे गुण ग्रिफिथमध्यें नव्हते. तो घुम्या, गर्विष्ठ व एकांतवासी होता. मनुष्यस्वभावाचें ज्ञान बेताचेंच असल्यामुळें हाताखालीं माणसें वागवून त्यांच्याकडून कामें करून घेण्याचें पुढारपण त्याला साधत नसे. पण त्याचें देशप्रेम अलोट होतें. तसाच तो निर्लोभी असून एकमार्गी आणि चिकाटीचा होता. म्हणून सर्व जन्मभर मत-

परिवर्तनाचें चेचरट काम त्याच्यानें करवलें. दीर्घकालानें का होईना पण त्याचीं तत्त्वें लोकांस पटून तीं यशस्वी झालेलीं त्यास पाहतां आलीं हें त्याचें भाग्य व त्याच्या श्रमाचें योग्य पारितोषिक होय.

व्हॅलेरा व ग्रिफिथ यांचा जो शेवटीं मतभेद झाला त्यांत कोणाकडे किती दोष याचा निर्णय देणें बरेंच कठीण आहे. ग्रिफिथच्या दृष्टीनें पाहूं जातां परिस्थिती अशी होती कीं युरोप खंडांत प्रत्येक राष्ट्रास आपले आपलेच प्रश्न अगदीं विकट झाले असून आयर्लंडबद्दल सहानुभूति दाखवण्यास कोणास सवड सुद्धां नव्हती. ब्रिटिशांच्या लष्करी सत्तेपुढें आणखी कांहीं दिवस स्वयंतंत्रक टिकाव धरूं शकले असते कीं नाहीं याबद्दल कॉलिन्सच साशंक होऊं लागला होता. अमेरिकेची सहानुभूति व्हॅलेरानें बरीच मिळविली होती व मुख्यत: अमेरिकेला खूष करण्याकरितांच इंग्लंडनें नमतें घेतलें होतें. एरवी इंग्लंड इतकें नमलें नसतें.तेव्हां मोठ्या कष्टानें मिळालेली संधी वायां दवडून मग ब्रिटिशांच्या तोफा आयर्लंडवर मोकळ्या सोडूं देण्यास ग्रिफिथचें मन तयार होईना; व मिळेल तेवढें आज घेऊन त्यांतच होईल ती देशसेवा करावी असें त्यानें ठरविलें.

उलट, ज्या युरोपखंडांत हॉलंड, बेल्जम, सर्व्हिया यासारखीं लहान राष्ट्रें सुद्धां स्वतंत्र राहतात तेथें आयर्लंडनें मात्र राहूं नये याचें व्हॅलेरास साहजिक वैषम्य वाटलें. शिवाय आयर्लंडचीं दोन शकलें इंग्लंडनें पाडिलीं ही गोष्ट त्यास असह्यच वाटली. १७८२ चें पार्लमेंट--जें ग्रिफिथला पूर्वीपासून मिळवावयाचें होतें तें--सर्व आयर्लंडास एक होतें. अल्स्टरमध्यें आयर्लंडांतील धनसंपन्न असा वर्ग असून अल्स्टरची भूमिगत संपत्ति अफाट आहे. शरीरावयवांत शीर्षकासारखा महत्त्वाचा असा हा भाग कापून काढून इंग्लंडनें आयर्लंडचा शिरच्छेद केला तो व्हॅलेरा पक्षास सहन झाला नाहीं. 'अल्स्टर व आम्ही आपसांत भांडूं पण तुम्ही मध्यें बोलूं नका म्हणजे आमचें भांडण मिटेल' असें सगळे आयरिश पक्ष पहिल्यापासून म्हणत असत. पण ज्यांना आयर्लंडला होमरूल द्यायचें नव्हतें त्या कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षानें ब्रिटिश पार्लमेंटचा अल्स्टरनें केलेला

उपमर्दही सहन करून अल्स्टरला त्रिथविलें आणि शेवटीं जेव्हां आयर्लंड हातीं ठेवणेंच अशक्य झालें तेव्हां सोडतां सोडतां आयर्लंडच्या काळजांत खंजीर मारून शेवटीं दुष्टपणानें सूड उगविला.

तहाच्या वेळीं व्हॅलेराचें वर्तन योग्य होतें कीं ग्रिफिथचें वर्तन योग्य होतें याचें उत्तर कांहींही असो. गेलीं ६।७ वर्षें वुइल्यम कॉसग्रेव्ह या कर्तृत्ववान व स्वाभिमानी अध्यक्षाचे नेतृत्वाखालीं फ्रीस्टेटनें राज्यकारभाराचा गाडा मोठ्या कौशल्यानें चालविला आहे. परराष्ट्रांच्या दरबारीं त्यांनीं वकील ठेऊन आंतरराष्ट्रीय राजकारणांत आपणास मान्यतेचें स्थान मिळविलें आहे. अंतर्गत कारभारांतही शिक्षण, व्यापार, शेती, उद्योगधंदे, यांत चांगली प्रगति केली आहे. संपूर्ण स्वायत्ततेचें व स्वातंत्र्याचें वेड आयरिश लोकांतून अजून गेलें नाहीं व तें कधीं जाणारही नाहीं असें वाटतें. फ्रीस्टेटचे जबाबदार सरकारी अधिकारीही स्वातंत्र्याच्या गोष्टी जाहीरपणें बोलतात व तहानें आयरिश न्यायकोर्टावर ब्रिटिश प्रिव्हीकौन्सिलकडे आपील ठेविलें असूनही आज आठ वर्षांत एकाही पक्षकारानें प्रिव्ही कौन्सिलकडे आपला दावा नेला नाहीं, तर स्वदेशांतलि न्यायासनाकडून मिळालेला न्यायच कसा असेल तसा शिरसावंद्य मानिला आहे. नुकतेच फ्रीस्टेटच्या एका प्रधानानें असेंही जाहीर केलें कीं "एकादा दावा प्रिव्ही कौन्सिलकडे जाऊन त्यावर प्रिव्ही कौन्सिलनें निर्णय दिल्यास त्या निर्णयाची बजावणी आयरिश सरकार मुळींच करणार नाहीं." आणि आश्चर्य हें कीं आयरिश सरकारच्या या उद्गाराबद्दल ब्रि. सरकार मूग गिळून गप्प बसलें आहे. अथवा आश्चर्य तरी कसलें? १९२६ सालच्या साम्राज्य परिषदेनें 'यापुढें वसाहतींनीं पूर्ण स्वातंत्र्यानें वागावें' असें धोरण आंखलें असून. ब्रि. सरकानें यास कृतीनें वेळोवेळीं मान्यता दिली आहे. त्यास अनुसरूनच हाही प्रकार झाला असावा. यावरून आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा प्रश्न तत्त्वतः नाहीं तरी व्यवहारतः आतां सुटल्यासारखाच झाला आहे असें म्हणता येईल.

# मायकेल कॉलिन्स

मायकेल कॉलिन्स याचा बाप ६२ वर्षेपर्यंत अविवाहित होता. पुढें त्यानें केट ओब्रायन नामक एका २२ वर्षांच्या तरुणीशीं लग्न केलें. या विजोड दंपत्यास अपत्येंही पुष्कळ झालीं. मायकेल हा त्यांचें आठवें अपत्य. मायकेल कॉलिन्सचा जन्म १८९० त झाला. घरची गरीबी असल्यानें त्यास शिक्षण असें फारसें मिळालें नाहीं. त्यानें सतरावे वर्षींच सरकारी नोकरी धरली व ज्युनियर पोस्टल क्लार्क होऊन तो लंडनला आला. पुढें तो मुलकी खात्याकडील हिशेबाचे कचेरींत शिरला. पण सरकारी नोकरींत त्याचें मन रमलें नाहीं. स्वभावानें तो दांडगाईखोर व पराक्रमप्रिय होता. त्यास ऑफिसांतील बैठें काम मानेना. इंग्लंडमध्येंच गॅलिकलीगच्या कांहीं लोकांशीं त्याची गट्टी जमली व त्यास देशभक्ती आवडूं लागली. पुढें तो रिपब्लिकन ब्रदरहुडचा सभासद होऊन १९१५ सालीं नोकरी सोडून आयर्लंडला परत आला. त्यावेळीं तेथें स्वयंसैनिकांची चळवळ जोरांत असून कॉलिन्सच्या उत्साही व धाडशी स्वभावानुसार तो एकदम त्या चळवळीस मिळाला. १९१६ सालीं आयर्लंडांत झालेल्या बंडांत सामील होऊन तो मोठ्या शौर्यानें लढला. धरपकडींत इतर बंडवाल्यासंगतीं त्यास वेल्समध्यें नेऊन बंदींत ठेविलें होतें. त्या ठिकाणीं उत्साह, धैर्य व कर्तृत्व या गुणांनीं तो कैदी झालेल्या बंडवाल्यांचा एकदम पुढारी बनला. पुढें सर्व बंडवाल्यांची मुक्तता झाली तेव्हां याचीही सुटका झाली. पराभव व बंदीवास यांनीं खचून न जातां त्याचा उत्साह आतां अधिकच वाढला होता. बंड होऊन टॉमक्लार्क व इतर पुढारी पकडले गेल्यावर

टॉमक्लार्क याच्या बायकोनें प्रातिनिधिक बंधुसमाजाचें नेतृत्व आपणाकडे घेतलें होतें. तें तिनें आतां सुटून आलेल्या बंडवाल्यांच्या स्वाधीन केलें व बंधुसमाजाची धुरा स्वाभाविकपणें पराक्रमी कॉलिन्स याजवरच येऊन पडली.

एडवर्ड स्प्रॉट यानें केलेला एक जर्मन कट या वेळीं उघडकीस आला. तेव्हां सिनफेनच्या कार्यकारी मंडळांतील सभासदांनीं आपण आतां पकडले जाणार हें ओळखून आपल्या जागीं दुसरीं माणसें नेमण्याची तजवीज केली व पुढें सरकारी हुकुमाप्रमाणें त्यांस अटक झाली. मायकेल कॉलिन्स याचें नांव कार्यकारी कमिटीवर नव्हतें. तरी सरकारनें कटवाल्यांची जी यादी केली होती त्यांत त्याचें नांव होतें. कॉलिन्सला हें कळतांच त्यानें या धरपकडींतून आपण निसटून जावें असा बेत केला. धरपकडीदिवशीं सकाळीं पोलिस अधिकाऱ्यास चुकविण्याकरितां बराच वेळ तो इकडे तिकडे घुटमळत राहिला. नंतर सायकलवरून तो आपल्या बिऱ्हाडाकडे वळला. दुरूनच त्याला आपल्या बिऱ्हाडाच्या दाराशीं आपणास पकडणाऱ्या पोलिसांची मोटार लॉरी दिसली. तेव्हां रस्त्याच्या दुसऱ्या बाजूवरील एका वाड्याच्या दरवाजांतून त्यानें कांहीं वेळ त्या मोटारीवर पाळत ठेविली. नंतर दुसऱ्या एका संशयित माणसास धोक्याची सूचना देण्या-करितां त्यानें सायकलवरून धांव ठोकली. तिकडे सदर इसमास आधींच पकडून नेण्यांत आलेलें त्यास आढळलें.तेव्हां त्याच्याच घरीं कॉलिन्स यानें तळ दिला व दुपारपर्यंत त्यानें त्याच्या घरीं लपून बसून वेळ काढिला. इकडे दुपारपर्यंत वाट पाहून मोटार लॉरी निघून गेली. नंतर कॉलिन्स आपल्या बिऱ्हाडीं परत आला.

सिनफेनचें कार्यकारी मंडळ पकडलें गेल्यावर, सिनफेन व व्हॉलं-टीयर्स या सर्वांत कर्तृत्ववान पुरुष असा एकटा कॉलिन्सच राहिला व मग ओघानेंच सिनफेन, प्रातिनिधिक बंधुसमाज व स्वयंसेवक या सर्व चळवळींचीं सूत्रें कॉलिन्सच्या हातीं येऊन पडलीं. तेव्हां या तीनही चळवळींत एकसूत्रता

उत्पन्न झाली, आणि तीनही चळवळींतील माणसांचा मोठा जमाव एका हातीं वागवून निरनिराळ्या मार्गांनीं कॉलिन्सनें चळवळीस व लोकक्षोभास मोठें भयंकर स्वरूप आणून दिलें. यावेळीं त्याला जें पुढारीपद लाभलें होतें तें त्यानें आपली दानत, हिंमत व शहाणपण या सद्‌गुणांनींच मिळविलें होतें व स्वतांच्या देहपातापर्यंत त्यानें तें अत्यंत कौशल्यानें व यशस्वितेनें चालविलें. ग्रिफिथ हा विचारप्रवर्तक व मुत्सद्दी होता. डी व्हॅलेरा हा भावनाप्रधान वक्ता म्हणून प्रसिद्ध होता. पण त्यावेळीं कार्यकर्त्या व धाडशी तरुणांमध्यें स्वार्थत्याग, साहस इत्यादि गुणांची प्रेरणा कॉलिन्सपासूनच झाली. लवकरच तो आपल्या अनुयायांत व एकंदर आयरिश जनतेंत कौतुकाचा व वात्सल्याचा विषय होऊन बसला.

मुख्यतः कॉलिन्सच्या प्रेरणेनें व नेतृत्वाखालीं आयर्लंडांत यावेळीं जी चळवळ झाली व अखेर जीमुळेंच इंग्लंड आयर्लंडला शरण आलें ती चळवळ म्हणजे आयर्लंडमधील ब्रिटिश सरकारविरुद्ध आयरिश तरुणांनीं चालविलेलें गनिमी काव्याचें युद्ध होय. १९१८ सालच्या पार्लमेंटच्या निवडणुकींतील अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर सिनफेन पक्षानें डेल एरिनची स्थापना केली. डेल एरिननें राज्यकर्तृत्वाची जबाबदारी अंगावर घेऊन ग्रिफिथचा सिनफेन कार्यक्रम तावडतोब हातीं घेतला. व ही संस्था आयरिश लोकांत एकदम लोकप्रिय होऊन, आयर्लंडचें कायदेशीर सरकार इंग्लंडमध्यें होतें तरी आयर्लंडांतील जनता व स्थानिक स्वराज्य संस्था यांनीं डेल एरिन : हेंच आपलें स्वायत्त सरकार होय असें हळूहळू प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें मानण्यास सुरवात केली.

इंग्रज सरकारास आयर्लंडांत आपलें राज्य चालवायचें: तर डेल एरिनचें हें वर्चस्व सहन करणें अशक्यच होतें. म्हणून डेल एरिनचें सामर्थ्य हाणून पाडण्याकरितां कॉलिन्स, कॅथल ब्रूगा व मुलकाही या पुढाऱ्यांस पकडण्याचें सरकारनें ठरविलें व दडपशाही करण्याकरितां लष्करी उपाय योजण्याची तयारी चालविली. सरकारी गोटांत पडद्याआड घाटत असलेल्या या कारस्थानाची

गुणगुण स्वयंसेवकांस लागतांच त्यांनीं प्रतिकार करण्याचा घाट घातला व येथ-पासून (१९१९) आयर्लंडांत कधीं झालें नव्हतें असें भयंकर गनिमी युद्ध स्वयंसेवकांनीं सरकारशीं सुरूं केलें. सरकारचे जणूं "डोळे व कान" म्हणजे जें गुप्तहेरखातें त्यावर स्वयंसेवकांनीं प्रथम हात टाकला. सरकारी नोकरींतून निघालेला क्विनलेस नामक पोलिस स्वयंसेवकास आपले-पणा दाखवून सरकारांत चहाडी करी. त्यास एका स्वयंसेवकानें गोळी घालून ठार केलें. तसेंच डब्लिनच्या 'जी' डिव्हिजनमधील कांहीं हलकट व दुटप्पी पोलिसांना गुप्तपणें गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. सोलोहेडबेग येथें एका दारूगोळा घेऊन जाणाऱ्या पोलीसांच्या टोळीवर स्वयंसेवकांनीं अचानक छापा घालून सर्व दारूगोळा लांबविला. तेव्हां गनिमी युद्धाची ही आग लवकरच सर्व देशभर भडकली. व प्रत्येक धाडशी तरुण स्वयंसेवक म्हणवून घेऊन आपल्या पिस्तुलास देशभक्तीचें काम शोधूं लागला. पोलीसांना सतावण्याचें धोरण स्वयं-सेवकांनीं मोठ्या नेटानें चालविलें. खेड्यापाड्यांतील पोलिसांचे खून करून किंवा त्यांस पिटाळून लावून त्यांच्या बराकी त्यांनीं भस्मसात् केल्या. सरका-रास या प्रकाराची एवढी दहशत बसली कीं त्यांनीं खेड्यापाड्यांतील पोलीस अजीबात उठवून त्यांची मोठ्या शहरांतून स्थापना केली. पण पुढें नवीनच भीति उत्पन्न झाली. ऐन तारुण्यांत घरादाराची आस सोडून व प्राण संकटांत घालून विलक्षण धाडसानें स्वदेशाकरितां स्वयंसेवकांनीं चालविलेलें युद्ध पाहून पुष्कळ ऐरिश पोलिसांत देशभक्तीचें वारें शिरलें. पोलिसांच्या कांहीं टोळ्या स्वयंसेवकांस उघडपणें मिळाल्या. दुसऱ्या कांहीं गुप्त मदत करूं लागल्या. ऐरिश पोलिसांची संख्या फार मोठी होती. या सर्वांवरचाच आतां ब्रिटिश लष्करी अमलदारांचा विश्वास उडाला व म्हणून ऐरिश पोलिसांच्या पुष्कळ तुकड्या भराभर कमी करण्यांत आल्या आणि त्यांच्या जागीं स्कॉटिश व इंग्लिश पोलिसांची भरती झाली. पण कमी झालेल्या पोलिसांनीं स्वयंसेवकांची संख्या अधिकच फुगली. त्यांचें बळ वाढल्यामुळें त्यांनीं सरकार पक्षास अधिक यशस्वितेनें तोंड दिलें.

१९१९ च्या फेब्रुवारींत डी व्हॅलेरा तुरुंगांत असतां कॉलिन्स व हॅरी बोलंड यांनीं रात्रीं गुप्तपणें त्यांस तुरुंगांतून पळवून लावलें होतें. व्हॅलेरा पुढें अमेरिकेस गेला व त्यानें स्वयंसेवकांच्या या धुमाकुळीस पैशाचा पुष्कळ पुरवठा केला.

या १९१९–२१ सालांत आयरिश स्वयंसेवकांनीं खरोखर अद्वितीय स्वार्थत्याग व शौर्य दाखविलें. सरकारी सैन्याचे मानानें त्यांची संख्या अत्यल्प होती. साधनसामुग्री तर अगदींच थोडी असे. घरांत बायका–मुलांनीं केलेले बांबगोळे, हलक्या दर्जाचे रिव्हॉल्वर कांहीं किरकोळ मशिनगन्स एवढ्या शस्त्रांवर मुठींत प्राण धरून त्यांना अहोरात्र धावपळ करावी लागे. पण या तुटपुंज्या साधनांनीं त्यांनीं सरकारास अगदीं जेरीस आणलें. कॉर्कमध्यें लष्करी कायदा पुकारून सरकारनें जो नागरिक सशस्त्र दिसेल अथवा सशस्त्रास जो मदत करील त्यास गोळी घालण्यांत येईल असा जाहीरनामा लावला. तेव्हां प्रतिक्रिया म्हणून माक्रून गांवाजवळ आठ मोटार लॉऱ्यांवर स्वयंसेवकांनीं छापा घातला आणि त्यांपैकीं सात गाड्यांतील मदत सैनिकांची गोळ्या घालून सर्वांस कत्तल केली. फक्त एक गाडी माल निसटून कत्तलीची बातमी सांगण्यास परत ठाण्यावर गेली. इतरत्र डब्लिन, डिप्पेरेरी, लिमरिक, मेयो या सर्व ठिकाणीं किरकोळ चकमकी झडत. पण झगड्याचा खरा भर कॉर्कमध्यें होता. कॉर्कमध्यें स्वस्थता करण्याकरितां जनरल स्ट्रिकलंड हा डिसेंबर १९२० पासून एकसारख्या मुदतीवर मुदती मागून घेत होता. याच कॉर्कचे एका लॉर्ड मेयरला अधिकाऱ्यांनीं छापा घालून ठार मारलें व त्याच्या मागून आलेल्या टेरेन्स मॅक्स्विनी या निस्सीम देशभक्तास सरकारनें तुरुंगांत घातलें. पण तुरुंगांत अन्नत्याग करून ७४ दिवसांनीं या वीरानें स्वदेशाचे चरणीं देह अर्पण केला. या सर्व प्रकारांनीं कॉर्कमधील धामधूम थांबण्याचें बाजूस राहून आयर्लंडच्या असंतोषाच्या ज्वाळा सर्व जगभर दिसूं लागल्या. आयर्लंडच्या वीरत्वाबद्दल सर्व जगांत आदर आणि दुःखाबद्दल सहानुभूति उत्पन्न झाली व इंग्लंडविरुद्ध अमेरिकन लोकमत विशेष खवळून गेलें.

झगडा जसा वाढत चालला तसे अधिकारी अधिकच क्रूर झाले. जनतेचा स्वयंसेवकांस पाठिंबा आहे असें पाहून त्यांनीं संशयित घरावर दरोडे घालून लुटालुटी सुरू केल्या, सापडतील तेथें स्वयंसेवकांचे खून केले व सत्तेच्या जोरावर इतरही अनान्वित प्रकार केले. पण जनतेनें भेदरून न जातां स्वयंसेवकांची बाजू अधिकच उचलून धरली. त्यांनीं स्वयंसेवकांस सर्व प्रकारें मदत केली. लागला तेव्हां, अन्न व दारुगोळ्यास जनतेनें पैसाही दिला. स्वयंसेवकांस वांचविण्याकरितां घरंदाज स्त्रीपुरुषांनींही कित्येकदां त्यांस आपल्या घरांत लपवून पोलिसास दारांतूनच वाटेस लावलें.

या भयंकर संग्रामांत कॉलिन्स यानें नेमकें कोणतें काम केलें याचा कागदोपत्रीं पुरावा मिळणें किंवा आजवर शाबूत ठेवला असणेंही अशक्य आहे. पण या सर्व युद्धाचा कल्पक व धोरणाचा योजक कॉलिन्सच होता हें समकालीनांस व सहकाऱ्यांस ठाऊक आहे. जर्मनीस ज्यांनीं आपल्या सामर्थ्यानें पालथें घातलें त्यांच्याशीं उघड संग्राम करून आपला निभाव लागणार नाहीं हें कॉलिन्स जाणून होता. म्हणून लपून छपून गोळ्या चालवून, बॉम्ब फेकून, लहान मोठे छापे घालून व दारुगोळा पळवून पुन्हां दुसऱ्या छाप्यास पाळत ठेऊन तयार असावें व अशा प्रकारें सरकारास जिकीरीस आणावें अशी गनिमी काव्याची लढाई त्यानें आपल्या कल्पनेनें बसविली. ग्रिफिथ यांस ही हाणामारीची व चोराचोरीचा पद्धत पसंत पडणें शक्यच नव्हतें आणि डेल आयरिनचा उपाध्यक्ष व मुख्य सूत्रधार ग्रिफिथच असल्यानें डेल आयरिन या चळवळीच्या वाऱ्यासही उभी राहिली नाहीं. स्वयंसेवक संस्थेच्या कार्यकारी कमिटीनें कॉलिन्सची ही योजना फेटाळली. पण एवढ्यानें कॉलिन्स नाउमेद झाला नाहीं. लहानपणापासून गुंडपणाची त्याला सवय होती. व पत्करलेलें सत्कार्य तडीस लावण्यास अवश्य तें जोमदार कर्तृत्व गाजवितांना बारीकसारीक पापपुण्याची अथवा अखेर यशापयशाची किचकट विचिकित्सा करीत बसण्याइतका तो हळवा अथवा सूक्ष्म नव्हता. स्वयंसेवक कमिटीनें

त्यास फेटाळलें तरी खुद्द स्वयंसेवकांचें आपणास भरपूर पाठबळ आहे हें तो जाणून होता. धाडस व पराक्रमप्रीती यांच्या जोरावर त्यानें स्वयंसेवकांसह इंग्रजाशीं गनिमी युद्धांत उडी घातली; तेव्हांपासून तहानें युद्धाचा शेवट होईपर्यंत कॉलिन्सच या युद्धाचा सूत्रधार होता. त्याचेपासूनच स्वयंसेवकांस स्फूर्ति मिळाली व त्याच्याच कल्पकतेनें व योजनेनें वेळोवेळच्या योजना फलित झाल्या. आयरिश जनतेस व इंग्रजास त्यानें आपल्या कर्तबगारीनें आयरिश राष्ट्राचें लष्करी सामर्थ्य मूर्तिमंत प्रगट करून दाखविलें. खेड्यापाड्यांतून पोलीस व लष्करची सत्ता पार नाहींशी झाली. सरकारी न्यायकोर्टांना कोणी विचारीनासें झालें व डेल एरिनची सत्ता जनतेनें उघडपणें मान्य केली. सरकारला तर कॉलिन्सचें नुसतें वेड लागलें होतें. कॉलिन्स हातीं सापडावा म्हणून सरकारनें अनेकदां बक्षिसें लावलीं, स्पेशल अधिकारी नेमले; पण त्यांस त्यानें दाद दिली नाहीं. पोलीस कोणत्याही घरांत झडतीस गेले कीं प्रथम कॉलिन्स आहे का तें पहात. आंथरुणें उलगडून त्यांत कॉलिन्सला हुडकीत. एकाच वेळीं चार निरनिराळ्या ठिकाणीं कॉलिन्स आहे अशी बातमी येऊन शिपाई चारही ठिकाणीं धावत जात व मग कॉलिन्स माल भरपोलीसठाण्यासमोरून ओळखला न जातां सायकलवरून भरारी मारून केव्हांच निघून जाई. कित्येकदां तो त्यांच्या अगदीं हातांत सापडूनही निसटून गेला. इंग्रजांचें सर्व पोलीसखातें व गुप्तहेरखातें त्यानें व त्याच्या स्वयंसेवकांनीं सपशेल धाब्यावर बसविलें. इतकेंच नव्हे तर आपलेंच गुप्तहेरखातें त्यानें आतां सरकारच्या मागें लावलें होतें; व अधिकाऱ्यांच्या योजना घाटत असतांच झडप घालून पुष्कळदां त्यानें त्या उलथून पाडल्या. आर्थर ग्रिफिथ याचा सिनफेन कार्यक्रम व डेल एरिनची स्थापना यांनीं लोकांच्या राजकीय विचारांत क्रांती घडविली होती. पण देशसेवेचा हुरूप, स्वार्थत्याग व इंग्रजी सत्तेविषयीं तिटकारा हे गुण आयरिश जनतेंत जे उत्पन्न झाले ते, कॉलिन्स यानें आपल्या सवंगड्यांसह ब्रिटिश सत्तेशीं झुंज खेळून तिचीं हाडें खिळखिळीं करून दाखविलीं त्यामुळें

उत्पन्न झाले. देशांतील कर्त्या पुरुषास कॉलिन्सच्या या यशस्वितेची जाणीव होती. तहानंतर १९२२ च्या जानेवारींत डेलचें अधिवेशन सुरू असतां "गेल्या युद्धांतील जेता पुरुष कॉलिन्स होय" असें म्हणून ग्रिफिथनें प्रेमानें कॉलिन्सचें अभिनंदन केलें.

डी व्हॅलेरास लॉइड जॉर्जचें बोलावणें येण्यापूर्वी कॉलिन्सबरोबर प्रधान-मंडळानें मध्यस्थाकरवीं समेटाची वाटाघाट चालविली होती. तह ठरविण्यास गेलेल्या शिष्टमंडळांत त्याची नेमणूक झाली. एकंदर परिस्थिति पाहून त्यानें तहास मान्यता दिली. शेवटीं फ्रीस्टेटची स्थापना होऊन डी व्हॅलेराशीं लढण्याचा प्रसंग आला. तेव्हां त्याला फार दुःख झालें. तरी निष्ठुर कर्तव्यास तोही निष्ठुर झाला. पण यापुढें आणखी पुष्कळ दिवस देशसेवा करणें त्याच्या नशिबीं नव्हतें. आर्थर ग्रिफिथच्या मृत्यूनंतर १० च दिवसांनीं म्हणजे ता. २२ ऑगस्ट रोजीं तो डी व्हॅलेराच्या एका टोळीशीं लढत असतां मारला गेला.

आयुष्याच्या ऐन उमेदींत राज्यकर्तृत्वाची मिळालेली जबाबदारी पार पाडून दाखविण्याचें भाग्य त्यास लाभलें नाहीं हें त्याचें, तसेंच त्याच्या राष्ट्राचें दुर्दैव होय. पण सुसरीनें गिळलेलें माणिक तिचें पोट फाडून हिसकून घ्यावें, त्याप्रमाणें रणबहादूर इंग्रजांच्या मगरमिठींतून स्वदेशास स्वातंत्र्य मिळवून देण्याचें जें साहस–तिशी बत्तिशीच्या तरुण वयांत–कॉलिन्सनें करून दाखविलें तेवढ्यानेंही त्याची कीर्ति जगांत निःसंशय अमर झाली आहे.

———

# डी व्हॅलेरा

डी व्हॅलेरा हा जन्मानें अमेरिकन आहे. त्याची आई आयरिश होती. बाळपणापासून तो आईचे माहेरीं आयर्लंडमध्यें येऊन राहिला होता. त्याला युनिव्हर्सिटींत शिक्षण वगैरे चांगलें मिळालें. तो बी. ए. बी.एस सी. झालेला आहे. गणित हा त्याचा आवडता विषय असून तो १९१० सालीं गणिताच्या प्रोफेसरीचें काम करीत होता. राजकारणाची गोडी अथवा राजकीय विषयांचा शास्त्रीय अभ्यास त्यानें कधींच केला नव्हता. पण स्वभावतः त्याचें अंतःकरण प्रेमळ, उदात्त व भावनाप्रधान असल्यामुळें आयरिश रिपब्लिकन ब्रदरहुडच्या उच्च राजकीय आकांक्षा त्यास पटून त्याच्या अंतःकरणांत देशभक्ति उत्पन्न झाली. तो या ब्रदहुडचा सभासद झाला व लवकरच स्वयंसेवक चळवळींत प्रामुख्यानें भाग घेऊं लागला. ब्रदरहुडमध्यें बंडासंबंधी वाटाघाट चालली असतां बंड करूं नये असें त्यानें मत दिलें. पण शेवटीं बहुमतानें बंडाचा निश्चय केल्यावर तो बंडांत सामील होऊन शौर्यानें लढला. बंडवाल्यांनीं शस्त्रें खालीं ठेवावीं असें ठरविलें तरी अगदीं अखेरपर्यंत त्यानें शस्त्रत्याग केला नाहीं. बंडानंतर त्यास मृत्यूची शिक्षा झाली होती, पण पुढें ती रद्द झाली. १९१७ च्या जूनमध्यें लॉइड जॉर्ज यांनीं सर्वपक्षीय परिषदेस अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरितां त्यास सोडून दिलें. त्यावेळीं बंडांतील पुढारी म्हणून लोकांना तो फारच प्रिय व पूज्य झाला. सिनफेन पक्षानें त्यास क्लेअर कौंटींतर्फे पार्लमेंटकरतां उमेदवार म्हणून उभें केलें.

तेथें तो प्रचंड बहुमतानें निवडून आला. ग्रिफिथनें सिनफेन पक्षाचें अध्यक्षपद आपण होऊन त्यास दिलें. त्यानें व्याख्यानांचे दौरे काढून प्रजासत्ताक पक्षाचा मत-प्रचार सुरू केला. १९१८ सालीं त्यास पुन्हा शिक्षा झाली. कॉलिन्सच्या सहाय्यानें १९१९च्या फेब्रुवारींत तो तुरुंगांतून निसटला. व्हॅलेरा पुढें अमेरिकेंत गेला. तेथें त्यानें केलेली कामगिरी अद्वितीय आहे. तो धिप्पाड, उंच व देखणा असून भावनोद्दीपक वक्ता आहे. त्यानें सर्व अमेरिकाभर हिंडून शेकडों सभा-भरविल्या. लाखों लोकांसमोर व्याख्यानें दिलीं. आयरिश पारतंत्र्याची आर्थिक व शुष्क चर्चा करीत न बसतां अमेरिकनांच्या अंतःस्करणांत रुजलेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावनेस त्यानें आपल्या अमोघ वक्तृत्वानें खळबळून इतकें प्रक्षुब्ध केलें कीं इंग्लंडला जगांतील आपली इभ्रत बुडाली असें वाटूं लागलें. इंग्लंडनें विरुद्ध बाजू मांडण्यास आपले वक्ते अमेरिकेस पाठविले. परंतु स्वातंत्र्यप्रेमानें काळीज पिळवटून बोलणाऱ्या या वीरापुढें ब्रिटिश मुत्सद्यांचें नीरस साम्राज्यसमर्थन फिकें पडलें असल्यास नवल नाहीं. अमेरिकेमध्यें व्हॅलेरानें आयरिश रिपब्लिकच्या नांवानें हजारों डॉलर्स कर्ज मिळविलें. या पैशाची मदत नसती तर कॉलिन्स यास आयर्लंडांतील लढा चालवितां आलाच नसता. अमेरिकेंतून आयर्लंडांत परत आल्यावर लॉइड जॉर्ज याच्या आमंत्रणावरून समेटाविषयीं बोलणें करण्यास व्हॅलेरा इंग्लंडांत गेला. भेटींत समेटाचें चिन्ह दिसेना. पुढें आयर्लंडमधून गेलेल्या शिष्टमंडळानें जो तह आणला तो त्यास पसंत पडला नाहीं. त्याकरितां प्रस्थापित फ्रीस्टेटशीं त्यानें उघड युद्धही केलें. पण फ्रीस्टेटनें सात आठ महिन्यांतच त्याचा मोड केला आणि नाइलाज झाला तेव्हां त्यानें शस्त्र खालीं ठेवलें.

व्हॅलेरा हयात असून त्याची आयर्लंडचें प्रजासत्ताक स्थापण्याची चळवळ चालूच आहे. तह झाला तेव्हां त्याला स्वतंत्र प्रजासत्ताकच जरी हवें होतें तरी ज्या अर्थी तडजोडीस मान्यता देऊन स्वतः तो लॉइड जॉर्जकडे गेलाही होता त्याअर्थी निवळ प्रजासत्ताकाचा हट्ट सोडण्यास तो तयार झाला होता हें उघड आहे. त्यानें स्वतः एक योजना तयार केली असून तिला तो 'एक्स्टर्नल ॲसो-

सिएशन' (इंग्लंडशीं बहिःसंबंधाची योजना) असें म्हणे. ही योजना पास झाली असती तर दोन्ही राष्ट्रें समान दर्जाचीं ठरलीं जाऊन समेटास 'ट्रीटी'–तह हें नांव दिलें गेलें तें सार्थ झालें असतें. पण झालेल्या 'तहांत' इंग्लंडच्या वर्चस्वाची खूण म्हणून इंग्लंडचा गव्हर्नर आयर्लंडवर लादला गेलाच. शिवाय अल्स्टरची कड घेऊन इंग्लंडनें भौगोलिक व सांस्कृतिक दृष्टया एकजीव असलेल्या आयरिश राष्ट्राचीं दोन शकलें करून आयर्लंडांत उत्पन्न झालेला गृहकलह स्वराज्या-नंतरही कायम राहावा अशी तजवीज केली. इंग्लंडनें अल्स्टरला मदत करणार नाहीं असें सांगून दक्षिण व उत्तर आयर्लंडचा तंटा आपसांत मिटविण्यास सवड दिली असती तर अल्स्टरला दक्षिणेपुढें नमावें लागलें असतें व मग सर्व देशास एकच पार्लमेंट या अटीवर १७८३ चें ग्रॅटन पार्लमेंट म्हणजेच द्विदळ राजसत्ता पत्करण्यास व्हॅलेरा तयार झाला असता असें वाटतें.

फ्रीस्टेटविरुद्ध व्हॅलेरानें केलेल्या युद्धाबद्दल जगभर त्याचे विरुद्ध टीका झाली. पण प्रत्येक राष्ट्रांत त्याचें समर्थन करणारें लोकमतही बरेंच मोठें आहे. कांहीं असलें तरी १९१७ नंतर सिनफेन, प्रजासत्ताक, मजूर वगैरे सर्व पक्षभेदांचीं व मतामतांची मोट बांधून त्यानें आपल्या वक्तृत्वानें, धडाडीनें व कांहींशा विभूति-मत्तेनें आयर्लंडच्या स्वातंत्र्यभक्तीस जी विलक्षण भरती आणली व अमेरिकन लोकमत आपणांस अनुकूल करून घेतलें तें इंग्लंडला नमविण्यास पुष्कळच कारणीभूत झालें यांत संशय नाहीं. हल्लीं बंडाचा नाद सोडून देऊन सदनशीर मार्गानें तो स्वातंत्र्याची चळवळ त्याच्या नेह-मींच्या हुरूपानें व धडाडीनें करीतच आहे. फ्रीस्टेटच्या चालू अमदानींत आयरिश लोकमताचा काटा जो एकसारखा स्वातंत्र्याकडे झुकता राहिला आहे त्यास व्हॅलेराची चळवळ ही पुष्कळच कारण झाली आहे.

**समाप्त**

## आमचेकडे मिळणारीं इतर पुस्तकें.

# पुरंदरे दप्तर भाग २ रा

पृष्ठें डेमी अष्टपली २२५ ] [ किंमत ३ रुपये.

( हें पुस्तक भा. इ. सं. मंडळानें पुरस्कारिलें असून श्रीमंत मल्हारराव पुरंदरे यांचे दप्तरांतील इ. स. १८००–१८०३ या पेशवाईतील अत्यंत धामधुमीच्या काळांतील महत्वाचा पत्रव्यवहार या पुस्तकांत एकत्र करून तंगतवार छापला आहे. तपशीलवार सूची शेवटीं दिली असून श्री. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांनीं लिहिलेल्या विस्तृत प्रस्तावनेंत पेशवाईच्या अखेरच्या काळावर नवविचारपरिप्लुत असें केलेलें विवेचन अत्यंत उद्बोधक झालें आहे.

# श्री समश्लोकीगीता

कवि—मुकुंद गणेश मिरजकर.

आवृत्ति २ री ] [ किंमत १२ आणे.

या पुस्तकांत श्रीमद्भगवद्गीतेंतील प्रत्येक श्लोकाचें मराठी समवृत्त श्लोकांत भाषांतर केलेलें असून मूळ संस्कृत श्लोक व समवृत्त मराठी श्लोक समोरासमोर छापलें असल्यानें मूळ संस्कृत श्लोक समजून घेण्यास, संस्कृत येत नसलें तर निदान मराठींतून गीता पाठ करण्यास व नित्यपाठास, तसेंच समवृत्तकाव्याच्या अभ्यासासही या पुस्तकानें बहुमोल मदत होणार आहे. मिरजकर शास्त्री यांच्या काव्यांत जोम व प्रतिभा नेहमींच झळकत असून प्रस्तुत पुस्तक महाराष्ट्रांतील विद्वानांनीं मुक्तकंठानें प्रशंसिलेलें आहे. पहिली आवृत्ति एकाच वर्षांत संपली.

# खग्रास प्रभाकर

ले. पां. वा. गाडगीळ.

संस्थानी राजकारणावर ही कादंबरी उत्कृष्ट प्रकाश पाडीत असून जोरदार व नवीन भाषापद्धति, चित्तवेधक प्रसंग, मनोविकारांचीं उठावदार चित्रें यांनीं ही कादंबरी मनास चटका लावून सोडते. [ किं. १ रुपया

# इंग्रजी शिकण्याचे सोपे नियम.

(ले. नागेश वासुदेव गाडगीळ एस्. टी. सी.

या पुस्तकामुळें शिक्षकावाचून इंग्रजी शिकण्याची सोय झाली आहे. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांचे उत्तम अभिप्राय. [ किं. ४ आणे.

# स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा

लेखक, { कुमारी बाळूबाई खरे बी. ए.
श्री. का. न. केळकर ॲडव्होकेट.

द्वि. आवृत्ति ] [ किं. ८६ आणे.

हिंदुधर्मशास्त्रामुळें हिंदुस्त्रियांवर जो अन्याय होतो त्याचें साधार विवेचन या लहानशा पुस्तकांत केलें असून अन्यायनिवारणाचे उपायांचा मार्मिक विचार केला आहे. उभयतां विद्वान लेखकांनीं आपल्या लेखनांत सुधारकांना जी सावधगिरी व सनातनींना जी शिकवण शिकविली आहे तीमुळें हें पुस्तक समाजविचाराच्या उभयपंथासही अभ्यसनीय झालें आहे. विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय मिळाले आहेत. पहिली आवृत्ति पहिल्याच पंधरवड्यांत संपली. दुसरी आवृत्ति सुधारून वाढविली आहे.

# देशी जमाखर्चाचे धडे

ले. ह. श्री. थोरे. वाङ्मयविशारद

या पुस्तकांत घरगुती जमाखर्चापासून उच्च प्रकारच्या व्यापारी जमाखर्चापर्यंत सर्व प्रकार सचित्र व सुलभ रीतीनें मांडले आहेत. हें पुस्तक प्रत्येक कुटुंबांत हवेंच. [ किंमत ८ आणे.

# गीतातत्त्वांजलि

ले. पां. वा. गाडगीळ.

गीतेंतील सारभूत तत्त्वांचें या निबंधांत खुलासेवार विवेचन केलें असून गीतेंतील विवेचन झटकन ध्यानांत भरण्यास हा निबंध अत्युपयुक्त आहे. विवेचन स्वतंत्र बुद्धीनें केलेलें आहे. [ किं. ८७

**रारुजगु आणि कंपनी, बुकसेलर्स व पब्लिशर्स बुधवार चौक, पुणें.**

रजिस्टर्ड

# सेंट चा राजा

# ओटो दिल बहार



याच्या सर्वोत्तम सुगन्धाची कोणासही नक्कल करतां येत नाहीं, हेंच त्याच्या सर्व हिंदुस्थानामधील वाढत्या मागणीचें निदर्शक होय. हातरुमालावर याचे थोडेसे थेंब टाकले म्हणजे प्रत्यक्ष जाई, जुई, डेझी वगैरे फुलांसारखा अखंड टिकणारा मधुर सुवास येत आहे असेंच वाटतें.

लग्न व मांगलिक प्रसंगीं मित्रमंडळीस खूष करण्यासाठीं ओटो दिल बहार वापरून आपल्या खर्च केलेल्या पैशाचा पूर्ण मोबदला मिळवा.

अर्ध्या औंसाचे बाटलीस रु. २-०-० पाव औंस बाटलीस रु. १-४-०
१ ड्रामच्या बाटलीस रु. ०-१२-० सँपल बाटली... रु. ०-२-०
सुगंधी कार्ड प्रत्येकीं रु. ०-१-० व्ही. पी. खर्च निराळा.

**धी अँग्लो इंडियन ड्रग आणि केमिकल कंपनी, जुम्मा मशीद, मुंबई नं. २**

हेंच तें ) **कामिनिया ऑईल** ( केंस वाढविणारें




जर तुमचे केंस कमी होत असतील, पिकत असतील किंवा गळून पडत असतील, परंतु त्यांच्या मुळांना जर धक्का लागला नसून जर ते जीव धरून असतील, तर तुमचे केंस खात्रीनें पुन्हां वाढतील त्याकरितां केंसांना जरूर तेंच अन्न पुरवा , पण तें देतांना त्याची योग्यता पहा कारण ' **केंसांचें संवर्धन** ' करणारेंच व ' केंसांचे अन्न ' असलेलें एकटें

हेंच ] कामिनिया ऑईल ( रजिस्टर्ड ) सुगंधी तेल [ आहे.

ह्यांत केंसांना जरूर असलेल्या अन्नाचाच अंश मोठ्या प्रमाणांत असतो. जाड, बळकट, रेशमाप्रमाणें मऊ व पुष्कळ केंस मुळापासून जोमानें वाढण्यास लागणाऱ्या उत्तम तेलाचा व वनस्पतींचा उपयोग फक्त कामिनिया ऑईलमध्येंच केलेला असतो. अशक्त झालेल्या पेशींला नवजीवन देऊन केंस भरपूर वाढतात, इतकेंच नव्हे तर तें डोक्याला थंडावा आणतें. केंसांची जोपासना करण्याकरितां लागणाऱ्या निरनिराळ्या सदतीस वस्तूंची यांत योजना केलेली आहे. या सदतीस वस्तु मस्तकांत भिनण्यानें आपल्याला अज्ञात असलेलें केशसौंदर्य निर्माण होईल. त्वरा करा. आजच विकत घ्या. कारण कामिनिया ऑईलनेंच केस वाढतात. १ बाटलीची किंमत १ रु व्ही. पी. चार्ज ६ आणे निराळा. ३ बा. २-१०-० व्ही. पी. चार्ज १२ आ. नि

**पत्ताः—धी अँग्लो इंडियन ड्रग आणि केमिकल कंपनी,**
**जुम्मा मशीद, मुंबई नं. २.**

# सरस वाङ्मयरत्नमाला

## सुंदर वाङ्मय, गायन किंवा बरवा विलास– ललनांचा॥
## रमवी चित्त न ज्याचें पशु किंवा मुक्त तो मनुज साचा॥

[ १ ] एक रुपया प्रवेश फी पाठवून या मालेचे " कायम ग्राहक " होतां येतें. पण प्रवेश फी पुनः कधींच परत मिळत नसतें. [ २ ] कायम ग्राहकांस या मालेची नवीन प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें व शिल्लक असलेलीं सर्व पुस्तकें खालील किंमतीच्या आकारानें निम्मे किंमतीस मिळतील. [ ३ ] ट. ह. वेगळें आकारलें जातें.

| | | रु. आ. |
|---|---|---|
| ( १ ) | महात्मा गांधींचा बंदिवास ... | ०–१२ |
| ( २ ) | स्वर्गीय प्रेम ... ... | २—८ |
| ( ३ ) | वनज्योत्स्ना व घागरगडचा सुभेदार ... | २—८ |
| ( ४ ) | जीवनलता ... ... | ३—० |
| ( ५ ) | गृहलक्ष्मी ... ... | २—० |
| ( ६ ) | रणरंग, बंडाचें प्रायश्चित्त, सौदामिनी ... | ३—८ |
| ( ८ ) | पतित व जर्मन उच्चाटन ( प्रती संपत आल्या ) | ४—० |
| ( ९ ) | रत्नकंकण व कृपणकन्या ,, ,, ,, | ४—० |
| ( ११ ) | तीन शिलेदार, भाग १·२ ( थोड्या प्रती शिल्लक आहेत ) | ५—० |
| ( १२ ) | राठोड वीर दुर्गादास व शीलपरिक्षा ... | ३—० |
| ( १३ ) | अल्ला हो अकबर ... ... | ४—० |
| ( १५ ) | गुर्जर वीर अणहिल ... ... | ५—० |
| ( १६ ) | १८२७ चें बंड व बाई कुसुमावती ( शिल्लक नाहीं ) | ४—० |
| ( १७ ) | सैतानी चक्कर ( नवीन आवृत्ति ) ... | २—८ |
| ( १८ ) | व्रतपालन ( शिल्लक नाहीं ) ... ... | ३—० |
| ( १९ ) | रंगमहालरहस्य ... ... | २—८ |
| ( २० ) | अस्तनींतील निखारा ( शिल्लक नाहीं ) ... | ५—० |
| ( २१ ) | समर्थ राष्ट्रगुरु ( शिल्लक आहे ) ... | २—८ |
| ( २२ ) | अमृतशोध–इंग्रजांचा जय ( शिल्लक नाहीं ) | ३–८ |
| ( २४ ) | शापित राजवंश ( शिल्लक आहे ) ... | ४–० |
| ( २५ ) | कर्मविपाक–प्रभु पाठिराखा ( थोड्या प्रती शिल्लक ) | ४–० |

| | | |
|---|---|---|
| (२६) | राजसंसार–पातिव्रत्य कसोटी ( शिल्लक नाहीं ) | ४–० |
| (२७) | प्रेमविनोद–दैवविलसित–मनोरमा ( शिल्लक आहे ) | ४–० |
| (२८) | तिरंगी सामना ,, ... | ४–० |
| (२९) | अधिकारी व जनता ,, ... | ४–० |
| (३०) | चारुगात्री ,, ... | ४–० |
| (३१) | खलीपत ( कान्स्टॉंटिनोपलचें पतन ) ... | ४–० |
| (३२) | योगसामर्थ्य–लाख्या बारगीर ,, ... | ४–० |
| (३३) | रत्नखचित सिंह ,, ... | ४–० |
| (३४) | अस्तोदय ,, ... | ४–० |
| (३५) | मुलांचें बंड व पत्नीव्रतकसोटी ,, ... | ३–८ |
| (३६) | रहस्यजाल ( पत्नी कीं भगिनी ? ) ,, ... | ४–० |
| (३७) | लोखंडी मुगुट ( थोड्या प्रती शिल्लक ) ... | ४–० |
| (३८) | लोकमान्य टिळक चरितसुधा ,, ... | १–८ |
| (३९) | रत्नमाला ,, ... | ३–८ |
| (४०) | मॅडम रोलंद व पतित अबला ,, ... | ४–० |
| (४१) | स्वराज्यस्वप्न–शारदाभक्त ,, ... | ४–० |
| (४२) | लाल गुलाल–मर्दानी सौंदर्य ( १ लें खंड ) | ४–० |
| (४३) | वीरविजय–वीरविवाह ... ... | ४–० |
| (४४) | मयूख–कुमुदचंद्र–राष्ट्रीय प्रेमविकास ... | ४–८ |
| (४५) | दिलबहार ( शिल्लक आहे ) ... ... | ४–० |
| (४६) | गुजराथचा समशेर बहाद्दर ... ... | २–० |
| (४७) | दिव्याखालीं अंधेर, खंड १·२-३ ... | ७–० |
| (४८) | गृहसौख्य–राष्ट्रीय शिक्षण ... | ४–० |
| (४९) | ब्रह्महत्या ( म्ह० नंदकुंवरची फांसी ) ... | ४–० |
| (५०) | दिव्यप्रेम–मोत्यांचा कंठा–जिवलग ... | ५–० |
| (५१) | आसुरी लालसा—मर्दानी सौंदर्य ( खंड २-३ ) | ५–० |
| (५२–५३) | पानपतची मोहीम ( थोड्या शिल्लक आहेत ) | ७–० |
| (५४) | परिचारिका–शीलविजय ,, ... | ५–० |
| (५५) | हानिफा बेगम व वकुळा ,, ... | ४–० |
| (५६) | मुक्तग्रहण व हरपलेलें रत्न ,, ... | ४–० |

| | | |
|---|---|---|
| ( ५७ ) | भुताटकीचा बुरुज व मर्दानी सौंदर्य, खंड ४-५ | ४-० |
| ( ५८ ) | मूकनायिका ... ... | ४-० |
| ( ५९ ) | पूर्णचंद्रोय-पट्टराणी पद्मावती ... | ४-० |
| ( ६० ) | सुलताना रझिया व सुधासिंधु ... | ४-० |
| ( ६१ ) | गणवंत गडाचा गडकरी व छोटा शिलेदार | ४-० |
| ( ६२ ) | शांतादेवी ( शठं प्रति सत्यम् ) ... | ३-८ |
| ( ६३ ) | शठं प्रति शाठ्यम् व भक्तिप्रभाव ... | ४-० |
| ( ६४ ) | मायावती ( खंड १-२ ) ... ... | ४-० |
| ( ६५ ) | हाय गे उज्जयनी ! व वनदेवता ... | ४-० |
| ( ६६ ) | भ्रमाचा भोंवरा, अनाथांचा नाथ ... | ४-८ |
| ( ६७-६८ ) | लीलारहस्य व बादशाही खुपमस्कऱ्या | ४-८ |
| ( ६९ ) | राष्ट्रभक्ताचा आत्मयज्ञ ... ... | ३-८ |
| ( ७० ) | प्रियपत्नीप्रेम व दख्खनचा वाघ ... | ४-८ |
| ( ७१ ) | राणीचा रत्नहार व गिरणीकामगारविजय | ४-८ |
| ( ७२ ) | मुकुटमणि ( ज्ञानदेवांचा गाथा ) ... | ४-८ |
| ( ७३-७४ ) | व्यापारी वैभव-मर्दानी सौंदर्य ( खंड ६ वें ) | ४-८ |
| ( ७५-७६ ) | गृहांगना कीं देवांगना व कठीण-कसोटी ... | ४-८ |
| ( ७७ ) | उषादेवी ( मायावती, खंड ३ रें ) ... | ३-० |
| ( ७८ ) | औटघटिकेचें राज्य, मर्दानी सौंदर्य खंड ७ वें | ४-० |
| ( ७९ ) | मोंगलाई कारस्थान, मर्दानी सौंदर्य खंड ८ वें | ४-० |
| ( ८० ) | श्रीशिवप्रताप ३ रु० ( ८१ ) वेदांतानिदर्शन | ४-० |
| ( ८२ ) | निशा ४ रु० ( ८३ ) परकायाप्रवेश | ४-० |
| ( ८४ ) | राजसत्तेवर गदा ( लौकरच प्रसिद्ध होईल ) | |

यानंतर राज्याभिलाप, मायावी राक्षस वगैरे कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध होतील. जुन्या व नव्या ग्राहकांनीं वरील पुस्तकें अवश्य मागवावींत. महागाईमुळें कांहीं पुस्तकांवर थोडी किं. वाढविणें भाग पडलें आहे. कापडी प्रतीस सहा आणे अधिक पडतात. इतरांस भर किंमत पडेल. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. या वरील पुस्तकांपैकीं जीं पुस्तकें कोणाच्या संग्रहीं नसतील तीं त्यांनीं अवश्य लवकर मागवावींत.

तात्या नेमिनाथ पांगळ, पुणें शहर

# सुरस ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेलीं सर्व पुस्तकें.

आमच्याकडे खालील किंमतीच्या निम्मे आकारानें तूर्त
आमचे ग्राहकांना मिळतील; टपालखर्च निराळा.

(१) निशाचराचा प्रेमाविलास, (आवृत्ति दुसरी) २॥ रु०
(३) पतिपत्नीप्रेम, ,, ... ४ रु०
(६) दैवाची विचित्र लीला, ४ रु. (७) चंद्रकांता ४ रु०
(८) उषा, ३॥ रु० (९) जर्मन मोहीम, २॥ रु०
(१०) सत्यमेव जयते व शैशवसहचरी ... ३॥ रु०
(११) भयंकर स्वप्न ४ रु० (१२) छत्रसाल ५ रु०
(१४) खरी आर्यकन्या व हिंदुस्थानचें भविष्य ... ४ रु०
(१५) शशांक, ३ रु० (१६) चंद्रिका २॥ रु०
(१७) सोनेरी खंजीर २॥ रु० (१८) गौरमोहन ३॥ रु०
(२०) स्वर्गीय सौंदर्य २ रु० (२१) ऐक्यांतच मौज ४ रु०
(२२) कर्मसंन्यास ! २ रु० (२४) मोहिनी ३ रु०
(२६) जन्मठेप ! ३ रु० (२७) श्वेतांबरा ३ रु०
(३०) मनोरमा ३ रु० (३२) नगरतारका ३॥ रु०
(३३) कुलांगना कीं वारांगना ? ... ३॥ रु०
(३४) अजब कारस्थान ३॥ रु० (३५) खरी लोकसेवा ३॥ रु०
(३६) विजया ३॥ रु० (३७) रशियन राज्यक्रांति ३॥ रु०
(३८) अमरसिंहाचा आत्मयज्ञ ३॥ रु (३९) मयूरसिंहासन ३॥ रु०
(४२) भीषण भवितव्यता-भाग १-२ ... ७ रु०
(४४) मृगेंद्रलीला ४॥ रु. (४५) ईश्वरी लीला व आशानिराशा ४॥ रु०
(४७) प्रेमाश्रम भाग १ व २ आणि मुकुट ७ रु०
(५१) पावागडचा प्रलय ! ... ... ३॥ रु०
(५४) लंडनच्या बड्या लोकांचा गुप्त कृत्यें (गोष्ट ३) ७ रु०
(५५) लताकुंजगूढ ... ... ३ रु०

हीं पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—

पत्ता—तात्या नेमिनाथ पांगळ, पुणें शहर.

सुवाङ्मयेन गीतेन युवतीनां च लीलया। यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः।

सरसवाङ्मयरत्नमालेचें ८३ वें रम्य रत्न.

# परकाया-प्रवेश.

(एका सुप्रसिद्ध आंग्लकथानकाधारें)


— लेखक व प्रकाशक —

तात्या नेमिनाथ पांगळ,

चालक — सरसवाङ्मयप्रसारक मण्डळी,

८०९ रविवार पेठ-पुणें.



मुद्रक— वा. भा. जोशी, 'ज्ञानविलास' प्रेस

२७ बुधवार पेठ, पुणें.



[या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.]



वर्ष १६ वें<br>सपटेंबर १९३० } किंमत ३ रुपये. { पुस्तक क्रमांक १४०<br>आवृत्ति १ ली.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भगवत्कृपेनें मालेचें हें ८३ वें रत्न आम्ही प्रस्तुत महाराष्ट्र-भाषाभिमानी रसिकांस सादर करीत आहोंत. प्रस्तुत कादंबरी अगदीं सर्वतोपरी निराळ्याच पद्धतीची असून, तींत योगशक्तीनें एका शरीरांतला आत्मा दुसऱ्या शरीरांत घालून; दोन जीवांची अदलाबदल केल्यामुळें मनुष्याच्या मूळ स्वभावांत होणाऱ्या फेरफाराचें चित्र मोठ्या गमतीनें रंगविलेलें असल्यानें तें वाचकांना थोडें उद्बोधक व मनोरंजकही झाल्याशिवाय रहाणार नाहीं. योगसामर्थ्याच्या मागें प्रसिद्ध केलेल्या कादंबऱ्या म्ह० **योगसामर्थ्य, स्वराज्यस्वप्न, शारदाभक्त** या वेगळ्या पद्धतीच्या व ही प्रस्तुतची अगदीं निराळ्या धर्तीवर लिहिलेली असली, तरी आत्म्याचें तेज, सामर्थ्य व कर्तृत्व हीं सर्वांतच उत्कृष्टतेनें दर्शविलेली असल्यानें वाचकांना नेहमींच्या कथानकापेक्षां यांत कांहींतरी विशिष्टपणा भासल्यावांचून रहात नाहीं. असो.

पुढील खेपेस सुप्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार अलेक्झांडर ड्यूमास, याच्या एका ऐतिहासिक व वीररसप्रधान राजक्रांतिविषयक कादंबरीवरून लिहिलेले **राजसत्तेवर हल्ला** म्हणून प्रसिद्ध करण्यांत येईल. सदर कादंबरींत राजे लोकांच्या अन्याय्य दडपशाहीस प्रजेनें एकजुटीनें कसें उत्तर दिलें, व त्याचा परिणाम फ्रान्सचे राजाला राजपद सोडून पळतां भुई कशी थोडी झाली व पुढें प्रजासत्ताक राज्यपद्धति म्हणजेच लोकशाही कशी उदयास आली, वगैरे रोमहर्षण प्रसंग असल्यानें ती कादंबरी सर्वांना मनोरंजक वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. सध्यांचें दिनमान व्यवसायास अत्यंत बिकट आहेत, करितां ग्राहकांनीं नवीन वर्गणीदार पाठवून मालेस साह्यता द्यावी, अशी अगत्याची विनंति आहे.

पुणें शहर<br>ता. २५।९।३०.

आपला नम्र साहित्यसेवक,<br>ता. ने. पांगळ.

# परकाया-प्रवेश

## प्रकरण १ लें

### गूढशास्त्र-जिज्ञासु.

हिंवाळा सुरूं झाल्यामुळें भोजनवस्तीगृहांत दाटी होऊं लागली होती. रिकाम्या खोल्या इतके दिवस पडल्या होत्या, पण आतां जागा नाहीं म्हणण्याची वेळ आली. पाहुण्यांची भीड लागली. कोणी सृष्टिचमत्कार पहाण्यास तर कोणी चैनीसाठीं, कोणी हिंदुस्थानची स्थिति प्रत्यक्ष नजरेखालीं घालण्यास, तर कोणी ह्या हवेंतील मजा अनुभविण्यास, अशा नानाविध हेतूंनीं प्रेरित होऊन पथिकाश्रमाच्या मालकास भंडावल्यासारखें झालें. नाहीं, जागा नाहीं, खोली खालीं नाहीं, अशीं उत्तरें देण्यासही फुरसत मिळेना. बल्लवगृहांतील, पाकशाळेंतील, कोठींवरची सर्व मंडळी दुप्पट वाढविली तरी पुरी पडेना; कारण ह्या दिवसांत लखनौ शहरास रम्यपणा येत असतो. उत्तर हिंदुस्थानांतील चांगल्या शहरांत ह्याची गणति होत असून जिकडे तिकडे शोभा अवर्णनीय दिसूं लागते. 'राजा' पथिकाश्रम नांवाच्या एका हाटेलांतील एका खोलीच्या बाहेर दहाबारा इसम, वरून पांढरा स्वच्छ पोषाख केलेले 'बॉय' म्हणजे हरकामे, नोकरीसाठीं जमले होते. प्रत्येकाच्या हातांत एकएक चिठ्ठ्यांचें भेंडोळें असून कोणी तें पुनः बाहेर काढीत, कोणी पुनः स्वच्छ फडक्यांत बांधून ठेवीत, अशा स्थितींत ही मंडळी होती. कोणाच्या चिठ्ठ्या-शिफारसपत्रें-बहुत दिवसांच्या ह्मणून फाटूं लागलेल्या, पिंवळसर रंगाच्या झालेल्या, तर कांहींकांच्या ताज्या आणि चुरचुरित, फडफडित

( फडफड वाजणाऱ्या नव्हेत ) खुडखुडीत कागदावर खरडलेल्या होत्या. हीं सर्व उत्तम कामाचीं शिफारसपत्रें-नोकरीच्या लायकीचे दाखले होते. चिठ्यांवरील सह्या करणारे लोक यमदरबारीं जाऊन कित्येक वर्षें लोटलेलीं होतीं. तेव्हां त्यांपैकीं कांहीं ह्या हरकाम्यांच्या हातीं कशीं आलीं ह्या प्रश्नाचें गूढ पडण्याचें कारण नाहीं. तसले दाखले बाजारांत उघड विकत मिळतात. किंमतही फार नाहीं पडत, पंचकडीला चार आणे दिले म्हणजे पुरे.

ही हरकाम्यांची गर्दी झाली आहे,त्यावरून ह्या खोलींत रहावयास येणारा इसम नवीन गिऱ्हाइक आहे एवढें खास. विलायतेहून कोणी तरी नवा 'साब' येऊन ह्या खोलींत रहाणार असें म्हणण्यास हरकत नाहीं. साहेबाच्या येण्याची वाट पहात ही मंडळी आपसांत टिंगलबाजी करीत होती. आपल्याला संवत झालेल्या दुसऱ्या इसमाच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यास जो तो पहात होता; भांडणें चाललीं होतीं, पण तीं हळूंच; शेजारच्या 'साहेबा'ला कटकट न व्हावी अशा बेताचीं होतीं. मराठी, उर्दु, हिंदुस्थानी, इंग्रजी-सगळ्या भाषेंतील शब्दांचा व कित्येक वेळा शेलक्या शब्दांचा मारा होत होता. ज्याला त्याला आपल्याला जागा मिळावी असें वाटत होतें, ह्यांत नवल नाहीं; आणि म्हणून साहेब आल्याबरोबर प्रथम आपल्या चिठ्या साहेबाच्या हातीं देण्यासाठीं जो तो तयारींत होता. ह्या सर्वांपासून कांहीं अंतरावर एक वृद्ध मुसलमान बसला होता. त्याची दाढी पांढरी झालेली पण तिला रंग चढविलेला होता. धाटे बांधून तिची मशागत करून तिला वळण लावलेलें होतें. ह्याचें वय निदान पन्नासाच्या खालीं नव्हतें; पण त्याचा बांधा मजबूत, छाती रुंद व हातपाय बळकट दिसत होते. त्याचें नांव खाबूर होतें. ह्या इतर मंडळीच्या चेष्टा चाललेल्या पाहून तो आपल्याशींच हंसत होता. ह्या मंडळींत कोणी महार वगैरे इतर जातीचे लोक असल्यामुळें त्यांच्यापासून हा दूर बसला होता कीं काय न कळे. ह्या मंडळीला आपसांत थट्टा करतांना कंटाळा आल्यामुळें कीं काय कोण जाणे, किंवा हा खाबूर दूर बसला होता म्हणूनही कदाचित असेल, किंवा ह्यांच्या थट्टेनें तो चिडत नाहीं, बोलत नाहीं त्यामुळें त्यांना चैन पडेना. हा मनुष्यस्वभावच आहे कीं, आपला बाण वाया गेलेला खपत नाहीं. आपण ज्याची चेष्टा करतों, तो चिडला नाहीं तर बरें वाटत नाहीं; आपण दुसऱ्यांना हंसूं येईल असें

बोललों आणि मग कोणी हंसलें नाहीं तर हिरमुसल्यासारखें होतें. पण कोणालाही एकदम खाबूराशीं बोलवेना. अखेर जातीला जात वैरी म्हणतात त्याप्रमाणें त्याचें नांव घेऊन एका मुसलमानानें टवाळीला आरंभ केला.

तो म्हणाला "हा पाहिला बुड्ढेखा–खाबूरसाहेब ! क्योंजी खाबूरनसाब, इदर कायकूं आये ? ज्याव, मसजीदमे ज्याके निमाज पढो ! पैगंबरकी सेवा कर ल्यो ! तुमारे दफनकीभी तयारी हो चुकी है ! ( पण हो, असले मुसलमानी शब्द सर्वांनाच कुठें कळतात ? यासाठीं आम्ही आतां इंग्रज लोकांचीं भाषणें मराठींतच देणार ! ) कां खाबूरजी, आपण कां आला ? गांवीं काय दुष्काळ पडला आहे ? तुम्हांला कांहीं पोरेंबाळें नाहींत काय ? जसे काय हुजूर ह्यालाच कामावर घेणार आतां ? कोण ' साब ' येणार, ह्याची तरी चौकशी करावयाची होती ! साब आहेत एकटे; अजून मेमसाबलाही ठिकाणा नाहीं. मग बिब्बी नसल्यावर ' बाबालोक ' ( मुलें ) कुठून असणार ? आणि ' बाबालोक ' असल्याखेरीज तुमच्यासारख्या बुढ्यांचा काय उपयोग ? खेळवायला ' बाबालोक ' नाहींत हो बुड्ढेबाबा ! जा, घरीं जा मुकाट्यानें. तूर्त हुजुरला ' आया ' ची जरूर नाहीं. "

ह्यावर मात्र खाबूर हंसला. आतां त्याच्यानें गप्प: बसवेना. तो म्हणाला–" कां बेटा ? अरे, तें काम तर आमच्या अंगवळणीं पडलें आहे. ' आया ' बिया आम्ही सर्व होतों. असले ' बाबालोक ' खेळविण्याचीच आमची नोकरी. आम्ही आजपर्यंत दुसरें कांहीं केलेंच नाहींना ? पण गडे हो, तुम्ही इतके जण जेथें बसलां आहांत ते कशाला ? तुम्हांला काय मिळणार भाकरी ? एकाला तरी वाटतें कां आपल्याला ही जागा मिळेल म्हणून ? माझा डनबार बाबा यायचा आहे, तो मला सोडून तुम्हांला पतकरील कसा, ह्याचा विचार करा. दुसऱ्या कोणाची इथें डाळ शिजावयाची नाहीं. तुम्हीच जा आपल्या घरोबर. "

"बुड्ढेखा––वहावा ! ही का विद्या आहे आपल्याजवळ ? कुठला येणार आहे तो डनबार बाबा ? "

" तो कोणी का असेना ? त्याला तुम्ही फसवायला आणि लुबाडायला टोळभैरव गोळा झालां ते कशाला ? पण काय रे अहंमद, तुझ्या चिठ्या काढ कुठें आहेत त्या पाहूं. " अहंमदनें लगेच आपलें पुडकें पुढें केलें.

खाबूरनें तें मागें लोटलें आणि म्हणाला, "हें नव्हें रे! बेटा, हे दाखले कोणाला दाखवितोस? हे तर तूं ह्या बाजारांत विकत घेतलेस. ह्याला काय करतोस? ते फेकून दे, नाहीं तर जाळून टाक, आणि तूं रे खुदाबक्ष? तुला कधीं कोणी वोटभर चिठ्ठी दिलेली मला आठवत नाहीं. नाहीं म्हणायला एकदा एक कागद आणला होतास; पण त्यांत काय, तुझी फजितीच होती. तेव्हां तो तूं फाडून टाकलास. हें पुडकें तुझें मुळींच नाहीं. नुसत्या नांवाला नांव जोडून मी का फसणार? बोल, ह्या चिठ्या सगळ्या त्या दुसऱ्या खुदाबक्षाच्या आहेत कीं नाहीं? तो हल्लीं कलकत्यास आगगाडीवरच्या उपहारगृहांत नोकरीस लागला आहे. काय, होय ना? हात बेट्यांनो! लबाड, सगळे लबाड! मी तुम्हांला सर्वांना ओळखतों. तुमचे सगळ्यांचे दाखले—चिठ्या खोट्या; माझें काम अस्सल, दाखले अस्सल." हें लांबलचक भाषण ऐकून सर्वच खों खों करून हंसूं लागले. खुदाबक्षाला आतां वचपा काढायला चांगली संधि मिळाली. त्यानें मोठ्या दिमाखानें म्हटलें—"बुढ्ढेबाबा, काढा काढा तुमचे दाखले किती शेर भरणार ते! इतके गोळा करायला ह्या म्हाताऱ्याला किती पायपिटी करावी लागली असेल! या अल्ला! पाय नाहीं दुखले बुढ्ढेबाबा?"

खाबूर ह्यामुळें थोडा ओशाळला, पण त्याच्यानें गप्प बसवेना. तो म्हणाला "म्हण बेटा, तुझ्या तोंडाला येईल तें. मी तर बुढ्ढा झालों आहें खरा. माझ्याजवळ चिठ्या पुष्कळ कुठून असणार? तुमच्यासारख्या मण दोन मण ओझेवाल्या नोकरांची बरोबरी मी काय करणार? मी साऱ्या जन्मांत एका मालकाची नोकरी केली, तेव्हां चिठ्यांचा भारा मीं कुठून आणूं? त्या मालकाचे 'बाबालोक' या हातांनीं खेळविले, त्यांच्याशीं बागडलों, उड्या मारल्या, सर्व कांहीं झालें. तो माझा बाबा मोठा झाल्यावर विलायतेला गेला. तिथल्या बड्या इस्कुलांत शिकायला पाठविला तेव्हां मी किती तरी रडलों, त्याला किती तरी वर्षें झालीं. माझा वृद्ध मालक तोही परत देशीं गेला आणि तिकडेच आटपला. मालकसाहेब विलायतेस गेल्यावर मीही आपल्या गांवीं गेलों आणि आतांपर्यंत तिथेंच होतों. आज कां आलों विचाराल, तर माझ्याच मालकाचा (मुलगा) बाबा लखनौस आला आहे आणि तो ह्या खोलींत रहायला लागला आहे, समज-

लांत ? मग सांगा पाहूं तो कोणाला नोकरीवर ठेवील तें ? मीच येथें नोकरीस लागणार यांत संशय नाहीं. आतां आहे का कोणाला आशा ? "

इतकी स्पष्टता झाल्यावर काय राहिलें ? ते सगळेजण उमजले आणि आपले कागद गुंडाळून खाकोटीला मारून एकेकानें रस्ता सुधारला. ह्यांच्या ह्या कृत्यानें सुलेमानाचे तोंडावर स्मित हास्य चांगलेंच झळकूं लागलें. हर्ष-भरानें तो आपल्याशीं म्हणाला, " पहा काय मजा आहे ती ? सगळेच देखनेमे ढब्बू. हीं गिलिटाचीं नाहीं तर इनामलचीं भांडीं. मुलामा गेला किंवा इनामल जरा खरवडलें, कीं आंत लोखंड ! त्याची किंमत दीडदमडी सुद्धां यायची नाहीं. बरीच पिडा गेली. हुजूरचा पुष्कळसा त्रास चुकला उगीच त्यांच्याशीं बाबाला पिरपिर करावी लागली असती. कांहीं दोन चार आणे प्रत्येकाच्या तोंडावर टाकावे लागले असते. तेवढेच वांचले. " इतके बोलून त्यानें आपले चिठ्यांची नीट घडी केली आणि त्या एका फडक्यांत बांधून कोटाच्या आंतल्या खिशांत नीट ठेवून दिल्या. त्याचें कारणच उरलें नव्हतें. तो पुनः मनाशीं विचार करून म्हणाला-" दिवस पुष्कळच वर आला आहे. आतां हुजूर येऊन जेवायच्या तयारीनें खालीं जाण्याला चाहतील, तेव्हां कपडे नकोत कां करायला ? मग आतां उगीच वेळ कां लावा ? आप-णच आंत जाऊन सगळी व्यवस्था लावून ठेवूं. "

ह्या गोष्टीला सुमारें अर्धा तास झाला, तों एक तरणाबांड साहेब व्हरंड्यांतून हळुहळू त्या खोलीकडे येत होता. तोंडानें कांहीं तरी गाण्याचा चरण गुण-गुणत होता. तो थेट नंबर १९ च्या खोलींत शिरला. पण दोनचार पावलें टाकून तेथेंच थांबला. तेथील व्यवस्था पाहून तो आपल्या मनाशीं म्हणूं लागला, " अबबब ! मी चुकलों तर नाहीं ? माझीच खोलीना ही ? दारावर स्पष्ट १९ चा आंकडा मीं पाहिला. त्यांत कांहीं चूक नाहीं. काय म्हणावें ? आश्चर्य आहे बुवा !" याचें नांव मि. डनबार.

आश्चर्य वाटण्याचें कारण समोर पलंगाकडे दृष्टि गेली तों तेथें स्वच्छ परीट घडीचा शर्ट आणि त्याच्या शिलकेचे इतर कपडे मांडून व्यवस्थेशीर ठेविले होते. ती योजना कोणीं केली असेल ह्याचें त्यास नवल वाटलें. तो आपल्याशीं म्हणूं लागला-" हे कपडे तर माझ्या कपड्यांसारखे दिसतात. आणि ह्या कपड्याच्या पेट्या तर निःसंशय माझ्या. खोलीही पण माझी.

मग काय ? ह्या भोजनाश्रमाच्या मालकानें कांहीं हरामखोरी केली कीं काय ? कोण उर्मटपणा हा ! मला विचारल्याशिवाय कोणीं हा कारभार केला ? वाहवा ! खोलींत कोणी तरी आहे खचित. कोण हाय अंदर ? ”

“ जी हुजूर. ” खाबूर आंतल्या स्नानगृहांतून बाहेर आला आणि त्यानें ह्या साहेबास लवून सलाम केला.

डनबारला आश्चर्य वाटलें “ तूं रे कोण फाजील माझ्या खोलींत शिरणारा?”

“ मी खाबूर ! ” येवढेंच उत्तर त्याला मिळालें.

“ तुझें तें शेंमडें नांव मीं तुला कधीं विचारिलें ? ” डनबार विचारूं लागला व त्याचा राग दर शब्दाबरोबर चढूं लागला. “ तूं माझ्या घरांत कां शिरलास ? कोणाच्या हुकमानें शिरलास ? ”

“ हुजूरनीं मला ओळखलें नाहीं तर ? ”

“ म्हणजे, मी कुठून ओळखणार ? तुझी पाहिली जानपछान असेल तर कीं नाहीं ? ”

“ हुजूरच्या वडिलांजवळ हरकाम्या होता तो आठवतो काय ? ”

“ अरे होय रे होय, आठवतो खरा. तोच कां तूं विश्वासू खाबूर ? मी तुला ओळखलाच नाहीं ? तूं किती म्हातारा झालास हा ? ”

खाबूरला हें ऐकून हसूं आलें; थोडा वेळानें गंभीर स्वर काढून तो म्हणाला, “ हुजुरच्या तारवाचें अर्धेंसुद्धां बनलें नव्हतें, त्याच्या पूर्वींच ह्या खाबूराची होडी समुद्रांत ढकलली जाऊन लाटा खात चालू झाली होती. आतां बहुतेक प्रवास संपलाच म्हणावयाचा. तिचा नांगर ओढून तिला किनाऱ्यावर खिळवून टाकावयाची वेळ आलीच आहे; शिडें वगैरे बांधून गुंडाळून ठेवलीं पाहिजेत. हुजूर, हुजूरला मीं पाहिल्याला दहा वर्षें झालीं. परंतु हुजूरला आज पाहतांच मीं ओळखिलें. त्या वेळीं शिपायांचें बंड मोडून थंड झालें होतें; आपले वडील स्वतःच्या मालकीची जागा घेऊन राहिले होते. तेथून लाल किल्ला जवळच होता. ”

“हो, खरें रे खरेंच. किल्ला नव्हे काय तो! अजून तो नबाब आहे का रे ?”

“कोणता नबाब हुजूर ? नवे नबाब आले आहेत आतां. जुन्या नबाबाची व हुजूरच्या पिताजींची फार दोस्ती होती. तो नबाब अल्लाकडे गेल्याला दोन महिने झाले.”

"होय, खरेंच. मी अगदींच विसरलों. हा तुझा नवा नबाब माझ्या बरोबर इंग्लंडांत होता. त्याचा बाप मेल्याची तिकडे तार आल्याबरोबर तो घाईनें इकडे निघून आला खरा."

"नवे नबाब तर थेट बिलायती अस्सल साब झाले आहेत."

हें ऐकून डनबारला मोठ्यानें हंसूं आलें. "इतक्यांत त्याचा प्रत्यय तुला आलाच तर मग."

"नाहीं हुजूर, मला एकट्यालाच नव्हे—सगळे लोक तसें ह्मणतात. तो बिलायतेला गेलाना, त्या जाण्यापूर्वी त्याच्या बापदादानें-त्याला तीन वर्षें झालीं,–पुष्कळ पैका खर्च करून त्याचें लग्न केलें. औरत पण किती सुंदर! राजकन्येसारखीच करून दिली. पण हे साहेब तिच्याकडे ढुंकून पहातील तर शपथ! तिला त्यानें अगदीं कडीकुलपांत सात पहाऱ्यांत ठेविली आहे. तिचें तोंडसुद्धां तो पहात नाहीं. एकदां काय तें लग्नांत तिचें तोंड त्याच्या नजरेस पडलें असेल तेवढेंच. त्यांचा नवराबायकोपणाचा संबंध झालाच नाहीं. गप्पांचा मात्र सुकाळ आहे. कोणी म्हणतो हे नबाब विलायतेंतल्या एका मडमेशींच निक्का लावणार आहेत."

"असें काय? तरी पण तो जात्या चांगल्या स्वभावाचा दिसतो."

"कोणी काय म्हणावें—अल्ला सब जाने. त्याला डोळे! हुजुरच्याबरोबर तो खेळायला येत असे, तेव्हां तो चांगला होता. पण ते पूर्वीचे दिवस गेले."

"ते दिवस किती मौजेचे होते! काय रे खावूर, मी त्या वेळीं फार खोड्याळ होतों, नव्हे?"

"मुळींच नाहीं. हुजुरला नाद तेवढा फिरण्याचा. कोणी साधु, फकीर, दाढीवाला गोसावी भेटला कीं, त्याच्याशीं हुजूर चिकटायचे. त्याला किती प्रश्न करायचे! पण बेडेचार किंवा त्रास कधीं दिला नाहीं."

"बरें असो. खावूर, तें जाऊं दे. तुला सांगून ठेवतों कीं, अजूनही तसलाच नाद मला आहे. हे लोक कीं नाहीं, मोठे गूढ ज्ञानी व योगी असतात. ह्यांच्याजवळ फार विद्या असते. ती योगविद्या शिकण्यासाठीं मी आलों आहें. मी हेंच काम तूर्त पतकरलें आहे."

"हुजूर, ह्या बंद्याची, बुढ्याची विनंति ऐकावी. ह्या असल्या भुताखेताच्या वाटेस आपण जाऊं नये. अल्लाचें नांव घ्या, त्याच्या हुकुमाप्रमाणें चाला;

तुमचें कल्याण होईल, तुम्हांला कांहीं कमी पडणार नाहीं. पण हुजूरला उशीर नाहीं कां होत? हुजुरनें कपडे करावयास लागावें, आणि कपडे करतां करतां आपण बोलूं."

डनबारला जरा हिरमुसल्यासारखें झालें. त्याच्या मनांतून कितीतरी प्रश्न विचारावयाचे होते. सुलेमाननेंही मोठ्या चतुराईनें घोरणाधोरणानें प्रश्न विचारून हुजूरचे हृद्गत काढून घेतलें. इंग्लंडमधील एका सभेचा तो सभासद झाला असून ह्या असल्या अलौकिक गोष्टींची माहिती मिळविण्याचा त्याचा उद्देश होता. मानसशास्त्राचे प्रयोग प्रत्यक्ष पाहण्यासाठीं हिंदुस्थानासारखी दुसरी जागा नाहीं, म्हणून या डनबारसाहेबाची रवानगी इकडे झाली होती. ह्यांत काय–दिवस, महिने जातील तितके दिवस हे साहेब, फार झालें तर ते येथें राहणार; हें ऐकून मात्र खाबूरास बरें वाटलें नाहीं.

डनबारनें मध्येंच प्रश्न केला, "ह्या हाटेलांत किती लोक आहेत?"

खाबूरनें उत्तर केलें "मला कसें सांगतां येईल? एक अल्ला जाणे. बहुतेक खोल्या भरल्याच आहेत. फक्त आपल्या शेजारच्या खोलींत. नंबर १८ त कोणी नाहीं. त्याच्या पलीकडे नंबर १७ त एक म्हातारा आणि तरुणी राहतात. ती धर्मोपदेशकाचें–पाद्र्याचें काम करतें. नंबर १६ मध्यें कोणी डेप्युटी साहेब असतात. पलीकडे नंबर १५ मध्यें—"

खाबूरचे शेवटचे शब्दाकडे डनबारचें लक्ष्यच नव्हतें. कारण तो म्हणाला, "ती मुलगी धर्मोपदेशाचें काम करते! हे पाद्री बहुतेक गरीब असतात, मग ते ह्या श्रीमंती व महाग हाटेलांत कशाला राहिले?"

"खाबूर, तुला बरोबर बातमी नसेल. तुझ्या समजुतींत चूक दिसते."

"माझी चूक नाहीं, हुजूर. मीं ह्या डोळ्यांनीं त्या 'मुलीला' स्नानाच्या घाटावर, बायका धुवायला येतात तिथें उपदेश करतांना पाहिली आहे. शिवाय एकदोन नबाबांच्या जनानखान्यांतही तिचा प्रवेश झाला आहे. लाल किल्ल्यावरही ती गेली होती ह्यांत संशय नाहीं!"

"काय बुवा आश्चर्य हें! हे मुसलमान लोक आपल्या बायकोबरोबर त्या ख्रिस्ती बाईला बोलूं कसे देतात?" डनबार म्हणाला.

"छे, छे, सगळे कोण तिला येऊं देतात? एक दोन ठिकाणीं तिचा शिरकाव झाला आहे, आणि त्याचें कारण न्यारेंच आहे. 'ही मुलगी' फारच

स्वरूपवान आहे ह्मणूनच तिला मज्जाव झाला नाहीं, आणि लोक म्हणतात कीं, झनानखान्यांत पोंचण्याची इला संधीच मिळत नसेल. हे नबाबच तिला आपल्याजवळ बसवून घेऊन तिला बोलायला गुंतवतात. यांतून सुटेल तेव्हां ती पुढें जाणार कीं नाहीं ?"

"काय म्हणतोस ? ती लाल किल्ल्यावरही जात असतेना रे ? बरोबर, आतां सारें जमलें. अमीर अल्लीखानचें मन तिच्याच भोंवती गुणगुण करीत असेल. तिचेंच वेड ह्याला लागलें असावें ?"

"कोणी सांगावें काय तें ? अल्लाला सारें ठाऊक. पण हुजूरनीं मात्र सावध रहावें. ती याच हाटेलांत रहाते म्हणून काळजी वाटते, दुसरें काय ?"

इतक्या वेळांत डनबारचा पोषाख पुरा झाला आणि तो भोजनाच्या– दिवाणखान्यांत गेला. तेथें आंत शिरण्याच्या दाराच्या अगदीं दुसऱ्या बाजूच्या भिंतीजवळ जें लहानसें मेज मांडलें होतें; तेथेंच त्यानें जागा धरिली. खाबूर म्हणाला कीं, पथिकाश्रमांत फार मंडळी जमली आहेत, व त्याचा अनुभव ह्या ठिकाणीं त्याला आला. गर्दी फार झाली होती आणि त्या मंडळींत आपल्या कोणी ओळखीचें भेटेल या आशेनें दारांतून येणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या चेहेऱ्याकडे तो पहात होता. पण त्याची अगदीं निराशा झाली. तेथें त्याच्या ओळखीचें कोणीच दिसेना. अखेर एक वृद्ध गृहस्थ एका तरुणीच्या खांद्यावर टेंकल्याप्रमाणें तिला धरून भोजनागारांत आला. ह्याजकडे तेथल्या मंडळींनीं कोणीच ढुंकूनही पाहिलें नाहीं, ह्याचें बीटनला मोठें नवल वाटलें; कारण एकतर ती तरुणी फारच सुंदर होती, आणि ती त्या म्हाताऱ्याला घेऊन येत होती. तीं दोघें डनबारच्या जवळच्याच एका मेजापाशीं येऊन जेवायला बसलीं. डनबारनें भोजनपदार्थांची यादी हातांत घेतली आणि ती वाचूं लागला. निदान ती वाचण्यांत तो गढून गेला आहे असें त्यानें सोंग केलें, पण त्याचें लक्ष सर्व त्या तरुणीकडे होतें. तो मनांत म्हणत होता कीं, सुलेमानानें सांगितलेली धर्मोपदेश करायला आलेली युवती हीच असेल काय ? तिच्या मुखावर दैवी संपत्तीचें तेज दिसत होतें आणि धर्मांतर करण्याला लावण्यासारखे कांहीं गुण असतील तर ते तिच्यांत दिसतात.

हे विचार चालले असतांना त्यानें आपलें मन पुष्कळ आवरलें, तरी त्याच्या डोळ्यांवर त्याचा ताबा चालेना. ते त्या युवतीकडे आणि म्हाताऱ्या-

कडे पहाण्याचें आपलें काम सोडीनात. तो मध्येंच दचकल्यासारखा करी. लज्जेनें त्याचें तोंड खजिल झालें तरी पण एक प्रकारच्या आनंदाच्या लाटांवर आपण तरंगत आहोंत असें त्याला वाटत होतें. असा किती वेळ गेला हें त्याचें त्याला कळलें नाहीं. परंतु पुनः तो शुद्धीवर येऊन पहातों तो त्याच्या नेत्रांना कांहीं केल्यानें दृष्टिमुख पुरेसें होईना. इतक्यांत त्याचे लक्षांत आलें कीं, ती युवती आपल्याकडे पहात आहे, पण तिच्या तोंडावर आनंदाचें चिन्ह असण्याऐवजीं घाबरल्याची मुद्रा दिसत आहे. ती तरुणी आपल्या पित्यास म्हणाली:—"बाबा, बाबा, कायहो झालं मला असं? मला कांहीं चमत्कारिक स्वप्नभास झाला." "काय झालं असें? माझी बाळ ती!" "काय सांगूं बाबा? ह्या दहापांच मिनिटांत माझ्या मस्तकांत कांहीं भणभण असा आवाज होत होता असं वाटलं, आणि डोळे मिटल्यासारखी झापड आली, आणि माझे डोळे जणूं काय त्या समोरच्या मेजापाशीं कोण बसलं आहे, त्यांच्याकडे कोणी ओढून नेल्यासारखे लागले. मला वाटतं कीं, त्यांनींच माझी दृष्टि मुद्दाम आकर्षण करून घेतली असावी. आणि बघतें तों तेही माझ्याचकडे नजर लावून बसले आहेत."

"फार श्रमाचा परिणाम हा बरं! तरी मी म्हणत असतों कीं, इतकी मेहनत तूं करीत जाऊं नकोस. बोलून बोलून मेंदू हलका होतो. तूं जें काम अंगावर घेतलें आहेस तें तुला वाटतें तसें हलकें नाहीं; त्याला अंगांत सामर्थ्य लागतें, मेहनत पडते."

त्या तरुणीचें नांव क्लिन्सी. क्लीन्सीला हें बापाचें बोलणें पटलें नाहीं. तिला वाटे कीं, हा चमत्कार झाला हा कांहीं श्रमाचा परिणाम नव्हे; असली भणभण किंवा गुणगुण मेंदूला त्रास झाल्यानें होईल अशी तिची खात्री होईना. तिच्या मनानें घेतलें कीं, ह्या समोरच्या माणसानें आपल्यावर दृष्टिपात करून वशीकरण प्रयोग केला असावा आणि ह्या असल्या निंद्य प्रकाराबद्दल तिच्या मनांत डनबारबद्दल एक प्रकारची तेढ पडली.

झालें, जेवणें उरकलीं; वाढण्याची गडबड वगैरे संपली आणि आलेली मंडळी दोन दोन अगर तीन तीन अशी कांहीं टोळक्या टोळक्यांनीं त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडूं लागली. रहातां रहातां तो म्हातारा, त्याची मुलगी आणि डनबार असे तिघे तेथें उरले. डनबारनें तोंड वर केलेंच नाहीं.

तो खालीं पाहून आपल्या हातांतील दारूच्या पेल्यांतून लहान लहान घोट घेत होता. त्याला कुठें बाहेर जाण्याची घाई नव्हती कांहीं नव्हती, तेव्हां तो जागचा हालेल कशाला ? तो वृद्ध गृहस्थ शेवटीं आपल्या मुलीला म्हणाला व ते शब्द डनबारनें स्पष्ट ऐकिले, "काय ग पोरी, गेली असतील आतां सारी मंडळी. चलायचें ना आपल्याला इथून? आतां वाट असेल का मोकळी ?" क्ीन्सीनें पुनः डनबारकडे दृष्टि फिरविली;पण तिनें ओळखिलें कीं, ही स्वारी मोठी खमंग दिसत आहे. तो आतां तरी निदान कांहीं वेळ उठण्याच्या बेतांत नाहीं. तेव्हां तीच उठली आणि तिनें बापाचा हात धरून तेथून रस्ता काढला. डनबारनें एकदम त्या पेल्यांतील उरलेल्या पेयाचा घोट गिळला आणि तोही त्या बापलेकींच्या मागोमाग निघाला. ह्या म्हाताऱ्याला नीट दिसत नाहीं, हें समजावयाला त्याला फार वेळ लागला नाहीं; कारण तो त्या मुलीचा हात धरून चाचपडत चालला होता; त्याच्या पायाखालचें त्याला दिसत नव्हतें. म्हणून तो आपल्या कन्येच्या हातावर भार टाकून पाय उचलीत होता. त्या भोजनागारांतून बाहेर पडण्याच्या दाराच्या उंबऱ्यांत म्हाताऱ्याचा पाय अडकला आणि तो खालीं पडणार इतक्यांत डबानर चटदिशीं पुढें झाला, व त्यानें म्हाताऱ्याचा तोल संभाळला, आणि त्याला पडूं दिलें नाहीं.

ती तरुणी म्हणाली " काय बाई करावं ! वस्तू जेथल्या तेथे ठेवायला ह्यांना काय होतं कोण जाणे ? दारांत पसरायची चटई अशी कां भलत्या जागीं ठेवीत असतात ! आपण या वेळीं धावून येऊन हात दिला ह्मणून खैर झाली; बरं तर बरं, नाहींतर बाबांना कित्ती लागलं असतं ! काय सांगूं आपल्याला ! आपली मोठी मदत झाली, उपकार कितीतरी म्हणावे ! देवानंच आपल्याला ह्या प्रसंगीं धाडलं. दुसरें काय म्हणूं ! "

डनबारनें ह्यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यानें मोठ्या अदबीनें खालीं मान वाकवून तिला सलाम केला, पण तो तेथून हालला नाहीं. ह्याताऱ्याच्या दंडाला त्यानें धरिलें होतें, तो तसाच धरून राहिला, तो सोडून दिला नाहीं. तेव्हां क्वीन्सीलाच बोलणें भाग आलें. ह्याला जा तरी कसें म्हणावें ह्याची पंचाईतच होती. तेव्हां ती युक्तीनें बोलूं लागली, "पुरे हो आतां. आतां नेईन मी बाबांना संभाळून; मला एकटीला ते आवरतील. "

" छे, छे, असें काय करतां ! मीच येतों तुमच्या खोलीपर्यंत पोहोंच-

बयाला यांना धरून. मला कांहीं त्यांत तसदी नाहीं. ”

हा लोचटपणा क्वीन्सीला आवडला नाहीं. पण करणार कसें ? नको असें स्पष्ट म्हणण्याची सुद्धां तिनें तयारी केली, पण म्हाताऱ्यानें डनबारचे उपकार मानण्याची पराकाष्ठाच केली. आणि डनबारचें म्हणणें मान्य करून तो त्याचाच हात धरून चालूं लागला; क्वीन्सीचा हात त्यानें सोडून दिला. तेव्हां मात्र तिला फणकारा आला. तिनें कपाळाला आठ्या घातल्या आणि ती चटकन पुढें निसटली. त्या तरुणीला आपल्या लुडबुडीनें राग आला आहे, हें डनबारनें पाहिलें. पण त्यानें त्याचें मनावर घेतलें नाहीं. त्यांत काय आहे असें त्यानें ठरविलें आणि त्या म्हाताऱ्याचा दंड धरून त्याच्या खोली-पर्यंत त्यास नेलें.

# प्रकरण २ रें.

## भुताखेतांबद्दल गोष्टी.

खोल्यांच्या रांगेपुढें व्हरंडा व त्यापुढें मोकळी जागा अंगणासारखी होती. क्वीन्सीच्या खोलीपुढें अंगणांत दोन खुर्च्या मांडलेल्या होत्या. खोलीपर्यंत पोहोंचल्यावर आतां परत जाणें डनबारला भागच होतें. पण इतक्यांत म्हातारा म्हणाला, “ भले शाबास, तुम्ही ऐन वेळेला मदत दिली हो. त्या पाहिल्या खुर्च्या. येथेंच मोकळ्या हवेंत बसून रहाण्याचा माझा परिपाठ आहे; निदान मी एकटा असलों म्हणजे तियेंच बसून रहातों.” तेव्हां डनबार त्या म्हाताऱ्याला त्या खुर्च्यांकडे घेऊन चालला, इतक्यांत तेथें क्वीन्सी आली; खोलींतून बापाची चाहूल ऐकूनच ती बाहेर आली; तिनें पाहिलें तों डनबार अद्याप तेथेंच आहे. म्हाताऱ्यानें त्याला बोलण्यांत गुंतविलें किंवा तो होऊनच तिथें रेंगाळत दिसला. आतां कांहीं तरी खोंचून बोलल्याशिवाय हा जात नाहीं असें वाटून ती म्हणाली “ आणि बाबांना किनई, एकटें असल्यानेंच बरं वाटतं. ” हें ऐकतांच डनबार मनांत चरकला; कारण त्या तरुणीच्या बोलण्याचा स्पष्टार्थ असा होता कीं “ राजेश्री, पुरे झाला लुब्रे-पणा. येथून आतां निघून जा ! ” तो आतां त्याप्रमाणें निघूनही गेला

असतां, परंतु म्हाताऱ्यानें त्याचा हात सोडला नाहीं. त्याला मुलीचें बोलणें पसंत पडलें नाहीं असें दिसलें. तो डनबारला म्हणाला " छे हो! तसें कांहीं नाहीं, नेहमीं कसला एकांत? कोणी बोलायला नसलें म्हणजे मग आम्ही एकटेंच बसतों कीं. मी ग असें केव्हां म्हटलें? जेवण झाल्यावर घटका दोन घटका थोड्याशा गप्पा मारायला कोणी असलें तर मला पाहिजेच असतें. पण आपल्यालाच जर कुठें जाण्याची गर्दी असली—"

डनबारला ह्या सुसंधीचा फायदा घेतल्यावांचून रहावेना. ह्या ऐटबाज पोरीचा गर्व उतरायला आयता आलेला प्रसंग वाया जाऊं देऊं नये असें मनांत योजून त्यानें उत्तर दिलें, " आज कांहीं माझें कुठें बाहेर जाण्याचें ठरलेलें नाहीं."

" वहावा! मग फारच छान झालें. बसा तर मग ह्या दुसऱ्या खुर्चीवर, म्हणजे आपण चार घटका बोलूं तरी स्वस्थ."

डनबारचे नेत्र पुनः क्रीन्सीच्या मुखाकडे वळले, तों तिच्या चेहऱ्यावर नाखुषीचें चिन्ह पाहून, हिला जर आपण येथें नसावेंसें वाटतें तर उगीच तेलंगीपणा करण्यांत अर्थ नाहीं, असें पुनः त्याच्या मनांत आलें. पण ह्या म्हाताऱ्याचें म्हणणें कबूल केल्यानें बरें होणार नाहीं, असेंही त्याची मनोदेवता सांगूं लागली. तिची मुद्रा कांहीं केविलवाणी पण कांहीं क्रुद्ध अशी मिश्र होती. तिच्या दीन मुद्रेनें ह्याच्या मनांत दया आली, परंतु अद्यापहि तिचा झणकारा गेला नाहीं असें पाहून त्याच्या विचारांनीं उलट खाल्ली, आणि तो म्हाताऱ्याला म्हणाला, "थांबा, मी आणखी एक खुर्ची आणवितों." असें म्हणत असतांच त्यानें ती दुसरी रिकामी खुर्ची ओढून त्या तरुणीच्या पुढें सारली, तरीहि ती बसेना. तेव्हां आतां स्पष्ट बोलण्याची पाळी आली, "कां, बसायची मर्जीच नाहीं वाटतं. माझी काळजी नको. मी आपल्या नोंकराला सांगुन माझी इझीचेअर आणवितों म्हणजे झालें."

त्या युवतीनें झणकाऱ्यानें मुरका मारून तोंड फिरविलें आणि तशीच पाठ करून म्हटलें, " छे छे, इतकी तसदी नको घ्यायला. मुळीं मीच इथून आपल्या खोलींत जाऊन बसल्यें म्हणजे कटकटच नको." इतकें बोलत बोलत तिनें पाय उचलून मार्ग सुधारला.

तो म्हातारा ह्मणाला " जाऊं द्या हो. तिला आज जरा त्रास झाल-

आहे. माझी पिडा तिला रोजची आहे. माझी नोकरी तिला रोज करावी लागते, त्यांत आज आयती सुटी मिळाली आहे. घेऊं द्या तिला त्याचा उपभोग. जाईना गेली तर. मी काय म्हणतों समजलें कां—काय तुमचें नांव म्हणत होतों तें— ?"

" डनबार ! " " असें काय? माझेंहि नांव फरेल. ही माझी मुलगी क्लीन्सी. पोर स्वभावानें फार चांगली आहे हो. माझें मलाच वाटतें कीं, ह्या ह्माताऱ्याची तिला किती उठाठेव पडत असेल. माझें सर्व ओझें तिच्यावर. म्हातारपण म्हणजे दुसरें पोरपणच.पण ती आपली मला फार संभाळते. तक्रार कधीं करीत नाहीं. कुरकूर सुद्धां नाहींहो. मला घड दिसत नाहीं. असला पंगुपणा आला म्हणजे माणूस अगदीं परतंत्र होतो माझ्या पायांतही चांगलासा नेट उरला नाहीं. त्यामुळें चालतांना तिनें मला संभाळलें तरच बरें असतें. पाहिलें ना, मघाशीं कसा मी कोलमडून पडत होतों तो ? बहुतेक तीच मला हातीं धरून वागविते. मी मागें धर्मोपदेशकाचें काम करीत होतों. तिकडे खालीं दक्षिणेकडे मी होतों. तें काम मीं पुष्कळ दिवस केलें; शेवटीं माझी प्रकृति जेव्हां थकत चालली, तेव्हां माझ्या क्लीन्सीला घेऊन मी परत इंग्लंडला गेलों. त्या पूर्वींच ( डोळ्यांत पाणी आणून ) माझें कुटुंब मला सोडून गेलें. तिला मूठमाती मुंबईस दिली. क्लीन्सी मोठी झाली तेव्हां तिलाही, मला जशी लहानपणीं आज्ञा झाली होती, त्याप्रमाणें प्रभूचा ' हुकुम ' झाला. तिच्या मनानें इकडे यायचें घेतलें, पण माझ्या म्हाताऱ्याची अडचण येऊन पडली. मी असा थकलेला, तेव्हां इकडे मला आणावा तरी पंचाईत, बरें, तिथें टाकून यायला क्लीन्सी तयार होईना. अखेर माझ्या मनांत नव्हतें तरी इकडे हिंदुस्थानला यायलाहि मीच तयार झालों. त्यांत कांहीं मी मोठेंसें शतकृत्य केलें नाहीं; माझ्या या म्हातारपणामुळें व विशेषतः अंधत्वानें मी माघार घेत होतों; एरवीं खरोखर मला ह्या देशाची मोठीच आवड वाटते. "

" मघाशीं काय तुम्ही म्हणालांत तें ? तुमच्या कन्येला प्रभूचा ' हुकूम ' झाला. असेंच ना आपण म्हटलेंत ? " असें डनबारनें विचारलें.

" होय, हिंदुस्थानांतील स्त्रियांमध्यें सद्धर्मप्रसार करण्याविषयीं तिला साक्षात्कार झाला; ती ह्या शहरांतील नदीच्या घाटावर जाऊन उपदेश करीत असते, आणि श्रीमंत मुसलमानांच्या घरोघर त्यांच्या गोषांत—झनानखान्यां-

तही तिला प्रवेश मिळाला आहे."

" ह्यांत कांहीं संकट येईल, भलताच प्रसंग तिजवर ओढवेल अशी भीति आपल्याला वाटत नाहीं ?"

" त्यांत कसली भीति ? माझ्या मनांत तर कांहीं येत नाहीं. नाहीं म्हणायला लाल किल्ल्याच्या नबाबानें माझी बायको होतेस का म्हणून कोन्सीला विचारलें होतें." पण हें बोलतांना फरेल म्हाताऱ्याला किंचित हंसायला आलें.

" काय म्हणतां ! काय करावें ह्या अमिराला ! मला नव्हतें वाटलें, हा इतक्या थरावर गोष्ट नेईल म्हणून—त्यानें हा असला अपमानाचा प्रकार—"

" त्यांत कसला अपमान ? आतां त्याची लग्नाची बायको आहे हें खरें; पण मुसलमान लोकांना आपल्यासारखी बंदी नाहीं. एकाच वेळीं एकापेक्षां अधिक बायका करण्याला त्यांना कांहीं हरकत नाहीं. आपण आपल्या समजुतीवरून पाहिलें तर जमणार नाहीं. त्यांची नीतीची कल्पना, मानापमानाचे विचार भिन्न असतात. आचार, रीतिभाती, पूर्वपरंपरा, संस्कार, परिस्थिति ह्यांच्यावरच ह्या मानापमानाची कसोटी लावावयास पाहिजे. आपण आपल्या समजुतीवरून दुसऱ्यावर तेच प्रकार लादतों हें बरें नव्हे. माझ्या मुलीनें त्याचा वेडगळपणा कसा झाला, आणि अशा लग्नाच्या विषयाबद्दल बोलण्याच्या अधिकार त्याला पोहोंचत नाहीं, वगैरे त्याची स्पष्ट समजूत घालून दिली, तेव्हांपासून तो विरमल्यासारखा झाला आहे. त्यानंतर पुढें त्यानें कांहीं गडबड केली नाहीं; मग उगीच त्याला दोष कां द्यावा ? त्यानें ह्याबद्दल एक पत्र लिहून झालेल्या अनिष्ट चुकीबद्दल माफीसुद्धां मागितली; आतां अजूनही कोन्सीचें त्याचे घरीं जाणें येणें आहे; ती त्याच्या झनान्यांत जाते; पण तो फार अदबीनें, मर्यादेनें, सभ्य गृहस्थास साजेल असाच वागतो. तुमची आणि ह्या नबाबाची ओळख आहे वाटतें ?"

" हो तर. आम्ही लहानपणीं पोरांमध्यें एकत्र खेळत होतों. पुढें मी इंग्लंडांत शिकण्यासाठीं गेलों, तिकडे तोही माझ्या मागोमाग आला, आणि मी ज्या शाळेंत होतों, तिथेंच त्यानें आपलेंही नांव घालविलें. मानसशास्त्ररोगपरिहारिणी सभेचे आम्ही दोघेही सभासद आहों."

" फार उत्तम झालें मग ! मलाही त्या विषयाची आवड आहे; मला

ह्या शास्त्रांतील शोधांची फार हौस आहे. एकदां ह्या "झाड बोलविण्याच्या प्रयोगाला" मी गेलों होतों, तेथेंच एक रोमन क्याथलिक पाद्री आला होता. त्याच्या गळ्यांत लहानशा पिशवींत एक मंतरलेली कणकेची चकती होती; तो पाद्री म्हणाला, ही माझ्याजवळ आहे तोंपर्यंत भुताखेताची मला भीति नाहीं. पुढें चमत्कार असा झाला कीं, त्या मांत्रिकानें आपला प्रयोग सुरूं केला आणि एक हडळ बनलेली संतीण तिथल्या एका बाईच्या अंगांत आली, आणि ती बाई घुमायला लागली! ह्या भटाकडे पाहून तिनें मोठ्या अदबीनें डोकें लववून सलाम केला. पण ह्याचें मला कांहीं वाटलें नाहीं. ही गोष्ट होण्याला पिशाचच नको होतें; ज्या बाईच्या अंगांत हें पिशाच्च आलें, तिला ठाऊक होतेंच कीं, भटाला संतिणी पहातांच अदबीनें सलाम करतात. तेव्हां कदाचित ती बाईच हें लबाडीनें करीत नसेल कशावरून? पण पुढें काय झालें, कीं त्या बाईचे अंगांतील पिशाच्च बोलूं लागलें! प्रश्नोत्तरें होतां होतां, तिनें भटाला सलाम कां केला, हेंही एकानें विचारिलें, तेव्हां ती ह्मणाली, मी ह्या भटजीला नाहीं सलाम केला, त्या भटजीच्या गळ्यांतल्या पिशवींत आमचा "मालीक" ह्मणजे ती "भारलेली चकती" आहे, तिच्यापुढें आह्मांला वांकणेंच भाग आहे."

हें ऐकून डनबारला नवल वाटलें आणि त्यानें त्या वृद्ध फरेलास म्हटलें— "ही तुम्हीं प्रत्यक्ष पाहिलेला गोष्ट मोठी विलक्षण व ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ही लिहून काढून इंग्लंडांतील आमच्या मंडळीकडे मला पाठवून दिलीच पाहिजे. आतां तुमच्यापासून कांहीं लपवून ठेवण्याचें कारण उरलें नाहीं. मी तर ह्या असल्या चमत्कारांचा अधिक माहिती मिळविण्यासाठींच इकडे आलों आहें. अलीकडे आमच्या पाश्चिमात्य शिक्षणाच्या योगानें हिंदुस्थानांत अनेक प्रकारची सुधारणा होऊं लागली आहे; त्यामुळें देशांतल्या चाली, शिक्षण, वगैरेमध्यें पुष्कळच फरक पडत आहे, आणि दिवसेंदिवस पूर्वीचें सर्व मान बदलत चाललें आहे. धार्मिक समजुती, उपासतापास, ह्यासंबंधानें नवीन पिढींत विश्वास उरला नाहीं, तरी अजून मागच्या आठवणी होण्यासारख्या अद्यापही कांहीं गोष्टी आहेत. हे आतां अवशेष आहेत, ह्यावरून पूर्वीचें वैभव ओळखावयाचें हें खरें! पूर्वीचीं मोठमोठालीं देवळें, गगनचुंबी मनोरे, मशिदी आतां फार थोड्या उरल्या

आहेत. त्या पूर्वजांना आतां कोणी मूर्ख म्हणोत, किंवा पैशाचा अपव्यय करणारे ठरवोत, पण त्यांनीं ज्या शोभिवंत इमारती उभारल्या आहेत, त्यांची छाया कांहीं तरी अद्याप शिल्लक आहे. आतां त्याचें कौतुक कोणाला वाटत नसेल तर तो त्या पूर्वजांचा दोष नव्हे; पण तसल्या कृत्यांबद्दल माहिती असणाऱ्या परदेशच्या लोकांना आतां त्यांची किंमत वाटत आहे."

म्हातारा म्हणाला—" मला सुद्धां असेंच वाटतें. ह्या पूर्वेकडच्या देशाची राहून राहून मला मौज वाटते. मला लहानपणीं अगदीं माझ्या कानांत कोणी चांगलें बोलल्यासारखें वाटलें. हे पूर्वेकडचे देश व तेथील लोक मला बोलावीत आहेत, असे चक्क शब्द माझ्या कानीं आल्यासारखें मला वाटलें. त्या आवाजाची, त्या स्वराची आठवण झाली कीं, अंगावर रोमांच उभे रहातात. किती मंजुळ ध्वनि! सोन्याची घाट वाजावी तसा सुरेल, रम्य नाद तो! तो ऐकतांच मनुष्य नम्र होऊन गेलाच पाहिजे, त्याला मोह पडलाच पाहिजे. त्या आवाजानें दिलेल्या हुकमाला नाहीं म्हणण्याची कोणाची छाती आहे?"

" ह्या हिंदुस्थानचें प्रेम ज्याला वाटूं लागलें, एकदां ज्याच्या मनांत ह्या देशाविषयीं ओढा व मोह उत्पन्न झाला, त्याला असला कांहींतरी निरोप, असली कांहींतरी वाणी, असला मंजुळ, हृदयाला शांति देणारा ध्वनि, ऐकूं येऊं लागतो. मागें असें झालें आहे—सध्यां होत आहे—पुढेंही होणार. आतां नुक्ती कुठें ह्या अतींद्रिय गोष्टींची जिज्ञासा पश्चिम खंडांत उत्पन्न होऊं लागली आहे. ज्ञानाचें आगर म्हणविणाऱ्या त्या पश्चिमेकडच्या लोकांना आधिभौतिक ज्ञानाशिवाय अधिक कांहीं तरी जगतांत आहे असें वाटूं लागलें आहे. आधिदैविक ज्ञानावर त्यांचा भरंवसा आजपर्यंत नव्हता. हें सर्व झूट असें ते समजत. बायबलमध्येंच जर भूतपिशाच्चांविरुद्ध आज्ञा आहेत, तर मग ख्रिस्ती म्हणविणाऱ्यांचें इकडे लक्ष जावें कसें? तेव्हां त्यांना तरी फारसा दोष लावितां येत नाहीं. अलीकडे तो मनु बदलला आहे. कांहीं लोकांचा ह्या गोष्टीवर विश्वास बसला असून, ह्या दृश्य जगाशिवाय दुसरा कांहीं एखादा लोक आहे, तेथील रहिवाश्यांबरोबर मानवांचा संबंध होणें शक्य आहे, त्या लोकांतून आपणांला निरोप येणें, त्यांच्याशीं संभाषण करणें संभवनीय आहे, असें आतां कांहीं शहाणे विद्वान् म्हणूं

लागले आहेत. असल्या गोष्टी पश्चिम खंडांत अश्रुतपूर्व असल्यामुळें आपण ह्या नवीन शोध लावीत आहों असें त्यांना वाटत असेल तर वाटो, पण ह्या पूर्वेकडील खंडांत कित्येक शतकें ही विद्या जाणणारीं माणसें झालेलीं आहेत; इहलोक सोडून गेलेल्या लोकांबरोबर बोलणारीं माणसें पूर्वी होतीं ह्यांत शंका नाहीं."

"पण काय हो! मला तर हें नवल वाटतें. तुमचें कसें मत आहे? हिंदुस्थानच्या लोकांवरच इतकी मेहेर नजर कां असावी? त्यांनीं काय असलें पुण्य केलें आहे? आम्ही खिस्ती धर्माशिवाय इतरांना अज्ञानी, अपवित्र, पातकी असें म्हणतों; आणि मग हेच लोक कां इतके लाडके?"

"ह्यांत कसली मेहेर नजर? लाडकेपण वगैरे कांहीं नाहीं." डनबारनें उत्तर केलें. "ह्यांत एवढेंच आहे कीं, तसला संबंध घडावयाला एक प्रकारचें विशेष शिक्षण लागतें आणि तें ह्या देशच्या लोकांनीं संपादन करून ठेविलें आहे, दुसरें काय? एक राजा होता; त्याची आणि भूमितिशास्त्रकार युक्लिड याची एकदां गांठ पडली. तेव्हां राजानें युक्लिडला विचारलें कीं, ही तुमची विद्या शिकण्याला कांहीं मार्ग आहे का? तेव्हां युक्लिडनें उत्तर केलें— "होय सरकार, आपण कांहीं थोडे श्रम घ्याल तर कांहीं साधेल; पण तुमचा शिरकाव राजे म्हणून दुसरीकडे होण्याला अडचण पडत नाहीं, हवा तिकडे राजमार्ग मिळतो; तसा ह्या विद्यामंदिरांत शिरायला राजमार्ग कां सांपडायचा नाहीं." ह्या गोष्टीसारखाच येथें प्रकार आहे. अंगच्या शक्तीच्या बलावर मिळवितां येण्यासारख्या कांहीं गोष्टी असतात, किंवा कांहीं द्रव्य देऊन हस्तगत करून घेतां येतात. पण ही विद्या ह्या दोन्ही उपायांनीं मिळण्यासारखी नाहीं; त्याला स्वतः अभ्यास केला पाहिजे. ही गुप्तविद्या आहे, राजगुह्य आहे. योगसामर्थ्य वाटेवर पडलेलें नाहीं. इतर शास्त्रें म्हणजे गणित वगैरेसुद्धां अभ्यासाशिवाय साध्य होत नाहींत; पण ह्या विद्येच्या अभ्यासाचा क्रम त्याच्याहून निराळा आहे."

फेरलला आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. तो म्हणाला—"शाबास, शाबास. तुम्ही तर ह्या विद्येचे मोठे भक्त व भोक्ते दिसतां! हिंदुस्थानावर तुमचें प्रेम आहे, हें तर उघड दिसत आहे. तुम्हांला जी माहिती पाहिजे त्याबद्दल कांहीं कमी जास्त सांगण्याचें मला ज्ञान नाहीं. मलाही ह्या

विषयाचा नाद आहे; पण माझें हें वेड आहे म्हणा किंवा माझा विश्वास समजा, माझ्या मनानें असें घेतलें आहे कीं, मीं ह्या विषयांत डोकें घालावें अशी ईश्वरी इच्छा नाहीं. ह्या जन्ममृत्युसंबंधाच्या गुह्य गोष्टींचें ज्ञान मला व्हावें अशी प्रभूची मर्जी असती, तर त्यानें मला अशा अज्ञानांत ठेविलें नसतें; त्यानें तसली बुद्धि मला दिली असती, वाट दाखविली असती; तसलीं साधनें, तसले प्रसंग जमवून आणले असते. ज्या अर्थी तसा कांहीं प्रकार आजपावेतों घडला नाहीं, त्या अर्थी मीं त्या विषयाचा अभ्यास करावा असें प्रभूला वाटत नसावें; आणि म्हणून मी त्या विषयाच्या भरीस पडत नाहीं."

इतक्यांत क्लीन्सी खोलीच्या दाराशीं आली आणि तेथूनच बापाला म्हणूं लागली कीं, "बाबा, अजून मोकळी हवा पुरी झाली नाहीं का ? जास्त वेळ बसल्यानें थंडीथिंडी कांहीं झालं नाहीं म्हणजे बरं ?" हे शब्द ऐकिल्यावर डनबारला वाटलें कीं, ह्या तरुणीला आपण शिक्षा केली येवढी पुरे झाली. तिच्या मनांत आपल्याला हाकलून देण्याचें आल्यामुळें आपण हट्टाला पेटून इतका त्रास दिला तो बस झाला. असा विचार करून त्यानें म्हाताऱ्याचा निरोप घेतला, त्याला 'गुडनाईट' केलें आणि आपल्या खोलींत येऊन तो 'सुखं च मे शयनं च मे' करिता झाला.

हा ओळखीचा आरंभ झाला, तो डनबारनें दाट करून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यामुळें लवकरच हा डनबारचा नित्यक्रमच बनला. संध्याकाळीं जेवण झालें कीं, फेरल म्हाताऱ्यापाशीं आंगण्यांत बसून कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्याशिवाय त्याला निजायला येत नसे. त्यामुळें जर एखादे दिवशीं त्याला येण्याला वेळ लागला तर, फेरलला चैन पडेनासें होई; 'हुजूर' अद्याप आले कीं नाहीं, याची चौकशी करण्याला तो आपला खिदमतगार पाठवीत असे. फेरलला बाहेरून येण्यास कां उशीर झाला याची त्याला काळजी लागे. ह्याप्रमाणें जरी म्हाताऱ्याची मर्जी त्यानें संपादन केली तरी क्लीन्सीपाशीं त्याची डाळ शिजेना. नुसत्या गोड शब्दानें किंवा खुणेनेंसुद्धां तिनें कधीं त्याला 'या' म्हटलें नाहीं; तिचें हास्यमुख तर दुर्लभच झालें होतें. कांहीं अंशीं त्याची गांठ पडूं नये, अशी ती टाळटाळ करिते आहे हें उघडच झालें होतें. ती असें कां करिते, आपण काय चुकलों, हें

आपल्यास समजावें म्हणून त्यानें अनेक तऱ्हा करून पाहिल्या, पण तें कांहीं जमेना. कौन्सीलाही नीटसें कारण सांगतां आलें नसतें. डनबार येऊं लागल्यापासून म्हातारा पहिल्यासारखी चिरचिर करीत नाहीं, थोडाबहुत गोष्टींत असतो, त्याच्या मुखावर उल्हासाचें चिन्हही दिसूं लागलें होतें, हें तिच्या लक्षांत आलें नव्हतें असें नाहीं. त्याप्रमाणेंच तो आपल्या बापाशीं मोठ्या ममतेनें वागतो, आणि पुष्कळ वेळां म्हाताऱ्याच्या कलानें मर्जीनें–लहरीनेंसुद्धां म्हटलें तरी चालेल–तो सर्व गोष्टी करितो, त्याचें मन दुखवीत नाहीं, ही गोष्टही तिच्या ध्यानांत आल्यावांचून राहिली नाहीं. म्हाताऱ्याच्या तोंडून एखाद्या पुस्तकाचें नांव निघालें, तें आपल्यास कोणी वाचून दाखविलें तर बरें असें तो म्हणाला, तर शक्य तर त्याच दिवशीं–नाहीं तर निदान दुसऱ्या दिवशीं, डनबार आपला तें पुस्तक घेऊन यावयाचाच, आणि म्हाताऱ्याजवळ बसून त्याला कंटाळा न येईल, अशा बेतानें त्या पुस्तकांतून मधून मधून कांहीं प्रकरणें वाचून दाखवावयाचा. दिवसेंदिवस थंडी अधिक पडत चालली, तेव्हां डनबारनें म्हाताऱ्याची समजूत घालून त्याला गरम कपडे किंवा एकाच्या ठिकाणीं दोन बंड्या घातल्याशिवाय अंगणांत बसूं दिलें नाहीं; किंवा शाल पांघरायला घालून मग बसावें किंवा मुळींच रोजच्या क्रमापेक्षां लवकर उठावें. सारांश, हा म्हाताऱ्याची अतिशय काळजी घेतो, एवढें कौन्सीला नाकबूल नव्हतें. एकदां म्हाताऱ्याला ताप आला, तेव्हां ती रात्र डनबारनें त्याच्या अंथरुणापाशीं जागून काढली. औषध त्यानें आपल्या हातानें दिलें; शेक करण्यासाठीं शेगडी पेटवायला आणि कडकडीत पाण्यानें बोळा भिजवून शेकायलासुद्धां त्याची तयारी होती. ह्या त्याच्या तरतुदीबद्दल कौन्सीला त्याचे उपकार वाटत नव्हते असें मात्र नाहीं. तिच्या मनांत कृतज्ञता जागृत होती, पण पहिल्या दिवशीं जी त्याजबद्दल अढी तिच्या मनांत बसली, ती ह्यानें कांहीं उलगडेना; तो आपल्या घरीं यावा असें तिला एक दिवससुद्धां वाटलें नाहीं. ती म्हणे, कीं, ह्या डनबारचे डोळे, ह्याची दृष्टिच कांहीं चमत्कारिकच वाटते; आणि पहिल्या दिवशीं गांठ पडली, तेव्हां त्यानें दृष्टिपातानें, मानसिक बलानें, वशीकरणप्रयोगानें मला आपल्याकडे पहायला लाविलें, अशी तिच्या मनाची खात्री झालेली होती, ती कांहीं केल्या डळमळेना.

ह्या कामांत डनबारचा वेळ जाऊं लागल्यामुळें तो ज्या कामासाठीं इकडे आला होता, त्या कामाकडे त्याचें दुर्लक्ष होऊं लागलें होतें; पण तो तें अगदीं विसरून गेला होता असें मात्र नाहीं. दोनचार दिवस कमीजास्त गेले म्हणून काय झालें, असें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें. नबाब हल्लीं येथें नाहीं, तो लखनौस आल्यावर मग काय तें करूं. ह्यापूर्वी त्याचा बेत लाल किल्ल्यावर जाऊन नबाबाची गांठ घ्यावी असा होता. नबाब आला आहे कीं नाहीं? हा प्रश्न तो दररोज खाबूरला विचारी, पण तो आला नाहीं असा जबाब यावा, हीच त्याची इच्छा असे, व त्याप्रमाणें उत्तर आलें म्हणजे त्यास मनांतल्या मनांत आनंद होई. आपण चूक करीत असून ती नाहीं असें दाखवितां आलें तर तें प्रत्येकाला पाहिजे असतें. नबाब आल्यावर आपल्या कामाला न लागण्याला मग कांहीं सबब उरणार नाहीं, आणि नबाबाकडे जाऊं लागल्यावर फेरेलच्या दर्शनाला जायला कसें सांपडणार? आणि कीन्सीची मनोहर मूर्ति निदान पाहून आनंद होतो त्यालाही मुकावें लागणार. सारांश, ह्या अनुमानपरंपरेवरून कीन्सीच्या पायीं ह्याच्या मनानें लोळण घेतली होती असेंच ठरूं लागलें. हा मदनाचा झपाटा झाल्याचें चिन्ह खाबूरनें तेव्हांच ओळखलें; डनबारलासुद्धां आपल्याला कीन्सीच्या दर्शनावांचून चैन पडत नाहीं, तिचा आपल्याला विशेष ओढा लागला आहे हें समजलें होतें, पण हें प्रेम आहे अशी ओळख त्याला पटली नव्हती; पण खाबूरला मात्र त्याबद्दल खात्री वाटूं लागली होती.

एके दिवशीं तर सकाळची न्याहारी किंवा छोटी हजेरीचे पदार्थांना डनबारनें बोटसुद्धां लावलें नव्हतें, ही गोष्ट तें सामान उचलून धुवायला नेतांना खाबूरनें पाहिली आणि बोलायला ही संधि बरी आहे असें ठरवून तो ह्मणाला—"क्यौं हुजूर, आतांशी हुजूरची भूक मंदावत कां चालली आहे? कोणा पाप्याची दृष्टविष्ट नाहींना पडली हुजूरवर?" डनबारनें ती गोष्ट हसण्यावारी नेण्यासाठीं म्हटलें—"वारे खाबूर! अशी माझ्यावर कोणाची दृष्ट पडणार? असलीं माणसें कोण आहेत आपल्या इथें?"

"दुसरें तिसरें कोणी नाहीं हुजूर. ती आपल्या शेजारच्या खोलींत एक बया आहे तर खरी." "खाबूर, अरे ह्मातारपणीं जीभ आवरावी आतां! देवानें वाचा दिली आहे, तिचा नीट उपयोग करावा. तोंडाला येईल तसें

बोलूं नये. तिला ' यथा ' असें कां ह्मणतोस ? असल्या वेडेवाकड्या शब्दांशिवाय दुसरें नांव तुला सुचलेंच नाहीं वाटतें. " हें ऐकून खाबूरनें एक मोठा सुस्कारा टाकिला आणि म्हटलें–" हेंच तें. मी आधींपासून सांगत होतों. हुजूरच्या मनाला हा शब्द इतका झटकन कां झोंबावा ? ती कोण आपली? पण हें कांहीं ठीक चिन्ह नाहीं. हुजूर, प्रेम म्हणजे–हुजूर, प्रेम ही एक प्रकारची मदिरा आहे, तिचे लहानलहान घोंटच घेतले पाहिजेत. जर एकदम ती घशांत ओतली, तर ती मेंदूला जाळील आणि भलताच परिणाम होईल. हुजूरनीं वेळेवर सावध व्हावें. "

" म्हणजे रे काय ? मी कांहीं अगदींच वेड्यासारखें करूं तर नाहीं लागलों ना ? मला वाटतें कीं, मी अगदींच बहकलों नाहीं अजून—"

" अद्याप कांहींच होऊं लागलें नाहीं. माझ्या ह्या ह्मातार्‍याच्या विनंतीकडे थोडें लक्ष द्यावें हुजूरनीं. माझ्या अनुभवावरून, मला लागलेल्या ठेंचांवरून हुजूरनीं वेळींच सावध व्हावें. माझी प्रार्थना अशी आहे कीं, ह्या सुंदर युवतीपासून आपण दूर रहा. ह्या स्त्रिया कोणच्या प्रकारच्या असतात तें मला विचारा, मी ह्यांच्या सर्व खुब्या जाणून आहें. या अल्ला ! या अल्ला ! या कामीं मी चांगला पोळलों आहें. ह्या काय करतील त्याचा नेम नाहीं. ह्यांच्या मनांत असेल एक, ह्या बोलतील दुसरेंच आणि करतील तिसरें ! त्यांचें धोरण कांहीं समजायचें नाहीं. ह्यांच्या तोंडून शब्द येतील तें अगदीं ब्रह्मवाक्य अशी समज होऊं देऊं नका. उंदीर धरून आणल्यावर मांजर त्याच्याशीं खेळतें, तसलाच प्रकार ह्यांचा असतो. उंदरावर जितकें मांजराचें प्रेम, तसलेंच ह्यांचें ! मांजर नाहीं का उंदरावर प्रेम करीत ? आणि खरोखर तें त्याचें खाद्य म्हणून त्याला जपतेंसुद्धां. "

ह्या उपमेचें आणि कोटिक्रमाचें डनबारला हसूं तर आलेंच, पण आज त्यानें तसें कांहीं कबूल केलें नाहीं; थट्टेनें सर्व उडवाउडवी करून त्यानें तो विषय टाळिला. परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं तसें करतां येणें शक्य राहिलें नाहीं, आणि सर्व गोष्टीचा पूर्ण विचार करण्याचें भागच पडलें. क्रिन्सीकडून आपल्याला कांहींच उत्तेजन मिळत नाहीं, उलट ती आपला तिटकारा करीत असून आपलें मन तिच्यावरून फिरत नाहीं, व पुनः पुनः लाळ घोंटावयास जातों, ही गोष्ट कबूल केल्यावांचून आतां चालेना. ह्यावरून पुढें

उमजून मन आवरण्याचा प्रयत्न करावा तें एका बाजूसच राहिलें, उलट रात्रीं जागरण पडूं लागलें, स्वप्नांतही तिच्यावांचून दुसरा विषय नाहींसारखा झाला. सकाळीं उठला कीं, ती जाई त्या बाजूला ही स्वारी आपली चालूं लागावयाची. पहिल्या दिवशींच्या फेरलच्या बोलण्यांत आलेंच होतें कीं, बायका धुतात त्या घाटावर ती जाऊन त्यांना उपदेश करीत असल्ये, आणि तो घाट कोणचा असेल ह्याबद्दल त्यानें आपल्या स्मरणानें सर्व गोष्टी लक्षांत आणिल्या. छत्र मंझिलवरून पुढें गेल्यावर जो घाट लागतो, तिथेंच हिंदुस्त्रिया धुवायला उतरत असतात. तेथून जुनी पडकी रेसिडेन्सीची इमारत जवळच आहे, वगैरे नकाशा त्यानें आपल्या मनांत आणिला, आणि एके दिवशीं हा आपली दुचाकी गाडी जोडून सकाळींच उठून रेसिडेन्सीकडे गेला. तेथें पोहोंचल्यावर घोडेवाल्याला गचकीपाशीं उभा करून किन्सीला पहात पहात रस्त्यानें जाऊं लागला. गोमतीनदीच्या दुसऱ्या म्हणजे पलीकडच्या काठांवर बायकांना धुण्याची सोय आहे. जरा खालच्या अंगाला नदीला सांडवा आहे, त्यावरून बायका पलीकडे जाऊन धूत असतात. घाटाच्या अगदीं वरच्या पायऱ्यांवर एक पांढरा पोषाख केलेली आकृति डनबारच्या दृष्टीस पडली व ती किन्सी असें त्यानें तत्काळ ओळखिलें. कांहीं बायका खालीं पाण्यांत जाऊन स्नान करीत होत्या, कोणी कपडे धूत होत्या व कांहीं जणी तिच्या जवळ बसून तिचें बोलणें ऐकत होत्या. तेथें नदीचें पात्र अरुंद असल्यामुळें–फार झालें तर १०-१५ हात अंतराचें असल्यामुळें–तेथून बरेंचसें दिसत होतें. ती जें बोलत होती, तें जरी ऐकूं येत नव्हतें, तरी तिच्या बोलण्याचा परिणाम त्या बायकांवर काय होतो, हें कळण्यासारखें दिसत होतें. तिच्याजवळ असलेल्या बायकांपैकीं एकीचेंही खरें लक्ष तिच्याकडे नव्हतें. कोणी तिला हिसडून टाकीत आणि कांहीं चारगट पोरें तेथें जमून, पाण्यांत उड्या मारून, त्या उपदेश करणाऱ्या बाईच्या अंगावर पाणी उडेल इतकें उंच उडवीत होतीं. डनबार एका झाडाखालीं उभा राहून हें सर्व पहात होता आणि आपलें प्रेम जिच्या चरणीं आपण वाहिलें, त्या आपल्या प्रेमदेवतेची अशी चेष्टा व उपहास पाहून त्याच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली. पण करतो काय, मूग गिळून स्वस्थ बसणें भाग होतें. तेथें जाऊन त्यांचा प्रतिकार करण्यास याला तोंड कुठें होतें ? असा विचार बो

करीत होता. इतक्यांत कीन्सीचें तिथलें बोलणें संपून ती पुलाकडे जाण्यासाठीं निघाली. तोही लगेंच घाईघाईनें रेसिडेन्सीकडे गेला, गाडींत बसला आणि नदी-वेशीच्या बाहेर पडला, तों तिथेंच तिची गांठ पडली. त्यानें आपली टोपी जरा उचलून तिला सलाम केला व तो तिनेंही घेतला व थोडेसें मस्तक लवविलें. तेवढ्यानें थोडासा धीर चेपून तो म्हणाला:—"बरेंच झालें, आयती सहज गांठ पडली. मी घराकडेसच निघालों आहें, आणि आपलाही रस्ता तोच असला तर यानात गाडींत ? घोड्याला कांहीं तेवढ्यानें जड होणार नाहीं ?" तिनें अगदीं शांत व नम्रपणानें उत्तर केलें, "पायींच जाणें मला बरें वाटतें." एवढ्यानें त्यानें उमजायला पाहिजे होतें, परंतु 'फिरून एकदां यत्न करून पहा' ह्या ह्मणीप्रमाणें तो बोलूं लागला. "बरोबर आहे, सकाळीं मजेदार थंड हवा असते, त्या वेळीं चालायाला कांहीं वाईट नाहीं; त्या वेळीं कांहीं मौजही वाटते. पण आतां दिवस किती वर आला आहे ! ऊन चांगलें चटका द्यावयास लागलें आहेना?"

तिनें पुनः उत्तर केलें "मला त्याचें कांहीं वाटत नाहीं. मला त्याची संवय झाली आहे. साहेब, आपण येवढी माझी काळजी घेतां ह्याबद्दल मी आपली फार फार आभारी आहें. तुम्ही आपल्याकडून करावयाचें तें केलें, पण मला पायीं चालत जाणेंच जास्त आवडतें."

झालें, आतां अगदींच तोंड मिटलें. डनबार हिर्मुष्टी झाला. त्यानें पुनः टोपी उचलून तिला सलाम केला, आणि आलेला राग तट्टाला जोरानें चाबूक मारून त्याच्यावर काढला आणि गाडी हांकीत चालता झाला. त्याच्या मनांत नानाप्रकारचे विचारतरंग हेलकावे खाऊं लागले. तो आपल्याशीं म्हणाला "काय ह्मणावें ह्या पोरीला ? ही तर माझ्या वाऱ्यालाही उभी रहात नाहीं. हिला वाटतें कीं, मी जसा कांहीं एकादा सर्पच, हिचा स्पर्श होतांच डसेन, आणि माझ्या मूर्खपणाची तरी कमालच म्हणावयाची ! मी लाजलज्जा, मानापमान सर्व विसरून गेलों अं ! मी का एखादा ग्रंथीसारखा साथीचा रोग आहे का कोण आहे? तिला मी जवळ सुद्धां येऊं नये असा कां वाटतों ! इतकें असून मी मूर्खशिरोमणी तिच्यापुढें लुडबुडायला जायला तयारच ! आतां तरी माझ्या मनानें तिचा नाद सोडून द्यावा कीं नाहीं ? पण ह्याची आपली सगळी उलट स्थिति. ती एखादा कृपाकटाक्ष

माझ्यावर टाकील काय, माझ्याकडे पाहून थोडें कां होईना, निदान गालां-तल्यागालांत तरी हंसेल तर बरें, असें ह्मणून माझें मन आशाळभुतासारखें तिच्या भोंवतीं नाचतच राहिलें आहे. कांहीं स्वाभिमान आहे कीं नाहीं मला ! बस, तर ठरलेंच आजपासून; दिलें सर्व सोडून; टाकला तिचा नाद. हा नेभळटपणा, कमकुवतपणा काय कामाचा ? मी पुरुषासारखा जवान मर्द असून तिचीं आर्जवें तरी कशाला ? ''

असा निश्चय त्यानें केला खरा, पण तो फार वेळ टिकला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो आपला उठला, तों नेमकी स्वारी घाटाच्या जवळ आलीच, आणि क्विन्सीचें काम संपून ती परत निघाली त्या संधीला जाऊन वेशीपाशीं त्यानें तिला पुनः गांठली. पण कालच्यासारखीच आजही फजिती ! गाडींत येण्याबद्दल त्यानें तिची विनवणी केली, तरी तिनें त्याला वाटाण्याच्याच अक्षता लाविल्या. आजही अपेश आलें तरी त्याचा नाद सुटला नाहीं. संध्याकाळीं स्वारी म्हाताऱ्यापाशीं हजर. आज क्विन्सीनें बापाच्या जवळच ठाणें दिलें होतें, आणि रोजच्याप्रमाणें तो म्हाताऱ्यापाशीं गप्पा मारूं लागल्यावर तिनें बापाला, हे रोज तिकडे कशाला जात असतात, असा खोंचीचा प्रश्न विचारला. ती हसत हसत म्हणाली "काय बाई तिकडे आहे कोण जाणें ? त्या जुन्या पडक्या रेसिडेन्सीच्या भिंताडाकडे पाहाण्या-सारखें आहे तरी काय, इतक्या लांब रोज गाडींतून जायला ? "

म्हातारा म्हणाला " अहाग वेडे! ह्या रेसिडेन्सीची जागा पाहिली म्हणजे पूर्वीच्या गोष्टींची आठवण होते; प्रत्येकाला त्यांत करमणूक वाटली पाहिजे. असलीं जुनीं स्थळें पाहिलीं म्हणजे किती तरी आठवणी स्मृतीच्या पटांगणांत छाया पाडूं लागतात ? "

" असेल बाई, पण ह्यांना तर कांहीं नवीन नसावें हें. ह्यांचा सारा जन्म बहुतेक इथेंच गेलाना ?"

" एकच काय, अनेक जन्मही पुरणार नाहींत, ह्या रेसिडेन्सीच्या पडक्या भिंताडांत आणि पायाच्या दगडांत ज्या कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत त्या वाचायला. येवढ्यानेंच काय झालें आहे ! मी रोज सकाळीं तिकडेच जाणार आहें फिरायला; नियमच केला आहे आजपासून. "

पुन्हां डनबार सकाळीं तिकडे गेला. क्विन्सी तिथें होती, पण कालच्या-

प्रमाणें युक्ति केली तरी तिची गांठ पडली नाहीं. ती पुलाकडे जावयास निघालेली ह्यानें समक्ष पाहिली, पण रेसिडेन्सीकडे जाऊन गाडी घेऊन येतो तों ती कुठें दिसेना. दुर्दैवाचे हे चाळे पाहून तरी त्यानें नाद सोडावयाचा होता, पण आपला पराजय झालेला कबूल करण्याचें धैर्य फारच थोड्या लोकांमध्यें सांपडतें. हाच प्रकार आणखी दोन दिवस झाला. पुढें शोध करतां ती दुसऱ्या लांबच्या रस्त्यानें परत घरीं जाते, असें आढळून आलें. ह्यानंतर तरी तिच्या मागोमाग जावयाचें त्यानें सोडावयाला पाहिजे होतें; पण प्रेमांध झाल्यावर विचार पायापाशीं अडखळूं लागला तरी, प्रेमांध मनुष्य काय आहे हें पहात नाहीं. शिवाय बुडत्याच्या हातीं गवताची काडी लागावी त्याप्रमाणें त्याला एक निमित्त सांपडलें. त्याला असें समजून आलें कीं, हिंदू स्त्रिया क्लिन्सीचा पहिल्यापेक्षां अधिक पाणउतारा करितात, तिला टाकून बोलायलाही कमी करीत नाहींत. पोरेंही पूर्वींपेक्षां जास्त घाटाच्या आसपासच जमून टवाळकी करूं लागलीं, तिच्या चेष्टा करण्याला त्यांनीं सोडिलें नाहीं. तेव्हां तो म्हणाला, न जाणों, ह्यांनीं एखादे वेळीं अधिक प्रसंग केला आणि तिच्या अंगावरच कोणी आला, तर त्या प्रसंगीं तरी आपण जवळ असल्यास मदत करावयास येईल, असें म्हणून त्यानें आपला क्रम चालूंच ठेविला.

# प्रकरण ३ रें

## मडमेची आरती

ह्या हिंदु स्त्रियांनीं आपला धर्म सोडून खिस्ती बनावें, असला उपदेश क्लिन्सी कधीं करीत नसे. हिंदुस्थानांतल्या स्त्रियांची स्थिति गुलामांपेक्षां अधिक वाईट आहे, तेव्हां तसला त्यांचा अनियंत्रित राजेपणा राखूं नका. जरा तुमचे हक्क तुम्ही ओळखा, असें ती सांगत बसे. कसें तरी करून ह्या बायकांनीं बंड करून पतीच्या दास्यत्वांतून मुक्त व्हावें अशी तिची इच्छा होती. ही असली समजूत पुष्कळ इंग्लिश लोकांची व इंग्लिश स्त्रियांची असते कीं, हिंदु स्त्रियांचे किती हाल होतात, त्यांची किती दैना असते,

हें त्यांना एकदां समजावून सांगितलें, आणि तें त्यांच्या गळीं उतरलें म्हणजे त्या बंड केल्यावांचून रहाणार नाहींत; असलेंच तिचें म्हणणें असे. परंतु हिंदु स्त्रियांच्या धार्मिक समजुती किती पिढ्यांच्या आहेत, त्यांच्या धार्मिक समजुती त्यांच्या अंगीं किती खिळल्या आहेत ह्याची कल्पना इतरांना होणें शक्य नाहीं. शिवाय नुसती दुःखाची जाणीव करविल्यानें फारच भलता परिणाम होतो. ही जबाबदारी ह्या परदेशी लोकांना जाणवत नाहीं. पति मेल्यावर त्याच्या जडदेहाला चितेवर ठेवून अग्नि देतेवेळीं त्याच्या बरोबर जिवंत जळून जाण्यास इथल्याच बायका तयार होत असत व अद्यापही—जर कायद्याची बंदी नसती तर, तसें करण्यास सती म्हणवून घेण्याच्या मानासाठीं कित्येक कुलवधू तयार होतील; इतक्या उच्च दर्जापर्यंत ज्यांची परंपरा आहे. परकर्यांच्या दृष्टीनें हें अज्ञान आहे—हा जुलूम आहे, तरी पण असे ज्यांच्या धर्मग्रंथांतल्या गोष्टींचे संस्कार आहेत, त्यांना नवरा रोज शिव्यांची लाखोली वहातो, क्षुल्लक कारणावरून वर्दळीला येतो, किंवा इतर देशांतल्याप्रमाणें तिचें मन राजी राखण्याचे प्रयत्न तर राहोतच, पण तिच्याविषयीं हलगर्जीपणा करतो, असें कितीहि कोणीं कानीं-कपाळीं ओरडलें, तरी त्यांच्या विचारांत कांहींसुद्धां बदल करणार नाहींत. ह्या गोष्टी त्यांच्या नित्याच्या पाठांतील झाल्यामुळें त्यांत कांहीं अमानुषपणा आहे असें त्यांच्या मनाला वाटण्याचा संभवच नाहीं. पण परदेशीय लोकांना हें कसें पटणार ? क्रिन्सीचा समजूत निराळी. ज्या देशांत स्त्रीपुरुषांचे हक्क समान, निदान तोंडानें तरी, मानले जातात, किंवा जेथें स्त्रियांचा अधिक बडेजाव करण्याचीच पुरुषांना हौस दिसून येते, असल्या संस्कृतीमध्यें ती वाढली असल्यामुळें तिला ही हिंदु स्त्रियांची सोशिकता चमत्कारिक वाटे, आणि त्यांच्या मनांत तसली कांहीं तरी जागृति व्हावी, म्हणून ती आपली पराकाष्ठा करून पहात होती. दररोज सकाळीं येऊन ती जी ही बडबड करीत असे, तिच्याकडे त्या बाया कांहीं दिवस मुळींच लक्ष देत नसत. पुढें तिच्या ह्या वटवटीचा त्यांना त्रास वाटूं लागला; आणि दिवसानुदिवस तो वाढून ही कटकट बंद कशी करावी असें त्यांच्या मनांत येऊं लागलें. तेव्हां प्रथम तिच्याकडे पाहून हंसण्याला त्यांनीं आरंभ केला. कोणी तिची थट्टाही करूं लागल्या; कोणी तिच्याकडे बेडावून दाखवीत. तथापि तिनें धीर सोडला

नाहीं. ती आपली रोज येऊन कांहीं तरी चार गोष्टी त्यांना सांगत बसे. होतां होतां एके दिवशीं एका बाईनें तिला उत्तर देण्याचें धैर्य केलें. तिच्या अंगावर खेकसावून ती म्हणाली— "गप्प बैस कीं फिरंगी बया! इतकी वटवट कशाला लावली आहेस? जाईनास का मुकाट्यानें आपल्या घरीं? तुला कोणी आमच्यापैकीं नवऱ्यांचीं गाऱ्हाणीं सांगायला आलों नव्हतों ना? आम्ही का तुला येऊन सांगितलें–कीं, आम्हांला संसारांत सुख नाहीं म्हणून? तुझ्या कानांत कोणी पिशाच्च तुला सांगायला आलं होतं काय –कीं, आम्हांला आमचे पतिराज बंद्या दासीप्रमाणें तुडवितात म्हणून! तुला ह्या नसत्या उठाठेवी सांगितल्या कोणीं करायला? आम्ही गोषांत असूं, कैद-खान्यांत असूं—नाहींतर एखाद्या भुयारांत कोंडून पडूं— तशांतून तुझ्याकडे यायला कोणाला सांपडलें? एक तरी आली होती का आपलं रडगाणं गायला? पुरे झालं बाई, तुझं हें चऱ्हाट आणि ही वटवट! तुला तरी कंटाळा कसा येत नाहीं कोण जाणे? तुझ्या तोंडाला किंवा जिभेला रहावतच नसेल तर तूं आपली घंटा घेऊन आपल्याच जातीच्या आयाबहिणींना सांगत बस कांहीं उपदेशाच्या गोष्टी! काय पण त्या निर्लज्ज वेसवांचे तार-तार चाळे आहेत,–ते सारे मला ठाऊक आहेत. त्या खुशाल वाटेल तसलीं सोंगें घेऊन नाटकांत थेर करतात, आणि मंडळी जमवून चारचौघांत धिंगाणा घालून नाचतात–त्याची तुम्हांला कांहीं क्षिती वाटत नसली तर नसेल, पण आमच्या मनानं हे सारे ढंग चवचालपणाचे आहेत. त्या नाचाच्या वेळीं त्यांच्या अंगावर जसे कपडे असतात, तसे आम्ही न्हातांना सुद्धां कधींही घेणार नाहीं. तसला पोषाख केला तर घरच्या पुरुषासमोर यायला सुद्धां आम्हांला लाज वाटेल. म्हणून म्हटलें हो! जा बया–आणि त्यांनाच सांग मर्यादा राखण्याच्या चार गोष्टी. इश्श मेलं! ह्या त्यांच्या बायकांसारखेच पुरुष असतात म्हणे. त्यांच्या दारू पिण्याला कांहीं ताळ ना तंत्र. झिंगल्यावर बेटे बायकांना बडव बडव गुरासारखे बडवतात. नाहीं तर–कांहींना आपल्या बायकांच्या पातिव्रत्याचीही किंमत वाटत नाहीं; कोणी तर म्हणे, पोट जाळण्यासाठीं बायकांना–स्वतःच्या लग्नाच्या बायकांना बंगल्यावर नेऊन वरिष्ठांकडे पोहोंचवितात, आणि बढतीच्या नोकऱ्या मारतात. जा, फिरंगी बया! तिकडे जाऊन ते असं न करतील असा कांहीं

उपदेश करून त्यांना सन्मार्गाला लावण्याचं पुण्य घे. पुन्हा आतां आम्हांला शिकवायला येऊं नको. तूं काय सांगणार तें आम्हांला सारं ठाऊक आहे. आम्ही आपल्या पिंजऱ्यांत कोंडलेल्या आहोंत त्याच बऱ्या. येथूनसुद्धां आम्हांला तुमचे सारे चारचार कळतात बरं! जा, आपल्या जातभाईंच्या तोंडांत थोडं शेण घाल आणि आयाबहिणींना ह्यापुढें तरी सन्मार्गाला लागा, म्हणून जाऊन सांग. नीघ एकदांची; इकडे पुनः येऊंही नको आणि तुझ्या ह्या कटु शब्दांचा आमच्या कानाला विटाळ करूंहि नको. ह्यांत आमचा अपमान होतो बरं! जा. हो चालती इथून!"

डनबार उभा होता तेथून त्या बाईचें बोलणें त्याला ऐकूं येणें शक्य नव्हतें, पण एक बाई रागारागानें हातवारे करीत क्रिन्सीपुढें उभी आहे आणि तिला कांहीतरी बोलत आहे येवढें दिसत होतें. तिचें बोलणें संपण्याच्या सुमाराला, एक एक, दोन दोन जमतां जमतां, आणखीही बायका तिच्या भोंवतीं घोळका करून उभ्या राहिल्या, आणि आतां हिच्या अंगाभोंवती जमून तिला त्या कांहीं कमी जास्त करितात कीं काय अशी भीति त्याला वाटली. म्हणून तो आपल्या गाडीकडे गेला आणि घोडा दामटीतच घाटाशीं आला. तों इतक्यांत ती तेथून जी चालती झाली, ती कोठेंच दिसेना. पुलाकडे नजर गेली तों तिथें मुलांची गर्दी झाली होती व तीं मोठमोठ्यानें हूर्यो म्हणून ओरडत होतीं. इतक्यांत त्यांच्यापुढें ती दिसली. ती पूल संपून पुढच्या उताराला लागली होती, आणि तिच्या मागें कांहीं अंतरावर जो घोळका चालला होता, त्यांत पोरांच्याबरोबर कांहीं मोठी तरुण मंडळीही होती. एका दोघांनीं तर खडे फेकण्यासाठीं उचलून घेतलेले त्यानें पाहिले, इतक्यांत त्यांची नजर ह्या गाडींत बसलेल्या डनबार साहेबाकडे गेली. तेव्हां एक एक पाऊल मागें मागें घेत ती मंडळी तिजपासून कांहीं अंतरावर राहिली. त्याचा तरी उपाय नव्हता. ती पूल उतरून अलीकडे येईपर्यंत त्याला स्वस्थ बसणें भाग होतें. पूल संपून ती रस्त्यावर येतांच त्यानें गाडींतून उडी टाकली. आपली टोपी उचलून तोंडानें 'गुडमार्निंग' केलें, आणि विलंब न करितां गाडींत चढा असें म्हटलें. ह्या वेळीं तिचा निरुपाय झाला होता, तरी गाडींत जाऊं नये असेंच तिच्या मनांत आलें; परंतु हा निश्चय अर्ध्या सेकंदापेक्षां

जास्त टिकला नाहीं. तिला आज जास्त श्रम झाले होते आणि कंटाळाहि आला होता; तेव्हां त्यानें हात दिला तो धरून ती गाडींत चढून बसली.

क्रिन्सीचा अपमान त्यानें पाहिला होता, पण त्याबद्दल अवाक्षर काढणें शक्य नव्हतें; कारण, तसें म्हणावें तर आपण सर्व सकाळभर तिच्याकडे पहातच तिथें होतों, असें कबूल करावें लागेल. म्हणून त्याविषयीं गाडीमध्यें एक चकार शब्दही त्यानें उच्चारिला नाहीं. पण गाडी हाकण्याच्या नादांत कांहींच बोललों नाहीं तरी वेड्यासारखें दिसेल म्हणून कांहीं वेळ हवेच्यासंबंधानें, कांहीं वेळ रस्त्यावरच्या अतीशय धुळीमुळें होणाऱ्या त्रासाबद्दल व नंतर ह्यापुढें कोणचे सण येणार, उत्सवाचे कोणचे दिवस आहेत वगैरे माहितीविषयीं—गप्पा मारून त्यानें वाट सारली. गेल्या थोड्या दिवसांच्या अनुभवानें तिचा स्वभाव त्याला अधिक कळूं लागला होता, आणि घांटावर तिनें एकटीनें जाऊ नये, त्यांत एखादा भलताच प्रसंग येईल, कोणीतरी वेळेला मदत करण्यासाठीं जवळ असल्यास बरें, वगैरे गोष्टी सुचविण्यास गेलों तर तिला तें आवडणार नाहीं आणि आपली आराध्यदेवता रुष्ट होण्याचा संभव आहे, हें तो जाणून होता. तीही जरा मोकळ्या मनानें बोलत होती. त्यांची पहिली भेट जेवण्याच्यावेळीं हाटेलच्या दिवाणखान्यांत झाली, त्या वेळीं जो त्यांच्यामध्यें भाषणप्रकार झाला, त्यावेळेपेक्षां आतां ती जास्त खुल्या दिलानें उत्तरप्रत्युत्तर देत घेत होती. डनबार हिंदुस्थानांत कां आला होता, हें त्याच्या तोंडूनच तिला समजलेलें होतें. तेव्हां त्यानें अंगीकृत कार्याचें काय केलें, त्याबद्दल कसा आरंभ केला किंवा काय विचार केला वगैरे प्रश्न विचारून त्यानें अद्याप त्यांत कांहींच हालचाल केली नाहीं, असें उत्तर आल्यावर, असें करणें चांगलें नव्हें; जें काम एकदां हातीं घेतलें तें दिरंगाईवर टाकूं नये; उगीच फुकट वेळ घालविण्यांत काय मतलब आहे? चटदिशीं उद्योग करून शक्य ती माहिती मिळवून मोकळें व्हावें हें बरें; वगैरे गोष्टी तिनें बेताबातानें सुचविल्या. तिच्या मनांतील पहिली अढी जराशी ढिली होऊं लागली होती; आणि त्याचे वर्तनाची किंमत तिच्या लक्षांत हळुहळू पटावयास अवसर पहात होती. मागें एकदां आम्हीं सांगितलेंच आहे, त्याची वाचकांना पुनरुक्ति वाटेल. परंतु ती गोष्ट आतां तिच्या मनोविचारांत अधिक वेळां येऊं लागली,

आपल्या म्हाताऱ्या बापाची हा किती काळजी घेतो, आणि त्याच्याशीं किती प्रेमळपणानें वागतो, हें तिच्या लक्षांत आतां चांगलेंच भरलें. आपण त्याला टांग्यांत बसण्याबद्दल इतकें झिडकारून टाकलें. आणि त्याच्या रेसिडेन्सीच्या दर्शनाप्रियतेची थट्टा उडविली, तरी आपल्यावर कांहींतरी अपमानाचा प्रसंग येईल, ह्या भीतीनें आपल्या संरक्षणासाठीं मुद्दाम दररोज घाटावर येण्याचा क्रम त्यानें ठेविला असला पाहिजे, असें आज तिच्या ध्यानांत आलें. दुसऱ्या खेपेसही गाडींत बसण्याची त्याची विनंति आपण झुगारून दिल्यापासून तो जरी आपल्या दृष्टीस पडला नाहीं, तरी आजच्या प्रसंगाला तो आला, ही कांहीं आकस्मिक गोष्ट झाली नसावी; तो दर दिवशीं आपल्यासाठींच तेथेंच कोठेंतरी आसपास थांबत असावा, असा तिनें तर्क बांधिला; आणि इतक्या सर्व गोष्टींचा प्रकाश तिच्या विचारपटलावर पडल्यावर त्याजविषयीं जरी एक प्रकारचा आदर तिच्या मनांत डोकावूं लागला, तरी त्याला इतक्या गोष्टी करण्यांत, इतकी काळजी बाळगण्यांत काय फायदा असावा, ह्याबद्दलच्या तिच्या तर्काची भरारी मात्र कांहीं केल्या दूरवर जाईना.

ह्या असल्या नाजूक कामांत लुडबुड करून जर आपण तिला कांहीं उपदेशाच्या गोष्टी सांगूं लागाव्या तर तें कसेंसेंच दिसेल, असें डनबारला संकट पडलें होतें, आणि त्यामुळेंही तो टांग्यांत ह्याबद्दल कांहीं बोलला नाहीं. तरी गाडींतून उतरून हाटेलजवळ पोहोंचल्यावर त्याचें प्रेम त्याला स्वस्थ बसूं देईना. " आज कांहीं तरी प्रसंगानें निमित्त सांपडलें आहे, पण उद्यां ही सबबही रहाणार नाहीं, तेव्हां आपण आपल्याकडून सूचना करून ठेवावी म्हणजे झालें." असा विचार करून तो म्हणाला– " मग कसें काय ? ह्यापुढें निदान महिना दोन महिने तरी घाटावर जाण्याचा नित्यक्रम बंद ठेवल्यास बरें पडेल, नव्हे ?"

क्लिन्सीनें हास्य करून म्हटलें– " त्यांत काय झाल ? तिथें कोणी माझ्या अंगाला हात लावणार नाहीं, कांहीं नाहीं. माझ्याभोंवतीं गर्दी जमली म्हणजे त्यांत कांहीं टवाळ आणि आडदांड, अविचारी लोक असणारच; आणि ते पाहिजे तशी थट्टामस्करीसुद्धां केल्याशिवाय सोडणार नाहींत. वेडेवांकडे शब्द उच्चारणार, खाचून उपरोधिकपणानें बोलणार, हें सगळं खरं;

पण आपण तिकडे लक्षच दिलं नाहीं म्हणजे झालं. आज आपण माझ्या साहाय्यासाठीं धांवून आलां, हा आपला उपकार आहे, आपला थोरपणा आहे. माझी तशी अनुकंपनीय स्थिति झालेली होती, असं तुम्हांला वाटलं असलं तर त्यांत कांहीं मी दोष देत नाहीं; परंतु खरोखर पाहिलं तर त्या-वेळीं भीतीचं कांहीं कारण नव्हतं. तितक्या थरावर गोष्ट गेलीच नसती. आपण वेळेला तिथें आलां आाणि ह्या वेळीं जर मीं नाहीं म्हटलं तर आप-ल्याला किती वाईट वाटेल, हें मनांत येऊनच मी आपल्या म्हणण्याला रुकार दिला. एरवीं माझ्या मनांत असं आहे कीं, ह्या लोकांवर माझा पूर्ण विश्वास आहे, मला त्यांची कांहीं भीति वाटत नाहीं; अशी त्यांच्या मनाची खात्री व्हायला पाहिजे. मी निर्भयपणानें त्यांच्यांत मिसळत्यें असें त्यांना समजलें म्हणजे कोणी माझ्या वाटेला जाणार नाहीं. माझ्या पाठीवर किंवा पाळतीवर कोणी आहे, अशी त्यांची समज होणें—नव्हे असला संशय त्यांना येणें, हेंही बरोबर नाहीं."

हें तिचें लांबलचक भाषण ऐकून त्याला बराच राग आला. ह्यावरून आपलें करणें तिला पसंत पडलें नाहीं हें तर स्पष्ट झालेंच; शिवाय आपण पुनः तिच्यामागें जाऊं नये असाही तिच्या बोलण्याचा रोख होता, हें लक्षांत येण्याला विशेष भानगड पडण्यासारखी नव्हती; तथापि तसें तिच्या मुखानें एकदां स्पष्ट ऐकून घेतल्यावांचून त्याला रहावेना. तो म्हणाला—" तर मग ह्या बोलण्याचा अर्थ असाच का करावयाचा, कीं, एखादे वेळी तिकडे घाटावर कांहीं वेडावांकडा-आाणि ईश्वर करो आाणि तसें न होवो—प्रसंग आला, तर मी किंवा कोणी मदतीला धांवून आल्यास त्याचें करणें कोणा एका माणसास रुचणार नाहीं. काय कसें मग ? असाच अर्थ घ्यायचा ना ?"

तिनें उत्तर केलें:—" तितकी ताणाताण करण्यानें काय होणार ? मी कांहीं अगदीं तसेंच म्हणत नाहीं; माझ्या शब्दांचा अर्थ तसा होत नाहीं. मी ह्मणत्यें कीं, मुळींच मला मदतीची जरूर नाहीं. मला तिथें कोण खा-यला येतंय ? मी कोणाच्या वाटेस जात नाहीं, तेव्हां मला कोणापासून भय नाहीं. शिवाय माझं लग्न झालेलं नाहीं, असं मी त्यांना केव्हांच सांगून चुकल्यें आहें. तेव्हां कोणी तिथें येऊन त्या लोकांदेखत मी गाडींत बसून घरीं यावं, मला न्यायला कोणीं यावं, मला घरीं पोहोंचवायला कोणी पुरु-

षानं नित्य जपावं ही गोष्ट बरी दिसेल कां ? आपण याचा विचार करून सांगा काय तें ? कोणाच्या चांगुलपणाच्या हेतूनं कां होईना, पण मी खोटें बोलत्यें असं त्यांना वाटायला कारण सांपडावं, किंवा कांहीं कुशंका निघून नांवं ठेवण्यास जागा मिळावी, असं कोणाच्या तरी मनांत येईल कां ? ''

ह्या इतक्या यराबर गोष्ट आली तेव्हां त्याचा तिळपापड होऊन त्यानें आपले ओंठ इतक्या जोरानें चावले कीं, आतां त्यांतून रक्त येतें कीं काय असें पहाणारास वाटलें असतें. तो जरा तिरस्काराच्या स्वरानें ह्मणाला:—
"बरें, नको तर नको. माझें तरी काय इतकें घोडें अडलें आहे म्हणा. कोणाचें बरें पहाण्यास जावें, आणि त्याला तें खपूं नये; ह्यापेक्षां दुसरें आश्चर्य कोणचें ? होईना तिकडे कांहीं, मला काय त्याचें ? माझ्या येण्यापासून सुद्धां त्रास होणार असला, तर मी कशाला ह्या कामांत उगाच पडून लुडबुडायला जाऊं ? हा अव्यापारेषु व्यापार मला कोणीं सांगितला आहे ?"

त्याचे शेवटचे शब्द तिच्या वर्मीं झोंबल्याशिवाय राहिले नाहींत; आणि त्याचा परिणाम म्हणून तिच्या मुखश्रीवर लहानशा दुःखाच्या ढगाची छाया येऊन गेली. ती म्हणाली—" हा अव्यापार केला, असं मी म्हणालें तरी का पण!"

" नाहींतर काय झालें ? हेच नेमके शब्द मुखावाटे निघाले पाहिजेत असें कांहीं नाहीं. परंतु—

" हंः हंः हें पहा डनबारसाहेब, हा किती तरी राग आपल्याला आला आहे तो! माझ्या बोलण्याचा अर्थ मुद्दामच जर कोणी विपरीत करूं लागलें, तर माझा नाइलाज आहे. तथापि येवढी तरी कबुली मला मिळालीच पाहिजे कीं, उद्यांपासून आपण माझ्यामागें घांटावर येणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर माझ्या मदतीसाठीं धावून येण्याची तसदीहि आपण घेऊं नये."

" होय, कबूल-कबूल, सात वेळां कबूल!"

" झालं तर, मग हें ठरलंच. आतां आपण माझ्याबद्दल जी तसदी घेतली त्याबद्दल मी फार फार आभारी आहें, असें— "

" छेः छेः त्यांत काय आहे ? त्यांत आभार आपण मानायचें कारणच नाहीं. उलट, मीच आपल्या मागें वेड्यासारखा आलों ह्याबद्दल माफी मागितली पाहिजे."

तिला हें बोलणें रुचलें नाहीं; तिनें आपलें पाऊल जमिनीवर आदळून त्याला गप्प करण्याचा प्रयत्न केला. अखेर ती म्हणाली, "बरं बाई, तसं कां होईना, वाटेल त्यानं वाटेल तें म्हणावं; तोंडाला कोणी हात लावावा? गुड मॉर्निंग." ती आपल्या खोलीच्या दारापाशीं आल्यावर म्हणाली. आणि खोलीचें दार लोटून आंत जातांना उंबऱ्यावर थोडीशी थांबून म्हणाली,—"डनबारसाहेब, आज संध्याकाळीं मला सुट्टी आहे. म्हणजे माझं रोजचं काम मला नाहीं. तेव्हां नित्याप्रमाणें जेवण झाल्यावर इकडे येणार असाल, त्या वेळीं आपण वडिलांच्या जवळ "मृत्यूनंतरची स्थिति" या विषयावर कांहीं माहिती सांगून मला आपलीं मतें ऐकवाल तर मी ह्या कानांनीं ती ऐकून पावन होईन आणि त्यामुळें त्या विषयासंबंधानं दुसरं कोणी विचारूं लागलं तर त्याला सांगायला सांपडेल."

"होय, तेवढें मी करीन. आणि आपलींही या विषयावरचीं मतें माझ्या कानीं आल्यास त्यापासून मलाही थोडा बहुत फायदा होईल आणि आमच्या दोघांच्या संवादरूपी दुग्धांत थोडीशी साखर पडल्यानें त्याला जास्त गोडीही येईल."

ह्या अलंकारिक भाषणानें तिला थोडेंसें हंसू आलें आणि ती म्हणाली, "मला त्यांतलं कांहीं कळत नाहीं, म्हणून तर हा विषय मीं मुद्दाम सुचविला. मीं आपलं उत्तम श्रोत्याच्या वर्गांतच राहण्याचं ठरविलं आहे." इतकें बोलून तिनें मान लववून त्याला सलाम केला, आणि खोलीचें दार लोटून ती आंत चालती झाली.

दुसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें घाटावर गेली, पण आदल्या दिवसासारखा प्रकार झाला नाहीं; तिच्याशीं भांडायला कोणी उठलें नाहीं. कोणी तिच्याकडे पाहीनाच व तिच्या जवळपास येऊनही कोणी बायका उभ्या राहिल्या नाहीत. ती जणुं काय तिथें आलीच नाहीं, अशाप्रमाणें त्यांनीं आपले व्यवहार चालविले होते. कांहीं वेळानें ती परत निघाली तेव्हां पुलावर कालच्यासारखाच कांहीं टोळभैरवांनीं घोळका घातला आणि तिला पहातांच कोणी एक मजली तर कोणी दोन मजली ह्याप्रमाणें हंसण्याची चढाओढ चालविली. तिला लागतील असे वेडेविद्रे शब्दही त्यांच्या तोंडांतून बाहेर पडत होते. ती कांहीं बोलली नाहीं, उलट त्यांच्याकडे पाहून हंसत हंसतच तिनें पुलाचें दुसरें टोंक

गांठलें. ती तशीच तडक रेसिडेन्सीच्या पडक्या इमारतीकडे गेली, आणि तेथें गेल्यावर मात्र क्षणभर स्वस्थ उभी राहिली. तिची दृष्टि त्या पडक्या इमारतीकडे जातांच तिच्या मनाची विचारसरणी सुरू झाली. " काल इतकें मी बोलल्यें, त्याजकडून न येण्याचें कबूलही करून घेतलं, तरी देखील तो आला असेल काय ? किंवा येथें येऊन लगेंच परतही गेला असेल काय ? " ही आशा तिला वाटावी हें नवल तर खरेंच, पण स्त्रियांची प्रकृतिच कांहीं अंशीं चमत्कारिक असत्ये. त्या वेळेला त्याच्यापासून कबूल करून घेते वेळीं जो हेका होता, तो मावळल्यामुळें त्यानें आपला शब्द पाळूं नये अशीच हिला इच्छा झाली. असो. तिनें चोहींकडे नजर फिरवून त्याची ती गाडी कोठें दिसत्ये कीं काय हें पाहिलें, पण तिच्या नेत्रांचें पारणें फिटलें नाहीं. ह्या वेळीं हवा फार मजेदार असल्यामुळें तिला मुळींच थकवा किंवा कंटाळा आला नव्हता, म्हणून तिला आणखी फिरावेंसें वाटत होतें. ती ह्या बाजूला आज पुष्कळ दिवसांत आली नव्हती, म्हणून रेसिडेन्सीच्या ह्या दरवाज्यानें आंत शिरून पलीकडच्या दारानें बाहेर पडावें, असें तिच्या मनांत आलें. उद्देश काय असावा हें तिचें तिलाच नीट सांगतां आलें नसतें; आणि ह्याची परीक्षा होण्याची वेळही तितक्यांत आली. समोरून कोणी तरी पुरुषाकृति येत आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. आतां त्याचा आणि हिचा कांहीं संबंध नसतांना हिचें हृदय धडधड उडूं लागलें. आपण इथूनच परत फिरावें आणि आलेल्या वाटेनें पळत निघून जावें, असें सुद्धां तिच्या मनानें घेतलें. पण ती आपल्या मनाशीं म्हणाली " काय करूं बाई ! हें समोरून कोण येतं आहे ! हे जर डनबार असले, तर त्यांना असें नाहीं कां वाटणार, कीं काल इतकं तारांगण केलं खरं; पण आज मुद्दाम त्यांचं दर्शन व्हावं म्हणून मी इकडे वळल्यें. असा आपल्या येण्याचा अर्थ दुसऱ्यांनीं कां करूं नये ?" असें वाटूनच तिच्या रक्ताशयानें उसळा मारण्यास आरंभ केला होता; म्हणजे त्याची आपली इथें गांठ पडूं नये असें तिच्या मनांत आलें असेल, असा जर कोणी वाचक अर्थ करतील तर त्याच्या उलट तिचें पुढचें वर्तन होऊं लागलें होतें; आणि म्हणून ती परत फिरण्याच्या विचारांत होती ती तितकीच थांबली.

" छे बाई, हें कांहीं उपयोगी नाहीं. हा येणारा इसम जर

तोच असला आणि त्याला पाहून मीं मागं पाय घेतला, हें जर त्यानं पाहिलं तर पंचाइत. त्याला वाटेल कीं त्याची गांठ पडूं नये म्हणूनच मी पळून गेलें; त्याला भिऊन तो लाजवील म्हणून मी त्याची भेट टाळण्याचा यत्न करीत आहें." अशा प्रकारें दोन्हीकडून तिला पेंचांत पडल्यासारखें होऊन ती घाबरून गेली. तिच्या अंगाला दरदरून घाम आला. तिचें वक्षस्थल तिच्या वस्त्राला फाडून बाहेर पडतें कीं काय इतक्या जोरानें उडूं लागलें. तिच्या मुखावर घर्मबिंदूंची पंक्ति उभी राहिल्यामुळें कोणी हिंदु युवती इंग्रजी पोषाख करून निघाली आहे व तिच्या वदनचंद्रावर मोत्यांची झालर घातली आहे, असें एखाद्या कामुक पुरुषास वाटण्याचा संभव होता. तिनें आपला हातरुमाल काढून घाम पुसला, तरी पण लज्जेनें तिच्या मुखावर इतका रक्तिमा पसरला कीं, दिवस मावळण्याच्या वेळच्या संध्यारागाच्या लाल ढगांतून पूर्णचंद्र उगवत आहे असा दिवसा भास होऊं लागला. तो मनुष्य जरा पुढें आला, तेव्हां तो डनबार नव्हे असें ठरलें; त्यामुळें तिच्या रक्ताशयाची उचंबळ कमी झाली. पण तिला हिरमुसल्यासारखें झालें. ह्या तिच्या हिर्मुष्टि होण्याच्या कारणाची मीमांसा केली तर स्त्रीस्वभावाची एक गंमत दिसणार आहे. ज्या अर्थी तो समोरून येणारा मनुष्य डनबार नाहीं असें कळतांच हिला कष्टी झाल्यासारखें झालें, तेव्हां येथें येऊन डनबारची गांठ घ्यावी असेंच तिच्या मनांत थोडेंतरी वाटत असलें पाहिजे. ही कल्पना तिच्या विचाराच्या पडद्यावर छायाचित्र उमटवूं लागल्याबरोबर तिचें तिलाच हसूं आलें. आणि 'हें कांहीं नव्हे, मी कांहीं त्याच्या दर्शनाला इकडे आलें नाहीं. ही रेसिडेन्सी पुष्कळ दिवसांत पाहिली नव्हती म्हणून सहज मी इकडे वळलें.' असें म्हणून ती आपली दृष्टि त्या पडक्या भिंतीकडे व दगडाकडे वळवूं लागली. पण तिच्या त्या चर्मचक्षूंपुढेंही ती भिंत येईना. तिची दृष्टि चंचल होऊन ती एके ठिकाणीं स्थिर होऊन आपलें कामच करीनाशी झाली. तेव्हां त्या तिच्या नयनांना भूक तरी कशाची होती ? भिंत सोडून ते नेत्र रस्त्याकडे कां वारंवार भटकत ? तर त्यांना ती डनबारची 'टमटम' पाहिजे होती, त्या 'टमटमीच्या' दर्शनानें त्यांना स्थिरता आली असती. पण तो योग घडून येण्यासारखा नव्हता. ती हळूहळू पावलें टाकीत जणूं काय त्या रेसिडेन्सीची लांबी मोजीत

पलीकडच्या दाराशीं पोहोंचली आणि बाहेर पडली, तेव्हां मात्र तिचें तोंड रडवें झालें—तिला गहिंवर आला; आणि त्याबरोबर तिला थोडासा आपलाच रागही पण आला.

नित्याप्रमाणें आजही फरेल म्हाताऱ्याजवळ डनबार आला. आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें त्या दोघांचा संवाद ऐकण्यास कीन्सी येऊन बसावयाची ती येऊन बसली नाहीं. ती जी आली ती थेट आपल्या खोलींत गेली. जेवणाच्या वेळीं त्यानें कित्येक वेळां तिच्याकडे चोरून पाहिलें, आणि त्यापैकीं कांहीं वेळ तिची व त्याची दृष्टि मीलन पावली, पण त्या वेळीं तिच्या गालावर जी लाली चढली, त्यावरून आपण त्याजकडे चोरून पहात आहों, हें त्याला न समजूं देण्याचा तिचा प्रयत्न होता, व ह्या चोरींत सांपडल्याबद्दल तिला वाईट वाटलें असावें, असें स्पष्ट होतें. दृष्टादृष्ट होतांच ती खालीं पाहूं लागे. वगैरे प्रकारही डनबारच्या लक्षांतून चुकला नाहीं. असो. ती तिथें बोलण्यास येत नाहीं असें ठरतांच त्यानेंही आटपतें घेतलें आणि रोजच्या-पेक्षां लवकरच तो उठला. त्यांचें बोलणें केव्हां आटपतें, ह्याची ती वाट पहात पाळतीवर असली पाहिजे. कारण डनबार उठून म्हाताऱ्याला 'गुड नाईट' म्हणून जायला निघाला, इतक्यांत कीन्सीनें खोलीचें दार उघडून तेथून त्याला खुणेनें जवळ बोलाविलें. ती म्हणाली "साहेब, आपण लाल किल्ल्याच्या नबाबाची चवकशी करीत होतांना, कीं तो लखनौला परत कधीं येणार वगैरे ? होयना ? तर मग मला कोणीं सांगितलें तें खोटें नव्हे. तर मी त्याबद्दल कांहीं माहिती देण्यासारखी बातमी सांगणार आहें. मला त्यांच्या बिबीसाहेबांकडून पत्र आलें आहे, त्यांत ती लिहिते कीं, पुढील आठवड्यांत सोमवारमंगळवारींच आम्हीं घरीं येऊं."

ही बातमी ऐकल्यानें डनबारला खरोखर पाहतां मुळींच आनंद होण्यासारखा नव्हता; परंतु तसें त्याला वरकरणी न दिसेल असेंच वागणें भाग होतें त्यानें उत्तर दिलें "असें काय ? मग फार छान झालें बुवा ! हो; तो आला म्हणजे वेळ कामाला लागेल; काय जी मला चौकशी करावयाची आहे, ती चटकन संपवून मी आपला इंग्लंडला परत जाईन म्हणतों. उगीच माशा मारीत इथें तरी किती दिवस काढावयाचे !"

"कंटाळलां कां इतक्यांतच ह्या हिंदुस्थानाला ? अग बाई !"

ह्या कोन्सीच्या प्रश्नावर त्यानें उत्तर केलें; " छे; छे, तसें कांहीं नाहीं. पण केव्हां तरी मला परत जाणें भाग आहेना ? कांहींतरी--मग तें वाटेल तें कां होईना-कांहीं तरी काम पाहिजे आपल्याला, त्याशिवाय मला चैनच पडत नाहीं. "

" पण कायहो ! मी विचारूं कां आपल्याला ? ह्या नबाबाचा म्हणे आपल्याशीं फार स्नेह आहे. असें असेल तर माझें एक काम आहे, तें कराल कां आपण ? आपल्या स्नेहाची भीड घालून तो आपल्या कुटुंबाला जरा ममतेनें वागवील, असें कांहीं करतां येईल कां आपल्याला ? कराल कां आपण ? "

" म्हणजे ? तो तिला ममतेनें वागवीत नाहीं कीं काय ? इतक्या निर्दयतेनें वागावितो अं ? "

" इकडचे पतिराज जसला निष्ठुरपणा करितात तसला तो करीत नाहीं. तिला मारीत नाहीं, शिव्या देत नाहीं; फक्त तो तिच्याकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहीं. तिचं वारं पडूं देत नाहीं. म्हणजे त्यांचें लग्न झालं, ह्यापेक्षां त्यांचा नवरानायकोपणा कांहीं नाहीं. "

" छे बुवा, मग तर काम फार कठीण आणि अत्यंत नाजूक. हें नाहीं वाटत आपल्या हातून होईलसें. मग प्रयत्न तरी काय करावा आणि काय उपाय सुचवावा ? "

" दुसऱ्या माणसाला आपल्याकडून होईल तितक्या सुखांत ठेवण्यासाठीं झटणें हें प्रत्येक मनुष्याचं कर्तव्य कर्म आहे. तुम्ही आपल्या कुटुंबाशीं अमुक प्रकारानं वागा, असं दुसऱ्याला समक्ष सांगण्याचं काम कठीण आहे खरं; त्याला पुष्कळ धैर्यही लागतं. पण इतका धीटपणा आपल्या अंगीं नसेल तर मग कांहीं माझं बोलणं नाहीं. " असल्या अढीच्या बोलण्यावर डनबार उत्तर काय देणार ? नाहीं म्हणण्याची सोयच राहिली नव्हती. तेव्हां त्यानें मान लववून तिला सलाम करून म्हटलें:-" बरें आहे, पाहातों प्रयत्न करून, " इतकें बोलून तो निघाला, तो त्याच्या खोलिच्या दारापाशीं खाबूर त्याची वाट पहातच बसला होता.

हा त्याचा नित्यक्रमच होता. धनी परत येईपर्यंत तो असाच बसत असे. धनी येतांच तो उठून उभा राहिला, आणि ' अटेन्शन ' असा हुकूम

मिळतांच ज्या प्रकारच्या कवाईतीच्या थाटानें शिपाई उभे राहतात, तसे पाय जुळवून हात अंगाला चिकटते धरून त्यानें आपल्या धन्याला सलामी दिली. आपला धनी आतांशा दुःखीकष्टी असतो, ही गोष्ट त्याच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. लहान पोर असल्यापासून ज्याला त्यानें आपल्या अंगाखांद्यावर खेळविलें, त्याच्याजवळ आपल्या मनांत आलेल्या गोष्टी स्पष्टपणानें बोलून दाखविण्यास त्याला कांहीं दिक्कत वाटत होती, अशी गोष्ट नव्हती. उलट आपला अधिकार तसा पोहोंचत आहे असें त्यास वाटत होतें. तरी त्यानें मुग्धता धारण केली होती, ह्याचें कारण मात्र निराळें होतें. तो मनांत म्हणे ' जें व्हावयाचें आहे तें होणारच; तें कांहीं केलें तरी चुकावयाचें नाहीं. ह्या जीवाच्या किताबांत ज्या गोष्टी नमूद करून राहिल्या आहेत, त्या घडल्यावांचून कशा राहतील ? तरी पण आज त्याला गप्प बसवेना. आपल्या धन्याचें दुःख कांहीं तरी कमी करण्याची खटपट करावी असें त्याला वाटलें. तो डनबारला म्हणालाः—

" हुजूर, माझ्या बोलण्याचा राग मानूं नये. दुःख हें फार चिखल झालेल्या झऱ्याप्रमाणें असतें. अदमी कांहीं कार्य करीत नाहींसा झाला, रिकामा बसूं लागला, म्हणजे झऱ्याचें वाहतें पाणी कशानें तरी बंद झालें म्हणजे जसें तें सांचून नासूं लागतें, तसें होऊं लागतें. त्याला उपाय दुसरा तिसरा कांहीं नसतो; पाण्याला पाट फोडून तें वाहतें करावें. त्याप्रमाणें माणसानें हालचाल केली पाहिजे, फिरलें पाहिजे, प्रवास केला पाहिजे; स्वस्थ बसतां कामा नये. व्यायाम, करमणुकीची गोष्ट केली पाहिजे. "

" बरें तर खावूर, तूंच सांगतोस !– मीं काय व्यायाम करूं, कोणची करमणूक करून घेऊं ? "

" शिकार करावी, हुजूर. हरडुई आणि बरेली जिल्ह्यांमध्यें पुष्कळ झील आहेत. तेथें पाणकोंबडीं किती तरी असतात. आजच एका शिकाऱ्याची व माझी गांठ पडली होती. पहा, जायचें मनांत असलें, तर करा आज रात्रींच निघण्याचा बेत, जलदीसे बहुत फायदा. "

" आज रात्रीं ! इतकी गर्दी कशाला ? "

" कारण, ह्या शिकाऱ्यानें जो झील आज पाहिला आहे आणि मला बातमी दिली आहे, त्याची बातमी दुसऱ्या कोणाला लागली समजा, मग

कसली मजा ? शिकार कशी राहील ?"

"कोणच्या गाडीनें निघावें लागेल, ह्याची कांहीं चौकशी केली आहेस काय ?"

"साडे अकरा वाजतां गाडी निघते हुजूर. आतां दहाचा सुमार आहे- अजून पक्का दीड तास आहे, बांधाबांधी करावयाला ?"

"बरें तर आटप, कर सारी तयारी– बांधाबांधी."

आपण शिकारीला जात आहों, ही बातमी फेरल म्हाताऱ्याला कळवावी, तो अजून निजायला खोलींत गेला नसेल, असा विचार करून डनबार बाहेर व्हरांडयांत येऊन पाहूं लागला. पण फेरल किंवा त्याच्या खुर्च्या कांहींच बाहेर नव्हत्या. तेव्हां परत येऊन त्यानें चटकन एक चिठी लिहून उद्यां मला यायला व्हायचें नाहीं म्हणून माफी मागितली. खाबूनें भराभर सर्व तयारी चालविली होती. डनबारच्या बंदुकीच्या संदुकीच्या कातडी पट्टया खेंचतां खेंचतां तो हिसका देत म्हणाला 'तो झलि (तलाव) कुसुंबी बेगमच्या जहागिरीच्या हद्दींत आहे.'

"अरे, मग आतां ही गोष्ट आधींच बोलावी कीं नाहीं ? बेगमच्या जहागिरीच्या हद्दींत शिकारीला जावयाचें तर तिची परवानगी नको कां आधीं ? त्याची काय तजवीज केलीस ?"

"हुजूर, मी इतका का वेडा आहें ? त्याची सर्व तरतूद मी करून ठेविली आहे, त्याबद्दल माफी असावी. या अल्ला ! इथें मात्र कांहीं इलाज नाहीं. हुजूरच्या बाटलींत व्हिस्कीचा थेंबही नाहीं."

"त्याची नको इतकी काळजी ! जा. माझ्या आंतल्या पेटींत एक सबंध बाटली भरलेली आहे. बरें मग–तूं काय म्हणालास तें ?–त्या बेगम-कडून शिकारीची परवानगी अगोदरच आणून ठेवली आहे म्हणून, होय ना ? वा रे वा ! मी शिकारीला निघायचें कबूल करीन, हें तुला अगोदर कसें कळलें ? इतका तर्क तुझा कसा चालला ?"

"तसें नाहीं, हुजूर. मला तें कसें आधीं मालूम होणार ? पण मीं म्हटलें कीं, हुजूरजवळ गोष्ट काढली, तर हुजूरकडून नकार येणार नाहीं; आणि हुजूरचें जेवण होऊन परत आल्यावर मग विचारून काय तें करूं, असा विचार मनांत आणून स्वस्थ बसलों असतों, तर उद्यांची हुजूरच्या शिका-

रीची तयारी होणेंच शक्य नव्हतें. परवानगी मिळवितांच आली नसती. आजच ती बेगम लखनौस अनायासें आली होती, म्हणून तिच्या कारकुनाची गांठ घ्यायला सांपडली. इथलें काम संपतांच ती मोटारींतून आपल्या जहागिरीच्या गांवीं लगेंच गेली."

"अं: काय म्हणतोस तरी! बेगमची मोटारगाडी आहे?"

"होय हुजूर. ती फार तरुण–बच्चा आहे, विधवा आहे. तिच्या मर्दला अल्लानें आपल्याजवळ फार जलद नेलें. मर्जी अल्लाची. तिनें पुन: निक्का लावला नाहीं. तिचें म्हणणें एकदां नशिबाची पारख झाली तेवढी बस्स. शिवाय ती आतां स्वतंत्र, स्वत:ची मालकीण आहे. तेव्हां दुसऱ्याच्या ताब्यांत रहावें, आपली स्वतंत्रता गमवावी असें कसें वाटावें तिला? ती पडदाबिडदा कांहीं पाळीत नाहीं."

"असं अं! तिच्या कारकुनाची तुझी गांठ तरी कशी पडली? कां समक्षच बेगमला भेटलास तूं?" हंसत हंसत डनबारनें विचारलें. ह्यांत बराच मजकूर खोटा असावा असें त्याला वाटूं लागलें होतें.

"छे हुजूर. इतकी बर माझी दाद कुठली लागायला? तिच्या कारकुनाची माझी थोडी ओळख निघाली, त्याच्याकडेच मीं तोंडीं अर्ज केला. 'परवानगी मागण्यासाठीं माझ्या मालकाचें पत्र आणावयाचें, पण ते बाहेर गेले आहेत, त्यांची वाट पहात बसल्यावर काम कसें होणार आणि आम्हांला तर जरूर शिकारीला यायचें आहे' असें मीं त्यांस म्हटलें, तेव्हां त्यानें परवानगी आणून दिली."

आतां मात्र डनबारच्यानें रहावेना. तो म्हणाला:––खाबूर, आतां तरी आपल्या केंसाची लाज राख; खोटें बोलावें किती याची कांहीं सीमाच नाहीं-ना? इतकें खोटें सांगवतें कसें तुम्हांला बुवा? त्यांत काय म्हणा, तें तुमच्या अंगवळणींच पडलें आहेसें दिसतें."

"मी ह्यांत काय लबाड बोललों हुजूर? आपण घरीं नव्हतां हें खरें ना? मग ह्यांत काय मीं खोटें सांगितलें? आणि तितका अवकाश असता तर हुजूरला कळल्याबरोबर हुजूरनीं परवानगीबद्दल पत्र लिहिलें असतें कीं नाहीं? ह्यांत तरी मीं कोणची लबाडी केली? बरें, कांहीं कां असेना, लबाडीनें कां होईना? आपलें कार्य एरवीं झालें असतें कां सांगा इतक्या लवकर?

हं, आटपा हुजूर. झाली सर्व तयारी–सारी बांधाबांधी झाली. कंप्लीट–आल राईट म्हणावें हुजूरनीं."

"आल राईट–खाबूर! हें पत्र घे, हें हाटेलच्या मालकाला द्यावयाचें बरें कां? हें दुसरें, हें उद्यां सकाळीं फेरलच्या हातीं द्यायला सांगून ठेव."

हाटेलच्या मालकाला देण्याचें पत्र हातीं घेऊन खाबूर निघाला तेव्हां आपल्याशीं म्हणूं लागला:–"ही लबाडी करण्यांत काय पाप घडलें असेल, त्याची अल्लापाशीं मी माफी मागेन, त्याबद्दल अल्लानें शिक्षा केली तरी भोगीन. सगळ्या गोष्टी हुजूरला कळवाव्या तरी कशा? बेगमनें कुठें हुजूरला पाहिलें नकळे? तिनेंच तर हा शिकारीचा बूट काढला; पण हें हुजूरला कळल्यावर माझा डाव कसा साधणार? ह्या एका गोऱ्या पोरीनें हुजूरचा कसा छळ मांडिला आहे पहा! त्यांतून हुजूरला सोडविण्यासाठीं मीं हा सर्व कारभार केला. ह्या हेतूनें लबाडी केली, मग त्याबद्दल मला प्रायश्चित्त पडेल काय? हिंदुलोकांच्या ग्रंथांत कर्मापेक्षां बुद्धि श्रेष्ठ म्हटलें आहे, म्हणजे जें कर्म घडलें त्याकडे निव्वळ पहाण्यापेक्षां तें कर्म करणाऱ्याच्या हेतूकडे पाहिलें पाहिजे, असें म्हणतात. माझ्या धन्याच्या कल्याणाशिवाय माझा दुसरा भावच नाहीं. ह्या गोऱ्या पोरीची पीडा कशी तरी टळो म्हणजे झालें. नाव तर ढकलली आहे. ह्या तीरावरून हालतच नव्हती, ती पुढें सरकली, पुष्कळ झालें. आतां पुढें तिचें कसें काय होतें तें पहावें. परवरदिगार एक अल्ला आहे. तोच सर्व नीट करील."

# प्रकरण ४ थें

## रतीच्या मंदिरांत!

धन्य तयास म्हणावें, एकान्तिंहि त्यागितो परस्त्रीतें।
उत्कृष्ट रूप, कामोद्दीपक वच, सरस मधुर-विभ्रम ते ॥
पाहूनि एकसमयीं कोणाचें नच वरें मन भ्रमतें।
न भुले ज्यांचें मन ते होत जगीं धन्य खास मानव ते ॥

गाडी अगदीं निघण्याची वेळ झाली; दुसरी घंटा वाजली; गाडीचें हिरवें निशाण फडफडूं लागलें. आतां इंजिनाची शिटी होऊन गाडी निघ-

णार, इतक्यांत डनबारला आठवण होऊन तो म्हणाला, "सगळें खरें, खाबूर, पण माझ्या सकाळच्या न्याहरीची-छोट्या हजिरीची-काय व्यवस्था केलीस रे? कां सगळ्या दिवसाचा आम्हांला फाक्या देण्याचा तुझा विचार आहे?"

खाबूरनें उत्तर केलें, "गाडींत फार वेळ बसावें लागणार नाहीं, हुजूर! आतां १।२ तासांचे आंत आपलें उतरण्याचें स्टेशन येईल. तिथें उतरल्यावर अगोदर आपण थेट झीलवर सूर्योदयाचे आंत जाऊन पोहोंचूं. तिथें एक कायसें विश्रांतीसाठीं घर आहे म्हणतात. तेथें आपल्या उपहाराची सर्व व्यवस्था केलेली हुजूरच्या दृष्टीस पडेल. मी आपल्यासाठीं शिकारी ठरविला आहे. तो आधीं जाऊन तिथली सर्व तजवीज करून ठेवणार आहे. हुजूर! झीलवर शिकारबिकार मनाजोगती मिळाली, मन रमलें, व हुजूरला एक नाहीं दोन दिवस मुक्काम करावासा वाटला, तरी कांहीं हरकत पडणार नाहीं."

गाडी सोंसों करीत निघाली व डनबारला लगेंच गाढ निद्रेच्या स्वाधीन व्हावें लागलें. त्याचें सामान घेऊन खाबूर उतरूं लागला व त्या वेळीं डनबारला त्यानें हलवून जागें केलें. डोळे चोळून तो पहातो तों एका स्टेशनांत गाडी उभी असून एक अर्धवट बिलायती किंवा साहेबी पोषाख केलेला मनुष्य डनबारला उतरून घेण्यास उभा होता; डनबारनें त्याचेकडे नजर फेंकतांच त्यानें लवून सलाम केला. तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला, "खाबूर म्हणाला तोच हा शिकारी असेल काय? छे, असला उंची पोषाख त्याचा कुठला असायला?" नंतर मोठ्यानें त्या मनुष्यास म्हणाला, "इथें एकादें वाहन मिळेल काय?" त्या मनुष्यानें पुनः सलाम करून म्हटलें, "वाहन कशाला? बेगमसाहेबांनीं आपली मोटारगाडी आपल्या सेवेला ठेवली आहे, हुजूर." डनबारला आश्चर्य वाटलें; तो म्हणाला, "मेहरबानी बेगमसाहेबांची! काय हा थोरपणा! माझी पहिली कांहीं ओळख नसून इतका पाहुणचार त्या करीत आहेत, त्यामुळें मला आभाराखालीं वांकल्यासारखें होणार आहे."

"येवढ्यानेंच काय झालें आहे, सरकार. हुजूरला पसंत पडेल तर काय वाटेल तें करायला आमची थोर मालकीण तयार होईल. ही त्यांची जहा-

गरि आपल्या कामीं लावण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या सर्व नोकरांना आपल्या सेवेला हजर असण्याबद्दल हुकूम दिला आहे. त्या विश्रांतिस्थानाच्या ठिकाणीं हुजूरसाठीं सर्व तयारी करून ठेविली आहे. आपल्या मर्जीप्रमाणें त्या ठिकाणीं वाटेल तितका मुक्काम करावा हुजूरनीं. आपल्या मनाला पसंत पडण्यासाठीं बेगमसाहेबांनीं जी व्यवस्था ठेविली आहे, ती आपल्याला आवडली, आणि हुजूरची लहर लागली, तर मालकिणीची विनंति अशी आहे कीं, सवड काढून त्यांच्या वाड्यापर्यंत येऊन आपण आपली पायधूळ झाडावी. सरकार, त्यांची अशी साविनय प्रार्थनाच आहे."

"कोण हा आदर! काय हें आतिथ्य! किती हा विनय! इतक्या पाहुणचाराचा उपभोग घेतल्यावर मीं समक्ष भेटीला येऊन आभार मानिले नाहींत, तर तें बरें दिसेल काय! तशी प्रत्यक्ष गांठ घेऊन त्यांचे शाब्दिक तरी उपकार मानल्याशिवाय मला चैन कसें पडेल? मीं कृतघ्न नाहीं का ठरणार? बेगमसाहेबांस आज दुपारीं केव्हां वेळ होईल? ती नक्की वेळ कळली तर त्या वेळीं मी स्वतः त्यांच्या दर्शनाला वाड्यांत हजर राहीन."

"जी हुजूर! आपला निरोप मी मालकिणीला कळवितों, सरकार!"

"विश्रांतिगृहापाशीं ही मंडळी जाऊन पोहोंचली आणि डनबार मोटारमधून पहाटेच्या अंधुक प्रकाशांत पहातो तों, त्यास विश्रांतिगृह कोण म्हणेल? इतका चांगला ऐसपैस तो बंगला होता, आणि सर्व प्रकारचें सामान मांडून तो उत्तम सजवल्यासारखा दिसत होता. बंगला चांगला उंचवट्यावर बांधला असल्यामुळें भोंवतालचा सर्व प्रदेश स्पष्ट दिसत होता; पलीकडच्या बाजूस झील ऊर्फ तलाव दिसूं लागला. म्हणतां म्हणतां दिशा उजळल्या. सामान सोडून, पोषाख बदलून, गोळीबाराचें सामान बरोबर घेऊन डनबार निघतो, तों पूर्वेकडे अरुणोदयाची बहार दिसूं लागली. आपला पति बऱ्याच वेळानें आपल्यास भेटला म्हणूनच कीं काय, त्यास नभोमंडळांतील अनेक प्रभादीपांची आरती उजळून, प्राची दिशा त्याचें स्वागत करीत होती. तळ्यांतलि पाण्याच्या आश्रयानें उगवलेल्या झाडींतील अनेक जातींचे पक्षी आपआपल्या परीनें मधुर आवाज काढून दिनमणीला आळवीत होते; पाण्याच्या पृष्ठभागापासून टराव, ट्रॅंव, केकाटणी वगैरे शब्द

बंगल्यापर्यंतही, त्या शांत परंतु पक्ष्यांच्या किलबिलाटानें किंचित क्षुब्ध अशा वातावरणांतून ऐकूं येत होते, त्यामुळें ते डनबारच्या शिकारलोलुप अंतःकरणास आनंदच देत होते. कोणी आपल्या मुलाबाळांचा समाचार घेऊन विहार करण्यास जाण्यापूर्वी त्यांचें समाधान करीत असतील; पण त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक कीं आजच आपलें आयुष्य संपलें म्हणून ! ह्या कॆंकाटण्याच्या रवानें अहिंसाप्रिय जनांस जे विचार उत्पन्न झाले असते, त्यांच्या अगदीं उलट विकार करमणुकीसाठीं शिकार करण्याचा परिपाठ पडलेल्या आणि मांसाहाराच्या संस्कृतींत वाढलेल्या डनबारच्या हृदयांत उचंबळू लागले. हा सर्व संवयीचा परिणाम आहे. निषादानें बाणानें विद्ध केलेल्या पक्ष्यास पाहून आद्यकवि वाल्मीकीस करुणासमुद्राच्या लाटा उचंबळण्याबरोबर काव्यस्फूर्ति झाली. सारांश, असल्याच दया, अहिंसा व सत्यादि धर्मासंबंधानेंही देशरिवाज निरनिराळे असल्यामुळें कोणी कोणास एकदम फारशीं नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. डनबारच्या कानाला तो पाणकोंबड्यांचा कर्कश आवाजही ह्या वेळीं आनंददायक झाला. त्यानंतर तो आपली आवडती बंदुक खांद्यावर टाकून त्या पक्ष्यांवर नेम धरून त्या सर्वांना यमसदनास पाठविण्याच्या तयारीसाठीं बार भरण्याचें सामान पुरेसें घेऊन निघाला. झीलमध्यें नानाप्रकारचे जलचर पक्षी आनंदानें क्रीडा करीत होते. अनेक रंगांचे निरनिराळ्या तऱ्हेचे पाणकोंबड्यांचे थवे तेथें असून रानबगळेही कांठावर होते. अशी आयती मौज सांपडल्यावर कंटाळून हात दमणें, दारुबाराची सामुग्री संपणें, किंवा भुकेनें पोटांत गडबड उडवून देणें असल्या उपाधि उत्पन्न झाल्याशिवाय ह्या क्रीडेपासून डनबारला परावृत्त होण्यास कांहींच कारण नव्हतें. त्यामुळें सकाळीं तो जो झीलवर गेला व त्यानें जो पहिला बार काढला, तो अकरा वाजेपर्यंत त्याची बंदूक एकसारखी फाडफाड आवाज करून आपल्या मालकाच्या कर्णांस आनंद देत होती. मग उपहार करण्याची आवश्यकता वाटल्यावरून डनबारची स्वारी त्या विश्रामगृहाला परत आली. उपहारानंतर थोडा वेळ विश्रांति घेऊन डनबार पुनः त्या तळ्याच्या कांठीं गेला; तों तेथें एक सुंदर नौका तयार असून तिच्यांत डनबारला बसण्यास विनंति करण्यांत आली. त्यांत बसल्यावर त्याला तळ्याच्या चोहों बाजूला फिरविण्यांत आलें, आणि सर्व बाजूंच्या शिकारी

पांखरांचा समाचार घ्यावयास सांपडला. ह्या एक प्रकारच्या जलक्रीडेहून डनबार परत आला तों दुपारचे चार वाजले. बंगल्यांत जाऊन बसतो तों बेगमसाहेबांकडून सकाळच्या निरोपाचें उत्तर घेऊन आलेला इसम हजर झाला. तो म्हणाला " संध्याकाळचें जेवण झाल्यावर हुजूरची मर्जी असल्यास आपल्या विनंतीप्रमाणें बेगमसाहेब भेटण्यास तयार आहेत. बेगमसाहेबांची विशेष प्रार्थना आहे कीं, हुजूरच्या चरणरजानें आपणांस व आपल्या रहात्या वाड्यास आपण पवित्र करावें. "

" तें सारें खरें, परंतु मी तर नवाच्या गाडीनें परत जाण्याचा बेत ठरविला आहे. तेव्हां ह्या सर्व गोष्टी त्याच्या आंत कशा होणार? गाडी गांठावयाची म्हटली म्हणजे निदान एथून सात वाजतां तर निघालें पाहिजेना? आतां तर चार वाजून गेले, तेव्हां ही एक अडचणच म्हणावयाची. "

त्या निरोप घेऊन येणाऱ्या इसमानें पुनः मुजरा करून म्हटलें, " जी हुजूर. ह्यावरून हुजूरच्या मनाजोगती येथली व्यवस्था झाली नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. ही गोष्ट जर मालकिणसाहेबांच्या कानीं गेली तर त्यांचा येथल्या सर्व मंडळीबद्दल रोष खात्रीनें होईल आणि त्या आम्हांस चांगलेंच शासन करतील. "

" पण माझी इथें व्यवस्था लागली नाहीं असें केव्हां व कोणीं म्हटलें?"

" तर मग हुजूरला येथून जाण्याची इतकी घाई कां झाली ? "

" मी निघतांना एक दिवसाच्या शिकारीची म्हणून सर्व तयारी करून आलों. ऊंस कितीही गोड लागूं लागला म्हणून तो मुळासकट खाणें कांहीं शहाणपणा नव्हे. बेगमसाहेबांचा पाहुणचार विनाकारण घेत बसावा हें मला बरें वाटत नाहीं, आणि शिवाय आळसांत पुष्कळ वेळ घालविणें मला आवडत नाहीं. इथें जाणारा रिकामा वेळ आनंदांत जाईल, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी तसला आनंद मला नको. "

" हुजूरची मर्जी. पण एका दिवसानें काय होणार? बेगमसाहेबांनीं हुजूरची भेट आतांच घेतली असती, पण त्यांचा नाइलाज झाला आहे. त्या जहागिरीच्या कामांत गुंतल्या आहेत, तें काम संध्याकाळपर्यंत आटपण्यासारखें नाहीं. आजरात्रीं नऊ वाजतां त्या रिकाम्या होतील, त्या वेळीं ही कामाची पिरपिर उरणार नाहीं व त्यांना त्या वेळीं दुसरें व्यवधानही राहणार

नाहीं. ह्या जहागिरीच्या नित्याच्या किटकिटींतून सुटल्याशिवाय आपल्या-सारख्यांच्या भेटीचीं मनाजोगतीं आनंददायक कामें सुचणार कशीं ? व तसल्या कामाची मागें ओढ असल्यावर असल्या मनरंजनाच्या गोष्टीकडे पूर्ण लक्ष तरी लागावें कसें ? तेव्हां नऊ वाजण्यापूर्वीं मालकीण साहेबांना आपलें दर्शन घेण्यास होणार नाहीं, हें कळवितांना हा बंदा लाचार आहे. ”

असें बोलल्यावर कांहीं इलाजच नव्हता. नवाच्या पूर्वींच तो झीलवर गेला, तों तेथें एक दुसरीच नौका तयार होती. तिच्यावर सुंदर दिव्यांची रोषणाई केल्यामुळें लखलखाट कांहीं और दिसत होता. तींत डनबार बस-तांच कोणी सतार वाजविण्यास सुरवात केली, तर कोणी तबल्याडग्याचा ठेका देऊं लागले. पण हा वाजविणारा डनबारच्या दृष्टीस पडला नाहीं. सतारीच्या छेडण्याचा प्रतिध्वनि चोहोंकडून निघत असल्यामुळें त्याचें मन चकित होत होतें. सतारीचा डनबारला फारसा परिचय नसल्यामुळें सूर जरी अपरिचित होते, तरी ते त्याला गोड लागले व त्याची तल्लीनता झाली. एक चीज झाल्याबरोबर पियानोला सुरवात झाली, तेव्हां मात्र त्यांतील कांहीं सुरांला डनबार ‘ री ’ च देऊं लागला. इतक्यांत नौका दुसऱ्या तीरावर पोहोंचली व खालीं उतरण्यासाठीं डनबारला सूचना झाली. तेथेंही मोटार तयार होती. तींत बसून तो थोड्याच वेळांत बेगमच्या जहागिरीच्या वाड्यापाशीं उतरला. वाडा फारच मोठा व उंच असल्यामुळें भव्य दिसत होता; त्याच्या भोंवतालीं चौफेर मोठें आवार होतें; पुढच्या भिंतीनें बाहेरच्या मनुष्यास आंतील बहुतेक कांहीं दिसण्यासारखें नव्हतें. वाड्याच्या चौकाच्या दारांत डनबार जातो, तों चार सुंदर तरुण दासी, त्याला दार उघडून मुजरा करण्यास उभ्या होत्या. दाराच्या दोन्ही बाजूंस दोघी दोघी मिळून उभ्या होत्या. त्यांनीं एकदम सलाम केले. त्यांचा पोषाख फारच झोंकदार असून त्यांच्या पायांत बारीक घुंगराचे चाळ होते. नाचांतल्या एका गतीवर ठेक्यानेंच जणूं काय त्या चालत होत्या व त्या, डनबारच्या पुढें दोघी व मागें दोघी चालूं लागल्या. त्यांनीं जिना चढून जाऊन एका मोठ्या आरसेमहालाचें दार उघडलें आणि आंत जाण्यास डनबारला खुणेनें सुचवून त्या मागच्या पायीं अदृश्य झाल्या, व त्यांच्या मागें दार एकदम लागलें. त्याला त्या स्थितींत फार वेळ तिष्ठत बसावें लागलें नाहीं. हंड्या-

झुंबरांची गर्दी लागून त्यांतील दीपांचीं प्रतिबिंबें भोंवतालच्या आरशांत पडल्यामुळें तेथें असंख्य दीप लावल्यासारखें वाटे. आरसेमहालाच्या छताचा रंग कुसुंबी होता. समोरून इकडून तिकडे गेलेल्या दासींचीं प्रतिबिंबें आरशांत दिसत. परंतु रात्रीच्या वेळीं प्रत्यक्ष कोणी दिसत नसतांना नुसता प्रतिबिंबांचा चमत्कार कसा होतो, हें डनबारच्या लक्षांत येईना. पण त्यांत नवल असें कीं, सर्व कांहीं स्त्रीमय:! पुरुषाचा एकसुद्धां चेहरा दृष्टीस पडेना; छतावर कांहीं चित्रें काढलीं होतीं, पण तीं सुद्धां सर्व स्त्रियांचीं. त्या महालाच्या खिडक्यांतून कांहीं पक्ष्यांचे पिंजरे होते, पण ते सुद्धां सांळुक्या, मैना यांचे ! पुरुषपक्षीही तेथें नव्हता. त्याच्या समोर एक वेलबुट्टीची झालर लावलेला कुसुंबीच रंगाचा पडदा होता; एकंदर तेथील खुर्च्या, कोचें, झुंबरें, पडदे ह्या सर्वांच्या रंगावरून त्या महालाच्या मालकिणीच्या नांवाचाच बोध व्हावा, अशी योजना असावी, असें त्याला वाटलें. ह्या सर्वांचा विचार करीत डनबार आश्चर्यानें थक्क होत आहे इतक्यांत समोरचा पडदा एकदम दोन्ही बाजूंला ओढून घ्यावा त्याप्रमाणें दुभंग होऊन नाहींसा झाला आणि नाटकांतील फेरप्रवेशाप्रमाणें आंतल्या बाजूस लहानशी खोली दिसूं लागली. आणि त्याबरोबरच त्याच्याही पलीकडून कोठून तरी फिडलच्या सुरांची लकेर येऊं लागली. पडदा नाहींसा झाल्याबरोबर समोरच्या मंचकावर बसलेली एक गौर युवती हळुहळु पावलें टाकीत ठुमकत मुरडत पुढें येऊं लागली. तिच्या दर पावलाबरोबर पैंजणाचा छुमछुम असा मंजुळ आवाज होत होता. तिची अंगकाठी उंच असून तिच्या मुखाचा वर्ण केतकीसारखा गोरा होता. तिची काचोळी व इतर कपडे तिच्या अंगाला अगदीं तंग असल्यामुळें यौवनविकासाच्या बहारीचीं नितांतरमणीय चिन्हेंच तेथें मूर्तिमंत प्रकट झालीं होतीं. तिच्या काळ्याभोर केसांचा कांहीं भाग पुढें दिसत होता. पण त्यांवर एक टपोऱ्या पाणीदार मोत्यांची जाळी बसविलेली होती. कपाळ उंच असून कपोलाचा भाग इतका आरक्त होता कीं, त्यांतून टिचकी मारतांच प्रवालसदृश रक्तिमेचा प्रवाह वाहील की काय असा भास होत होता. ओंठ पोंवळ्यांप्रमाणें लाल असून नुकत्याच चर्वण केलेल्या तांबुलामुळें ते विशेष खुलून दिसत होते. कुंदफुलांना मागें सारणारी दंतपंक्ति ह्या तांबुलानें कांहींशी रक्तांकित झाली असल्यामुळें तेथें शुभ्र आणि रक्तवर्णाची

स्पर्धा लावल्यासारखें वाटणें साहजिक होतें. कानांतील लोलकाची चमक तेजस्वी असल्यामुळें दिव्याच्या प्रकाशांत त्यांचें तेज कामुक जनांची त्रेधा उडविण्यासाठीं कटाक्ष फेकण्याचाच प्रयत्न करीत आहे असें वाटे. पेहेराव मुसलमानी थाटाचा होता, तरी लहंगा टाचेपर्यंतच होता; व त्यामुळें त्या सुंदरीच्या चालण्यास त्यानें कांहीं प्रतिबंध होण्यासारखा नव्हता. लहंग्यावर मधूनमधून व काठाच्या भरजरी किनारींत भिंगें बसविलीं होतीं, त्यांची चमक तिच्या दर पावलागणिक आरशावर पडून त्यांत चांदण्यांनीं वेढलेली तेजस्वी चंद्रिकाच तेथें फिरत आहे असा भ्रम उत्पन्न करीत होती. ह्याप्रमाणें विषयी जनांला मारण्यासारख्या सर्व तयारीनें सज्ज झालेली ती रूपसुंदर बेगम डनबारला पाहून हास्य करून त्याच्यावर आपले कटाक्षबाण सोडीत येत होती. डनबारच्या जागीं दुसरा कोणी असता, तर त्याचें देहभानच हरपलें असतें. ती खोलींतून पुढें येतांच डनबार उठून उभा राहिला आणि त्यानें तिला लवून सलाम केला. इतक्यांत समोरचा पडदा पूर्ववत् सारला जाऊन ती कुसुंबी-बेगम कुसुंबी पोषाखांत, कुसुंबी पडद्याच्याजवळ उभी असलेली पाहून, आपण हा देखावा प्रत्यक्ष पहात आहोंत किंवा हा एखाद्या नाटकांतील प्रसंग आहे, ह्याबद्दल संशय उत्पन्न होण्यासारखी त्याची स्थिति झाली. बेगमच्या हातांतल्या आंगठीवरील हिरकणी इतकी तेजोमय होती कीं, तिनें आपला अंगठीचा हात पुढें करतांच त्यावरील तेजस्वी किरण भोंवतालच्या आरशावर पडून तितके काजवेच तेथें प्रगट झाल्याचा भास झाला. बेगमनें आपला हात पुढें करतांच युरोपांतील रिवाजाप्रमाणें डनबारनें गुडघा टेकून तिच्या मृदुल हाताचें चुंबन घेतलें.

भिंतीच्या कमानींत एक मखमालीचें कोंच मांडलें होतें, त्याकडे बोट करून तिनें डनबारला " आप बैठीये " असें मधुर आवाजानें सुचविलें आणि तो बसल्याबरोबर तीही त्याचे शेजारीं जाऊन बसली. तिनें आपल्या पायानें किंचित अवाज करितांच फिडलची सुरावट बंद झाली. खिडकींतून झीलच्या पाण्यावरून येणारा थंडगार वायु मंद गतीनें आंत प्रवेश करीत असल्यामुळें इतक्या दाट रोषणाईनें वाटणारा उष्मा मुळींच भासत नव्हता. बेगमनें आपल्या स्वागताची पराकाष्ठा केली आहे; उगीच निवाऱ्याची जागा म्हटली तरी पण तेथील थाट उत्तम

बंगल्याच्याही वर होता; अशा विचारांत डनबार असतां बेगम म्हणूं लागली कीं, " आपली जितकी सोय करावयास पाहिजे तितकी आमच्या हातून झाली नसेल तर त्याबद्दल माफी असावी. आपल्या आगमनाची सूचना फारच थोड्या अवकाशाची मिळाल्यामुळें सर्व तरतूद न राहणें अपरिहार्य होतें. " तिला पुरतें बोलूं न द्यावें म्हणून डनबार कितीदां तरी " असें कांहीं झालें नाहीं; मी इतक्या लांब येऊनहि आपल्या स्वागतानें माझा सर्व शीण परिहार झाला, आणखी अधिक मला काय हवें होतें ? " असें म्हणाला. पण तिनें आपलें पहिलेंच बोलणें निरनिराळ्या शब्दांनीं पुनः पुनः सांगण्याचा क्रम ठेविला. पुढें तिनें एकदम डनबारला विचारिलें, " आपलें लग्न झालें आहे काय ? आपलें वय किती आहे ? " हे प्रश्न इंग्लंडांत निदान पहिल्या भेटीला कोणाहि स्त्रीला विचारितां येत नाहींत किंवा विचारिले असतां तो गैरशिस्त प्रकार समजण्यांत येतो. पण ही बेगम मुसलमान, तेव्हा तिला हा नियम लावणें बरोबर नाहीं, असा विचार करून त्यानें तिला उत्तर देण्याचें ठरविलें. थोडेसें हंसून तो म्हणाला, " बेगमसाहेब, अद्याप माझें लग्न झालें नाहीं. माझी बायको होण्यास योग्य अशा स्त्रीची व माझी गांठ अद्याप पडली नाहीं. "

बेगम आश्चर्यानें म्हणूं लागलीः-" काय म्हणतां तरी हें ? तुमचें लग्न अजून झालें नाहीं ? आणि तुमच्या मनाजोगी स्त्री सांपडत नाहीं ? तर मग तुमच्या पसंतीची कसोटी, तुम्हीं ठरविलेल्या योग्यतेचें, गुणांचें प्रमाण फारच कठीण किंवा मोठें असलें पाहिजे. पण तुमचे लग्नाचें वय होऊन गेलें; आणि आपल्या कुळाची, आपल्या वंशाची, आपल्या घराण्याची परंपरा अक्षय पुढें चालावी म्हणून तुम्हीं आतां लवकर लग्न करणेंच भाग आहे. पण काय हो, तुमच्या धर्माची अशी कांहीं अट आहे काय, कीं तुमच्या जातीचीच बायको तुम्हीं केली पाहिजे ? "

" छे छे, तसें कांहीं नाहीं. ज्या स्त्रीवर माझें प्रेम बसेल, तिच्याशीं लग्न लावायला आमच्यांत जातीबितीची दुसरी कांहींच अडचण मानीत नाहींत. "

त्यावर बेगम कांहींच बोलली नाहीं. तिनें टाळी वाजविली, त्याबरोबर

दोन उंची पोषाख केलेल्या दासी आल्या. त्या प्रत्येकीच्या हातांत एकेक सुवर्णाचें ताट असून एकीच्या ताटांत नाना प्रकारचे साखरेचे पदार्थ ओळीनें मांडून ठेवलेले होते, आणि दुसरीच्या हातांतील ताटांत दोन काफीचे पेले होते. त्यांनीं एक लहानसें मेज उचलून आणिलें आणि तें कोचाजवळ मांडून त्यावर दोन्हीं ताटें ठेविलीं, आणि त्या दोघी निघून गेल्या. आपल्या शेजारीं बसलेल्या सुंदर युवतीबरोबर आपण गोड भाषण केलें नाहीं, आणि बळेंच थोडीशी उल्हसित वृत्ति ठेवून तिची थोडीबहुत मर्जी राखिल्यापुरतें कांहीं केलें नाहीं, तर आपल्याकडे कृतघ्नपणा येईल, असें डनबारच्या मनानें घेतलें होतें. जिनें येवढा आपला पाहुणचार केला, तिच्याशीं संकोच ठेवण्यानें आपण तिच्या उपकारांतून उतराई होणार नाहीं. तिच्या थोडेसें मर्जीनें घेण्यांत आपलें कांहीं खर्च होत नाहीं, उलट हिच्या सहज प्रश्नास उत्तरें सरळ दिल्यास तिच्याशीं एक प्रकारचा स्नेहही होईल, असले विचार त्याच्या मनांत आले. म्हणून त्यानें तिला एकदम झिडकारून दिलें नाहीं; परंतु पुढें पुढें ही गोष्ट भलत्याच थरावर जाऊं लागली. ती बाई कामातुर झालेली स्पष्ट दिसत होती. पण तिच्या रूपाला व ऐश्वर्याला भुलून तिचें आपण दास व्हावें, आणि तिच्या मुखकमलावरील प्रेममाधुरी चाखण्याविषयीं आशक्त बनून भृंगाप्रमाणें तिच्या चरणीं लोळण घेऊन तिची कामेच्छा पूर्ण करण्यास तयार व्हावें असा तिचा हेतु असेल, असें डनबारच्या स्वप्नींसुद्धां आलें नसेल.

मध्यंतरीं त्या दासी आल्यामुळें ह्यांचें बोलणें तसेंच अर्धवट राहिलें होतें, तेंच आपण पुढें सुरू करीत आहों, अशा बहाण्यानें बेगम म्हणाली:-"हं! आपण काय म्हटलं ? तुमचं प्रेम बसेल, तिच्याशीं तुमचं लग्न होतं; होय ना ? असंच ना ? पण प्रेम म्हणजे काय ?"

डनबारला आतां कांहीं वेळ स्वस्थ बसणेंच भाग झालें. क्रीन्सी व फरेलची ओळख झाल्यापासून प्रेम म्हणजे काय आणि तें कसें असतें, हें आपण सहज सांगूं असें त्याला वाटत होतें. परंतु आतां त्या शब्दांची व्याख्या करण्याचीच पाळी आली तेव्हां तो गोंधळून गेला, त्याला एकदम उत्तर देतां येईना. तो कांहीं वेळ विचारांत गढून गेला. पण आतां मुकाट्यानें किती वेळ बसावयाचें, म्हणून तो बोलूं लागला—"प्रेम म्हणजे

एक प्रकारची विकारवश कामुक मनोवृत्ति आहे, त्यायोगानें आपल्या हृदय-कोशाला आंदोलन मिळत असतें, मनामध्यें धगधगीत ज्वाला उत्पन्न होऊन ती हृदयाला जाळीत सुटते व दोन प्रेमी जीवांची एक प्रकारची एकतानता –हृदयग्रंथि—"

"हंः हंः आलं माझ्या लक्षांत. पण असलं प्रेमसुद्धां माझ्यासारखीला अगदींच फिकं वाटतं. माझं प्रेम म्हणजे सर्वांगाची लाही करून सोडणारा, रोमरोमांच्या ठिकाणीं अदृश्य प्रकारानें जाळणारा अग्निच पाहिजे ! ज्या कोणाच्या हृदयांत माझ्याविषयीं प्रेम उत्पन्न होईल, त्यानं आपलं सर्वस्व मला अर्पण केलं पाहिजे. माझीच गोष्ट घ्याना, मी आपले प्राण, तन-मन-धन सर्व कांहीं त्याच्या चरणीं अर्पण करण्यास तयार आहें. माझ्या प्रेमौघाचा, माझ्या प्रीति-नदीचा लोंढा इतका धों धों करीत फोंफावत जाणार कीं, त्याच्या जोरापुढें धर्माची किंवा समाजाची, चालीरीतीची, कशाचीही आडकाठी, कसलाही बांध, धक्का, प्रतिबंध करूं शकणार नाहीं ! असो. मी आतां असे डोळे धरते, आणि आपण माझ्याकडे पहा; म्हणजे तुम्हांला त्यांत काय दिसत आहे तें समजेल. हंः असे उभे रहा. नीट पहा माझ्या डोळ्यांत."

डनबार उठून त्याप्रमाणें पाहूं लागला, तों जादूमय नेत्रांत जणूं काय मदनज्वाला धगधगत होती, व ती पहातांच त्याची अगदीं गाळण उडून गेली, आणि आतां इथून आपला पाय धडगतीनें कसा निघतो ह्याची त्याला पंचाईत वाटूं लागली. कोचावरून उठून तिच्याकडे पहात पहातच त्यानें तिच्याशीं बोलणें सुरू केलें. तो म्हणालाः—"बेगमसाहेब, काय सांगूं आपल्याला ! ह्या तुमच्या नेत्रांत प्रत्यक्ष अग्नीची ज्योत मला दिसत आहे. ज्या कोणावर तुमचें प्रेम बसलें असेल, त्या व्यक्तीचें चिंतन तुमच्या हृदयांत घोळत असलें पाहिजे; माझी स्वतःची स्थिति निराळी आहे. मला असला हा आवेग येणें शक्य नाहीं. कारण इतक्या प्रकारचें सर्वग्रासी प्रेम करण्या-पुरता रिकामा वेळच मला नाहीं. मी कांहीं कामानिमित्त इकडे आलों आहें, आणि तें काम थोडेंबहुत होतांच मी लगेच स्वदेशीं जाणार आहे म्हणतों. रात्र फार होत चालली, यासाठीं मला आपण निरोप द्या. पुनः पुनः आपल्या पाहुणचाराबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं. आपण मला किती आभारी केलें आहे हें कितीदां जरी

बोलून दाखविलें तरी मला पुरेसें होत नाहीं. ”

हें ऐकून बेगमही कोचावरून उठली. ह्या वेळीं तिच्या गालावरील लाली फार नाहींशी होऊन तेथें पांडुरतेनें आपला अम्मल बसविला होता. ती म्हणाली:—“ बरं तर, पण एकदां मला आपला हात पाहूं द्या बरं. ”

त्यानें कांहींशा थट्टेच्या आवाजानें म्हटलें——“ हीहि विद्या आपण शिकलां आहां वाटतें ? सामुद्रिक ज्ञानानें माझें दैव आपण सांगणार कीं काय ? ”

तिनें उत्तर केलें, “ होय, पाहूं काय होतें तें ? माझा एक भाई आहे, तो लांब तिकडे उत्तरेस काश्मीरकडे असतो. तो फार मोठा अवलिया बनला आहे. तो परलोकच्या आत्म्यांबरोबर बोलत असतो. त्यानं मला एकदां असं म्हटलं कीं, अम्मा, तुझ्या दैवासंबंधानं कांहीं विशेष महत्वाची गोष्ट समजून घ्यावी, असं कधीं तुझ्या मनांत आलं तर मी ती सांगून देईन. त्या वेळीं मीं त्याला म्हणालें कीं, समजा, तसा समय आला आणि आपण माझ्यापासून फार दूर अंतरावर असलां, तर मग ही गोष्ट कशी साधणार ? तेव्हां त्यानं मला सांगून ठेवलं कीं, बेटा, अशा वेळीं माझी समक्ष गांठ पडण्याचं कारण नाहीं. तशी संधि आली असतां तूं माझं स्मरण कर म्हणजे झालं. म्हणून म्हटलं कीं, आपला हात मला पाहूं द्या. तुमच्या हस्तावरील रेषेवरून तुमच्या नशीबीं पुढें काय आहे, तें तरी समजून घेऊं द्या. हं, अधिक कांहीं बोलूं नका. आटपा, नाहीं म्हणूं नका. ” इतकें बोलून तिनें लगेच डनबारचा हात धरिला आणि तो उताणा ताठ धरून त्याच्याकडे ती एकसारखी नजर लावून पाहूं लागली. तिच्या मुखावर प्रथम गांगरल्याचें चिन्ह दिसूं लागलें आणि नंतर ती अगदीं काळवंडून गेली. त्यानंतर तिच्या ओठावाटे कांहीं शब्द येऊं लागले, परंतु ते ती फार लांबून बोलत असल्यासारख्या खोल आवाजानें बाहेर पडत होते. “ हे पहा, हे दोन आत्मे आकाशांत उडत चालले आहेत; आणि ह्या मनुष्याचा हात माझ्या हातांत आहे, त्याचा आत्मा ह्या दोहोंपैकीं एक आहे. अग बाई, बाई ! काय ही अंधेरी ! मला कांहींच दिसेनासं कसं झालं ! अगदीं काळोख, काळोख ! या अल्ला, अल्ला ! ” तिच्या मुखावर दुःखाचा आवेग स्पष्ट दिसत होता. तिनें एकाएकीं मूर्च्छा आल्यासारखें करून डनबारच्या अंगावर झोंक

टाकला आणि ती पडेल ह्या भीतीनें तिला सांवरून धरणें त्याला भाग पडलें. तथापि सांवरतां सांवरतां त्याजवळच्या धाकट्या मेजाला धक्का लागून तें खालीं पडलें आणि काडकन मोडलें. हा आवाज होतांच दोन दासी आंतमध्यें आल्या आणि डनबारच्या अंगावर बेगम पडली आहे, तिला तो सांवरीत आहे किंवा त्यानें तिला आपल्या बाहुपाशांत बद्ध केली आहे, हें त्यांच्या लक्षांत येण्याजोगें नसल्यामुळें त्यांनीं आपल्या डोक्यावर तिरपे हात धरून इकडे पाठ फिरविली. तें पहांताच त्यांचा भावार्थ डनबारच्या लक्षांत आला आणि त्यानें त्यांना जवळ हाक मारिली. तो म्हणाला, " थांबा थांबा, बेगमसाहेबांना जबर मूर्च्छा आली आहे. "

त्यांनीं आश्चर्यकारक मुद्रेनें किंचित् विलक्षण आवाज केला आणि त्या दोघी पळत गेल्या; डनबारला वाटलें कीं, आतां काय करावें ? पण इतक्यांत त्या पाण्याचा पेला भरून घेऊन आल्या. त्या जवळ येतात तों बेगमनें डोळे उघडले आणि शुद्धीवर आल्यासारखें करून हास्यमुखानें त्याच्याकडे पाहिलें. पण त्या ठिकाणीं अगदीं गारवा आहे असें लक्षांत येतांच ती त्या दोघींपैकीं एकीला म्हणाली, " चांदबिबी, अबी मेरा अच्छा हैय. जा तुम्ही. मला तुमची जरूर लागल्यास मी हांक मारीन. "

डनबारच्या मनांत विचारांचें काहूर उठलें. आपण हा काय भलताच प्रसंग आपल्यावर ओढून घेतला ? ह्या स्थितींत आपणांस पाहिल्यामुळें त्या दोघी दासींच्या मनांत काय वाटलें असेल, आणि आपल्या येथें येण्याचा भलताच अर्थ होण्याचा किती संभव आहे, वगैरे सर्व गोष्टी त्याच्या लक्षांत येऊन चुकल्या. त्याच्या मुखाकडे एकसारखी बेगम पहातच होती, तेव्हां तिनेंही ह्या गोष्टी तर्कानें खोळाखिल्या असाव्या. ती म्हणाली:—" आपण कांहीं काळजी करूं नये. मी त्या दोघींना सर्व कांहीं नीट समजावून सांगेन. पण त्याला आपण काय करणार ? माझ्याकडूनच मूर्खपणा झाला. मला एकाएकीं येवढी मूर्छाच कशी आली कोण जाणे ! तुमच्या दैवाचा अर्धा भागही मला पाहण्यास सांपडला नाहीं; आणि तो समजून घेण्याची पुनः संधि येण्याचा संभव नाहीं. काय करूं ? ही अशी घेरी, अंधेरी आली नसती..."

" पण आपल्याला काय समजलें तें मला कळविण्यासारखें तरी आहे काय ? "

"मी कांहीं असली अर्धवट गोष्ट सांगणार नाहीं. अगोदर ह्मणाल तर मलाच कांहीं नीटसं समजलं नाहीं. पण येवढं मात्र मला कळलं कीं, आपल्या मनांत परत विलायतेला जायची जी घाई आहे, तसं आपलं कांहीं जाणं होणार नाहीं. कदाचित परत आपलं जाणं होणारही नाहीं. पण मला ह्याबद्दल खात्रीनं कांहीं सांगतां येण्याजोगं कळलंच नाहीं. हें मात्र खरं कीं, आपल्यावर फार मोठं संकट येणार आहे. आणि त्या समयीं ह्या दासीच्या हातून आपली अल्पस्वल्प कामगिरी होणार आहे. ही पहा ही माझ्या बोटांत आंगठी आहेना, ही आपण आपल्याजवळ ठेवा." असें बोलून तिनें आपल्या बोटांतलि ती चमकणारी हिऱ्याची आंगठी काढून डनबारपुढें धरिली, आणि म्हणाली, "तुमच्यावर जर कांहीं भयंकर प्रसंग आला आणि त्या वेळीं आपल्याला कोणाच्या मदतीची जरूर पडली, तर कोणातरी विश्वासू मनुष्याबरोबर ही आंगठी मजकडे पाठवून द्या. म्हणजे तेवढ्यावरून मी सारं समजेन."

डनबारला फारच आश्चर्य वाटलें होतें. तो त्या आंगठीकडेच पहात राहिला होता, आणि ती घ्यावी किंवा न घ्यावी ह्याबद्दल त्याच्या मनाला हेलकावे बसत होते. शेवटीं ती आंगठी हातांत घेऊन तो त्या खड्याकडे एकसारखा बघत होता, आणि बेगमला म्हणाला, "ह्या आंगठीवरचें नक्षीकाम फारच सुबक आहे; ही तयार केल्याला किती तरी वर्षें झालीं असतील, नाहीं बरें?"

"हां जी, बराबर. ही आंगठी इतर साधारण आंगठ्यांच्या प्रकारांतली नाहीं. माझे भाई अवलिया म्हणून मीं मघाशीं सांगितलें, त्यांनीं ही मला दिली आणि देतेवेळीं मला बजावून सांगितलें कीं, संकटकाळीं ही माझ्याकडे धाडून दे म्हणजे मी सर्व गोष्टी यथास्थित करीन."

"मग ही आंगठी आपण मला कां देतां?"

"मला माझ्या भाईच्या मदतीची जरूर लागणार नाहीं. परंतु माझी मनोदेवता मला सांगत आहे कीं, आपणांला तिचें कार्य अवश्य पडेल. मात्र आपण उगीच हट्टास पेटूं नये. म्हणून म्हणत्यें कीं, ती घाला पाहूं अगोदर आपल्या बोटांत. माझ्या देखत घाला! हं, अशी तिला जिवापलीकडे जपा. हरवेल किंवा हयगयीनें कोठें तरी राहील, संभाळा! या आतां. अल्ला तुमारा भला करेगा!"

तिच्या बोलण्याकडे चित्त असल्यामुळें ही कांहीं भलतीच गोष्ट एकदम करील असा अदमास होण्याचा संभव नव्हता. आणि त्यामुळें डनबार अगदीं असावध होता. तिनें एकदम डनबारच्या गळ्याला मिठी घातली आणि त्याच्या भालप्रदेशाचें चुंबन घेतलें. हें इतक्या थोड्या अवकाशांत झालें कीं, तें कागदावर लिहिण्यांत सुद्धां आमचे अधिक सेकंद खर्च झाले असतील. आणि इतकें करून बेगम पळतच त्या कुसुंबी पडद्याच्या आंत गेली व दिसेनाशी झाली. त्या आरसे महालांतून बाहेर कोणीकडे जावें, हें डनबारला ठाऊक नसल्यामुळें असेंच आपणास येथें किती वेळ तिष्ठत बसावें लागणार, ह्याबद्दल त्याचा विचार चालला होता. इतक्यांत बेगमनें जिला चांदबिबी अशा संबोधनानें हाक मारली होती, ती दासी त्या महालांत येऊन उभी राहिली आणि किंचित् रोषयुक्त मुद्रेनें म्हणालीः–" अहो साहेब, आपल्यासाठीं बाहेर मोटारगाडी वाट पहात आहे ना?" असें बोलून ती दाराकडे चालूं लागली. तेव्हां तिच्या मागोमाग डनबार निघाला. तो मागोमाग येत आहे किंवा नाहीं एवढें पहाण्यापुरतीच ती कित्येक वेळां मागें मुरडून पाहून पुढें चाले, परंतु डनबारला तिच्याशीं कांहीं बोलावयास सांपडूं नये अशा बेताचें अंतर तिनें आपल्यामध्यें व त्याच्यामध्यें ठेविलें होतें. जिना उतरून बागेंतून पलीकडच्या थोरल्या दरवाज्यापाशीं गेल्यावर ती उभी राहिली. तेव्हां डनबारला दम धरवेना. तो तिला म्हणालाः—" चांदबिबी, माझ्या एका प्रश्नाचें येवढें आपण उत्तर द्याल काय? तुमच्या मालकिणीची प्रकृति आतां बरी आहे ना?" तिनें संतापानें उत्तर केलें. मोठे आले आहेत विचारणारे! मला काय विचारतां! आमच्या मालकिणीची तब्येत बिघडायला आपणच कांहीं तरी तिला केलं असलं, तर मला काय ठाऊक?" तिच्या उद्दामपणाचा त्याला राग आला, आणि तो म्हणालाः–" कोणाला उत्तर देतेस हें? आपली पायरी संभाळून तोंड आवर. जरा गोड व मृदु शब्दांनीं बोलायला तुला शिकवलेंच नाहीं काय?"

" खरंच ग बाई– मोठे आले आहेत शिकवायला! (वेडावून) म्हणे जरा गोड आणि मृदु बोलायला येत नाहीं कां? जशास तसं.–माझ्या मालकिणीशीं तसलंच गोड आणि मृदु आपण बोललां असतां तर त्या कां आतां रडत बसल्या असत्या?"

" मी तर तिला कांहीं रडविण्यासारखें बोललों नाहीं!" " हा मूर्ख!–माझ्या मालकिणीचें प्रेम आपल्यावर बसलं आहे, हें तुला कसं कळलं नाहीं ? तिला जर उलट तुम्ही म्हणतां कीं, मी तुमच्यावर प्रेम करितों; तर–"

" मी तर बुवा कांहीं बोललों नाहीं. तिनेंच माझा हात पाहून माझ्या दैवांतल्या गोष्टी पाहिल्या; आणि माझ्या तळहाताकडे पहातां पहातां—"

" अस्सं, अस्सं. हें नव्हतं बाई मला ठाऊक! तर मग तुमच्याकडे ह्याचा फारसा दोष असेल असं वाटत नाहीं. माफ करा मला. माझी माझ्या मालकिणीवर अत्यंत भक्ति असल्यामुळें तिला जो कोणी दुखवील, तो मला शत्रूसारखा वाटतो. जा–जा, आतां इथून. पुनः मात्र माझ्या मालकिणीच्या वाटेला येऊं नका."

डनबार परत विश्रामबंगल्यांत येऊन पोहोंचला. तों तेथें खाबूर स्वस्थ होता. डनबार आल्याबरोबर खाबूरला सामानाची बांधाबांधी करण्याची घाई करूं लागला. तो म्हणाला—" अरे, असा काय हात जोडून बसला आहेस! ऊठ, आटप लवकर. एक तासाच्या आंत इथून निघून स्टेशनावर गेलें पाहिजे. आणि मग जी गाडी सांपडेल तिनें पुढें परत जाणार."

" पण हुजूर, उद्यां शिकार करायची आहे ना ? तिला पुनः परत येणार कीं काय ? "

" बस बस, अधिक बोलूं नको. मी म्हणतों ना एकदम बंद कर सारें सामान! बस्स. उद्यां मला शिकार करायची नाहीं! चल. समजलें आतां! आटप! "

खाबूरनें ' होय ' म्हणून सर्व बांधाबांधी केली आणि मोटार हाकणारास सूचना देण्यासाठीं तो बाहेर गेला आणि आमची स्टेशनावर जाण्याची तयारी आहे, गाडी घेऊन ये, असें सांगूं लागला.

तो मोटारवाला म्हणाला:—" ह्या आजच्या फेरींत मला खूप मोठें बक्षीस मिळेल अशी आशा होती, ती कांहीं आतां जमत नाहीं. बेगमच्या मनाजोगं कांहीं झालं नाहीं. तिचं ह्यांचं कांहीं सूत जमलं नाहीं. तसं कांहीं जमलं असतं तर मला इतक्या थोरल्या सोन्याच्या मोहरा मिळाल्या असत्या."

खाबूरनें उत्तर केलें–" कोण जाणे काय बिनसलें तें ? कदाचित बेगमसाहेबच आमच्या मालकाच्या पसंतीला आल्या नसतील."

" कांहीं कां होईना ! हें काय आणि तें काय, दोन्हींचें फळ एकच. नवरा मरो कीं नवरी मरो. आमच्यासारख्यांची पोळी पिकली नाहीं, कीं आम्ही दोन्ही वऱ्हाड्यांना शिव्या देणार ! माझं इनाम बुडालं तें बुडालं. तें काय येतंय थोडंच ?"

" दोस्त, संभाळून बोल. जीभ जरा आवर. नाहींतर याद राख, आमचे मालक फार संतापले आहेत, त्यांच्याच हातून कपाळमोक्ष करून घेशील ! "

पण मोटारवाल्याला रिकाम्या हातानें परत यावें लागलें नाहीं. त्याच्या अदमासाबाहेर डनबारनें त्याचा खिसा गरम केला.

# प्रकरण ५ वें,

## डनबारची निराशा.

ह्या शिकारीच्या फेरीवरून परत आल्याच्या दिवशीं संध्याकाळपर्यंत फेरलची गांठ पडली नाहीं. जेवण झाल्यावर नेहमींप्रमाणें डनबार फेरलकडे गेला, तेव्हां पहिला प्रश्न आला तो क्विन्सीकडून. ती म्हणाली:--" शिकार भरपूर मनाजोगी मिळाली वाटतं ? "

" हो बुवा ! पण तुमच्यापर्यंत त्याची वर्दी कशी पोहोंचली ? "

" आज काय जेवणाच्या वेळीं सांजसकाळ सारे पदार्थ चमचमीत ! "

म्हाताऱ्यानें मोठें सद्गदित होऊन डनबारचा हात धरिला आणि इतक्या आवेशानें त्याचें आंदोलन केलें कीं, आज कित्येक दिवसांनीं भेट झाल्या-वरचा आनंद हा असावा, असें पहाणारास सहज वाटलें असतें. पण खरें पाहिलें तर डनबारची गैरहजिरी सारी एक दिवसाची होती. क्विन्सी म्हणाली " काल बाबांनीं खूपच गंमत केली. एखाद्या लाडावलेल्या मुलाच्या संवयीचं माणूस कुठं गांवाला गेलं असलं म्हणजे तें जसं करतं, तसं बाबा करीत होते. त्यांच्या मनास कांहींच येईना. कोणाचं कांहींही करणं त्यांना पसंत पडेना. मग त्यांना काय होत होतं तें देव जाणे ! सगळी आदळआपट चालली होती. "

" असं ! त्यांना जें कांहीं पाहिजे होतें, तें कां कोणीं दिलें नाहीं ? "

हा प्रश्न मुद्दामच डनबारनें केला होता. आपण नसल्यामुळें हें सर्व चाललें होतें हें डनबारला समजलें होतें, पण क्विन्सीचे आणखी कांहीं मधुर शब्द कानीं पडावे म्हणून त्यानें असें ढोंग करून प्रश्न केला. बोलणें संपविल्यावर आपल्या कर्णास पवित्र करणारे उच्चार कसे सांपडणार, म्हणून बळेंच संभाषण लांबविण्याचा त्याचा प्रयत्न होता.

" दुसरं काय असणार ? हुजूरची स्वारी काल उगवली नाहीं, त्यामुळें बाबांना सारा अंधकार पडल्यासारखं वाटत होतं. "

म्हातारा बोलूं लागला:—" होय बुवा, असें झालें होतें खरें! इंग्लंडांत माझे पुष्कळ स्नेही आहेत आणि त्यांपैकीं बरेच तुमच्यासारखे तरुणही आहेत, पण त्या तरुण उमेदवार मंडळीला माझ्यासारख्या अंधपंगू म्हाताऱ्याबरोबर बोलत बसायचा कंटाळा येई. बरोबरच आहे त्यांचें करणें. त्यांना जगाचा अनुभव घ्यावयाचा असतो. त्यांना सर्व गोष्टी नव्या आणि म्हणून मनोरंजक वाटतात आणि त्यामुळें म्हातारपणाची त्यांना बरोबर कल्पना होत नाहीं. त्या कारणानें माझ्यासारख्या जरठाशीं गप्पा मारायला त्यांना कंटाळा येणें साहजिक आहे; पण डनबारसाहेब, तुमची गोष्ट तशी नाहीं. तुमचें सारेंच निराळें. "

" त्यांत काय आहे ? मीं त्यांत काय अधिक केलें ? मला नाहीं का तुमच्यापासून किती तरी शिकावयास सांपडलें ! माझा कांहीं थोडा फायदा झाला नाहीं. आपल्यासारख्या वयोवृद्ध मनुष्याच्या अनुभवाचा लाभ मला झाला तो कांहींच नाहीं वाटतें ? "

म्हातारा बोलूं लागला:—" हें पहा डनबारसाहेब, माझा स्वभाव थोडा अप्पलपोट्या आहे. तुम्हीं माझेजवळ नेहमीं असावें असें मला वाटतें. आतां आपल्याच पोटाची काळजी करावी, आपल्याच सुखाकडे दृष्टि ठेवावी ही चूक आहे असें माझें मला कळतें, पण वळत नाहीं. पुन: आपला मोह पडून दुसऱ्याचें मग काय होईल तें मी विसरतों; पुष्कळ प्रयत्न केला तरी तो मोह अनावर होतो. "

क्विन्सी मध्यें कांहींच बोलली नाहीं. ती एकसारखी खालीं मान घालून स्वस्थ ऐकत होती. तेव्हां तिला कांहीं तरी बोलायला लावावी म्हणून तिला उद्देशून डनबार म्हणाला—" पण माझी गोष्ट कशी झाली आहे पहा !

तुमच्या दोघांच्या संगतीचा लाभ मला मिळत आहे, तेव्हां मी अगदीं रिकामटेंकडा बसून आहें असें दूषण मला कोणालाही लावतां येणार नाहीं. मी आपला कांहींच फायदा करून घेतला नाहीं, असें म्हणायला कोणालाही तोंड नाहीं. पण येवढें खरें कीं, माझें मुख्य काम थोडेंसें मागें पडल्यासारखें झालें आहे. मीं एका मोठया कपटजालांत सांपडलों होतों आणि त्यांतून माझा नीटसा निभाव न लागतां मी कसा तरी पार पडलों इतकीच बहार झाली. असो. आतां मात्र येथें फार दिवस राहून चालणार नाहीं. मीं ज्या कामाला आलों तें मला कसें तरी संपविलें पाहिजे, आणि मग इथें कोण बसतो ? मी आपला परत इंग्लंडला जाईन."

"इंग्लंडला जाणार ? कधीं— ? क्विन्सीचा हात गालाखालून निसटला व तो डनबारच्या गुडघ्याला लागला ! दोघेंही चोरून एकमेकांकडे पाहूं लागलीं. परंतु त्यांनीं एकमेकांची दृष्टादृष्ट होऊं दिली नाहीं. डनबारनें उत्तर केलें, "त्याला फार अवकाश नाहीं. ह्या नबाबाची एकदां भेट झाली कीं झालें अर्धें काम ! फार झालें तर आणखी थोड्या दिवसांनीं पुढें."

क्विन्सी म्हणाली, "मग बाई, बाबांना फारच चुकल्यासारखं होईल!"

म्हातारा एकदम बोलला, "कां ग बाळ असें ? माझें एकट्याचें नांव कां पुढें ? आपणां दोघांना चुकल्यासारखें होईल, असें कां स्पष्ट म्हणेनास ?"

क्विन्सीनें पुनः मान खालीं घालून म्हटलें, "खरेंच गडे, चुकल्येंच मी बोलायला ! आम्हां दोघांनाही अगदीं करमेनासें होईल हेंच खरं. आतां अवकाशही फारच थोडा उरला म्हणावयाचा. नबाब तर येऊन दाखल सुद्धां झाला." हे शब्द कानांवर पडतांच डनबारची जी मुद्रा झाली ती मोठी पहाण्यालायख होती. तो प्रथम अगदीं निस्तेज झाला. तो नबाबाची वाट पहात होता, ही गोष्ट खोटी नव्हे; परंतु नवाब आला ह्या बातमीनें त्याला बरें वाटण्याच्या ऐवजीं दुःखच झालें. आतां नबाब आल्यावर कामाची चौकशी लांबणीवर टाकण्यास सवड राहिली नाही, असें मनांत येऊन तो क्षणभर स्तब्ध राहिला. पुनः आपली व क्विन्सीची गांठ कशानें पडणार, असें त्याच्या मनांत येऊन त्याला गहींवरहि आला.

म्हाताऱ्या फेरलनें ह्या सर्व गोष्टी पहाण्यापेक्षां तर्कानें ओळखून हंसत हंसत तो म्हणाला, "साहेब, हें काय हो ? ही नबाब आल्याची बातमी ऐकून

आपणांस आनंद व्हावयास पाहिजे होता, पण तसें झाल्यासारखें कांहीं दिसत नाहीं ! ”

“ अहो, आनंद होईल कसा ? तुह्मीच सांगा कीं, मला जर ह्यापासून हर्ष झाला, तर मग तुमच्याविषयीं आणि ह्यांच्याविषयीं माझ्या मनांत काहींच पूज्यभाव, आदर नाहीं, असा नाहीं कां त्याचा अर्थ होणार ? कारण असें पहा, ही बातमी म्हणजे माझ्या हिंदुस्थानांतील रहाण्याची मुदत संपल्याची पहिली घंटा झाल्यासारखीच आहे. असो. पण तो नबाब रहातो कोठें ? ”

क्विन्सीनें उत्तर केलें, “ कुठं म्हणजे ? तो आपल्या वाड्यांत. गोमती नदीच्या कांठीं त्याचा राजवाडा आहे. तिथेंच तो राहतो. त्याच्या बेगमला मी भेटून सुद्धां आलें. ”

आतां हा विषय बदलला पाहिजे असें ह्मणून डनबारनें क्विन्सीला विचारिलें, “ तुमचें काम कसें काय चाललें आहे ? त्या बायका तुमचा उपदेश कांहीं ऐकून घेतात कां नाहीं ? ” हें ऐकून म्हातारा हंसूं लागला. ती तर अगदींच लाजून खालीं तोंड घालून बसली व अगदीं रडकुंडी होऊन म्हणाली, “ मी आतां तिकडे जात नाहीं. तो नाद मीं सोडून दिला. ”

तिनें जाणें कां टाकिलें, हें विचारून घ्यावें, अशी डनबारला फार उत्सुकता झाली. तथापि त्यावद्दल त्यानें कांहीं प्रश्न विचारिला नाहीं. क्विन्सी तर कांहींच बोलेना. हें पाहून ह्मातारा आपण होऊनच त्याचें कारण सांगूं लागला. तो ह्मणाला, “ त्या बायकांनीं हिचें बोलणें ऐकून घेतलें नसतें, एवढेंच होतें तरी हरकत नव्हती; पण त्या बस्ताद, हिला दटावूं लागल्या ! ”

तेव्हां बापानें कांहीं तरी सांगण्यापेक्षां आपणच नीट थोडक्यांत सांगून टाकावें ह्मणून क्विन्सीनेंच पुढें सांगण्यास आरंभ केला. “ त्यांच्या रागावण्याला आणि दरडावण्याला मीं दाद दिली नसती. पण काल फारच चमत्कारिक प्रसंग गुदरला. त्यांपैकीं कोणाचे नवरे, कोणाचे भाऊ, कोणाचे दुसरे आप्त वगैरे पुष्कळच पुरुष मंडळी जमून आली, आणि सर्वांनींच तोंडें सोडून मजवर गहजब केला ! ”

डनबार म्हणाला—“ अरेरे ! चुकलेंच सारें. वेळ गेली, आतां काय ? मी त्या वेळीं असायला पाहिजे होतों. मी जर त्या प्रसंगाला हजर असतों—

तर काय सांगूं?"

"हेंच अगदीं क्विन्सी म्हणत होती," असें म्हाताऱ्यानें मध्येंच म्हटलें. तो तिजकडे पाहूं लागला, तिला कसेंसेंच झालें. तेव्हां रागाच्या आविर्भावानें ती बापास म्हणाली–"कायहो बाबा हें? इश्श मेलं!"

म्हातारा म्हणाला—"मी काय खोटें सांगतों? मी आपल्या पदरचें कांहींच बोलत नाहीं. तूंच नाहीं कां मला येऊन सांगितलेंस कीं–"

आतां आणखी आढेवेढे घेतल्यानें कांहीं जमणार नाहीं, असें ध्यानांत येऊन बापाला पुढें बोलूं न देतां क्विन्सी म्हणाली—"साहेब, मीच खरोखर वेडी! माझ्या मूर्खपणाबद्दल तुम्हीं मला माफी केली पाहिजे. तुम्ही एकदां कां–अनेक वेळां–मला मदतीला येतों, म्हणून म्हटलें होतेंत; पण मींच तुम्हांला झिडकारून दिलें. मला वाटलं कीं, मला कोण खातो? मला संरक्षण करायला दुसरं कोणी कशाला पाहिजे? माझं काय कोण करणार? त्याचाच हा परिणाम झाला. काल चांगली माझी कणीक मऊ होण्याची वेळ आली होती." इतकें बोलतां बोलतां तिला रडण्याचा हुंदका आला. डोळे भरून आले, तोंडांतून शब्द निघेना. तिनें आपलें तोंड हातांनीं झांकून घेतलें. थोड्या वेळानें पुनः ती बोलूं लागली:—"मीं घरीं आल्यावर बाबांना सर्व हकीकत सांगितली आणि म्हटलें कीं, आज साहेब माझ्याजवळ असायला पाहिजे होते. ही गोष्ट त्या वेळीं माझ्या मनांत एकसारखी किती वेळ तरी आली असेल. पण बरं आपणच, इथें माझं रक्षण करणारं असं आमच्या ओळखीचं कोणी आहे का?"

पहिल्या वाक्यानें डनबारच्या मनांतील आशेची बी रुजावयास लागून तिला अंकुर येऊं पहात होता. इतक्यांत ह्या शेवटच्या वाक्यानें तो पार होरपळून गेला. एकूण दुसरें कोणी ओळखीचें नाहीं, रक्षण करावयाला कोणी तरी सशक्त मनुष्याची जरूर होती, म्हणून येवढी माझी आठवण का? नंतर डनबारनें निराशेच्या स्वरानें म्हटलें—"आतां काय त्याचा उपयोग? मनाशीं मी बोललों तेंच पुनः एकवार म्हणतों झालें! त्या वेळीं मी हजर असतों तर काय बहार झाली असती! काल त्या प्रसंगीं मला तिथें आणण्यासाठीं कोणीं काय मागितलें असतें तर त्यास तें मीं दिलें असतें. डनबारला आतां पक्कें समजून चुकलें कीं, क्विन्सीचें प्रेम आपल्यावर बिलकूल

नाहीं व तें ह्यापुढें साध्य करणेंहि शक्य नाहीं. ह्यामुळें नवाब आल्याच्या बातमीनें त्याला जितकी खिन्नता प्रथम वाटली होती, तीच आतां बरी वेळेवर आली, असें त्याच्या मनानें घेतलें.

दुसऱ्या दिवशीं उठल्याबरोबर त्यानें प्रथम नवाबाला पत्र लिहिलें. त्याचें उत्तरही तावडतोब आलें. "संध्याकाळीं छत्तर-मंझीलच्या जवळ आपली गांठ घ्यायला मी येतों" असें नवाबानें लिहिलें होतें. ठरल्याप्रमाणें दोघांची गांठ पडली. आपला पूर्वीचा स्नेही फार दिवसांनीं भेटला, म्हणून नवाबानें आपल्याला अत्यंत हर्ष झाल्याचें दाखविलें, परंतु हें सारें दिखाऊ आहे, ही लबाडी आहे, असें डनवारच्या मनांत थोडेंसें संशयाचें पाऊल वाजलें. सारांश, डनवारचा पहिल्या भेटींत ग्रह चांगला झाला नाहीं. नवाबानें एक नौका आणविली, आणि त्यांत दोघे बसले. व त्यांनींच ती वल्हवीत नदीच्या वरच्या बाजूला पुष्कळ लांबपर्यंत नेली; आणि नाव परत फिरविल्यावर तिला नदीच्या ओघाबरोबर हळूं हळूं चालू ठेवून त्यांनीं एकमेकांस आपले वृत्तांत सांगितले. नवाब स्पष्टच म्हणाला कीं, "मी हें इंग्रजी शिकलों नसतों तर बरें झालें असतें; आणि त्यांतही मी विलायतेंत कांहीं दिवस जाऊन राहिलों, ही तर गोष्ट अगदींच चुकली; त्यामुळें हिंदुस्थानांतली कोणचीच गोष्ट मला चांगली दिसत नाहीं. माझी बायको अगदीं म्हणजे अगदीं निरक्षर, ठोंबी, त्यामुळें माझ्या मनास येत नाहीं. माझ्या विचाराशीं तादात्म्य होणारी सहचारिणी मला पाहिजे. ह्या आमच्या लग्नाचे विधि पडले धार्मिक, जखडबंद; ह्यांतून सुटण्याची आशा नाहीं. त्यामुळें मला फार वेडावल्यासारखें झालें आहे. मानसशास्त्राबद्दलच्या शोधाची माझी आवड पूर्वींप्रमाणें कायम आहे, त्यासंबंधानें मी कांहीं महत्वाचा शोध चालविला आहे. पण आमच्या मुसलमानी थाटाच्या बायकोला त्याचें काय होय? आत्मा कशाशीं खातात असेंच ती विचारणार! आणि आमच्यांत स्त्रियांना आत्मा नाहीं म्हणतात, तें तरी ह्या असल्या ज्ञानविहीन पशुतुल्य स्त्रियांच्या उदाहरणांवरूनच कोणीं तरी तर्कशास्त्र लढविलें असलें पाहिजे. आजपर्यंत माझी तिची एकांतांत गांठ नाहीं. मी येवढासा लहान बच्चा होतों तेव्हां माझ्या गळ्यांत ही बेटी अडकवून दिली आहे. लग्नाच्या वेळीं काय तें मीं तिचें मुखावलोकन केलें, त्यानंतर पुन्हां दर्शन नाहीं. या सर्वांच्या

मुळाशीं माझी महत्वाकांक्षा आहे; आणि ती अशी कीं, इंग्रज लोकांपैकीं एखाद्या शिकलेल्या कुमारीशीं लग्न लावावें." डनबारकडून कांहींतरी प्रत्युत्तर येईल किंवा उलट प्रतिपादन होईल, अशा योजनेनें तो थोडासा थांबला. ह्या वेळीं उगीच वाद माजविण्यांत कांहीं अर्थ नाहीं, परंतु उत्तर देणें भाग आहे, असा विचार करून तो म्हणाला:—"नबाबसाहेब, ही आपली आशा सफळ होईल, असें मला वाटत नाहीं. तुम्हीच जरा विचार करून पहा; म्हणजे माझी सूचना तुमच्या लक्षांत येईल. आमच्या लोकांपैकीं एकादी शिकलेली कुमारिका तुमच्याशीं लग्न करण्याला तयार होईल, असें मला वाटत नाहीं. निदान वरिष्ठ वर्गातली तरी मिळणार नाहीं. एखादी हलक्या धंद्यांतली—किंवा भिकाऱ्यांतली म्हणाल—किंवा खालच्या वर्गातली पसंत असेल, तर कांहीं तुमची आशा सफळ होण्याचें चिन्ह आहे!"

नबाबाला हें बोलणें आवडलें नाहीं. तो आपल्या मिशीवर ताव देत म्हणाला—"बरें बरें, दाखवितोंच तर महाराज मी लग्न करून! मग पाहूं. त्या माझ्या बायकोला साऱ्या लखनौंत कोणाची प्राज्ञा आहे नांवें ठेवण्याची ती! सगळ्यांच्या नाकावर टिच्चून चांगली शिकली सवरलेली—तुमच्या इंग्लंडांतली मुलगी—बायको करून आणतों!"

डनबारच्या मानसिक चक्षूपुढें कीन्सी फेरलची मूर्ति दिसूं लागली आणि जों जों विचार करूं लागला तों तों कीन्सीवरच नबाबाचा डोळा असावा असें त्याला वाटूं लागलें. पण म्हाताऱ्यानें तर स्पष्ट सांगितलें कीं, कीन्सीनें नबाबाची चांगली कानउघाडणी केल्यापासून तो तिच्या वाटेला जात नाहीं. तो चांगला शुद्धीवर आहे; आणि पुनः त्यानें तसलें कांहीं बोलणें सुद्धां काढलें नाहीं.

इतक्यांत त्यांची नाव एका सुंदर वाड्याच्या भिंतीच्या कडेनें चालली होती. हा कोणातरी बड्या नबाबाचा वाडा असावा व त्याचा झनानखाना येथें असावा असें ध्यानांत येण्यास कांहींच पंचाईत नव्हती. कारण पुष्कळ जनानी आवाज आणि नानाप्रकारच्या वाद्यांचे शब्द आंतून निघून ह्या दोघांच्या कर्णपथाला विंधीत होते. त्या भिंतीच्या किंवा तटाच्या ह्मणा, दोन्ही टोंकांना कोंपऱ्यांवर बुरुज होते आणि ह्यांची ही नाव एका बुरुजाजवळून सावकाश चालली असतांना, एका सुंदर स्त्रीचें ओझरतें दर्शन

डनबारला झालें. तिनें खिडकींतून बाहेर हात काढला होता असासुद्धां भास डनबारला झाला. ही गोष्ट तो नबाबाला सांगणार होता; परंतु थोडा वेळ तो विचार करीत थांबला; व ह्याबद्दल आपण शहाणपणा केला, असें पुढें ह्मणण्याची वेळ आली.

डनबारकडे वळून नबाब बोलूं लागलाः– " अहो डनबारसाहेब, ह्या वाड्याची इमारत पहाण्यांतच आपली स्वारी गुंगलेली दिसते. हा वाडा कोणाचा असेल ओळखा पाहूं ? अहो! येथें आमची ती लग्न लागलेली बायको–बायको तरी तिला कशी म्हणूं ?–पण ह्मणतों– येथें असते. दोघांचें वय लहान. अहो पोरापोरीं कारभार. आम्हांला त्या वेळीं काय समजत होतें ? लहान मुली बाहुलाबाहुलींचीं लग्नें लावतात, त्यांतलाच हा प्रकार! आमच्या वडिलांनीं त्या निर्जीवांऐवजीं सजीव बाहुल्यांचा विबाह लाविला,"

हें ऐकून डनबारनें आपल्या तोंडांत राहिलेला चिरुटाचा तुकडा तसाच फेंकून दिला, आणि बुरुजाच्या वरच्या खिडकींत नबाबाची बायको ओझ-रती पाहिल्यासारखें वाटत होतें म्हणून, अजून ती तिथें असेल कीं काय, हें पाहण्यासाठीं तिकडे नजर लाविली. ती नबाबाची बायकोच असावी, असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें होतें. नबाबानेंच आयता विषय काढिला, तेव्हां आतां ही संधी बरी आहे, कौन्सीला आपण वचन दिलें त्यांतून मोकळे होण्यास सहज प्रसंग मिळाला, असें पाहून त्यानें आपल्या आवाजांत किंचित खिन्नतेची छटा आणून म्हटलें:– " नबाबसाहेब! मी असें विचारणार होतों– "

नबाबानें त्याला मध्येंच अडवून म्हटलें:–" डनबारसाहेब, तुम्हांला मी साहेब ह्मणतों, हें ठीकच आहे. कारण नुसतें डनबार म्हणायला बरें वाटत नाहीं, पण तुम्ही मला साहेब म्हणण्याचें कारण नाहीं. नुसतें नबाब ह्मटलें तरी चालेल. तुमच्या आमच्यांत इतका भेदभाव उपयोगी नाहीं. लहानपणापासून आपण एकत्र खेळलों, शिकलों, मग इतका आपला स्नेह जमून हा औप-चारिक प्रकार कशाला ? निदान दोघे एकांतीं असतांना तरी असा परकेपणा दाखवूं नये. "

डनबार ह्मणाला, " बरें, तसें कां होईना ? पण मी म्हणत होतों, तें दुसरेंच आहे. ज्या स्त्रीबरोबर एकदा आपलें लग्न झालें, तिच्याशीं जसें

नवऱ्यानें वागावयाचें तसें आपण वागत नाहीं म्हणे ? हें खरें कां ? मी हें प्रथम ऐकलें तेव्हां मला खरें सुद्धां वाटेना ? परंतु आतां तुमच्याच तोंडून निघालें म्हणून— ”

नबाबानें त्याला पुरतें बोलूं दिलें नाहीं. तो म्हणाला, “ मला वाटलेंच होतें, कीं, आतां आमची चांगली झडती आपण घ्याल.पण आपण अगदींच मिळमिळीत प्रश्न विचारलात हा ! झालें का आपलें बोलणें ? तुम्ही इंग्रज लोक असेच. तुमचा स्वभावच हा. कोणी कसली स्त्री असेना ! तिचा पक्ष घेऊन तुम्ही भांडायला उठणारच. पण मी आतां सांगू तुम्हांला? खोटें वाटूं देऊं नका. त्या पोरीला—अहो पोर नाहीं तर काय ? तिला नुक्तेंच कोठें सोळावें वर्ष सरत आहे. त्या पोरीला ह्याबद्दल कांहीं दुःख वाटत असेल तर शपथ ! तिला काय मीं कमी केलें आहे? खाणेंपिणें, होयनव्हे, सर्व यथास्थित आहे. ती मागेल ती वस्तु तिच्या सेवेला हजर आहे. बरें, तिला काडी मोडून द्यायलाही मी तयार आहें. त्यांत कांहीं अवघड नाहीं. आमच्यांत ही काडी मोडून घ्यायला प्रयास पडत नाहीं. दुसरा नवरा करण्याची तिची इच्छा असली तर खुशाल करावा. पाहिजे तर तिनेंच मला काडी मोडून देऊन माझा नवरेपणाचा हक्क झुगारून टाकावा. पण ती कसली वस्ताद ! माझी अन्य जन्मींची वैरीण माझ्या गळ्यांत पडली आहे. तिला ही गोष्ट पसंत नाहीं, आणि तिच्यापेक्षां तिचे आईबाप—पैशासाठीं प्राण सोडणारी मंडळी ! त्यांना माझी ही नबाबी दिसते आहे ना? काडी मोडून दिल्यावर मग कुठली असली चैन भोगायला मिळणार? ते तर असली गोष्ट नुसती काढायला तयार नाहींत. डनबारसाहेब, तुम्हीच याचा न्याय करा, माझ्याकडून आणखी काय होण्यासारखें आहे ? ”

“ सगळें खरें। पण तिला अशी वेगळी कां ठेविली आहे? तुमचें निजणें बसणें तिथें कां ठेवीत नाहीं ? तुम्हांला काय कमी वाटतें ? ती काय कुरूप आहे ? ”

“ छे हो, मुळींच नाहीं. उलट सगळे जण सांगतात कीं, ती परमसुंदर— परीसारखी लावण्यवती आहे; पण नुसत्या सौंदर्याला काय चाटावयाचें आहे ? नुसत्या स्वरूपानें माझ्यासारख्याची तृप्ति व्हावी कशी ? तुम्हीच सांगा बरें, होईल का ? शिवाय सौंदर्याची महती कोठें ? जेव्हां

अशी एखादी सुंदर स्त्री हजारांत असेल तेव्हां ! पण माझ्या दासदासीही अत्यंत रूपवान आहेत. ह्या असल्या स्वरूपाची डोळ्यांना एकदां संवय झाली ह्मणजे त्याचें फारसें कांहीं वाटत नाहींसें होतें. माझा मुख्य मुद्दा निराळाच आहे. हिला बरोबर घेऊन कोठें जाण्याची सोय आहे का ? अगोदर ह्यांचा हा पडदा; आणि त्यांतून माझ्या ओळखीच्या इंग्रज लोकांकडे हिला घेऊन गेलों, तर ही माझी बायको असें म्हणायला मला शरम उत्पन्न होणार. ही आमची गोषाची चाल तर मला मुळींच आवडत नाहीं. इथल्या ह्या क्लबांतल्या मंडळींनीं माझें नांव आपल्या पटांत घातलें आहे, पण तें केवळ शोभेला, माझ्या समजुतीसाठीं. हीच माझी बायको शिकलेली असती तर तिला मी बरोबर घेऊन गेलों असतों आणि मग मला वाटतें, निदान माझी अशी कल्पना आहे कीं, मला त्यांनीं मोठ्या आनंदानें खरोखरीच आपल्यांत घेतलें असतें. म्हणून हा सारा माझा खटाटोप आणि आग्रह-अथवा हट्ट कीं, एकाद्या तुमच्या जातीच्या इंग्रज पोरीशीं लग्न लावायचें ! सारांश काय ? तुम्ही वाटेल तें ह्मणा —हंसा; मला वेडा ह्मणा. तुमच्या ह्या इंग्रजी विद्येचा हा परिणाम. तिनें माझी विचारक्रांति होऊन मला भलताच नाद लावला. ह्मणजे झालें काय अखेर ? माझा देह हा असा इकडचा राहिला. तरी मी सर्व पोषाख इंग्रजी करून सर्व जुन्या चाली व समजुती फेंकून दिल्या. पोषाख रीतभात सर्वांतही तुमचें अनुकरण केलें तरी तुमचे इंग्रजलोक मला पहिल्या प्रमाणेंच दूरदूर ठेवितात, आपल्या घरीं मला बोलावीत नाहींत; आपल्या सामाजिक समारंभांत मला निमंत्रण पाठवीत नाहींत. पहावें तर सगळीकडे टाळाटाळी चालते. ह्या देहांत, ह्या रक्तमांसांत, ह्या माझ्या रंगांत मला बदल करतां येणें शक्य नाहीं; त्यामुळें हा जन्माला आला तसाच रहाणार, परंतु माझा अंतरात्मा, जीवात्मा पूर्णपणें अस्सल इंग्रज बनला आहे. कोण जाणे कीं, ह्या माझ्या एकंदर मानसिक प्रकारावरून मी अन्य जन्मीं केव्हां तरी इंग्रजच होतों कीं काय ? अगदीं संभवनीय आहे, एरवीं अशी बुद्धि मला कां व्हावी ! ”

नवाबानेंच बोलण्याच्या ओघांत विषय बदलला हें पाहून, डनबारला बरेंच वाटलें. आत्मा अमर आहे, देहाव्यतिरिक्त त्याला रहातां येतें, अशी दुसरी योनि आहे, पिशाच्चांशीं आपल्याला बोलतां येईल, वगैरे गोष्टी

त्याला थोड्याबहुत खऱ्या वाटत होत्या; तथापि आत्मा पुन्हा जन्मास येतो, किंवा एखादा मनुष्य झालेला जीव, पुनः पशुपक्षी वगैरे क्षुद्र योनींत जन्माला जातो; किंवा हिंदूंप्रमाणें, जीवाला चौऱ्यांयशीं लक्ष योनीरूप संसृतीचा पिंगा-चक्र फिरत बसावें लागतें, ह्याबद्दल त्याच्या मनाची पक्की खात्री झालेली नव्हती. म्हणून त्यानें नबाबास विचारिलें–" असं काय ? मागच्या जन्मीं इंग्रज असून ह्या जन्मीं मुसलमान तुम्ही झालांत, म्हणजे तोच जीवात्मा पुनः जन्माला आला; ही गोष्ट तुम्हांला खरी वाटते तर मग ?– "

नबाबानें आश्चर्यानें म्हटलें—" म्हणजे ! तुमची खात्री झालेली नाहीं का ? अरेच्या ! ह्या बाबतींत इतका पुरावा असूनही तुम्हांस खरा वाटेना, तेव्हां काय म्हणावें ? ह्याबद्दल कसा काय पुरावा मिळतो ह्याचा विचार करा बरें ! स्वप्नांत आपला देह एका जागीं बिछान्यावर पडलेला असून आपण भलत्याच जागीं गेल्यासारखें वाटतें. पूर्वी कधीं पहाण्यांत न आले-ल्या लोकांची गांठ पडून त्यांच्याशीं भाषण-प्रकार घडतो; असला अनुभव तुम्हांला आलेला आठवतो का ? पुनः त्याच स्वप्नांतल्या स्वप्नांत त्या लोकांची पूर्वी कधीं गांठ पडल्यासारखें वाटतें, त्याच जागीं पूर्वी केव्हां तरी आपण गेलों होतों असें स्मरण येतें; असा कधीं प्रकार तुमच्यासंबंधानें घडला नाहीं काय ? सारांश, हे सर्व आपल्या पूर्वजन्मांतील संस्कार असून त्यांची आपणांस विस्मृति झालेली असते. एखादे वेळीं फोटो काढून त्याची कांच कोठें तरी तशीच पडून रहावी, आणि अनेक मनोवृत्तीच्या चालनांत त्या कांचेवर ह्या वृत्तीच्या प्रकाशानें चित्र निघण्याची क्रिया घडावी व पाहूं जावें तों दुसऱ्या कागदावर तें चित्र उमटलेलें ! आणि मग ह्या कार्या-वरून त्या निगेटिव्ह ( फोटो घेतलेल्या ) कांचेचें कारण लावीत बसावें, तसा हा प्रकार आहे. डनबारसाहेब, तर मग आत्मा अमर आहे, ह्या देहाबरो-बरच त्याचा नाश होत नाहीं, इतका तरी आपला विश्वास आहे ? का तोही नाहीं सांगा पाहूं ? "

" हाच प्रश्न सोडविण्यासाठीं कांहीं माहिती गोळा करावी, हीच काम-गिरी पतकरून मी मुद्दाम इकडे आलों आहें. आत्मा मरत नाहीं, हें मला कबूल आहे, पण त्याला पुनः दुसरा जन्म येतो, हें मला खरें वाटत नाहीं. एकच जीवात्मा पुनः पुनः जन्मास येतो, ह्याचा प्रत्यक्ष पुरावा मला अद्याप

पाहाण्यास मिळाला नाहीं, आणि अनुमानानें हा सिद्धांत ठरविण्याला सबळ कारणेंही कोणीं मला दाखविलीं नाहींत."

"हेंचसें काय, ह्यापेक्षांही चमत्कार वाटण्यासारख्या गोष्टी मी तुमच्या प्रत्यक्ष अनुभवाला आणून देतों. थांबा! ह्या जीवात्म्याला देहांतून बाहेर पडतां येतें आणि मृत्यूच्या जबड्यांत न जातां म्हणजे मृत्यूनंतर काय होतें त्याचा अनुभव येण्याला आपण मरून न पाहतां, ह्या मृत्यूरूपी सार्वजनिक दरवाजानें आंत न शिरतां, परलोकांत, अदृष्ट लोकांत, पिशाच किंवा पितर राहतात त्या स्थळीं जाऊन परत येतां येतें, अशी माझी तर पक्की खात्री झालेली आहे."

डनबार म्हणालाः–"हे सर्व तुमचे वेडेवाकडे तर्कच ना! ह्या असल्या अनुमानांत पुष्कळ चुका होण्याचा संभव असतो. असलें विपरीत अनुमान आणि अज्ञान किंवा मूर्खपण ह्या सर्वांची मी एकाच सदरांत गणति करतों; आणि असल्या शेकडों पुराव्यांनीं माझ्यासारख्या दीर्घशंकेखोर माणसाची खात्री होणार नाहीं. ज्या विषयाचें आपल्याला ज्ञान नाहीं, अशा विषयावर एक सोडून शंभर मनुष्यांनीं सांगितलेला खुद्द स्वतःचा अनुभव असला तरी ह्या पुराव्याला मी कांहीं महत्व देणार नाहीं."

"पण ज्यानें त्या विषयाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे, त्याचा पुरावा तर खरा समजाल ना? असाच इसम मीं तुह्मांला दाखविला तर? आपण लहानपणीं एका फकिराकडे जात असूं, तो तुम्हांला आठवतो काय? तो तर तुमच्या ओळखीचा आहे ना? तो ह्मातारा अवलिया—"

"हो, आठवतो म्हणून काय विचारतां? पण तो आतां फारच वृद्ध झाला असेल. आपण त्याच्याकडे जाऊन बसत होतों, त्या वेळेस त्याचें वय ऐंशीपेक्षां अधिक होतें."

"तो आहे तसाच आहे. तो मरणार कसा? त्याच्या मनांत आलें कीं, तो हें जीर्ण झालेलें शरीर टाकून देईल आणि नव्या एखाद्या शरीरांत शिरेल म्हणजे झालें. आपला जुना कोट टाकून आपण नाहीं का नवा घालीत? त्यांतलाच प्रकार हा!"

डनबारनें अमीराच्या पाठीवर थाप मारून म्हटलें–"वाहवा! मग बहार झाली बुवा! अमीर, आतां तुझा हेतु पूर्ण व्हायला काय हरकत आहे सांग

पाहूं ? ही तुम्हांला छान संधि आली आहे. ही दवडूं नका. तुमच्या जातभाईंचा तुम्हांला कंटाळा आलाच आहे, मग त्याच्याकडून येवढें करून घ्या म्हणजे झालें. त्याला म्हणावें कीं, एखाद्या इंग्रज गृहस्थाच्या शरिरांत माझा आत्मा घालीनास तेवढा ? ”

हें सर्व डनबार सहज थट्टेनेंच बोलत होता; पण तें अमीराच्या वर्मी झोंबल्यासारखें झालें. आपल्या मनांतले विचार त्याला समजले कीं काय अशा भीतीनें तो गांगरून गेला; त्याचें तोंड म्लान होऊन पांढरेंफिकट पडलें. दिवस अस्ताला चालला होता, पण ह्या वेळीं अमावास्येचा काळोख असता तर बरें झालें असतें असें अमीराच्या मनांत आलें. अमिराला डनबारकडे पाहाण्याची छाती होईना; त्याची दृष्टि चंचल व रडकुंडी झाली. डोळे ओढल्याप्रमाणें किंवा तारवटल्यासारखे होऊन तो कांहीं तरी निमित्तानें त्याच्यापासून आपला हा विकार लपवीत आहे हें डनबारच्या लक्षांत आलें. परंतु इतके खोल विचार ओळखण्याची कला डनबारला अवगत नसल्यामुळें त्याला हा असा काय करीत आहे असें वाटलें; पण त्यानें त्याबद्दल प्रश्न केला नाहीं. अमीरानें मोठ्यानें हंसून हें सर्व लपविण्याचा यत्न केला. तो चमत्कारिक आवाजानें ओरडून म्हणालाः–“ भलतेंच काय हें बोलतां! जरी मला विलायती बायको पाहिजे, तरी माझे जातभाई मला अगदीं नकोसे झाले नाहींत कांहीं! शिवाय सर्व इंग्रजांवर तरी माझें प्रेम तितकें आहे कुठें ? मला दुसऱ्या कशाचें कांहीं वाटत नाहीं, आमच्या घाणेरड्या चालीरीती, कुलाचार, समजुती ह्या काय त्या मला नकोशा झाल्या आहेत. साहेब ! पहा पहा आपण कुठें आलों तें. हा पूल आहे का तुमच्या ओळखीचा ? आणि तो पाहिला वृद्ध फकीर ! त्या कित्येक युगाच्या पूर्वीच्या वडाच्या झाडाखालीं बसलेला आहे आपला ! काय, आहे का मर्जी ? यायचें आहे का त्याच्याकडे ? ”

डनबारनें उत्तर केलें:—“ हो यायचें तर ? अहो, आपण बोलायला आणि त्याची आठवण व्हायला आणि त्या झोंपडीपाशीं यायला कशी गांठ पडली पहा ! मला तर त्याचा बराच उपयोग होईल. आपल्या मंडळाला ह्याच्यापासून माहिती पुष्कळच मिळेल. मग इथेंच कार्य झाल्यावर आणखी दुसरीकडे जाण्याची आपोआप दगदग मिटली. पण हा कांहीं मदत करील

का ? कां नुसताच डोलारा ! "

" करील तर ! चला, आपण आपली नौका किनाऱ्याला लावूं. तें पाहिलें का एक झाडाचें खोड, त्याला नाव बांधून टाकूं म्हणजे तिची काळजी उरली नाहीं. कशी सोय पण नामी सांपडली ! "

# प्रकरण ६ वें

## ....जीवात्म्याचें दर्शन–अनुभव.

फकिराची खोंपटी नदीच्या उत्तरेच्या कांठाला असून ती, वेळूच्या कामट्या, पानें आणि गवत घालून केलेल्या छपराची बनविलेली होती. झोंपडींत सामान कांहींच नव्हतें, इतकेंच नव्हे तर त्या फकिराला अंग आडवें करण्यास घड चटईसुद्धां नव्हती. झोंपडीजवळच एक मोठें वडाचें झाड होतें. ह्या झाडाविषयीं हिंदु लोकांस फार पूज्यता वाटते. वटसावित्रीच्या दिवशीं सवाष्ण बायका वडाची पूजा करितात, आणि त्यावर ब्रम्हा, विष्णु, महेश ह्या तिन्ही देवांचा निवास असतो, अशी त्यांची समजूत आहे. काशीयात्रा करावयास गेलेल्या लोकांनीं गयेस अक्षय्य वट वृक्षाच्या पारावर पितरांना पिंड दिल्याशिवाय त्यांची यात्रा परिपूर्ण होत नाहीं. संसारवृक्षाला ह्या झाडाचीच उपमा भगवद्गीता वगैरे ग्रंथांतरीं दिलेली आहे. असो. ह्या वडाच्या झाडाखालीं एक देवीचें लहानसें देऊळ होतें. देवीची मूर्ति ओबडधोबड होती, परंतु ती सर्व शेंदुरानें माखल्यामुळें सगळी सारविल्यासारखी झाली होती. तथापि तिची पूजा करण्यास, दर्शनास वगैरे फार लांबून लोक येत असत. परंतु हा फकिर कधींही त्या देवीकडे ढुंकून सुद्धां पहात नसे. तिची पूजा, तिला नुसता नमस्कार सुद्धां त्यानें कधीं केला नाहीं. कोणी ह्मणत कीं, हा फकीर मुसलमान असल्यामुळें हिंदूंच्या देवांस तुच्छ मानतो; कोणी म्हणत कीं, त्याला मूर्तिपूजा आवडत नसेल; कांहीं जण म्हणत की, योगी लोकांना हिंदूंच्या तेहतीस कोटी देवांची थट्टा वाटते; आणि कांहीं लोकांना वाटे कीं, हा फकीर स्वतःच देव झाल्यामुळें दुसऱ्या देवांचा त्याला हेवा वाटत असेल. तथापि इतकी यात्रा देवीच्या दर्शनाला जमत असतां आणि तिला नाना प्रकारचे नवस करीत असतां

त्यानें कोणा एकासही प्रतिबंध केला नाहीं किंवा त्याबद्दल कोणाला उपदेश करण्याचा कधीं यत्नही केला नाहीं. ह्या देवीपुढें बकऱ्यामेढ्यांचा बळी देण्याचें मात्र बंद होतें. मग ह्या फकिरानें तसें न करण्यास कांहीं सांगितलें होतें, किंवा त्या पवित्र देवीचा तसा दृष्टांत कोणा भक्तांना झाला होता, हें कोणासहीं कळलें नाहीं. या यात्रेच्या योगानें आपल्याला पोटाची निराळी दगदग नको, यात्रेकरू भाविक असल्यामुळें ह्या फकिराच्याही दर्शनाला येत, कोणी मुकाट्यानें दमडी पैसा फकिरापुढें टाकीत; कोणी पेरू, केळें वगैरे फळ पुढें ठेवीत; कोणी तांदूळ मूठमूठ देत. सर्व दिवसभर हा त्या वडाखालीं बसलेला असे. तो ध्यानस्थ असे, पण कोणी यात्रेकरू कांहीं प्रश्न विचारूं लागला तर त्याला उत्तरही देई. त्याच्या सर्वांगास राख फासलेली असून कंबरेला फक्त एक फडकें गुंडाळलेलें असे. डोक्याच्या केंसांच्या जटा वळून त्यांचा जुंबडा डोक्यावर बांधलेला दिसे, केंसाचा रंग धूम्रवर्ण होता. ह्या फकिराच्या अनेक चमत्काराच्या गोष्टी लोक बोलत आणि हिंदुमुसलमान दोन्ही जातीचे लोक हा कोणी मोठा अवलिया आहे असें समजून त्याला मान देत.

इमामवाड्याच्या उंच मनोऱ्यानें सूर्य आच्छादिला जाऊन तो हळूहळू अस्ताचलास चालला होता. मशिदीवरून मुएदीन किंवा बांगी मोठमोठ्यानें "अल्ला हो अकबर, आशाद अल्ला! ऐलाह इलल्लाह!" असे शब्द पुकारून तद्धर्मी लोकांना प्रार्थनेस बोलावीत होता. ह्या हाकेचा प्रतिध्वनि सर्व शहरभर दुमदुमून "ईश्वर फार मोठा आहे, ईश्वर एक आहे" वगैरे वाक्यांनीं सांजसकाळ भक्तांस आणि अभक्तांस ईश्वराची आठवण देत होता. अशा शांत समयाला डनवार व अमीर फकिराजवळ येऊन उभे राहिले. देवीच्या दर्शनाची गर्दी आतां अगदीं मोडली असून फकिराशिवाय तेथें कोणीच उरलें नव्हतें. तेथें फकिरापुढें हे मुकाट्यानें कांहीं वेळ उभे राहिले. कारण फकिराचे डोळे मिटलेले होते. त्याची हनुवटी त्याच्या छातीवर टेंकली होती आणि कधीही न विंचरलेली त्याची दाढी जमिनीवर लोळत होती. असा कांहीं वेळ गेल्यावर फकिरानें आपली मान वर न उचलितां बोलण्यास आरंभ केला. तो म्हणालाः—"मला अगोदरच बातमी लागली आहे, दोन तरुण मला कांहीं भूतपिशाच्च योनीबद्दल प्रश्न विचारण्यास येणार आहेत म्हणून. अतींद्रिय ज्ञानगम्य लोकांतील गुह्य गोष्टी जाणण्याची इच्छा

धरून आलेले हे कोण आहेत तें मीं ओळखिलें. फार वर्षांपूर्वीं हे दोघे लहान पोरवयाचे असतां मजकडे पुष्कळदां येत असत. मीं त्यांना कांहीं कांहीं शिकवीत असें. तेच ना तुम्ही ?"

इतकें बोलत बोलत त्यानें आपलें डोकें वर उचलिलें आणि डोळे उघडून ह्या दोघांकडे तो पाहूं लागला. त्यानीं कांहीं उत्तर केलें नाहीं किंवा आपण आल्याचें वर्तमान यास कसें समजलें ह्याबद्दलच्या विचारानें आश्चर्य वाटून ते स्तब्ध राहिले. त्याच्या प्रश्नानंतर तरी कांहीं उत्तर किंवा हुंकार द्यावा, परंतु त्या फकिरानें तशी सवड दिली नाहीं. तो लगेच पुनः बोलूं लागला— "तुमचें पुढें काय होणार हें मला लख्ख दिसत आहे. ही प्रभुकृपा आहे! दासांवर त्याची दया आहे. त्याच्या अनुग्रहानें कोणाच्या नशिबीं कायकाय लिहिलें आहे, तें सर्व वाचण्याची दृष्टि मला प्राप्त झाली आहे. माझ्या ज्ञानदृष्टीला त्यांतलें कांहींच अगम्य असें नाहीं. तुमच्या दोघांचीं दोन निरनिराळीं जीवितचक्रें रेखाटलेलीं मला स्पष्ट दिसत आहेत. असली—भविष्य जाणण्याची दृष्टि नसली म्हणजे कांहीं तरी अनुमानानें लोक कुतर्क करितात; मागल्या हकीगतीच्या धोरणानें पुढलें टिपण वर्तवितात. झालेल्या गोष्टीवरून कार्यकारणसंबंध जोडून पुढें होणाऱ्या गोष्टींची अटकळ बांधितात; पण तशी गोष्ट माझी नाहीं. अनंत कालाच्या पोटांतील सर्व भावी गोष्टी माझ्यापुढें दिसत आहेत. लोकांच्या भावी स्थितीच्या वहीची घडी मला उलगडतां येत आहे; त्यांतील खडान् खडा वाचावयास सांपडत आहे. अशी संधि पुनः येणार नाहीं. तुम्हांला कोणाला विचारून घ्यावयाचें असेल तर लवकर विचारा. तुमच्या दोघांच्या आत्म्याची सांगड घातलेली आहे, असें दिसतें. तुम्ही आज कोणचा विशिष्ट हेतु मनांत धरून माझ्याकडे आलां आहांत तें सांगा पाहूं !"

इतकें बोलून तो फकीर थांबला त्यानें पुनः डोळे मिटले आणि त्याची मान हळु हळु पुढें वाकतां वाकतां त्याची हनुवटी त्याच्या छातीवर टेंकली. डनबार कांहींच बोलेना. त्याची कांहीं वेळ वाट पाहून नबाब हात जोडून म्हणालाः—"साई महाराज, हे आमचे साहेब—आणि मी लहान पोरवयांत असतां आह्मी आपल्याकडे येत होतों आणि आपण पुष्कळ वेळां आह्मांस झोंप आणली आहे. ती कशी आणितां येते, ह्याबद्दल आह्मी आप-

त्यास पुष्कळ वेळां प्रश्न करीत असूं, परंतु त्या वेळीं बाबा, आपण असें ह्मणालां कीं, मोठे झाल्यावर माझ्याकडे या, ह्मणजे मग आत्म्याचें काय सामर्थ्य आहे, हें मी तुह्मांस सांगेन; आणि ह्या अपरिचित दिव्य लोकांत, जेथें जीवात्मे संचार करितात तेथें घेऊन जाईन, असें बोललां होतां."

"होय, बोललों होतों. मीं कधीं नाहीं म्हटलें! पण अपरिचित लोकांत नव्या लोकांत—असलें कांहीं विशेषण मीं लाविलें नव्हतें. मी ज्या ठिकाणीं नेहमीं जातों, त्याला मी नवा किंवा अपरिचित असें कसें म्हणेन? तुम्ही आणि तुमच्याच वर्गांत बहुतेक मंडळी मोडतात, तुमच्या ओळखीच्या बहुतेक लोकांचें असेंच मत आहे कीं, ह्या लोकाशिवाय दुसरा लोक, जग, स्थान नाहीं. आपल्या दृष्टीला दिसतें येवढेंच सत्य, बाकी खोटें—असें मानणारेच पुष्कळ लोक आहेत. असो. आतां तुमचें म्हणणें काय! मी मागें बोललों तें खरें करून दाखवावें, एवढेंच ना? आत्मा व देह यांचें तादात्म्य झालेल्या जीवाला देहातिरिक्त आत्मा वाटतच नाहीं. तुम्हांला तो प्रत्यक्ष अनुभव पाहिजे, म्हणजे तुमच्या देहांतून—या स्थूल किंवा जड शरीरांतून—तुमचा आत्मा निघून सूक्ष्म किंवा लिंग-शरीरांत बाहेर राहूं शकतो, ह्याबद्दल तुमची स्वतःची खात्री झाली पाहिजे, हेंच ना तुमचें मागणें? पण ही गोष्ट तुम्ही प्रत्यक्ष पहाण्यास मागत आहां, ती अगदीं सोपी व सहज साध्य होण्यासारखी नाहीं. त्यांत कांहीं कमीजास्त झालें तर?"—

त्यावर डनबारनें उत्तर केलें:– "आम्हांला त्याची कांहीं फिकीर नाहीं. आम्ही असे भिणार नाहीं." फकीर लगेच म्हणाला—"बरोबर आहे; तुम्हांला भीति कशाला वाटेल? दिव्याच्या ज्योतीला हात लावण्यास मुलास भीति वाटत नाहीं. ह्याचें कारण त्याचें अज्ञान. तुम्ही आतां शहाणे, पण तुम्हांला या कामांत कांहीं अवघडपणा न वाटण्याचें कारणही तुमचें अज्ञानच होय. तुम्हांला वाटतें कीं, ही गोष्ट शक्यच नाहीं; मग उगीच भीति बाळगून काय करावयाचें? उगाच भेकडपणा कशाला पत्करा? तूं अजून बच्चा आहेस. तुझें दैव फिरलें आहे असें दिसतें. त्याच्या चक्राच्या फेरींत तूं आपण होऊन उडी टाकूं पहात आहेस, हें चांगलें नव्हे. मग कांहीं काल रडत बसशील, मागाहून पश्चात्ताप होईल; आग्रह धरिला नसता तर बरें झालें असतें असें वाटेल. तुझ्या मनांत नसलें तरी तुझ्याकडून आमच्या

पुष्कळ लोकांचें हित होणार आहे. पण बेटा याद कर; संभाळून बोल. पुढें तूं आणि तुझे आतेष्ट म्हणतील कीं, कोणच्या कुमुहूर्तावर ह्या फकीराची गांठ घेण्याची याला बुद्धि झाली कोण जाणे!"

नबाबानें उत्तर केलें—"आमची पूर्णपणें तयारी आहे. होऊं द्या आमचें काय होईल तें?"

डनबार म्हणाला:—"असल्या बुजगावण्यानें मी भिणार नाहीं. कांहीं तरी भय दाखवून आम्हीं आपला आग्रह सोडावा, असली युक्ति कांहीं आमच्यापाशीं पचावयाची नाहीं."

ह्यांच्या बोलण्यावर फकीर कांहींच उत्तर करीना. त्याची मान हळूहळू खालीं वाकूं लागली. त्यानें डोळे मिटलेलेच होते. ती मान वाकतां वाकतां छातीला हनुवटी टेंकली आणि मग त्याच स्थितींत तो कायम राहिला. "समं कायशिरोग्रीवं" या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें त्याची पाठ व मान सरळ होती, पण डोकें मात्र ताठ नव्हतें, झालें, त्याची समाधि लागली. त्याचा श्वासोच्छ्वासही चाललेला दिसेना. त्याच्या अंगावर कपडा नव्हताच, तेव्हां ऊर हलकें उडत असतें तरी तें दुसऱ्याच्या लक्षांत आलें असतें. अजूनही डनबार व नबाब दोघे उभेच होते; त्यांना एकसारख्या जांभया येऊं लागल्या, डोळे मिटूं लागले; उभें रहावेनासें झालें; हातपाय जड झाल्यासारखे वाटूं लागले; अंगाला आळोकेपिळोके द्यावेसे वाटले. प्रथम डनबार खालीं बसला, तो हातपाय पसरून आडवाच झाला; लगेच नबाबाची-ही तीच स्थिति झाली. ते दोघे त्या उघड्या मैदानांत वाळूवर हातपाय ताणून निजले आणि अगदीं निश्चल झाले.

अशा स्थितींत सुमारें अर्धा तास गेला असेल, तों फकिराची मान हळुं हळूं वर होत होत ताठ झाली. त्यानें डोळे उघडले आणि त्या दोघांकडे पाहिलें. ते झोपेंतच ह्या कुशीचे त्या कुशीला झाले. त्यांचा श्वासोच्छ्वास जारानें होऊं लागला. ते डोळे उघडून इकडे तिकडे पाहूं लागले. डोळ्यावरची झांपड हळुहळू नाहींशी होऊन त्यांनीं साफ डोळे उघडले आणि इकडे तिकडे पहात पाहत ते उठून बसले.

नबाब मोठ्यानें ओरडून "या अल्ला, अल्ला" असें म्हणाला आणि हळूंच मागें वळून पाहूं लागला; जणूं काय त्याच्या पाठीमागें कोणी

आहे कीं काय असें तो पहात असावा व त्या पदार्थांकडे किंवा जीवाकडे एकदम वळून पहाण्याचें धैर्य होत नसावें आणि म्हणून तो वळून चोरून पहात होता. नंतर पुनः त्यानें डोळे ताणून डनबारकडे पाहिलें. डनबारचीही तीच स्थिति झाली होती, तोही असाच घाबरल्यासारखा चोहोंकडे निरखीत होता, आणि त्याच्या मुद्रेवर आश्चर्याचें चिन्ह स्पष्ट दिसत होते. आकाशांतही कोणी आहे कीं काय, अशासारखी डनबारची दृष्टि वर लागली होती. दोघेही सावध झालेसें पाहून फकिरानें हळूंच बोलण्यास आरंभ केला. तो म्हणाला " कसें काय ? आतां तुमची इच्छा पूर्ण झाली ना ? " त्याला काय उत्तर द्यावें, हेंच डनबारला कळेना. त्यानें सरळ उत्तर दिलें नाहीं. तो ह्मणालाः—" मला एक चमत्कारिक स्वप्न पडलें. " फकीर जरा रागाच्या स्वरानें म्हणालाः—" काय म्हणतोस ? स्वप्न पडलें ! वहावा ! असें का स्वप्न असतें ? ह्याला का तूं स्वप्न म्हणणार ? छे बेटा, तें स्वप्न नव्हे. तुझी काय इच्छा होती. जीवात्मे ज्या लोकांत असतात, तो मला दाखवा, असा तुझा प्रश्न होता ना ? सूक्ष्म देहानें रहाणारी योनि असून त्याचा मला प्रत्यक्ष अनुभव पाहिजे, असेंच तुझें मागणें होतें ना ? मीं त्या लोकांत तुला नेलें होतें, आणि अजूनही त्याला तूं स्वप्न म्हणतोस ? तेव्हां तुला आतां काय ह्मणावें ? तुह्मांपैकीं प्रत्येकाला काय काय दिसलें, काय अनुभव आला, त्याची प्रत्येक जण आपली निराळी हकीगत सांगा पाहूं ! आणि मग ती एकमेकांशीं किती जुळते हें पाहून आपली खात्री पटवून द्या. "

नबाब मुकाट्यानेंच बसला; पण डनबारनें आपण काय पाहिलें, त्याची हकीगत सांगण्यास सुरवात केली. तो ह्मणाला, " मी उभा असतांनाच मला एक प्रकारची मरगळ आली. त्याला झोंप तरी कशी म्हणूं ? झोंपेची झांपड निराळी. त्यांत हळूहळू विस्मरण पडत चाललें. एक एक गोष्ट मावळूं लागून ह्या इथल्या सर्व पदार्थांचें स्मरण बुझलें. भुलीचें औषध–क्लोरोफार्म हुंगायला दिला म्हणजे जसें होतें तसें होऊं लागलें, आणि हळूहळू इकडचें सर्व भान नाहींसें झालें. मला वाटे कीं, मी स्वप्नांत आहें कीं जागा आहें ? कारण कित्येक वेळां स्वप्नांतही असें होत असतें. माझा जमिनीचा आधार सुटून मी वरवर आकाशांत उडूं लागलों. हवेपेक्षां मी हलका असल्यामुळें इकडे

तिकडे हेलकावेही खात होतों. मला असें वाटे कीं, वर आकाशांत उडणारा तो मी किंवा खालीं झोंप घेत पडलों तों मी ! खालीं पहावें तों हें माझें शरीर जमिनीवर—ह्या वाळूंत आडवें पसरलेलें दिसत होतें, आणि त्याप्रमाणें त्याच्या शेजारीं नबाबाचा देहही ताणून निजलेला स्पष्ट दिसत होता. पुढें पहावें तों साईबाबा, आपणही ह्या वडाच्या झाडाखालीं असेच समाधींत बसलेले दृष्टीस पडलांत."

फकीर मध्येंच बोलूं लागला:—"बेटा, आतां तरी समजलें का तुला ? ह्या शरीरसंघाताचे पदार्थ एकत्र झाले म्हणजे त्यांच्या अंगीं येणाऱ्या गुणांपैकींच आत्मा हाही एक गुण आहे असें पुनः ह्मणणार नाहींसना ? आत्मा ही स्वतंत्र, निराळी वस्तु आहे; येवढी तरी तुझ्या मनाची खात्री झाली काय ? हें जड शरीर मृत्यूच्या जबड्यांत गेल्यावर त्यांतील अविनाशी म्हणून जो आत्मा निराळा रहातो तो तूं. ह्या शरीरसंघाताशीं तादात्म्य समजून हें शरीर–हात, पाय इत्यादि अवयव–तेच मी, असें तुला व इतर अज्ञानी सर्व जीवांना वाटत असतें. परंतु वास्तविक ती एक काल वस्तीची झोंपडी, क्षणभर वस्तीसाठीं जवळ केलेलें ठिकाण, म्हणजे धर्मशाळाच आहे, हें ओळखिलें पाहिजे. तूं मघाशीं म्हणालास कीं, 'मी व अमीर असे एकमेकांशेजारीं पसरलेले होतों,' पण तूंही तो नव्हतास आणि तुझ्या शेजारीं ताणून निजलेला तो अमीरही पण नव्हता––"

डनबारनें येथें आपलें बोलण्याचें घोडें मध्येंच ढकलिलें. तो ह्मणाला:––"होय, तें खरें. मला ही गोष्ट लवकरच कळून आली. हवेमध्यें एखाद्या पक्ष्यासारखा मी तरंगत आहें, उडत आहें असा मला भास होत होता, आणि भोंवतालीं पहातों तों माझ्या शेजारीं अमीरही तसाच उडत होता. मी मोठ्या संशयांत पडलों. कित्येक वेळां मी खालीं पाहीं, तों येथें अमीराचा देह दिसे आणि वर पहावें तों अमीर आहेच; पुनः खालीं पहावें तों वाळूवर अमीर आहेच आणि वरही अमीर माझ्याजवळच. तेव्हां मी समजलों कीं, माझ्याप्रमाणेंच अमीर व त्याचा देह निरनिराळे झाले आहेत. पहावें तिकडे अनेक जीवात्मे माझ्यासारखेच हवेंत उडतांना दिसूं लागले, तेव्हां माझ्या मनांत असा विचारतरंग आला कीं, हे सर्व माझ्या दृष्टीस पडणारे जीवात्मे एक वेळ माझ्याप्रमाणेंच पृथ्वीवर जन्मास आलेले असतील, तेव्हां

ह्यावरून ह्या दृश्य शरीराबरोबर आत्मा नाहींसा होत नाहीं; निदान त्या देहाची व्यवस्था लागल्यानंतर तो मागें रहातो, असें ह्यावरून सिद्ध होत आहे, पण हें तर स्वप्न नव्हे ना ? छे, स्वप्न नाहीं हें खास; असें मी आपल्या मनाशीं म्हणत आहें, किंवा एक प्रकारचा प्रश्न विचारीत आहे, तोंच त्याचें उत्तरही मला ऐकूं आलें कीं, " तूं स्वप्नांत नाहींस. " हे शब्द कोणी तरी उच्चारल्यासारखे मला स्पष्ट ऐकू आले खरे, परंतु मी जसें आपल्या मनाशीं बोलत होतों, मी मोठ्यानें कधीं प्रश्न केला होता ? तेव्हां त्याचें उत्तरही त्याच मासल्याचें असावें असेंही माझ्या मनांत आलें. पृथ्वीवरील तारायंत्रापेक्षां मानसिक तारायंत्राच्या संदेशाची गति फार वेगाची असणें, अगदीं साहजिक आहे. असो. या जीवात्म्यांच्या कंपूनें आपल्याबरोबर भिसळून चालण्यास सांगितलें आणि माझ्याप्रमाणेंच अमीरला कळविलें असावें. तसें कोणी बोललें नाहीं, तसा कांहीं आवाज झाला नाहीं, पण आम्ही दोघे एकदम वळलों आणि त्या स्वर्गीय जीवात्म्यांच्या मागोमाग चाललों आमची गति पक्ष्यांच्यासारखी होती, किंबहुना विजेच्या लकाकण्याचा जो वेग, तितक्या जोराची होती. वाटेंत ढग, धुकें लागलें, पण आमच्या अंगाचा कोणास धक्का लागला नाहीं, किंवा त्यांचाही आम्हांस कांहीं धक्का भासला नाहीं. डोंगरावर आम्ही चालत गेलों; नद्या, सरोवरें ह्यांच्या पाण्यावरून चालतांना आम्हांस खालीं बुडण्याचा प्रसंग आला नाहीं. हिमालयपर्वतावर आम्ही पोहोंचलों. तिथलीं रानमेंढरें किती मजेदार होतीं, त्यांच्यामागें आम्ही धांवत सुटलों. चित्त्यांचे कळप दृष्टीस पडले. पण आम्हांला पाहून भयानें तेच पळत गेले, आमच्या अंगावर कोणी धावून आले नाहींत. पर्वतावर बर्फाचे दाट थर पसरले होते, त्यांवर आम्ही नाचलों, बागडलों, घसरगुंड्या खेळलों; सुंदर आणि रम्य सरोवराच्या पृष्ठभागावरून चालत असतांनाही आमचे पाय ओले झाले नाहींत. ह्या मानवी वस्तीच्या जगतापासून किती तरी लांबवर आमचा प्रवास झाला ! ह्या पृथ्वीचा मागमूसही तेथें नव्हता. आम्ही असे उडतां उडतां ही पृथ्वीच मुळीं दिसेनाशी झाली. आम्ही आकाशांत फार उंच गेलों. ह्या आकाशांतील इतर ग्रहांच्या फिरण्याचा एक प्रकारचा मंजूळ ध्वनि होत असतो, असें मीं कोठें वाचिलेलें आहे, पण तसला कर्णमधुर आवाज स्पष्ट ऐकूं येऊं

लागला. जिकडे तिकडे शुचिर्भूतपणा, पवित्रता, सात्विक गुण ह्यांचीं चिन्हें दिसूं लागलीं, व त्याचा परिणाम आमच्यावरही होऊन आम्ही शुचिगंगेंत स्नान करून शुद्ध झाल्यासारखें वाटलें. मला एकदां असें वाटलें होतें कीं, आपण ह्या अज्ञानावस्थेच्या शोधांत उडी टाकणें म्हणजे अज्ञान होय, मीं चूक केली; असला भलता आग्रह धरिला नसता तर बरें झालें असतें. पण येथें अज्ञानाचा लवलेश नव्हता. सर्वत्र ज्ञान आणि त्याचा उज्वल प्रकाश-दैदिप्यमान सूर्याची प्रभा-सर्वत्र आनंद भासत होता. दुःखाचा मागमूसही नव्हता. मला दुःख होईल किंवा पश्चात्ताप वाटेल असली कोणचीही कृति आठवली नाहीं, म्हणजे पापकर्मे मी मुळींच केलीं नव्हतीं असा ह्याचा अर्थ नव्हे, किंवा जी एक मृत्यूच्या ( यम-) लोकांत विस्मरणी नदी आहे म्हणतात, तिच्यामध्यें स्नान केल्यानें जसला प्रकार होतो तसाही कांहीं मला झाला नव्हता. माझ्या सर्व प्रेमी माणसांची मला स्मृति होत होती. माझ्या घराची-ज्या ठिकाणचें स्मरण होतांच माझें हृदय आनंदानें उचंबळूं लागतें, ती सर्व आठवण जागृत होती; आणि माझ्या साऱ्या जन्मांत जेवढ्या सुखाच्या गोष्टी झाल्या होत्या, त्या सर्व डोळ्यापुढें दिसूं लागल्या. माझ्या श्वासोच्छ्वासासही कांहीं निराळी अवस्था आली होती. तोही आनंदपूर्ण होऊन तो आंत फुप्फुसांत शिरतांना तेथेंही आनंद प्रसवत आहे, असें वाटूं लागलें. आंत बाहेर सर्वत्र आनंदाशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं, असें झालें. जगत् हें सुखदुःखाचा बाजार आहे, ह्यांत त्याचें सर्वत्र मिश्रणच दिसून येतें, आणि त्यामुळें मृत्यु आल्यानंतर काय होत असेल, त्यानंतर ह्या सुखदुःखाचा कसा प्रकार असेल, हें गूढ समजावें, अशी माझी इच्छा फार होती. अखंड सौख्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं, अशी स्थिति आपल्याला प्राप्त व्हावी, हें मला पाहिजे होतें.प्रारंभीं शंका आली कीं, ह्या जगतांत सत्य कसें ओळखावें ? पण असला प्रश्न येथें उपस्थित करण्याचें कारणच नव्हतें. ह्या पृथ्वीवर सत्य कशाला म्हणावें, ह्याची खरी जाणीव आतां उत्पन्न झाली. अलीकडे सत्य म्हणजे सारासारविचार,दूरदर्शीपणा,कोणच्याही गोष्टीचा साधकबाधक प्रमाणांस तराजूंत घालून संभावाचें पारडें जिकडे झुकेल, तें ओळखणें हेंच सत्य असें मानलें जातें; तथापि, जर, तर, परंतूचा वारा लागला कीं, पारडीं पुनः डळमळूं लागतात. परंतु ह्या प्रसंगीं तसला कांहीं

प्रकार उरला नव्हता. संशयास जागाच नव्हती. मृत्यूनंतर कशी स्थिति होत असेल, जीवात्मा कसा रहातो, ह्याचें गूढ कोडें आतां स्पष्ट उकललें होतें. मला असें आतां समजलें कीं, आत्मा अविनाशी, नित्य, अमर आहे. हा देह हें एक क्षेत्र, त्यांत रहाणारा, त्याला जाणणारा आणि ह्मणून त्याच्याहून निराळा जो कोणी तो क्षेत्रज्ञ, तो शाश्वत आहे. ह्या क्षेत्राच्या नाशाबरोबर आत्म्याचा नाश व्हावयाचा नाहीं; आणि मरण म्हणजे किंवा पृथ्वीवरील आयुः-काल संपणें ह्याचा अर्थ किंवा ह्या जगाला, ह्या लोकाला सोडून दुसऱ्या लोकाला जावयाचें ह्याचा संबंध असा, कीं, हा वस्त्र पालटण्याचा प्रकार होय; किंवा सर्प जसा आपली कात टाकून पुनः ताजातवाना होतो, तशी स्थिति होय. ह्या देहाला मिळालेली भ्रमणाची, आयुःक्रमणाची गति संपली कीं तो थंड होतो, निरुपयोगी होतो आणि म्हणून तें जड ओझें येथें टाकून आत्मा मोकळा होतो, मरणानंतर ह्या जड देहाहून त्याला निराळें रहातां येतें.

अशा प्रकारचे माझे विचारतरंग एकामागून एक उद्भवत आहेत, तोंच " चला परत " असा आवाज माझ्या कानीं आला. हा ध्वनि कोठून आला असावा ह्मणून मी चोहोंकडे पाहूं लागलों, तों जवळपास कोणी तसा बोलणारा दिसला नाहीं, आणि तो फार लांवून आला असावा, असें-ही खात्रीनें वाटेना. पण मागें एकदां ह्या जीवात्म्यांचे प्रश्नोत्तरांचा प्रकार मीं वर्णन केला आहे, तसलीच ही तऱ्हा असावी असें ध्यानांत आलें. माझ्याप्रमाणेंच अमीरालाही परत निघण्याची सूचना किंवा अनुज्ञा झाली असावी. तोही माझ्यामागें निघाला. परंतु इतर जीवात्मे कोणीच मागें-परतले नाहींत, ते आपल्या मार्गानें पुढेंच चालले होते. झालें; परत यायला कांहीं वेळ लागला नाहीं; एका क्षणार्धांत आम्ही आपल्या शरीरापाशीं येऊन तेथून घिरट्या घालूं लागलों. ह्यानंतर काय झालें तें मात्र आठवत नाहीं, किंवा ह्या देहभानावर कसे आलों, हें समजलें नाहीं. नंतर पुढें तुम्ही आम्हांस जागें केल्यावर आम्ही सावध झालों. "

नयाब घाईघाईनें ओरडून ह्मणाला, " या अल्ला ! या अल्ला ! परवर-दिगार ! अहो डनवारसाहेब, तुह्मी तर खडानखडा मला जो अनुभव आला तोच सांगितला. आतां मी आपली हकीकत निराळी सांगण्याचें

कारणच नाहीं. कायहो, साईबाबा, असेंचना ? " फकिरानें त्याच्याकडे पाहून स्मितहास्य केलें. परंतु ह्या दोघांचा संकेत डनबारच्या लक्षांत आला नाहीं. फकीर म्हणाला, " काय, आतां तरी खरें वाटतें का ? मी म्हणतों त्याची खात्री पटली का ? आत्मा अमर आहे, असा आतां तरी मनाला अनुभव आला काय ? इतकेंच नव्हे तर मरणाचेंच द्वार उघडल्या-वांचून कांहीं सोय नाहीं असें नव्हे; मरणसमय येण्यापूर्वीं सुद्धां ह्या जीवाला देहांतून बाहेर जाणें शक्य आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव तुम्हांला आला आहेना ? "

डनबार म्हणाला " मी असें कसें म्हणूं ? "

" काय म्हणतोस ? बच्चा, आतां येवढा वेळ जी स्वतःच्या अनुभवाची हकीगत सांगत होतास, ती इतक्यांतच विसरलास ? इतका सगळा खटाटोप व्यर्थ गेला तर ! तुझ्या तोंडूनच तूं मघाशीं बोललासना, कीं, माझा कांहीं संशय उरला नाहीं म्हणून ! शर्थ आहे तुझ्या संशयाची ! "

" माझा आत्मा आकाशांत उडत होता, असें मला वाटत होतें व त्या वेळीं माझ्या मनांत जे विचार जसे आले, ते मीं तसेच बोलून दाखविले. परंतु माझा आत्मा ह्या माझ्या देहाला सोडून खरोखरच दूर कोठें गेला होता कीं नाहीं, कोण जाणे ! तुम्हांला दृष्टिपात करतां येत असला पाहिजे. तुम्हीं मला भारून टाकून कांहीं भ्रांति उत्पन्न केली नसेल कशावरून ? "

फकिरानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यानें डोळे मिटले आणि त्याची मान हळूहळू लवतां लवतां हनुवटी छातीवर टेंकली, आणि त्या स्थितींत तो स्तब्ध झाला.

तेव्हां डनबारला नबाब म्हणाला—" चला बुवा आतां; इथें आतां राहूं नये. अगोदरच फार रात्र झाली आहे. ह्यापुढें अवलिया कांहीं बोलणार नाहीं. मला वाटतें कीं, तुमच्या महासंशयामुळें साईबाबांस राग आला असावा. " ह्या वेळीं कांहीं दिसत नाहींसें झालें होतें, म्हणून ते उठले, ते चांचपडत घांटाबर गेले आणि नाव सोडून तिच्यांत बसले. नबाब म्हणाला, " आपण क्लबांत जाऊं म्हणजे झालें कीं नाहीं ! मी तुमच्या घरापर्यंत पोहोंचविण्यास आलों असतों, पण माझ्या घरीं कोणी पाहुणे यायचे आहेत, नाहीं तर माझी गाडी आपल्या सेवेला हजर होतीच ! "

डनबार ह्मणाला--" हंः त्यांत काय आहे ? मी क्लबांतून घरीं चालत जाईन. मला तेंच बरें वाटतें, आणि शिवाय मी पायीं चालत असलों म्हणजे माझे विचार सुरळीत चालतात. हा माझा स्वभावच बनला आहे, आणि त्या विचारांना पुष्कळसें खाद्य आज ह्या फकिरानें देऊन ठेविलें आहे. मघांशीं काय बरें तुम्ही म्हणालांत ? माझ्या संशयामुळें त्या फकिराची खप्पा मर्जी झाली असावी असें तुम्हीं बोललां, होय ना पण ? परंतु मला तसें वाटत नाहीं. तुमचा तर्क चुकीचा असावा. त्यांत मर्जी जायला मीं काय केलें ? मी जर त्या वेळीं तसें न बोलतों, तर खोटें बोलायला पाहिजे होतें. माझा संशय दूर झाला नसून, मी जर झाला असें म्हणेन, तर माझ्याकडे लबाडी येते; मला नुसतें तोंडदेखलें बोलणें येत नाहीं. आजच्या प्रयोगा-बद्दल मला फार शंका आहे. हा दृष्टिप्रयोग म्हणजे दुसऱ्यांवर मोहिनी टाकणें ही विद्या त्याला चांगलीच येत असली पाहिजे."

"डनबारसाहेब, आज तुमचे संशय फारच दूरवर वहात चालले आहेत! किती संशयखोर स्वभाव हा ! तुमचें कशानेंच समाधान होत नाहीं कसें ? सगळ्याबद्दलच तुमचा संशय !"

"काय सांगूं नबाबसाहेब ! आतां मी पूर्वीसारखा सहज फसणारा, भावडा राहिलों नाहीं. एक प्रकारानें पहातां असले भोळे लोक बरे. त्यांचा भाव त्यांना उपयोगीं पडतो. त्यांना एकदम सत्याची प्रतीति येते. पण आमच्या सोसायटीची मंडळी तशी भोळी नाहीं. हें कांहीं वाईट नाहीं, उलट चांगलें आहे. आमच्यापुढें ज्या कांहीं गोष्टी येतील, त्या सगळ्यांचा आम्ही पूर्ण छडा लावतों आणि साधकबाधक प्रमाणें पाहून जें अखेर ठरतें, त्याला कांहीं महत्व येतें."

"म्हणजे सारांश काय कीं, ह्या एका प्रयोगानें तुमची कांहीं तृप्ति झाली नाहीं, तुमचा संशय संपला नाहीं. आणखी प्रयोग, अधिक अनुभव तुह्मांला पाहिजे आहेत !"

"अगदीं खरें !"

"बरें तर, मी पुनः फकिराकडे जाऊन त्याचेपाशीं बेताबेतानें गोष्ट काढीन, आणि त्याचें काय म्हणणें आहे तें विचारून घेईन."

"पहा तुमची डाळ शिजली तर ! पण मागच्यासारखा लटपटीचा प्रयोग

उपयोगी नाहीं; त्यापेक्षां अधिक खात्री पटविणारा आणि अनुभव दाखविणारा दाखला पाहिजे. ही गोष्ट तुमच्या हातून झाली तर आमच्या मंडळावर तुमचे फार उपकार होतील, आणि त्यांच्या दप्तरीं तुमचें नांव चिरस्मरणीय होऊन राहील. "

# प्रकरण ७ वें.

## नबाबाचें कारस्थान.

छत्तर-मंझीलजवळ नबाबाची गाडी उभी होती. गोमती नदीच्या पलीकडच्या तीरावर नबाबाचा वाडा असल्यानें नबाब गाडींत बसून तिकडे जातांना घाटाकडे गाडी वळलेली पाहून डनबारला विलक्षण वाटण्याचें कारण नव्हतें; तेवढ्यावरून नबाब आपल्याशीं खोटें बोलला असा संशय येण्यालासुद्धां जागा नव्हती. गाडी पुलाच्या पलीकडे जायलाच पाहिजे, त्याप्रमाणें ती गेली; पण ह्यांत नबाबाची सारी लबाडी होती. पूल ओलांडून पलीकडे जाईपर्यंत गाडींत बसण्याचें सोंग नबाबानें केलें आणि पूल संपतांच तो गाडींतून उतरला, आणि मोकळी गाडी मात्र नबाबाच्या वाड्याकडे गेली. गाडींत नबाब नाहीं हें डनबारला इतक्या दुरून दिसणार कसें ? नबाब उतरला, तो तशा अंधेरांत फकिराच्या झोंपडीकडे गेला. जातां जातां वाटेनें तो आपल्या मनाशीं हंसत होता. त्यानें आपली पाठ थोपटून घेतली आणि किती वेळां तरी मिशीला पीळ भरला. शेवटीं तो आपल्याशींच पुटपुटूं लागला—" वहावा ! बहुत खाशी ! कशी मजा झाली ! खूप बहार झाली ! विलायतेंत मंडळाच्या दप्तरीं माझें नांव चिरकाल रहाणार तर ! ह्यः ह्यः ह्यः ! संभाळा बरें ! माझ्याशीं गांठ आहे. "

पण इतक्यांत त्याचे विचार ह्या विषयावरून वळले. त्यानें पुष्कळ छपवाछपवी केली; पण त्याचें सर्व चित्त कॉन्सीकडे लागून राहिलें होतें. तिची प्राप्ति आपल्याला कशी होईल, ह्याचा उपाय शोधण्यासाठीं त्याची खटपट चालली होती. तिनें त्याला वेडच लावलें होतें. तो मनाशीं म्हणूं लागला—" मीं कॉन्सीपाशीं लग्नाची गोष्ट काढली होती, हें ह्या गोऱ्याला समजलें

असेल काय ? ती कशी बोलेल ? कदाचित तो थेरडा मात्र गुलुगुलु बाता मारायला म्हणून गेला असेल; पण मग बुवा फारच नवल ! माझें तें कृत्य ह्या पांढऱ्याला कळून, हा कसा त्या गांवचाच नाहीं असें दाखवितो पहा ! मला नाहीं ही गोष्ट खरी वाटत. क्वीन्सी तर मीं ही गोष्ट काढली म्हणून आपल्याला मोठा मान मिळाला असें समजत असेल; म्हणून ती कांहीं सहसा ही बातमी आपण होऊन सांगणार नाहीं. मी एवढा श्रीमंत नबाब तिच्या मनास येणार नाहीं हें संभवनीयच नाहीं. पण मी पडलों मुसलमान, ती ख्रिस्ती. तेव्हां ही धर्माची नड तिला फार आडवी आली असेल, आणि म्हणून तिनें निरुपायानें मला नाहीं म्हटलें असेल. तिनें कशी माझी समजूत घातली ! ती का रागावली, का रुसली ? कांहीं नाहीं. नबाब आपल्यावर अनुग्रह करीत आहे, असें तिच्या मनाला वाटलें खास. नाहीं तर तिनें माझा बाडा वर्ज्य नसता केला ? पुनः माझ्याशीं बोललीसुद्धां नसती. तेव्हां तें कांहीं नाहीं. तिच्या मनांत आहे; पण तिला तितकें धैर्य होत नाहीं. आतां हा गुलाम तर तिच्या पायीं वेडा होऊन गेला आहे. तिच्यावर ह्याचें अत्यंत प्रेम जडलें आहे, असें म्हणतात हें खरें असेल काय ? असेल तर एक नवलच हें ! असेल आणि नसेल. पण नाहीं, पुष्कळ अंशीं खरेंच असण्याचा संभव आहे. ती आहेच तशी नाजूक नार ! तसें नसतें, हिनें त्याला फिदा केलेला नसता, तर ज्या कामाला तो इथें आला, त्यासाठीं एकदम माझ्या भेटीला कां नाहीं आला ? इतके दिवस त्या हाटेलांतच कशाला असला होता ? मी इथें नव्हतों तर पत्र पाठवून माझा शोध करायचा होता ! तसें न करतां क्वीन्सीनें पवित्र केलेल्या त्या हाटेलांत मिटक्या मारीत घोटीत तो कां राहिला असता ? दुसरा पुरावा असा कीं, ती नवयुवती घांटावर–धुण्याच्या घाटावर–त्या बायकांच्या बरोबर बोलायला, त्यांचीं मनें वळवायला –त्यांना नवऱ्यांपुढें बंड करायचें शिकवायला जात असे, तेव्हां हा गोरा रोज तिकडे गाडी घेऊन कां जात होता ? त्याच्या हृदयाला दोरी लावून ओढणारी ही बया होती. तिला कोणीं त्रास देऊं नये, तिच्या वाटेस कोणी गेल्यास त्याला शिक्षा करायला जवळ असावें, ह्या हेतूनेंच हा जात असला पाहिजे. इनशानअल्ला ! ही गोरी पोर केवळ इंद्राची परी आहे. ह्या सुंदरीसाठीं–ह्या तिलोत्तमेसाठीं–मी काय पाहिजे तें द्यायला तयार आहें !

माझी दौलत, माझें घरदार, माझा देह तिच्या चरणीं वहाण्याची माझी तयारी आहे. पण तिनें माझ्याशीं लग्न लावायला कबूल व्हावें. इतकेंच नव्हे तर माझा जीव, माझा आत्मा सुद्धां देण्याला मी तयार आहें, आणि ह्यासाठीं तर ही सारी खटपट आहे. ती गोष्ट करण्याचें सुद्धां मीं ठरविलें आहे, पाहूं आतां मग काय होतें तें ? "

फकिराचें ध्यान, भजन, पूजन किंवा काय त्याचें ईश्वरासंबधाचें कार्य व्हायचें होतें, तें सगळें आटपून, तो तीन दगड मांडून त्यांच्यावर एक भाताचें मडकें ठेवून जाळ लावीत बसला होता; इतक्यांत हा अमीर तेथें जाऊन पोहोंचला. ह्या वेळची फकिराची वागणूक अगदीं निराळी. मघाशीं जितका निस्पृहपणा दिसला, त्याच्या उलट आतांची कृति. आतां सर्व वर्तन संसारी माणसाप्रमाणें. नबाब फार श्रीमंत, तेव्हां त्याच्या पुढें अगदीं नम्र! नबाब येतांच फकीर उठून उभा राहिला आणि त्याचें मोठ्या आदरानें स्वागत करूं लागला. ह्या नबाबालाहि आपला हेतु साधावयाचा होता; म्हणून त्यानें लगेंच फकिराचे पाय धरले आणि गुडघे टेंकून पायांवर डोकें ठेविलें, आणि हात जोडून लवून उभा राहिला. फकीर त्याला 'बसा' म्हणूं लागला. तेव्हां नबाब म्हणे "छे छे! असें कसें होईल ? मी आधीं बसणार नाहीं." त्याला फकीर म्हणाला "हें काय भलतेंच ! किती झालें तरी तुम्ही नबाब, थोर, गादीचे मालिक. मी गरीब, यःकश्चित् भणंग भिकारी. आपल्याला उभे ठेवून मी खालीं बसूं होय ? आतां ह्या गरीबाच्या झोंपडींत आपल्याला बसण्याजोगी खुर्ची किंवा कोच, अगर आसन कांहींच नाहीं."

"छे छे! साईबाबा, असें कां म्हणतां ? आसन, सिंहासन आपल्याला योग्य. आपल्यासमोर मी अशा धुळींत बसण्यालाही योग्य नाहीं. माझी आपल्यासमोर काय कथा ? अल्लाची आपल्यावर मर्जी; मी आपल्या दासाच्या दासाचा गुलाम !" अमीर हात जोडून बोलत होता.

"होय, नबाबसाहेब ! ईश्वराच्या सन्निध-त्याच्या लोकांत गेल्यावर, सर्व जीव सारखेच. त्यांत लहान मोठें कोणी नाहीं. पण ह्या व्यवहारांत-ह्या भूलोकांत आपण नबाब-आणि उपास काढणारा मी दरिद्री फकीर. पण पुनः स्वारी इकडे कां आली ? काय आपल्या मनांत आलें ? काय आज्ञा आहे ?"

"साईमहाराज, मी का आपला धनी? का मालक? म्हणून आपणांस आज्ञा करूं? मी ह्या चरणांचा सेवेकरी. माझ्यावर दयार्द्र दृष्टि ठेवून ह्या लेंकराचे लाड पुरवावे, येवढीच विनंती आहे. हा अनुग्रह मजवर करावा अशी विनंति करण्यासाठीं मी आलों आहें. ह्या सद्गुरुचरणापाशीं पदर पसरून भीक मागण्यासाठीं मी आलों आहें. मजबरोबर जे साहेब आले होते, त्यांची पुनर्जन्माबद्दल अद्याप खात्री होत नाहीं. त्यांची विनंति पुनः प्रयोग पाहण्याची आहे, परंतु त्यांची पुनः शंका न राहील असें झालें पाहिजे. मी त्यांच्यासाठीं ही प्रार्थना करण्यासाठीं दर्शनास आलों. येवढी मागणी मान्य करावी साईमहाराज!"

"हा मूर्खा! असल्या रिकामटेकड्या, श्रद्धाहीन लोकांच्या करमणुकीसाठीं मी आपल्या विद्येचा उपयोग करूं होय? तें कध्धीं होणार नाहीं!"

"छेः! महाराज, असें रागावूं नये. त्याची खरोखर मनापासून तशी इच्छा आहे. ह्यांत खरें कितपत आहे, हें पहाण्यासाठीं त्याचा प्रयत्न चालू आहे, आणि मीं तरी हेंच सांगण्यासाठीं आलों आहें कीं—" ह्यानंतर नबाबानें आसपास कोणी नाहीं असें पाहून हळूच कांहीं फकीरास सांगितलें.

फकीर मोठ्यानेंच म्हणाला—"बरें बरें, समजलें मला. जा–जा! तुझ्या मनाप्रमाणें सर्व कांहीं घडून येईल. आणखी आठ दिवसांनीं पुनः ये. जा."

नबाबानें पडत्या फळाची आज्ञा म्हणून तेथून पाय काढला. तो आपल्याशीं म्हणाला—"शकून तर चांगला झाला! इतक्या लवकर आणि गुप्तपणें हें काम होईल असें मला वाटलें नव्हतें. एक युक्ति तर फळाला येणार; आतां दुसरी एक योजना करून ठेवलीच पाहिजे. एकाच दगडानें कोठें अंबा हातीं लागतो? एकाला दुसऱ्याची जोड पाहिजेच. जुनी म्हण आहे कीं, बायकांची मर्जी कशी मिळवावी, तर प्रथम त्यांना घालावें संकटांत–आणि मग त्यांचा कैवार घेऊन, त्यांना सोडवायला एखाद्या माझ्यासारख्या तरुणबांडानें धांवून जावें. असा योग जुळला, कीं, काम झालेंच; मग त्या बाईनें गळ्यांत मिठी मारलीच समजावें. मग लग्नाला काय उशीर?"

रोजच्याप्रमाणें डबगार फेरलकडे गेला, आणि तेथें गोष्टींवरून गोष्टी निघतां निघतां, आज आपण आपल्या कामाला आरंभ केला, असें तो म्हणूं

लागला. " मी आज नबाबाकडे गेलों होतों. नावेंतून हिंडलों फिरलों; इकडच्या तिकडच्या पुष्कळ गप्पा झाल्या. संध्याकाळ संपून रात्र केव्हां पडली, ती समजली नाहीं." पण त्यानें फाकिराच्या भेटीबद्दल किंवा तेथें घडलेल्या गोष्टीबद्दल अवाक्षरही काढलें नाहीं. डनबारनें आपल्या कामाला लागावें ह्मणून क्रीन्सी रोज आग्रह करणारी, पण तो आतां खरोखर तसें करूं लागला, हें ऐकून तिच्या मुखावर पांडुरता आली! तिला कसेंसेंच झालें. तिनें हें सर्व दुसऱ्याच्या दृष्टीस पडूं नये ह्मणून तोंडावरून हात फिरवीत फिरवीत विचारिलें, " मग इतक्या लगेंच कांहीं सगळ्या गोष्टी संपल्या नसतील. कामाची घाई केली तर एकाच बैठकीला संपणार आहे सारं थोडंच. सर्वच विषय एकदम कसा बोलायला सांपडणार ! झालं तें ठीकच झालं."

" असें कांहीं नव्हे. आम्ही दुसऱ्या गोष्टी फारशा बोललोंच नाहीं. थोड्या कांहीं इतर किरकोळ कथा निघाल्या असतील, पण मुख्य विषय तोच होता. आमचें कामही बरेंच रंगाला आलें. आतां सांगूं नये—पण तुम्हांशीं म्हणून बोलतों—त्यांत कांहींच हरकत नाहीं म्हणायला—कीं, माझें काम लवकरच संपेल—मग लवनौस फार झालें तर दहा पंधरा दिवस झाला तर मुक्काम होईल, आणि कदाचित् त्याच्याही आंत काम आटपलें तर बरेंच झालें."

हें ऐकून फेरल म्हातारा अगदीं चवताळून गेला. तो मोठ्या आवेशानें म्हणाला— " आग लागो त्याला! आणि मग माझें कसें होईल? तुह्मी बोलायला नसल्यावर ही एवढी रात्र मला खायला उठेल ती ! "

" ह्या क्रीन्सी..." डनबारनें आपल्याकडून बोलण्याचा उपक्रम केला, पण त्याच्या तोंडून शब्द उमटेना. त्याला काय बोलावें हेंही सुचेना. पण त्याचें संकट जाणून नव्हे, आपण बोललेंच पाहिजे, असा प्रसंग आहे, हें पाहून क्रीन्सी म्हणाली— " अहं: तें कांहीं नव्हे. माझं नांव घेऊं नका. माझी गोष्ट बोलूं नका. मी आतां कोणीच नाहीं, अशी झाली आहे बरं. आपल्याला अजून नाहीं का समजलं ? " असे शब्द तिनें तोंडांतून उच्चारले खरे, पण तितक्यांत तिचा कंठ दाटून आला. डोळे पाण्यानें भरले.

ही गोष्ट फेरलच्या लक्षांत आली. म्हाताऱ्याला वाटलें कीं, आपण बोलण्यांत मोठा प्रमाद केला. इतके दिवस ज्या कन्येनें आपल्यास सांभाळिलें, तिच्याशीं कृतघ्नासारखें आपण बोलून गेलों. तिच्या डोळ्याकडे

आहतांच म्हाताऱ्याला वाईट वाटलें. तो म्हणाला– " हें काय बरें बाळ! मी तुला लावून बोललों नाहीं. माझ्या मनांत काय आलें होतें, तें त्या परमेश्वराला समजत आहे. तूं माझी अत्यंत मनोभावानें आजपर्यंत सेवा करीत आहेस, हेंही मी विसरलों नाहीं. असें काय करावें बरें? माझ्या मनांत कांहींसुद्धां कपट नाहीं. मी कपटानें बोललों नाहीं. ती गेल्यापासून तुझ्या-शिवाय मला कोणी आहे का दुसरें ? हें का माझ्या ध्यानांत नाहीं होय ? ह्या म्हाताऱ्याचें सारें काम तूंच करीत आलीस. लहान पोरक्या पोराला आई सांभाळतें त्याप्रमाणें ह्या पंगू म्हाताऱ्याचें तूं संगोपन केलेंस, हें कां मी जाणत नाहीं ? तूं मला कितीतरी जपतेस ? तुला आजपर्यंत लग्नाबद्दल मागणी घालणारे कितीजण तरी आले, त्यांना तूं कबूल झाली नाहींस, अग, एवढा हा नवाब, पण— "

" इश्श मेलं! बाबा, हें काय हो? बोलतांना कांहींच अदमास ठेवायचा नाहीं कसा ? "

" इश्श काय झालें ? मी कांहीं खोटें बोललों कां ? लबाडाला भीति. कायहो डनबारसाहेब, तुम्हींच सांगा. तुम्हांलासुद्धां ह्याचें आश्चर्य वाटेल तुम्हांलासुद्धां मी नीट सांगितल्याशिवाय खरें वाटणार नाहीं. तुमच्या तोंडा-वरूनसुद्धां तसेंच दिसत आहे. पण माझी बया ती. मी नाहीं बोलत बरें. आतां ह्यापुढें मी हा आप्पलपोटेपणा आजपासून टाकला बघ; पहा तर खरी. माझी काय, आतां इहलोकची यात्रा कांहीं फार उरली नाहीं. मला आतां किती दिवस काढावयाचे आहेत ? आतां पुष्कळ झालें माझें कौतुक. नको, माझ्यासाठीं तूं कांहीं अशी राहूं नको. तूं आतां लग्नाला हो हाण. माझी आडकाठी कोणत्याही प्रकारें मनांत आणूं नको."

" बाबा, बाबा ! असं काय करावं गडे ! मीं कधीं तुम्हांला कांहीं म्हटलं तरी ? मी का तुमच्यासाठीं अशी राहिल्यें असं म्हणतां ? तसं मुळींच नाहीं. मला त्यांतल्या कोणाच्याबद्दल एवढासुद्धां ओढा वाटला नाहीं. आणि शिवाय मी तयार झालें असून तुम्ही मला नको म्हटलं असं केव्हां झालं ? "

" हें काय पहा ! मी ग कशाला नको म्हणूं ? मी जसा कांहीं नाहींच समज. तूं आतां कांहीं लहान नाहींस, तुला सगळें समजतें. तूं आपला

विचार करून काय तें ठरीव, असें सुद्धां मी तुला प्रत्यक्ष बोलून दाखविलें असेल. पण आतां सांगूं तुला ? त्या वेळेला तूं लग्न करून मला टाकून जावेंस, असें माझ्या मनांत खरोखर नव्हतें. त्या मागणी घालावयास आलेल्या लोकांपैकीं कोणी तुला—"

" बाबा, पुरे झालं आतां. दुसरा विषय नाहीं कां बोलायला ? मला कोणीं कोणीं मागण्या घातल्या वगैरे उजळणी करण्यांत काय मौज आहे ? ह्या डनबारसाहेबांना त्याचं काय बरं होय ? त्यांच्यादेखत तो पाढा कशाला ? "

डनबार मुकाट्यानें हें सर्व ऐकत होता. तो काय बोलणार ? आणि जर कदाचित् बोलायला गेला असता तर त्याच्या प्रेमानें त्याच्या हृदयांत जी खळबळ उडून गेली, ती दृष्टीस पडल्याशिवाय राहिली नसती. हा विषय डनबारला आवडत नसेल, असें कीन्सी म्हणाली. परंतु त्याला तसें वाटलें असतें काय ? त्याला आणखी किती गोष्टी तरी समजायला पाहिजे होत्या. त्याला निदान येवढें तरी समजलें कीं नाहीं-कीं कीन्सीच्या प्रेमाला आपण जरी पात्र झालों नसलों तरी ती जागा अद्याप कोणीं पटकावलेली नाहीं. पण डनबार बोलणार तरी काय ? त्यानें कांहीं तरी बोलावें, इतक्या स्थितीला कीन्सीनें आपल्या भाषणाचा ओघ आणून ठेवला खरा; आणि तो कांहीं तरी बोलेल म्हणून ती कांहीं वेळ स्वस्थ बसली. तरी डनबार आपला मुखस्तंभच ! त्यामुळें सगळ्यांनाच चमत्कारिक होऊन गेलें. पण त्यांना ह्या संकटांतून सोडविण्यासाठींच कीं काय ( किंवा दुसऱ्या भावी संकटाच्या प्रस्तावनेसाठीं म्हणून कीं काय कोण जाणे. ) एक गडी कीन्सीच्या नांवचें पत्र घेऊन आला. हें पत्र अमीराच्या बिब्बीकडून आलेलें होतें आणि त्यांत कीन्सीला जरूरीनें बोलाविलें होतें. " कांहीं महत्वाच्या कामांत तुमचा सल्ला घ्यावयाचा आहे, तरी उदयीक सकाळीं होईल तितक्या लवकर मला दर्शनाचा लाभ द्यावा " अशी विनंति त्या पत्रांत होती.

डनबार आपल्या खोलींत जाऊन निजला. कांहीं वेळानें नवाबाकडून एक हुजऱ्या पत्र घेऊन आला, आणि त्यानें डनबारला हाका मारून उठवून तें पत्र दिलें. " उदयीक सकाळीं लवकर मला येऊन भेटा; फकिराची मीं गांठ घेतली होती; त्याचीं पुष्कळ आर्जवें केल्यावर तो दुसरा प्रयोग

करण्याला तयार झाला आहे; त्यानें त्याबद्दल दिवसही मुक्रर केल्यासारखाच आहे; पण तुम्ही आलांत म्हणजे काय तो विचार ठरवून त्याला कळवूं." अशा आशयाचा मजकूर त्यांत होता. म्हणून रोजच्यापेक्षां लवकर डनबार उठला आणि नित्यविधि आटपून फेरलच्या खोलीकडे निघाला. झेनाबी बेगमचें बोलवणें कॉन्सीला आलेलें आहे, तिच्या महालाकडे ती जाणार व आपणही नबाबाकडे जाणार; तेव्हां आपण बरोबरच टांग्यांत जायला काय हरकत आहे, असा विचार करून तिला बोलावण्यासाठीं डनबार तिकडे गेला. आज कांहीं ती आपल्याला झिडकारणार नाहीं, नाहीं म्हणणार नाहीं, अशी आशा त्याला वाटत होती. फेरलचें दार बंद होतें. त्यानें दाराला धक्का दिला, तेव्हां म्हातारा अर्धेमुर्धे कपडे घालून बाहेर आला. दार उघडून पाहतो तों डनबार, तेव्हां त्या म्हाताऱ्याला थोडें आश्चर्य वाटलें. त्यानें त्याला "गुड मॉर्निंग" करून म्हटलें– "शर्थ आहे बुवा तुमची! इतक्या लवकर तुम्ही उठतां तरी कसे ? मी पहा कसा आळशी! अजून माझे कपडेसुद्धां पुरते घालून झाले नाहींत. मला तुमच्या इतकें लवकर उठण्याची संवय नाहीं. इतक्या लवकर कोणीकडे ? फिरायला कीं कांहीं काम आहे ?" डनबार बुचकळ्यांत पडला. कॉन्सी अजून कुठें पुढें येत नाहीं म्हणून विचारावें तरी कसें ? तेव्हां त्यानें आदल्या दिवशीं अपरात्रीं आलेल्या पत्राची हकीगत सांगितली आणि म्हटलें– "बेगमसाहेबांचें बोलावणें कॉन्सीबाईनाही माझ्या देखत आलें होतें, म्हणून मला वाटलें कीं आयता टांगा आहे, तेव्हां त्यांनाही बरोबरच घेऊन जावें."

फेरल म्हाताऱ्याच्या मुद्रेवर आश्चर्याचें चिन्ह स्पष्ट दिसूं लागलें. तो बोलूं लागला– "म्हणजे काय ? हा साराच चमत्कार! तुम्हांला बोलावण्याचें पत्र कालच आलें आणि तेंही निजानीज झाल्यावर इतक्या अपरात्रीं! काय गडबड आहे समजत नाहीं. आम्हीसुद्धां निजून बराच वेळ झाला असावा, इतक्यांत दुसरा एक हुजऱ्या कॉन्सीकडे आला, आणि त्या माणसाबरोबर ती तशीच रात्रीं निघून गेली." डनबारची अगदीं निराशा झाली. त्याचें हिरमुसलेलें तोंड विचित्र दिसत होतें. तो म्हणाला:– "खरोखर काय भानगड आहे समजत नाहीं खरी. इतक्या रात्रीं काय काम होतें कोण जाणे ? बेगम कांहीं आजारीबिजारी झाली आहे काय ?"

" त्या माणसानें दुसरें कांहीं सांगितलें नाहीं. काम फार जरूरीचें आहे, येवढेंच तो बोलला. " डनबार गाडींत बसून चालला असतां त्याच्या मनांत विचारांचें काहूर उठलें होतें. त्यांत कांहीं दगाफटका नसेल ना झाला, असा त्याला संशय आला. पुनः तो आपल्या मनाची समजूत घाली. पण पुनः हा संशय एखाद्या पिशाच्यासारखें आपलें डोकें वर काढी. अशी शंका घेण्याला कांहीं आधार नव्हता; निदान तसा प्रश्न कोणीं केला असता तर त्याचें उत्तर डनबारला समर्पक देतां आलें नसतें. तो मनाशीं म्हणूं लागला, " बेगम अजारी असती तर नबाब मुळींच कांहीं बोलला नाहीं कसा ? तो कांहीं तरी म्हणता. हिंदुस्थानच्या लोकांसारखा बायकोबद्दल बोलण्याची लाज वाटणारा तो नाहीं. आमच्या रीतिरिवाजाचा तो भोक्ता असल्यामुळें, उगीच कसें दुसऱ्यापाशीं आपल्या पत्नीविषयीं बोलावें, असें त्याच्या मनांत येण्याचा संभव नाहीं, आणि बेगम जर आजारी वगैरे नसली तर इतक्या घाईनें रात्रींच कौन्शीला बोलावून नेण्यासारखें काय काम होतें ? खरें, पण आतां काय काळजी करून होत आहे ? घटकेचा कांहीं प्रहर होत नाहीं. नबाबाची गांठ पडल्यावर सगळी हकीगत समजेलच कीं नाहीं ? " असा विचार करीत करीत तो नबाबाच्या वाड्यापाशीं पोहोंचला. नबाबाची गांठ पडतांच पहिला प्रश्न कौन्सीबद्दलचा. " ती इकडे आली आहे ना ? मग ती आहे कुठें ? " नबाबानें आश्चर्याची मुद्रा करून झटलें, " अहो, म्हणतां तरी काय ? मला नवल वाटतें बुवा ! कौन्सीबाई इकडे आल्या आणि मला त्यांचा कांहींच पत्ता नाहीं कसा ? आतां, माझी गांठ न घेतांच त्या परभारें झना-न्याकडे गेल्या असल्यास न कळे ? पण तसें होणार नाहीं. पण न जाणों आमच्या बिबीसाहेबांचा महाल जरा दूर आहे, तेव्हां कांहीं घाईनें त्या पर-स्पर तशाच चालत्या झाल्या असल्या तर ! मी स्वतः कधीं तिकडे जात नाहीं, कीं झनानखान्यांत पाऊल घालीत नाहीं; पण आमची बिबी जर आजारी असती तर मला नुसतें कोणी तरी कळविल्यावांचून राहिलें नसतें. बरें तर थांबा, मी कोणाला तरी तिकडे पाठवून शोध आणवितों. पण तों-पर्यंत आपण आमच्या दिवाणखान्यांत जाऊन बोलत बसूं. " नबाबानें एका हुजऱ्यास बोलाविलें आणि त्याला सगळी हकीगत सांगून झनानखा-न्यांतून चौकशी करून लौकर काय तो निरोप परत घेऊन ये असें बजाविलें.

हें सगळें कृत्य इतकें बेमालूम झालें कीं, डनबार फसला! त्याला नबाबाचा कांहींच संशय आला नाहीं. ते दोघे दिवाणखान्यांत गेले. त्याला जोडूनच एका मोठ्या खोलींत नबाबाचा पुस्तकसंग्रह होता. तेथील सर्व व्यवस्था अगदीं युरोपियन थाटाची. तावदानाचीं कपाटें, त्यांवर हस्तीदंती पेट्यांत कोरलेलीं नांवें, फिरत्या खुर्च्या, खालीं चाकें लावलेल्या खुर्च्या, सर्व कांहीं सोयी अगदीं उत्तम केलेल्या होत्या. पैशाकडे कांहीं पाहिलेलें नव्हतें. जागजागीं प्रसिद्ध विद्वान पुरुषांच्या लहानमोठ्या, रंगीबेरंगी तसबिरी टांगलेल्या होत्या. दिव्याची व्यवस्था विद्युद्दीपानें केलेली असून त्यासाठीं नबाबाच्या वाड्यांत स्वतंत्र यंत्र लावलेलें होतें.

नबाब म्हणाला– "ही माझी बसावयाची जागा. येथें दुसरें कोणी यावयाचें नाहीं. आमचे कारभारी, कारकून, सर्व मंडळी खालीं बसतात. मी पूर्वीप्रमाणें दरबार बिरबार कांहीं भरवीत नाहीं. मी एकटाच इथें बसून काम पहातों. प्रथम जेव्हां ही युक्ति मीं सांगितली, तेव्हां सगळीच मंडळी माझ्या तोंडाकडे पाहूं लागली. त्यांना वाटलें कीं, हा काय नवा प्रकार आहे! पूर्वींचे सर्व नबाब दरबारी थाटानें कामकाज पहात असत; आतां हा सर्वच साहेबी थाट होणार कीं काय? मी सर्व जुन्या चाली मोडून टाकणार, ह्याबद्दल त्यांना कोणालाही बरें वाटलें नाहीं. प्रथम कांहीं दिवस कुरकुर झाली, पण आतां तें आभाळ सारें निवळलें. फार कशाला? माझें जेवण तरी अगदीं तिकडच्या विलायती तऱ्हेनें तयार होतें. मी तिकडून एक स्वयंपाक्याही आणला आहे. येथें दुसऱ्या कोणास येण्यास हुकूम नाहीं, माझा हुजऱ्या मात्र येथें आला तरी चालतो. असो. आतां त्या फकिराकडची हकीगत सांगतों. आणखी आठ दिवसांनीं तो पुनः प्रयोग करून दाखविण्यास तयार झाला आहे. त्यांत तो आपली दिव्य सिद्धि प्रगट करणार आहे. त्यांत तुमचे सर्व संशय दूर होतील. तो कोणच्या प्रकारचा प्रयोग करून दाखविणार आहे, हें त्यानें कांहीं कळूं दिलें नाहीं, परंतु त्यानें मला असें बजावून सांगितलें आहे कीं, आमच्या लोकांच्या रीतिभाती, नेमधर्म, कुलाचार, जातिप्रकार वगैरे सर्वांची पूर्ण माहिती मी तुम्हांस करून द्यावी; म्हणजे माझ्यासारख्या नबाबाच्या घरांत कशी काय व्यवस्था असते, कोणच्या वस्तु कोठें कशा मांडलेल्या असतात, घरांतील मंडळीचा मुख्य मालकाशीं कसा संबंध येतो वगैरे

गोष्टी तुम्हांस पूर्ण समजून घेतल्या पाहिजेत. त्याप्रमाणेंच इंग्रजांच्या गृहव्यवहारासंबंधाची सर्व माहिती मीं करून घेतली पाहिजे, असेंही त्यानें सांगितलें आहे. मला तर नवीन कांहीं कळावयाचें उरलें नाहीं. मी तुमच्यामध्येंच कांहीं दिवस काढल्यामुळें मला सर्व गोष्टी ठाऊक आहेत. तुमच्यासाठीं मी तुम्हांला घेऊन आपला सर्व वाडा दाखवितों, सगळीकडे फिरवून माहिती करून देतों; माझ्या सर्व नोकरांचीं कामें काय आहेत हेंही आपल्या नजरेस आणितों. "

" मला ह्याचा कांहींच अर्थ कळत नाहीं. ह्याचें कारण काय असावें ह्याबद्दल नवल वाटत आहे. ही माहिती पाहिजे कशाला मला ? आणि ही गोष्ट त्यानें इतकी बजावून सांगण्यांत काय मुद्दा असावा हें कांहींच कळत नाहीं ! त्याचा हेतु काय असेल ह्याचा तर्क होत नाहीं. " डनबारनें धैर्य करून म्हटलें.

" कोण जाणे त्याच्या मनांत काय आहे तें ? अल्लाखेरीज या बाबतींत नुसत्या तर्कानें काय समजणार आहे ? त्याच्या सूचनेप्रमाणें आपण आपली तयारी करून ठेवावी. नाहींतर तेवढ्यावरूनच त्याचें कांहीं फिस्कटेल ! जरा त्याच्याच तंत्रानें घ्यायला नको काय ? इतके अधीर कां होतां ? सुसरीबाई, तुझी पाठ मऊ, असें म्हणायला काय वेचतें ? माझा कांहीं तसें विचारायला धीर झाला नाहीं. साईबाबांच्या म्हणण्याप्रमाणें तयारी करून ठेवायला काय हरकत आहे ! त्यांत नुकसान तर कांहीं नाहीं. "

नंतर नबाबानें डनबारला आपलें सर्व घरदार, चीजवस्त दाखविली आणि नंतर ते परत पुस्तकांच्या कपाटापाशीं येऊन बसले. जनानखान्याकडे पाठविलेला मनुष्य परत येऊन सांगूं लागला कीं, बेगमसाहेबांनीं कोणीही मनुष्य इंग्रज बिबीकडे पाठविला नव्हता; किन्सीबिबी इकडे आल्या आहेत म्हणतात, पण त्या तिकडे कालपासून आल्याच नाहींत."

डनबारनें हातपाय आपटून म्हटलें, " हायरे देवा ! तरीच माझ्या मनाला वाटेनें एकसारखी हुरहुर लागली होती. बसबस ! इथेंच कांहीं दगा आहे. तिला कोणीं तरी ठकवून—फसवून पळवून नेली ह्यांत शंका नाहीं. " आणि त्यानें नबाबाकडे अशा दृष्टीनें पाहिलें कीं, ह्यांत नबाबाचेंच अंग असावें असें डनबारला वाटत आहे, असें स्पष्ट दिसलें.

त्याला शांत करण्यासाठीं नवाब ह्मणूं लागला—" अहो डनबारसाहेब, इतके संतापतां कशाला ? जरा दमानें घ्या. घाई केल्यानें अविचार होईल. इतक्या चांगल्या बाईच्या कोण वाटेस जाईल ? "

" कोण म्हणजे काय विचारतां ? कांहीं शरम वाटत नाहीं ? दुसरे कोण ?– " तथापि एकदम हे शब्द तोंडानें उच्चारणें चांगलें नव्हे, असें मनांत आणून तोंडाशीं आलेलें नांव त्यानें गिळलें. नबाबाच्या अंगाशीं हें सर्व कृत्य येतें, असा त्याचा समज झाला होता.

" कोण बरें असेल ? " असा प्रश्न पुनः नबाबानें उच्चारिला. " कांहींच तर्क चालत नाहीं माझा. पण कांहीं तरी चमत्कारिक, कदाचित वेडावाकडा प्रकारही झाला नसेल कशावरून ? हायहाय ! अल्ला अल्ला ! त्यांच्या एका केंसाला कोणी धक्का लावण्याचें मनांत आणील तर ! — "

हें सर्व हुजऱ्या ऐकतच होता. तो हात जोडून मध्येंच म्हणाला, " मी कांहीं बोलूं कां ?" " कां रे ? तुला काय मधेंच तोंड घालायचें कारण ? म्हणजे त्यांची तुला कांहीं माहिती आहे वाटतें ? हो, जर कांहीं ठाऊक असेल तर बोल. त्यांत परवानगी कशाला पाहिजे ? अरे अजून मुका कां ? सांग, सांग, आटप. मला बघ कसें होऊन गेलें आहे. बोल, भाई बोल. तूं आज देवच झालास. बोल, तुझ्या पायां पडूं कां ? " हें बोलतांना नबाबानें जें घाबरल्याचें सोंग आणलें होतें, त्यानें डनबार पुरा फसला. त्याला वाटलें कीं, " नबाबाचें ह्यांत अंग असतें, तर त्यानें इतकी कळकळ बाळगली नसती. पण अगोदर नबाब जें म्हणाला कीं, घाबरण्याचें कारण नाहीं, तें अगदींच उगीच. त्यानें माझे सांत्वनासाठीं तसें म्हटलें. पण माझ्याप्रमाणेंच ह्यालाही कौन्सीबद्दल काळजी वाटत असावी. " तो मनुष्य कांहींच बोलेना, तेव्हां डनबारच्या तोंडचें पाणी पळालें आणि त्याच्या सर्व शरीरास कंप सुटला. तो त्या हुजऱ्याला ह्मणाला, " अजून तुझ्या तोंडाची खीळ निघत नाहीं का ? काय तुला ठाऊक आहे तें सांग लवकर ! तुझी दांतखिळी तर नाहीं ना बसली ? "

तिकडे कांहींच लक्ष नसल्याप्रमाणें तो हुजऱ्या सावकाश बोलूं लागला, "काल रात्रीं अशी गोष्ट झाली कीं,–म्हणजे पहा सरकार, मी आपला परत घरीं निजायला चाललों होतों–सरकारला मी सांगायला नको, कीं सगळ्यांची

निरवानिरव झाली, म्हणजे सगळीं दारें बंद झालीं वगैरे पाहून मग मी वाड्याच्या बाहेर पडतों तें. नवाबसाहेबांच्या लक्षांत असेलच हें ? "

" महा मूर्खा! असल्या क्षुल्लक गोष्टींची आठवण आणि ती ह्या वेळीं मला देत बसलास होय ! असा काय बावचळलास ? तुला कांहीं वेळ-काळ समजतो कीं नाहीं ? " त्याच्या अंगावर चवताळून जाऊन संतापानें नबाब म्हणाला. पण पुनः लाडीगोडीनें ह्याजपासून काढून घेतलें पाहिजे, अशी नेत्र-संकेतानें डनबारला खूण करून त्या हुजऱ्याला हळूच म्हणाला, "मी तुझ्या-वर रागावलों नाहीं. बोल बोल. तुला चांगलें बक्षीस देईन. बोल, तुला काय ठाऊक आहे तें ? तूं काय पाहिलेंस ? "

" मी मघाशीं सांगत होतों ना सरकार, कीं मी रात्रीं घरीं जात होतों—मी भर बाजारांत राहतों. माझें बिऱ्हाड कुठें आहे तें सरकारला मी पुष्कळदां सांगितलें आहे— "

डनबारचा संताप अनावर झाला. त्यानें जमिनीवर पाय हापटून म्हटलें, " लघाळ कुठला ! बोल काय पाहिलेंस तें ? "

" मी काय पहाणार सरकार, मीं कांहीं पाहिलें नाहीं. पण कानपुराकडे जाणाऱ्या रस्त्यावरून एका बिबीचा स्वर—ओरडण्याचा स्वर माझ्या कानीं आला, आणि त्या आवाजावरून ती इंग्रज बिबीच असावी असें मला वाटतें. मी कांहीं भिलो नाहीं; शूर, धीट आहें चांगला. मी आपल्या जीवाची वेळे-वर पर्वा करावयाचा नाहीं. माणूस असो कीं राक्षस असो, मी भ्यायचा नाहीं. — मी कसा आहें, हें सरकारला एकदां दाखवूं का ? "

नबाबही फार संतापून म्हणाला—" बेअक्कल ! गप बस ! नुसता कर्कश स्वरानें किर्किर्र ओरडतो आहे जसा ! अंडें घातलें कीं, कोंबडी करते कीं नाहीं, तसा ! तें कांहीं का असेना. तूं काय मग प्रताप गाजविलेस ते बोल ! त्या चोरांच्या मागें लागून त्या बिबीसाठीं दोन हात करावे कीं नाहीं ? "

" काय करूं धनीसाब ! त्या वेळीं किती रात्र झाली होती म्हणून सांगूं ! आणि जर का त्या नादीं लागून मी रोजच्यापेक्षां अधिक रात्र करून घरीं गेलों असतों, ( डोळ्यांत पाणी आणून ) तर माझी घरीं काय शोभा झाली असती ! माझी बायको हातांत स्लीपर घेऊनच उभी राहिली असती आणि मग माझ्या पाठीचें धिरडें बनलें असतें ! म्हणून तिकडे मी गेलों

नाहीं. मी पळत घरीं गेलों. वाटेनें चाललों असतां एक जण घोडा दामटीत समोरून आला, तो माझ्या जवळून गेल्यामुळें मीं चांगला पाहिला आणि सरकार, त्याला ओळखलाही. तो दुसरा कोण ? तो लबाड–हरामखोर— अली महमद–"

" या अल्ला ! अरे तोच रे तो ! तो म्हणत असे खरा, कीं एक इंग्रजी बिबीवर आपलें मन बसलें आहे, आणि संधी साधून तिला आपण उपटून नेणार. तेव्हां त्याचेंच हें काम खास ! संशय नको ! "

डनबार ह्मणाला–" तर मग आतां उशीर का ? चला, आपण त्याचा पाठलाग करून त्याला पकडूं ! "

" होय, सगळें खरें; पण जाणार कोणीकडे ? थांबा, पाहूं बरें. तो आतां असें करील: कदाचित् तिला घरांतच कोंडून लपवून ठेवली तर ! तेव्हां अगोदर शहरांतच शोध केला पाहिजे आणि तिला घेऊन तो जर कानपूरलाच गेला असला तर ? मी हा जातों स्टेशनवर आणि आगगाडीनें गेला कीं काय ह्याची चौकशी करितों. आणि मित्र, तुम्ही आतां वेळ घालवूं नका. मी घोडे देतों त्यांच्यावर स्वार व्हा आणि त्याच्या घरीं जा. त्याचें घर रेसिडेन्सीच्या पलीकडे जवळच आहे. "

नबाबानें हुकूम केल्यावर लगेच घोडे तयार होऊन आले. एकावर डनबार बसला आणि त्याच्या साहाय्याला म्हणून नबाबानें आपले दोन स्वार बरोबर दिले. तिघांना तीन तरवारी आणि पिस्तुलेही नबाबानें दिलीं.

डनबार स्वार झाल्याबरोबर अगदीं अधीर झाला होता; नबाबानें दिलेलीं हत्यारें घेऊन त्यानें घोड्याला टांच दिली, तेव्हां इंग्रजी पद्धतीप्रमाणें नबाब ओरडून ह्मणाला:–" जा, तुम्हांला अल्ला यश देवो ! मी हा इकडे स्टेशनाकडे निघालों ! "

पण नबाब स्टेशनाकडे गेला नाहीं, तो आपल्या रंगमहालांत जाऊन मच्छरदाणींत पलंगावर स्वस्थ निजला !

# प्रकरण ८ वें,

## प्रेममीलन.

डनबार व त्याच्या दिमतीस दिलेले स्वार ह्यांनीं सारखे घोडे दामटून छत्तर मंझील तेव्हांच गांठलें, आणि नदीकांठच्या रस्त्यानें रेसिडेन्सीवरून ते पुढें चालले. कांहीं वेळानें त्यांस तीन रस्ते मिळालेला त्रांगडा लागला. तेव्हां तेथें त्यांनीं घोडे थबकविले. त्यांतला एक रस्ता इमामवाड्याकडे जातो, दुसरा शहराकडे आणि तिसरा नदीकडे. त्यांनीं गांवच्या रस्त्याला घोडे वळविले आणि थोडेसें पुढें गेल्यावर त्या दोघां स्वारांपैकीं एक जण एका मोठ्या आवाराच्या घराकडे बोट दाखवून ह्मणाला–" तें पहा त्याचें घर." घरांत अगदीं सामसूम होती. माणसांची कांहींच चाहूल लागेना. घराच्या खिडक्या बंद, दाराला कड्या, वगैरे पूर्ण बंदोबस्त दिसला. आवाराच्या फाटकापाशीं गेल्यावर नबाबाचा खास हुसऱ्या अलीखान खालीं उतरला आणि दाराला धक्के देऊन कडी काढण्यासाठीं हाका मारूं लागला. पण कोणी उत्तर देईना तेव्हां डनबारनें घोड्यावरून उडी टाकली आणि दाराला थाडकन् लाथ मारिली, त्याबरोबर दार मोडून पडलें! घरांत मनुष्य कोणी दिसेना, इतकेंच नव्हे, तर सामानही कांहीं नव्हतें.

तेव्हां त्यांच्या अंगावर ओरडून डनबार म्हणाला:—" हें काय रे हें! माझी थट्टा करतां काय? मला ह्या रिकाम्या घरांत कशाला आणिलें?"

" छे हुजूर, आम्ही चुकूं कसे? घर तर हेंच. तो ठक येथेंच रहात होता. त्यानें आपला सर्व मालसुद्धां लंपे केला असें दिसतें!"

तो दुसरा स्वार म्हणाला–" होय रे खान! तरीच बरें, काल इथें, ह्या दारापुढें एक सामानाची भरलेली गाडी होती. मला वाटलें, सामान उतरीत असतील; पण ह्यावरून त्यांनीं सामान भरून चालविलें होतें असें दिसतें. चला माडीवर, वर कोणी असलें तर पाहूं!" ते तिघे जिना चढून वर गेले.

तिथें एका चटईवर एक मनुष्य घोरत पडला होता. त्याला उठवून विचारतां, तो प्रथम तारवटल्यासारखेंच करूं लागला. तो म्हणाला–" मला

कांहीं माहीत नाहीं. अली महमद इथून गेल्याला दोन दिवस झाले. "

डनबारचा राग अनावर झाला; त्यानें त्याचा हात हिसकून त्याला दोन धक्के दिले आणि म्हटलें—" हरामजादा ! इथून सामान गेलेलें काल ह्या मियानें समक्ष पाहिलें. आणि तूं म्हणतोस तो गेल्याला दोन दिवस झाले !"

" जी हुजूर, तसेंच असेल. मला नीट स्मरण रहात नाहीं !"

अलीखान कातावून म्हणाला-" असें असें ! तूं बऱ्या बोलानें ऐकायचा नाहींस. थांब, तुला चवदावें रत्न दाखवितों. उडवितों तुझी चटणी ! म्हणजे तुला वाचा फुटेल ! " असें बोलत बोलत त्यानें आपला जोडा काढिला आणि त्याला यथास्थित बडविलें ! तेव्हां तो घरांत सांपडलेला मनुष्य रडूं लागला आणि आर्जवें करून म्हणाला—" हुजूर, मला मारूं नका ! मला ठाऊक आहे तें सारें सांगतों ! "

" बोल तर बोल, हुजूर तुला बक्षीस देतील !" बक्षीस शब्द ऐकल्याबरोबर त्या इसमानें कान टवकारिले आणि हात पुढें करून म्हणाला— " द्या, द्या काय देणार तें. सांगा सांगा ! " त्याच्या आशाळभूतपणाचा डनबारला फार संताप आला, त्यानें धांवत जाऊन त्याची मानगुटी धरली आणि म्हटलें—" हें बघ, मी तुला बक्षीस देईन; खरोखरच देईन ! पण किती, काय, असला लुत्रेपणा करीत बसूं नको. वेळ न घालवितां लवकर काय तें बोल ! नाहीं तर असाच गळा दाबून ठार मारतों ! "

" हा असा गळा दाबल्यावर मी कसा बोलूं ? जरा बोटें सैल करा !"

डनबारनें गळचेपी जरा सैल केली, आणि त्याला म्हटलें-" काल तुझ्या मालकानें इथें एक इंग्रजबाई आणली होती ना ?"

" होय, फार उशीर झाला होता. "

" बरें तर, एवढें खरें बोललास ! "

" जी हुजूर, मी सारें सांगतों. जणूं काय मी अल्लापुढें उभा आहें असें समजून हुजूरपासून कांहीं लपवीत नाहीं. हुजूरला सारें समजणार ! अल्लापासून माणसाला काय चोरून ठेवायला येईल ? माझा मालक इथून गेला आणि तो बीबीला घेऊन गेला. त्याला जाऊन तीन तास झाले. "

" मग तो कोठें गेला, ठाऊक आहे तुला ? "

" कानपूरला जाणार ह्मणत होता ! "

" तूं म्हणतोस हें खरें ठरलें तर संध्याकाळीं तुझें बक्षीस तुझ्या घराकडे पाठवून देईन. चल चल, अल्ली, आतां स्टेशन गांठलें पाहिजे अगोदर! "

ते जिना उतरूं लागले. अल्ली मध्येंच थबकून कांहीं सुचल्यासारखें करून म्हणाला, " थांबा, हुजूर थांबा! ह्यानें तो काफर कानपूरला गेला म्हणून म्हटलें, पण कानपूरला आहेत दोन वाटा! एक आगगाडीची आणि दुसरी सडकेची. मग कसें करावयाचें ?" नंतर त्या घरांत सांपडलेल्या माणसाकडे वळून त्यानें विचारलें-" ह्या दोहोंपैकीं कोणच्या रस्त्यानें तुझा मालक गेला ? "

" तो सडकेनें गेला; नवीन सडकेनें गेला. स्टेशनाच्या पलीकडून तुरुंगाच्या जवळच्या सडकेनेंच तो गेला. बीबीला एक मेण्याची गाडी केली आहे. तिचे पडदे सोडून बाहेरून कोणाला दिसूं नये असा बंदोबस्त केला आहे. आणि जर लोकांच्या रहदारीच्या ठिकाणीं ती ओरडेल तर तिच्या तोंडांत बोळा घालण्याचीहि तयारी केलेली आहे. "

डनबारनें घोड्याच्या जीवाकडे पाहिलें नाहीं; घोडा चौपाय सोडला आणि आपल्या बरोबरच्या स्वारांनाही घोडे दामटा ह्मणून तो वरचेवर सांगत असे. पोलीस ठाण्यावरून असे घोडे चाललेले पाहून पोलीस शिपाथी टवकारून पाहूं लागले. आणि कदाचित त्यांनीं हाका मारून अडवलेंही असतें; परंतु त्यांत एक साहेब आहे, तेव्हां हे कांहीं तरी घाईच्या कामाला निघालेले असतील असें समजून पोलिसचे लोक मुकाट्यानें राहिले. बालरामपूर इस्पितळापर्यंत पोंहोंचल्यावर अल्ली म्हणाला- " हुजूर, आतां ह्या सडकेच्या रस्त्यानें जाऊन उपयोग नाहीं. इथून असे मधून शेतांतून वाट काढून जाऊं, आणि पुढें तशी आडवी सडक लागेल तेथें तुरुंगाजवळ पुनः रस्त्याला लागूं. बीबी कांहीं फार पुढें गेल्या नाहींत खास. त्या तुरुंगाच्याहिपुढें फार गेल्या नसतील. "

डनबारच्या मनांत आलें कीं, ह्या घरांत सांपडलेल्या माणसानें अर्धवट खरी गोष्ट सांगून आपल्याला फसवलें तर नसेल ? कांहीं खरें, कांहीं खोटें सांगितलें म्हणजे सगळेंच खरें मानून फसणें साहजिक आहे. अल्ली अहमद मुळीं आगगाडींतूनच गेला असला तर ? " असा संशय घेऊन त्यानें अल्लीखानाला आपल्या मनांतील शंका कळविली. तेव्हां तो नबाबाचा हुजऱ्या म्हणाला-" हुजूर, अलीअहमद इतका वेडा नाहीं. तो फार धूर्त

आहे. असली भलतीच चूक तो करणार नाहीं ! प्रथम त्यानें सर्व विचार केला असला पाहिजे. आपण लखनौ सोडून कानपूरला गेलों म्हणजे आपला पाठलाग झाल्याशिवाय राहणार नाहीं; प्रथम लोक आगगाडीकडे धावतील; कारण तो रस्ता जवळचा आणि सोपा. दुसरें असें पहा कीं, त्यानें मनांत आणलेंच असेल कीं, ही इंग्रज बीबी स्टेशनपर्यंत झाकून नेऊं, पण आगगाडीच्या धक्क्यावर कशी गुपचुप नेतां येईल ? गोषा म्हणून तिचें नखही बाहेर दिसूं देणार नाहीं, पण ती ओरडली किंवा अडली तर मग तिच्याशीं हिसकाहिसकी तिथें करतां येणें शक्य नाहीं. छे हुजूर, तसें झालेंच नाहीं; तो आगगाडींत बसायलाच जाणारच नाहीं. तो तिकडे गेला नाहीं हें खास. त्यांतून तसली त्याला बुद्धि सुचून त्यानें बिबीला आगगाडीनें नेलीच असली, तर तिकडे नबाबसाहेब गेले आहेतच; त्यांनीं त्याचा पत्ता काढलाच असेल आणि त्याला धरण्याचा उपाय ते करीतही असतील. पण मला वाटतें कीं, तो ह्या सडकेनेंच गेला असावा; आणि त्यांतही तो गाडी करून गेला असावा."

हें ऐकल्यावर, त्या हुजऱ्याचेंच म्हणणें खरें असावें, त्यानें तर्क बरोबर ठरविलेला दिसतो, असें डनवारला लगेंच पटलें. म्हणून अधिक चिकित्सा करण्याच्या भानगडींत न पडतां त्यानें आपला घोडा शेतांतून घातला आणि त्याला टांच दिली. वाटेंत खांचखळगे लागले, जुन्या पडक्या घरांच्या भिंती आडव्या आल्या, पण त्यांवरून त्या चपळ जनावरानें ताडकन् उडी मारून एखाद्या शर्यतींतल्या घोड्याप्रमाणें आपली कामगिरी बजावली ! जणूं काय जिवावरचा प्रसंग टाळण्यासाठीं पळणाऱ्या स्वाराप्रमाणें घोडा चौखूर काढून डनवारनें घोड्याच्या अंगाचें पाणी पाणी केलें ! अनेक प्रकारच्या कुशंकांनीं त्याच्या मनाची त्रेधा उडवून दिली होती. त्याला वाटे कीं, आतां आपण पंख लावून उडून जावें कीं काय करावें ? जर कां तिच्या अब्रूला त्या मांगानें धक्का लावला असला, तर मागाहून तेथें जाऊन काय उपयोग ? व रागाच्या भरांत अलीमहमदला त्यानें दर मिनिटास शिव्या देण्याचा सपाटा चालविला होता. आणि 'जर का तिच्या अंगाला हात लावला असशील तर तुझीं शंभर वर्षे भरलीं समज; आधीं तुला गोळी घालून ठार करीन, आणि मग पुढचा विचार !' असा निश्चय त्यानें कितीदां तरी मनाशीं केला.

ह्या प्रमाणें हे तिघे धडपडत जातां जातां अर्ध्या तासानें कानपूर रस्त्याला लागले. रस्त्यावर धूळ पुष्कळ होती आणि त्यांत गाडीची चकारी स्पष्ट उमटली होती. परंतु त्या चकारीच्या बाहेर गाडीच्या घोड्यांच्या टापाशिवाय दुसऱ्या घोड्यांच्या टापा दृष्टीस पडेनात. त्यावरून अली अहमद घोड्यावर नसावा, त्यानें घोडा परत लावून देऊन आपण गाडींत बसला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या सडकेला फारशी रहदारी......आणि त्या वेळीं तर कोणीच जवळपास दिसेना. झाडीच्या पलीकडे रस्त्याला वळण होतें. त्या वळणावर एक चौचाकी हळुहळू चाललेली दिसावयास लागली. तेव्हां तिला थांबण्याची सूण करून अल्लीखाननें पुष्कळ हाका मारल्या, पण त्या गाडीवानास ऐकूं आल्या नाहींत, किंवा ऐकूं जाऊनही तो लक्ष देत नाहीं असें दिसलें. तथापि कांहीं वेळानें गाडी हाकणारानें मागें पहात पहात घोडे खेंचून धरून उभे केले. हें पाहून डनबार म्हणाला—" हें रे काय अल्ली ? ती गाडी तर उभी राहिली ! शिवाय आपल्याला पाहून ती मंडळी घाबरल्याचेंही दिसत नाहीं. म्हणून म्हणतों त्या हरामखोरांची ती गाडी नसेल कदाचित् !" हुजूर अल्लीखान उत्तरच देईना : तो आपल्या दाढीवरून पुनः पुनः हात फिरवूं लागला आणि त्यावरून तो उत्तराची योजना करीत आहे असें वाटलें. शेवटीं तो म्हणाला, " खरेंच कीं हो हुजूर ! आपल्याला पाहून गाडी उभी राहिल्यासारखें दिसतें. आपणाजवळ जाण्याची वाट पहात आहे कीं काय ? आतां असें करूं या आपण घोडे पिटाळीत गेलों तर ती मंडळी घाबरतील; म्हणून आपण जरा बेतबेतानें जाऊं, म्हणजे त्यांना तितकें भय वाटणार नाहीं." तेव्हां डनबार तर जरा मागेंच वळूं या असें म्हणणार होता पण इतक्यांत अल्लीखान ओरडून म्हणाला—" हुजुर, हुजूर ! पळा हो पळा ! ते निघाले, गेले पहा !" डनबारनें गाडीकडे वळून पाहिलें, तों त्या गाडीचे घोडे मोकळे केले होते आणि दोन इसम त्या गाडीच्या घोड्यांवर स्वार होऊन गाडी तेथेंच टाकून चालते झाले. ते सरळ रस्त्यानें न जातां आडवाटेनें निघाले होते.

अल्लीखान म्हणाला—" चला, आपण त्या दोघांना पकडूं. " असें बोलून तो आणि नबाबाचा दुसरा नोकर असे दोघे त्या पळालेल्या इसमांच्या मागें गेले, पण डनबारनें आपला घोडा गाडीच्या रोखानें पिटाळला. तो

जरासा पुढें गेल्यावर गाडींतून कोणी तरी हातानें खुणावीत आहे असें दिसलें. गाडींतील स्त्रीनें खिडकींतून बाहेर डोकावल्याबरोबर, ती कीन्सीच आहे असें डनबारनें ओळखिलें. अशा प्रकारच्या दर्शनानें डनबारच्या चित्ताची काय स्थिति झाली, ती शब्दांनीं सांगतां येणार नाहीं. आतां केव्हां गाडी गांठीन असें त्यास झालें होतें. पुन्हां शर्यतींतील घोड्यांच्याप्रमाणें डनबारनें आपला घोडा जोरानें काढला तरी त्याला वाटलें कीं, घोडा फारच सावकाश चालला आहे!

"चार्ली, चार्ली," हे मंजुळ स्वरानें उच्चारिलेले शब्द त्याच्या कानीं आले. प्रथम त्याला तें खरें वाटेना. असले प्रेमाचे शब्द कीन्सीच्या मुखांतून आले असतील काय, ह्याबद्दल त्याची त्याला शंका वाटूं लागली. पण गाडींत कीन्सी आहे, हें त्यानें पक्कें ओळखिलें होतें आणि तिनें उघडलेले ओंठही त्याला दिसले; तेव्हां ते शब्द खरोखरच तिच्या तोंडून निघाले याची शंका राहिली नाहीं. इतक्यांत गाडींतल्या स्त्रीचें मुख अगदीं कोमेजून गेलें आहे, निस्तेज झालें आहे, असें त्याच्या लक्षांत आलें. व तिला आश्वासन देण्यासाठीं तोही 'कीन्सी' म्हणून मोठ्यानें ओरडला, पण इतक्यांत जरा लगामाचा हात सैल पडल्यामुळें अवसानाच्या बाहेर पिटाळलेल्या त्या घोड्यास ठेंच लागली आणि तो एकदम खालीं कोसळला! कीन्सीचें सर्व लक्ष इकडेच होतें. घोडा पडतांना पाहून ती दाराला धक्के देऊं लागली. पण दार घट्ट बसविल्यामुळें तें तिला उघडेना. आतां कोणी कांहीं म्हणो, उगीच लाजत बसण्याची ही वेळ नव्हे, असा विचार करून ती धडपडत खिडकींतून बाहेर पडली आणि धांवत पळत डनबारच्या जवळ आली! डनबार घोड्यावरून खालीं पडून त्याला जबर मूर्च्छा आली होती. त्याला पाणी पाहिजे म्हणून सडकेवरून इकडे तिकडे पाण्याच्या शोधार्थ ती धांवत गेली; परंतु पाण्याचा थेंबही दृष्टीस पडेना. तेव्हां निराश होऊन ती परत आली. तेथेंच सडकेवर ती बसली आणि डनबारचें मस्तक हळूच उचलून तिनें आपल्या मांडीवर घेतलें, आणि "चार्ली, चार्ली," म्हणून ती ओक्साबोक्सीं रडूं लागली! आपल्या अंगांत इतकी धिटाई, निर्भीडता कशी आली ह्याचें तिचें तिलाच नवल वाटलें, आणि कोणी आपला हा निलाजरेपणा पाहण्यास आहे कीं काय, म्हणून चोहोंकडे पाहूं लागली. जवळपास कोणी

नव्हतें, त्यामुळें तिला थोडेंसें बरें वाटलें. आपल्या प्रेमाचें जें हें प्रदर्शन झालें, आपण प्रेमपूर्ण शब्दांनीं जी हाक मारली, ती कोणालाही ऐकूं गेली नसावी, असा धीर येतांच ती जरा धीट झाली. प्रेमाशिवाय अशी हाक येणार नाहीं, हें जरी खरें, तरी तें कोणाला समजूं नये असेंच तिला वाटत होतें. तरी पण डनबारची मूर्छा पाहून तिला अतिशय दुःख झालें आणि त्यामुळें तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा लागल्या. त्यांचे कांहीं थेंब डनबारच्या तोंडावर पडले, ते तिनें खालीं वाकून चुंबन घेऊन पुसून टाकले. त्याच्याबद्दलच्या प्रेमामुळें तिला दुःखावेग न आवरून तिच्या डोळ्यांतील अश्रु त्याच्या मुखावर पडले आणि हा अपराध कोणास उमगूं नये म्हणून तिनें पुनः चुंबन घेण्याचा दुसरा अपराध केला! पण तिला तसें वाटलें नाहीं. पहिल्या चुकीची दुरुस्ती आपण केली, असें ती आपल्या मनांत म्हणत होती. पण आपलें हें कृत्य सर्वच व्यर्थ गेलें,—हें कोणासच समजलें नाहीं तर मग काय उपयोग ?—असें तिला वाटूं लागलें. "निदान माझ्या चित्ताचे मालक 'चार्ली' यांना एकदां हें कळतें तर बरें होतें, पण ते आतां शुद्धीवर कसे येतात ? ही मूर्छाच जर,—अगबाई! महामूर्छा झाली, पुनः हे जर सावध झाले नाहींत, तर मग माझें प्रेम व माझें सर्वस्व मी ह्या चरणीं अर्पण केलें होतें, हें त्यांना कळेल कसें ? निदान आज सर्व लाजलज्जा सोडून मीं ह्या मुखचंद्राचें चुंबन घेतलें, येवढी गोष्ट जरी इकडे कळली असती तरी बस्स होतें. परंतु ईश्वरा, मी इतकी का दुर्भागी आहें ? आणि खरोखर पुनः ह्या दिव्यनेत्रांनीं माझ्याकडे पहाणें होणारच नाहीं काय ? मीं आजपर्यंत माझें प्रेम चोरून ठेविलें, ही किती चूक केली ? ह्याच्या मागेंच हें कळवावयास पाहिजे होतें. देवा ! इतका मीं तुझ्यापाशीं कोणचा अपराध केला कीं, त्या योग नें माझ्या प्रेमाची उत्कलिका फुलली, तों लगेच ती करपण्याची वेळ यावी ?" इतकें बोलून तिनें मोठ्या कळवळ्यानें देवाचा धावा केला ! तिची ही अनन्यभावाची विनंती ईश्वरापाशीं रुजु झाली ह्मणा किंवा कांहीं ह्मणा, ती पुनः त्याच्या मुखाकडे पहाते तों तो परत शुद्धीवर येण्याचें चिन्ह दिसूं लागलें. एवढा वेळ त्याच्या मुखावर निस्तेजपणा दिसत होता, तो आतां किंचित कमी होऊन, सकाळीं अरुणोदयाचे वेळीं जसा प्रकार होतो, तसा भास होऊं लागला. तिनें आपले ओंठ डनबारच्या कानापाशीं नेऊन

हळूंच ह्मटलें, " चालीं, प्रियकरा ! " त्या तिच्या शब्दाच्या विद्युत्तेजानें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, डनबारनें डोळे उघडले, आणि कीन्सीची दृष्टादृष्ट होतांच पुनः मिटले. तें पाहून कीन्सी अगदीं लज्जेनें भयभीत झाली. तिला वाटलें कीं, डनबार खरोखरच एवढा वेळ मूर्च्छित होता किंवा नव्हता ? कोण जाणे ! ह्यानें मुद्दाम सोंग करून माझें मनोगत सर्व ऐकलें असेल तर मात्र अगदीं फजिती ! " म्हणजे पहा: मरण्यापूर्वी आपलें प्रेम आहे येवढें डनबारला कसें तरी समजावें, असें जिच्या मनांत नुकतेंच येत होतें, तिला आतां त्यानें आपलें सर्व भाषण ऐकलें असल्यास अगदींच भलतें झाल्यासारखें वाटावें, हा काय चमत्कार आहे पहा ! अशा निराळ्याच आवेगानें तिचें हृदय पिळवटत आहे, तोंच डनबार डोळे मिटूनच झोंपेंतल्यासारखें बरळूं लागला, " कीन्सी, माझी प्रिया कीन्सी ! हायहाय ! तिचें रक्षण आतां कोण करील ? देवा, आतां तिला त्राता तुझ्याशिवाय कोण आहे ? परमेश्वरा, तिला ह्या दुष्टांच्या हातून सोडीव!" ह्या त्याच्या बोलण्यावरून तो शुद्धीवर नाहीं, ही खात्री होण्यास उशीर नव्हता. लज्जेनें तिच्या सर्व मुखांवर जें रक्तांबर चढविलें होतें, तें कांहींसें कमी जाज्वल्य होऊन ती ह्मणूं लागली, " तर मग माझे शब्द इकडे ऐकूं गेले नाहींत तर ! मी ह्यांच्याइतकी जवळ आहे, अशा कल्पनेचं हें बरळणं नाहीं. परंतु ह्यावरून इकडचं प्रेम मजवर किती आहे, हें व्यक्त होत आहे. आणखी ह्यापेक्षां मला काय पाहिजे ? " तिनें त्याच्या तोंडावर आलेले केस एका बाजूस केले आणि आपल्या हातानें त्याचें तोंड पुसून हळच ह्मटलें, " डनबारसाहेब, डनबारसाहेब, सावध व्हा !" हे शब्द कानीं पडतांच, डनबार दचकला. त्यानें डोळे लख्ख उघडिले आणि कीन्सीकडे पाहून तिला ओळखून हास्यमुख केलें !

" देवा, धन्य आहे तुझी ! तुझी लीला अगाध आहे. वहावा ! आपण सुरक्षित आहांना ? आपल्याला कांहीं इजा झाली नाहींना ? "

ती म्हणाली; " हं हं पुरे, गप्प रहावं गडे. आतां लवकरच बरं वाटेल. घोड्यावरून पडल्यामुळें बराच धक्का बसून मूर्छा आली होती; ह्यापेक्षां जास्त कांहीं झालं नव्हतं असं दिसतं. "

डनबार हंसत हंसत ह्मणाला, " बरें, समजलों मी. कांहीं काळजी करावयास नको; मी आतां चांगला सावध झालों आहें. मला आतां बरें वाटूं

लागलें आहे. तथापि हल्लींच्या स्थितींतच पडून रहावयास सांपडेल तर उत्तम असें मला वाटतें. ह्या स्थितींतून हालूं नये असें मन सांगत आहे. " ह्या बोलण्याचा अर्थ क्निसीच्या लक्षांत येतांच ती फार खजिल झाली, आणि स्त्रीजातीस सहज अशा मर्यादेनें तिच्यावरील स्वामित्व पुनः बळकाविलें; तेव्हां ती ह्मणाली, " इश्श, हें काय बाई ! डनबार साहेब, आपण सावध झालां, हें ठीक झालं. पण आतां लवकर उठावं ह्मटलं. माझ्या गुडघ्याला कळ लागली आहे. गडे पुरे आतां. " हें ऐकतांच डनबार उठून बसला आणि तसाच धडपडून उभा राहिला. " मी किती मूर्ख पहा ! मी आपल्याच सौख्यांत दंग होऊन गेलों; तुमच्या नाजूक गुडघ्याला माझा भार जड झाला हें माझ्या लक्षांतच आलें नाहीं. " डनबार उभा राहिला खरा, पण त्याचा झोंक जात होता, तेव्हां त्याला हात देऊन सांवरणें क्निसीला भागच पडलें. ती म्हणाली, " अजून चांगलीशी शक्ति अंगांत आली नाहीं. मी कुठून बोलल्यें बाई कोण जाणे ! मी उगीच उठायला लावलं ! "

डनबारनें तिच्याकडे हास्यमुखानें पाहिलें आणि ह्मटलें " नको नको, मला आतां सांवरून धरायला नको. पण आपला गुडघा आतां कसा आहे ? " ह्याला क्निसी काय उत्तर देणार ? तेव्हां डनबारचा प्रश्न आपल्या कानींच आला नाहीं किंवा नीट समजला नाहीं, असें दाखविण्याचा तिनें यत्न केला. ती ह्मणाली, " आतां असं किती वेळ उभं रहायचं ? घराकडे परत चलायचं ना ? चालण्यासारखा धीर वाटत नसला, तर इथेंच थोडी विश्रांति घेऊन मग निघूं. बसावं जरा खालीं. " " अं:, त्यांत काय आहे! आतां चालायला कांहीं हरकत पडणार नाहीं. नाहीतर तुझा हात इकडे दे पाहूं, मग मला कांहींच पंचाईत नाहीं; तुला धरून मी कसा तरी चालेन. " हे डनबारचें बोलणें तिनें ऐकिलें, पण ती ही गोष्ट कबूल करीना. डनबारनें तर त्याबद्दल हट्टच धरल्यासारखें केलें, तेव्हा तिनें एकदाचा हात दिला. तेव्हा त्यानें तो चांगला आपल्या पाठीमागून ओढून घेतला आणि मग दोघें स्टेशनच्या बाजूच्या धोरणानें निघालीं. त्यांना पाहिजे तशी ह्या वेळीं स्थिति होती; हवेमध्यें अद्याप थंडाई होती. आणि रस्त्यावर दुतर्फा झाडांची सावली होती. डनबारनें हळूंच गोष्ट काढली, " पण हा असला कसला प्रसंग तुमच्यावर आला ? असें झालें तरी कसें ? "

क्निसीनें अगदीं केविलवाण्या स्वरानें ह्मटलें, " नको बाई- त्याची इतकी

घाई कशाला ? अगोदर घरीं तर जाऊं ! " तिला ह्या वेळीं इतका आनंद झाला होता कीं, त्या वेळीं असल्या सुखाचा भंग करणाऱ्या त्या क्लेशमय स्थितीची आठवणही ह्या वेळीं नकोशी वाटली. कांहीं वेळ चालल्यावर डनबार ह्मणाला, " पुरे आतां, मला आपल्या हाताचा आधार नको. मला तसेंच चालायला येईल असें वाटतें. " हे शब्द डनबारच्या तोंडांतून येण्याचा अवकाश कीं, कीन्सीनें आपला हात काढून घेतला. डनबारला वाटलें कीं, हिला राग आला कीं काय, म्हणून तो बोलूं लागला. " असें नका समजूं हो. मला आपला नाजूक हात असाच राहिला तर पाहिजेच आहे. ह्या गुलाबाच्या फुलाची तृप्ति कोणाला होईल ! माझ्या मनांत असें वाटलें कीं, येवढ्या कोमल हातावर माझा एवढा शरीराचा भार कसा आणि किती वेळ टाकावयाचा ? ह्या देहाचा सगळा जड भार आपल्याला तोलून धरावा लागला होता. "

कीन्सी म्हणाली, " मी नाहीं असं म्हटलं कांहीं ! ह्यांत कसला भार ? आणि असला तरी, प्रसंग पडल्यावर तो तसा नको का सोसायला ? माझ्यावर असला वेडावाकडा प्रसंग आल्या वेळीं माझ्यासाठीं येवढं धावून येणं झाल्यावर मी येवढं सुद्धां करायला नाहीं कसं म्हणूं ? आपण जर आलां नसतां तर माझं काय झालं असतं कोणाला ठाऊक ? " हें बोलतांना तिला गहिंवर आला. तिचा शब्द उमटेनासा झाला. डनबारला हें सारेंच चमत्कारिक वाटूं लागलें. त्याला कशाचाच उमज पडेना. कीन्सीचा आपल्यावर राग आहे म्हणावें तर तशा प्रकारचेंही हें बोलणें दिसेना. आपण जी काय तिच्यासाठीं थोडी फार खटपट केली, त्याबद्दल तिच्या मनांत कांहीं तरी वागत असलें पाहिजे, असें दिसलें.

आतां मात्र डनबारचा मनोद्वेग अनावर झाला. तो मोठ्या गद्गद-स्वरानें म्हणूं लागला. " तो सर्वज्ञ परमेश्वर सर्व कांहीं जाणत आहे. आपले माझ्यावर किती उपकार झाले आहेत, हें सांगत बसल्यानें संपणार नाहीं. मी आपल्या जिवाला अगदीं कंटाळून गेलों होतों. ह्या जगांत माझें असें कोणीच वाटेनासें होऊन मला क्लेश होऊं लागले होते; एकटें पडल्यासारखें वाटत होतें. त्या माझ्यामध्यें आपल्या दर्शनानें एक प्रकारचें चैतन्य उत्पन्न झालें ! माझ्या रक्षा होत होत निवत जाणाऱ्या जीवित-अग्नि-कणाला आपल्या समागमानें आनंदाची झुळुक लागून तो प्रफुल्लित झाला आहे.

माझें आयुष्य व्यर्थ आहे अशी माझी समजूत होऊं लागली होती, ती बदलून आपल्या दर्शनानें माझ्यांत कर्तव्यजागृति झाली. असल्या कठीण प्रसंग आपल्यावर आला असतांना ईश्वरानें माझ्याकडून आपल्याला अल्पसें साहाय्य कराविलें. शिवाय आणखी कांहीं सांगणार होतों: काय म्हणत होतों पहा: मला एक स्वप्न पडल्यासारखें वाटलें. स्वप्नच असेल तें. ईश्वरकरणी अगाध आहे. तो काय कशा तऱ्हेनें घडवून आणील हें सांगतां येत नाहीं. कधीं कधीं स्वप्नांत पाहिलेल्या गोष्टी खऱ्या होतात, पण इतकें माझें दैव आहे काय ? माझें स्वप्न जर खरें होईल, तर—पण जाऊं द्या. मी आपलें स्वप्न सांगून टाकतों. मी बेशुद्ध होऊन पडलों असतांना मला असा भास झाला कीं, कोणी तरी माझें नांव घेऊन हाका मारीत आहे. आवाज मात्र मंजूळ होता, पण तो प्रथम दुरून येत होता. मग तें माणूस—स्वर्गीय देवता-माझ्या अगदीं जवळ आली आणि त्या देवीनें आपल्या अधरोष्ठांनीं ह्या माझ्या कपोलास मृदु असा स्पर्श केला ! तेणेंकरून मी पवित्र झालों. मला धन्यता वाटली ! पुढें ती देवता–"

" इश्श मेलं ! खोटं तरी किती बोलावं ? कांहीं तरी मनानं रचून सांगायचं झालं !" इतकें बोलत बोलत कॉन्सीनें एक मुरका मारला !

डनबारनें आपलें बोलणें तसेंच पुनः सुरू केलें. " खोटं म्हणजे ? मी काय हें आपल्या पदरचें सांगत आहे थोडेंच! माझें सगळें बोलणें तर ऐकून घ्या. आपण तेथें होतांना ? माझें स्वप्नच जर तें असेल आणि तें जर खोटें असेल तर आपण तसें म्हणा म्हणजे झालें. मी पुनः ते शब्द तोंडानें काढणार नाहीं ! मग ह्या असल्या सुंदर ओंठावाटे तसें एकदां ऐकल्यावर मी हट्ट सोडून देईन. माझ्या स्वप्नांतली इमारत ढासळल्याबद्दल मला फार दुःख होईल, हें खरें; आणि प्रथम एकदां त्याबद्दल कष्ट होतील. पण मी अशा गुलाबाकडून खोटी ठरलेली गोष्ट जिवाशीं बाळगून रहाणार नाहीं. कॉन्सी–छे छे, फेरेल–कॉन्सी फेरल–ती देवता, ती स्वर्गीय देवता, ती परी, माझ्या नांवाचा सुंदर उच्चार जिच्या मुखावाटे येत असतां मला तो अत्यंत रागदारीच्या गाण्यापेक्षांही प्रिय वाटला–ज्या अप्सरेनें माझ्या ह्या भालप्रदेशीं आपल्या मुखानें चुंबन घेऊन मला पावन केलें–ती कोणी दुसरी नव्हती. पहातों तों–प्रियसखे, तूंच ती ! " इतकें बोलून त्यानें तिच्या कंबरेभोंवतीं

आपल्या हाताचा विळखा घातला. तिनें तो सोडवून आपण दूर झाली, पण हाताला झटका मारिला नाहीं.

ती म्हणाली, "असं असं ! तर मग घोड्यावरून पडतांना धक्का वगैरे कांहीं फारसा बसला नव्हताच म्हणायचा ! बेशुद्धि तर नसेलच मग ? आणि हें सर्व ढोंग केलं होतं वाटतं ?"

"नाहीं, नाहीं. असें कसें होईल ? मी खरोखर बेशुद्ध झालों होतों, आणि स्वप्नाचें सांगितलें ह्यांत सुद्धां कांहीं लबाडी नाहीं; आणि आतां सुद्धां कांहीं खोटें बोलत नाहीं. ( टाळी वाजवून ) मग येवढें मात्र आपल्या बोलण्यावरून खरें ठरलें कीं, ह्या दीनावर कृपा करणारी देवता त्या वेळीं आलेली होती, आणि ती हीच देवी होती, आणि माझ्या देहास पवित्र करणारें चुंबन हाही ह्याच ओष्ठाचा अनुग्रह झाला तर मग ! " असें बोलत बोलत त्यानें तिच्या कंबरेभोंवतीं पुनः विळखा घातला !

"मीं सांगितलं असं ? माझ्या तोंडून आलं हें ?" क्रीन्सी चाचरत बोलूं लागली.

"नाहीं सांगितलें म्हणून काय झालें ? मी जें कांहीं बोलत होतों त्यास ह्या माझ्या परीनें 'नाहीं' असें तरी कुठें म्हटलें ? मुकाट्यानें बसल्यानें कबूली दिल्यासारखेंच होतें. तर मग आतां मात्र मी सोडणार नाहीं. आपल्यावर कोणीं उपकार केला तर त्याची फेड करण्याचा कांहीं प्रयत्न न करितां त्याच्या ऋणांत रहाणें हें मला पसंत नाहीं बुवा ! " झालें, ह्याप्रमाणें डनबारनें सव्याज उसनें फेडिलें, पण तिनेंही ह्या वेळीं प्रतिकार केला नाहीं !

तिच्या कानाशीं तोंड नेऊन तो हळूंच म्हणूं लागला, "हे प्रियसखे, माझे हृदयहारिणी, माझ्या मनाच्या सिंहासनावर अधिरोहण करणाऱ्या सुंदर देवते–"

क्रीन्सीनें तर आतां डोळे मिटून घेतले आणि डनबारनें तिला आपल्या हृदयाशीं धरितांच तिनें आपलें डोकें त्याच्या मानेवर टेकलें.

ती म्हणाली, "चालीं, प्रियकरा ! माझं मन तरी माझ्याजवळ कुठें राहिलं आहे ? तें आपल्या चरणीं केव्हांच जाऊन सेवा करीत राहिलं आहे. मला तरी इकडच्याशिवाय दुसरं कोण आहे ?"

# प्रकरण ९ वें

## प्रेमपरिस्फोटानंतरचें स्वरूप.

तीन मैलभर पायीं चालत जाणें हें काम निदान क्रीन्सीला कांहीं सोपें नव्हतें. ह्या स्थलापासून हॉटेल तब्बल तीन मैल होतें, आणि कांहीं वाहन करून जावयाचें मनांत आणलें असतें तरी दोन मैल वांकडें जावें तेव्हां स्टेशन येणार आणि मग तेथें गाडी वगैरे मिळणार. पण ह्याचा विचार दोघांच्याही मनांत आला नाहीं. डनबारला स्वतःला यांत कांहीं वाटण्यासारखें नव्हतेंच, परंतु आपल्या प्रियतमेला श्रम होतील, ही सुद्धां गोष्ट तो ह्या वेळीं विसरून गेला. नुकत्याच प्रेमसंलग्न झालेल्या ह्या युवयुवतींच्या मनांत चालण्याच्या कष्टाचा विचार येणें संभवनीयच नव्हतें. त्यांच्या हृदयाची संपूर्ण जागा एका प्रेम-विकारानें भरून गेल्यामुळें त्यांना दुसरें कांहीं दिसत नव्हतें आणि सुचतही नव्हतें. तीं उभयतां एकत्र असल्यावर तिसऱ्याची आठवण होणें संभवनीय नव्हतें. शिवाय त्यांचें खरें हृद्गत एकमेकांस समजल्याला फार वेळ झालेला नव्हता. तेव्हां त्याच आनंदांत तीं दोघें निमग्न होतीं. त्यांनीं एकमेकांच्या खाकेंतून हात घातले होते आणि तीं दोघे बरोबर त्या धुळीनें भरलेल्या रस्त्यानें हळूहळू चाललीं होतीं. आज ज्या कांहीं चमत्कारिक गोष्टी घडून आल्या त्याबद्दल त्यांचें संभाषण चाललेलें नव्हतें, किंवा ह्या असल्या विलक्षण तऱ्हेनें एकमेकांच्या गांठी पडून त्यांचें परस्परांचें प्रेम एकमेकांस कळविण्याचा प्रसंग आला, आणि ज्या प्रेमाविष्करणानें तीं दोघें एकजीव झाल्यासारखीं मानूं लागलीं, त्याबद्दलही त्यांनीं एकमेकांस कांहीं सांगावयाचें राहिलेलें बोलण्यास आरंभ केला नव्हता. तर आज जो आनंदाचा नवीन झरा सांपडला होता, त्याबद्दलच्या त्यांच्या गुजगोष्टी चालल्या होत्या. क्रीन्सी म्हणूं लागली. " हिंदुस्थानांतल्या स्त्रियांना उपदेश करून त्यांच्या निसर्गसिद्ध अधिकाराची जाणीव त्यांच्यांत उत्पन्न करावी, या हेतूनें मी इकडे आल्यें, परंतु आतां माझी ती हौस फिटली; आतां ती कामगिरी मला नकोशी झाली–छे छे! असं म्हणण्यापेक्षां त्यांत माझी पुरी फजिती

झाली। तेव्हां तो पाश संपला. आजपासून इकडचा आयुष्यक्रम जितका अधिक सुखकर करतां येईल, तितका करण्याविषयीं झटणं हेंच मी आपलं पवित्र कर्तव्य समजेन. ''

"तूं जर असें म्हणतेस तर मी काय करणार, हें सांगणेंच भाग झालें." डनबार उत्तर देऊं लागला. " मी ज्या मंडळीचा सभासद झालों आहें, त्याच्यासाठीं कांहीं माहिती मिळविण्याचें काम आपण होऊन पतकरून मी इकडे आलों. ती माहिती मिळाली म्हणजे आपण विवाहविधीनें बद्ध होऊं आणि मग जहाजांत बसून इंग्लंडला जाऊं. तिकडे कांहीं माझी वतनवाडी आहे "

" आणि बाबा ! "

" मला ते वडिलांच्या ठिकाणीं आहेत. माझे वडील वारले आहेत. खरें पहाशील तर मला इकडच्या नात्याचें कोणचि उरलेलें नाहीं. " डनबार हसंत हसंत म्हणाला, " आपण धर्मविधीप्रमाणें एक झालों म्हणजे मग तुझे बाबा, तेच माझे बाबा; त्यांत फरक कोणचा उरला ? मग तेही आपल्याजवळच रहातील. "

आपल्या प्रियकराच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच क्रीन्सीला फारच आनंद झाला आणि त्या योगानें तिचें मुखकमल प्रफुल्लित दिसूं लागलें. ती म्हणाली— " हें ऐकून बाबांना किती सुख वाटेल म्हणून सांगूं ? त्यांचं मन आपल्यावर फारच बसलं आहे. सांगूच कां आणखी एक मौज ?" ती हंसत हंसत लडिवाळपणें बोलूं लागली. " मी आपल्याशीं नीट वागत नाहीं; मी उगीच रुसल्यासारखी वागत्यें, आपल्याशीं नीट बोलत नाहीं, म्हणून बाबा माझ्यावर कितीदा तरी रागावले असतील ! त्यांना वाटे कीं, मी आपला मान ठेवीत नाहीं. पण मी कधीं आपला अपमान केला कां ? कां कधीं टाकून बोलल्यें तरी ? "

" तसें तूं केलेंसच असें मला निश्चयानें सांगतां येणार नाहीं. पण मला वाटतें कीं, एका प्रसंगीं तूं माझ्यावर रागावली होतीस आणि माझी पीडा केव्हां टळेल असें तुला झालें होतें ! "

" सांगूंव कां आतां ? त्या वेळीं आपली मला फार भीति वाटली. हॉटेलमध्यें प्रथम आपली गांठ पडली, त्या दिवशीं मीं अगदीं घाबरून

गेलें. आपण तिकडे दुसऱ्या मेजापाशीं बसलां होतां खरे, पण माझ्या मनांत नसतां आपण मला आपल्याकडे पहाण्यास लाविलं, असं मला वाटलं! तेव्हां आपण माझ्यावर दृष्टिपाताचा प्रयोग करून मला भारून टाकिलं आणि आपल्या मनाप्रमाणं वागायला लाविलं, अशी मीं गांठ बांधिली."

"काय म्हणतेस ? तर मग असलें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे, ही गोष्ट मला अद्याप ठाऊक नाहीं! हं हं. आतां जमलें सगळें. त्या दिवशीं तूं माझ्याकडे एखाद्या रुष्ट वदनानें टवकारून कां पहात होतीस, आणि जेवण झाल्यावर मी तिकडे आलों तेव्हां माझी पीडा कशी तरी लवकर टळो म्हणून तूं कां खटपट केलीस, त्याचें कारण आतां समजलें! मी जर आपल्या दृष्टिक्षेपानें तुला भारलें असें वाटत असलें तर वाटो, पण माझी स्थिति एखाद्या लोखंडाच्या तुकड्याला लोहचुंबकाचें आकर्षण लागावें, तशी तूं माझ्या दृष्टीस पडल्यापासून झाली होती."

क्लिन्सी मध्येंच म्हणाली—"असो, आतां काय त्याचें ? ईश्वरानं आपल्याला एकमेकांसाठींच निर्माण केलं असावं असं दिसतं."

आसपास कोणी नाहीं असें पाहून डनबारनें क्लिन्सीला आपल्या बाहुपाशानें बद्ध करून दृढालिंगन दिलें आणि अधरोष्ठाचें यथेच्छ पान केलें.

इकडे म्हाताऱ्या फेरेलला कशाचीच दाद नव्हती. तो आपला नेहमीप्रमाणें आनंदांत होता. आपल्या प्रियकन्येवर कांहीं संकट आलें असेल हें त्याच्या स्वप्नींही नव्हतें. त्याच्या मनांत आपली मुलगी बेगमकडे गेली आहे, तिकडेच ती असेल. आदल्या रात्रीं गेली ती अजून परत आली नाहीं ह्याबद्दल कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं, अशा विचारांत तो असल्यामुळें क्लीन्सी खोलींत येऊन उभी राहिली, तेव्हां तिला पाहून त्याच्या तोंडून विशेष आनंदाचे कांहीं उद्गार निघाले नाहींत. पण ह्याच्या ऐवजीं, क्लीन्सीच्या सुरक्षितपणाबद्दल त्याचें मन साशंक असतें तर ती दृष्टीस पडतांच त्याला आनंदातिरेक झाला असता! क्लीन्सीला पाहून म्हाताऱ्यानें तिला 'गुड मॉर्निंग' केलें, आणि व्हरंड्यांत डनबारला पाहून गडबडीनें त्याच्याजवळ गेला आणि त्याच्या हातांत हात घालून आंदोलन दिलें!

आपल्या मुलीकडे आणि डनबारकडे पाहून तो म्हणाला–"समजलों मी तुमची लबाडी. तुम्ही दोघेजण बरोबर आलांत तर मग ? बरें झालें हें एक.

आतां तुमचा तंटा मिटला! कां, होय ना ? कां उरलें आहे कांहीं भांडणाचें निमित्त ?"

बाप बाहेर डनबारशीं बोलायला आला, तेव्हां कॅन्सी दाराशीं येऊन उभी राहिलीच होती. ती आतां पुढें होऊन ह्मणाली–" पण आमचें भांडण होतें कधीं ?" ह्या दोघांचें भाषण काय चाललें आहे, तें ऐकण्यास ती फारच उत्सुक झाली होती. तिला वाटूं लागलें कीं, आपण जी एकमेकांस आणभाक दिली आहे, त्याबद्दल एकदां डनबारच्या तोंडून बापास कळलें, म्हणजे तितकें बरें.

ह्यातारा आश्चर्यानें म्हणाला–" काय, कसें म्हणालीस मुली ?– भांडण होतें कधीं ! भांडणतंटा नव्हता, तर मग दोघेजण आजच्यासारखीं एका गाडींत बसून कधीं घरीं आलां नाहींत तीं ?" असें बोलतांना फेरलला मोठा गहिंवर आला. त्याचा कंठ दाटून आला. डोळे पाण्यानें भरले. " बरें तर कॅन्सी मग मला हें कोणीं सांगितलें, तूंच ना ?–कीं, डनबार तुझ्या मदतीला आला असतां, तूं त्याला नको म्हणलीस आणि ही गोष्ट एकदां नव्हे, दोनचारदां झाली ! असें कोणीं बरें मला कळविलें ?"

" हें काय बाबा हें ! त्याचं काय आज ? मागं झालं तें झालं, आतां पुनः तसं व्हायचं नाहीं."

" अरेच्या ! हें कांहीं तरी नवीनच प्रकरण दिसतें आहे तर मग ?"

फेरेलच्या लक्षांत अजून कांहीं सर्व हकीगत आली नव्हती. इतक्या थराला ही गोष्ट गेली असेल आणि आपण सहज जितक्या आवेशानें उद्गार काढिले, तितका जोर देण्यासारखा कांहीं प्रकार आज झालेला असेल, अशी कल्पना ह्यातान्याला व्हावी कशी ? त्यामुळें ह्यातारा फारच घोटाळ्यांत पडला. तो डनबारकडे पाहूं लागला. तो त्याला हंसतांना दिसला. तेव्हां त्याच्या लक्षांत आलें आणि तो म्हणाला–" आतां काय करूं ! काय झालें आहे तुम्हांला, तें सांगा तरी ?"

डनबार म्हणाला—" पुष्कळ झालें आहे आणि पुष्कळच सांगावयाचें आहे. पण तें इथें कशाला, सगळ्यांच्या देखत ? खोलींत जाऊन बसूं चला."

" चला तर मग. ह्यांत इतका संकोच कशाला आतां ? येवढें खरें कीं, माझ्या खोलींत जरा अस्ताव्यस्तपणा दिसेल; पण त्याला माझा इलाज

नाहीं. कीन्सी गेली होती बाहेर; आणि मला दिसत नाहीं; तेव्हां मी एकटा कशी व्यवस्था करूं बरें ? " असें बोलत म्हातारा खोलींत चालला आणि त्याच्या मागोमाग डनबार व कीन्सी बरोबर निघाली.

कीन्सीनें डनबारचा हात दाबून त्याच्याकडे हर्षोत्फुल्ल नयनांनीं अर्थपूर्ण तऱ्हेनें पाहून म्हटलें—" प्रथम बाबांना आपल्या वाग्दानाची गोष्ट सांगून टाकावी, आणि तें झाल्याबर माझी हकीगत मी दोघांना सांगेन. " हें बोलत असतां कीन्सी किती तरी लाजत होती. आंत जाऊन तिघेही खुर्च्यांवर बसलीं. पण कांहीं वेळ कोणीच कांहीं बोलेना. आतां बोलण्याची वेळ आली तेव्हां डनबारची अगदीं घांदल उडाली. त्याचा धीर गळाला आणि त्याच्या तोंडून शब्दच बाहेर उमटेना. अखेर म्हाताऱ्यानेंच पुनः चमत्कारिक तऱ्हेनें विचारिलें—" अरे, काय आहे हें ? कोणीच कां बोलत नाहीं ? काय सांगायचें आहे, तें सांगून टाका एकदां ! " हे शब्द ऐकून डनबार दचकल्यासारखें करून अस्पष्ट वाणीनें बोलूं लागला—" मीं कीन्सीबरोबर लग्न करण्याचें ठरविलें आहे. "

हें ऐकतांच म्हाताऱ्यानें हास्यमुख केलें आणि मोठ्या उत्सुकतेनें म्हटलें, " काय ? म्हणतां तरी काय हें ? " आणि लगेच तो म्हातारा मोठ्यानें हंसूं लागला. कीन्सीनें डोळ्यानें खूण करून त्याला पुष्कळ दाबलें; पण त्याचें हंसणें आवरेना. तेव्हां तिलाही हंसूं येऊं लागलें. आणि तें पाहून डनबारनेंही तिचेंच अनुकरण केलें ! हा हंसण्याचा आवेग येऊन गेल्यावर डनबार जरा शुद्धीवर आला.

तो म्हणाला—" मीं एकदम अखेरचेंच वाक्य बोलून टाकलें. आरंभ कुठें आणि कसा करावा, ह्याच्याच घोटाळ्यांत मी पडल्यामुळें माझ्याकडून थोडी चूकच झाली खरी. अगोदर आपली संमति मिळेल तर मी लग्न लावावला कबूल होईन, अशी कीन्सीनें एक अट घातली आहे. ती एकदम कबूल झाली नाहीं; आपल्याला विचारून काय तें करणार. "

म्हातारा म्हणाला—" हें आपलें उगीच ! मला कळत नाहीं वाटतें अगदीं ? मी तिला कधीं हरकत करणार नाहीं, हें का तिला ठाऊक नाहीं ? इतकेंच नव्हे, तर उलट माझी इच्छा तुम्हीं दोघांनीं एकमेकांवर प्रेम करून संसार करावा, असें मी तिला कितीदां तरी सांगितलें असेल. " इतकें बोलून

म्हाताऱ्यानें आपला हात पुढें केला, आणि डनबारनें पुढें केलेल्या हाताचें अत्यंत प्रेमानें आंदोलन केलें. डनबारनेंही त्या वेळीं अत्यंत आनंदानें म्हाताऱ्याचा हात धरून त्याच्याइतक्याच प्रेमानें तीच आंदोलनक्रिया केली ! नंतर आनंदभरानें तो म्हातारा म्हणूं लागला--" चार्ली बाळा ! माझ्या कॉन्स्टीला जसा पति असावा असें मला वाटत होतें, त्या प्रकारचे सर्वतोपरी तुम्ही आहां. आतां मीं तिला तुमच्या पदरांत घातली आहे. तिला तुम्ही प्रेमानें वागवाल ह्यांत मला शंका नाहीं. पण मला वाटत होतें कीं, माझी कॉन्स कधीं—"

" इश्श ! बाबा, हें काय असं ? माझं लग्न झालेलं कधीं पाहीन, दुसऱ्याची ठेव कधीं परत करीन असं आपल्याला झालं होतं ना ? "

" होय मुली, अगदीं खरें. पण हा असला सुदिन येईल, अशी मला कल्पना नव्हती. डनबारला तूं वरिलेंस, ह्यांत मला अत्यंत संतोष झाला आहे. ही गोष्ट अगदीं माझ्या मनाजोगती झाली. "

" बाबा, तुमचें प्रेम मजवर असेंच सदोदित राहो. " इतकें बोलून कॉन्सी आपल्या खुर्चीवरून उठली आणि बापाला मिठी मारून तिनें त्याचें चुंबन घेतलें आणि नंतर मिठी सैल करून ती वडिलांस ह्मणाली, " बाबा, हें माझं प्रेम ह्मणजे एकदम, एकाएकीं उत्पन्न झालेलं, वेड्यासारखा कांहीं मनोविकार आहे असें समजूं नका. माझं खरोखरच चार्लीवर प्रेम आहे, आणि तें प्रेम तसं असल्याबद्दल अलीकडे अलीकडे मला समजूं लागलं होतं. "

ह्या वेळीं डनबारनें तिच्या मुखाकडे पाहिलें आणि तिच्या डोळ्यांत अशा कांहीं तेजाची झांक त्यास दिसली कीं, तिच्या वाक्याबद्दल संशय घेण्याला त्याला जागाच उरली नाहीं.

इतकें होतांच फेरल म्हाताऱ्याला उपदेश करण्याची लहर आली, आणि तशाच आवेगांत त्यानें बोलण्यास आरंभ केला--" वहावा ! फार उत्तम गोष्ट झाली. तुझें त्यांच्यावर प्रेम आहे आणि त्यांचेंही तुझ्यावर प्रेम आहे, ही फार छान गोष्ट झाली. पण संभाळा बरें, लग्न झाल्याबरोबर पहिल्या प्रथम तुमची एकांतांत गांठ पडेल, त्या पहिल्या कांहीं दिवसांतच तो प्रेमपूर ओसरून जाईल ! ह्यासाठीं सावध रहा, आणि तसें होऊं देऊं नका ! पहिल्या समारंभांतून बरेंचसें--पुष्कळसें-नव्हे नव्हे, बहुतेक सारेंच पुढें

शिल्लक राहील, आणि तें तुमच्या जन्मभर तुम्हांस पुरेल अशा तऱ्हेनें बेताबेतानें चालूं द्या. ह्या प्रेमाची झडप फार कठीण आहे. तिच्या स्वाधीन मनुष्य झाला म्हणजे त्याला खरोखर झडपल्यासारखें होतें ! ती गोष्ट वर्णन करून समजण्यासारखी नाहीं, त्याचा अनुभव ज्याचा त्यानेंच घेतला पाहिजे. ह्या बाबतींत मला प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे. त्या वेळीं मी ऐन तारुण्याच्या भरांत होतों. प्रथम एकलकोंडेपणा वाटून करमेनासें होऊं लागतें, इतर गोष्टींत चैन पडत नाहीं, जीवितसुद्धां नकोसें होतें. आणि पुढें त्या विकाराची खूण पटून तें प्रेम आहे असें स्वरूप कळल्यावर अत्यंत आनंद होण्यास सुरवात होते, आणि त्या प्रेमाची जोड मिळाल्यावर मग संसारसुख उपभोगण्यांत चित्त रंगून जातें. आपलें चित्त हरण करणारी अमुक एक व्यक्ति आहे, असें समजून त्या व्यक्तीची स्थिति आपल्यासारखीच झाली आहे, असें अनुभवास आलें;–त्या दोघांची भेट पडून परस्परांची कबूली झाली;–म्हणजे आणखी एक निराळीच अवस्था येत्ये. हा समय मोठा कठीण, आणिबाणीचा असतो. त्या प्रेमाच्या झटक्यानें, प्रेमामृतपानाच्या उन्मादानें दोघेही अंध होतात, त्यांना इतर जग दिसत नाहीं हें तर खरेंच; पण त्याच वेळीं परस्परांतील दोष समजत नाहींत. आणि त्या पहिल्या झडपणीबरोबर आलिंगन, चुंबन, वगैरे प्रकारांतच सर्व काळवेळ ते घालवितात. खरोखर पाहिलें तर ह्या वेळीं त्यांनीं एकमेकांच्या स्वभावाची पूर्ण परीक्षा करून एकमेकांच्या लहरी, खोडी, दोष ह्यांची माहिती करून घ्यावयास पाहिजे. पण–हें काय हें ? मी अगदींच वहावलों. मी तुम्हांला एक व्याख्यानच झोडूं लागलों. काय वेडा मी ! असो. कीन्स्री, आपल्या गड्याला हाक मार पाहूं ! ''

श्यांपेन दारूची बाटली आणविण्यांत आली, आणि आपल्या आनंदाचें दर्शक म्हणून म्हाताऱ्यानें दारूचा पेला भरून घेऊन आपल्या ह्या नवीन वधूवरांच्या नांवानें चिरायुचिंतनार्थ ' टोस्ट ' म्हणून पिऊन टाकला. अशाच प्रकारें आणखी कांहीं ' टोस्ट ' घेण्यांत मदिरापान झालें. आणि मग डनबार कीन्स्रीकडे वळून म्हणाला:––'' तुम्ही आपली गोष्ट सांगणार तरी केव्हां ? आपल्याला श्रम झाले आहेत ह्यांत संशय नाहीं. मग आतांच काय त्याची घाई आहे ? जरा ढकलेनात पुढें ? आतां भूक लागली असेल, तर थोडा फराळबिराळ करून मग सर्व वृत्त सांगा म्हणजे झालें.''

" तसं कशाला ? माझी हकीगत कांहीं फार लांब नाहीं; ती आतां संपेल, आणि तोंपर्यंत आमचा नोकर फराळाची, छोट्या हजिरीची तयारी करील. त्याची वर्दी येण्याच्या आंत मी सांगून टाकत्यें. "

फ़ेरेल म्हातारा म्हणालाः--" हें काय आणखी लचांड ? अरे देवा ! आणखी कांहीं चमत्कार झालेला आहे तर मग ? कॅन्सी कसली हकीगत सांगणार आहे, कांहींच समजेना !"

" बाबा, तुम्हांला आठवतेंना कीं, काल बेगमकडून निरोप घेऊन मनुष्य आला होता, आणि त्याच्याबरोबर मी लगेच निघाल्यें. दाराशीं गाडी उभी होती, त्यांत मी बसल्यें. नेहमींप्रमाणें गाडीचीं दारें लावून पडदे वगैरे सोडलेले होते, त्यामुळं मला कांहीं संशय येण्याला कारण नव्हतं. गाडी चालली ती कूचावरून पुढें गेली, तरी मला कांहीं वाटलें नाहीं. नंतर बेगमच्या मंदिराकडे जायला पुलावरून वळावयास पाहिजे; पण तसें न होतां गाडी जेव्हां पुढें समोर चालली, तेव्हां त्याचें कारण विचारण्यासाठीं मी उठून उभी राहणार, तों एका घरापाशीं गाडी उभी राहिली. तिबंड्यावरून गाडी पुढेंच आलेली होती. तेव्हां मला बोलावण्यास आलेल्या इसमास मी पाहूं लागलें; तो गाडीवानाशेजारीं बसलेला होता. तो दार उघडण्यासाठीं आला, तेव्हां मी त्याला म्हटलें:--" गाडी इकडे कोणिकडे आणलीस ? " त्यानें उत्तर केलें:-" बेगमसाहेब ह्या इथल्या घरांत आहेत. " मी खालीं उतरल्यें. घराकडे पहातें तों माडीवर लखलखित उजेड पडलेला होता; पण घरांत शिरल्यें तों त्या खोलींत एकच दिवा अंधुक जळत होता. माझ्या मनांत तरी कांहीं संशय आला नाहीं; पण खालच्या खोलींत कांहीं सामान वगैरे नव्हतें. ती अगदीं रिकामी केल्यासारखी दिसत होती. माडीवर जाण्यासाठीं मी जिना चढूं लागल्यें, तों वरून दोन इसम येऊन म्हणाले— " बेगमसाहेब आपली केव्हांची वाट पहात आहेत. " ह्यांत कांहीं लबाडी असेल असा संशयच मला नव्हता. पण तितक्यांत मला कोणी मागून धरलं, डोळ्यावर हात ठेवून माझ्या तोंडांत बोळा घातला, आणि माझे दोन्ही हात मागच्या बाजूला बांधून टाकले ! त्याबरोबर माझ्या मागच्या कोणी तरी मनुष्यानें ' शाबास ' असे शब्द उच्चारिले. मला वाटतं कीं, मी तो आवाज ओळखिला. त्यामुळं मी फारच घाबरून गेल्यें. मला वरच्या एका खोलींत

नेऊन आंत लोटिलें आणि कडीकुलुप घातलें; आणि बाहेरच्या मनुष्यांस सावधगिरीनें पहारा करण्यास ताकीद देण्यांत आली. रात्रभर किंवा किती वेळ मी तिथें होत्यें, तितक्या वेळ माझे हात बांधलेलेच होते. पण त्या दुष्टांनीं माझ्या तोंडांतला बोळा काढिला होता. बाहेरच्या पहाऱ्यावरचा मनुष्य मला वरचेवर बजावून सांगे कीं, " कांहीं गडबड कराल तर खबरदार ! मी लगेच गोळी घालीन हो ! संभाळा ! " अगोदर मला झोंप येतच नव्हती, पण त्यांतून ह्या माणसाच्या ओरडण्याचा मला बराच त्रास झाला. मध्यरात्र उलटून गेल्यावर, खोली उघडून मला सांगण्यांत आलं कीं, " इथं रहायचं नाहीं आतां; कानपूरला जायचं आहे. " हें सांगणारा इसम मुसलमानच होता, आणि त्याच्या पेहरावावरून तो घोडेवाला दिसला. तो आणखी म्हणाला—" तुम्ही मुकाट्यानं आलांत तर ठीक आहे, तुम्हांला कांहीं कोण-च्याही प्रकारचा त्रास होणार नाहीं. तसं नसेल तर मग तुमच्या तोंडांत बोळा घालावा लागेल. तुम्ही काय तें कबूल करा. " मी मनाशीं विचार केला कीं, फार लांब जायचं कांहीं चुकत नाहीं, मग उगीच हाल करून का घ्या ? असें ठरवून मीं गडबड न करण्याचं कबूल केलं. त्या वेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली होती, तिचं वर्णन शब्दांनीं करणं फार कठिण आहे. त्याची शतांशानंही कल्पना होणार नाहीं. तेथील परिस्थिति फारच भयंकर होती; माझा जीवच मुळींच जाग्यावर नव्हता. विष किंवा हिरकणी मजजवळ असती किंवा दुसरें कांहीं हत्यार हातीं आलं असतं, तर मी आत्महत्या करण्यास मागं पुढं पाहिलं नसतं. बरं, जगण्याची आशा धरून रहावं तर माझ्या शोधासाठीं कोणी लवकर येईल असा संभव नव्हता. मी कांहीं तरी संकटांत आहें, अशी कल्पना तरी तुम्हांस कशी व्हावी ? कारण त्या वेळीं बाबा, तुम्हांला वाटत असेल कीं, मीं बोलून चालून बेगमच्या बोलावण्यावरून तिच्या महालांत गेलेली; तेव्हां तिथें घटकाभर कमी जास्त वेळ लागला तरी त्याची काळजी करण्याचं कारण नाहीं. असे एक ना दोन, मला सारं इकडचं डोळ्यापुढं दिसत होतं. झालं, पुढें मी गाडींत बसल्यावर माझ्या बरोबरच्या दोघांपैकीं एक गाडीवर पुढें बसला. आणि दुसरा माझ्यावर पहारा करण्यासाठीं गाडींत बसला. त्याच्या हातांत एक मोठा सुरा होता. त्यांतल्या त्यांत येवढं एक बरं होतं कीं,

गाडींत बसलेल्या इसमानं माझा कांहीं अपमान केला नाहीं; चावटपणानं वागला नाहीं; तो पहिल्यापासून मुकाट्यानं बसला होता. गाडीचे पडदे सोडले होते, त्यामुळें कोणीकडे गाडी चालली आहे, हें समजण्यास मार्ग नव्हता. ह्याप्रमाणं कांहीं तास गेल्यावर-मी आपली अदमासानं बोलत्यें- गाडी थांबली. गाडी हाकणारा आंतल्या इसमापाशीं कांहीं बोलला आणि तें ऐकतांच हा गाडींतून बाहेर पडला. जातांना त्यानं दाराला कुलूप घातलं. ते एकमेकांला घाई करीत होते, तें मला ऐकूं येत होतें. कांहीं वेळानं मागच्या बाजूला घोड्यांच्या टापा ऐकूं आल्या, त्याचं मला फार नवल वाटलं! गाडीचे पडदे मी ओढून फाडून टाकले आणि डोकावून पहात्यें, तों आंत बसला होता तो मनुष्य आणि गाडीवाला गाडीचे घोडे सोडून त्यच्यावर स्वार झाले आणि घोडे दामटींत निघून गेले! ते कां भ्यायले, म्हणून दुसऱ्या बाजूला त्याचं कारण असलं पाहिजे, असें समजून मी मागच्या अंगास पाहूं लागल्यें, तों तिकडून घोडे धांवडीत लोक येत होते. त्यांत एक साहेब आहे, आणि तो कोण, हें मीं लगेंच ओळखिलें. कारण इतक्या घाईनं माझ्यासाठीं धांवून येणारें कोण असणार? माझ्या प्रियकर चार्लीखेरीज इतकी काळजी कोणाला वाटणार? मीं मोठ्यानं हांक मारली, त्या वेळीं माझं अगदीं देहभान सुटल्यामुळं मी आपल्याला आपल्या ख्रिस्ती नांवानंच हांक मारली. मग-मग पहातां पहातां आपल्या घोड्याला ठेंच लागली आणि तो खालीं पडला. स्वारही खालीं आला. मग मला कांहीं स्वस्थ बसवेना. दाराला पुष्कळ धक्के दिले, पण त्याला कुलूप होतं; तें कांहीं केल्या उघडेना. अशा संकटांत मग लाज सोडून दिली. कोणीं पाहिलं तर काय म्हणेल याचा विचार केला नाहीं; खिडकींतून पाय बाहेर काढून कशी तरी बाहेर पडल्यें आणि धांवत आपल्याजवळ येऊन बसल्यें. पुढें काय सांगायचं? बाकीचं सगळं चार्लीला ठाऊक आहेच."

म्हातारा म्हणाला, "मी सांगूं कां पुढें काय झालें तें! तूं त्यांचें डोकें मांडीवर घेऊन बसलीस आणि कांही तरी उपाय करून त्यांना शुद्धीवर आणलेंस; मग ह्यांनीं आपलें प्रेम तुझ्यावर असल्याबद्दल तुला सांगितलें. कां, होय ना? असेंच झालें ना? असेंच व्हावयाचें हें."

"अगदीं बरोबर. असेंच घडून आलें." डनबारनें सांगितलें.

" काय म्हणूं या कर्माला ! माझी बाई तिकडे असल्या संकटांत पडली असून मी आपला स्वस्थ रोजच्यासारखा वाचीत बसलों होतों ! मला हिच्यावरील प्रसंगाचें स्वप्न सुद्धां नाहीं. "

ह्या विचारांत म्हातारा खुर्चीवरून उठला आणि खोलींत इकडून तिकडे खेपा घालूं लागला. तो मध्येंच थांबून म्हणाला. " कोण लबाडी ही ! काय फसवेगिरी तरी ? डनबार, तें कांहीं नाहीं; चला अगोदर, आपण पोलीस ठाण्यावर जाऊन ह्याची वर्दी देऊं या. "

कीन्सीनें ह्यास हरकत घेऊन म्हटलें, " नको बाबा ! तसं करायचं नाहीं. माझा हेतु निराळा आहे. मी मघाशीं म्हणाल्यें ना, कीं ' शाबास ' म्हणणाराचा आवाज मीं ओळखिला म्हणून ! तो आवाज दुसऱ्या कोणाचा नसून नबाबाचा होता ! "

" म्हणतेस तरी काय हें ? " असें दोघेही एकदम ओरडून म्हणाले.

" मला त्यांत कांहींच संशय नाहीं. पण कदाचित त्यानं कांहींच केलं नसलं तरी पोलिसांत वर्दी दिल्यावर चौकशींत माझ्या नांवाची विटंबना होईल, नाहीं का ? ती मला नको आहे मी तिथं अशी होत्यें वगैरे पुष्कळ सांगितलं तरी कोणाला खरं वाटणार आहे ? मला नुसती कोंडून ठेविली होती, माझ्या वाटेस कोणी गेलं नाहीं, माझं कांहीं वेडं वाकडं झालं नाहीं, हें खरं धरायला, मी म्हणत्यें, मी सांगत्यें येवढाच ना पुरावा ? लोक काय म्हणतां ? त्यांच्यापुढं कोणीं डोकं फोडून सांगितलं तरी ते म्हणणारच कीं ' ही बिचारी अबला गाय ! तिचं त्या मंडळीपुढं काय चालणार ? ' बरं, कोणाला आपण कांहींच कळूं दिलं नाहीं, तर त्यांत आपलं काय नुकसान होणार ? कांहींच नाहीं. मला भीति वाटली, ह्याशिवाय कांहीं झालं नाहीं. मग उगीच बभ्रा कराच कशाला अगोदर ? कोणाला कांहींच सांगूं नये. जसं कांहीं कांहींच झालं नाहीं ! "

म्हातारा म्हणाला--" तरीच माझी बाई ! किती शहाणपण, किती धूर्तता तुझ्या एवढ्याशा डोक्यांत भरली आहे ही ! तुझेंच म्हणणें बरोबर आहे. शिवाय ह्या पोलीसच्या लोकांना मी फार दिवस ओळखतों. त्यांच्याकडे वर्दी देऊन ते एकदां आल्यावर त्यांच्या मुठी जेव्हां अगोदर भराव्या, तेव्हां पुढें ते कांहीं तरी करतील. छे छे, डनबार ! ह्या कामांत दुसऱ्याच्या तोंडाकडे

पाहात बसण्यांत अर्थ नाहीं. काय करावयाचें तें आपणच करूं या. कार्याची बजावणी आपल्याच हातीं घेऊं. काय डनबार, आहे तयारी ? ”

“ ज्या हरामानें हा उपद्याप केला, त्याची माझी जर दहा एक मिनिटें गांठ पडेल, तर काय मजा होईल ! तसें कोणी घडवून आणील तर त्याला चांगलें बक्षीसही देईन. परंतु ह्यांत नबाबाचें अंग असेल असें मला वाटत नाहीं. त्याचें कारण असें कीं, बेगमच्याकडे कॉन्सी आली आहे असें मीं त्याला सांगितलें, आणि ती तिकडे गेली नाहीं हें चौकशीअंतीं समजल्यावर त्यानें आपण होऊनच हिच्या शोधासाठीं माणसें, घोडे, हत्यारें वगैरे देण्याची व्यवस्था केली. त्याच्याच एका माणसानें कॉन्सी राहीं होती तें घर दाखविलें, आणि तेथेंच अली नांवाचा मनुष्य रहात होता. येवढें खचित आहे. मला ह्या घराकडे चौकशीला पाठवून नबाब स्वतः स्टेशनाकडे हिच्या शोधासाठीं गेला. नबाबाच्या लोकांनीं मदत करण्यांत कांहीं कसूर किंवा लबाडी केली असती तर कॉन्सीला कानपूरच्या रस्त्यानें चालविली आहे, हें कळावयाला दुसरा मार्गच नव्हता, आणि कॉन्सीची सुटकाही झाली नसती. तेव्हां कॉन्सीला पळवून लपवून ठेवावी असें जर नबाबाच्या मनांत असतें, तर त्यानें इतकी खटपट केली असती कां, हें सांगा पाहूं ? शिवाय कॉन्सी नाहींशी झाल्याबद्दल त्याचाही जीव काळजींत पडल्यासारखा मला दिसला, आणि ह्मणूनच ही सुरक्षित आहे, असें समजल्यावर त्याला खरोखर आनंद होईल ! ”

हें ऐकल्यावर फेरेल ह्मातार्‍याचेंही मत बदललें आणि तो म्हणाला:—

“ एकंदरींत माझें मत चुकलेंच असेंच म्हटलें पाहिजे. आतां तुम्हीं जें मला सांगितलें, ह्यावरून कॉन्सीनें ज्याचा आवाज ओळखिला असें तिचें म्हणणें आहे, तो नबाब नसला पाहिजे. छे बुवा, आपण उगीच त्याचा संशय घेतला; त्याला उगीच दोष दिला. ”

कॉन्सी ह्मणाली—“ मीही तसेंच समजत होतें. आतां जरी त्यानें मदत केल्यामुळें तो नसावा असें ह्मणतां येईल, तरी पण तो आवाज त्याचाच असावा असें मला अजूनही वाटतें. आतां जर कदाचित तो तेथें नसला तर त्या वेळीं बोलणार्‍या इसमाचा आवाज थेट त्याच्यासारखा तरी असला पाहिजे, ह्यांत संशय नाहीं. ” इतक्यांत न्याहरीची तयारी झाल्याची सूचना

आली; तेव्हां फराळ करण्याबद्दल बापलेकींनीं डनबारला आग्रह केला, तरी त्यानें त्यांचें ऐकलें नाहीं. तो थांबेना. थोडीशी तरी न्याहारी करण्याचेंसुद्धां तो कबूल करीना; त्यानें कांहींतरी सबब काढून तेथून पाय काढिला. ह्या ह्यातान्याला लेकीशीं पुष्कळ बोलावयाचें असलें पाहिजे, कान्सी अगदीं त्रासून दमून गेली आहे, काल रात्रीं तर तिला झोंप कशी ती आली नाहीं, असा विचार करून त्यानें दोघांचा कसातरी निरोप घेतला.

# प्रकरण १० वें,

## नबाबाच्या प्रेमाचा विचित्रपणा.

परत आपल्या खोलींत आल्यावर डनबारनें अगोदर स्नान केलें आणि न्याहारीच्या तयारीचे कपडे घालीत घालीत तो खाबूरशीं बोलत होता. खाबूर ह्मणाला, " आपल्या भेटीला आतां कोणसें आलें होतें. "

" म्हणजे ? असें कां बोलतोस ? कोण होतें तें ? "

" अल्लाला माहीत. येणारी व्यक्ति तरुण दिसली. चेहरा फारच सुंदर होता. मला वाटतें कीं, तो चेहरा बेगम कुसुंबच्यासारखा थेट होता. तो तिचा भाऊ असेल—पण भाऊ तिला मुळींच नाहीं ! "

" मूर्ख कुठला ? अरे खाबूर, आज तुला वेडबीड नाहींना लागलें ? बेगमला भाऊ नाहीं, हें तूंच ह्मणतोस; मग आलेला माणूस तिचा भाऊ कसा होईल ? "

" हुजूर, काय सांगूं आपल्याला ? अहो, अशा गोष्टी झाल्या आहेत, होतात, होतील. ह्या देशांत पुष्कळ होतात आणि विशेषकरून बड्या लोकांत, नबाबांच्या मंडळींत फार. बोलूंच कां आतां ? अशीं पुष्कळ माणसें आहेत कीं, त्यांना जर विचारिलें कीं, तुझा बाप कोण, तर त्यांची मति गुंद; पुंगी बंद. "

" अस्सें, अस्सें. समजलों मी आतां तुझा अर्थ. तुझें म्हणणें असेंचना कीं, तो आलेला माणूस बेगमचा आडभाऊ, लेंकवळा भाऊ असेल, होय ना ? त्या माणसाचें माझ्याशीं काय काम असावें बरें ? "

" अल्ला जाने ! " ह्या उत्तरानें डनबारला राग आला; तो म्हणाला—-

" हें रे काय खाबूर ! क्षुल्लक भलत्याच गोष्टीचा कांहीं तरी बाऊ करून दाखविण्याची तुला खोडच पडली आहे. जेव्हां पहावें तेव्हां तुझी अशीच तऱ्हा असते. "

" मी काय सरकार, मी हुजूरचा बंदा गुलाम आहें ! खाविंद, मला काय समजतें? पण मी हुजूरपाशीं कधीं खोटें बोलत नाहीं. कांहीं लपवून ठेवीत नाहीं. तो आलेला इसम म्हणत होता 'आपल्याला भेटावयाचें आहे.' मीं विचारिलें काय काम आहे ? कशाला आलांत ? पण त्याचें उत्तर कांहींच मिळेना. पण हुजूर, आपण रागावणार नाहीं तर आणखी सांगतों–मला वाटतें–आलेला इसम अदमी नसावा, ती स्वतः बेगमच आली असावी ! "

" काय ह्मणतोस ? "

" अगदीं निःसंशय, हुजूर. अल्लानें बनविलेल्या दोन माणसांत इतका सारखेपणा कधींच असत नाहीं, कांहीं तरी फरक असतो. चेहरा, नाक-डोळे वगैरे अगदीं सारखे असले, तर अवाजांत फरक असतो; निदान हात-वाऱ्यांत, चालण्याच्या ढबींत, कशांत तरी कमीजास्त असतेंच. मीं बेगमला पुष्कळ वेळा पाहिली आहे, आणि जो कोणी आला होता–त्याला पुरुष कोण म्हणेल ? तो–ती म्हणाली, 'मी पुनः भेटावयास येईन.' इन्शानअल्ला. आलाच–आलीच वाटतें ती–नव्हे नव्हे, नबाबसाहेब आले ! "

शिष्टाचाराप्रमाणें बाहेर थांबून परवानगीनें आंत जावयाचें ही रीत गुंडाळून ठेवून नबाब एकदम आंत आला आणि लगेच बोलूं लागला, " हं, हं. तुम्हीं आतांच स्नान करून बाहेर आल्यासारखें दिसतें आहे, कां खरेंना? तुमची न्याहारीची तयारी होऊन राहिली आहे; पुष्कळ वेळ झालेला दिसतो, वाट कोणाची पाहतां ? मी आलों तरी मी नाहींच समजून तुमचें आपलें चालूं द्या; माझ्याकरितां संकोच नका करूं. मी थोडासा वेळ गप्पा मारायला आलों आहे, दुसरें काम कांहीं नाहीं. फेरेल बाई सुरक्षित आहेत; त्यांना कांहीं इजा झालेली नाहीं, हें मला कळलें तेव्हां फार आनंद झाला, आणि तो कळविण्यासाठीं मी मुद्दाम आलों, दुसरा हेतु कांहींसुद्धां नाहीं. "

" हो खरेंच. मी तुम्हांला तसा निरोप पाठवणार होतों, पण मला वाटलें कीं, तुमचे ते दोघे नोकर तुम्हांला सगळें सांगतील. आणि म्हणूनच मी स्वस्थ राहिलों. " इतकें डनबारला म्हणणें भागच आलें; परंतु त्याला

खरोखरच नबाबाचें स्मरणच राहिलें नव्हतें. त्याला जो नवीन प्रेमानंद झाला होता, त्यांत तो अगदीं गुंग होऊन इतर सर्व गोष्टी पार विसरून गेला होता.

पुनः डनबार कांहीं वेळानें बोलूं लागला– " पण काय हो, ते गाडीचे घोडे सोडून पळून गेलेले बदमाष लोक पाहून त्यांच्यामागें तुमचे नोकर लागले होते, ते पुनः माझ्या दृष्टीस पडलेच नाहींत तें ? त्या दोघांना त्यांनीं पकडलें कीं नाहीं, कांहींच समजलें नाहीं. शिवाय त्या पळालेल्या दोघांपैकीं एकजण अल्ली महमद होता कीं नाहीं ? "

नबाबानें उत्तर केलें–" अल्ली महंमद मेला ! "

" तुमच्या नोकरांशीं दोन हात होऊन त्यांनीं मारला वाटतें ? "

" छे, छे. तो घोड्यावरून पडला, त्यांत त्याची मानच मोडली !"

" बरें झालें. मी तेंच करणार होतों. त्याची मान, गर्दन केव्हां उडवीन असें मला झालें होतें."

नबाब आपण होऊनच एका खुर्चीवर बसला आणि मोठ्या गंभिर-पणानें म्हणाला– " हें पहा, असल्या गोष्टीचा हवाला अल्लावरच टाकावा असें मला वाटतें. माझे नोकर परत आले, ते सांगूं लागले कीं, तुम्हीच फरेले बीबीचा पत्ता लावला; पुढें गाडीच्या पाठीस लागून माझे लोक त्या दोघांच्या मागें लागले वगैरे हकीगत त्यांनीं मला सांगितली. पण मग तुम्हीं काय केलें ? "

ह्यावर डनबारनें थोडक्यांत सर्व हकीगत त्याला सांगितली; आणि ह्या नबाबाच्या मनांत मिस् फेरेलशीं लग्न लावण्याचा कांहीं आशांकुर अस-ल्यास तो समूळ उपटून टाकावा ह्या हेतूनें डनबार म्हणाला–" आणि अखेर–अखेरह्या कीन्सी बाईनें माझ्याशीं लग्न लावण्याचें कबूल केलें ! "

ह्या डनबारच्या शब्दांचा नबाबावर बराच परिणाम झाला आणि त्याच्या चेहेऱ्यावर साश्चर्य निर्भत्सनेसारखा विकार दिसूं लागला. परंतु डनबारला तो समजला नाहीं. शिवाय आपला भाव छपविण्यासाठीं नबाबानें हास्यमुख केलें, त्यामुळें डनबार फारच घोटाळ्यांत पडला. नबाब किंवा डनबार दोघेही कांहीं वेळ बोलले नाहींत. नबाबानें डनबारजवळ जाऊन ( डनबारची न्याहारी आटपून तो एका खुर्चीवर बसला होता तेथें ) त्याचा हात धरून त्याचें मोठ्या जोरानें व उल्हासानें आंदोलन केलें आणि म्हणाला– " मिल

डनबार, आपला कांहीं आज नवा परिचय नाहीं, आपण जुने बालपणापासून स्नेही. तेव्हां असल्या माझ्या मित्राच्या मनाला अत्यंत आनंद देण्यासारखी गोष्ट घडून आल्याबद्दल मला त्याचें अभिनंदन केल्याशिवाय कसें राहावेल ? आपणांस सुख झालेलें पाहून मला अत्यंत आनंद होत आहे. तुम्ही आनंद-सागराच्या लाटांवर यथेच्छ पोहत आहां असें तुमच्या तोंडावरून स्पष्ट दिसत आहे; तें कांहीं तुम्हीं शब्दांनीं मला सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्या बाईच तशा बहुमोल माणिक–रत्न–मोतीं आहेत. तिच्यासाठीं कोण काय पाहिजे तें देण्यास तयार होईल. असो. तेव्हां म्हणायचें काय कीं, हें जें आपल्यास पळवून नेल्याचें वगैरे संकट वाटत होतें, तें आयतेंच तुमच्या पथ्यावर पडलें. मी आतां स्पष्टच विचारितों कीं, जर असा प्रसंग आला नसता आणि त्या सडकेवर तुम्ही पाठलाग करून त्यांना सोडविण्यास कारण झालां नसतां, तर त्यांचें प्रेम आपल्यावर जडलें आहे, हें कालत्रयीं तरी तुम्हांला कळलें असतें का ? ”

“ अमीर, तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें. प्रेम तर राहूंद्याच, पण मला इतक्या दिवस वाटत होतें कीं, फेरेल–क्विन्सी–ह्या बाई मजवर रुष्टच आहेत, माझा तिरस्कारच करीत आहेत. ”

हें ऐकतांच नबाबाची अगदी त्रेधा झाली. पण त्यानें तें सर्व हंसण्यावारी नेलें, आणि आपल्या मनांतील भाव समजूं नये म्हणून त्यानें एक सिगारेट काढून पेटवून तिचा धूर सोडण्यांत आपलें इंगित छपवून टाकिलें. तो म्हणाला, “ फेरेल बाई अत्यंत सुंदर, त्यांच्या सौंदर्याला उपमाच नाहीं. तितकें मोहक सौंदर्य मीं आजपर्यंत कोणाचेंच पाहिलें नाहीं. ईश्वराची माझ्यावर मोठी अव-कृपा समजली पाहिजे. कारण त्यानें मला इंग्रजांच्या कुळांत जन्म दिला नाहीं ! मी जर तसा इंग्रज असतों तर काय पाहिजें तें करून त्यांचें प्रेम संपादन केलें असतें. काय हो, हें तर तुम्हांला बरें वाटतें कां ? आम्ही इकडचे हिंदुस्थानचे लोक चांगले शिकून सवरून तयार झाल्यावर सुद्धां ह्या इंग्रजांच्या गुलजार मुलींनीं आमच्याशीं लग्न करायला कां नकार भरावा ? ह्याला काय बरें कारण असावें ? ”

डनबारनें उत्तर केलें, “ त्याला अनेक कारणें आहेत. त्यापैकीं मुख्य दोन; एक देश निराळा आणि धर्म निराळा. ”

" मला तसें वाटत नाहीं. मी म्हणतों कीं, स्त्रियांपाशीं प्रेम व्यक्त करण्याची जी तुमची तऱ्हा आहे ती आह्मां लोकांना साधत नाहीं, हेंच मुख्य कारण असलें पाहिजे. बरें, तें असो. पण त्या ऐन प्रसंगाला तुम्ही कसे वागलांत? तुम्हीं काय केलें तें सांगा पाहूं ? "

ह्यावर डनबारला चमत्कारिक झालें. तो मोठ्यानें हंसला आणि ह्मणाला, " तें कसें सांगतां येईल ? आणि शिवाय ही गोष्ट दुसऱ्याला समजावून तर सांगतांच येणार नाहीं. कोणच्याही दोन पुरुषांचें वर्तन असल्या प्रसंगीं कधींही एकसारखें असणें शक्य नाहीं, किंवा एकाचें दुसऱ्यानें अनुकरण करूनही जमावयाचें नाहीं. "

" छे हो, असें काय सांगतां ? ही गोष्ट तर सगळ्यांची सारखीच असली पाहिजे. दुसरी अशी गोष्ट विचारावयाची कीं, आतां तुमच्या गांठी पडल्या म्हणजे तुह्मी किती वेळां त्यांचें चुंबन घ्यायला पाहिजे, असें कांहीं ठरलेलें असतें काय ? अहो, हंसतां काय असे ? मित्रा, ह्या असल्या बारीक सारीक गोष्टी एरवीं आम्हांला समजणार कशा ? आणि त्या तर समजावून घेण्याबद्दल मला फार हौस आहे म्हणाना ? तुमची तर आतां लग्नाबद्दची सुद्धां आणभाक झाली आहे. तुमची जेव्हां जेव्हां भेट होईल, त्या त्या वेळीं आतां तर तुम्हांला त्यांचें चुंबन घेणें जरूरच आहे, अशीच रीत आहेना ? "

डनबारची हंसून हंसून मुर्कुंडी वळली. शेवटीं तो म्हणाला, " हें हो काय भलतेंच विचारतां ? असल्या गोष्टी कोठें ठरलेल्या कां असतात ? व त्या सांगून तरी काय समजणार ? आमची भेट आतां जर चारचौघां मंडळींत पडली तर तिथें कां कोणी ह्या गोष्टी करील ? शिवाय असल्या बाबतींत कसले नियम आणि कसले काय ? कांहीं स्त्रीपुरुषांना तर हा प्रकार आतां मुळींच आवडत नाहींसा झाला आहे; कोणी कोणी आरोग्य राखण्याच्या तत्वावरच ह्या प्रकाराला हरकतहि घेतात. "

" तुह्मी त्यांपैकींच आहांत काय ? "

डनबारनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ह्या बाबतींत नबाबाची चिकित्साबुद्धि फार वहावत चालली आहे, पण आतां ह्याला अडवून काय करायचें, असें मनांत येऊन त्याची त्याला मौजच वाटली. कांहीं वेळानें तो म्हणाला— " नाहीं हो! माझी तसली हरकत नाहीं. पण हा प्रकार नेमस्त असावा.

फार झालें, तर प्रथम गांठीबरोबर एकदां—आणि जातांना एकदां—म्हणजे झालें."

"तें झालें. आतां आलिंगन देणें, गळ्यांत हात घालणें, ह्याबद्दल कसें काय?"

"तो प्रकार फारसा होत नाहीं. अगदीं पहिल्याप्रथम कांहीं दिवस तसें होतें, पण पुढें पुढें तें कांहीं नसतें."

"हं हं, समजलों मी. साधारणपणें एक आठवडा संपला म्हणजे ही आलिंगनाची पायरी ओलांडली जात असावी, होयना?"

"अमीर, हें हो काय? आजची तुमच्या प्रश्नाची अखेर लागत नाहीं असें दिसतें. इतकें काय तुम्हांला त्यांत वाटतें? काय हो नवाबसाहेब, तुमचा बेत दुसरें लग्न करण्याचा आहे वाटतें?"

"कोणीं सांगावें नाहीं म्हणून? असेलही आणि नसेलही. ही का आज नवीन गोष्ट आहे? मी मागेंच तुम्हांला सांगून टाकलें आहे ना? माझें लग्न ज्या स्त्रीबरोबर झालेलें आहे, तिला मी आपली बायको समजत नाहीं. तेव्हां मी कदाचित अमेरिकेला नाहीं तर इंग्लंडला जाईन आणि तिकडच्या एखाद्या चांगल्या शिकलेल्या मुलीबरोबर लग्न करून तिला घेऊन येईन."

इतकें बोलून अमीर खुर्चीवरून उठला आणि त्या खोलींत इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागला. त्यानें डनबारच्या मेजाचे कप्पे उघडून त्यांतील सामान सर्व पाहिलें आणि भिंतीवरील फोटोबद्दल—हा कोणाचा, हा कसला वगैरे प्रश्न विचारून माहिती करून घेतली; आणि पुनः खुर्चीवर बसून तो अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारीत, आपण पुढें काय करावें ह्याबद्दल वाटाघाट करीत होता. अखेर तो डनबारला म्हणाला— "मी आपला मन मोकळेपणानें तुमच्यापाशीं बोलत आहें, ह्याबद्दल तुम्ही कसलाही विषाद मानूं नका. आणि मी विचारूं नये असले कांहीं प्रश्न केले असले तरी त्याबद्दलही राग मानूं नका. तुमच्यासंबंधानें माझ्या मनांत किती आदर वाटत आहे, आणि तुमच्या सर्व गोष्टींसंबंधानें मी इतकी चौकशी कां करतों, ह्याचें कारण थोडक्येच दिवसांत आपल्याला समजून येईल. आज कशाला सांगत बसूं? असो. ज्या कामाला तुम्ही आलांत त्यामध्यें काय व्यवस्था आहे? ते कांहीं तुम्हांला देतात कां? तुमचा खर्च कसा चालतो?"

" तिकडून, त्या मंडळाकडून मला दरमहा पैसे येतात; पण शिवाय माझे स्वतःचे पैसे आहेतना ? मी तेवढ्यावर थोडाच अवलंबून आहे ! "

" बरोबर, ठीक आहे ! पण तुमचें जें कांहीं असेल तें विलायतेंत. तेव्हां तुमच्या जमीनजुमल्याची व्यवस्था कोण पहातो ? "

" लंडनमध्यें क्राईन आणि कंपनी आहे, तिच्याकडे सर्व व्यवस्था सोंपविली आहे. "

" पण आतां तुम्हीही लवकरच परत जाल. पण ह्या तुमच्या सर्व कामाला कांहीं दिवस लागणार असतीलच कीं नाहीं ? कां आधींच निघणार इथून ? "

" फकिरानें प्रयोग दाखवून माझ्या शंका निवारण केल्या म्हणजे मग मला येथें राहून काय करावयाचें आहे ? मग आमचा विवाह होईल आणि त्यानंतर आम्ही जहाजांत बसून इंग्लंडला जाऊं. "

" काय म्हणतां ! तर मग इथेंच कायमचा रहाण्याचा विचार दिसत नाहीं एकूण. एकदोन दिवसांत फकिराकडचा नक्की दिवस कोणता तें समजेल. मला स्वतःला कांहींच शंका उरली नाहीं. सर्व हें तुमच्यासाठीं. तुमची खात्री झाली नाहीं, तुम्हांला आणखी पुरावा पाहिजे, होय ना ? असेंच कीं नाहीं ! फकीरमहाराज आतां असा कांहीं बेमालूम प्रयोग करून दाखविणार आहेत कीं, त्यापासून तुमची पक्की खातरी होण्याला कांहीं पंचाईत उरणार नाहीं. मागच्याप्रमाणेंच तो तुह्मांला झोंप आणणार—त्या स्थितीला काय म्हणत असाल तें म्हणा. झोंप म्हणावी तर तसेंही नाहीं—आणि त्या झोंपेतून तुम्ही उठतां तो ' अपिते नाइजीजला ' जसें झालें, त्याप्रमाणें सर्व शहाणपण तुह्मांला आलें आहे, असें दिसून येईल. "

डनबार म्हणाला: —" काय होईल तें दिसेल. तुम्ही म्हणतां तसें झालें तर उत्तम ! एकदां माझी शंका निवृत्त झाली, म्हणजे मला दुसरें कांहीं नको. मला तितकें झालें तरी पुरे. "

" असें कां म्हणतां ? तेवढें सिद्ध केल्यानें सर्व गोष्टींचा कांहीं निकाल लागणार नाहीं. मी म्हणतों कीं, त्यापासून हा एक प्रश्न तर पूर्ण सुटल्यासारखा होतही नाहीं. जगांतील सर्वच धर्म आपआपल्यापरीनें आपल्यालाच मोठा म्हणवितात. त्यांपैकीं कोणच्या धर्माच्या मार्गानें तें मृत्यूनंतरचें जग

प्राप्त होणार, ह्या शंकेचें निवारण होत नाहीं तें नाहींच."

"कां बरें? निवारण झाल्यासारखेंच आहे. ह्या प्रयोगानें येवढें तर सिद्ध होणार ना?—कीं मनुष्याचा आत्मा म्हणून कांहीं देहाशिवाय निराळा असतो. आणि तो अविनाशी, सदोदित रहाणारा आहे. आणि आत्मा हेंच खरें सर्वस्व. मग ज्या देवानें तो आत्मा दिला, त्याच्यावर प्रेम करणें हें मनुष्याचें कर्तव्य होईल; आणि तसें तो प्रेम करूं लागला म्हणजे मग तो शुचिर्भूतपणानें वागणार, आणि परोपकारांत दक्ष रहाणार. इतर गोष्टींना कांहीं विशेष महत्व नाहीं, आणि असलें तरी आपल्यासारख्यांना ती उठाठेव पाहिजे कशाला?"

"हा तर नवाच धर्म झाला!"

"नवा नाहीं, जुनाच आहे. ह्याच धर्माचा उपदेश खिस्तानें केला आहे."

"आणि महंमद पैगंबरानें, झारो अस्तरनें, कनफ्यूशिअस, बुद्ध आणि महावीर वगैरे सर्वजण हेंच सांगत आले आहेत."

"ह्या सर्व ईश्वराच्या दूतांनीं, प्रेषितांनीं प्रतिनिधींनी तेंच सांगितलें आहे."

"नाहीं, सगळ्यांचें म्हणणें इतकें स्पष्ट नाहीं. ऐका, माझी अनुमानमालिका कशी आहे? मी ज्याला धर्म म्हणतों त्याची विचारसरणी कशी आहे, हें मी तुम्हांला सांगतों ऐका. त्याच्या सिद्धांताची माला जमविली तर ती अशी होणार? ज्याचा विश्वास, श्रद्धा कायम आहे, त्याचें तारण होणार; तारण झालें कीं तो पापापासून मुक्त होणार; पापनिर्मुक्त झाले ते ईश्वराच्या दृष्टीनें निष्पाप—पुण्यवंत ठरले; पुण्यवान स्वर्गाला लायख ह्यांत संशय नाहीं; आणि स्वर्गाला लायख ठरतील त्यांना स्वर्ग मिळणार; म्हणून विश्वास ठेवणाराला स्वर्गांत घेणार हें सिद्ध झालें; त्याप्रमाणें विश्वास ठेवणारा—श्रद्धावान मी आहें, तेव्हां माझ्यांतील कोणचाच दोष शिल्लक राहाणार नाहीं. वास्तविक पाहिलें तर पाप म्हणजे तरी काय हो? पापाची व्याख्या देणें फार कठीण आहें. आफ्रिकेंतल्या लोकांना नरमांसभक्षणांत कांहींच दिक्कत वाटत नाहीं, त्यांना तुम्ही पापी म्हणणार काय? त्यांच्या देशांत नरमेध पाप गणीत नाहींत; त्यांच्या कायद्यांत ह्या गुन्ह्याला शिक्षा सांगितली नाहीं. त्यांच्या मनांलाही त्याचें कांहीं वाटत नाहीं. तुमच्या इंग्लंडचीच गोष्ट घ्या, तुमच्याकडील कायद्यानें ज्या कांहीं गोष्टी गुन्ह्याच्या सदरांत घालून शिक्षेस

पात्र ठरविल्या आहेत, त्यांची गणना परमेश्वराच्या घरीं पापांत नाहीं; म्हणून तसलीं कृत्यें करणाराला तुमच्या कायद्यानें शिक्षा केली तरी त्याला स्वर्गाचे दरवाजे बंद होणार नाहींत; किंवा तसल्या कृत्यांनीं माझा आत्मा अखेर बर्फाप्रमाणें पांढरा पक्षी व्हायचा तो झाल्यावांचून रहाणार नाहीं, आणि मग तो अल्लाच्या सिंहासनापाशीं जाऊन पोहोंचावयाचा नाहीं, असें थोडेंच होणार ! बरें बुवा ! तुह्मांला कंटाळा आल्यासारखा दिसतो, तेव्हां हा विषय मी अधिक वाढवीत नाहीं. ह्या फेरेल बापलेकीच्या विषयाबद्दलच बोलूं. त्यांची संपूर्ण माहिती करून घ्यावी असें मला कितीतरी वाटतें ! मग तर झालें ना ? ”

प्रश्नाची सवलत जों जों द्यावी तों तों त्याचा अतिक्रमणाचा मार्ग चालूच आहे; विचारण्यास योग्य नाहीं असल्याहि गोष्टी त्यानें आतांपर्यंत किती तरी विचारल्या, असें जरी डनबारला वाटूं लागलें होतें, तरी रिकाम्या उठाठेवी करण्याची आणि नसत्या कामांत तोंड घालण्याची ह्या लोकांना खोड असते, तीच नवाबाचीहि शिक्षणानें दूर झालेली नाहीं, असा विचार करून त्यानें नबाबास झाडून टाकिलें नाहीं. तेव्हां त्याच्याच कलाप्रमाणें घेण्यांत काय बिघडतें असें मनांत आणून त्यानें नबाबास उलट प्रश्न केला. “ आज तुम्हीं मांडलें आहे तरी काय हें ? त्यांच्याबद्दल काय माहिती तुम्हांला पाहिजे ? आज कितीतरी बाबतींत उगीच खोदखोदून चौकशी चालविली आहे तुम्ही ही !”

“ झालें आहे खरें हें असें ! पण आज ह्याबद्दल तुम्हीं मला माफी केली पाहिजे. डनबार साहेब, मला आतांशीं अगदीं कसेंचें होऊं लागलें आहे ! एकटें एकटें वाटतें. ह्याचा सर्व दोष तुमच्या त्या शिक्षणाकडे आहे; आणि त्यांत ही तुमच्या समाजाची बंदी ! ह्या शिक्षणाचा माझ्यावर असा परिणाम झाला आहे कीं, मला आमच्या जातीचे लोक हलके वाटूं लागलेत, त्यांच्यांत मी मिसळत नाहीं, आणि तुमच्या लोकांत, समाजांत हिंडण्याफिरण्यासारखा मीं शिकलों सवरलों असूनसुद्धां व मी तितका योग्य झालों असूनहि, मला तुम्ही अद्याप आपल्यापैकीं एक असें समजत नाहीं. मला येऊं देतां म्हणजे काय, माझ्यावर ती एक मेहेरबानी; माझा हक्क तसा आहे असें तुम्ही मानीत नाहीं ! ह्यासाठीं मला दररोज वाटतें कीं, मी एखाद्या इंग्रज मुलीशीं लग्न लावावें, म्हणजे तिची सोबत आपल्याला होईल, कांहींतरी मनाला विरंगुळा वाटेल,

निदान माझ्याशीं बोलाचालायला, वेळ घालवायला तरी ती उपयोगी पडेल ! बरें, जाऊं द्या. ह्या फेरेलच्या मुलीबद्दल कांहीं विचारलें तर तुम्ही त्रासतां, तेव्हां तें कांहीं विचारीत नाहीं. हें पहा दिलें सोडून. " तो हंसत हंसत पुढें बोलण्याचा सपाटा चालू करीत म्हणाला, " तिचें नांव निघालें कीं तुम्ही किती लाजतां हो ! मी ती गोष्टच काढीत नाहीं. पण तिच्या बापाचा स्वभाव कसा काय आहे ? "

" फारच योग्य मनुष्य ! उदार, दयाळू, ख्रिस्तभक्त, सभ्य—"

" हें पाहिलें ? हें असें ! इथेंच घोडें पेंड खातें तें. इथेंच फरक पडतो. तुम्ही नुसतें ' सभ्य ' असें म्हणण्यावर थांबत नाहीं. त्याच्यामागें तुमची ही ' ख्रिस्तभक्त ' शब्दाची जोड आहेच कीं नाहीं ? त्याला कांहीं कसला विशेष नाद आहे कीं नाहीं ? तो आपला वेळ कसा घालवितो ? दिवसभर काय करितो ? "

" त्याला वाचनाचा नाद आहे. अनेक प्रकारच्या विषयांवर वादविवाद करण्याची त्याला हौस आहे. संध्याकाळीं जेवण झाल्यावर तो मला बहुतकरून बोलावून नेतो, आणि तिथें नानाप्रकारच्या ग्रंथांवर, राजकीय विषयावर गप्पा चालतात. "

" दररोज ? "

" होय. ही रोजची ठरलेली कार्यक्रमाची एक बाब झाली आहे. "

" तुम्हांला किती त्रास होत असेल त्यामुळें ! "

" मुळींच नाहीं. फेरेल कांहीं अशिक्षित किंवा वेडा नाहीं. म्हाताऱ्यानें पुष्कळ वाचलेलें आहे. तसेंच त्यानें अनेक देश पाहिले आहेत. "

" तें खरें, पण त्या वेळीं त्याची कन्या ? "

" ती जवळ बसून सर्व ऐकत असत्ये. "

" हं हं ! मग तर खरीच मजा असेल. असो. पण मला आतां गेलेंच पाहिजे. मी बेत करून आलों होतों, त्यापेक्षां किती तरी जास्त वेळ बसलों. मी जातों आतां. फकिराकडे जाण्याचा नक्की दिवस त्याच्याकडून कळला कीं तुमच्याकडे निरोप पाठवीन. आपण आमच्या घरीं कधीं येणार ? येत जा उगीच जाता येतां. "

" सवड झाली कीं आल्याशिवाय रहाणार नाहीं. "

" अरेच्या ! आतां समजलों. मी अगदींच विसरून गेलों होतों. तुह्मांला कसला वेळ मिळतो ! आतां तर तुमचें आणखी वाग्दान झालेलें आहे ! " असें बोलून अमीर मोठ्यानें हंसला आणि खोलीच्या बाहेर पडला.

डनबारचा राहिलेला फराळ त्यानें आतां संपविला; इतक्यांत खानूर एक पत्र डनबारच्या नांवचें घेऊन आला आणि म्हणाला, " मिशनरी साहेबांनीं हें मजपाशीं दिलें आहे. "

हें डनबारच्या प्रियकरणीचें पहिलें प्रेमपत्र. " आज सायंकाळीं पुष्पप्रदर्शन आहे तिकडे आपण जाऊं. " हें त्यांत वाचून डनबारला फार आनंद झाला. कारण ह्या विनंतींत दुसरें कांहीं विशेष नव्हतें तरी, त्यावरून क्लोन्सीच्या मनाची स्थिति दिसत होती. तिनें जो आयुष्याचा क्रम आपल्यासाठीं आखल्यासारखा दिसत होता, आणि जो बहुतांशीं वैराग्यपूर्ण होता—तो तिनें आतां बदलला आहे. जगांत भोंवतालीं काय चाललें आहे, त्यामधील कांहीं तरी तथ्य पहाण्याची जिज्ञासा तिला उत्पन्न झाली आहे, येवढें त्यांत स्पष्ट होतें. तें पाहून डनबारला पुष्कळ बरें वाटलें. इतके दिवस ती ह्मणत असे कीं, "परोपकार करावा, दुसऱ्याच्या कल्याणासाठीं झीज सोसावी, असा उच्च हेतु ज्याला साधावयाचा असेल, त्यानें ऐहिक सुख अशाश्वत—नश्वर व पोकळ समजून त्याचा त्याग केला पाहिजे; तो जर ह्या सुखासाठीं लाचावेल, तर त्या योगानें त्याच्या थोर कार्याला हरकत आल्याशिवाय रहाणार नाहीं वगैरे. " तिचे विचार बदलत चालले आहेत असें अनुमान तिच्या विनंतीवरून काढण्यास कांहींच हरकत नव्हती. त्यामुळें डनबारला आपल्या सौख्याचें सुकाणू फिरल्याप्रमणें वाटूं लागलें. तिच्या पत्रांत आणखी खालीं दिलेला मजकूर होता. " प्रदर्शनांतच सगळा वेळ घालवावा असें माझ्या मनांत मुळींच नाहीं. तेथून आपण लवकरच निघूं आणि लांब कोठें तरी बिनरहदारीच्या रस्त्याला टांग्यांत बसून जाऊं. "

ह्या शेवटच्या वाक्यावरून तिचा हेतु उघड दिसत होता; एक प्रकारचा हा पुरावाच होता. तिचें डनबारवर अत्यंत प्रेम असल्यामुळें एकांतसहवास जितका सांपडेल तितका तिला पाहिजेच, हें तो दर्शवीत होता. लगेच मेजापाशीं बसून तिच्या पत्राचें त्यानें उत्तर लिहिलें. " तुझा बेत मला फार पसंत आहे. तुझे शब्द वाचून मला किती आनंद झाला तो सांगतां येत नाहीं ! "

वगैरे मजकूर त्याच्या पत्रांत होता. खाबूरच्या हातांत तें उत्तर येतांच त्यानें मोठ्या अदबीनें तें हातीं घेतलें; परंतु एकदम निघून न जातां, जणूं काय आपल्याशीं, पण डनबारला–आपल्या धन्याला–स्पष्ट ऐकूं जाईल अशा बेतानें तो बोलूं लागला:—" पाहिजे तिकडे जा, चांगल्या शहाण्या पुरुषांची ह्या चवचाल बायका अशीच भिर्रेखडी उडवून द्यायच्याच! पुरुष कितीहि कर्तब-गारीचा असला, तरी तो बायकोच्यापुढें वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें ती नेईल तिकडे जायला तयार होतो. बरें; पण असें न व्हावें तर काय असावें? कुराणांत लिहिलें तें खोटं कां आहे? ईश्वरानें मनुष्याला उत्पन्न केला तेव्हां त्याला शेंपूट होतें, आणि अल्लानें तें कापून त्याच्यापासून स्त्री निर्माण केली. म्हणून स्त्री म्हणजे पुरुषाची शेपटी. तो जाईल तिकडे तिनें जायला पाहिजे; तो सांगेल तें तिनें ऐकावें; आणि पुरुषांनीं तिला आपल्यामागें ठेवावी; तिला पुढें जाऊं देऊं नये किंवा तिच्यामागें धांवायला लागूं नये."

हें ऐकून, डनबार मोठ्यानें हंसूं लागला. कांहीं वेळानें तो म्हणाला—"मूर्ख कुठला! ज्याव् इदरसे. हें बघ–तुझ्या कुराणांत लिहिल्याप्रमाणें स्त्री जर पुरुषाचें शेंपूट असलीं, तर ती शेंपटी फार उपयोगाची आहे, समजलास! सिंहाची शेंपटी काय करते तुला ठाऊक आहे? ती मोठी असल्यामुळें मागें लोळत असते; आणि त्यामुळें सिंहाचा माग अगदीं पुसून जातो; त्याप्रमाणें चांगल्या स्त्रिया आपल्या पतीच्या अवगुणाचा पत्ता इतर लोकांना लागूं देत नाहींत; आलें का लक्षांत?"

"होय हुजूर! चांगल्या असतील त्या आपल्या म्हणण्याप्रमाणें करतील, पण चांगल्या कोणच्या समजाव्या? कोणत्याही स्त्रीचा चांगला–वाईट स्वभाव तिच्याशीं लग्न होईपर्यंत नीट समजत नाहीं; आणि एकदां लग्न लागल्यावर मग समजून कांहीं उपयोग होत नाहीं. त्या कामाची अगोदर अटकळ किंवा परीक्षा व्हायला पाहिजे, ती होणें शक्य नाहीं. त्यांत आमच्या-सारख्या मुसलमानी धर्माच्या लोकांची स्थिति बरी आहे. त्यांना तसें कांहीं वाटलें तर पुरुषानें वाटेल तेव्हां बीबीला काडी मोडून देऊन मोकळें व्हावें. बायका जन्मत:च खोडकर; त्यांना अगदीं वेगवेगळ्या पिंजऱ्यांत कोंडून ठेविल्या तर मात्र कदाचित् त्या गडबड करायच्या नाहींत. आमच्या लोकांत गोषा, झनाना वगैरे आहे; पण त्या तिथेंसुद्धां मुकाट्यानें रहात नाहींत.

इनशानल्ला! माझी स्वतःचीच गोष्ट घ्याना! मला ह्यांचा फार कटु अनुभव आहे. मी असा एकदां गैरसावध असतां फसलों आणि लग्न करून बसलों! मला बिबी मिळाली ती फारच भयंकर! ती मेल्यावर सुद्धां कित्येक दिवस तिची भीति मला निजायच्या वेळीं त्या 'अबूडा' बाईप्रमाणें वाटत असे! म्हणून ह्मणतों हुजुर, ह्या बायकांसंबंधानें मला कांहीं शिकवूं नका. पण तें असो, मी किती जरी हुजूरला सांगितलें, तरी माझें थोडेंच ऐकणार आहांत आपण? माझ्या बोलण्याचा कांहींच फायदा नाहीं. ह्या गोष्टी ज्याच्या त्यानेंच स्वतः उमजल्या पाहिजेत." इतकें बोलून अल्ला, अल्ला म्हणत तो खोलीच्या बाहेर निघून गेला.

# प्रकरण ११ वें,

## पुष्पप्रदर्शन–कुसुंबीची भयसूचना.

लखनौमधील पुष्पप्रदर्शन ह्मणजे सार्वजनिक उत्सवांतला शेवटचा खेळच ह्मणावयाचा. सिव्हिल सर्विसचे लोक ह्या लखनौस कांहीं तरी निमित्तानें एकत्र जमावें म्हणून त्यांचा एक आठवडा करमणुकीच्या खेळाचा ठरलेला असतो. त्या आठवड्यांत जे अनेक समारंभ होतात, त्यांत हें पुष्पप्रदर्शन म्हणजे जेवणांतला शेवटचा गोड घांस म्हणून योजना केलेली असावी. ह्या आठवड्यांत मोठमोठ्या मी मी ह्मणून काम करणाऱ्या उत्साही लोकांचीसुद्धां त्रेधा होत असे. आणि त्यांपैकीं बहुतेकांना आतां अगदीं दमल्यासारखें होऊन शीण आला होता. तेव्हां त्या दगदगीच्या परिहारासाठीं मुख्य नेत्रेंद्रियास तृप्त करणारें असें हें प्रदर्शन असल्यामुळें आरामबागेतील मैदानांत पुष्कळच गर्दी जमत असे. क्विन्सीच्या म्हणण्याप्रमाणें डनबार तिला घेऊन प्रदर्शन पहाण्यास आला होता. लखनौंत युरोपियन लोकांचे जे उत्सव चालले होते, त्यांपैकीं कोणच्याही समारंभाला डनबार किंवा क्विन्सी कोणीच हजर राहिलीं नव्हतीं. त्या प्रत्येकाला आपआपलें "काम" असल्यामुळें आजपर्यंत असल्या सार्वजनिक प्रसंगांस त्यांना जायला फावलें नाहीं. खरें पाहिलें तर क्विन्सी आणि तिचा बाप ह्यांचें लखनौंत पूर्वीच्या

ओळखीचें कोणीच नव्हतें. तीं दोघें लग्नांत प्रथमच आलीं असल्यामुळें त्यांच्या माहितीची मंडळी येथें नव्हती. पण डनबारचे पुष्कळ स्नेही तेथें होते— स्नेही कसले ! तोंडओळखीचे लोक बरेच होते. तो एकदां इंग्लंडला परत जाण्यांपूर्वी ह्याच शहरांत रहात असल्यामुळें त्याची ह्या बाजूच्या पुष्कळ लोकांची ओळख झाली होती. परंतु हिंदुस्थानांत परत आल्यापासून आज-पर्यंत तो कोणालाच भेटायला गेला नव्हता. बाहेर निघून सार्वजनिक समारंभास जाण्याचा असा त्याचा हा आजचा प्रसंग पहिलाच होता. त्यामुळें ह्या सिव्हिल सर्विस आठवड्यांतील दगदगीनें इतर मंडळी जशी थक-ल्यासारखी दिसत होती, तसा डनबारचा प्रकार झालेला नव्हता.

त्या बागेतील मधल्या मोठ्या पटांगणांत कठडे व तारा लावून निराळी जागा केली होती. आणि नानाप्रकारच्या फुलांच्या लहानमोठ्या कुंड्या जल-मंदिराच्या संगमरवरी पायऱ्यांवर ओळीनें मांडून ठेविल्या होत्या. औध-प्रांताच्या बादशहाच्या काळांत पूर्वी ह्या जलमंदिरांत ते क्रीडा करण्यास येत असत. त्याच मंदिराच्या आंतल्या अंगास फुलांच्या नानाप्रकारें बनविलेल्या वस्तु, गुच्छ, माला वगैरे रचनाचातुर्याचीं कामें मांडून ठेवलीं होतीं. सूर्य-कमळें, चंद्रकांत, घननीळ, सावळी वगैरे अनेक रंगांचीं, बागेंत तयार केलेलीं, रानांत उगवलेलीं मनोहर फुलें आपल्या चित्रविचित्र रंगांनीं नयनांस आल्हाद देत होतीं. पांढरे, तांबडे, पिवळे गुलाब एक पाकळीपासून अनेक पाकळ्यांचे, सुवासाचे, बिनवासाचे गुलाब, अनेक रंगांचीं कमळें ह्यांची तेथें गर्दीच होती; तथापि त्या ऋतूंत होणाऱ्या पुष्पांच्या बनविलेल्या अनेक तऱ्हा ठिक-ठिकाणीं दिसत होत्या. हें पुष्पप्रदर्शन पहाण्यास लोकांची जी गर्दी लोटत होती त्यांत अगदीं म्हाताऱ्यांपासून लहान मुलांपर्यंत सर्वांचीच करमणूक होण्यासारखी असल्यामुळें अगदीं तान्हीं मुलें सुद्धां घेऊन स्त्रीपुरुष येत होते. फुलांची मौज सर्वांनाच समजते. ताऱ्यांच्या आकृतीचीं, करवतीसारख्या पाकळ्यांचीं फुलें कितीतरी होतीं. वेड्यावाकड्या फुलांची योजना केली असतां तींच फुलें मनाला फार आल्हाद देणारी होतात, आणि 'योजकस्तत्र दुर्लभः' ह्या मधु-सूक्तीचें प्रत्यक्ष उदाहरणहि तेथें पहाण्यास सांपडत होतें. अमक्या प्रकारचा रंग त्या ठिकाणीं नव्हता असें म्हणतां येण्यासारखें नव्हतेंच. पांढरीं, अस्मानी, किरमिजीं, पिवळीं, गुलाबी, कुसुंबी, जांभळीं, लालभडक, भगवीं अशीं

सर्व प्रकारच्या रंगांची फुलें तेथें गोळा झालीं होतीं. ह्या अनेक वर्णांच्या पुष्पांच्या वर्णनाचें काम लेखकाच्या लेखणींतून बरोबर उतरण्यासारखें नाहीं. त्यानें कितीही वर्णन लिहिलें तरी त्यापेक्षां एकाद्या कुशल चित्रलेखकानें आपल्या कुंचलीनें सहज रंग भरला तर त्यांत तेव्हांच सर्व मौज येण्यासारखी असते.

डनबारबरोबर कीन्सी सर्व प्रदर्शन पहात हिंडत होती, आणि त्या दोघांचा योग्य जोडा पाहून जो तो क्षणभर त्यांच्याकडे आपली दृष्टि रोखीत होता, आणि त्यामुळें भोंवतालच्या गुलाबांशीं कीन्सीचे कपोल वरचेवर स्पर्धा करीत आहेत असें पहाणारास वाटलें असतें. बहुतेक सर्व वस्तु पाहून झाल्यावर तीं दोघे जलमंदिराबाहेर पडून नबारादारीकडे बसायला जागा केली होती, तिकडच्या रस्त्याला जाऊं लागलीं.

इतक्यांत समोरून येणारा एक युरोपियन गृहस्थ ह्मणाला, " कोण ? डनबार ! अरेच्या ! पण ह्यांत संशय नाहीं, आणि आश्चर्यही नाहीं. खरोखरच डनबारच हा ! "

हा गृहस्थ मध्यम वयाचा, जरासा पोक्तपणा आलेला होता. त्याला पहातांच डनबार हंसत हंसत त्याच्याकडे जाऊन ह्मणाला, " कसें काय ? बरें ओळखलें बुवा ? तुमची प्रकृति बरी आहेना ? तुमची सर्व मंडळी खुशाल आहेतना ? आमच्याबरोबर कोण आहे, ह्यांची माहिती तुम्हांला कोठून असणार ? ह्यांचें नांव कीन्सी फेरेल. ही माझी भावी पत्नी होय. "

हें ऐकून प्ले फेयरनें आपली मान लववून तिला सलाम केला. तो ह्मणाला " फार उत्तम. ही नवी ओळख झाली, बरेंच झालें. आतां आमच्या कुटुंबाची आणि आलिव्ह मुलीची तुमची ओळख करून देतों. "

डनबार ह्मणाला, " मग त्या कोठें आहेत दोघी ? त्यांना बरोबर आणल्या नाहींत कीं काय ? "

" त्यांच्याशिवाय मी कसा येईन ? माझें एकट्याचें इथें काय काम ? आमचें कसें तरी चालतें, पण ह्या बायका असल्या कीं त्यांना वरचेवर तहान आणि भूक लागते. त्या दोघी त्या तिकडे उपहाराच्या तंबूंत गेल्या आहेत. कांहो, तुम्ही आलांत कधीं ? नुक्तेच आलां असाल; म्हणजे या लखनौंत ह्मणतों हो ? " डनबार अगदींच ओशाळला. उगीच हो हो म्हणून वेळ मारून न्यावयाची सोय नव्हती. लखनौला आपण आल्याला बरेच दिवस झाले,

ही कबुली दिल्यावांचून इलाजच नव्हता.

तेव्हां प्ले फेयर जरा रागाच्या मुद्रेनें म्हणाला— " असें काय ? तुम्हीं ओळख टाकून दिली, हें कांहीं बरोबर केलें नाहीं. तर मग आतां खरोखरच तुमच्यावर रागावलें पाहिजे. अगदीं अबोल्यापर्यंत राग वाढविला पाहिजे. मी इथेंच असतों, हें तर तुम्हांला माहीत असलेंच पाहिजे, नाहीं म्हणण्याची कांहीं तरी सबब पुढें करून उपयोगीं पडणार नाहीं. "

" मी कोठें तसें म्हणतों आहें ? मी मुळींच कोणाला भेटायला गेलों नाहीं. शिवाय खरें म्हणाल तर आपण लखनौला आलां आहांत हें मला माहीत नव्हतें. तुमची गांठ पडली तेव्हां आपण हरडोईला होतां, नव्हे ? त्या वेळीं आपण ए. एस्. पी. ( पोलीस खात्यांत दुय्यम अधिकारी ) होता. त्यानंतर मी हिंदुस्थान सोडून स्वदेशीं कांहीं दिवस गेलों होतों. "

" होय, होतों खराच त्या वेळीं. पण आतां मी लखनौस डी. एस्. पी. ( पोलीस खात्यांत मुख्य अधिकारी ) झालों आहें. पण जर तुम्ही कोणा-कडेच बाहेर गेलां नसलां-काय, असेंच ना तुम्ही म्हणालां ? "

" माझी, तशीच ह्यांची स्थिति एकच. आम्ही कांहीं विशिष्ट कामासाठीं इकडे आलों आहों. त्यामुळें हिंदुस्थानांत आल्यापासून आमच्या कामापुढें आम्हांला फुरसतच सांपडेना."

" असें, असें. आतां काय त्याचें ? तुमचें म्हणणेंच खरें, असें म्हणून समाधान मानून घेतलें पाहिजे. दुसरा कांहीं इलाजच नाहीं. "

कॉन्सी म्हणाली– " माझे वडील बरेच म्हातारे आहेत, त्यामुळें ते बहु-तेक बाहेर पडतच नाहींत; सदोदित ते आपल्या खोलींतच असतात. "

प्लेफेयरनें ह्या वेळींही मान लववून तिचें म्हणणें कबूल झाल्याचें सुचविलें. कांहीं वेळानें तो म्हणाला– " पण कायहो डनबारसाहेब, ह्यांना घेऊन तुम्ही क्लबांत तर गेलां असालना ? "

कॉन्सीनें तर खालींच मान घातली. ती काय बोलणार !

" नाहीं हो. ह्यांना बरोबर घेऊन हिंडण्याचा मान आजपर्यंत मला मिळालाच नव्हता. आज सकाळींच त्याला आरंभ झाला, आणि त्याचा पहिला सुमुहूर्त हाच. "

" आतां जुळलें तर मग. मिस् फेरेलताई, तुमचें मला प्रथम अभिनंदन

करूं द्या. तुम्हांला फारच चांगला लाभ झाला. तुम्ही योग्य निवड केली. पण सांगूं कां तुम्हांला ? हा डनबार येवढा लहान असतांना मीं पाहिला आहे हो. तेव्हां अगदीं टारगा पोरगा होता. तेव्हांपासून ह्याला मी ओळखतों. त्या वेळेला किती उनाडपणा करीत असे म्हणून सांगूं ? काय ! नाहीं म्हणूं द्या त्यांना ! पण इतर मुलांच्यासारखा नव्हता हो ! त्यांच्यापेक्षां हा पुष्कळच वरच्या वर्गांतला होता. ”

कॉन्सी हंसत हंसत म्हणाली, “ त्या वेळेला तरी उनाडपणा करण्याची ह्यांना बुद्धि झाली असली, तर त्याचा मुद्दाम अभ्यासच करावा लागला असावा, असें माझ्या सध्यांच्या अनुभवावरून मला वाटतं. ”

“ मला वाटतें, ह्या स्वारीनें दिल्या आहेत पुष्कळशा गप्पा झोकून आपल्या चांगुलपणाच्या. तुमच्या कानाशीं गुलगुल गोष्टी करून ह्यानें देवगंधर्व कोटींत आपली गणना करण्याला आपल्याला लाविलें आहे असें दिसतें. ही आली आमच्या कुटुंबाची सेना.” आणि त्याची बायको जवळ येतांच तिला तो म्हणाला- “ तो चार्ली डनबार, तो मुष्कीन तुला आठवतो कां ग ? डनबारसाहेब, रागावूं नकाहो ! तूं समजलीस कां नाहीं अजून ? त्या डनबार कार्ट्यानें तुझें कुलुंगें कुत्रें नव्हतें कां हालहाल करून मारलें ! तो पोरगा आला कां तुझ्या ध्यानांत ? ”

त्याला उत्तर म्हणून प्ले फेयरची बायको म्हणूं लागली— “ प्रियकरा, फ्रेड, हें काय बोलणं भलतंच ! आपण म्हणतां तसलं मला तर कांहीं आठवत नाहीं. पण माझा चार्ली डनबार मला पक्का आठवतो. तो किती कनवाळू ! कुठलं एक भिकार कुत्रं पाण्यांत पडून मरत होतं, त्याच्यासाठीं उडी घालून त्याचा जीव वांचविला ! तो अशींच चांगलीं व प्रशंसनीय कामें नेहमीं करीत असे. तेच हे डनबार. मी तेव्हांच ओळखलं—पण चटदिशीं ओळखतां आलं नाहीं. केवढे मोठे झालांत हो ! ”

प्ले फेयर म्हणूं लागला— “ वा ग वा ! तुझें म्हणणें डनबारनें मांडचोळणा घालून अद्यापही तुझ्यापुढें यावें होय ? काय वेडी समजूत बायकांची पहा ! अग, नेहमीं हे कुकुलें बाळच कसे राहतील ? ” आणि या कॉन्सीकडे बोट दाखवून डोळे मिचकावून बोलूं लागला- “ आणि ही, आतां लक्षांत ठेवा, यांचें अडनांव फेरेल आहे; पण ह्या लवकरच आपलें

नांव सोडून डनबारसाहेबांचें नांव धारण करणार आहेत. "

तेव्हां हास्यमुखानें फ्ले फेयर बाई म्हणाल्या— " फार छान ! अशा योगानें तरी ओळख झाली. " या तिच्या बोलण्यावरून व सुहास्य मुद्रेवरून क्विन्सीचा तिच्याविषयीं चांगला ग्रह झाला.

ह्यानंतर फ्ले फेयरनें आपल्या आलिव्ह मुलीची आणि क्विन्सीची ओळख करून दिली. आलिव्हला डनबार अपरिचित नव्हता; तिची त्याची पूर्वीचीच ओळख असून ती विसरलीही नव्हती. बारडोईस असतांना डनबारबरोबर आपण कोल्ह्याच्या शिकारीच्या वेळीं किती वेळां तरी बरोबर घोडे पळवीत गेलों होतों, ह्याचें तिला स्मरण होतें.

डनबार तिला म्हणाला— " पूर्वीच्या कांहीं गोष्टी आठवतात ना ? एकदां तुम्हींच शिकार शोधून काढली व ती मारून मीं त्याची शेंपटी तुम्हांला दिली होती. ती असेलच तुमच्याजवळ अजून."

आलीव्हनें आश्चर्याच्या मुद्रेनें म्हटलें— " इश्श ! काय, वेड तर नाहीं लागलं ! ती इतक्या दिवस राहील कशी ? ह्या देशांत चांगल्या लोकरीच्या आणि रेशमी कपड्यांना सुद्धां किती लवकर कसर लागते. दोन चार महिन्यांत ह्या हवेनें सबंध शालीचा सुद्धां निकाल लागणार. येथें तुमच्या शेंपटीची काय कथा घेऊन बसलां ? ती कधींच पार गेली ! "

फ्ले फेयरनें टाळी वाजवून म्हटलें, " तरीच बरें ! मला वाटतच होतें कीं त्या शेंपटीच्या टोंकाला कांहीं तरी लांब आंखुड दुसरें शेंपूट जोडलेलें असावें म्हणून; त्याचा आज उलगडा झाला. तीं प्रेमाची देणगी होती म्हणायची तर ? "

आलिव्ह लाजून म्हणाली, ' इश्श ! हें हो काय बाबा ! तुमची आपली सारीच थट्टा ! तिला वेळ ना काळ ? आम्हांला त्या वेळीं खेळण्यापुढें दुसरं कांहीं दिसतच नव्हतं, समजलांत ? ह्या प्रेमाच्या गोष्टी समजायला आम्हांला रिकामा वेळच होत होता कुठं मुळीं ? "

" काय म्हणतेस पोरी ! तर मग प्रेमाच्या कथा बोलण्यांत गेलेला वेळ फुकट असें कां तुझें मत आहे ? "

" होय होय, तसंच हो ! प्रेमाच्या झपाट्यांत एकदां मंडळी सांपडली की, ती मोठीं साधुपणाचीं सोंगें आणायला लागतात, तसं तर आजपर्यंत

मीं केल्याचं मला आठवत नाहीं."

"अग, ऐकलेस कां पोरीचे तारे? ही आतां आम्हांला शिकवायला लागली हो! असलें वेड हिच्या डोक्यांत शिरणें चांगलें नाहीं. तें बऱ्या वाईट कोणच्या तरी प्रकारांनीं काढून टाकिलें पाहिजे! हें बघ, हिचा चांगला कान उपटून असले विचार खरबडून निर्बीज केले पाहिजेत, बरं कां! त्याची हयगय उपयोगी नाहीं. हिला आपल्या घरांतच पुजून ठेवण्याचा तर तुझा हेतु नाहींना? मला हिला पोसायला किती दिवस लावणार? तुमचीच म्हण आहेना कीं, हत्ती पोसवतो पण लेक नाहीं पोसवत म्हणून?"

आलिव्हनें कीन्सीला हळूंच डवचून म्हटलें, "ही सारी बाबांची थट्टा आहे, हो. त्यांचं हें असंच चालतं बाई. पण त्यांच्या मनांत तसं वाईट कांहीं नसतं हो! बरं, पण तुम्हीं चहा घेतला कीं नाहीं? काय, नाहीं घेतला अजून? आई, ह्या कीन्सीताईचा घसा तान्हेनं अगदीं कोरडा झाला आहे. चला आपण पुनः त्या तंबूंत जाऊं. तुमच्याबरोबर मीसुद्धां एकाददुसरा पेला घेईन. अशा एखाद्या पेल्यानं जास्तकमी काय होणार आहे म्हणा!"

त्या तिघी मिळून स्त्रीमंडळ तंबूकडे गेल्या, आणि हे दोघे पुरुष प्ले फेअर व डनबार तेथेंच बोलत उभे राहिले.

प्ले फेअर बोलूं लागला—"मागें तुम्ही हिंदुस्तानांत होतां, त्याला आणि आतांच्या स्थितीला फार फरक पडला आहे. खालच्या लोकांतसुद्धां शिक्षणाचा प्रसार झाला आहे. आणि इतर देशांतल्याप्रमाणेंच आपण माणूस आहों अशी जाणीव त्यांच्यांत उत्पन्न होऊं लागली आहे. धर्माच्या वेडगळ समजुती, जुन्यापुराण्या चालीरिती ते टाकून देऊं लागले आहेत. स्त्रीशिक्षणाची वाढ बरीचशी झाली आहे. त्यामुळें त्या वर्गाची थोडथोडी कुरकुर मोडली आहे. त्यांना कांहीं समाधान वाटूं लागलें आहे. बायकांची गोषाची, पडद्याची चाल हळूहळू मागें पडत चालली आहे. आतां असें करूं लागलेल्या बायका अद्याप फार थोड्या आहेत हें कबूल; पण एकीनें पुढें पाऊल टाकिलें म्हणजे तिचें अनुकरण करणाऱ्या बऱ्याच निघतील. हें पहा त्याचें प्रत्यक्ष उदाहरण: ती सुंदर युवती आहेना पलीकडे बसलेली? ती बेगम कुसुंबी. ती दोन महिन्यांपूर्वींच पडदा बुरखा घेतल्यावांचून कधीं बाहेर पडत नसे. तिचें सौंदर्य, लावण्य अप्रतिम आहे. काय, तुह्मांला नाहीं वाटत तसें?

ती पहा, इकडेच आपल्याकडे बघूं लागली. छे छे, तसें नाहीं, ती तुमच्याकडेच पाहूं लागली. पूर्वी तिची तुमची गांठ पडून ओळख झाली आहे वाटतें ! ”

डनबारनें अडखळत उत्तर केलें—“ होय. त्यांच्या जहागिरीच्या एका सरोवरावर शिकारीसाठीं कांहीं दिवसांपूर्वीं मी गेलों होतों. ”

“ काय ह्मणतां ! मघांशीं तर तुम्ही म्हणालांना कीं, मी कोठेंही कोणालाही भेटायला बाहेर गेलों नाहीं. हो, पण न जाणों बुवा ! बेगमच्या जहागिरीवर जाऊन शिकार करणें, हा तुमच्या कामांतलाच कांहीं प्रकार असेल ! काय हो, असेंच कीं नाहीं डनबारसाहेब ? ”

ह्याला डनबार काय उत्तर देणार ! तो नुसता हंसला, पण कांहीं तरी उत्तर दिलेंच पाहिजे, म्हणून तो बोलूं लागला—“ काय बुवा, झालें खरें असें ! माझें बोलणें तुह्मांला काय आणि कोणाला काय खरें वाटणार नाहीं. पण वास्तविक गोष्ट अशी झाली कीं, माझ्या ध्यानींमनींसुद्धां नसतांना एकाएकीं तसाच योग आला आणि तेथें गेल्यावर तिची माझी गांठ पडली. पहा, ती आपल्या नोकराला आपणांकडे धाडीत आहे असें दिसतें.”

तितक्यांत बेगमकडचा मनुष्य आला आणि डनबारला सलाम करून म्हणाला:–“ हुजूर, आमच्या थोर मालकीणबाईनीं आपल्याला बहुत सलाम देऊन विचारिलें आहे कीं, आपल्याला १०।५ मिनिटें वेळ असल्यास फुरसतीप्रमाणें इकडे एकदां येऊन जाल तर बरें ! ”

प्ले फेअर लगेंच बोलूं लागला:—“ डनबारसाहेब, माझ्यासाठीं कांहीं संकोच धरूं नका. तुम्हांला बोलावणें आलें आहे, तुम्ही खुशाल जा. मी मुळींच त्या स्त्रीमंडळाकडे जाऊन त्यांना हाकलून घेऊन येतों. तुम्ही मला लाजूं नका. ” इतकें बोलून तो उभा राहिलाच नाहीं. कवाइतींत ‘ राइट अबाऊट टर्न ’ असा हुकूम मिळतांच तेथल्या तेथेंच तोंड फिरवून दुसऱ्या दिशेला जातां येतें, त्याप्रमाणें प्ले फेअर निघून गेला.

तेव्हां बेगमकडे डनबार गेला. त्याला दुरून येतांना पाहून आपल्या भुवया वाकवून त्याच्यावर तिनें दृष्टीचें शरसंधान केलें. त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं, हें ती जाणून होती; तरी निराशेंतही आशा उत्पन्न होत्ये, तिचा हा परिणाम होता. डनबारला जवळ आलेला पहातांच ती आपल्या

दासीच्या परिवारांतून, बारादारींतून पुढें येऊन बागेच्या मैदानांत उभी राहिली. डनबारही तिच्याकडे गेला. तिनें हंसत हंसत आपला नाजूक लहानसा हात डनबारच्या पुढें केला.

डनबारनें पूर्वीप्रमाणेच स्वदेशाच्या चालीप्रमाणें त्या हाताचें चुंबन घेतलें, तेव्हां ती म्हणाली:—"आपण आलांत, फार बरें झालें! त्यामुळे मला फार आनंद झाला. अशी आपली गांठ केव्हां तरी पडावी ह्मणून मी फार आशा करीत होत्यें."

डनबारनें हास्यमुख करून म्हटलें—"मीही पण आपल्यासारखेंच ह्मणतों. आपल्यासारख्यांच्या दर्शनानें आनंद होणार नाहीं असा कोण आहे बरें?" ही गोष्ट निव्वळ खोटी होती, हें डनबारच्या मनाला खाऊं लागलें. पण ह्या वेळीं असली लबाडी केली नाहीं, तर मग साधारण व्यवहार बरोबर चालणार नाहीं, असें जाणून त्यानें ही असत्यपणाची माशी गिळली.

पण ही गोष्ट बेगमच्या लक्षांत आलीच. आणि तिनें लगेच प्रश्न केला, "अगबाई, खरं का पण हें?" तिला हें खरें कसें वाटावें? तिच्या मनांत आलेली शंका तिनें लगेच बोलून दाखविली—"आपल्याला खरोखरच जर माझ्या भेटीनं आनंद होत असेल, तर मग तो आनंद वारंवार भोगण्याचें तुमच्या हातांत असून त्यासाठीं आपण कांहींच तजवीज करीत असल्याचं दिसत नाहीं. माझ्या निमंत्रणाची वाट पहाण्याचं कारण नाहीं. मी एकदांच सांगून टाकलं आहे. आपल्यास वाटेल तेव्हां आपण यावं!"

"तें खरें बेगमसाहेब, मी कोठें नाहीं ह्मणतों? पण माझा सगळा वेळ असा जातो कीं—"

"कोणाबरोबर?—त्या तिच्या—" इतकेंच शब्द अर्धवट उच्चारून तिनें आपली दृष्टि क्वीन्सी बसली होती तिकडे वळविली. बागेंतील पटांगणांत बाजेवाल्यासाठीं तंबूवजा जें गृह बांधलेलें होतें, त्याच्या जवळच्या एका बाकावर क्वीन्सी आणि प्रेफेसरची मुलगी आलिव्ह अशा दोघी बसल्या होत्या. बेगमनें क्वीन्सीकडे पाहून तिरस्कारानें आपले ओंठ आवळून घेतले, आणि एक मोठा सुस्कारा टाकिला.

"तुमचा प्रश्नच मला समजला. माझें मला काम आहेना? त्या कामामुळें फावत नाहीं." असें डनबारनें उत्तर केलें.

डनबारचें उत्तर ऐकतांच बेगमनें डनबारकडे तोंड फिरविलें आणि आपल्या सुंदर हास्यानें मघाची तिरस्काराची मुद्रा तिनें पार झांकून टाकिली. तथापि अर्धवट जागृतावस्थेप्रमाणें बहाणा करून बेगम म्हणाली:— " कसं कसं म्हटलं? आपल्याला आपलं काम पुरेसं होतं, होय ना? पण दिवसभर कामाला गेला, संध्याकाळीं किंवा रात्रीं तर काम नसतें ना? पण हो खरंच, मी कशी अगदींच विसरल्यें! त्या वेळीं तुमचा तो क्लब, तो तुमच्या पाठीस असेलना? जळ्ळा मेला तो क्लब! तिकडे गेल्याशिवाय तुमचं चालायचंच नाहीं. क्लबांत हाजिरी देणं हें कर्तव्यकर्मांपैकीं एक समजलं जात असेल नाहीं? तुमच्या इंग्रज लोकांची ही तऱ्हाच अशी. तुमचा क्लब, म्हणजे देव, देऊळ, किंवा प्रार्थनामंदिर! पण इतर देवदेवींसारखी किंवा देवळासारखी ह्या क्लबाची स्थिति कधींच नसत्ये. त्याचे भक्त त्याला कधीं विसरत नाहींत; तेव्हां हें देवदर्शन तुमचं चुकायचं नाहीं. "

" अरे वा! इतक्या बारीक नजरेनें आपल्यासारख्यांनीं आमचे दोष ओळखिले असतील अशी मला कल्पना नव्हती. पण तुम्हांला माझें बोलणें खोटें वाटेल कीं, मी क्लबांत कधींच जात नाहीं. तुम्हीं जो शेरा मारिला तो क्लबांत नित्य जाणाऱ्या लोकांना बरोबर लागूं पडण्यासारखा आहे. त्यांना क्लब कधीं सुटणार नाहीं. प्रार्थनामंदिरांत ते आठवड्यांतून एकदा जातात. तेसुद्धां एखादे वेळीं चुकलें तरी हरकत नाहीं, पण हा रोजचा क्लब त्यांचा टळणार नाहीं. उन्हाळा असो, पावसाळा असो, सर्व ऋतु सारखेच. चुकला फकीर जसा मशिदींत सांपडावयाचा, त्याप्रमाणेंच आमची मंडळी शोधायला जावयाचें तर क्लबांत गेलें म्हणजे झालें. "

" येवढंच कशाला! सगळीकडे तुमच्या लोकांची हीच रीत. तुम्हांला खुष करायला लहानसहान एवढ्या तेवढ्या गोष्टी पुरेशा होतात. तुमची चैन भाजक्यासुजक्या गोष्टींवरच चालत्ये. तें विष एकदां भिनूं लागलें म्हणजे तुमच्या तारुण्याची बहर कुजून जायला वेळ लागणार नाहीं. कंटाळवाणा झालेला वेळ घालविण्याकरितां जो टूम निघेल, तसल्या क्षुद्र गोष्टींतच तुमचे लोक दंग होऊन जातात. आमच्या इकडच्या म्हणजे पौर्वात्य लोकांचे खेळकरमणूक असल्या हलक्या प्रकारांनीं होत नाहींत. त्यांना कांहींतरी विशेष खोल व भेदक दर्जाच्या गोष्टी लागतात. फार कशाला, आमच्या इक-

डच्या पुष्कळशा चाली ज्यांनीं उचलिल्या आहेत, आणि देशांतल्या उपभोगाची मौज दुसरीकडे नाहीं असें ज्यांना प्रत्यक्ष अनुभवानें समजलं आहे, अशा लोकांनीं इकडे पुष्कळ वर्षे घालविल्यामुळें त्यांना मी ह्मणत्यें असंच म्हणावं लागत आहे. पण हा कसला भलताच विषय निघाला! हा येथेंच पुरे. आपल्यापर्यंत माझ्या सकाळच्या येण्याची वर्दी पोहोंचली कीं नाहीं कोण जाणें ? ”

“ काय म्हणतां ! खरें कीं काय ! पण माझा नोकर म्हणत होता कीं, कोणी तरुण सुंदर पुरुष मला भेटायला आला होता म्हणून ! ” डनबारनें हंसत हंसत ह्मटलें.

“ हं. हं. इतके त्याला डोळे आहेत ह्मणावयाचे सौंदर्य समजायला ? ’ इतके शब्द बेगमनें हंसत हंसत उच्चारिले, पण लगेच गंभीर मुद्रा करून ती ह्मणाली:—“ पण हें पहा, असे कांहीं लोक आहेतच कीं नाहीं, कीं त्यांना माझ्या सौंदर्याचं इतकं कांहीं वाटतच नाहीं. मी आपली आहे दहाजणीं सारखी, ह्यापेक्षां काय ! ”

“ असें म्हणत असतील ते लोक खास वेडे, त्यांना अक्कल नाहीं सौंदर्य ओळखण्याची ” तिची स्तुति करण्यासाठीं डनबार आवेशानें बोलूं लागला. “ आपण तर केवळ— ”

“ पुरे पुरे, कांहीं नका बोलूं. माझी स्तुति नको करायला कांहीं ! आमच्यांत अशा अर्थाची एक ह्मण आहे कीं, जो कोणी बायकांची स्तुति करायला पडतो, त्याला खोटें बोलण्यावांचून गतिच नसत्ये. आतां कदाचित् ह्या वेळेला तुमची गोष्ट तशी नसेल; तुह्मांला जें खरं वाटत असेल, तेंच आपल्या मुखांतून येईल, असं मला वाटतं. सकाळीं मी तिकडे आल्यें होत्यें, त्याचें कारण असं कीं, तुमचं लग्न ज्या मुलीबरोबर व्हावयाचं ठरलं आहे, तिला पळवून नेल्यासंबंधाची कांहीं बातमी मला लागली होती, ती कळविण्यासाठीं मी मुद्दाम भेटायला आलें होत्यें. आपल्याला आश्चर्य वाटूं देऊं नका ! ह्या बातम्या अशाच तेव्हांच बाहेर फुटून सर्वतोमुखीं होतात. मला ही गोष्ट समजली असेल अशी कल्पना तरी तुह्मांला झाली होती काय ? त्या तुमच्या भावी पत्नीला कानपुरला नेत आहेत, असं मला कोणी सांगितलं, म्हणून मी तें तुमच्या कानावर घालण्यासाठीं आल्यें होत्यें. मी

कांहीं कष्टानें बोलत नाहीं. तुमच्याविषयीं मला फार कळकळ वाटत्ये खरी. ती अशी कां वाटावी हें माझं मलाच सांगतां येणार नाहीं. असो; पण आतां काय त्याचं ? तुमची तिची गांठ पडली, सारं झालं. तें पहा मागं कोण येतं आहे तें. तुह्मी ज्यांना स्नेही म्हणवितां ते नबाब. ते पहा तिकडे फेरेलच्या मुलीशीं कांहीं बोलत उभे राहिले आहेत. तो तुम्हांला मित्र वाटतो, होय ना ? तुमचं मन कदाचित् तसं सांगत असेल—पण मी आपली बजावून ठेवत्यें बरं! सावध रहा.—"

"ह्यावरून उघडच दिसतें आहे कीं, त्यांच्याबद्दल तुमच्या मनांत कांहीं तरी अढी बसलेली आहे. पण अमीर आणि मी अगदीं लहान होतों तेव्हांपासून अगदीं जिवलग मित्र आहों. लांब कशाला ? आज सकाळचीच गोष्ट घ्याना! फेरेलच्या मुलीचा मला जो पत्ता लागला, त्याचें सर्व यश त्यानें मदत केली तिच्याकडे आहे."

हें वाक्य ऐकून बेगमला आश्चर्य वाटलें, हें स्पष्टच दिसत होतें. तिनें डनबारकडून आपलें तोंड फिरविलें, आणि अर्धवट आपल्याशींच बोलल्याप्रमाणें म्हणूं लागली—" म्हणजे ? ह्यांत त्याचा कांहींतरी डाव आहे खचित! पण तो समजणार कसा ?"—पुनः डनबारकडे तोंड करून म्हणाली,—"परंतु तें कांहीं कां असेना. मीं आपलं तुम्हांला सावध करून ठेवलंच आहे. ह्याउप्पर कांहीं वेडावांकडा प्रसंग आलाच तर मी मदत करण्याला तयार आहे, हें विसरूं नये. याविषयीं मीं पूर्वीच सांगून ठेवलं आहे. तेव्हां कोणच्याही प्रकारचा संकोच बाळगूं नये. माझ्यानं भागलं नाहीं तर मी आपल्या मदतीला माझ्या काश्मीरच्या भावाला घेऊन येईन. हाय हाय! काय तें माझं स्वप्न! तें स्वप्न म्हणावं कां काय, तेंच कळत नाहीं. तें कसं एक एक खरं होत चाललं आहे पहा! पुनः हात जोडून सांगत्यें—सावध करून ठेवत्यें, संकट आलं तर माझ्याकडे मदत मागायला विसरूं नका."

"फार उत्तम. आपण इतकी माझी काळजी करतां, ह्याबद्दल आपले किती उपकार मानूं तितके थोडे आहेत. मी तुमच्याकडे मदत मागावयाला अवश्य येईन; पण माझ्यावर असं कांहीं संकट येईल, याची कल्पनाच होत नाहीं!"

"बरं-बरं, आतां काय त्याचं! अनुभवास येईल. तें खरं. मी आपल्याजवळ

पाठीराखी आहें असं समजा, म्हणजे झालं. अल्ला तुमारा भला करे गा."

इतकें बोलून तिनें आपल्या बेगमी थाटास शोभेल अशा प्रकारें ऐटीनें मान लववून सलाम केला, आणि चट्दिशीं ती आपल्या दासींच्या परिवारांत जाऊन मिसळली.

# प्रकरण १२ वें

## प्रेमी जोडपें–ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं– प्यारीलालचें रक्षण.

पूर्वी ठरल्याप्रमाणें डनबारनें क्रीन्सीला टांग्यांत घेतली, आणि नदीकडे जाणाऱ्या वळणाच्या रस्त्याला हीं दोघें निघालीं. बऱ्याच अंतरावर गेल्यावर क्रीन्सीनें हळूच सुचविलें कीं, आपण खालीं उतरून पायीं चालत जाऊन नदीच्या कांठीं वाळूवर बसूं. त्याप्रमाणें तीं दोघें नदीच्या कांठानें कांहीं वेळ फिरलीं; आणि नंतर तेथेंच थोडीशी साफ जागा करून त्यावर डनबारनें क्रीन्सीला बसविली. नदीचें पात्र जवळच होतें, तरी त्या पाण्याचा कांहीं आवाज होत नव्हता. पण तेथेंच एका खडकावरून थोडेंसें पाणी वेढा घेऊन उतरत जात असल्यामुळें मधून मधून त्याचा झुळझुळ शब्द कानीं येत होता. कांहीं अंतरावर भाताची ने-आण करणारी एक होडी करकर आवाज़ क़रीत चालली होती. तिचें शीड वाऱ्यानें मधून फडफडत होतें, आणि समोरच्या तीरावर कांहीं पाणबुडे-पक्षी क्रीडा करीत होते. ह्याशिवाय आसपास सजीव वस्तूची कांहीं चाहूल नव्हती.

तेथें बसल्यावर प्रथम कांहीं वेळ प्रदर्शनांतील निरनिराळ्या वस्तूंविषयींच त्या दोघांचें बोलणें चाललें होतें. नंतर क्रीन्सीनें होऊनच तो विषय सोडून दिला. तिनें डनबारच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलें—"प्रियकरा चार्ली, आपण असे जवळ असलों म्हणजे मला फार सौख्य वाटतें. आपला लाभ मला झाल्या दिवसापासून माझ्या आनंदाला पारावार नाहीं. परंतु मीं पुष्कळ प्रयत्न केला तरी त्या माझ्या आनंदावर दुःखाची छाया पडल्यावांचून रहात नाहीं. ह्याला काय उपाय करावा ?"

डनबारनें तिला आपल्या बाहुपाशांनीं बद्ध करून पोटाशीं धरिलें, आणि अत्यंत प्रेमपूर्वक दृष्टीनें तिच्याकडे पहात तिची हनुवटी धरून तिचें मुख वर करून म्हटलें —" प्रिये, काय बरें असें ? तुला भीति कशाची वाटते ? माझ्याशीं लग्न करण्याबद्दल तूं वचनबद्ध झालीस, ह्याबद्दल तुझें मन माघार घेऊन, तुला कांहीं पश्चात्तापाची टोंचणी तर वाटत नाहीं ना ?"

तिचें प्रेम खरोखरच आपल्यावर आहे, ह्याबद्दल डनबारला कोणच्याही प्रकारें शंका नव्हती. परंतु ह्या प्रणयाचें पूर्ण सौख्य मिळण्याचा जो योग्य विवाहविधि, त्या मार्गांत कांहीं अकल्पित विघ्न उपस्थित होऊन त्याला कांहीं हरकत येते कीं काय, असें डनबारच्या मनांत आलें.

तिनें त्याच्या विचाराची दिशा ओळखून म्हटलें—" छे छे ! प्रियकरा, पश्चात्ताप ! त्याचं नांवच घेऊं नका ! आपली मी वाग्दत्तवधु झाल्यें आणि आपण मला पदरांत घेतली, ह्यामुळं माझ्या मनाला किती किती समाधान होत आहे म्हणून सांगूं ! त्याबद्दल कोणच्याही प्रकारचा संशय आपण धरूं नये. मला ह्या स्थितींत अत्यंत सौख्य आहे. आतां इहलोकींची कांहीं काळजी उरली नाहीं, परंतु इहलोकींची यात्रा संपल्यावर पुढें काय होणार ? दुसऱ्या एखाद्या जगांत आपल्या दोघांस जन्म आल्यास तेथें आपल्या गांठी पुनः पडतील किंवा नाहीं, ही शंका मनांत येऊन दुःखाची छाया येऊं लागल्ये आणि माझं मन खिन्न होतं. आजपर्यंत हा विषय मीं जवळ काढलाच नाहीं. मीं कांहीं पुस्तकें वाचल्यापासून हा पुनर्जन्म म्हणतात तो आहे कीं नाहीं, किंवा मनुष्य मेल्यानंतर त्याचं कांहीं शिल्लक राहतं कीं नाहीं, ह्याबद्दल माझं मन फार साशंक झालं आहे. माझा आत्मा अमर असेल तरच बरं, असं माझ्या मनाला वाटूं लागलं आहे. इतके दिवस त्याचं मला कांहींच वाटत नव्हतं; पण आतां तो प्रकार बदलला आहे. ह्यापुढें जगून काय करायचं आहे, असं इतक्या दिवस मनानं घेतलं होतं; पण आतां असं वाटूं लागलं आहे कीं, हल्लींची स्थिति सदोदित कायम रहावी, याचा नाश होऊं नये. हा असा इच्छेचा बदल कां...? जगावं, निरंतर येथेंच रहावं, असं कां वाटूं लागलं ? ह्याचं बीज लक्षांत आलं कां ? हा जो नवा आनंद मला सांपडला आहे, हें जें आपल्यावर माझं प्रेम जडून त्याला ही आपल्या प्रेमाची जोड लाभली आहे, त्यामुळं आपल्या समागमांत सदो-

दित रहाण्यास मिळावं, ह्या जन्मींच नव्हे तर जन्मजन्मांतरींही—ह्या जगांतच नव्हे दुसऱ्या कोणच्याही जगतांत-हीच संगति असावी, ह्याच अनुपमेय समागमांत दिवस जावे अशी आशा धरून प्रार्थना करण्याची वेळ आली आहे. पण त्या प्रसंगापूर्वी हें असलं कांहीं नव्हतं. त्याच्यापूर्वी कांहीं निराळीच भावना होती. हा जन्म संपला कीं, पुढें कांहीं नसल्यामुळें काळजी वाटत नव्हती. आणि त्यांतच मला सुख वाटत होतं. ह्या जगतांत दिसणारं दुःख आपल्याकडून होईल तितकं कमी करावं आणि जे कांहीं थोडे फार दिवस इथें काढवयाचे असतील, ते शक्य तेवढ्या सुखांत घालवावे हीच काय ती माझ्या इच्छेची, आशेची, देवापाशीं मागण्याची पराकाष्ठा होती. पण आतां किती फरक पडला आहे पहा! येथेंच कायमचे रहावंसं वाटूं लागलं आहे." हें बोलतां बोलतां कीन्सीचा गळा दाटून येऊन तिचे डोळे भरून आले.

तेव्हां डनबारनें तिच्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हटलें—"प्रिये, तूं इतक्या लहान वयांत बराच पोक्त विचार केला आहेस असें दिसतें. हेकल, ग्रांटएलन आणि असल्याच विचाराच्या दुसऱ्या कित्येक लेखकांचे ग्रंथ मींही वाचले आहेत. हीं पुस्तकें वाचण्यापूर्वीं मी फार धर्मवेडा, नव्हे, तर धर्मभोळा होतों; नंतर अगदीं नास्तिक बनलों होतों. पण ती वेळ मात्र भयंकर होती हो! पुढें कांहीं दिवसांनीं त्यांत फरक पडला. ईश्वर ह्मणून कोणी तरी सृष्टीचा नियामक आहे; मला स्वतःला आत्मा ह्मणून कांहीं असून त्याचें ज्ञान व्हावें ह्मणून मला तळमळ लागून राहिली आहे. त्यासाठीं मागें तुला सांगितलेल्या मंडळांत मीं आपलें नांव दाखल करून घेतलें आणि त्याच्या कामांत मला हौस वाटूं लागली, आणि त्याच हेतूनें मी येथें आलों. कारण मृतांच्या आत्म्यांबरोबर प्रत्यक्ष संभाषण करणारे लोक हिंदुस्थानांत आहेत, अशी तिकडे समजूत आहे. ह्या देशांत तसल्या आत्म्यांना निवासस्थान मिळतें, असें कित्येक लोक—इकडे आल्यावर असल्या लोकांशीं ज्यांचा परिचय झाला असले लोक—म्हणतांना मीं ऐकलें आहे. तेव्हां येथें मी आलों, तो त्या मंडळानें मला इकडे आपल्या कामासाठीं पाठविलें, ह्मणून तर खराच; तथापि माझ्या मनाची तृप्ति, शांति करून घ्यावी, हाहि माझा मुख्य उद्देश होता. माझा विश्वास दृढ होण्यास मला पुष्कळ अनुभव मिळावयास पाहिजे आहे. वास्तविक अशी स्थिति नसती तर बरें झालें

असतें. पण ह्यांत तरी माझें काय नुकसान आहे ? कांहीं नाहीं. पण तसें कांहीं जमत नाहीं. कांहीं लोकांची जात्याच प्रकृति अशी असते कीं, त्यांना स्वत: जरी कांहीं अनुभव नसला, त्यांनीं प्रत्यक्ष कांहीं पाहिलें नसलें, तरी त्यांच्यावर अशी ईश्वराची कृपा असते कीं त्यांचा विश्वास बसतो. पूर्वीपेक्षां हल्लीं माझ्या मनाची स्थिति बरीच समाधानकारक आहे. माझ्या दृष्टीस जें कांहीं पडतें, त्यावरून ईश्वराच्या अस्तित्वाचाच मला दाखला पटतो."

ह्या ठिकाणीं कॉन्सीनें मध्येंच प्रश्न केला—"मग ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन कां होत नाहीं ? तें झाल्याशिवाय बाकी सर्व गोष्टी वृथा आहेत. कोणा एका चांगल्या विद्वानाच्या तोंडचे असे उद्गार मीं ऐकिले आहेत कीं, ईश्वर जर जगांत असेल, तर त्याचें प्रत्यक्ष दर्शन होईपर्यंत माझा त्याच्यावर विश्वास बसणार नाहीं, म्हणून त्यानें मजवर उगीच रागावूं नये. निदान तो रागावणार नाहीं खास !"

डनबार म्हणाला:—"ह्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही कोटि मीं पूर्वींच ऐकिली आहे. ह्या लोकांचें म्हणणेंच बरोबर नाहीं. ईश्वराचा आपल्याला साक्षात्कार व्हावा म्हणणाऱ्या ह्या लोकांना यहुद्यांची हकीगत ठाऊक नाहीं काय ? त्यांना देवाचें प्रत्यक्ष दर्शन किती वेळां तरी झालेलें आहे. पण हा आधार त्यांना द्यायला जा कीं, तुमची ते थट्टा उडविल्याशिवाय रहाणार नाहींत. ईश्वराचा साक्षात्कार होणेंच शक्य नाहीं, असा त्यांच्या मनांतील दंश असतो. असले चमत्कार होतच नाहींत, असें एकीकडे म्हणत असतांही पुनः तसला चमत्कार आपल्यापुरता घडून यावा, अशी त्यांच्या मनांत खुमखुम असते. ह्या त्यांच्या मूर्खपणाला—विसंगतपणाला काय म्हणावें ?"

"प्रियकरा चालीं ! आपलं बोलणं किती सुबोध वाटतं ! माझ्या मनांत शिरलेली ही ईश्वराविषयींची नास्तिकबुद्धि नाहींशी होईल, असा मजला उपदेश करा ! माझी खात्री पटेल असे दाखले, दृष्टांत द्या ! आमचा जन्म ह्या काळांत ह्या सुधारणेच्या नास्तिकपणाच्या काळांत—झाला, हीच चूक झाली. खिस्ताचा अवतार जेव्हां होता, तेव्हां आम्ही कां जन्मास आलों नाहीं ? काय करावं ह्याला ? किंवा हल्लींच्या काळांत तसा खिस्तच कां जन्माला येत नाहीं ? नाहींतर त्याला जेव्हां खिळे ठोकून मारण्याच्या शिक्षेसाठीं चाललेंपी होतें, त्या वेळेस आम्ही तेथें असतों, तर ईश्वराचें अस्तित्व समजून

घेण्यासाठीं त्याच्यामागें खात्रीनें गेलों असतों अथवा तो जेव्हां पर्वतशिखरावर आरोहण करून आकाशांत उडून गेला, तें पहाण्यास जरी हजर असतों, तरी किती मौज झाली असती वरें ?"

"कांहीं झाली नसती. आपण त्या वेळीं असतों तर इतर लोकांप्रमाणेंच 'खिळे ठोकून मारा' असेंच ओरडलों असतों. त्या वेळची गोष्ट कशाला ? हल्लीं आपलें आचरण कसें आहे पहा ! भाषाभेद पण अर्थ त्या प्रकारचाच नाहीं काय ? ख्रिस्त हा ईश्वराचा अवतार आहे अशी भावना आतां तरी कोणाच्या मनांत आहे कां सांग ? ह्याच विषयाचा आणखी थोडा विचार कर म्हणजे मी काय म्हणतों तें लक्षांत येईल. उदाहरणार्थ, ह्या आकाशांत जे ग्रह आपआपल्या कक्षेत फिरत असतात, ते कशाच्या आधारानें ? अगोदर प्रश्न असा येतो कीं हे निर्माणच कसे झाले ? आपोआप, सहज किंवा यदृच्छेनें, असें जर कोणी म्हणेल तर हल्लीं तसा एखादा नवीन ग्रह कां उत्पन्न होत नाहीं ? ते आपल्या स्थलावरून एक तिळभरही इकडे तिकडे हालत नाहींत, ह्याला कारण तरी काकतालीय न्यायच कां ? जगांतील अत्यंत नवल करण्यासारखी गोष्ट हा ताजमहाल आहे ना ? हाच कोणी म्हणूं लागला कीं मनुष्यानें बांधलेला नाहीं, तो आपोआप पृथ्वीच्या पोटांतून वर आला, तर त्याला आपण काय म्हणूं ? एका बादशहाला स्वप्नांत दृष्टांत झाला आणि त्यानें त्या दृष्टांताला मूर्त रूप दिलें; असें वास्तविक असून, त्याला आपण म्हणूं लागलों कीं, छे छे ! ही कविकल्पना आहे; यांत प्रतिभा नाहीं, तेज नाहीं; उगाच ह्या गप्पा आहेत. असे शब्द ऐकतांच वेड्याच्या इस्पितळांत आपली रवानगी केली पाहिजे असेंच लोक म्हणूं लागतील ! पण ह्या बाबतींत स्वतःला वेडा म्हणवून आपला शहाणपणा व्यक्त करणाऱ्या मनुष्याला ह्या जगाबद्दल, सृष्टीबद्दल प्रश्न करा आणि तो काय म्हणतो पहा. तो म्हणेल कीं, ताजमहालापेक्षां अनंत पटीनें सुंदर व आश्चर्यकारक हें जग आहे खरें, तरी तें सृष्टिनियमाप्रमाणें आपोआप, काकतालीयन्यायानें उत्पन्न झालें. त्याचा कर्ता पाहिजे कशाला ? जग निर्माण करणारा कोणीच नाहीं. अशा प्रकारें तो आपलें मत प्रतिपादन करील. चमत्कार वगैरे सब झूट आहे, माझा त्याच्यावर विश्वास नाहीं, असे तो एकीकडे म्हणेल; पण सहज जगाची उत्पत्ति झाली म्हणणें हा जो सर्वांत मोठा चमत्कार तो मात्र

तो मुकाट्यानें कबूल करितो; त्याबद्दल त्याला कांहीं वाटत नाहीं. गर्भामध्यें जीव उत्पन्न होतो हा सुद्धां सृष्टिनियम किंवा यदृच्छा काय? अनेक रसायन-शास्त्रवेत्त्यांनीं आजपर्यंत हजारों प्रयत्न करून पाहिले, परंतु जीव निर्माण होण्याला कारण जीवच पाहिजे, सजीवाशिवाय जीव होत नाहीं; त्या जीवाची उत्पत्ति पूर्वीच्या जीवापासून; असें मागें जातां जातां कोठें तरी थांबणें भाग येतें; शेवटीं जो अगदीं पहिला जीव ठरला, तो तरी जन्माला कसा आला? हेकेलसारख्यांनीं सुद्धां ह्या कामांत हात टेकले. तेव्हां हा पहिला निर्जीवापासून उत्पन्न झाला असेल, असें गृहीत धरणें, अशा म्हणण्यावर विश्वास ठेवणें म्हणजे अत्यंत मोठ्या चमत्काराला अंधविश्वासानें मान डोलविण्यासारखेंच आहे! छे छे, प्रिये, तें कांहीं नाहीं! मोठ्यामोठ्या मी मी म्हणविणाऱ्या शहाण्यांची मति येथें कुंठित झाली आहे. हें जीवित म्हणजे केवळ दुःखमय आहे असें म्हणणारे कांहीं लोक असतात, पण हल्लींच्या स्थितींत मी आणि तूं तरी ह्या वर्गांत आपली गणना करून घेण्यास तयार नाहीं. तथापि विचार करीत बसल्यावर पूर्वींच्याच शंका पुनः दत्त म्हणून पुढें उभ्या रहातात, आणि ह्याच शंकांचा एकदा अखेर निकाल लावून त्या खोल जमिनींत गाडून टाकाव्या, अशा उद्देशानें मी इकडे आलों. कदाचित् ह्या येण्यांत माझा यत्न सफल होईलच असें कशावरून! कदाचित् नवीन माहिती कांहींच मिळणारहि नाहीं. तसेंच व्हावयाचें असेल तर ईश्वराची मर्जी! आपल्यासारख्याचा इलाज तेथें काय चालणार! मी इकडे आल्यानें निदान एक सुखाची खाण माझ्या हातीं आली; ती दुसरी कोणची नव्हे, तर ही प्रत्यक्ष आनंदाची पुतळी मला लाभली, हीच होय!"

डनबारला वाटलें कीं, आतां अगदीं एकांत आहे, अगदीं आसपास कोणी नाहीं; म्हणून त्यानें कीन्सीच्या हनुवटीला हात धरून तिच्या ओंठापर्यंत तोंड नेलेंसुद्धां पण तितक्यांत तो दचकून मागें झाला आणि 'काय हें?' म्हणून ओरडला काय झालें म्हणून कीन्सी पाहूं लागली तों कोणीतरी एकदम पाण्यांत उडी मारल्यासारखा आवाज ऐकूं आला.

तेव्हां कीन्सीही ओरडली. ती म्हणाली—"अगबाई! कोणी तरी पाण्यांत उडी मारून जीव देत आहे. तो खास आतां बुडणार!"

डनबाननें तिकडे नजर टाकली. व तो ताडकन् उठून उभा राहिला, त्यानें

कोट काढून फेकून दिला आणि तो नदींत शिरला. त्याच्या पाठोपाठ कॉन्सी पाण्याच्या कांठापर्यंत गेली. पण भयानें ती अगदीं घाबरून गेली. तिचा मुखचंद्र अगदीं विवर्ण झाला, आणि तिचें हृदय इतक्या जोरानें उडूं लागलें कीं, शेजारच्या मनुष्याला त्याचे ठोके ऐकूं गेले असते. ती कावऱ्या-बावऱ्या नजरेनें तिकडे पाहूं लागली.

डनबारनें पाण्यांतून डोकें वर काढिलें, तों तेथें आसपास दर्भाचीं वाढलेलीं बेटें दिसत होतीं; सूचना देऊन त्याला सावध रहाण्यासाठीं सांगावें म्हणून ती ओरडून म्हणाली— " संभाळा, संभाळा ! तिथें दर्भाचीं बेटें वाढलेलीं आहेत." पण डनबारचा उपायच नव्हता. तो पाण्यावर तरंगून पहातो तों या दर्भांतच त्याला डोकें दिसूं लागलें, आणि आपण मदतीला गेलों नाहीं तर तो आतां खालीं जाणार असें मनांत आणून त्यानें पुनः बुडी मारली. कांहीं वेळ त्या दर्भाच्या जुंबड्यांत धडपड होत असल्याचें दिसलें; डनबार त्यांतूनच हिसडा मारून वर निघाला. तो एका हातानें दर्भाचीं पातीं उपटून टाकीत होता. डनबार चांगला सशक्त होता आणि त्याला चांगलें पोहतां येत होतें म्हणून बरें झालें. नाहीं तर आज कांहीं त्याचा निभाव लागला नसता. त्या दर्भाच्या जुंबड्यांतून दुसऱ्या बुडत्या माणसास वर काढून घेऊन प्रवाहाच्या उलट बाजूनें पोहत येणें फार शक्तीचेंच काम होतें. जीव देण्यासाठीं बुडी मारणारा एक लहान पोरगा होता; त्याला डनबारनें सुरक्षित नदीच्या किनाऱ्यावर आणून वाळूवर ठेविलें, आणि त्यानें व कॉन्सीनें दोघांनीं त्याचें अंग चोळून सावध केलें.

तें पोर जेव्हां शुद्धीवर येऊं लागलें, तेव्हां त्याच्या तोंडून प्रथम उद्गार कांहींतरी कृतज्ञतेचे येणें हें साहजिक होतें, पण तसें कांहीं झालें नाहीं. त्याऐवजीं त्याची तक्रारच सुरूं झाली. तो म्हणाला— " हें कां तुम्हीं असें केलें ? मी चांगला मरणार होतों, तों मला कां वांचविलें ? मीं तुमचें काय वाईट केलें होतें, म्हणून तुम्हीं माझे हाल मांडिले आहेत ? "

त्याचा डनबरला राग आला; तो म्हणाला— " चूप्प बस्स पोरा ! आम्हीं तुला काढूं नये, तर काय तुला पाण्यांत बुडून मरूं द्यायचें होतें ? "

तो पोरगा त्रासानें बोलूं लागला— " हो, खुशाल ! त्यांत तुमचें कांहीं गेलें नसतें; मी इतक्यांत तुमच्या जवळून गेलों, तेव्हां तुम्हांला मीं पाहिलें,"

पण मग माझा इलाज चालेना. उडी मारण्याच्या वेगांत मी धांवत आलों होतों, तेव्हां मग माझें मलाच आवरण्याचें अवसान नव्हतें. हें जर मला आधीं समजतें तर मी इतका खालीं आलोंच नसतों. जरा वरच्या बाजूला जाऊन उडी टाकली असती. ''

'' येवढेसं मिच्याएवढं पोर तूं! आणि इतक्यांत तुला जीव नकोसा झाला कसा ? ''

हें ऐकून तें पोर आतां उठून बसलें; तें गुरगुर करीतच बोलूं लागलें— '' हो हो! मला माझा जीव नकोसाच झाला आहे. तुमचेंसुद्धां प्रेमाचें कोणी मेलें असतें तर तुम्हांलासुद्धां तसेंच झाल्यावांचून राहील कां ? तुमच्या जिव्हाळ्याचें कोणी असेल त्याचा तुमचा वियोग झाला तर तुह्मांला कसें वाटेल सांगा बाहूं ? '' असें म्हणून त्यानें आपल्या पालथ्या हातानें आपले अश्रु पुसले.

कॉन्सीला त्याची फारच दया आली, ती म्हणूं लागली— '' अरेरे ! गरीब बिचारं अनाथ पोर हें. तुला आईबिई कोणी आहे का रे बाळ ? ''

त्या पोरानें तिरस्कारमिश्रित हास्य करून ह्मटलें— '' आई ! मला कसली गरिबाला आई ? मला आई ठाऊक नाहीं आणि बापही ठाऊक नाहीं. माझा काय तो एक लाडका ' टाम्या ' कुत्रा होता; म्युनिसिपालिटीच्या कोणी मांगानें त्याला गोळी घालून मारून टाकला. पण कोणीं मारला त्याचें नांव मला माहीत नाहीं. तो मारेकरी जर मला समजता तर त्याचा प्राणच मी घेतला असता ! '' हें शेवटचें वाक्य उच्चारतांना त्यानें अगदीं दांतओठ चावले.

तेव्हां डनबारला त्याची भीति वाटली. म्हणून त्यानें कॉन्सीला त्याच्यापासून जरा मागें ओढिली आणि तिला म्हटलें– '' तूं इतकी त्याच्याजवळ बसूं नको. मला वाटतें कीं, ह्या पोराला वेड लागलें आहे. तो काय कोणाला करील त्याचा नेम नाहीं. त्याच्यापाशीं सावधगिरीनेंच वागलें पाहिजे. ''

हें डनबारचें वाक्य ऐकतांच त्या पोरानें आपले दांतओठ नीट साफ केले आणि तोंडावरून हात फिरविला. तो म्हणाला— '' इतकें नको कांहीं मला भ्यायला ! मी वेडा नाहीं. दुसऱ्याबरोबरचें माझें वर्तन कोणा-

लाही असेंच चमत्कारिक दिसणार; कारण मी बोलूनचालून कुत्रा; ह्या जन्मीं मनुष्य झालों म्हणून काय झालें ? मागच्या जन्मीं कुत्रा होतोंच कीं नाहीं ! ”

‘ मागच्या जन्मीं ’ हे शब्द ऐकतांच डनबारनें कान टवकारिले आणि त्या मुलाबद्दल त्याला अधिक जिज्ञासा उत्पन्न झाली. तो त्याला गोंजारून बोलूं लागला— “ तुझें नांव काय ? ”

त्या पोरानें उत्तर केलें— “ प्यारीलाल ”

डनबारला जास्तच आश्चर्य वाटलें; तो म्हणाला— “ काय म्हणतोस ? अरे, हें नांव तुझें खरें दिसत नाहीं. हें खिस्ती नांव नाहीं. तुझ्या आई-बापांनीं तुझें नांव काय ठेविलें होतें ? ”

त्या पोरानें म्हटलें— “ मला काय ठाऊक ? अगोदर आईबाप होते कीं नाहीं ह्याचीच जर पंचाईत, तर नांव कुठून ठाऊक असणार ? मला अगदीं पहिली आठवण अशी आहे कीं, मी एका मांगाच्या घरांत फार फार हाल काढीत होतों. निसटून जायची संधि मिळतांच मी तेथून पोबारा केला. दिली चांगलीच झुकांडी! तेव्हांपासून कुठें तरी असतों. स्मशानांत नाहीं तर कुठल्यातरी पडक्या इमारतीच्या आश्रयाला राहतों. पण तेथेंसुद्धां माझ्या सोबतीला एक कुत्रें होतें; तें आतां मेलें; तेव्हां मला जपून काय करा-वयाचें आहे ? ”

कनवाळूपणानें त्याच्या पाठीवर हात फिरवून कॅन्सी म्हणूं लागली— “ असें बोलूं नये बाळ. मरायचं कशाला तें ? आम्हीं तुला संभाळूं, नाहीं तर तुला एखाद्या मिशनरी शाळेंत पाठवून देऊं. ”

“ नको नको बाबा, मला ती मिशनरी शाळा. तसें कराल तर मी आपला लगेंच इथें येऊन नदींत जीव देईन ! मला एकदां तसल्या शाळेंत घातलें होतें, त्याचा मला अनुभव आहे. तेथलीं फळें मीं चोरून खाल्लीं, तेव्हां त्या पाद्र्यानें मला बडव बडव बडविलें ! मीं तरी काय करूं ? उपास किती दिवस काढूं ? फळें आयतीं सांपडलीं तीं मीं उचलून तोंडांत घातलीं. त्या दिवसापासून पाद्री पाहिला कीं माझा संताप होतो ! ”

तेव्हां त्याचें समाधान करून डनबार ह्मणाला:—“ तूं कांहीं भिऊं नकोस. मी आपल्या घरींच तुला ठेवीन. तूं मजजवळ राहाशील कीं नाहीं ?

सध्यां तर चल माझ्याबरोबर."

डनबारच्या मनांत त्या पोराला सोडून द्यावें असें येईना; ह्याचें कारण विचारिलें असतें तर त्याचें त्यालाच सांगतां आलें नसतें. ह्या पोराचे आई-बाप युरोपियन असले पाहिजेत, असें त्याच्या मनानें घेतलें होतें; पण तेथून तें मांगाच्या घरीं कसें आलें, ह्याची कांहीं कल्पना बसेना. तें पोर कुत्रा-संबंधानें जें कांहीं वेडेविद्रें भाषण करीत आहे, त्याचें कारण दुसरें कांहीं नसून लहानपणापासून त्याला दुसरी कांहीं संगति नसल्याचा हा परिणाम आहे. कुत्र्याशिवाय त्याला जवळ असें कोणीं घेतलेंच नसेल, सगळ्यांनीं हड हड केल्यामुळें असें झालें असावें.

क्रीन्सीनें विचारलें—" ह्या पोराला घरीं नेणार खरें, परंतु ह्याला घेऊन कोण येईल ? त्याला नुसती खूण सांगितली तर हें पोर न चुकतां पत्ता काढीत येईल कीं नाहीं कोण जाणें ! "

डनबारनें उत्तर केलें—" छे छे, तसें करून कसें चालेल ? त्याचा काय नेम ? माझ्या मनांत त्याला आपल्याबरोबर गाडींत न्यावें असें आहे; पण तुला तें आवडेल कीं नाहीं म्हणून—"

तेव्हां मानेला हिसडा देऊन क्रीन्सी मध्येंच म्हणाली:—" इश्श ! मी कशाला नको म्हणूं ? आपलीही योजना पाहून आपल्या अंत:करणाच्या प्रेमळपणाचा अधिक दाखला मला मिळत आहे. जों जों इकडचा सहवास होत जात आहे तों तों ह्या बाबतीचा अनुभव वाढतच चालला आहे."

झालें. लगेच ते सर्वजण गाडींत बसले. तेथें कपडे बदलण्याची किंवा वाळवण्याची कांहींच सोय नसल्यामुळें प्यारीलाल तसाच ओलेता घोडेवाल्याजवळ बसला; तेव्हां त्याच्या तोंडावर त्याला झालेल्या आनंदाचें स्पष्ट प्रतिबिंब पडलें होतें. ह्याप्रमाणें राजरोस गाडींत बसण्याचा त्याचा पहिलाच प्रसंग होता. एरवीं भाड्याच्या गाडीच्या मागच्या फळीवर चोरून बसून तो पुष्कळ वेळां गेला होता. पण अगोदर तिथें नीट बसण्याची सोय नसावयाची; आणि कोणी ' गाडीवाले, पीछे चाबूक ! ' म्हटल्याबरोबर त्यानें मागें फटकारा मारला तर काय घ्या, ह्याची भीति असावयाची ! प्यारीलालची घोडेवाल्या-बरोबर एकसारखी टकळी सुरू झाली. घोडेवाला मुळींच भाषण करीत नव्हता. प्यारीलाल लख्ख उर्दू बोले. घोडेवाला बोलेल कसा ? गाडीस मालक

असल्यावर, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांस " पैस पैस " म्हणण्याशिवाय दुसरा शब्द काढणें म्हणजे अपमान, अमर्यादा, गैरशिस्तपणा होतो, ही त्या घोडेवाल्याची समजूत. ' गप्प बैस ' अशी खूण करून प्यारीलालला दाबण्याचा घोडेवाल्यानें यत्न केला, पण तें पोर कांहीं केल्या गप्प बसेना; त्याची आपली कहाणी सुरू होती. तो म्हणत होता कीं, " मला इंग्रजी नाहीं उर्दूइतकें येत. तसें येत असतें तर गाडींतल्या बीबीसाहेबांशींच मी बोलत बसलों असतों. मग तुला कोण विचारीत होतें ? " हें त्याचें भाषण ऐकून डनबार व कीन्सी दोघांनाही हसूं आलें. पण पुढें बोलतां बोलतां तें पोर फारच वहावूं लागलें. तें म्हणालें " अहारे आंधळ्या, पहा तर खरा नीट. आपल्या मालकीण बाई किती सुंदर आहेत, तुला कांहीं कळतें कां ?" तेव्हां मात्र डनबारनें रागें भरून त्याला गप्प केलें. मग त्याच्या उलट कृति सुरू झाली. तोंडांतून शब्द काढण्याची मनाई झाली, तेव्हां तो माकडचेष्टा करूं लागला ! कोणाला वेडावून दाखव, कोणाला पाहून नाक खाजीव, कोणापुढें वेडेवांकडे हात कर, असा त्याचा क्रम सुरू झाला.

घरीं आल्याबरोबर म्हाताऱ्या फेरलला त्यानें त्या पोराची सर्व हकीगत सांगितली आणि तें पोर दाखविलें. तेव्हां म्हाताऱ्यानें त्याला कांहीं प्रश्न विचारिले आणि नंतर डनबारकडे वळून तो म्हणालाः—" ह्याला सुधारण्याला पुष्कळ खटपट करावी लागेल. मला जर हें कोणीं काम सांगितलें तर मी कांहीं तें पतकरलें नसतें. तुम्ही याला कसा संभाळणार कोण जाणें ? त्याची जेवणाची तजवीज प्रथम केली पाहिजे; पण त्याला आपल्या शेजारीं घेऊन बसणार काय ? "

डनबारनें उत्तर केलें:- " नाहीं बुवा, आजच ही गोष्ट नको. न जाणों, त्या पोरानें भलतीच कांहीं चेष्टा तेथें केली, तर मालकच म्हणायचा कीं, तुम्हीच जा मुळीं माझ्या खाणावळींतून निघून ! त्याला मी आपल्या खोलींतच जेवण वाढून देईन. "

नंतर प्यारीलालच्या स्नानाची तयारी झाली. पुष्कळ कढत पाणी करून साबण लावून त्याला चांगली घासून अंघोळ घातली, आणि डनबारनें आपले जुने कपडे त्याच्यासाठीं शोधून काढून ठेविले. ते त्याला पोकळच झाले, पण कीन्सीनें इकडे तिकडे टाके मारून तुरपून सुडपून त्याला

कांहींसा आकार आणिला. प्यारीलालचें आंग पुसून झाल्यावर त्याला तो पोशाख चढविला. लहान पोरी आपल्या भावलाभावलीस परकर वगैरे नवीन नेसविल्यावर ज्याप्रमाणें त्याच्याकडे पाहून आनंद मानतात, त्याप्रमाणेंच डनबारला झालें. प्यारीलालच्या अंगावर ते कपडे घातल्यावर त्याच्याकडे किती वेळ डनबार पहात उभा राहिला! " काय प्रेम हें, किती मेहेरबानगी हुजुरची ही. असल्या ममतेची आजपर्यंत मला ओळखच नाहीं आणि त्यामुळें मीं माणुसघाण्या न व्हावें तर काय होणार ? लोकांना त्रास देण्यांत, त्यांना पीडा झालेली पाहण्यांतच मला आनंद होतो, ह्याचें कारण तरी हेंच. बसबस; ह्यापुढें तो स्वभाव आपण बदलून टाकण्याचा यत्न करणार. निदान मालक आणि त्या सुस्वरूप ताई ह्यांच्यावर तरी आपण प्रेम करणार. बस, हीच गोष्ट ठरली ! ठरली ती ठरलीच."

डनबार आनंदानें बोलूं लागलाः— " भले शाबास! हा आरंभ तर ठीक झाला. कोणी तरी प्रेम करायला असलें म्हणजे बरें असतें. हेंच प्रेम हळूहळु वाढवीत सर्व प्राणिमात्रावर दया करावयास मी तुला शिकवणार आहें."

पण ही गोष्ट प्यारीलालला मानवली नाहीं. प्रेमाचें क्षेत्र इतकें व्यापक करण्याचा हा हुजुरचा प्रश्न आपल्याला कसा झेपेल असें वाटूनच जणूं काय त्यानें मानेनें नाहीं म्हणून खुणविलें आणि डनबारकडे पाहून तो मोठ्यानें हंसूं लागला.

# प्रकरण १३ वें,

## प्यारीलालच्या खोड्या, आत्मज्योतिदर्शन, व दुःखाचीं स्वप्नें.

प्यारीलाल अगदींच टाकाऊ व निकामी पोर नाहीं, असें लवकरच निदर्शनास येऊं लागलें. तें पोर खोडकर होतें ह्यांत संशय नाहीं; पण भलत्याच्याच वाटेला जात नसे. त्याचें कोणीं कांहीं केलें, तर मात्र तें लक्षांत ठेवून, मग त्याबद्दलचा सूड घेण्यासाठीं तो अगदीं रागावून सतावल्यासारखा

होई ! तो खुशाल म्हणे कीं, माणूस पाहिला कीं, माझ्या कपाळाची तिडीक उठते; आणि म्हणून कोणाला–मग ती स्त्री, पुरुष, कोणी असो; अगदीं लहान मूल कां असेना–त्याला दुःख होत असतें, त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा आल्या, म्हणजे हा पोरगा आनंदानें नाचूं लागे ! हॉटेलमध्यें डनबार त्याला घेऊन आला–त्याच दिवशीं दुपारच्या आंत–त्याला कुठून, कसा हॉटेलच्या मुसलमान कारभाऱ्याचा जोडा सांपडला कोण जाणे ! त्यानें तो उचलून स्वयंपाक घरांतल्या इंजिनाच्या निखाऱ्यांत फेंकून दिला. जोडा जुना होता खरा, पण तो कारभारी म्हणे कीं, मला जुना चालेल. पण जुना तरी मिळ-णार कोठें ! त्यामुळें त्याबद्दल नव्याचेच पैसे डनबारला भरावे लागले. दुसरी खोडी–हॉटेलमधल्या स्वयंपाक्याच्याजवळ हिंडतां हिंडतां त्याचा धक्का लागून आधणाचें पाणीच स्वयंपाक्याच्या पायावर सांडलें ! ही गोष्ट चुकून झाली असेल–प्यारीलालनें मुद्दाम केली नाहीं–असें म्हणणें संभवनीय आहे; पण खाबूरच्या दाढीला–तो निजला असतांना प्यारीलालनें काडी पेटवून लाविली, ही गोष्ट तर सहज झाली नाहीं ना ! खाबूरची झोंप फार सावध असे. त्यामुळें तो चट्दिशीं जागा झाला, आणि त्यानें दाढी पटदिशीं विझविली ! नाहीं तर खाबूरची सर्व शोभा नाहींशी होऊन तो विद्रूप दिसूं लागला असता ! पण खाबूरला त्या पोराचा फारच संताप आला. कारण, मुसलमान लोकांनीं मोठी शपथ घ्यावयाची, म्हणजे आपल्या दाढीची किंवा पैगंबराच्या दाढीची. त्यामुळें त्यांना दाढी म्हणजे पवित्र, धर्माची एक बाब वाटत असते; आणि म्हणून ते दाढीला फार जपतात. खाबूर अगदीं हातघाईवर आला. तो डनबारला म्हणाला—"हुजूर, पुरे झाली आपली नोकरी ! मी आतां ह्यापुढें आपल्याजवळ रहाणार नाहीं. माझ्या मागल्या चिठ्या, दाखले आपल्याजवळ दिले आहेत, ते माझे मला आत्तां सारे परत द्या कसे ! मी आपला निघून जाणार. एक हें पोर लाथ मारून हाकलून द्या, नाहीं तर माझा आपला सलाम घ्या. पहा, मालक, मी आपल्या पायांपाशीं किती दिवस इमानेंइतबारें नोकरी केली आहे !"

डनबारला मोठी पंचाईत पडली. तो खाबूरचीं आर्जवें करून म्हणूं लागलाः—"हें काय बरें ! खाबूर, मी तर तुला सोडणार नाहीं. त्या पोराचें काय इतकें मनावर घेतोस ! त्याच्याकडे काय दोष बरें ! त्याला

कोणीं कधीं चांगली रीतच लाविली नाहीं, तेव्हां त्यालाच सर्वस्वीं दोष लावितां येत नाहीं. "

" छे छे ! हुजूर, ओ तो अदमी नही, कुत्रा है कुत्रा ! म्हणून तर तो तुमच्या चटईवर हातपाय पसरून पडतो ! तो तसाच असतांना आपल्या झाडूला बोलावून मी केर काढून घेतों. "

" म्हणूनच त्या पोराचा तुझ्यावर राग आहे. हें काय बरें ? तूं तरी असें कां करावें ? त्याच्या वाटेला तूं जातोस आणि मग त्यानें तुझी खिजाळी केली म्हणून रागावतोस, हें चांगलें का ? तो चिखल आहे, तुला ठाऊक आहे; मग त्याच्यावर दगड टाकून तूं आपल्या अंगावर शिंतोडे कां उडवून घेतोस ? तूं त्याला ममतेनें वागीव, म्हणजे मग तो तुझ्या वाटेस जाणार नाहीं. तुझा योग्य सन्मान ठेवील. "

" केवढा आला आहे मान ठेवणारा ! ह्यापेक्षां मोठी फजिती ती कोणची करणार ? बरें, मी लवकर जागा झालों ह्मणून खैर झाली, नाहीतर माझी सगळीच दाढी गेली असती ! आणि माझ्या तोंडाचा गोटा, केंस-रहित पाहून माझी हातारी बिबी आणि पोरी मला काय म्हणाल्या असत्या ? काय ह्मणावें मीं ? हुजूर, आपणही त्याचाच कैवार घेतां ? म्हणे माझा योग्य सन्मान ठेवील ! तें कारटें निव्वळ ( दांतओंठ खाऊन ) बदमाष आहे बदमाष ! त्याच्या मनांत माझी छीः थूः व्हावी असेंच होतें. इनशानल्ला ! झनानखान्यांत नोकरीवर बिन दाढीमिशाचे लोक असतात, नाहीं कां ? त्यांतलाच एक मी व्हावें असा त्या लुच्याचा हेतु होता खास ! "

" छे रे खाबूर ! तुझा समज भलताच झाला आहे. मला नाहीं वाटत कीं, त्याचा इतका खोल हेतु असेल म्हणून. बरें बुवा, झालें तें होऊन गेलें, आतां पुनः ह्यापुढें तो असें करणार नाहीं. मी त्याला चांगलें समजावून सांगेन. तें पोर कांहीं अगदींच कामांतून गेलेलें नाहीं. "

ह्या वेळीं खाबूरनें आपल्या त्या थोडथोड्या जळलेल्या केंसांच्या दाढी-वरून खालून वर चढवीत असा हात फिरविला आणि पुनः तो डनबारला नम्रतेनें म्हणूं लागलाः—" हुजूर, आपण त्याचे फार लाड करतां, त्यानें तो शेफारून जातो. त्याच्यावर हुजूरची बहाल मर्जी आहे. पण त्या गुला-माचेंही हुजूरवर अत्यंत प्रेम आहे, हें मलासुद्धां कबूल केलें पाहिजे. ही गोष्ट

कशी झाली, ती मात्र कळेना. त्याचा लागाबांधा पूर्वीचा असल्यामुळें ही त्याची भक्ति जडली कीं काय कोणास ठाऊक ? आतां त्याच्या ह्या भक्तीबद्दल आजच्या गुन्ह्याची मी त्याला माफी देतों. ”

सारांश, ह्याप्रमाणें ह्या वेळेला तरी समेट होऊन सगळें स्थिरस्थावर झालें. पण डनबारचें स्वस्थ नव्हतें. त्याला वाटे कीं, हें पोर कोणच्या वेळीं काय खोडी करील कोण जाणे ? पुनः जर कां ह्यानें कांहीं कमी जास्त केलें तर सगळीच बंडाळी माजेल ! तेव्हां त्या पोराला घालवून द्यावें कीं काय करावें ? पण पुनः कांहीं वेळ विचार करून त्यानें असें ठरविलें कीं, आणखी एकदां प्रयत्न करून पाहूं. तेवढ्यावरून तें पोर निवळलें, व त्यानें आपलें वर्तन सुधारिलें, तर बरेंच झालें. इतक्यांत प्यारीलाल त्याच्या दृष्टीस पडला. डनबारनें त्याला आपल्याजवळ बोलाविलें; तें पोर लगेंच धांवत आलें आणि कुत्र्याप्रमाणें जमीनीवर पालथें हातपाय ताणून बसलें आणि डनबार काय म्हणतो याची वाट पहात त्याच्या तोंडाकडे त्यानें सारखी नजर लाविली.

डनबारनें त्याच्या पाटीवरून हात फिरवून त्याला फार ममतेनें म्हटलें, “ प्यारीलाल, तुला मीं नदींतून काढून बांचविलेंना ? मग तूं असें कां बरें करितोस ? माझें कां ऐकत नाहींस ? माझ्या मनाला बरें वाटेल असा कां वागत नाहींस ? तूं तर काय विलक्षणच खोड्या करूं लागलास; तुझ्याबद्दल किती तरी लोक मजजवळ तक्रारी घेऊन येतात, त्या प्रत्येकाची समजूत घालतां घालतां मला पुरेवाट झाली आहे. हें काय बरें असें हें ? तूं माझें ऐकणार कां नाहीं ? अशानें मी तुला एका मिशन शाळेंतच मुळीं पाठवून देतों म्हणजे सगळी कटकट मिटली !”

मानेला एक हिसडा देऊन प्यारीलालनें उत्तर केलें, “ आहा ! मी तर तिथें रहाणारच नाहीं. मी आपला पळून जाईन आणि नदींत उडी टाकून जीव देईन ! ”

“ हें काय असें ? मी काय म्हणतों तूं समजलास नाहींस. त्या शाळेंत तूं गेलास म्हणजे तिथले लोक तुझी सर्व प्रकारची काळजी घेतील, तुला शिकवितील. नीट चांगलें वागून दुसऱ्याच्या उपयोगीं कसें पडावें याचें शिक्षण तुला मिळेल. ”

"तें कांहीं मला नको. माझ्यावर कोणी, कोणीसुद्धां प्रेम करितां कामा नये. मीही ठरवून टाकिलें आहे कीं, मी कोणावर सुद्धां प्रेम करणार नाहीं. ह्यांतून दोन माणसें मात्र वगळायचीं हो! एक हुजूर आणि एक त्या कालच्या बाई—"

"तुझें प्रेम खरोखरच आमच्यावर आहे कां? तसें असेल असें मला वाटत नाहीं. खरोखर माझ्यावर प्रेम असतें तर तूं असा वागला नसतास."

"माझें आपल्यावर प्रेम आहे, हें खचित खचित! पण इतर दुसरे कोणी मला नको. धनीसाहेब, आतां माझ्या लक्षांत आलें. कोणी तरी माझ्या चुगल्या आपल्याजवळ सांगितल्या आहेत. हाच खाबूर, ह्यानेंच ही सगळी कागाळी केली असेल. त्याला मी असाच त्रास देईन. त्यांतच मला गंमत वाटते. मी तरी काय करूं? ह्याच्याशीं असेंच वागावें असें मला वाटतें. तरी देखील इतरांच्यापेक्षां खाबूरवर माझा राग कमीच आहे. लोकांना जितका त्रास देईन तितका त्याला देणार नाहीं."

डनवारनें डोळे वटारले आणि रागानें म्हटलें, "हरामखोर! असलें भलभलतें माझ्या तोंडावर बोलायला शरम नाहीं वाटत?"

ह्या डनवारच्या रागाकडे प्यारीलालनें लक्षच दिलें नाहीं. त्यानें आपलीं बुबुळें फिरविलीं, तीं वर चढवून डोळे पांढरे करून म्हटलें, "मी दुसऱ्या लोकांशीं अगदीं निराळ्या तऱ्हेनें वागणार. मला त्यांची काय जरूर? मला जें जें दिसतें, तें त्यांना काय ठाऊक आहे? त्यांना कोठें तें दिसतें आहे? मला मनुष्याच्या शरीरांत रहाणारा कूटस्थ आत्मा तो दिसतो."

आतां तर डनवार फारच संतापला. तो त्याच्या अंगावर खसवसून मारण्यासाठीं धावला, आणि त्याला म्हणाला, "कारट्या! कसला आला आहे रे आत्मा आणि त्याचें दर्शन तुझ्यासारख्या भिकारड्याला!" पुनः जरा शांत होऊन तो बोलूं लागला, "सांग सांग, तुला काय दिसतें तें, आत्मा कसा असतो?"

"काय सांगूं मी? त्याला का नांव असतें कांहीं? आपलें जें खरें रूप, आपलें जें सूक्ष्मरूप, खरे जे आपण, तो आत्मा. त्याला नांव कोठून असणार? नांव नाहींच. लोक मरतात त्या वेळीं मला तो दिसला आहे. त्या मनुष्याचें-मरणाऱ्या मनुष्याचें सूक्ष्मरूप—दिव्यरूप—दिव्यज्योति माझ्या

नजरेस पडली आहे. त्याच्या देहांतून ती ज्योत निघून गेली म्हणजे तो मेला असें म्हणतात; पण हें मृत्यु येण्यापूर्वीं ती कशी बाहेर पडते, आणि रहात्या घरांतून कशी पार निघून जाते, हें मीं पाहिलें आहे. ही ज्योति कोणा मित्राकडे जाऊन त्याला कांहीं गोष्टी सांगून नंतर नाहींशी होण्याचा संभव आहे.

प्यारीलालच्या मुखांतून हें एक एक वाक्य बाहेर पडूं लागलें, तेव्हां तें प्रत्येक वाक्य डनबारचें आश्चर्य कलेकलेनें वाढवीत होतें. तो मनाशीं म्हणूं लागला, "हें पोर काय बडबडतें आहे हें? माझ्या मनांत आलेल्या गूढ शंका जाणूनच त्याचें हा निरसन करीत तर नाहीं? देशांतरीं गेलें एक त्याचें नातेवाईक मृत्यु पावत असतांना दृष्टान्त अगदीं जवळच्या किंवा प्रेमांतल्या माणसाला होतात, असें कोणी सांगतात; पण त्याचा खुलासा अद्याप कोणालाही काढितां आलेला नाहीं. तेव्हां हा सर्व प्रकार प्यारीलाल म्हणतो त्या लिंगदेहाचाच तर नसेल ना?" असे विचार करितां करितांच तो प्यारीलालला आणखी प्रश्न विचारूं लागला, "ती ज्योत एकदां निघून गेल्यावर ती पुनः त्या देहांत परत येते काय?"

"होय, ती परत आलेली मीं पाहिली आहे. ती परत येऊन त्या आसन्नमरण देहाच्या भोंवतालीं घिरट्या घालत्ये. त्या स्थूल देहाची श्वासोच्छ्वासक्रिया किंवा प्राणवायु संपला कीं, ती ज्योति दिसत नाहींशी होत्ये. हुजूर, काय सांगूं मी आपल्याला? किती तरी मौजेच्या गोष्टी मीं पाहिल्या आहेत! एका तज्ज्ञ पंडितानेंच मला सांगितलें कीं, तूं मागच्या जन्मीं कुत्र्याच्या योनींत होतास. तो माझी समाधि लावी आणि त्या स्थितींत मेलेल्या माणसांच्या आत्म्यांशीं मी बोलत असें. अशा प्रकारें पुष्कळ वेळां समाधि लावण्याच्या संवयीनें कित्येक वेळां समाधि न लावतांसुद्धां मी मृतात्म्यशीं बोलूं शकतो मनुष्य दररोज झोंपीं गेल्यावर त्याचा आत्मा त्याच्या शरीरांतून बाहेर पडून इकडे तिकडे हिंडावयाला जातो. निजलेल्या मनुष्यास वाटतें कीं, आपण स्वप्नांत आहों, परंतु त्याचा आत्मा सूक्ष्मरूपानें दुसऱ्याच ठिकाणीं गेलेला असतो. ह्याप्रमाणें सूक्ष्मरूपानें बाहेर निघालेले आत्मे मीं पाहिलें आहेत."

"प्यारीलाल, तूं फार विलक्षण दिसतोस बाबा! पण ह्या सगळ्या गोष्टी स्वप्नांत पाहिलेल्या किंवा तुझ्या पदरच्या गप्पा तर नाहींत ना?"

"नाहीं नाहीं. मी स्वप्न सांगत नाहीं, गप्पा मारीत नाहीं; ह्या सगळ्या गोष्टी मीं प्रत्यक्ष खरोखर पाहिल्या. पण त्या आजपर्यंत कोणाला सांगितल्या नाहींत, फक्त हुजूरजवळ आज बोललों."

"काय रे, जर तुला हे आत्मे दिसतात, तर मनुष्याचें बारें नको असें कां म्हणतोस?"

"त्या आत्म्याला पीडा देण्याचें सामर्थ्य मला आहे कुठें? तें माझ्या हातांत नाहीं, ह्मणून तर ह्या त्यांच्या शरीरांला मी त्रास देतों. हें शरीर जड, ह्याचें काय हो? त्या आत्म्याला हा जसा कांहीं एक प्रकारचा पिंजरा, आवरण घालणारें घर आहे. पाप लागणें, पाप घडणें वगैरे संबंध शरीराला; त्यापासून आत्मा अगदीं अलिप्त असतो. ह्या शरीराकडून कांहीं चूक घडूं नये, त्यानें नीट मार्गानें जाऊन आपला अधःपात होऊं देऊं नये म्हणून आत्मा खटपट करीत असतो. त्याला नीट जपावें लागतें, योग्य वळण लाविल्याशिवाय जमत नाहीं. तें शरीर पापमय आहे, ह्मणून त्याचा मला तिटकारा येतो." हे शेवटचे शब्द उच्चारतांना प्यारीलालनें अगदीं दांतओंठ खाऊन त्वेषानें मुखाबाहेर काढले. त्याचा ह्या वेळीं इतका संताप झालेला होता कीं, त्याच्या तोंडाकडे पाहून भीति वाटली असती इतकें तें भेसूर दिसत होतें. डनबारची दृष्टि त्याच्यावर खिळून राहिल्यासारखी झाली होती. दर क्षणाला प्यारीलालच्या शब्दांचा चमत्कार डनबारला वाटूं लागला. तो आपल्याशीं विचार करून पहातां असें म्हणे कीं—"ह्या व्यक्तीची गांठ पडली ही एक ईश्वरी कृपाच समजली पाहिजे. आत्मा अमर आहे किंवा नाहीं, ह्याबद्दल मला पडलेल्या संशयाचे निर्मूलनासाठींच ईश्वरानें हा दुसरा गुरु–ज्ञानी पुरुष–माझ्यासाठीं मुद्दाम पाठविला असेल काय? ईश्वराची प्रार्थना करीतांना जें मी नेहमीं मागत असतों, तीच प्रार्थना सफल करण्यासाठीं ईश्वराची ही योजना, ईश्वराचा हा उपाय समजावा कीं कसें?"

तो मोठ्यानें त्या पोराशीं बोलूं लागला:—"बेटा प्यारीलाल, मघाशीं मी तुला ह्मणालों ना शाळेंत पाठवीन ह्मणून. पण आतां तो बेत मी रहित केला आहे. तूं माझ्याजवळच रहा. पुढें मी इंग्लंडास जाईन तेव्हां तुला घेऊन जाईन आणि तुझा सांभाळहि करीन."

हें ऐकतांच प्यारीलाल आनंदानें नाचूं लागला. तो कुत्र्यासारखा चारी

पायांवर खोलीभर रांगत, गरगरा फिरूं लागला. आंतील त्याचा आवाज बाहेर बसलेल्या खाबूरनें ऐकला, आणि काय गडबड आहे पहाण्यासाठीं तो खोलींत येऊं लागला. इतक्यांत प्यारीलाल एकदम त्याच्या दोन्ही पायांमधून घुसून मुसुंडी मारून निघून गेला. या त्याच्या खोडीमुळें खाबूर सपशेल खालीं पडला! प्यारीलाल जो निसटला तो पार पटांगणांत जाऊन उभा राहून मोठ्यानें हसूं लागला.

खाबूर धडपडत उठला आणि चरफडून म्हणाला:-" तेंच तें सैतानाचें कारटें! हें मला एखादे दिवशीं ठार मारणार ह्यांत शंका नाहीं!"

डनबारला इतकें हसूं लोटलें कीं त्याला तें आवरेना! कांहीं वेळानें तें दाबून तो म्हणाला-" खाबूर, उगीच कां संतापतोस? तें पोर फार चांगलें आहे, समजलास? इतक्यांतच तो मला सांगत होता कीं, खाबूरच्या आत्म्यावर माझें प्रेम आहे."

" काय सांगतां हुजूर? अल्ला, अल्ला! हें कां त्याचें प्रेम? असलें प्रेम नसलेलेंच बरें. त्याला नमस्कार असो! हें जर त्याचें प्रेम, तर मग ह्याच्या उलट त्यानें माझा द्वेष केलेलाच पुरवला. तसा द्वेष केला तर तो माझ्या वाटेस तरी जाणार नाहीं. त्याच्या माझ्यावरी प्रेमाचेंच हें लक्षण असें दिसतें; त्यानें मला इतके हाल सोसावे लागतात कीं, तें मला शेवटीं असह्य होतात; तर ह्या प्रेमाच्याऐवजीं तो जर माझा द्वेष करील, तर मला सुखानें बसून अल्लाचें नांव घ्यायला तरी सांपडेल. हुजूर, काय ह्मणतां? हें पोर—हें पोर कसलें? हें पोर माणसाचें आहे हें तरी कशावरून? तो स्वत:च आपल्या तोंडानें म्हणत असतो ना कीं, मी कुत्रे आहें! मला वाटतें कीं, हा आमच्या कुराणांतला हामे असावा. आमच्या पोथींत असें सांगितलें कीं, एकाचा खून झाला, त्याच्या मेंदूंतल्या रक्तापासून एक पक्षी बनविला, तो हा हामे. तसेंच तो इसकूनी, इसकूनी, मला तहान लागली, पाणी दे, असें नेहमीं ओरडत असतो."

" खाबूर, काय बोलतोस हें? तें पोर इतक्या दिवस माणसांत तरी होतें कां? तें जंगली जनावराप्रमाणें वागलें तर त्यांत नवल काय? त्याला कोणी नीट वळणच लाविलें नाहीं, त्यांत त्याचा दोष काय! पण एवढें लक्षांत ठेव कीं, तुझ्यासारखाच त्यालाही आत्मा आहे. तो नीट वागत नाहीं,

त्यांत काय चुकतें, हें जर त्यास आपण नीट समजावून सांगितलें, तर त्याला त्याचा पश्चात्ताप होऊन त्याच्यांत कांहीं तरी सुधारणा होईल. तुझ्या अल्लाचेंच म्हणणें आहे ना कीं, ज्याला पश्चात्ताप होईल, त्याच्यावर मी प्रेम करीन. स्वर्गांतून बाहेर घालवून दिलेल्या परीची काय दशा झाली बरें ? देशाकरितां प्राण देणाऱ्या माणसाच्या रक्ताचा वशिला लागेल ह्या आशेनें तसले रक्तबिंदू आणले, आत्मयज्ञास तयार झालेल्या युवतीच्या दुःखाची भेट पुढें मांडिली, पण अल्लानें त्या परीला थारा दिला नाहीं. परंतु अगदीं वृद्ध झालेल्या मनुष्यास कृतकर्माबद्दल पश्चात्ताप होऊन त्याच्या डोळ्यांतून पडलेले अश्रूचे थेंब दाखविल्याबरोबर स्वर्गाचे दरवाजे खाडकन उघडले. असेंच ना ? ”

खाबूरनें दोन्ही हात जोडले आणि मोठ्या अदबीनें डनबारपुढें मान लववून म्हटलें—“ हुजूरला आमच्या कुराणाची चांगलीच माहिती दिसत्ये. आपला अभ्यास फार, आपलें वाचन पुष्कळ. तेव्हां हा बंदा गुलाम, हुजूरच्या पायाचा नोकर, आपल्यापुढें काय बोलणार ? आपल्याबरोबर वादविवाद करण्याची माझी योग्यता नाहीं, व मला तितकी अक्कलहि नाहीं. पण मला असें वाटतें कीं, लहान पोराला शिस्त लावावयाची, त्याला जडलेल्या वाईट संवयी त्याला टाकावयास लावावयाच्या, आपण पुनः असें करूं नये असें त्याच्या मनांत वागेल असें करावयाचें असेल तर त्याला चौदावें रत्नच दाखविलें पाहिजे, त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. पाप हें भुतासारखें आहे. हुजूर, तें दुष्ट आहे. तें प्रत्यक्ष सैतानाच्या डोक्यांत जन्मास आलेलें आहे. असल्या पापानें—पापी भुतानें कोणाला पिछाडिलें असेल तर, एक चांगला चाबूक घ्यावा आणि त्या पिशाच्चाला झोडून काढावें, म्हणजे तें आपोआप पळून जातें !”

डनबारनें त्याला अडवून म्हटलें “ तसें नाहीं. माझा अनुभव ह्याच्या उलट आहे. असल्या मारानें तें पोर निगरगट्ट होईल. ”

“ हुजूरचा अनुभव माझ्यापेक्षां अधिक, तेव्हां मी गरीब, ह्यांत वाद कशाला घालूं ? पण माझी येवढी विनंति हुजूरनें ऐकावी. त्या पोराला सांगा कीं, माझ्या ह्या एवढ्या दाढीच्या वाटेला जात जाऊं नको. त्या कारट्यानें ती अगदीं खुंटासुद्धां जाळून माझा हा सारा गोटा बनवावयाचीच वेळ आणली होती.” इतकें बोलून खाबूर आपल्या कामाला गेला.

संध्याकाळीं कीन्सीची भेट झाल्यावर प्यारीलालनें अशा अशा खोड्या केल्या, त्याच्यापासून असे परिणाम झाले, असा त्रास झाला, वगैरे सर्व गोष्टी डनबारनें तिला कळविल्या; त्याप्रमाणेंच आत्म्यासंबंधानें तो कांहीं बोलत होता, तेंही सारें डनबारनें तिला सांगितलें. एकामागून एक खोड्या ऐकत असतांना कीन्सीला त्याची मौज वाटून हसूंच येत होतें. परंतु आत्मा दृष्टीस पडला वगैरे गोष्टी जेव्हां डनबार सांगूं लागला, तेव्हां तिचें हसणें बंद झालें, आणि तिची मुद्रा गंभीर झाली. ती म्हणाली " ह्या सार्‍या गप्पा तर नसतील ? किंवा स्वप्नांत पाहिलेल्या विलक्षण गोष्टीच तो सांगत नसेल ना ? "

नकारदर्शक मान हलवून डनबार म्हणाला—" हें इतकें सर्व पदरचें रचून सांगण्याइतकी कांहीं त्याची बुद्धिमत्ता दिसत नाहीं. तें पोर जरा वाचाळ आहे; पण आत्मा दृष्टीस पडला ही गोष्ट, ही कल्पना त्याच्या डोक्यांत, त्याच्या मेंदूंत आपोआप उत्पन्न झाली किंवा दुसरी कोठून शिरली असती, असें मला वाटत नाहीं. असो. आतां कशाला त्याच्या वाद ? उद्यांच तो फकीर मोठा प्रयोग करून दाखविणार आहे, अशी नबाबाची चिठ्ठी आलेली आहे. त्यानें मला लवकरच या असें आमंत्रण केलें आहे. नबाबाकडेच चहा घेऊन नंतर फकिराकडे जाण्याचा बेत ठरविला आहे. "

हें एकतांच घाबरल्यासारखें करून कीन्सीनें डनबारचा हात घट्ट धरिला. या वेळीं तीं दोघें व्हरंड्यांतच बसलीं होतीं, व त्यांच्या खुर्च्या एकमेकींस चिकटून मांडलेल्या होत्या, तरी तिनें पुढें वांकून डनबारच्या गुडघ्यावर हात टेंकिला, आणि दुसर्‍या हातानें त्याच्या खांद्याला धरून केविलवाण्या मुद्रेनें डनबारच्या तोंडाकडे ती एकसारखी पाहूं लागली. तिला हुंदका येऊन तिचे ओंठ थरथर कांपूं लागले; तिचे डोळे भरून आले. ती तिची अवस्था पाहून डनबार घाबरून गेला. तिला एकाएकीं असें काय झालें असावें म्हणून त्याला काळजी वाटूं लागली. तो म्हणाला— " प्रिये, हें काय असें ? तुला कांहीं होतें आहे काय ? सांग बरें. तुला कशाची एकाएकीं भीति वाटली काय ? तुझ्या कांहीं दृष्टीस पडलें काय ? "

हे प्रश्न ऐकतांच कीन्सी सावध झाली. ती मागें सरली आणि हात जवळ घेऊन खुर्चीवर सावरून बसली. तिनें आपल्या तोंडावरून हात फिरविला आणि किंचित हास्य करून म्हणाली— " मला कांहीं होत नाहीं. मी

आजारी नाहीं. माझ्या मनांत एकदम कांहीं भयंकर विचार आला! विजेचा लखलखन प्रकाश पडावा तसं होऊन एकदम मी घाबरून गेल्यें!"

"काय म्हणत्येस? असा हा विकार हृदयकोषाला—रक्ताशयाला एकाएकीं धक्का बसला तर होत असतो."

"छे छे! तसला हा प्रकार मुळींच नाहीं. माझें रुधिराभिसरण निर्दोष चाललें आहे, त्याचा आवाज घणघण घंटेसारखा मला ऐकूं येतो आहे. ती भयंकर कल्पना जी एकदां डोळ्यांपुढें आली, ती तशी आहे; ती कांहीं केल्या जात नाहीं. उद्यां जो प्रयोग होणार आहे, त्यासंबंधानंच माझ्या मनानं भीति घेतली आहे; उद्यां इकडेच कांहीं संकट येणार अशी माझी मनोदेवता सांगूं लागली आहे." इतकें बोलतां बोलतां पुनः तिची मुद्रा पूर्वींसारखी कावरीबावरी झाली आणि तिनें विचारिलें, "तिथें काय करावं लागणार आहे?" आतां तिला अगदीं गहिंवर आला, "तिथें म्हणजे त्या फकिराकडे जायचं आहे ना? तिथें कांहीं भयंकर दिव्य करावं लागणार आहे कीं काय स्वतःला? त्यापासून स्वतःच्या जिवाला अपाय होण्यासारखा कांहीं प्रकार व्हावयाचा आहे काय?"

तिच्या बोलण्यावर उत्तर देण्यासाठीं हास्यमुख करून डनबार म्हणाला, "वेडी कुठली! भलतीच भीति घेऊन बसली आहे! अग, तिथली गोष्ट अगदींच सोपी आहे, त्यांत कांहींच अवघड नाहीं. हृदयवल्लभे, उद्यांच्या प्रयोगाबद्दल कांहीं फिकीर करावयाला नको. त्यांत भीतीसारखें कांहींच नाहीं."

स्वतः डनबारनें जेव्हां इतक्या स्वस्थपणानें तिला आश्वासन दिलें, तेव्हां क्रिन्सीचें समाधान झाल्यासारखें दिसलें, आणि तशा प्रकारचें ती कांहीं बोलणार होती, इतक्यांत खोलींतून म्हातारा फेरल बाहेर आला.

त्या दोघांच्याकडे एकदा निरखून पाहून तो म्हणूं लागलाः—काय ग पोरी, तुमचीं दोघांचीं तोंडें अशीं कां झालीं आहेत? नेहमींप्रमाणें तुम्ही आनंदांत खेळतांना दिसत नाहीं. तुम्ही एकमेकांशी भांडणतंटा तर केला नाहीं ना?"

क्रीन्सीनें लागलींच उत्तर केलें "इश्श, भांडायचं काय म्हणून! तें कांहीं नाहीं हो बाबा! चार्ली आणि मी कधीं कधींसुद्धां भांडणार नाहीं हो! काय, असेंच ना चार्ली?"

डनबार बोलूं लागला, " होय, तसला प्रसंग येऊं देऊं नये, असें आम्हीं ठरविलें आहे. शिवाय ह्यांत कांहीं अवघड नाहीं. तसा प्रसंग आलाच तर दोघांपैकीं एकानें कोणीं तरी गम खाऊन माघार घेतली म्हणजे झालें. "

फेरेल म्हातारा म्हणाला, " खरेंच रे बाबा. पण असल्या गोष्टी ठरवायला फार सोप्या आहेत, पण प्रत्यक्ष कृतीच्या वेळीं त्यांचा कसा काय अनुभव येईल तो खरा. त्या वेळीं असले निश्चय कठीण वाटून डळमळतात. म्हणून मला तर असें वाटतें कीं, असला न भांडण्याचा निश्चय करून तो पाळण्यापेक्षां मधून एखादे वेळीं थोडेंसें भांडण—म्हणजे कडकडून नव्हे, उगीच चांचणी म्हणून—भांडण झालेलेंच बरें. कोणच्याही गोष्टीची किंमत सापेक्ष असते. सुखाची खरी मौज समजायला थोडेसें तरी दुःख झालेंच पाहिजे. असो. बरें, तुम्ही जर भांडत नव्हतां तर मग एवढ्या मोठ्या कोणच्या तरी विचारांत पडल्यासारखी तुमच्या दोघांचीही मुद्रा गंभीर कां दिसते ? "

डनबारनें उत्तर केलें, " फेरेलसाहेब त्याचें कारण इतकेंच कीं, त्या फकिराकडे उद्यां जाण्याचा माझा बेत ठरला आहे, आणि हें ऐकून क्वीन्सीला एकाएकीं कांहीं चमत्कारिक वाटून तिनें उगीच कांहींतरी शंका काढून, भीति व्यक्त केली आहे. ती म्हणते कीं, ह्या फकिराकडे जाण्यानें कांहीं तरी संकट येणार अशी तिची मनोदेवता तिला सांगत आहे !"

हें ऐकून म्हाताऱ्या फेरलनेंही तोंड म्लान केलें. त्याच्या मुखावर दुःखाची छाया दिसूं लागली. ती पाहून डनबारनें विचारिलें, " हें हो काय ? आपल्याला सुद्धां ह्यांत कांहीं तरी दुश्चिन्ह दिसूं लागलें आहे कीं काय ? "

म्हातारा मानेनें खुणावून म्हणाला—" गेले कांहीं दिवस ही गोष्ट माझ्या मनांत एकसारखी डांचत आहे. चार्ली, मला तर कित्येक वेळां असें वाटतें कीं, ह्या तुमच्या करण्यानें तुम्ही कांहीं तरी पाप, कांहीं तरी ईश्वराची इच्छा मोडण्याचा गुन्हा करीत आहां ! जगीं धन्य तो दास विश्वास..."

आपल्याला म्हातारा टोंचून बोलतो आहे, ह्या जाणीवेनें डनबार फार ओशाळला. तो म्हणाला—" अहो फेरलसाहेब, मी कांहीं अगदीं पहिल्यासारखाच उरलों नाहीं. मी आतां अस्तिक बनलों आहे. मी रोज अनन्यभावानें ईश्वराला शरण जाऊन प्रार्थना करीत असतों. देवा ! माझ्या हृदयांत विश्वास उत्पन्न कर, आणि आत्म्याची पुढें काय गति होते ह्याबद्दल माझ्या मनांतील

सर्व संशय दूर होतील असें कृत्य कोणाच्या तरी हातून करून दाखीव, अशी माझी दररोजची विनवणी असते. माझ्या शंका पूर्वीपेक्षां आतां पुष्कळ कमी झाल्या आहेत. आणि ज्या राहिल्या आहेत त्यांमध्येंही पूर्वींच्याइतका जोर उरलेला नाहीं. तरी पण त्या अद्याप आहेत, समूळ नाहींशा झाल्या नाहींत. रात्रीं एकांतांत ईश्वराचें स्मरण करून, त्याच्यापाशीं फार नम्रतापूर्वक मी मागतों मागत असतों. त्याची विनवणी करितों, करुणा भाकितों, आणि प्रार्थना करितों कीं, ' देवा! अगदीं लहान कां होईना, पण कांहीं तरी दृष्टांत— दाखवून माझी खात्री पटेल असें कर.' मी काय म्हणतों इकडे आपलें लक्ष आहे कां? मी बोललों ह्या गोष्टी आपल्या ध्यानांत आल्या असतील. देवावरचा माझा विश्वास अढळ कायम रहावा, ही माझी अगदीं अंतःकरण-पूर्वक इच्छा आहे."

" चार्ली, तुम्ही काय म्हणतां हें सर्व माझ्या ध्यानांत आलें. ह्याबद्दल निःसंशय होण्यासारखा— खात्री पटण्यासारखा— दाखला तुम्हांला मिळाला, तर त्यापासून तुमचें कल्याण होईल. परंतु माझी मनोदेवता मला असें सांगत आहे कीं, तुम्हीं जो मार्ग स्वीकारिला आहे तो बरोबर नाहीं. असो. आतां काय त्याचें? ह्या विषयाची आज अधिक वाटाघाट नको. आज रात्रीं मी जेव्हां देवाची प्रार्थना करीन, तेव्हां तुमच्यावर दयार्द्र दृष्टि ठेवण्यासाठीं मी त्याजपाशीं पदर पसरून मागणें मागेन. आणि क्लीन्सीही तसें करण्यास चुकणार नाहीं. कसें तरी करून सर्वांच्या प्रार्थनेचा संकलित परिणाम चांगला होवो म्हणजे झालें. ईश्वर तुमचें कल्याण करो!"

# प्रकरण १४ वें,

## नबाबाचे अंतर्गत विचार—झीनाब व नगीबन ह्यांचे बेत.

गोमती नदीच्या पलीकडच्या तीरावर असलेला नबाब अमीराचा वाडा औध प्रांताच्या राजांच्या कारकीर्दींत बांधलेला असून जवळजवळ राज-वाड्यासारखा होता. राजवैभवाच्या अमदानींत स्वतः राजास राहण्यासाठीं किंवा त्याच्या मुलांसाठीं जे अनेक राजमहाल बांधले गेले होते, त्यांपैकींच

हा एक असून ह्याच्या बरोबरीच्या इतर इमारती बहुतेक पडून गेल्या होत्या. ह्या वाड्याभोंवतीं मोठें थोरलें आवार होतें. पुरुषांच्या महालापासून झनानखाना कांहीं अंतरावर असून त्यांच्यामधील वाट आच्छादिलेली होती, पण त्यावर मजला बांधिलेला नव्हता. ह्या दोन्ही इमारतींमधील अंतर पन्नास हातांपेक्षां अधिक नव्हतें. दोन्ही इमारतींभोंवतीं सुंदर बगीचा असून, त्यांतील एका भागाला मध्येंच भिंत घालून तो भाग फक्त गोषांतील स्त्रियांकरितां राखून ठेविला होता.

फकिराकडे जाण्याचा दिवस उगवला. संध्याकाळीं डनबार आणि नबाब ह्यांनीं मिळून फकिराकडे जावयाचें आणि नंतर तेथें हा शेवटचा पण खात्री पटविण्यासारखा प्रयोग व्हायचा असें ठरलें होतें. नबाब आपल्या पुस्तकालयांत एकटा विचार करीत बसला होता. वेळ सकाळची होती, आणि नबाब विचाराच्या भरांत मोठ्या खुषींत आलेला दिसत होता. कादंबरीलेखकास कोठेंच प्रतिबंध नसतो, मनांत चाललेले विचारही ऐकूं येतात. त्यामुळें हा नबाब काय म्हणत आहे, तें वाचकांस ऐकण्याची जिज्ञासा झाली असेल, ती पुरविण्यास त्याला कांहींच अडचण पडत नाहीं. " या अल्ला, काय पण पोर सुंदर आहे ! तिच्या नखाचीही सर कोणास येणार नाहीं ! तिच्यावरून माझी सर्व संपत्ति ओवाळून टाकाली तरी ती अपुरी पडेल यांत शंका नाहीं. तिच्या प्राप्तीविषयीं माझी इच्छा इतकी अनावर झाली आहे कीं, कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें ती हस्तगत व्हावी म्हणून आजपर्यंत मीं एवढी खटपट चालविली आहे. पण आज माझ्या प्रयत्नांना यश येऊन आतां माझा मार्ग निष्कंटक झाला आहे. इतक्या परिश्रमानें ती माझी झाली, मी आपली कामशांति करून घेतली, म्हणजे नंतर मी तिलाच धरून जन्मभर राहणार आहे थोडाच ? आणि तसें मीं रहावें तरी काय म्हणून ? तिच्याविषयीं माझ्या मनांत प्रेम आहे खरें, पण तें प्रेम किती किंमतीचें ? प्रेम म्हणजे काय ? प्रेम म्हणजे मनाचा एक प्रकारचा गुळमुळीत लोभ. किंवा खिस्ती धर्मोपदेशक आपल्या व्यासपीठावरून उपदेश करीत असतात तसला मनोविकार. हें कांहीं प्रेम नव्हे. माझें प्रेम म्हणजे हातघाईवर आलेली अनावर झालेली भोगेच्छा. त्या कामेच्छेनें मन आणि देह ह्या दोहोंचीही प्रतिक्षणीं लाही झाली पाहिजे, आणि त्याच्या शांतीला दोन शरीरांचा

संयोग ह्याशिवाय दुसरा कोणचाही मार्ग उरतां कामा नये. तसला हा माझा उड्या घेऊं पाहणारा–उच्छृंखल झालेला कामाग्नि तिच्या समागमानें–कांहीं दिवसाच्या उपभोगानें एकदां शांत झाला, म्हणजे मग–हींच कशाला, दुसरी स्त्री पाहिलीच पाहिजे. मी हें असेंच करणार! सुंदरी कॉन्सी, तूं माझ्याशीं गुण्यागोविंदानें लग्न लावण्यास कां बरें कबूल झाली नाहींस? मी आपण होऊन तुझ्यापाशीं विनंति केली असतां तूं ती सोन्यासारखी संधि फेंटाळून लाविलीस अं! तर संभाळ आतां. त्याचें प्रायश्चित्त तुला आतां देतों. आतां सर्व माझ्या हातांत आहे. मी सांगेन त्या अटी तुझ्याकडून कबूल करवीन; मी म्हणेन त्याप्रमाणें तुला वागावयास लावून तुझा उपभोग घेईन. आतां पाहूं तूं काय गमजा करितेयेस ती!"

इतक्यांत नबाबाचा हरकाम्या चहाचा पेला भरुन घेऊन आला. त्याला नबाब म्हणाला—"अल्ली, आज संध्याकाळीं पांच वाजतां दोघांसाठीं चहा पाहिजे; एक गृहस्थ मजकडे येणार आहेत. त्याबरोबरच कांहींतरी पाहिजे हो! नुसताच चहा आणशील नाहींतर. नीट व्यवस्था ठेव हो!"

'होय' ह्या उत्तरादाखल अल्लीनें लवून सलाम केला.

नबाब पुढें बोलूं लागला—"कायरे अल्ली, तुला कसें काय वाटतें? मी आतांशा फार सुस्त, आळशी बनत चाललों आहें, नव्हे?"

"छे छे, सरकार, असें कोण म्हणेल? असें कसें होईल?" अल्लीनें उत्तर केलें.

"नाहीं कसें म्हणतोस? मी किती आळशी झालों आहें, तें माझें मला समजूं लागलें आहे. मी अगदीं त्रासून कंटाळून गेलों आहें. आजपासून आपल्या ह्या नोकरांपैकीं कोणी कोणी सुद्धां वर–इथें येतां कामा नये. त्यांनीं खालींच बसावें. त्यांना काय विचारावयाचें असेल, तर त्यांनीं दिवाणजीस विचारावें. दिवाणजीस जसें वाटेल तसें ते सांगातील. हरघडी मला विचारावयास येऊं नये! आतां माझ्या खान्याची व्यवस्था. मला काय पाहिजे, म्हणून रोज रोज उगीच विचारावयास येऊन किटकिट करण्याचें कारण नाहीं. ह्या गोष्टी स्वयंपाक्यानें ठरविल्या. पाहिजेत त्याला एक मात्र ताकीद देऊन ठेव, सर्व पदार्थ इंग्रजी पद्धतीनें तयार केले पाहिजेत. मी जेवायला बसलों म्हणजे आमच्या दिवाणजींनीं फक्त तिथें उभें रहावें. मी एकटा

असलों म्हणजे ही व्यवस्था. दुसरी पाहुणेमंडळी असतील त्या वेळींसुद्धां मी तिकडे नेहमींच्या ठिकाणीं येणार नाहीं. माझें ताट वाढून इकडे माझ्या खोलींत मी बसणार! जा; अगोदर ही व्यवस्था आतांपासून अमलांत आली पाहिजे. तशी सगळ्यांना ताकीद दे."

लवून मुजरा करून अल्ली निघून गेला.

नवाब आपल्याशींच अगोदर पोटभर हंसला. ह्या हंसण्यानें त्याच्या विचाराला थोडी शांतता येऊन तो पुढील बेत ठरवूं लागला--"आतां खालीं काय बुवा, खूप गंमत उडेल! सगळे जण ह्या माझ्या विक्षिप्त हुकुमाचा काथ्याकूट करीत असतील. पण कांहीं कां होईना? मला काय करायचें आहे आतां! तरी पण अदलाबदली कोणाच्या लक्षांत लवकर येऊं नये अशी व्यवस्था करून ठेवलीच पाहिजे! उद्यांपासून काय होईल ह्याचा विचार मला कशाला पाहिजे? या अल्ला, अल्ला! हें अगोदरच चुकलें सारें!" आतां त्याला स्वस्थ बसवेना. त्याचे विचार आतां वैखरींत येऊन तोंडावाटे बाहेर पडूं लागले. पण कादंबरीलेखकाशिवाय दुसरें कोणीच जवळ नव्हतें ते तारे ऐकायला "मी इंग्लंडांत गेलों, तेथल्या शाळेंत शिकलों सवरलों; सारें झालें; पण माझ्या रक्तमांसांत खिळलेली ही लपंडावी अजून कांहीं गेली नाहीं. ही पूर्वेकडची खोड कशी जावी? शाबास! अमीर, शाबास! ह्या फेरलपोरीला पळवून नेण्याचें नाटक कसें अगदीं बेमालूम साधलें? त्याचा परिणाम मी म्हटला होता तसाच घडून आला. ह्या अशा प्रसंगांत सांपडलेल्या युवतीची असल्या तरुणबांडाशीं गांठ पडल्यावर दुसरें काय होणार? त्या दोघांचें लग्न ठरलें, वाग्निश्चय झाला, त्यांनीं एकमेकांस आणभाक दिली. लग्न उरकून घेण्याचा बेत ठरून लवकरच तो विधि करण्याचें ठरलें आहे. हः हः हः! पाहूं आतां काय मौज होत्ये ती? पाहूं आतां लग्न कोणाशीं लागतें तें? कोन्सी, ह्या अस्मादिकांशीं तुझें लग्न लागणार बरें? तूं काय समजली आहेस? मला तूं झिडकारिलें होतेंस नाहीं कां?"

तो जाग्यावरून उठून खिडकींत गेला आणि समोर पाहूं लागला; तों त्याची दृष्टि त्याच्या लग्नाच्या बायकोच्या महालावर गेली. तिकडे पहातां पहातां त्याच्या मनांत पुनः विचारांचें काहूर उठलें. अखेर पुनः त्याच्या विचारांना वाचा फुटली--"तिकडे तसें झाल्यावर मग इकडे असें झाल्या-

वांचून कसें राहील ? पण त्याची काळजी मी कशाला करूं ? त्याच्याबद्दल मला वाईट कां वाटावें ? तिचा माझा अद्याप एकदां सुद्धां संबंध झालेला नाहीं, मग ती माझी बायको तरी कसली म्हणायची ? तिला मीं नुसता स्पर्शसुद्धां केला नाहीं, तिला बोट नव्हे, नख सुद्धां लाविलें नाहीं ! सलाम, झीनाब, सलाम ! तुटला तुझा आणि आमचा संबंध आजपासून. आतां ह्या-पुढें तरी—माझ्यापासून तुला सौख्याचा लवलेश मिळाला नाहीं; पण पुढें तरी तुला सौख्याची पूर्ण प्राप्ति होवो, म्हणजे झालें."

जग म्हणजे जगांतील साधारण लोक श्रीमंतांच्या ज्या वैभवाला आनंदाची सीमा समजतात, सौख्याची परिपूर्णता मानितात, त्या वैभवाचा खरोखर उपभोग घेणाऱ्या लोकांना किती दुःख होत असतें, ह्याचा विचार केला म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें. संस्कृतकवीनें म्हटल्याप्रमाणें 'न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः।' असेंच वाटूं लागतें. जगांत सुखाचा भाग अधिक किंवा दुःखाचा वांटा मोठा ह्याबद्दल पौर्वात्य आणि पाश्चिमात्य वेदान्त्यांचा मतभेद असला तरी वास्तविक परिस्थिति मोठी मौजेची आहे. वैभव व संपत्ति पाहिली कीं, लोकांचे डोळे दिपून जातात. गाडींत बसून जाणारे लोक, मोटारमधून भों भों शिंग वाजवीत लोकांच्या अंगावर धुळीचे लोट उडविणारी चित्रविचित्र पोषाखांतील मंडळी पाहून, त्यांना अत्यंत सुख होत असेल, ईश्वराची त्यांच्यावर कृपा असली पाहिजे, असें पादचारी लोकांस वाटत असतें. परंतु मोत्यांनीं शृंगारलेल्या आणि रत्नांनीं चकाकणाऱ्या त्या मोटारगाडीवाल्याला कांहीं शारीरिक पीडा असली तर ती त्या श्रीमंतीनें दूर होणार आहे काय ? त्याची माहिती ह्या पायांनीं चालणाऱ्या व आशाळभूत नेत्रांनीं त्यांच्याकडे पहाणाऱ्या लोकांस असणें संभवनीय नाहीं. प्रस्तुत नबाबाची लग्नाची बायको झीनाब हिचेंच उदाहरण घेऊं. ह्या नबाबाचा एवढा मोठा राजवाडा दुरून पहाणारास झीनाबचें नशीब फारच थोर, तिचा जन्म उच्च कुळामध्यें झाल्यामुळेंच तिला येवढा श्रीमंत पति मिळाला, असें मनांत येऊन कोणाही स्त्रीला तिचा हेवा वाटेल असावा; आणि तें साहजिक होतें. परंतु त्या तरुण पोरीला इतक्या अल्पवयांत किती हळहळ लागलेली आहे, तिच्या अंतःकरणाला दर घटकेला पीळ पडून तिच्या मुखावाटे किती संतापाचे व दुःखाचे उद्गार येत आहेत !

पतिसुखाचा अनुभव नाहीं व पति आपलें वारेंसुद्धां पडूं देत नाहीं, ह्या काळजीनें ती कशी झुरत आहे, हें जर कोणाला समजतें तर तें सौख्य आणि तें वैभव नको असें वाटल्यावांचून राहिलें नसतें. " माझ्याकडे एकदा तरी पतीची प्रेमदृष्टि वळेल काय ? मला आपल्या महालांत प्रवेश करण्याची परवानगी देऊन एकदां तरी सौख्याचा वाटा मिळेल काय ? माझी कूस सफल होऊन माझ्यावर आलेला वांझपणाचा डाग धुऊन निघेल काय ? " ह्या विचारांच्या हेलकाव्यानें झीनावच्या हृदयांत नेहमीं चंचलता असे. पोटीं संतान नाहीं, त्या स्त्रीचें जिणें व्यर्थ होय, अशी हिंदुस्थानांत समजूत आहे, आणि असला डाग आपणाला न लागावा म्हणून ह्या देशांतील स्त्रिया आपला प्राणसुद्धां देण्यास तयार होतात !

मागें एकदां सांगितलेंच आहे कीं, नबाबाच्या महालापासून जरा अंतरावर, तुटून झनानखान्याची इमारत होती, आणि एकंदर सर्व राजवाड्याच्या बागेंतील दुसऱ्या टोंकाला झीनावचा महाल होता. त्या महालाच्या एका बाजूच्या भिंतीला लागूनच नदीचें पात्र होतें. झीनावच्या महालाची रचना फार सुबक असून त्याच्या महिरपीच्या खिडक्यांत नानाप्रकारच्या सुवासिक गुलाबाच्या कुंड्या मांडून ठेविलेल्या होत्या. गझनीचे व किनखापाचे पडदे जागजागीं सोडले होते, तरी त्यांतूनही झरोके व खिडक्या राखून हवा खेळती राहील व आंत लख्ख उजेड पडेल अशी व्यवस्था केलेली होती. महालाच्या छतावर नानारंगांची वेलबुट्टी असून त्यावर मीन्याचें पाणी चढविलें होतें. महालांत जुन्या व नव्या तऱ्हेचें सर्व सामान, ऐषआरामास शोभेल अशी आरास, वगैरे सर्व ठाकठीक होतें. अशा सुंदर महालांत रहाणारी झीनाव अत्यंत लावण्यवती असून तिच्या तैनातीला असंख्य दासी होत्या ! पण ह्या नव कुसुम गुलाबाला कोणींही हुंगलें नव्हतें ! जसें उगवलें तसेंच तें कोमेजून जाणार काय ? ह्या चाफेकळीची दैना झालेली होती. आपल्याकडे आपला पति ढुंकुनसुद्धां पहात नाहीं, म्हणून ती चारी प्रहर अश्रु ढाळीत बसत असे. तिनें दुसरें काय करावें ? तिला पुत्रप्राप्ति होणार कशी नबाबाचें तिला दर्शनही नव्हतें; ह्या पतिप्रेमाच्या अभावापेक्षां पुत्र नसल्याबद्दलच तिला अधिक दुःख होत होतें. ईश्वरानें आपल्या पतीच्या बुद्धींत कांहीं तरी फरक पाडावा, आपल्यावर दया करून पतीच्या मनाचा बदल होईल अशी

त्यानें प्रेरणा करावी, म्हणून ती व तिच्या दासी दिवसांतून किती वेळां तरी निमाज पढत असत; दीनस्वरानें त्याची करुणा भाकीत. परंतु ईश्वराला त्यांची दया आल्याचें कांहीं चिन्ह दिसेना. ह्यांची प्रार्थना अल्लाच्या कानींच जात नव्हती कीं काय ? किंवा ह्यांची प्रार्थना केवळ सुखविलासाची म्हणून ईश्वर तिकडे लक्ष पुरवीत नसावा, असेंही असेल. झीनाब तर महाल सोडून कधीं कुठें बाहेर पडत नसे. तिच्या बरोबरीच्या इतर स्त्रियांची गांठ पडली म्हणजे प्रथम मुलाबाळांच्या गोष्टी निघावयाच्या; आणि त्याच्यांत, हिलाच मूल नाहीं असें पाहून त्या तिलाच दोष देत. कारण त्यांना हिच्या घरची स्थिति काय ठाऊक असणार ? झीनाबला पतीचें दर्शनसुद्धां होत नाहीं, हें जर कोणीं म्हटलें तर तसें खरें वाटणेंही संभवनीय नव्हतें. नबाब बोटींत बसून नदींतून सहल करावयास गेला तर ती आपल्या महालाच्या झरोंक्यांतून त्याच्याकडे पहात बसत असे; त्या चोरून टाकिलेल्या दृष्टिक्षेपानें काय शांतवन होईल तें खरें, त्यापेक्षां अधिक सुखाची भेट तिला आजपर्यंत झालेली नव्हती. एखादेवेळीं डनबारची व नबाबाची गांठ झाल्यापासून ते दोघेही बागेंत फिरत असत, तेव्हां नबाबाकडे पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडावयाची संधि झीनाबला मिळत असे. पण ह्यापेक्षां दुसरा मार्ग आजपर्यंत तिला सुचला नाहीं. झीनाबच्या दासीपैकीं कांहीं तिच्या बरोबरीच्या व कांहीं थोड्याशा वयानें लहान होत्या. आपल्या धनिणीच्या मनाला करमणूक व्हावी म्हणून त्यांची नेहमीं खटपट असे. अनेक तऱ्हेच्या बाहुल्या सजवून त्यांना जागे करून तोंड धुणें, न्हाऊं घालणें, साडी नेसविणें इत्यादि सर्व व्यवहार करविणें असले खेळ त्या चालवीत. भावलाभावलींचीं लग्नें होत, त्यांचें गर्भाधान, डोहाळे, बाळंतपण वगैरे सर्व प्रकार होत. एखादी दासी स्वतःच नबाबासारखा पोषाख करून झीनाबच्या नवऱ्याचें सोंग आणी, आणि हें नाटक चाललें असें तोंपर्यंत झीनाबच्या मनाला थोडा विरंगुळा होई. परंतु तो संपल्यावर तिला अधिकच खेद होई !

फकिराकडे नबाब व डनबार जाण्याचें ठरलें होतें, त्या दिवशीं दुपारीं झीनाब आपल्या महालाच्या खिडकींत बसून शून्य चित्तानें नदींकडे पहात होती. तेथून शहरचा रम्य देखावा दिसत होता. मुसलमानांची वस्ती अधिक असल्यामुळें अनेक मशिदींचे लहानमोठे कळस, डेरे व मनोरे आणि शह-

रांतील पुरातन हवेल्यांच्या किल्ल्यासारख्या तटवजा भिंती तेथून नजरेपुढें येऊन आल्हाद देण्यासाठीं झटत होत्या. पण ह्या सुंदर सृष्टिसौंदर्याकडे झीनाबचें चित्त नव्हतें. ती उदास अंतःकरणानें हातावर गाल ठेवून सचिंत बसली होती. तिच्या पायाजवळच तिची अत्यंत प्रिय दासी नगीबन तिच्या मुखाकडे पहात होती.

बेगमनें आपल्या दासीला एकदम हाक मारून ह्मटलें, "बाई, बघ बघ, तो फिरंगी पुलावरून चालला आहे! पाहिलास का?" नगीबन उठून उभी राहिली, आणि गच्चीच्या कठड्यावरून पलीकडे पाहूं लागली.

नगीबन म्हणाली, "होय, तोच तो बाईसाहेब! आमच्या धनीसाहेबांचा त्याच्याशीं फार स्नेह आहे ह्मणतात. तोच तो हो! बाईसाहेब, आपण त्याला कधीं अगदीं जवळ जाऊन पाहिला आहे का?"

"छे ग, कधींच नाहीं."

"छे पण बाई, तो फारच स्वरूपवान आहे हो, असें लोक ह्मणतात. तो स्वभावानेंही मोठा दिलदार आहे. कनवाळूही तसाच. परवां त्यानें त्या प्यारीलालला नदींत बुडतां बुडतां वांचविलें! त्या पोराला त्यानें आतां आपल्याजवळच ठेविला आहे."

"प्यारीलाल कोणचा ग? हं, हं! आठवलं, आठवलं. इथें नव्हता कितीकदा तो आला? तोच ना? त्यानें आपल्याला किती तरी भंडावून सोडलें होतें, तोच ना?"

"अहो, तेंच तें पोर. आतां हे हुजूर त्या पोराची सर्व तरतूद ठेवितात. खर्च त्यांचा, त्याची काळजी ते स्वतः घेतात ह्मणे. ह्यावरून त्यांच्या चांगुलपणाची परीक्षा नाहीं कां होत?"

"हो तर. त्यांचं मन सुद्धां तसेंच प्रेमळ असलं पाहिजे ह्यावरून."

"अहो, ज्याच्या त्याच्या तोंडीं हल्लीं त्यांच्या लग्नाबद्दलच्या गोष्टी आहेत. त्यांचं म्हणे लवकरच लग्न होणार आहे. आणि कोणाशीं, समजलं कां? ती आपल्याकडे सुरेख फिरंगीबाई येत नसे? तिच्याशीं हो! फेरलमिशीबरोबर हो!"

हें ऐकून झीनाबनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिनें एक दीर्घ सुस्कारा टाकला. तिचें दुःख पाहून नगीबन अगदीं विव्हळ झाली; तिनें आपल्या

मालकिणीच्या पायावर लोळण घेतली आणि म्हटलें, " बाईसाहेब, ह्या दासीला गुन्हा माफ करावा. मी भलतंच कसं बोलून गेल्यें! अल्लाकी कसम, माझ्या ध्यानांत आलं नाहीं कीं, त्यामुळं आपल्या लग्नाची आपल्याला आठवण होईल! ती गोष्ट माझ्या लक्षांतच राहिली नाहीं. बाईसाहेब, ह्या दासीवर दया करावी. मीं मुद्दाम कांहीं हा विषय काढला नाहीं!"

झीनाबानें आपल्या दासीच्या पाठीवरून हात फिरविला आणि तिच्याशीं प्रेमानें संभाषण सुरू केलें, " अग पोरी, इतकं नको कांहीं कळवळून जायला हो! मला येवढं कां नाहीं समजत ? तूं अशी मुद्दाम माझ्या लग्नाची आठवण होईल असली गोष्ट कां काढशील ? तुझ्या इतकं माझ्यावर कोणाचं प्रेम नाहीं हें मी जाणून आहें. माझ्या दुःखाची वांटेकरीण तरी दुसरी कोणी आहे कां ? मी असलीच कपाळकरंटी! मला जें दुःख भोगावं लागत आहे, त्याचा दोष तुझ्याकडे काय म्हणून ? या अल्ला! माझ्या हातून काय असं पातक घडलं कीं, त्याचा परिणाम हें दुःख मला सोसावं लागत आहे. दिवसांतून किती वेळां तरी मी निमाज पढत्यें, किती फकीरफुकऱ्यांना अन्न, कपडे, पैसे देत्यें आणि किती धर्माप्रमाणें वागत्यें! इतकं असून माझ्या पतीनं माझ्यावर नुसती दृष्टिही टाकूं नये, माझा रागराग करावा असं कां व्हावं ? अशी मी अगदींच का कुरूप आहें ? "

हे शब्द झीनाबच्या तोंडांतून पडतांच नगीबन ताडकन् उठून उभी राहिली, आणि आपल्या धनीणिकडे पुनः एकवार निरखून पाहून म्हणाली, " बाईसाहेब, हें सगळं हिंदुस्थान पालथं घातलं आणि त्यांतल्या हजारों लावण्यवती स्त्रिया गोळा केल्या, तरी ह्या माझ्या परीसारखी, माझ्या धनीणप्रमाणं नाकडोळे रेखीव असलेली, अशा झोंकदार ठेवणीची एकएकसुद्धां दुसरी सांपडणार नाहीं! मी जर पुरुष असत्यें, तर अशी आपल्या चरणापाशीं गुडघे टेंकून-" इतकें बोलतां बोलतां नगीबननें बोलल्याप्रमाणें कृति करून आपलें बोलणें पुढें चालविलें—" आपल्या हाताचं असं चुंबन घेतलं असतं. आणि आपलीं आर्जवें करून आपल्या प्रेमाचा लवलेश तरी मजवर असूं द्या, अशी विनवणी केली असती; आणि ती मान्य होईपर्यंत अशीच राहिल्यें असत्यें. आपल्या संपूर्ण प्रेमाला मी योग्य नाहीं, असं मीं खचित् खचित् म्हटलं असतं."

हें तिचें नाटक पाहून झीनाबला फारच हंसूं आलें. ती म्हणाली— "पोरी, शाबास! तूं ही नायकाची भूमिका फारच सुंदर उठविलीस! हें नाटक नसून जर खरा प्रकार असा होता, तर तुझ्यासारख्या नायकापुढं माझा कांहीं इलाज चालला नसता. हाय हाय! काय करूं ग! माझी दशा तुला किती सांगूं? ह्या वेळीं तुझ्याच जागीं जर नबाबांची स्वारी असती तर काय बहार झाली असती! तूं म्हणतेस ना कीं, माझं सौंदर्य अप्रतिम आहे म्हणून? आणि जो पुरुष मला पाहील त्याचं देहभान जाऊन तो माझ्या पायाशीं लोळण घेईल म्हणून? मग तशी नवाबसाहेबांची स्थिति कां होत नाहीं ग?"

"बाईसाहेब, ह्या दासीला माफी करावी; पण आपलं रूप नबाबसाहेबांच्या कधीं दृष्टीस पडलं आहे कां?"

"छे बाई! पण स्वारीचं लग्नांत एकदां दर्शन झालेलें मला आठवतं; आणि तेंही विलायतेस जाण्याच्या अगोदर."

"हास्याच्या! त्या वेळेला तर आपण लहान पोरच होतां कीं नाहीं? त्या वेळीं आपले पणांत तरी आपण कुठं आलां होतां? हल्लीं आपल्या अंगाचा, स्वरूपाचा जो मोहकपणा आहे, त्याचा दशांश भागही तेव्हां नव्हता. असणार कसा? त्या वेळीं हें आम्रफळ अगदीं कच्चं हिरवं, पाडाला सुद्धां लागलं नव्हतं. बाईसाहेब, ह्या गरीब दासीची समजूत अशी आहे कीं, अगदीं निराश होण्याचं कारण नाहीं. कष्टी होऊं नये. अद्यापि आशेला थोडी तरी जागा आहे. हल्लींच्या ह्या आपल्या मोहक सौंदर्यावर नबाबसाहेबांची एकदां नजर पडूं द्या कीं, पहा! लगेंच काम फत्तें झालेंच पाहिजे! आपल्यास पाहिल्याबरोबर आपण यापूर्वीच इकडे कां आलों नाहीं असं त्यांना वाटेल!"

"काय ग पोरी, मी तुला एक मोठी अप्सरा वाटत असेन, पण इतरांनाही तशीच वाटत असेन हें कशावरून? हें बघ, तुझी दृष्टि वेगळी; तुझं प्रेम माझ्यावर आहे, आणि प्रेम हें अंधळं असतं. दुष्टाच्या हृदयाप्रमाणें जरी मी तर अगदीं कृष्णवर्णीय असतें, तरी देखील तूं मला मोठी लावण्यवतीच ठरविली असतीस!"

"माझी भक्ति आपल्यावर आहे, हें तर खरंच; पण तें जरी तसं नसतं,

तरी सुद्धां आपण सौंदर्यलतिकाच आहांत असं म्हणायला मी सोडलं नसतं. आपला मुखचंद्र, हा अंगलट पाहिला म्हणजे इंद्रलोकची रंभाच प्रत्यक्ष पुढं आहे, असं वाटतं. कोणा एखाद्या पुरुषाच्या जर आपण चुकून नजरेस पडाल, आणि आपण जरी त्याच्याकडं दृष्टिक्षेप करून त्याला कांहीं मधाचं बोट लावलं नाहीं, तरी कामव्यथेनं त्याची त्रेधा होईल, आणि तो झुरणीस लागेल ! ह्या आपल्या वाड्याच्या बागेंत पुष्कळ झाडांना बहार येऊन फळं पिकलीं आहेत; त्यांचा उपभोग घेण्याचं नबाबाच्या नशीबींच नसलं, आणि तो जर त्याला हातच लावीनासा झाला झाला; अशा वेळीं दुसरा कोणी बागेंत येऊन त्याचा आस्वाद घेण्यांत दंग झाला, तर त्याचा दोष कोणाला लावितां येईल सांगा ! कारण ईश्वरानं फळ निर्माण केलं, तें वायां जाऊं देण्यासाठीं नाहीं, तर त्याचा आस्वाद सर्वांना मिळावा म्हणून."

"नगीबन, हें काय ग असं बोलणं भलतंच काढलंस तूं ! तूं मला चार गोष्टी सांगायच्या तें बाजूलाच राहिलं, आणि असल्या गोड भाषणानं माझ्या तोंडाला पाणी सुटण्याचा उपाय तूं करते आहेस. पण सांभाळ, बजावून ठेवल्यें ! आज बोललीस तें बोललीस, पण पुनः असलं भाषण करूं नको! कोणा पर पुरुषाचं माझ्यावर जडलेलं प्रेम मला नको. त्यापेक्षां मला माझ्या नबाबसाहेबांनीं आपल्या प्रेमाची थोडीशी जरी भीक घातली तरी ती मला जास्त सुखकर होईल!"

"तें सारं खरं, पण आपलं मुख नबाबसाहेबांच्या दृष्टीस पडेल तेव्हां ना ? एकदां पहा तरी प्रयत्न करून; आणि कसंही करून त्यांची गांठ तर घ्या!"

"गांठ घ्यावयाची कशी हीच पंचाईत!" झीनाब हंसत म्हणाली, "हें बोलायला फार सोपं, पण करणं फार कठीण आहे. येते कांहीं तुझ्या डोक्यांत युक्ति ?"

"मला तर सध्यां दुसरी कांहीं युक्ति सुचत नाहीं. पण मी म्हणतें, आपणच होऊन तिकडे गेलांत तर ?"

हें ऐकून बेगमनें तिच्याकडून तोंड फिरविलें आणि म्हटलें, "तें कसं व्हावं ? मला वाटलं होतं कीं, तूं ह्यापेक्षां कांहीं तरी सोपा उपाय काढशील. स्त्रियांना कल्पक, युक्तिबाज अशीं पुरुष विशेषणं लावतात. पति वश करण्याची कांहीं तरी जडीबुट्टी तुझ्याजवळ असेल आणि ती तूं मला सांग-

शील अशी मला आशा होती; पण तूं माझी अगदीं निराशा केलीस. मी तरी तिकडे कशी जाऊं ? कारण तिकडचा तर सक्त हुकूम आहे कीं, माझ्या महालांत पाऊल टाकतां कामा नये ! नोकरांनाहि तशी ताकीद असेलच. मग तिकडच्या नोकरांना चुकवून किंवा चोरून कसं जातां येईल ? ''

" त्याचीच कां काळजी पडली आहे आपल्याला इतकी ? आपला खास मार्ग निराळा आहे ना ? रात्रीं तर नबाबसाहेबांच्या जवळ कोणी सुद्धां नसतं. त्या वेळेला आपण जाऊन भेटा म्हणजे झालं. उगीच दिरंगाई कशाला ? आजच पहाना प्रयत्न करून ? ''

इतकें झालें तरी झीनाब आपल्या मानेनें नकार घालीतच होती. ती म्हणाली, " छट्छट् ! हें माझ्या हातून घडणार नाहीं. तिकडची मला बाई फारच भीति वाटत्ये ! मी असं कांहीं केलं तर तिकडून फार संतापायचं होईल. ''

" होय, कबूल ! प्रथम हुकूम तोडल्याबद्दल ते रागावतील; पण आपल्या ह्या छबीकडे, लावण्याकडे एकदां कां त्यांनीं पाहिलं, कीं ते तेव्हांच विरघळून जातील, नव्हे विव्हळ होतील ! ''

" हें बघ, तूं उगीच मला आशा लावीत आहेस झालं. तूं म्हणतेस तसं कांहीं होणार नाहीं. त्यांना आहे कुठं माझी जरूर ? मी असं ऐकलं आहे कीं, ते एक फिरंगी बायको करणार आहेत. ''

" अंः ! त्यांत कांहीं तथ्य नाहीं. आणि असलं तरी कोठपर्यंत ! जोंवर जंबूक करी गर्जना. त्याचं कारण मी म्हणत्यें तेंच, कीं त्यांनीं आपल्याला पाहिलं नाहीं ! त्यांना त्या फिरंगीबाईची इतकी आवड कां उत्पन्न व्हावी ? त्याचं कारण इतकंच कीं, नबाबसाहेब इंग्रजी शिकले, विलायतेला जाऊन आले आणि म्हणून त्यांना झनान्याच्या चालीरीती आवडत नाहींत. हल्लीं आपल्यापैकीं कांहीं जणींनीं पडदा टाकून नाहीं कां दिला ? ' तसं करायला मी तयार आहें; हुकूम झाल्यास मीहि तसं करून आपल्याबरोबर फिरायला यावयास तयार आहे,' असं आपण म्हणा कीं कामच झालं पहा !''

" खरंच ! असं मीं केलं तर बाबा कांहीं रागावणार नाहींत. त्यांना बरंच वाटेल. पण मासाहेब मात्र फार रागावतील, त्या माझं तोंड सुद्धां पहाणार नाहींत. ''

" होईल तसं प्रथम कांहीं दिवस. कुसुंबी बेगमला प्रथम तसंच झालं.

तिनं थोडी कळ काढली. मग आतां कसं झालं आहे? त्यांतलं कांहीं उरलं नाहीं. अशींच उदाहरणं आणखी किती तरी मला ठाऊक आहेत. आईची ममता ती! ती कधीं अगदीं नाहींशी होणार नाहीं. ती प्रथम रागावेल. पण आईचा राग तो. जन्मदात्रीचा रोष तो! तो फार वेळ टिकणार नाहीं. पण तेवढ्यामुळें तुमचं कल्याण केवढं होईल?"

तें ऐकून झीनात थोडीशी खुलली, तिनें स्मित हास्यही केलें. तिच्या मानसिक राज्यांत नबाबची तिची भेट होऊन ती आपल्या मनःपटावर भविष्यकालीन सुखकर चित्रें काढण्यांत गुंग झाली. तिला वाटलें कीं, आईची आपल्यावरील मर्जी थोडा वेळ खप्पा होईल खरी, पण त्यांत मोठेंसें नुकसान नाहीं; उलट, या अल्प दुःखाची पर्वा बाळगली नाहीं तर त्याचेंच आपल्या अतीम सुखांत रूपांतर होऊन आपलें जीवितसाफल्य होईल. परंतु हें जमणार कसें? ती मोठ्यानें बोलूं लागली, "समजा, मी जरी तयार झालें, मासाहेबांची पर्वा बाळगिली नाही, तरी पण नबाबांनीं साफ नको म्हणून सांगितलं, तूं वाटेल तें करायला तयार झालीस तरी मला नको असं त्यांनीं म्हटलं, तर मग काय करणार? उलट ते जास्तच रागावतील. मी जर गेलें तर माझा द्वेषच करूं लागतील!"

नगीननेंही तावडतोब उत्तर दिलें: "मग करीनात द्वेष! आतां काय अगदीं प्रेम वाया चाललं आहे! हल्लीं कुठं त्यांचा तुम्हांवर रोष नाहीं, म्हणून कदाचित् पुढें द्वेष झाला तर अधिक वाईट होणार आहे! पण समजा कीं, तसं कांहीं न होतां अल्लाच्या मेहेरबानीनं आपल्या बेताप्रमाणं जमलं, तर मग किती मौज होईल! आपल्याला, माझ्या धनिणीला किती सुख लागेल! आपली निंदा करणारांचीं तोंडेंच बंद होतील. अगदीं खेटरं मारल्यासारखं त्यांना होईल!"

"पुरें बाई तुझं. तूं कां मला बोलूं देणार आहेस!" बेगम जरा त्रासून म्हणाली: "बरं बाई, तुझ्यासारखं कां होईना! तुझ्या तोंडांत साखर पडो. तूं म्हणतेस तसं करून तर पहात्यें."

"मग केव्हां? उशीर कां? आजच कां होईना?"

"इतकी घाई कशाला?"

"झाला शकून तोच खरा. काय घेतां तुमचं? मध्येंच कांहीं विघ्न

येऊन सर्व बेत फिसकटला, कदाचित् तुमचं मन बदललं तर करा काय ? "

" अं हं ! आतां माझं मन बदलायचं नाहीं. पण तुझ्या म्हणण्याप्रमाणंच मी वागेन. आज रात्रीं ठरला बेत. बघूं बरं तुझी कुशलता ? आज मला कशी नटवतेस ती पाहतें. माझी ओढणी, लहंगा, अत्युत्तम असतील तेवढे सारे कपडे काढ. "

हें ऐकतांच लगीबन उठून आनंदानें नाचूं लागली. ती म्हणाली: " तें काम माझं. पोपाखाच्या अंगीं जर कांहीं गुण असेल तर असा आज शृंगार करवितें कीं, प्रत्यक्ष दगडालासुद्धां मोह पडला पाहिजे ! आज रात्रीं, आज रात्रीं माझ्या धनिणीला सर्व सुख मिळणार खचित ! "

असें म्हणत आणि अर्धवट गात पुढील तयारीसाठीं ती निघून गेली.

# प्रकरण १५ वें,

## परकायाप्रवेश--अमीराची लबाडी.

नबाबाकडे जाण्यापूर्वी डनबार क्रीन्सीकडे गेला. ह्या वेळीं ती आनंदांत होती; कालचीं खिन्नतेचीं चिन्हें तिच्या तोंडावर दिसत नव्हतीं. तिच्या मुखचंद्राच्या कांतीच्या आड कालच्या बादळी ढगांपैकीं एकाचाहि मागमूस उरला नव्हता. परंतु डनबारची तिची गांठ पडतांच त्याला तिनें त्याचा सत्कार करून म्हटलें, " खरंच गडे, मी एक म्हणणार आहें, त्याच्याकडे लक्ष द्यावं. आज ज्या कामाला जायचं आहे, त्यायोगानं ईश्वराला सतावल्यासारखं नाहीं कां होणार ? मी पुनः म्हणून असल्या कामांत आपल्याला पडूं द्यायची नाहीं. " डनबारनें थोड्या आवेशानें म्हटलें, " काय ही तुझी भलतीच शंका ? ह्यांत सतावण्याचा काय संबंध ? तूं आपली बिलक्षण समजूत घेऊन बसली आहेस झालें. मला ह्यांत तसें कांहीं वाटत नाहीं. ईश्वर आहे असें मी म्हणतों, त्याच्याविषयीं माझ्या मनांत श्रद्धा उत्पन्न होऊन प्रेम वाटूं लागावें म्हणून मी कसा अधीर झालों आहें. तरी पण ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल आणि परलोकाबद्दल माझी खात्री होऊन निःसंशय वृत्ति व्हायला पाहिजे. मी कांहीं नास्तिक नाहीं. देव आहे,

परलोक आहे, असें मला वाटत नाहीं असें समजूं नको; पण त्याबद्दल सबळ पुरावा सांपडतो कां तें पहावें, असें माझ्या मनांत आहे. मी दुसरा तिसरा कारभार आज करणार नाहीं. फक्त दैवी शक्ति व परलोक यांच्या-संबंधीं अधिक माहिती मिळविण्याची खटपट करणार आहें. तेव्हां ह्या कामांत देवाचा कोप माझ्यावर होण्यासारखें काय आहे बरें ? मला तर वाटतें कीं, तो खचित रागावणार नाहीं. ”

“ परंतु विश्वास– ” फ्रान्सी हळूंच सुचवूं लागली.

“ तें मात्र नाहीं हो. विश्वास,अंधविश्वास,तो मात्र मजपाशीं नाहीं खरा. पण मला वाटतें कीं, आजच्या कामांत ईश्वर साहाय्य केल्यावांचून राहणार नाहीं. असो. आतां जर तुझा आग्रहच आहे तर पुनः या कामांत मी पड-णार नाहीं. पण आज कबूल केलें आहे त्यांतहि माघार घेणार नाहीं. आजची ही अखेरच. मी कांहीं भलतीच गोष्ट करीत नाहीं; पारमार्थिक बाबतींत सत्य काय आहे, आणि तें कसें कळेल ह्या हेतूनेंच ह्या कामीं पडलों आहें. तेव्हां त्या सत्यासाठीं ईश्वर आम्हांस साहाय्य केल्याशिवाय राहणार नाहीं. ”

ह्या वेळीं प्यारीलालकडे डनबारची नजर गेली. तो आवारांतच पण दूर अगदीं फाटकापाशीं उभा होता. त्याच्याकडे बोट दाखवून तो फ्रान्सीला म्हणाला—“ तो पोर पाहिलास ? त्याला कुत्र्यासारखी कांहींतरी उपजत बुद्धि असावी असें दिसतें. आज तो माझ्या मागेंमागें एकसारखा आहे.इतकी लगट तो कधीं करीत नाहीं, पण आज आपला मी जाईन तिकडे हा आहेच. कोठें तरी जवळपास असतो पण मला सोडून जात नाहीं. त्याच्या मनांत काय आलें आहे, किंवा त्याला कांहीं भविष्य कळलें आहे कीं काय कोण जाणे ! मी आज कांहींतरी प्रयोग करून पाहणार आहें, आणि त्या प्रयोगांत कांहींतरी मृत्यूच्या दुसऱ्या रूपासारखें घडणार आहे, असें त्याला कोणीं सांगितलें असेल असें दिसत नाहीं. ”

मृत्यु शब्द ऐकतांच फ्रान्सी घाबरली आणि भेदरल्यासारखी होऊन विचारूं लागली— “ काय म्हटलं तें ? मृत्यूचं दुसरं रूप ! काय, होय ना ? पण मृत्यु तर नाहींना ? ”

तिला वेडावून डनबार म्हणाला— “ अहा ग वेडे ! ह्मणें मृत्यु तर

नाहीं ना ? त्यांत काय होणार हें कोण सांगेल ? कदाचित् नवा जन्म मिळाल्यासारखेंही होईल. पण प्रिये, इतकी भयभीत कां झालीस बरें ? तूं कांहीं काळजी करूं नको. माझ्या जिवाला ह्यांत कांहीं धक्का लागणार नाहीं. अग, तसें जर मला कांहीं वाटलें असतें, तर अगोदर माझ्या मागचा सर्व व्याप आवरून सर्वांचा निरोप घेण्यास मी राहिलों असतों कां ? याचा विचार तूंच कर. "

ह्याप्रमाणें कॅन्सीला धीर देऊन गाडींत बसण्यासाठीं डनबार जाऊं लागला, तेव्हां टमटमपाशीं प्यारीलाल आला. डनबारनें त्याच्या डोक्यावरून व अंगावरून हात फिरविला आणि त्याच्याशीं दोन गोड शब्द बोलल्यावर त्याला डनबार म्हणाला— " जा, खेळ बरें खुशाल, पण कोणाच्या खोड्या करूं नको ! "

तें पोर केविलवाण्या मुद्रेनें म्हणालें— " आज मला न्याना बरोबर ! "

ह्या प्रश्नाचें डनबारला नवल वाटलें. आजपर्यंत असा प्रश्न प्यारीलालनें कधींच केला नव्हता. तेव्हां डनबार त्याला म्हणाला— " कां रे ? आजच काय तुझी हुक्की लागली असें विचारावयाची ? मी तुला बरोबर घेऊन कधीं बाहेर जातों का ? मग आजच तुला काय वाटलें ? मी तुला बरोबर नेत नाहीं हें तूं विसरलास होय ? "

प्यारीलाल कांहीं बोलला नाहीं, त्यानें मान खालीं घातली आणि गाडी-पासून तो निघून गेला डनबार गाडींत बसला आणि फाटकाच्या बाहेर गाडी जातां जातां मागें वळून कॅन्सीकडे पाहूं लागला. तों प्यारीलाल कॅन्सीच्याजवळ उभा आहे, तिनें त्याच्या खांद्यावर हात ठेविला आहे आणि ती शून्य मुद्रेनें पहात आहे. प्यारीलाल तर मोठा गळा काढून रडत होता ! हें चित्र त्याच्या डोळ्यापुढून हालेना. ह्या मुलाची स्थिति आजच अशी चमत्कारिक कां व्हावी ह्याचा विचार पुनः पुनः त्याच्या मनाला डचचूं लागला. त्याला कांहीं केल्यानें त्याचा उलगडा पडेना. असो. नबा-बाच्या वाड्यापाशीं गाडी पोहोंचल्यानंतर तो खालीं उतरला आणि घोडे-वाल्यास म्हणाला कीं, —" तूं गाडी घेऊन परत जा; मी येथील काम झाल्यावर पायींच परत येईन. " त्याला वाटलें कीं, फकिराच्याकडे किती वेळ लागतो कोण जाणें. तेव्हां तितका वेळ गाडी थांबवून काय करावयाचें

आहे ? नबाबाच्या दारापाशीं एक फाटके कपडे घातलेला संत्री पाहरा देत होता. त्यानें डनबारला पाहतांच सलामी दिली. डनबार आंत गेला तों एका मोठ्या दिवाणखान्यांत नबाबाचे नोकर मांड्या घालून फरशीवर बसले होते. कोणी पानतंबाकू खाऊन पिचकाऱ्या मारीत होता, कोणी चिलीम पेटवून झुरके घेत होता, आणि मोठ्यानें बाजारांत बसल्याप्रमाणें गप्पा मारीत गोंगाट करीत होते. डनबारला पाहतांच सगळेजण उठून उभे राहिले. नबाबाचा हरकाम्या म्हातारा अल्ली पुढें आला व त्यानें डनबारला लवून सलाम केला. डनबारला हिंदी भाषा छान बोलतां येत होती; तेव्हां त्यानें हिंदींतच अल्लीला प्रश्न केला— " नबाबसाहेब घरीं आहेत कां ? "

म्हाताऱ्यानें उत्तर दिलें– " होय हुजूर. ते आपल्या खोलींत बसले आहेत. माझ्या मागोमाग असे इकडून या. मी जरा पुढें होऊन आपण आल्याबद्दल वर्दी देतों. "

डनबार त्याच्या मागोमाग जिना चढून गेला आणि बाहेरच्या उत्तम शृंगारलेल्या दिवाणखान्यांत क्षणभर उभा राहिला; तो इकडे तिकडे पाहून तेथील उंची सामानाचें पुरतें निरीक्षण करीत आहे तोंच म्हाताऱ्यानें पुढें होऊन नबाबास डनबार आल्याचें सांगितलें.

अमीरानें खोलींतूनच ओरडून म्हटलें– " या हो डनबारसाहेब, या ! आंत या. " डनबार लगेंच खोलींत गेला, तों अमीर एका खुर्चीवर स्वस्थ रेलून बसला होता. त्याच्या अंगांत कोट नव्हता आणि पायांत बूट वगैरे कांहीं नव्हतें. डनबारला पाहतांच अमीर खुर्चीवरून उठला आणि जरा पुढें येऊन म्हणाला—" बरें झालें बुवा. मी काळजींतच होतों. म्हटलें, कांहीं दुसरेंच काम आलें तर नाहीं ? पण तुम्ही आलांत एकदाचे. छान झालें. या, बसा इथें. आतां आपण बरोबरच चहा घेऊं. अजून फकिराकडे जाण्याला बराच अवकाश आहे. अंधेर पडूं लागल्यानंतर या, असा त्याचा निरोप आहे. ह्याचें कारण मला वाटतें त्याला एकांत पाहिजे असावा. कारण दिवसां तेथें गर्दी असते. दिवस मावळल्यावर मग तेथें कोणी रहात नाहीं. "

अमिरानें अल्लीला ' चहा करवून घेऊन ये ' असा हुकूम करून तो स्वतः भरभर कपडे चढवूं लागला, तरी त्यानें डनबारबरोबर बोलणें चालूच ठेविलें होतें. " आज ह्या माझ्या खास खोलींत यायचा तुमचा पहिलाच प्रसंग,

नाहीं हो ? ही कशी काय आवडली ? तुमच्या लक्षांत आलेच असेल कीं, मी हळुंहळुं आमच्या एक एक चालीला फाटा देत आहें. समजा, उद्यां तुम्हांलाच या वाड्यांत रहाण्याचा प्रसंग आला तर तुह्मांला कसं काय पसंत पडेल बरें ? ''

डनबारला ह्या प्रश्नांतील इंगित कळलें नाहीं. तो त्या खोलींतील वस्तूंकडे वर खालीं निरखून पाहूं लागला. बिछाइतीपासून तों खिडकीच्या पडद्यापर्यंत सर्व जिनसा मौल्यवान, चैनीच्या अशाच होत्या. व्यवस्थाही उत्तम होती. अडाणीपणा किंवा विशोभित प्रकार असा कोठेंच नव्हता.

" हीं चित्रें कशीं काय दिसतात हो ? पण माझ्या प्रश्नाचा अर्थ तुह्मांला बरोबर समजला ना ? नाहींतर त्याचा भलताच अर्थ कराल ! समजा, उद्यां कोणीं यक्षानें कांडी फिरवून तुह्मांलाच नबाब बनविलें, माझा देह व वेष दिला, तर तुह्मांला त्या नाटकांतील सोंग बरोबर उठवितां येईल कीं नाहीं ? माझ्याविषयीं म्हणाल तर जर तुमचें रूप व सोंग मीं घेतलें आणि जर डनबारसाहेब बनलों, तर मला त्यांत मुळींच अवघड वाटणार नाहीं. पण तुमची मनःस्थिति मला ओळखतां आली नाहीं म्हणून विचारतों."

" तुम्हांला तें अशक्य नाहीं. तुम्ही पुष्कळच पुढें धांव मारली आहे. तुह्मांला इंग्रजी शिक्षण मिळालें आहे, आणि आमच्या लोकांत किती दिवस तरी तुमचें येणें जाणें व संघटन असल्यामुळें तुमचें हें ठीक आहे. परंतु मला नबाबाची कवाईत किंवा रंगी तालीम करितां येईल असें मला नाहीं वाटत. तुमच्या ह्या चाली—"

नबाब मध्येंच बोलूं लागला–" होय. तुम्ही ह्मणतां तें बरोबर आहे. आमचे जुने पुराणे नबाब सगळे आपल्या बापजाद्यांच्या पुरातन चालीपासून कधीं तिळभरही ढळणार नाहींत. पण मी या आपल्या घरांत तें सारें बदलून टाकून हळुंहळुं एक एक इंग्रजी पद्धति अमलांत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. उदाहरणार्थ, माझे स्तुतिपाठक, तोंडपुजे, खुषमस्करे ह्यांचा घोळका मीं अजिबात बंद करून टाकला आहे. ते कोणी इकडे यायचे नाहींत. तसेंच मी एकटा जेवायला बसतों. तेथें दुसरा कोणी भोजनभाऊ असत नाहीं. त्याप्रमाणेंच निजण्याची व्यवस्था. मी एकटाच आपल्या पलंगावर निजतों. हा आतां तुह्मांला वर घेऊन आलेला म्हातारा माझा नोकर

खरा, पण त्याचा दर्जा वरिष्ठ आहे; तरी तोच माझा हुजऱ्या व हरकाम्या. दुसरा येथें एक माझा दिवाणजी असतो; त्याच्याकडे सारा पैशाचा कारभार. दररोज त्याची अकराची वेळ ठरली आहे, त्या वेळीं त्यानें हिशोब दाखवायाला यावें. जर मला कांहीं जेवतांना पदार्थ लागेल तर त्याबद्दल मी स्वत: हुकूम देतों. आतांशा तर मला काय आवडतें वगैरे आमच्या आचाऱ्याला, बवर्जीला ठाऊक झालें आहे; तेव्हां सांगण्याचें कारणच पडत नाहीं. बाहेर जातांना येतांना उगाच छडीदार पुकारायची चाल मीं मोडून टाकली आहे. गडबड, गोंगाट वगैरे कांहीं नाहीं. मी वाटेल तेव्हां जातों आणि येतों. उगीज गाजावाजा करणें मला आवडतच नाहीं."

"हा सारा तुम्ही इंग्रजी शिकलां त्याचा परिणाम. त्यामुळें तुह्मांला जुनें कांहींच चांगलें दिसत नाहींसें झालें आहे. सर्व चालीरीती टाकाऊ वाटूं लागल्या आहेत."

हें ऐकून अमीर मोठ्यानें हंसला आणि म्हणाला—"होय, असेंच व्हायला पाहिजे. रस्किन काय म्हणतो पहा. याच लाटेबरोबर मी जाईन, किंवा अमक्याच किनाऱ्यावर मी लागेन, अमक्याच किनाऱ्याला मला लागलें पाहिजे, असा हट्ट अथांग समुद्रांत तरंगणाऱ्या तापभावरील मनुष्यानें करूं नये. कारण तो हट्ट अगदीं निरुपयोगी आहे. म्हणून अमक्या गोष्टीनें आपल्याला सुख होईल असें मला वाटलें कीं, लगेंच मी ती अमलांत आणितों. सगळ्या जगांत पाहावें तिकडे प्रगति होत असतांना आम्हींच काय म्हणून जुन्या चालीरीतीचा पाश गळ्याला बांधून घ्यावा ? पण यावर तुम्ही म्हणाल कीं, तुम्ही हिंदुस्थानचे लोक आज कित्येक वर्षें परकी राजांच्या हाताखालीं गुलामासारखे सांपडलेले आहांत. तेव्हां तुम्ही आपल्या जुन्या संस्था, संस्कृति व वाडवडिलांच्या चालीरीती फार पवित्र समजून त्यांना चिकटून रहावें हेंच बरें. परंतु आतां आह्मीं आमचा दर्जा वाढवून विश्वबंधुत्व संपादन केलें पाहिजे."

"छे छे, येथें तुमचा तर्क चुकला, तसें बोलणाऱ्यांपैकीं मी मुळींच नाहीं. शिवाय इंग्रज लोकांचा तुमच्यावर अम्मल म्हणजे एक प्रकारची गुलामगिरीच आहे असें मी समजतों. कारण तुमच्यासारख्या सुधारणाप्रिय लोकांना स्वातंत्र्याच्या अभावीं आपलें तेज, आपली कलाकुशलता जगतास पटविण्यासाठीं वाव न

मिळूं देतां तसेंच त्यांना कुजत ठेवणें ही गोष्ट राज्यकर्त्यांना लाजिरवाणी आहे. जरी हें मी माझ्या जातभाई लोकांविषयीं बोलत आहें, तरी— "

इतक्यांत अल्ली चहा घेऊन आला व विषयांतर झालें.

अल्लीनें पुढें ठेवलेला पेला डनबारनें तोंडाला लाविला. त्याचा चहा पिणें झाल्यावर नबाब त्यास आणखी घेण्याचा आग्रह करून म्हणालाः— " असें हो काय ? एकच पेला घेतला तुम्ही ! आणखी एक घ्याल कीं नाहीं ? चहानें कांहीं अजीर्ण होणार नाहीं. "

डनबारनें उत्तर केलें–" नको नको ! मला पुरे झाला एक. अमीरसाहेब, माझें म्हणणेंसुद्धां असेंच आहे. तुम्ही ह्मणतां कीं, विश्वबंधुत्व संपादन केलें पाहिजे; आणि त्याप्रमाणें तुमच्या बायकापोरांची ओळख करून द्या ह्मणून तुम्ही आमच्या पाठीस लागतां. परंतु तुम्ही आपल्या घरच्या मंडळीशीं आमचा परिचय करून देण्याबद्दल मागें मागें कां राहतां ? जणूं काय आमच्या बाबतींत हा राखून ठेवलेला हक्क आहे, अशी तुमची वागणूक ! वा ! छान हें ! "

ह्यावरही उत्तरादाखल पहिल्यानें नबाब हंसलाच. तो ह्मणाला–" कसला हक्क न काय घेऊन बसला आहांत तुम्ही ! तुमची कल्पना चुकीची आहे. आमच्या घरांत तुमची ओळख कां करून देत नाहीं, ह्याचें बिंग तुमच्या लक्षांत नाहीं आलें ? तसें आम्ही करूं लागलों तर तुम्हीच म्हणाल नको. उदाहरणार्थ माझीच बायको घ्या. तिची तुमची ओळख करून दिली तर ती तुमच्यापाशीं काय बोलणार ? तिची कल्पकशक्ति–प्रतिभा–अत्यंत आकुंचित असल्यामुळें तिला झनानखान्यांतील कारभार, दागिने, कपडेलत्ते या पलीकडे बोलण्यास विषयच सुचणार नाहींत व कळणारही नाहींत. आमच्या स्त्रीवर्गाला शिक्षण आहे कोठें ? अहो, पण बोलतां बोलतां बराच वेळ झाला. आपली जायची वेळ झाली. चला तर जाऊं घाटावर. "

डनबार म्हणालाः— " मी तर हा तयार आहें. फकिराला ह्मणावें आज होऊं देच एकदांचें काय तें. माझें मन निःसंशय होईल असा प्रयोग होऊं दे म्हणजे झालें. "

" तो आज कांहीं तरी विशेष गम्मत दाखविणार आहे असें दिसतें. मला तर त्यानें खूपच आशा लावून ठेविली आहे. पण त्याचें डोकें ठिका-

णावर राहिलें म्हणजे मिळविली! नाहीं तर काय घ्या? कांहीं कारण उपस्थित होऊन फकिराची लहरच फिरली, आणि त्यानें आजचा बेत रहित केला, आणि 'आज नाहीं, यापुढें केव्हां तरी.' असें म्हणून ढकलाढकली करूं लागला, तर काय करणार?"

दोघेही चालत निघाले. डनबारच्या नास्तिकपणाबद्दल नबाबानें वाटेनें चांगलीच फजिती चालविली होती.

डनबार म्हणालाः-"ह्या माझ्या विचाराला नास्तिकपणा म्हणत असलां तर ह्मणा. हक्सलेची नास्तिकपणाची व्याख्या मला अगदीं पटते. तो म्हणतो कीं, ज्या गोष्टी शास्त्रीय पद्धतीनें सिद्ध झाल्या नसतील, आणि त्या कारणासाठींच जो त्यांच्यावर विश्वास ठेवीत नसेल, किंवा त्या गोष्टी आपल्यास माहीत नाहींत असें जो म्हणत असेल, त्याला नास्तिक ह्मणतां येईल."

त्यावर अमीर बोलूं लागला—"तर मग राजेश्री, आज आपल्याला नुसत्या कोरड्या शब्दांनीं सिद्धांताची समजूत देण्याचा विचार नाहीं फकिराचा. तो जो प्रयोग करील त्यामुळें ह्या डोळ्यांनीं पहायला, ह्या कानांनीं ऐकायला, ह्या हातांनीं स्पर्श करायला सर्व गोष्टी मिळणार आहेत बरें! हा आत्मा म्हणजे प्रत्यक्ष कांहीं तरी वस्तु आहे असा अनुभव तुमच्या प्रत्येक इंद्रियाला येईल. तुमच्या देशांत ह्या विद्येचा-या योगाभ्यासाचा नाद आतांशा कोठें कांहीं लोकांना लागूं लागला आहे. तिकडून इकडे तुम्ही आलांत ते कांहीं तरी स्पष्ट समजून घेण्यासाठीं ना? इकडे आलांत हें बरेंच झालें. हा आमचा देश म्हणजे योगाभ्यासाचें माहेरघर आहे. आजपर्यंत लोकांची समजूतच अशी होती कीं, हें यौगिक सामर्थ्य आहे म्हणणारे लोक सारे लबाड, केवळ धूर्त, ढोंगी. आम्ही मृतलोकांच्या आत्म्यांना परत बोलावितों.— खरें पाहिलें तर मेलेल्यांचा आत्मा म्हणणेंच बरोबर नाहीं. आत्मा कधींच मरत नाहीं. हें जग सोडून-हें स्थूल टाकून ज्यांनीं सूक्ष्मरूप धारण केलें, त्यांना तुमच्याशीं बोलावयास लावितों- देहापासून आत्मा निराळा झाल्यावर तो ज्या अवस्थेंत असतो, व जी अवस्था बहुतेकांना किंवा पुष्कळांना अनुभवावी लागतेच, त्या अवस्थेंत असलेल्या आत्म्यांना आम्ही प्रत्यक्ष बोलावितों-असें ते म्हणतात. पण ही त्यांची विद्या, हें त्यांचें सामर्थ्य नुसत्य

चाता आहेत, अशीच पुष्कळांची समज आहे. डनबारमहाराज, आज तुमच्या संशयाला थोडीसुद्धां जागा उरणार नाहीं, अशी मला खात्री वाटत आहे."

आजपर्यंत अशा प्रकारचें खात्री देण्याचें भाषण नबाबाच्या तोंडून कधींच आलें नव्हतें. आजची गोष्ट त्यामुळें विलक्षण वाटण्यासारखी होती. परंतु तें डनबारच्या लक्षांत आलें नाहीं. नबाब अगदीं हुरळून गेल्यासारखा झाला होता, आणि आजचा प्रयोग पाहण्याची डनबारला जितकी उत्सुकता वाटत होती, त्यापेक्षां नबाबाची अधीरताच अधिक होती.

× × × × × ×

फकिराच्या निवासस्थानाचें मागें वर्णन केलेंच आहे. आणि त्याप्रमाणें तो फकीर आज त्या वडाच्या झाडाखालीं एकटा बसलेला होता. त्याची हनुवटी त्याच्या छातीला टेकली असून तो ध्यानांत गर्क झाला होता. नहाणीघाटावर कोणी नव्हतें, तरी पुलाच्या पलीकडे एक मनुष्य दिसत होता. त्याला घरीं जायला उशीर झाल्यामुळें तो झपाझप पावलें टाकीत चालला असावा. बादशाहा-बागेजनिक असलेल्या पोलीस ठाण्यावरील रखवालदार शिपाई तासांचे ठोके मारूं लागला. एक, दोन—सहा, सात, सात वाजले. आजच्या भयंकर पातकाचें दर्शन नको म्हणूनच कीं काय सूर्यनारायणाची स्वारी लवकरच अस्ताचलास गेली असावी, असें भासत होतें. संधिप्रकाशसुद्धां नाहींसा होत आला असून गगनदीप लाविल्या-प्रमाणें एक एकतारा चमकूं लागला होता. जुम्मामशिदीच्या अत्यंत उंच मनोऱ्यावरून मुअदीनची प्रार्थनेची हांक येथपर्यंत ऐकूं येऊन ह्या बाजूला रहाणाऱ्या कित्येक लोकांस " ईश्वर एक आणि एकच आहे, दुसरा नाहीं" या वाक्याचें स्मरण देत होती. तिचा प्रतिध्वनिही आतां नाहींसा झाला, आणि जिकडे तिकडे शांतता पसरली. इतक्यांत फकिरानें आपली मान वर उचलली; आणि डोळे न उघडतांच झोपेंत बोलल्याप्रमाणें त्याच्या तोंडांतून शब्द येऊं लागले—" मुलांनो, आज पुनः तुम्ही आलां आहां. माझ्या सामर्थ्याची परीक्षा पाहण्याचा तुमचा हेतु आहे; कांहीं हरकत नाहीं. परंतु हे प्रयोग मी फारसा करीत नसतों. मृत्युद्वारें शरीराच्या बाहेर पडणाऱ्या या आत्म्याची अंतिम अवस्था सचेतन देहास अनुभवणें फार कठीण आहे. ह्या पंचभूतांच्या संयोगानें झालेला हा जडदेह—ही माती—पुनःपुन्हां

मातीला मिळवून जो आत्मा मोकळा झाला नाहीं, त्याला त्या स्थितीचा अनुभव येणें बहुतेक अशक्यच म्हटलें तरी चालेल. पण तुम्ही दोघे खरे जिज्ञासु आहांत, तुमच्यावर ईश्वराची कांहीं तरी कृपा आहे, परंतु तुम्हां दोघांपैकीं एकाचा संशय अद्याप कायम आहे. ह्यासाठींच मी आजचा प्रयोग करण्यास तयार झालों आहें. ह्या प्रयोगानंतर त्याला कांहीं संशय रहाणार नाहीं. पण मी अगोदर बजावून ठेवितों कीं, जर कांहीं बरें वाईट झालें, तर मला मग कोणी दोष देतां उपयोगीं नाहीं. मग मी कोणाचें बोलणें चालूं देणार नाहीं. अगोदर सावध व्हा. हा प्रयोग म्हणजे निव्वळ साखर खाण्यासारखें नाहीं. त्यांत कांहीं संकट आलें, माझ्याकडून कांहीं चुकलें आणि त्याचा भलता परिणाम झाला, तर त्याबद्दल कुरकुरतां कामा नये. तें दुःख, तें संकट सोसण्याची तयारी पाहिजे. बोला काय तें ? तसें नसेल तर आलांत तसे परत जा ! आणि पुनः माझ्यापाशीं ही गोष्ट काढूं नका."

डनवारनें विचारलें—" पण तीं संकटें तरी कोणच्या प्रकारचीं आहेत, तें तर कळूं द्या !"

त्या फकीरानें उत्तर केलें—" तें सांगण्याचा मला हुकूम नाहीं."

" त्यापासून मृत्यूची किंवा कांहीं देहदुःख होण्याची भीति आहे काय ?"

" त्यापासून नवीन देहाची प्राप्ति होईल."

अमीर उत्सुकतेनें म्हणालाः-" तर मग चालूं द्या ! माझी तयारी आहे. मला कांहीं भीति वाटत नाहीं."

डनवारनें कांहींच उत्तर दिलें नव्हतें. तेव्हां त्याच्याकडे बोट करून फकिर म्हणालाः—" आणि तूं रे ?"

" तुम्ही आरंभ केव्हां कराल असें मला झालें आहे !"

फकिर कांहींच बोलला नाहीं. पण थोड्या वेळांत प्रथम अमीर आणि नंतर डनवार दोघांनाही झोंप येऊं लागून दोघेही जमिनीवर हातपाय पसरून आडवे झाले. अगदीं निश्चेष्ट हालचाल न होतां तसे पडून राहिले. ह्याला दहा मिनिटें झाल्यावर फकीर उठून उभा राहिला आणि प्रथम डनवारच्या शरीराला त्यानें हात लाविला आणि मागाहून अमीराच्या देहालाही त्यानें स्पर्श केला. त्याबरोबर ते दोघे ह्या कुशीचे त्या कुशीला झाले.

तरी पण ते झोपेंतच होते.

" झालें. मला करायचें तें मीं केलें." इतके शब्द त्यानें उच्चारिले, आणि तेथें पडलेलें एक घोंगड्याचें रकटें होतें, तें उचलून त्यानें आपल्या कंबरेभोंवतीं गुंडाळिलें आणि तेथून धांवत निघून गेला; तो अंधेरामुळें दिसेनासा झाला. इकडे अमीर व डनबार यांच्या आत्म्यांची अदलाबदल झाली.

डनबार व अमीर दोघेही बरोबरच जागे झाले, आणि थोडा वेळ ते एकमेकांकडे टक लावून पहात राहिले, आणि कांहीं वेळानें डनबार मोठ्यानें हंसूं लागला.

अमीर ताडकन् उठून उभा राहिला आणि चोहोंकडे पाहूं लागला; पण तो फकिर त्याला कोठें दिसेना. तेव्हां हातपाय आपटून तो म्हणालाः— " अरे हरामखोरा, आतां पळून गेलास वाटतें ? "

डनबार म्हणालाः—" हो गेला, पार उडून गेला. कळीच्या घोड्यावर बसून फकिरानें आकाशगमन केलें. "

अमीरानें पुनः हातपायांची आदळआपट केली आणि म्हटलें:—" हसायला काय झालें ? ही कां थट्टेची वेळ आहे काय ? तो फकीर कोठें गेला, तो मला शोधून काढिलाच पाहिजे ! "

" तो आतां सांपडणार नाहीं बरें मित्रा. अमीरसाहेब —"

" कोणालारे म्हणतोस अमीर ? चूप ! अरे लबाडा, तुझेंच ह्यांत अंग आहे खास. फकीरानें व तूं मिळून हा बेत अगोदरच ठरविला असला पाहिजेस, तुला हें अगोदर ठाऊक असलेंच पाहिजे. काय करूं रे ! तुझा गळा दाबून तुझा प्राणच घेतों बघ!"

" ये ये, कर पाहूं काय करतोस तें ! पाहूं कसा गळा दाबतोस तो ! गळा कोणाचा आहे हा ? तूं आपलाच गळा दाबणार काय ? कां ! आतां कां चरकलास ? बरें बुवा ! तुम्हांला माझा इतका राग आला आहे, तर आजपासून पुरे तुमची संगत."

" अरे गुलामा, जातोस कुठें ? थांब, मी तुला जाऊं देणार नाहीं. अगोदर त्या फकिराला शोधून काढूं आणि मग—"

" मग पहा वाट आतां. त्याला परतण्यास दिवस, महिने, कां वर्षें

लागतात कोण जाणे ? बऱ्या बोलानें आतां माझें बोलणें ऐका. थोड्या वेळा-पूर्वीं आपण माझ्या वाड्यांत होता, तेव्हां मीं तुम्हांला प्रश्न केला होता, त्याची आठवण करा. हेंच तुमच्या हिताचें आहे. आतां मुकाट्यानें जा. ”

डनबारला मारण्यासाठीं अमिरानें हात उगारिला, पण डनबार जागचा हलला नाहीं, तो स्वस्थ उभा होता. तो म्हणाला–“ तुमच्या मनांत असेल तर खुशाल मला मारा, जीव घ्या. पण ठार मारणार कोण, तुम्हीच ! असो. आतां उमजा. सलाम; बहुत सलाम. ”

“ हरामजाद्या, थांब ! ” असें बोलून अमिरानें डनबारच्या गळ्याला हात घातला, पण डनबारनें आपल्यास सोडवून घेतलें आणि हात मागें करून अमिराला असा एक ठोसा कानशिलावर मारिला कीं, त्यामुळें तिरमिरी येऊन अमीर धाडकन जमिनीवर मूर्च्छित होऊन पडला ! डनबार त्याच्या-जवळ गेला आणि त्याच्या छातीवर हात ठेवून धुगधुगी आहे कीं नाहीं, हें पाहिलें आणि तो म्हणाला “ बस, पुरें झालें. हा आतां कांहीं वेळानें शुद्धीवर येईल. हट् अमीरा ! ” यानंतर त्यानें मोठ्यानें हास्य करून आपले कपडे साफसूफ केले आणि पुलावरून पलीकडे जाण्यास निघाला.

कांहीं वेळानें अमीर सावध झाला; तो तसाच वाळूवर बसून राहिला, आणि संध्याकाळपासून घडलेली एक एक गोष्ट आठवूं लागला. त्याच्या कान-शिलावर डनबारनें जो ठोसा मारिला, त्याची झिणझिणी अद्याप शिल्लक होतीच. त्याच्या डोळ्यापुढें सारखी अंधारी होऊन त्याला कांहीं सुचेना. कांहींवेळ थांबून थांबून त्याला सर्व गोष्टी आठवूं लागल्या. नव्या स्थितीचें सर्व चित्र त्याच्या मानसिक दृष्टीपुढें उभें राहिलें; पण अद्याप आपण झोपेंत असून हें स्वप्न तर नाहीं ना अशी त्याला शंका आली. याचवेळीं नदीच्या पैलतीरावर कोणी चैनी प्राणी आपल्या रंगांत येऊन एका अचकटविचकट लावणीच्या लकेरी मारीत होता. पलीकडे दूर अंतरावर असलेल्या क्लबांतील चमकणारे दिवे तेथून दिसत होते. नदीच्या पाण्यावरून चाललेल्या नावेचा सरसर आवा-जही त्याच्या कानीं आला. तेव्हां आपण स्वप्नांत नसून सत्यसृष्टींतच आहोंत, अशी त्याची खात्री झाली. जो आपल्यास आतां डनबार म्हणवीत होता, त्यानें आपल्याला फसविलें, विश्वासानें गळा कापिला, आणि फकिराला सामील करून घेऊन हें कृत्य त्यानें करविलें, ह्यांत शंका उरली नाहीं. मनुष्य स्वप्नांत

असतो, तेव्हां त्याला कांहीं वाजलेलें ऐकूं येत नाहीं व आपण स्वप्नांत आहोंत अशी कल्पना त्याच्या सुप्त मेंदूला शिवतहि नाही. स्वप्नांत दुसऱ्याबरोबर संभाषण घडतें, पुष्कळ दूरच्या देशांत प्रवास घडतो; त्या वेळीं इतर लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी स्वप्नसृष्टींतील असल्यामुळें त्या ऐकूंहि येतात. पण सत्यसृष्टींत कोणताहि ध्वनि त्याला ऐकूं येत नाहीं. पण ह्या अमिराला नदीच्या पलीकडे तारस्वरांत ओरडणाऱ्या सत्यसृष्टींतील मानवाचा शब्द स्पष्ट कळत होता. नदींतून चाललेल्या होडीचा करकर आवाज आणि वल्हीं मारतांना होणारी पाण्याची खळखळ अगदीं स्पष्ट कानीं येत होती. असो.

अमीराच्या–आतां डनबारच्या आत्म्यास अमीरच ह्मटलें पाहिजे—दृष्टीनें पाहिलें तर आजचा फकिराचा प्रयोग पूर्ण खात्री पटविणारा झाला खरा. ह्या प्रयोगावरून येवढें सिद्ध झालें कीं, मनुष्याला आत्मा आहे, आणि त्या आत्म्याला एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत जातां येतें, म्हणजे परकायाप्रवेश स्पष्टच होता, इतकेंच नव्हे तर जन्मल्याबरोबर जो देह प्राप्त झाला, तो तसाच जिवंत ठेवून तो आत्मा दुसरीकडे जाऊं शकतो. दुसऱ्याच्या शरीरांत मरणानंतरच नव्हे, तर एका कुडींतील आत्मा बाहेर गेला असला तर त्यांत शिरून तें शरीर जन्माबरोबर ज्याला प्राप्त झालें, त्याच्या आत्म्याला परत त्यांत शिरण्याची बंदी करितां येते. आतां ह्या बाबतींत संशय उरला नव्हता. परंतु ह्या आपल्या प्रयोग पाहण्याचा उपद्व्यापाचा परिणाम असा होईल हें अमीराच्या कुडींत असणाऱ्या आत्म्याच्या ध्यानींमनींही नव्हतें.

त्याच्या हृदयांत असणाऱ्या कॉन्सीचीं मूर्ति त्याला दिसूं लागली आणि आतां ती आपल्याला कायमची अंतरली असें त्याला वाटूं लागलें. तिचें लग्न डनबारबरोबर ठरलें आहे, म्हणजे डनबारच्या देहाबरोबर तें लागणार, पण ह्या अमिराच्या कुडींतल्या डनबारचा तेथें काय उपाय चालणार ? तो जर अशी हकीगत झाल्यामुळें लबाडी कराणाऱ्या अमिराबद्दल कांहीं सांगूं लागला, तर कोणाला तरी तें खरें वाटणार आहे काय ? अमिरानें आपले तळहात आपल्या डोळ्यापुढें धरिले आणि त्यांच्याकडे किती तरी वेळ वेड्यासारिखा तो पहात राहिला. त्या हातांचा काळा रंग पाहून त्याचें त्यालाच हसूं आलें आणि तो उद्गारला, " काय हें ! माझेंच कां हें शरीर ? "

होय, तें कृष्णवर्णीय शरीर आतां त्याच्याच मालकीचें झालें होतें !

पण आतां त्याला काय इलाज! शेवटीं कशीतरी मनाची समजूत करून तो उठला आणि अमीराच्या वाड्याकडे चालता झाला. दारापाशीं जातांच पहारेवाल्यानें सलामी दिली, तेथून तो अंगणांत गेला. खालच्या ओसरीवर सर्व नोकर चाकर जमा झालेले होते. ह्याला पहातांच ते सर्व उठून उभे राहिले. त्यांतून म्हातारा अल्ली पुढें आला आणि लवून सलाम करून हात जोडून काय हुकूम म्हणून विचारूं लागला. अमीर म्हणाला, " मला माझ्या खोलींत नेऊन पोहोंचीव. "

अमिराला कांहीं तरी झालें आहे, येवढी गोष्ट नोकरांच्या नजरेस आल्या-वांचून राहिली नाहीं. परंतु त्याला काय झालें, हें नक्की कोणासच कळेना. अल्लीनें त्याला त्याच्या खोलींत नेलें, आणि एका खुर्चीवर नेऊन बसविलें; तेथें अगदीं दमून गेल्याप्रमाणें त्यानें खुर्चीवर अंग टाकून दिलें.

अल्ली हळूच म्हणाला, " नबाबसाहेबांची प्रकृति आज बरोबर दिसत नाहीं. " अमिरानें आपल्या हातांनीं डोकें दाबून धरून म्हटलें, " मला कांहीं एक स्मरण नाहींसें झालें आहे. उद्यां सकाळीं मी चांगला बरा होईन. आज कचेरींत असतांना मला एकाएकीं घेरी आली आणि मी पडलों. त्यानें माझ्या डोक्याला एकदम मोठा धक्का बसला! "

" मग आतां हकीमाला— "

" छे छे, नको. मी अगोदर एकाकडे जाऊन सुद्धां आलों. पडल्यामुळें माझ्या मेंदूला धक्का बसला आहे आणि त्यामुळें मला सर्व गोष्टींचें विस्मरण झालें आहे. पहा, तुझें नांवसुद्धां मला आठवेनासें झालें आहे. "

विस्मययुक्त होऊन अल्ली म्हणाला— " या अल्ला, तोबा! तोबा! नबाबसाहेब हें फार भलतेंच झालें. माझें नांव आपल्याला आठवेना, तेव्हां आतां काय म्हणूं? मी आपल्या वडिलांपासून ह्या वाड्यांत नोकरी केली ना? मी अल्ली—ह्या माझ्या खांद्यावर मी आपल्याला खेळविलें आहे ना ? "

" होय रे, खरेंच कीं ? आठवलें सारें आतां. मी कधीं भलताच हट्ट धरून बसलों ह्मणजे मला तूं बडवीत असे, नाहीं रे ? "

अल्लीनें आपल्या दाढीवरून हात फिरवीत ह्मटलें—" हें काय नबाबसाहेब? असें होईल कसें ? मला असें मारल्याचें कांहींच स्मरत नाहीं तें! मी आपल्या अंगावर हात कसा टाकीन ? नबाबसाहेब! आपण कांहीं ह्मणा,

पण आपल्या मेंदूंत कांहींतरी बिघाड झाला आहे खरा. " हें बोलतांना अल्लीच्या तोंडावर चिंतेची स्पष्ट छाया दिसूं लागली. तें पाहून अमीर हंसून म्हणाला—" कांहीं भ्यायला नको, असें हकीमानें मला सांगितलें आहे. माझी स्मृति लवकरच पुनः पूर्ववत होईल. मी पडल्यामुळें हें असें झालें आहे. माझ्या डोक्याला आणि मेंदूला चांगलाच मार बसला असून त्यायोगानें स्मरणशक्ति अंधुक झाली आहे. पण मेंदूला कायमची कांहींच इजा झाली नाहीं. "

कांहीं वेळानें तो पुनः अल्लीला म्हणाला— " आतां असें कर; तूं सगळ्या वाड्यांतून मला हिंडवून आण. तेथल्या सर्व लोकांची आणि वस्तूंची मला माहिती करून दे. म्हणजे तरी पाहूं माझी स्मरणशक्ति पुनः लवकर येते कां तें ! आपले नोकर कोण, त्यांचीं कामें काय, हें सर्व मला सांगत चल. पहा बरें, आतां नाहीं कां मला तुझी आठवण राहिली ? "

अमीराला घेऊन मुकाट्यानें अल्ली पुस्तकालयांत गेला आणि भिंतीवर तैलतिक्त रंगांनीं काढलेल्या तसबिरी दाखवूं लागला. त्यांपैकीं एका मोठ्या भव्य व उंची पोशाख केलेल्या पुरुषाच्या चित्राकडे बोट दाखवून अल्ली म्हणाला— " नबाबसाहेब, ही कोणाची तसबीर सांगा पाहूं ? ओळखतां येते कीं नाहीं ? "

अमिरानें तर्कानेंच ओळखिलें. पण तसें न दाखवितां तो म्हणाला— " हात्याच्या ! ही तसबीर दादांची. "

तें ऐकून अल्लीला बरें वाटलें. तो आपल्याशीं पुटपुटला— " मनुष्य कितीहि वेडा झाला तरी तो आपल्या बापजाद्याला ओळखणारच ! "

तेथून ते दोघे गच्चीवर गेले, आणि तेथून खालीं दिसणाऱ्या बागेकडे अमीर पाहूं लागला. ती बाग फार सुंदर होती, परंतु ह्या वेळीं काळोख पडल्यामुळें कांहीं एक दिसत नव्हतें, पण बागेच्या पलीकडे बिबीचा महाल होता, त्यांतील खिडक्यांतून दिव्याचा प्रकाश पडलेला दिसत होता.

अमिरानें विचारिलें—तें कोणाचें घर ? तिथें कोण रहातें ? "

" बिबीसाहेब. "

" कोणाची बिबी ही ? "

अल्लीनें एक दीर्घ सुस्कारा टाकला. नंतर कांहीं वेळानें तो म्हणाला,

" नबाबसाहेब, काय सांगूं आतां ? या बिबीसाहेबांशीं तर आपलें लग्न लागलें. तें घर आपलेंच. तोच झनाना. तो औरतांचा महाल आहे. आतां सर्व हुजुरांच्या ध्यानांत आलेंच असेल."

" हं हं, असें ! झानाना—तिथें जायला कोणालाही परवानगी नाहीं ना? मीसुद्धां तिकडे जाऊं नये असेंच कीं नाहीं ? आणि गेलोंच तर मला धरून ठोकतील नाहीं वरें ? नंतर खूप दंगा, आरडा होईल !"

अमीराच्या या बुद्धिभेदामुळें अल्लीचे डोळे पाण्यानें भरून आले, त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. तो मानेनें नाहीं म्हणून खुणवीत होता. तो तसाच रडकुंड्या स्वरानें कांहीं वेळानें बोलूं लागला:– " हाय हायरे ! या अल्ला ! माझ्या धन्याची काय दशा केलीस ही ! ह्यांना कांहींच कसें स्मरण नाहीं ! हुजूर, हा आपला खुदबेखुद झनाना आहे. आपली लग्नाची औरत तिथें रहाते. साहेब, तुम्ही आपल्या पत्नीकडे गेलां तर तुम्हांला नको कोण म्हणेल ?" येथें तो थांबला. त्याच्या मनांत आणखी कांहीं बोलावयाचें होतें, पण त्यानें तें तितकेंच आवरून धरिलें. नबाबसाहेबांनीं तिकडे जावें, नबाबसाहेब तिकडे केव्हां जातील तें पाहण्यासाठीं आम्हां सर्वांचे डोळे बुभुक्षित झाले आहेत, असें म्हणावयाचें त्याच्या मनांत आलें होतें.

" मला कांहींच कसें आठवेनासें झालें हें ! काय म्हणालास तें ? माझी-बायको त्या महालांत रहात्ये, असेंच ना ? हां हां ! आतां आठवलें रे आठवलें ! मी तर आजपर्यंत तिच्याशीं संबंध ठेविला नाहीं. बरें, जाऊं द्या कीं; आतां काय त्याचें ? आतां कोण त्या वाटेला जातो ? आतां तें होणार नाहीं. चल, अल्ली, चल पुढें. हा विषय मला आतां नकोसा झाला आहे." अल्ली मुकाट्यानें परत फिरला, व त्याला घेऊन तो पहिल्या दिवाणखान्यांत आला. तिथें मुयाद नांवाचा दुसरा नोकर नबाबासाठीं ताटें वाढून घेऊन आला होता. अमिरानें फारसें कांहीं खाल्लें नाहीं. इकडे तेवढ्यांत मुयाद त्याचा बिछाना साफ करितो न करितो तोंच अमिरानें त्याला 'जा' म्हणून तेथून घालवून दिलें. तो गेल्यावर अमीर अल्लीला म्हणाला, " अल्ली, तूंही जा बाबा आतां. आमच्या दादांपासून असले विश्वासु नोकर आहेत म्हणून बरें आहे. मला आतां झोंप येऊं लागली आहे. उद्यां बहुतेक मी चांगला बरा होईन !"

खोलींतून बाहेर पडतां पडतां अल्ली म्हणाला, "काय अल्लाच्या मनांत असेल तें खरें."

त्या रात्रीं नबाबाचे नोकर एका ठिकाणीं जमल्यावर हुक्का पितां पितां नबाबाच्या प्रकृतीचा विषय मुख्य होऊन बसला. मुयादला जो तो प्रश्न विचारीत होता आणि 'नबाबसाहेब मला असें म्हणाले, मला असे प्रश्न विचारीत होते' वगैरे तो सांगत होता. नेहेमींप्रमाणें रात्रीचे कपडे उतरायला न सांगतां एकदम जाण्याची परवानगी दिल्याबद्दल आश्चर्य वाटल्याचेंही त्यानें सांगितलें. शेवटीं अल्ली बोलूं लागला, "नबाबसाहेबांच्या मेंदूला कांहीं तरी जबर धक्का बसला आहे, ह्याकरितां तुम्ही सर्वांनीं फार जपून वागलें पाहिजे. नबाबसाहेब वेडेवांकडे कांहीं बोलले तरी आश्चर्य दाखवून बुचकळ्यांत पडल्यासारखें कोणीं करूं नका. प्रसंग पाहून त्यांना संभाळून घेत चला." सर्व नोकरांनीं अल्लीच्या सूचनेप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. त्यांपैकीं कोणाचेंही नबाबावर प्रेम नव्हतें, तरी त्याचेकडून भरपूर पगार मिळत असल्यामुळें जो तो आपलें काम चोख बजावीत असे.

# प्रकरण १६ वें,

## झीनावची भेट.

अमीर लगेंच निजला नाहीं, एका गच्चीवर खुर्ची टाकून तो बसला. त्यानें चिरूट पेटविला आणि त्याचा धूर सोडीत तो विचार करूं लागला. आजच्या घडलेल्या सर्व गोष्टी पुनः त्याच्या दृष्टीपुढें दिसूं लागल्या. ह्या गोष्टी थट्टेच्या नव्हत्या, तर त्या फारच महत्वाच्या होत्या. फकिरानें जो हा प्रयोग करून दाखविला, त्यावरून त्याच्या अंगांत अद्भुत शक्ति आहे, ह्याबद्दल संशयाला जागाच उरली नाहीं. अमीर आणि डनबार ह्यांना काय काय दिसलें, आणि त्यांना काय अनुभव आला, ह्याबद्दल ते एकमेकांपाशीं किंवा कोणाशीं बोलले नव्हते ही गोष्ट खरी; तथापि ह्या झालेल्या प्रकाराची जाणीव त्या दोघांनाही होती. आपण आपल्या देहांत नाहीं, आपल्या आत्म्यानें परकायाप्रवेश केला आहे, हें दोघांनाही कळून चुकलें होतें.

ह्या देहविनिमयानें अमीराला—किंवा अमीराच्या देहांतल्या डनबारला कसें-सेंच वाटूं लागलें; परंतु फकिराचा पत्ता लागून त्यानें हा प्रकार फिरविल्या-शिवाय ह्याला उपाय कांहींच नव्हता, हें त्यानें पूर्णपणें ओळखिलें होतें. त्याप्रमाणेंच आत्म्यांची उलट अदलाबदल होऊं द्यावयाची नाहीं असा हल्लींच्या डनबारचा व फकिराचा बेत पूर्वींच ठरला असला पाहिजे, ह्या-बद्दलही हल्लींच्या अमीराची खात्री झाल्यासारखी होती. परंतु त्याचा मूळचा स्वभाव रडवा नसल्यामुळें तर आलेल्या भोगाला सादर झालें पाहिजे असें त्यानें ठरविलें होतें. कांहीं गोष्टी पालटणें आतां शक्य नाहीं, म्हणून तो जरी उदासीन झाला होता, तरी आतां आलेलें हें नवें संकट कसेंही करून पार पाडिलें पाहिजे असा त्यानें निश्चय केला. आतां या विपरीत प्रसंगानें उत्पन्न होणारीं सुखदु:खें धैर्यानें सोसावींत असें त्याला एकदां वाटलें. पण क्रीन्सी-ची काय वाट ? कारण, ती आपल्याला आतां कायमची मुकली असें त्या फकिरानें जातां जातां त्याच्या कानांत सांगितलें होतें, आणि या विचारा-मुळें त्याला फार वाईट वाटूं लागलें.

गच्चीवरून तो परत आपल्या खोलींत येऊं लागला, तों त्या खोलींतल्या मधल्या मेजापाशीं एक बुरखा घेतलेली युवती त्याच्या दृष्टीस पडली. त्या-सरशीं तो आश्चर्यचकित होऊन तिच्याजवळ गेला. तरीहि ती कांहीं बोलली नाहीं. तेव्हां तोच तिला ह्मणाला—" तुम्ही इकडे कशासाठीं आलां ? तुमचें काय काम आहे ? "

झीनाब उभी होती, पण तिचे पाय लटलट कांपत होते. तिच्या तोंडां शब्द निघेना. अखेर मोठ्या कष्टानें ती तोंडांतल्या तोंडांतच पुटपुटली:—

" मी नव्हे का ती झीनाब ? "

" झीनाब कोण ? काय म्हणतां, झीनाब ? कोठल्या नबाबाच्या बिब्बी आपण ? तुम्ही एकट्या ह्या वेळीं माझ्या खोलींत आपण होऊन आलां, हें चांगलें दिसतें कां ? लोक नांवें नाहीं कां ठेवणार ? "

" काय ? प्रत्यक्ष स्वत:च्या बायकोचं नांवही आठवत नाहींसं झालं अं ? " असें खोंचून ठसक्यानें ती बोलली. अमीराच्या भाषणाचा तिला तिटकारा आला, असें तिच्या स्वरावरून स्पष्ट दिसत होतें. आतां तिची भीति गेली होती, आणि पहिल्या प्रथम तिच्या आवाजांत जो कांपरेपणा

होता, तोही आतां नाहींसा झाला होता.

" अरेरे, काय हें ? मी काय अगदीं वेड्यासारखें बोलून गेलों हें ? तूं माझी बायको अं ? होय, तीच असशील तूं ! माफ कर. तूं आतां अशी किती वेळ उभी रहाणार ? बसायचें नाहीं कां तुझ्या मनांत ? छे छे ! तिथें इतक्या लांब कां ? इथें या खुर्चीवर बैस ना ! लाजून अशी मान खालीं घालूं नको. "

ह्यावर झीनावनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिला नबाबाच्या बोलण्याचें आश्चर्य वाटलें आणि ती अगदीं गोंधळून गेली. ती किती भीतभीत आली होती; पण येथें तर तिचें स्वागतच होऊं लागलें. त्यामुळें ती बावरून मनांत म्हणाली—" आपल्यामध्यें बायकांचा इतका मानमरातब आणि त्यांतून लग्नाच्या बायकोचा तर कोणी ठेवीत नाहीं; उलट बायकांनीं सर्व प्रकारें आपल्या नवऱ्याची सेवा करावी, त्याचा मान राखावा, हा धर्म समजला जातो. हें इकडे विसरायचं झालं वाटतं ? "

" तंबाखू ओढायला आपली कांहीं हरकत नाहींना ? चिरूट ओढूं ना मी ? " डनबार नम्रतापूर्वक म्हणाला.

झीनावनें उत्तर केलें—" हें काय बाई विचारणं ! आम्ही बायका म्हणजे आपल्या पायांच्या दासी, गुलाम. आमच्यापुढं धन्यांनीं असं नाचायचं, ही कसली नवीन चाल ? ही सारी माझी थट्टा तर नाहीं चालली ? मी इथं परवानगीवांचून आलें म्हणून असं बोलून माझ्यावर राग काढायचा बेत दिसतो आहे. ही अशी थट्टा करून मला लाजवायचं आहे वाटतं ? "

अमीराला हें चमत्कारिकच वाटलें. तो म्हणाला—" तसें नव्हे. दुसऱ्या लोकांची गोष्ट मला कशाला ? माझी वागणूक गैर नसली म्हणजे झालें. ज्याचा मान त्याच्या मानानें राखलाच पाहिजे. "

हें ऐकतांच बेगमला हंसूं आवरेना. ती हंसत हंसत म्हणाली—" मान, मान कोणाचा ? हा असला सारा तोंडपुजेपणा दुसऱ्याच्या बायकोपुढं चालायचा ! उगीच पोकळ गोड शब्द बोलायला कांहीं खर्च होत नाहीं, आणि असल्या गोड गोड भाषणांनीं आम्हां बायकांचीं मनें तेव्हांच हुरळून जातात. पुरुषांची हीं मायावी—लाघवी बोलणीं आम्हांस खरींच वाटूं लागतात ! मी इकडची गोष्ट बोलत नाहीं; इतरांची तऱ्हा सांगितली. असल्या

मुलथापांनीं बायका वेड्या होतात, आणि आपल्या जवळची अमोल चीज, अब्रू गमावून मग रडत बसतात ! माझ्या ह्या धिटाईच्या बोलण्याचं इकडं नवल वाटेल, आणि ह्या असल्या गोष्टी हिला कशा कळल्या, असं मनांत येईल. पण मी तरी काय करणार? ह्याचा विचार आपणच करावयास पाहिजे होता. आपण माझा अव्हेर केलात खरा; पण त्याचा परिणाम काय होत आहे, इकडे लक्ष आहे का? आज किती तरी लोक माझ्यापुढें लाळ घोटण्याचा प्रयत्न करीत आहेत! मला आतांपर्यंत किती लोकांनीं पत्रं धाडून त्यांत माझ्या सौंदर्याची त्यांनीं स्तुति केली असेल व अनेक मुलथापांही दिल्या असतील; पण मी आपलं मन कसं घट्ट करून कोणाच्याही नादीं मी लागलें नाहीं. कारण, पुरुषांची जात येथून तेथून सारी लबाड, अशी माझी पक्की समजूत झाली आहे. त्यांचें भाषणही खडी-साखरेहूनही मधुर असावयाचें! अगोदर यंव करूं आणि त्यंव करीन, अशा थापा द्यावयाच्या. परंतु एकदां त्यांचा हेतु साध्य झाला कीं, संपलें सारं. नंतर त्यांच्या नांवांनीं बायकांनीं जन्मभर खडे फोडिले तरी त्यांना त्याची दाद लागावयाची नाहीं."

यावर अमीर उत्तर काय देणार? परंतु कांहींतरी बोललेंच पाहिजे असें वाटून तो म्हणाला—"पण मी तुला कांहीं बोलतों कां? जरी तूं वाममार्ग पत्करला असतास, तरी मी पश्चात्तापानंतर तुला पावन करून घेतलें असतें."

"या अल्ला! माझं जरा ऐकून घ्यायचं होईल का? हें काय बोलणं बाई! आणि माझं वाकडं पाऊल पडेल असं इकडं वाटतं तरी कसं? इतक्या हीन दर्जाची मी असं आपल्याला वाटतं कां? आपण धनी माझे, आपण म्हणाल तें खरं! पण हा मनाचा थोरपणा व्यर्थ आहे, हें मला चांगलंच कळतं बरं का? मी जर तसं कांहीं केलं असतं, तर तुम्ही पुरुष त्याला बेअब्रू म्हणतां–घराला काळिमा लाविला म्हटलं म्हणून त्याचं प्रायश्चित्त मलाच भोगावयास लाविलं असतं! कदाचित माझा प्राण घेऊनही कोणाची शांति झालीच नसती. आपली अब्रू, आपल्या थोर घराण्याची अब्रू निष्कलंक राखण्यासाठीं तेंच आपण केलं असतं–करविलं असतं. पण ह्यामध्यें मला एक अशी मौज वाटते कीं, बायकांना खरोखर कांहींच किंमत नसतांना, त्या एखाद्या घराण्याला उजेडांत आणितात कशा, आणि

काळोखांत ढकलून देतात तरी कशा? सर्व कृत्य–अब्रू घालवायची किंवा ती साफ करावयाची–ह्याचा संबंध येतो बायकांशीं? तेव्हां पुरुषांच्याकडे ह्यांतलें कांहींच नाहीं! तेव्हां त्यांना मूळची कांहीं अब्रू नसतेच म्हणायची!"

हें ऐकून अमीर मोठ्यानें हसूं लागला. कांहीं वेळानें तो म्हणाला, "इनशाल्ला! झीनाब, तुझी जीभ ती मला एकाद्या तीक्ष्ण सुरीसारखी चालते. एखाद्या शस्त्रवैद्याचें नवें शस्त्र यापेक्षां बरें. ही तुझी जिव्हा आंतल्या क्षताच्याच मुळाशीं हात घालून तें विदारण करून दाखवील. पण अल्लाची माझ्यावर मेहेरबानी अशी कीं, मी असलें कांहीं पातक केलेंच नाहीं, तेव्हां तुझ्या या माऱ्याचा कांहींच उपयोग नाहीं. तो अगदीं व्यर्थ गेला."

झीनाबला ह्या बोलण्याचा अर्थच कळेना. तिची स्थिति फार चमत्कारिक झाली. आजपर्यंत इतकें टाकून कोणी स्त्री आपल्या नवऱ्याला बोलली नसेल; आणि इतकें ती बोलली तरी आपला पति त्याबद्दल रागें न भरतां उलट शांत रहातो हें आहे काय? तिला वाटूं लागलें कीं, अमीराचें मन अगदीं कठीण पाषाणासारखें निष्ठुर झालें असलें पाहिजे; कारण तो म्हणतो कीं, आपण कांहींच पातक केलें नाहीं आणि इतर लोकांपेक्षां आपण किती तरी चांगले आहों; यावरून त्याच्या निलाजरेपणाची व निंद्य वर्तनाची ही अखेरच झाली. नबाबाच्या पायां पडून त्याच्यापुढें पदर पसरून त्याचीं आर्जवें करण्याच्या उद्देशानें ती आज महालांतून इकडे आली, पण आतां तें सर्व विसरून तिचा अभिमान जागृत झाला. पतीची विनंति करण्याचें एकाव बाजूस राहिलें, आणि त्याच्या तोंडावर तिनें त्याची वाटेल तशी निंदा करून यथेच्छ तोंडसुख घेतलें. त्यामुळें आतां मात्र आर्जवें करण्यास तिचें मन घेईना; पुन्हां एकदां अशी बोलण्याची संधि मिळाली, तर त्याचा फायदा घेऊन आपल्या हक्काची नबाबास जाणीव करून दिल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा तिनें निश्चय केला. लग्नाची बायको या नात्यानें वागावयाची जर नबाबाची तयारी नसेल तर पुन्हां कोणत्याहि तऱ्हेनें त्याचीं आर्जवें करावयाचीं नाहींत असें तिच्या मनानें ठरविलें; मग इतर बायका आपली निंदा करोत, आपल्या अंगांत कांहींच करामत नाहीं म्हणून दोष देवोत, किंवा आपल्यांत कांहीं अवगुण असल्यामुळें असें होत आहे म्हणोत. बराच वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं, तेव्हां अमीर

म्हणाला:—" आतां कां बोलत नाहींस ? "

झनिाबनें उत्तर केलें, " काय बोलावं ह्याचाच मी येवढा वेळ विचार करीत होतें. "

" मग अखेर निकाल काय झाला ? "

" दुसरा काय होणार ? आतां पुष्कळ रात्र झाली आहे, तेव्हां ह्मटलं आपलं मुकाट्यानं परत आपल्या तुरुंगांत जाऊन पडावं झालं. " इतकें बोलून ती जाग्यावरून उठून उभीच राहिली.

अमीर ह्मणाला— " हें काय हें ? तुरुंग कां म्हणतेस ? मी तुला तुझ्या महालांत पोहोंचवायला येऊं कां ? "

अमीर तिच्या मागोमाग उठलाच होता, त्याच्याकडे तिनें आतां तोंड फिरविलें, परंतु तिच्या तोंडावर बुरखा असल्यामुळें तिनें जरी डोळे फाडले किंवा ती रागानें लाल झाली आणि तिचे ओंठ थरथर कांपले तरी त्याचा बाहेर नबाबास कांहींच पत्ता लागणें अशक्य होतें. ती संतापानें म्हणाली:— " माझी दर घटकेला अशी थट्टा करून दु:खावर डागण्या देणार तरी किती ? " हे शब्द तिनें हलक्याच पण कर्कश आवाजानें दांतओंठ चावून उच्चारिल्यामुळें तिला फार राग आला आहे असें अमिरानें ओळखिलें. तो ह्मणाला— " तुझ्या बोलण्याचा मला बरोबर अर्थ कळला नाहीं. आजच्या तुझ्या वर्तनाचा उलगडा पडत नाहींसा झाला आहे. मी काय थट्टा केली ह्यांत तें सांगशील कीं नाहीं ? "

" हो हो ! काय पण नाटक चालविलं आहे ! जणूं काय सांबावतारच कीं नाहीं ! त्या तुरुंगांत इतके दिवस डांबून ठेवून वर असं बोलणं शोभतं कां इकडे ? आज तरी या दासीवर कांहीं मेहेरनजर होईल या मोठ्या आशेनें मी येथें आलें होतें. पण इकडं तर हसत हसत असले प्रश्न करून माझ्या दु:खावर डागण्या देऊन माझी बोळवण करावयाची तयारी चालली आहे ! अगदींच कशी बाई सोडून दिली ! "

" मला वाटतें कीं, आज स्वारी इकडे आली ती मुद्दाम भांडण्याच्या हेतूनेंच आली असावी. मी आतांच सांगितलेंना, कीं मी इतर लोकांसारखा नाहीं. स्त्रियांचा योग्य मान राखावयास मी कधीं चुकणार नाहीं. "

" खरंच ग बाई, तें काय विचारावं ! " असें बोलत असतां झीनाब-

लाच हसूं आलें. " म्हटलं, आजपर्यंत कधीं आपल्या बायकोचं मुखावलोकन तरी केलं होतं कां ! "

" आणि आज तरी कुठें तें भाग्य प्राप्त झालें आहे? आपला हा बुरखा"–

" मी मुद्दामच तसं तोंड उघडं केलं नाहीं, हें लक्षांत आलं नाहीं वाटतें ! शिवाय माझ्या प्रश्नाचें हें उत्तर नाहीं. "

अमिराला असलीच बायको पाहिजे होती. ही मुळमुळ रडत बसणारी नसून, तोंडीस तोंड, उत्तरास प्रत्युत्तर देणारी स्त्री आहे असें पाहून त्याला बरें वाटलें. तिनें आपल्याला दासी म्हणवून घेतलें, आपण हुकुम सांगाल तो ऐकेन म्हटलें खरें, पण त्या बोलण्यांत सरळपणा नसून उपरोधिकपणा-चाच भाग असावा असें अमिराला वाटूं लागलें.

तेव्हां पुन: अमीर बोलूं लागला, " माझ्या बोलण्याचा अर्थ समजला नाहींसें दिसतें. बायकांना उठल्या बसल्या हुकूम करणारा व त्यांच्यावर खेकसावणारा मी नसून, आपली बायको आपल्याकडे केव्हां प्रसन्न मुद्रेनें पाहील अशी आशा करीत बसणारा मी आहें. बायकोनें आपलें मुख आपल्या पतीला दाखवावें ही गोष्ट अगदीं योग्य खरी, पण हा माझा हक्क मी गमावून बसलों आहें. यासाठीं ती कृपा मजवर व्हावी म्हणून मीं प्रार्थना केली."

असल्या भाषणानें झनिाब अगदीं मोहून गेली. तिचा आनंद पोटांत मावेना. आपण आपल्या नवऱ्याला शरण यायला लावलें म्हणून तिला एक प्रकारचा गर्व चढला. तिनें आपला बुरखा वर धरिला आणि अत्यंत सुहास्यवदनानें त्याच्याकडे पाहूं लागली. तिच्या त्या लावण्याकडे पहातांच 'या अल्ला !' असें उद्गार अमीराच्या तोंडांतून बाहेर पडले. आपली बायको एवढी सौंदर्यवती असेल अशी अमीराला कल्पनाही नव्हती. आपल्या स्वरूपास पहातांच आपला नवरा मोहित होऊन गेला, या कल्पनेनें झनिाबच्या मुखाला लज्जेनें जास्तच आरक्तपणा आणिला. त्यामुळें तिच्या सौंदर्याच्या मोहकपणाला अधिक मदतच झाली. तिचे हरिणासारखे गरगरीत व मोठे नेत्र, तिच्या काळ्याभोर असून धनुष्याप्रमाणें असलेल्या काळ्याभोर कमानदार भुवया, पोंवळ्याप्रमाणें आरक्त ओष्ठप्रांत, आणि गुलाबपुष्पाप्रमाणें कपोल, हंसासारखी झोंकदार मान आणि स्कंध ह्या सुंदर अवयवांनीं नटलेल्या त्या चारुगात्रीकडे अमीर पहातच राहिला. इतक्यांत झनिाबनें पुनः बुरखा घेतला.

" या अल्ला ! माझी ही काय दृष्टिभूल झाली किंवा मी हें स्वप्नच तर पहात नव्हतों ना ? सुंदरी, खरोखर तुझें लावण्य अनुपमेय आहे. जुम्मा मशि. दीच्या कळसावर खेळणाऱ्या सूर्यकिरणांची कांतिसुद्धां तुझ्यापुढें फिकी पडेल ! मग इतरांची काय कथा ! "

तिच्या सौंदर्याविषयीं अमिरानें काढलेले उद्गार ऐकतांच त्यावर प्रत्युत्तर म्हणून झीनाथ नुसती हसली, आणि लगेच आपलें तोंड फिरवून ती ह्मणाली, " ह्या माझ्या सौंदर्याचा मला कांहीं उपयोग आहे काय ? मसणांत गेलं तें सारं सौंदर्य ! "

अमिरानें तिचा हेतु ओळखिला. त्याला वाटलें कीं, आजपर्यंत ही झनानखान्यांत कोंडून ठेविल्यासारखी आहे, तिच्या दासीशिवाय ती कोणाच्या दृष्टीस पडलेली नाहीं, आणि म्हणून आपल्याला मोकळेपणा नाहीं, हें तिला डाचत असावें. अमिरानें पुनः तिचा हात धरिला आणि पुनः म्हटलें " मी येऊं तुझ्याबरोबर तुला पोहोंचवायला ? "

" पुनः तेंच तेंच कितीदां विचारावं तरी ? पुरुषांना असं बोलण्याची संवयच असत्ये. त्यांच्या बोलण्यांत खरोखर तसाच अर्थ कांहीं नसतो. बायकांना चढवून देण्यासाठीं हें त्यांचं कांहीं तरी भाषण असतें. कांहीं झालं तरी बायकांचा जन्मच गुलामागिरीचा. असो. आतां असा हट्टच धरायचा असला आणि हें नाटकच असं चालवायची परवानगीच हवी असली, तर मी आपल्याला तसं करण्याला परवानगी देत्यें, चला माझ्याबरोबर ! "

अमिरानें तिचा हात सोडिला नाहीं. अमिराचा महाल आणि झनानखाना ह्यांच्यामधील मार्गानें तीं दोघें बरोबरच चालत होतीं. वाटेंत नगीना उभी होती, पण बेगमनें टाळी वाजवितांच त्याचा अर्थ समजून तेथून निघून गेली. वाटेनें दोघेंही पुढें गेलीं, पण कोणीच कांहीं बोललें नाहीं. झनानखान्याच्या मोठ्या दिवाणखान्यांतून आडोसा केलेल्या गच्चीवर येऊन झीनाथच्या खुद्द महालांत दोघें पोहोंचलीं. हा महाल लहानसा पण टुमदार होता. श्रीमंतीचा सर्व देखावा दिसत होता. तेथील खुर्च्या व कोचें ह्या सर्वांवर मखमलीच्या गाद्या व गिर्द्या बसविलेल्या होत्या.

अमीर म्हणाला:—" हा कां महाल तुझा ? ही तुझी रहाण्याची जागा फारच सुरेख आहे. " असें बोलत बोलत अमीरानें आपल्या हातानें तिच्या

तोंडावरील बुरखा दूर केला.

" पण ह्या ऐश्वर्याचें मला काय सुख आहे ? मी जेव्हां कडेवर मूल खेळवीन तेव्हां ह्याचा उपयोग ! " हे शब्द ऐकतांच अमीराच्या मुखावर खिन्नतेचें चिन्ह दिसूं लागलें.

तो विषय बदलण्याच्या मिषानें म्हणाला—" आजपर्यंत तुला एकांतवास भोगावा लागला खरा, पण आजपासून तें सारें संपलें. तूंच आपल्या तोंडानें म्हणालीस ना कीं, माझें वर्तन सामान्यपुरुषांसारखें नाहीं. पण येवढ्यानें काय झालें ? ह्यापेक्षांही जास्त आश्चर्य तुला वाटेल अशा गोष्टी मी करून दाखविणार आहें. मी म्हणतों कीं हा बुरखा मुळींच नाहीं घेतला, तर नाहीं कां चालणार ? शिवाय माझ्या मनांत बाहेर फिरावयास जातांना तुला बरोबर घेऊन जावें असें आलें आहे. "

झीनावनें आनंदानें टाळी वाजविली आणि म्हटलें— " माझे दादा, मीर अजम आपल्याला माहीत आहेतच. विलायतेहून आल्यानंतर पुष्कळ वेळां मला आणि मासाहेबांना ते स्त्रीस्वातंत्र्याची थोरवी सांगत असत. पण मासाहेबांनीं त्याचें कांहींहि न ऐकतां जुन्या चाली सोडिल्या नाहीत. परंतु त्या माझ्या शिकण्याच्या आड मात्र आल्या नाहीत. त्यामुळें जरी मला इंग्रजी चालीरीति ठाऊक नसल्या तरी इंग्रजी भाषेचें थोडेंफार ज्ञान झालें आहे. "

" हं, तें मी शिकवीन सारें. ह्या कामांत आपणच पुढाकार घेऊन लोकांना उदाहरण घालून देऊं म्हणजे झालें. हा पडदा टाकावयाची पुष्कळांची तयारी आहे, पण पुढाकार घेण्याची कोणाची तयारी नसल्यामुळें जो तो दुसऱ्याला पुढें ढकलीत आहे. तेव्हां उभयतां आपणच सर्वांच्यापुढें पाऊल टाकूं. "

एका मेजावर लहानशी रुप्याची घंटा होती; ती बेगमनें वाजवितांच नगीवन धांवत आली. झीनावनें ' काफी ' येवढा शब्द उच्चारतांच ती सलाम करून निघून गेली. तिला आनंद झालेला तिच्या मुखावर स्पष्ट दिसत होता. आपल्या धनिणीच्या सुखासाठीं आपण जी युक्ति सुचविली ती सफळ झाल्याचा प्रत्यक्ष पुरावाच तिच्यापुढें असल्यामुळें तिला फार समाधान झालें होतें. थोड्या वेळांतच काफीचें भांडें घेऊन ती आली; तें झीनावनें हातीं घेतलें आणि नबाबाच्यापुढें एक पेला ठेवून त्यांत ती काफी

ओतली, आणि आपणही नबाबाच्याजवळच उभी राहिली. अमिरानें वर तोंड केलें व झीनावकडे प्रश्नार्थक दृष्टीनें तो पाहूं लागला.

झीनावनें त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलें— " आतां उशीर कां ? पिऊन टाकावी ती काफी. ती निवून गेल्यावर त्याच्यांत लज्जत काय राहील ? " त्यानें हळूच आपल्या हातानें तिच्या कंबरेला विळखा घातला; आणि तिला अगदीं आपल्याजवळ ओढिलें.

तो म्हणाला— " प्रिये, कितीतरी सुंदर आहेस तूं ? "

तिनें लडिवाळपणानें म्हटलें— " पण ती काफी एकदां पिऊन टाकावी गडे ! "

" छे, छे, असें कसें होईल ? अगोदर तूं आपल्यासाठीं एक पेला भरून घे, मग मी घेईन. "

" आपली चाल अशी-- "

" चाल जाऊं दे ती. मी तुला सांगतों ना कीं, ह्या साऱ्या चाली मी बदलून टाकणार आहें म्हणून ? "

तिनें लगेच आपल्यासाठीं एका पेल्यांत काफी ओतली.

अमीरानें काफीचा पेला उचलून घेतला आणि म्हटलें-- " ह्या सहपानानें आपलें प्रेम वृद्धिंगत होवो. " आणि दोघांनीं आपले पेले रिकामे केले.

झीनावच्या महालांतून बाहेर तीन बाजूला तीन लहान लहान गच्च्या होत्या; त्यांवर चंद्राचें स्वच्छ चांदणें पडल्यामुळें त्या विशेषच शोभिवंत दिसत होत्या, आणि नदीच्या अंगच्या गच्चीवरून कांहीं चंद्रकिरण महालांत डोकावीत होते. अमीर जागेवरून उठला आणि त्यानें आपल्या बायकोचा हात धरून तिला बरोबर घेतली आणि दोघें गच्चीवर गेलीं. तो तेथें गेल्यावर म्हणाला " अहाहा ! आजची रात्र फार मजेदार आहे, नाहीं ? "

" होय, मला तर आज जिकडे पहावें तिकडे सौंदर्य फुलून गेलेलें दिसत आहे. " झीनाव अगदीं त्याच्या अंगाला चिकटून उभी राहून म्हणाली, " पण ह्या सर्व आनंदांत आतां एकच उणीव राहिली आहे. " पुन: तिनें आपलें पहिलें पालुपद काढिलें, तेव्हां अमीर कावराबावरा होऊन म्हणाला— " मी आतां जातों, मी आज अगदीं थकून गेलों आहें. "

" पुन: चरणधूळ केव्हां लागणार ? " खिन्न स्वरानें झीनाब म्हणाली.

" उद्यां तूं माझ्याकडे आधीं ये आणि मग मी तुझ्याबरोबर इकडे येईन. आतां यापुढें हा अमीर तुला कांहीं कमी पडूं देणार नाहीं. "

इतकें बोलून त्यानें तिचें चुंबन घेतलें आणि आपल्या निवासस्थानाकडे तो निघून गेला.

# प्रकरण १७ वें.

## क्विन्सीचा घोटाळा; डनबारचा उतावीळपणा !

फकिराच्या तेथला प्रयोग आटपल्यावर डनबार खाणावळींत परत गेला. तो इतका लपतछपत चोरट्यासारखा चालला होता कीं, त्या वेळेस त्याला कोणीं पाहिलें असतें तर हा तुरुंगांतून पळून आलेला काळ्या पाण्याच्या शिक्षेचा गुन्हेगार तर नव्हे ? अशी शंका त्याला आला असती. खाणावळीच्या आवाराच्या फाटकापाशीं आल्यावर तो एकदम आंत गेला नाहीं. दारापाशीं कोणीं आहे कीं काय, किंवा क्विन्सी आपल्यासाठीं वाट पहात बसली असेल काय, म्हणून त्यानें डोकडोकावून पाहिलें आणि थोडी सावली पडली होती तेथें चोरासारखा उभा राहिला. कोणी जवळपास फिरकत नाहीं असें पाहून तो पळतच आपल्या खोलींत थेट गेला. आंत जाऊन एका खुर्चीवर बसल्यावर तो आपल्याशीं म्हणाला— " विजय, विजय ! " नंतर तो सर्व खोलीभर बारकाईनें पाहूं लागला. " आतांच जर कां त्या फेरलच्या पोरीची–छे छे, आतां असें कां? प्रिया क्विन्सीची–गांठ पडली असती तर फाजितीची वेळ होती. इथल्या सर्व गोष्टींची अगोदर पूर्ण माहिती घेतली पाहिजे. आज रात्रभर हेंच काम केलें पाहिजे. येथील सर्व कागदपत्र पाहून त्यांची सर्व माहिती करून घेण्यासाठीं या पेट्या धुंडाळल्या पाहिजेत आणि थोडीशी नाटकाची तालीम किंवा कवाईतही केली पाहिजे. डनबारची हुबेहूब नक्कल साधली तर बरें, नाहींतर सगळेंच मुसळ केरांत जायचें. एकदां क्विन्सीचें माझ्याशीं लग्न लागलें आणि ह्या देहानें कां होईना, त्या सुंदर पुष्पाचा बहार लुटायला सांपडला म्हणजे झालें. मग पुढें कांहीं होवो. त्याची मला

फिकीर नाहीं. मग मनास वाटेल तेव्हां अमीराचा अमीर आणि डनबारचा पूर्ववत् डनबार झाला तर मला कांहीं वाटणार नाहीं; मला पुनः तें पुनः पाहिजेच आहे. पण माझा नोकर गेला कुठें ! " इतक्यांत प्यारीलाल खोलींत आला आणि नित्याप्रमाणें त्याच्या पायाजवळ आंग टाकून कुत्र्यासारखा पसरून पडला. त्याला पाहतांच डनबार म्हणाला-- " अरे, पण हा कोण ? "

त्याच्या पायाला प्यारीलालचा स्पर्श होतांच त्यानें त्याला लाथेनें उडवून देऊन म्हटलें: " चल जा, चालता हो येथून. नीघ अगोदर. तुम कौन सैतान हैय ? या अल्ला ! पण इतका फाजीलपणा काय कामाचा !"

लाथ मिळतांच प्यारीलाल चटकन उठून उभा राहिला. तो भ्याला आहे असें म्हणण्यासारखें त्याच्या तोंडावरून दिसेना; पण तो अगदीं गोंधळून गेला. आजपर्यंत डनबारनें त्याला असें कधींही वागविलें नव्हतें. इतक्यांत त्याच्या मागून खदखद हंसल्याचा आवाज प्यारीलालच्या कानीं आला आणि म्हणून मागें वळून पहातो तों दारांत खाबूर उभा होता. खाबूरला हें हसूं एकाएकीं आलें होतें, पण तितक्यांत त्यानें तें दाबिलें आणि तो नेहमींप्रमाणें शांत, स्वस्थ व अदबीनें उभा राहिलेला दिसला.

तो म्हणाला:-" भली झाली. असेंच, आजच्यासारखेंच ह्याला दररोज पाहिजे. हुजूरनीं चांगली खोड मोडली गुलामाची. फार शेफारून गेलें होतें हें कारटें. "

डनबार म्हणाला:-" खरेंच कीं काय ? हें बघ, पण तुझें नांव काय ? आठवेना कीं-जा रे पोरा इथून. आजपासून पुनः माझ्या खोलींत आलास तर खबरदार ! जा आपल्या घरीं."

हें ऐकतांच खाबूरचा आनंद पोटांत मावेना. तो हसणार होता, पण त्यानें तें हसूं कसें तरी दाबिलें. हें पाहून प्यारीलालच्या अंगाचा संताप झाला. तो त्या रागाच्या आवेशानें थरथर कापूं लागला, आणि म्हणाला:-" घरीं ? मला घर आहे कोठें ? तुम्हांला तर माझी स्थिति ठाऊक होती ! मग मला नदींतून काढलेंच कशाला अगोदर ? "

" हरामजाद्या ! तोंड आटपून बोल ! इतका बेताल होऊं नको ! अदबी न ठेवतां कांहीं तरी बोलायचें असेल तर तोंड बंद कर ! मी तुझा प्राण वांच-

विला ! अरेच्या खरेंच ! मला आठवलें. मीं केला तो गाढवपणा केला. बरें पण, आतां काय त्याचें ? आतां मी तुझ्या आड येणार नाहीं. जा, पुनः आतां जाऊन जीव दे पाहिजे तर ! मी आपला जीव धोक्यांत घालून तुला काढावयाला आतां यायचाच नाहीं, हें पक्कें समजून ठेव ! ज्याव इद-रसे; ज्याव, अब्बी ज्याव ! "

प्यारीलाल थोडा वेळ तसाच स्तब्ध उभा होता. त्याचे डोळे डनबारवर खिळून गेल्यासारखे झाले होते. जणूं काय डनबारच्या देहाच्या आंत शिरून पहाण्याचा तो प्रयत्न करीत होता. क्षणभरानें त्यानें एकदम दचकल्यासारखें केलें, आणि त्याचें तोंड खरकन् उतरलें. तो खोलींतून पळतच बाहेर गेला आणि रडत ओरडत ह्मणाला–" हाय हाय ! माझे धनीसाहेब कोठें गेले हो ! माझ्या धन्याला तूं काय केलेंस ? "

खाबूरलासुद्धां डनबारचें वर्तन चमत्कारिक वाटलें. परंतु त्यानें त्याचा आपल्या मनाशीं असा मेळ घातला कीं, " आज बहुतकरून हुजूरनीं अधिक दारू झोंकली असली पाहिजे; आणि त्यांत प्यारीलाल शुद्ध वेडाच आहे. हें एक झालें तें बरेंच झालें. तें पोर अगोदरच अर्धवट वेडें होतें, त्यापेक्षां आतां हें बरें झालें कीं तो पुरा वेडा झाला. त्यामुळें त्याला कोणी असें मोकळें हिंडूं न देतां पकडून खोलींत कोंडून टाकतील, म्हणजे औषधावांचून खोकला गेला ! "

डनबार म्हणाला–" अरे खाबूर, हें बघ, आतां मला भूक लागली आहे, तेवढें जेवण आणून दे आणि मग तूं जा; तुझी मला जरूर नाहीं. "

" रात्रीपुरतीच ना हुजूर ? "

" नाहीं नाहीं ! मूर्ख कुठला ! तुझी कायमचीच जरूर नाहीं. तूं अगदीं निरुपयोगी, सुस्त, निकामी आहेस. मी दुसरा नोकर ठेवणार आहें, सम-जलास ? "

" अल्लाची इच्छा ! "

हे खाबूरचे शब्द ऐकतांच डनबार जरा चरकला, आणि रागानें ह्मणाला, " कोणाची इच्छा म्हणतोस रे ? माझी इच्छा ! माझ्यासमोर अल्लाचें नांव काढूं नको; "

खाबूरनें नुसता सलाम केला. तो कांहीं वेळानें परत येऊन म्हणाला—

" जेवणाची तयारी झाली आहे केव्हांची."

" गाढवा, आहे कोठें ती तयारी ?"

" जेवावयाच्या दिवाणखान्यांत; हुजूर !"

" मला माझें जेवण इथें पाहिजे !"

" आपण आल्याबरोबर आपल्याला बोलाविलें आहे, असा निरोप 'मिशी' साहेबांकडून आला आहे."

" अरे मरूं दे रे ती ! छे छे. अरे खाबूर, 'मिशी' ला सांग कीं, मी अगदीं दमून गेलों आहें, आणि रात्रभर स्वस्थ निजून राहणार आहें. मला कोणी उगीच त्रास द्यायला येऊं नका, आणि खाबूर, हें बघ, तूं नीट वागशील तर मी तुला सोडून देणार नाहीं; पण माझ्याबद्दल कोणी कांहीं विचारलें तर तूं कांहीं सांगत जाऊं नकोस. तूं अगदीं गप्प बसत जा. सगळ्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें मी देईन. तूं कांहीं कारभार करीत जाऊं नको. जा आतां."

खाबूरनें सांगितलेला डनबारचा निरोप ऐकून कीन्सीचें मन फार अस्वस्थ झालें. तिनें खाबूरला खोदखोदून विचारलें, परंतु खाबूर जास्त कांहींच बोलेना. तो म्हणे कीं, डनबारसाहेब अगदीं दमून गेले आहेत. ते निजले-सुद्धां. त्यांनीं जेवणसुद्धां खोलींत उरकलें."

आज डनबारला काय काय कष्ट भोगावे लागले असतील, ह्याबद्दल नानातऱ्हेच्या कल्पना कीन्सी करूं लागली, आणि ती अगदीं घाबरून गेली. तिच्या ह्या अधीरपणाबद्दल म्हाताऱ्यानें तिची थट्टा केली, आणि डनबारचा कैवार घेऊन तो म्हणाला:—" आज त्याला बरेच मानसिक श्रम पडले असतील, आणि त्यामुळें तो अगदीं थकून गेला असेल. उद्यां सकाळीं तो चांगला बरा होईल. उगीच काळजी कां करत्येस ?"

कीन्सी म्हणाली--" असं कशावरून ? कदाचित् असं असेल कीं, कालचा प्रयोगच बरोबर झाला नसेल. आणि म्हणून आपली फजिती काय सांगावी म्हणून ही आजची टाळाटाळी असेल."

फरेल म्हतारा म्हणाला-" छे ग ! तसें होणार नाहीं. प्रयोग फसो कीं बरोबर होवो, तुला सांगितल्यावांचून चालीं राहणार नाहीं. उघड केलें नाहीं तर त्यावर कोठें तुमचा विवाह अवलंबून आहे ! तो लपवून काय म्हणून ठेवील ? पण कदाचित् त्यानें तें तसेंच दाबून ठेविलें तर त्यावांचून तुमच्या

लग्नाचें कांहीं अडलेलें नाहीं ना ? कालच्या प्रयोगाच्या निकालावरून तुमचें लग्न ठरलें आहे त्यांत फरक होणार आहे थोडाच ! पण कालचा प्रयोग फसला असेल असें माझी मनोदेवता कांहीं सांगत नाहीं. त्या फकिरानें त्याची जास्त वेळ समाधि लाविली असेल, आणि त्या श्रमामुळें डनबार अगदीं थकून गेला असेल, हेंच खरें ! "

त्या रात्रीं किती वेळ तरी क्वीन्सीला झोंप लागेना. डनबारसंबंधाच्या नाना प्रकारच्या विचारांनीं तिच्या मनांत अगदीं काहूर करून दिलें होतें. एकदां तिला वाटे कीं, डनबार मला टाकून जाईल काय ? पुनः मनांत येई कीं तसें होणार नाहीं. होतां होतां मध्यरात्र झाली. कोणी तरी दारावर हळूच टिचकी वाजवीत आहे, असा तिला भास झाला. पुनः तसा आवाज झाला, म्हणून ती कान देऊन ऐकूं लागली. तेव्हां " मिशी, मिशी " अशी हांक तिनें ऐकली. तो शब्द—आवाज तिनें तात्काळ ओळखिला. तिच्या अंगावर शहारे आले; एकदम भीति वाटून तिचे पाय लटपटूं लागले. ती तशीच घडधडत अंथरुणावरून उठली. तिला वाटलें कीं, डनबारची प्रकृति बिघडल्यामुळें त्यानें प्यारीलालला आपल्याला बोलवायला पाठविलें असावें ! तिनें खिडकी उघडून बाहेर पाहिलें, आणि प्यारीलालला हाक मारिली.

ती घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली—" सांग काय तें लवकर ! कांहीं कमी-जास्त आहे कां रे ? प्रकृति बिघडली आहे होय ? मी बाबांना उठवितें आणि वरचा कोट घालून बाहेर येतें; थांब. "

'तुम्ही म्हणतां तसें कांहीं नाहीं' असें प्यारीलालनें मानेनें खुणावून कळविलें. तो पुढें म्हणूं लागला, " छे छे;...हुजूर चांगले आहेत; त्यांना कांहीं एक झालें नाहीं. "

" ते हुजूर म्हणजे कोण ? असें कां म्हणतोस हें ? "

" कारण—कारण ते माझे धनी नव्हेत. माझें नीट ऐकून घ्या मिशी-साहेब. मी आतां इथून जाणार. त्या माणसानें मला लाथ मारली आणि ' जा, काळें कर, मर, ' असें म्हटलें. "

" हें रे काय प्यारीलाल ? तूंच तसं कांहीं तरी केलं असशील. तूं फार त्रास दिला असशील, खोड्या केल्या असशील. शिवाय आज हुजूरची स्वारी दमून आली असल्यामुळें तुझ्या खोड्यांचीं गऱ्हाणीं ऐकून संताप आला

असेल. बेटा, पण माझं ऐक; तूं जाऊं नको. "

प्यारीलाल पुन: मानेनें नाहीं नाहीं म्हणतच होता. तो पुन: बोलूं लागला:– " माझें बोलणें आपल्याला समजायचें नाहीं. असल्या गोष्टी तुमच्यासारख्या इंग्रज बायांच्या डोक्यांत शिरावयाच्या नाहींत. माझ्यानें आतां येथें रहावणार नाहीं. त्यानें मला लाथ मारली आणि सांगितलें कीं, 'नीघ, जा इथून; नदींत उडी घे आणि जीव दे !' शिवाय हा म्हणतो कीं, मीं तुला काढिलें हीच चूक केली. पण माझा प्राण वांचविणारा तो हा मुळींच नव्हे. माझा धनी निराळाच आहे. "

" प्यारीलाल, हात् वेड्या ! काय भलभलतं बोलतोस हें ! तूं शुद्धीवर नाहींस, तुझें डोकं फिरलं आहे खास. पोरा, हें काय असं बडबडतोस ? हा माणूस आणि तो माणूस म्हणजे रे काय ? म्हणजे डनबारसाहेब ते डनबार-साहेब नव्हेत ? असं काय बोलावं बरें ! "

" बसबस ! तेंच तेंच. तुम्ही बोललांत तसेंच झालें आहे अगदीं. पण तुम्ही आहांत इंग्रज, आणि त्यांतून बाई माणूस. तुह्मांला ही माझी गोष्ट नीट समजावयाची नाहीं. आमच्या ह्या हिंदुस्थानतल्या लोकांना ह्या गोष्टी तेव्हांच समजतात. सैतान किंवा दुष्ट पिशाच्च बाईला किंवा पुरुषाला कसें पछाडतें, हें इकडच्या लोकांना कळतें. त्याप्रमाणें कोणी तरी पिशाच्चानें हुजूरच्या कुडींत प्रवेश केला आहे खचित, खचित ! मी आतां जातों बेगम कुसुंबीकडे, आणि तिला सांगतों कीं आतां कांहीं तरी उपाय कर म्हणून."

" अरेरे, काय पोराची दशा झाली ही ! बाळ, जा तूं आतां. जाऊन नीज जा. खचित खचित, तुझीच प्रकृति बरोबर नाहीं ! तुला कांहीं तरी झालं आहे. ती बेगम काय उपाय करणार ? तिच्या हातांत काय आहे ? शिवाय तिच्याकडे जाणार कसा तूं ? ती किती लांब ! ती आपल्या जहागिरीवर. थांब, मीच तुला आंत आणून थोपटून निजवितें."

प्यारीलालनें तोंड फिरविलें आणि पूर्ववत बोलूं लागला, " मी म्हटलें नाहीं, कीं, तुम्हांला यांतलि कांहीं एक समजणार नाहीं ! मी एकदां स्वप्नां-तच काश्मीरला गेलों होतों, आणि तिथें मला एका फकिराचें दर्शन झालें. त्यानें आपल्या हातांतली आंगठी मजजवळ दिली. ती फार नक्षीची व चमत्कारिक होती. तो अवलिया मला म्हणाला कीं, ही अंगठी नेऊन माझी

बहीण कुसुंबी आहे तिला दे. झालें. ह्यानंतर एक वर्ष गेल्यावर त्या कुसुंबी बेगमची माझी गांठ पडली आणि पहातों तो तिच्या बोटांत ती आंगठी होती. तेव्हां ही आंगठी कशी आली, म्हणून त्यांना मी विचारिलें. त्या म्हणाल्या, कीं, माझ्या भाईनें मला दिली. बेगमसाहेब म्हणाल्या कीं, माझ्या बंधूंनीं मला बजाविलें आहे कीं, कांहीं संकट आलें तर ह्या अंगठीची खूण पाठवून दे म्हणजे झालें. आतां बाईसाहेब, असें पहा कीं, तीच आंगठी माझ्या हुजूर डनबारच्या बोटांत आहे !"

" काय म्हणालास ? ती आंगठी! ती सुंदर, चमत्कारिक, सोन्याची आहे तीच ना ? "

" होय तीच. तिच्या मधल्या खड्यावर कांहीं गुप्त लिपीत अक्षरें खोदलेलीं आहेत तिच्यावर."

" ती बेगमनेंच हुजूरला दिली!"

हें एक बरेंच झालें म्हणावयाचें! मी जातों आतां. बाईसाहेब, मीच ह्या सगळ्या दुःखाचें मूळ आहे. माझ्यामुळें माझ्या धनीसाहेबांवर संकट आलें आहे. त्यांना शिक्षाच ही. खरोखर, माझा प्राण त्यांनीं वांचविला हीच चूक केली! त्यांनीं तसें करायला नको होतें. माझ्या दुर्दैवाच्यामध्यें ते आडवे आले, म्हणून त्यांना हें दुःख सोसावें लागत आहे. पण आतां माझी पाळी आली असून, मीच त्यांना सोडवीन; आणि मग खुशाल प्राण सोडीन. गोमतीनदीच्या पाण्यावर माझा देह फुगून तरंगतांना तुमच्या दृष्टीस पडला म्हणजे समजा कीं, प्यारीलालनें आपल्या म्हणण्याप्रमाणें केलें असलें पाहिजे. परंतु तुम्हांला ही गोष्ट समजण्यापूर्वींच हा प्यारीलाल आपल्या टाम्याकडे जाऊन भेटला असेल!"

क्वीन्सी त्याला आणखी कांहीं सांगून पहाणार होती, परंतु प्यारीलाल थांबला नाहीं. त्यानें व्हरंड्यांतून खालीं ताडकन् उडी मारली आणि काळोखांत तो दिसेनासा झाला!

क्वीन्सीनें वरचा पोकळ कोट घेतला आणि तो घालून प्यारीलालला पहाण्यासाठीं ती बाहेर आली. हा सर्व कांहींतरी वेडयासारखें बोलत होता असें तिला वाटणें साहजिक होतें. कारण, त्याच्या बोलण्यांत कांहींच मेळ नव्हता. तिनें खालच्या पटांगणांत सगळीकडे हिंडून कोपरान् कोपरा शोधिला, पण

प्यारीलाल सांपडला नाहीं. थंडी फार पडली होती, तिनें तिला हुडहुडी भरली. तरी ती तशीच रस्त्यापर्यंत गेली. चोहींकडे अगदीं काळोख पडला होता. तरी तिनें प्यारीलालच्या नांवानें एकदोन हांका मारिल्या, पण कांहीं उत्तर मिळालें नाहीं; तेव्हां ती लागलीच घाबऱ्या घाबऱ्या परत आपल्या खोलीकडे आली. ह्या वेळीं जर आपल्याला कोणी पाहिलें असेल, आपली हाक कोणाच्या कानीं गेली असेल, तर तो खचित आपल्याला नांवें ठेवील; आणि असल्या रात्रीच्या पोषाखांत आपण रस्त्यापर्यंत गेलों होतों हें जर समजलें तर लोक काय म्हणतील ? याची तिला भीति वाटत होती. ती आपल्या खोलीच्या दारापर्यंत आली, पण तिला आंत जाववेना. तिच्या मनांत असें आलें, कीं, 'एकदां डनबारचा समाचार घेऊन आल्यें तर काय होईल ? ते तर दमले असतील खरेच; परतु जर कां प्यारीलालचं कांहीं बरंवाईट झालं, तर तूं वेळेवरच मला कां कळविलं नाहींस, असं सुद्धां म्हणणं होईल. त्यांना राग येईल. मी निजलों होतों तर मला उठवावयाचं होतं म्हणतील." असें मनांत येऊन ती डनबारच्या खालीपर्यंत गेली आणि दार उघडलें तरी त्यांत बिघडणार नाहीं असें ठरवून ती पाउलें टाकीत होती.ही अपरात्रीची वेळ, या वेळीं आपल्याला डनबारच्या खोलीकडे जातांना दुसऱ्या कोणीं पाहिलें तर काय म्हणेल, ह्याची भीति तिच्या मनाला शिवली नाहीं. उलट ह्या वेळीं प्यारीलालची गोष्ट कळविली तर डनबार आपणास शाबासकी देईल असे ती मनांत मांडे खात होती. तिनें डनबारच्या दारापाशीं गेल्यावर पडदा वर केला. तों दार उघडेंच होतें. आणि तेथें पुढील प्रकार पाहून ती तेथेंच थबकली. डनबार कांहीं निजलेला नव्हता, त्यानें अंथरुणावर आंग टाकल्याचेंही चिन्ह नव्हतें, इतकेंच नव्हे तर निजण्याची तयारी म्हणून कपडे काढावयाचे, ते सुद्धां त्याच्या अंगावर तसेच होते. क्रीन्सीला त्याचें नवल वाटलें आणि ती दारांतच उभी राहिली. डनबारचें लक्ष तिच्याकडे गेलें नाहीं. तो आपल्या कामांत अगदीं गढून गेला होता तो पेट्या उघडी, पत्रें फोडून वाची, आणि मधून मधून आपल्या रोजनिशींत कांहीं टिपणें करून घेई. इतका वेळ आपण उभे राहिलों तरी तो आपल्याकडे बघत नाहीं, असें पाहून तिनें त्याला हाक मारिली नाहीं. ती तशीच हळूच परत निघाली आणि आपल्या खोलींत आली, आणि बिछान्यावर आंग

टाकून मनमुराद रडली व म्हणूं लागली, " काय लबाडी पहा; मला खोटंच सांगितलं कीं, मी दमलों आहें म्हणून, नी आतां माझ्याकडे येऊं नको, असा खोटाच निरोप धाडला अं ! ह्यांत कांहीं तरी लबाडी आहे. कांहीं तरी गुप्त गोष्ट माझ्यापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न आहे. पण मला कितीदां तरी आपणच होऊन म्हटलं असेल कीं, आपल्या दोघांत कांहीं कोणी लपवून ठेवायचं नाहीं बरं ! तेव्हां आजपर्यंत आपण जी मूर्ति आपल्या हृत्पटलावर खोदून ठेविली आहे, ती तशी नाहीं तर मग ? त्याची खरी परीक्षा आपल्याला झालीच नाहीं म्हणायची ? ही कृति एखाद्या लफंग्याप्रमाणें आज होत आहे असं समजलं पाहिजे, दुसरं काय ? "

असल्या विचारांची मालिका तिच्या मनांत उचंबळूं लागली, आणि त्या मुळें तिचें हृदय शतशः विदीर्ण झालें! ती किती वेळ तशी रडत राहिली ! अखेर रडतां रडतां ती दमली; तेव्हां तिचे विचार जरा शांत झाले. तेव्हां ती पुन: आपल्याशीं बोलूं लागली, " कदाचित माझ्या समजुतींतच कांहीं चूक झाली असली तर ? आज जें चार्लीचं वर्तन गैर म्हणून दिसत आहे, त्याचं खरोखर योग्य कारण असलं तर मग कसं ? तसंच कांहीं तरी असलं पाहिजे. " असल्या प्रकारें विचाराला निराळी दिशा लागल्यानंतर तिची थोडीशी समजूत झाली, आणि त्यांतच तिचा डोळा लागला.

दुसऱ्या दिवशीं डनबार बराच उशिरा उठला आणि त्यानें आपल्या खोलींतच न्याहारी मागवून खाल्ली; नंतर खाबूरला हाक मारून विचारिलें कीं, " जा, पहा क्वीन्सी बाहेर व्हरंड्यांत आली आहे कीं नाहीं ? " तो लगेंच हुजुरला ह्मणाला, " हां जी, हुजूर, त्या बाहेर येऊन पुस्तक वाचीत बसल्या आहेत. "

हें ऐकतांच डनबार खोलींतून बाहेर निघाला. त्याला पाहतांच क्वीन्सीनें पुस्तक मिटलें आणि हास्यमुख करून ती त्याच्याकडे पाहूं लागली. डनबार तिच्याजवळ गेला आणि लाडानें तिच्या गालावर टिचकी वाजवून म्हणूं लागला, " आज आमच्या गुलाबाचा रंग बदलून त्याला पांडुरता कां आली आहे ही ? असल्या विशोभित रंगानें आमच्या परीची शोभा बिघडते सारी काल रात्रीं चांगली स्वस्थ झोंप लागली नाहीं वाटतें ? "

" होय, तसंच खरं. कालरात्रीं माझी फार वेळां झोंपमोड झाली; आणि

झालीं, आपलं कसं?''

"मी तर बुवा अगदीं थकून गेलों होतों. मला फार हळहळ वाटली. तुझी भेट घेतल्यावांचून रहावेना, पण काय करूं? माझें मस्तक अगदीं जड झालें; मन अगदीं सुस्त झालें; आणि डोळे आपोआप मिटूं लागले; मग कांहीं इलाज चालेना–निजलों लागलाच!''

हें सर्व खोटें आहे वगैरे पुष्कळ बोलावें, असें क्रीन्सीच्या मनांत आलें; पण तिनें तें तसेंच दाबलें, आणि अगदीं ओंठापाशीं आलेले शब्द तिनें आवरून घेतले. ती मनांत म्हणाली—"हा तर अगदीं शुद्ध खोटें बोलूं लागला! बरं, पण आतां दुसरी गोष्ट काढून पाहूं—'' आणि ती बोलूं लागली—"काल किनई, प्यारीलाल भलत्याच वेळीं अपरात्रीं माझ्याकडे आला होता. तो अगदीं वेड्यासारखं करूं लागला, म्हणून त्याला मी धरायला गेलें तों तो पळून गेला! त्याला शोधण्यासाठीं मी खोलीच्या बाहेर पडलें, पण तो माझ्या हातीं लागला नाहीं. तेव्हां हें सारं सांगण्यासाठीं मी आपल्या खोलीपर्यंत आल्यें आणि पाहिलें तों स्वारी तर जागीच होती!'' अगदीं मुद्यावर पकडल्यामुळें काय उत्तर द्यावें हें डनबारला सुचेना. तेव्हां हें सर्व हंसण्याखालीं लपविण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. तो म्हणाला— "तुझ्या बोलण्याचा रोंख मी समजलों. मीं प्रथम सांगितलें तें अगदीं खोटें असेंच तुला म्हणायचें कीं नाहीं? झोंपेनें अगदीं गांगरून गेलों होतों, असें मी तुला म्हणालों तें–आणि तूं पाहिलेंस तें–हीं दोन अगदीं विरुद्ध दिसतात, होय ना? पण अगोदर मला असें सांग कीं, तूं माझ्या खोलीपाशीं आली होतीस, तेव्हां किती वाजले असतील!''

"नक्की कांहीं मीं पाहिलें नाहीं; पण त्या वेळीं एकाचा सुमार असावा.''

"हंः तर जुळलेंच सारें! त्याच्या अगोदर एकतास मी जागा झालों होतों. मी आलों तसाच लगेच निजलों. अंगावरचे कपडे उतरून ठेवण्याचीसुद्धां मला फुरसत झाली नाहीं. तो जों निजलों तों मध्यरात्रीला झोंप संपली आणि मग कांहीं केल्या झोंप येईना. काय उपाय करावा तें सुचेना. मला कल्पनाच नाहीं कीं, तूं इतक्या रात्रीं जागी असशील? कांहीं तरी करावयाचें म्हणून मी आपले सारे मागचे कागदपत्र जुळवून नीट लावीत बसलों. कांहीं निरुपयोगी कागद फाडून टाकले; कांहींची रोजनिशींत नोंद ठेवावयाची

होती, ती लिहिली. त्यात वेळीं तूं आली असशील. पुढें मी तसाच पहाटे-चार बांजेपर्यंत तळमळत जागाच होतों, आणि अगदीं कंटाळून कंटाळून मग पुनः झोंप लागली. ”

हें ऐकून, क्रीन्सीला थोडें बरें वाटलें. तिच्या तोंडावर कांहीं टवटवी आली आणि डनबारबद्दल आपण आपला भलताच ग्रह करून घेतला होता म्हणून तिला थोडें वाईटही वाटलें. आतांच्या या डनबारच्या बोलण्यावरून त्याच्या खरेपणाबद्दल मत बदलण्यास कांहीं कारण नाहीं, असें लक्षांत येऊन तिला थोडें समाधान झालें. कांहीं वेळानें तिनें डनबारला विचारिलें—“ काल त्या प्यारीलालनें इतकं काय केलं होतं? तो रडत रडत माझ्याकडे येऊन म्हणत होता, तसं खरंच का त्याला लाथेनं उडविलं? मर जा, उडी घे नदींत–असं कां त्याला सांगितलं?”

हें ऐकतांच डनबारच्या पोटांत धस्स झालें! पण लगेंच त्यानें गंभीर मुद्रा धारण केली आणि सर्व लपविण्याच्या उद्देशानें बोलण्यास आरंभ केला. तो म्हणालाः– “ काय ह्मणत्येस ? तें पोर अगदीं निव्वळ खोटें सांगत होतें तुझ्याजवळ हें खरें कीं, मी त्याला खोलींतून बाहेर जा, असें सांगितलें. तूं समक्षच पाहिलेंसना, तो कसा अगदीं वेड्यासारखें करूं लागला होता तो. वेडेंच तें, तेव्हां मीं त्याला म्हटलें कीं, ह्यापेक्षां नदींत जीव दिला तर काय वाईट ? ”

“ हें काय बरें चालीं, असं कां सांगायचं ? ”

डनबारनें तिच्या कंबरेला हाताचा विळखा घालून तिला जवळ ओढली आणि तिचें चुंबन घेतलें. त्या वेळीं क्रिन्सीला कसेंसेंच झालें. ती म्हणाली–“ इश्श, हें काय असं करणं ? सगळीं माणसं इकडून तिकडून हिंडतात, काय ह्मणतील ते ? प्रेम झालं म्हणून कांहीं मर्यादा पाहिजेच. घरांत वाटेल तें करावं, पण अशा ठिकाणीं हें नको बाई ! ”

“ मला काय लोकांशीं करावयाचें आहे ? इथें आणखी ह्यापेक्षां मंडळींची गर्दी जमली असली तरी मी असेच मुके घेणार, सोडावयाचा नाहीं.”

“ पण मी घेऊं देणार नाहीं. आजच प्रेमाला इतका ऊत कशानं आला ? आजच्यासारखा, इतक्या उघड्या जागेंत हा प्रकार पूर्वी कधीं झाला होता काय ? आपणच सांगावं ! ”

" नाहीं खरें. पण माझें प्रेम आतां क्षणोक्षणीं वाढत चाललें आहे! आपलें लग्न केव्हां एकदां लागेल, असें मला झालें आहे. उद्यां कां होईना?"

".काय बोलणं हें!" इतकें क्लेन्सी बोलली आणि मोठ्यानें हंसूं लागली, " चार्ली, इतकं काय झालं हें? सगळंच कसं विसरायचं तें. लग्नाच्या अगोदरचा सर्व विधि, त्याची परवानगी वगैरे नको कां मिळायला? त्याला कमींत कमी तीन आठवडे तरी लागतील."

" छे बुवा! इतके दिवस आपल्याला नाहीं आतां दम. आपण मुद्दाम परवानगी काढूं मग तर झालें कीं नाहीं?"

" तें नको बाई. असा मुद्दाम घाईनं परवाना काढून लग्न लावावयाचं मला नाहीं आवडत. आणि बाबांना तर मुळींच आवडणार नाहीं. अशा गडबडीनं लग्नविधि उरकून घेणं म्हणजे कांहीं तरी काळाबेरा प्रकार अगोदर झालेला असेल, तो छपविण्याचा दोन्हीकडच्या माणसांचा विचार झाला असावा, असं सहजच लोकांच्या मनांत येतं. फारच गडबड केली तर पुढच्या रविवारीं प्रथमची शपथ घेतां येईल. पण अगोदर कालच्या प्रयोगाचं काय झालं तें मला सांगायचं ना? कसं काय झालं? प्रयोग सगळा नीट झाला ना?"

" अग, नीट म्हणून काय विचारतेस? अगदीं सगळा व्हावा तसा झाला. माझी खात्री झाली आणि नबाबाचीही झाली."

" पण सगळ सांगावं मला. कसं झालं, काय झालं?"

" हात्याच्या! त्यांत काय आहे? मागच्या सारखाच प्रयोग हा. मला वाटतें कीं, त्या वेळची सारी हकीगत मीं तुला सांगितली होती एकदां."

" होय. पण त्या वेळेला म्हणणं होतं कीं, माझा संशय राहिला आहे अजून. त्या फकिरानं त्या वेळीं फक्त वशीकरणाचा प्रयोग करून झोंप आणली होती येवढंच."

" होय, तेंच खरें. कालचा प्रयोगसुद्धां तसलाच होता. त्यांतल्या त्यांत मी आपण होऊन थोडीशी करामत करून पाहिली. माझ्या देहांतून माझा आत्मा बाहेर निघाल्याबरोबर मी तुझ्याकडे धांवत आलों. तूं बाबांच्या बरोबरच होतीस; बागेंत बसलां होतां दोघें. तुझे ओंठ हालत होते तें मी

पाहिले, पण त्यांतून निघणारे शब्द मला ऐकूं येत नव्हते. त्या दुसऱ्या लोकांत शब्दाचें कारणच पडत नाहीं, आवाज करावा लागत नाहीं. सर्व गोष्टी मानसिक तारायंत्रानें समजतात. त्याच स्थितींत मीं तुझें चुंबनही घेतलें, तेव्हां तूं आपल्या हातानें गालावर हात फिरवून तें पुसून टाकलेंस!"

"इश्श! हें काय चार्ली?" क्लीन्सी म्हणाली. ह्या वेळीं लज्जेनें तिच्या मुखावर आपलें साम्राज्य पसरल्यामुळें ती फारच मनमोहक दिसूं लागली. ती म्हणाली— "खरंच गडे. मी इथें बाहेर बसल्यें होत्यें आणि बाबांच्या पाशीं बोलत होत्यें. पण आपण म्हणतां तसला प्रकार मला कांहींच आठवत नाहीं. कदाचित् वाऱ्यामुळं केस विसकटल्यासारखें मला वाटलें असेल आणि म्हणून मीं हातांनीं ते सावरले असतील. इतक्या जवळ यायचं होतं हें मला जर कळलं असतं—पण जाऊं द्या कीं, आतां काय? आतां तर एकदाचं तें संपलं ना? आतां संशय जाऊन मनाला स्वस्थता आली ना?"

डनबार म्हणाला—" माझें मन आतां त्या बाबतींत अगदीं स्वस्थ झालें; पण आतां आपलें लग्न केव्हां लागेल असें मला झालें आहे. मुद्दाम परवाना काढायला तूं विनाकारण हरकत घेत आहेस."

" माझं आपलं जाऊं द्या; पण बाबा कधींही कबूल करणार नाहींत. शिवाय माझे कपडे अजून तयार व्हावयाचे आहेत. पण अशी घाई कां बरं करायची? मी तर आपली झाल्यें आहे ना? आतां मला कोणी पळवून नेईल असं तर वाटत नाहीं ना?" आणि तिनें अशा अर्थपूर्ण दृष्टीनें डन-बारवर दृष्टी फेंकली कीं, तिचें मूर्तिमंत प्रेम तिच्या नेत्रांत उभें राहिलें होतें

तो म्हणाला— " तें कोण नाहीं म्हणतो? तूं माझीच आहेस, माझ्याशीं तूं प्रतारणा करणार नाहींस, हें कां मला समजत नाहीं? पण तुझ्यापासून दूर राहणें मला सहन होत नाहीं. सदोदित तूं जवळ असावींस, असें मला वाटतें. तुझा रुकार असेल तर आतां या घटकेला-लग्नच लशाला पाहिजे—मी तुला घेऊन जायला तयार आहें."

हें ऐकतांच क्लीन्सीचे आंगावर रोमांच उभे राहिले. तिची मुद्रा कावरी-बावरी झाली. गालाची लाली पार मावळली. ती मोठ्या कष्टानें बोलूं लागली— " हेंच कां तें शौर्य आणि शहाणपण? आपला मनोविकार जर ताब्यांत ठेवतां आला नाहीं, तर मग काय राहिलं? असं पुनः माझ्यादेखत

बोलूं नये. ”

डनवारनें लडिवाळपणानें तिचा हात धरिला आणि ह्मटलें— “ हें काय बरं असं प्रिये ? इतकी कां तूं माझ्यावर रागावलीस ? तुझ्यावांचून माझी काय स्थिति होत आहे, हें जर तुला बरोबर कल्पनेनें ओळखतां येतें, तर तूं माझ्यावर इतकी रुष्ट झाली नसतीस. माझ्याबद्दल तुला करुणाच आली असती.”

ती तशीच वर न पाहतां ह्मणाली-- “ हा अधीरपणा टाकून द्या गडे. थोडा अमळ विवेक करा. धीर धरा. द्या, आधीं मला वचन द्या कीं, मी पुनः अशी गोष्ट काढणार नाहीं म्हणून. ”

“ हेंच काय, मी वाटेल तें वचन तुला देतों. पण अशी माझ्यावर रागाऊं नकोस. गेला ना राग आतां तरी ? ”

तिनें उत्तर न देतां हास्यमुख केलें. “ आपलं प्रेमच तसं असल्यामुळें आपल्याला कदाचित् देहभान राहिलं नसेल. आज झालं तें झालं, पुनः असं करूं नये गडे. मी मग अशानं बोलणार नाहीं. आजची चूक एक वेळ माफ.”

रात्रीं जेवणाचे वेळीं थोडा घोटाळा उडाला. त्यामुळें कौन्सीला वाटूं लागलें कीं, हा डनवार कांहीं शुद्धीवर नाहीं. जेवायला डुकराचें मांस होतें, त्यांतलें थोडेंसें डनवारच्या पानांत खाबूरनें वाढिलें; पण त्या वेळीं डनवारचें लक्ष पानाकडे नव्हतें. मेजाच्या पलीकडच्या अंगाला फेरल ह्मातारा बसला होता, त्याच्याशीं कांहीं बोलण्यांत तो गुंतला होता. तथापि त्या मांसाचा सुवास त्याच्या घ्राणरंध्राच्या द्वारानें त्याच्या मेंदूपर्यंत जाऊन भिडावयाचा तो मात्र राहिला नाहीं.

तेव्हां पानाकडे पाहून खाबूर त्याच्या खुर्चीजवळच उभा होता, त्याला डनवार म्हणाला—“ हें काय हें ? याचा सुवास तर फार छान आला बुवा ! ” खाबूर काय उत्तर देणार ! तो जातीचा मुसलमान. त्याच्या धर्माप्रमाणें हें मांस खाऊं नये अशी सर्व मुसलमान धर्माच्या लोकांना ईशप्रेरितानें सक्त ताकीद केलेली आहे. त्या मांसाचें नांवसुद्धां कोणीं उच्चारावयाचा नाहीं. तेव्हां जेवणाच्या पदार्थांच्या यादींतील डुकराच्या मांसाच्या नांवावर बोट ठेवून ती यादी त्यानें डनवारच्यापुढें धरिली. डनवारनें तितक्यांत त्या मांसाचा तुकडा काढून काट्याला लावून तोंडापर्यंत नेला होता, इतक्यांत यादींतील नांवाकडे त्यानें पाहिलें; मग काय विचारतां ? त्यानें तो

हातांतला तुकडा धाडकन मेजावर आदळून दिला, आणि तो ताडकन उठून उभा राहिला!

तो इतका संतापला कीं, आपण कोठें आहों वगैरे त्याचें देहभान सुटलें. तो ओरडून म्हणाला—" या अल्ला! हरामखोर! सुवरका बच्चा! माझ्या ताटांत हा पदार्थ कां वाढलास गद्ध्या?"

ह्या वेळीं दिवाणखान्यांत, ह्या जेवणाच्या जागेंत मंडळीची गर्दी होती. तो आरडा ऐकून जेथें एका मेजापाशीं म्हातारा फेरल, त्याची कन्या व डनबार जेवायला बसले होते, तिकडे जो तो पाहूं लागला. क्वीन्सीला कांहीं चमत्कारिक झालें. ती प्रथम दचकली आणि अगदीं घाबरून गेली. म्हातार्‍याचें तोंड उतरून गेलें, आणि तो जातीचा इंग्रज असल्यामुळें ह्या वेळीं आपण बोलूं लागलों तर सगळी मंडळी घों घों करून येथें जमा होतील हें जाणून तो गप्प बसला; आणि जणूं काय आपलें तिकडे लक्षच नाहीं, आपल्यापुढें वाढलेले पदार्थ खाण्याच्या नादांत आपण आहों, असें दाखविण्याचा त्यानें बहाणा केला. खाबूरला तर कांहींच बोलायचें सुचेना, तेव्हां तें डुकराच्या मांसाचें पात्र त्यानें मुकाट्यानें उचललें आणि तें परत नेण्याच्या निमित्तानें तेथून पाय काढिला. कांहीं वेळानें सगळे स्वस्थ झाले. आतां डनबारच्या लक्षांत आलें कीं, हा आपण उगीच तमाशा केला! तो येवढा वेळ उभाच होता. त्याला जी शिसारी बसली, त्यामुळें त्याचे पाय खालीं वाकेनात. अखेर तो कसा तरी खालीं बसला आणि म्हणाला—" मीं मूर्खपणा करून लोकांना काय हा तमाशा दाखविला तरी!"

म्हातारा फेरल जरा चिडून म्हणाला—" आणि आपल्याबरोबर आम्हांलाही त्याच वर्गांत ढकललेंत येवढें एक जास्त झालें!" म्हातारा सहसा रागावत नसे, पण आज त्याचा संताप अनावर झाला.

डनबार म्हणाला—' माफ करा, मी चुकलों!"

क्वीन्सी तर मोठ्या दिमाखानें बोलूं लागली—" पण येवढं ओरडण्यासारखं झालं तरी काय बाई?"

" त्या गाढवाचं हें कृत्य सारें. तो तसला पदार्थ त्यानें माझ्यापुढें कां आणून ठेवावा अगोदर? त्याच्याकडे पहातांच मला—"

फेरल म्हातार्‍यानें मान वर न करतांच मध्येंच म्हटलें—" पण हें डुक-

रावें मांस मला फार आवडतें, असें तुम्हींच आपल्या तोंडानें कितीदां तरी आम्हांला सांगितलें असेल. ''

डनबार फारच गोंधळून गेला. त्याला काय बोलावें तें सुचेना. पण उत्तर दिल्यावांचून गति नव्हती. तेव्हां तो म्हणाला—'' होय, तें खरेंच ! मला तें आवडतें असें मीं म्हटलें खरेंच. पण आज काय असेल तें असो; मला त्याची अगदीं शिसारी आली ! मला त्याच्याकडे बघवेना. असें कां व्हावें, हें माझें मलाच सांगतां येत नाहीं. मी असा एकदम ओरडलों ह्या-बद्दल माझें मला फारच वाईट वाटत आहे. त्या फकिरानें जो प्रयोग काल केला, त्याचा जो माझ्यावर परिणाम झाला, त्यांतला कांहीं शेष राहिला असावा असें वाटतें. तुम्हांला काय सांगूं ? माझें डोकें अगदीं फिरूं लागलें आहे. पुष्कळशा गोष्टींची मला भ्रांति, विस्मृति पडली आहे. ''

त्याची ती स्थिति पाहून म्हाताऱ्या फेरलचें अंतःकरण कळवळलें. तो म्हणाला, '' हें माझ्या लक्षांत आलें नाहीं, त्यामुळें माझा भलताच समज झाला. अरेरे ! कालच्या प्रयोगाच्यापासून असें कांहीं वेडेंवांकडें झालें असेल अशी माझी कल्पना नव्हती. पण आतां अगोदर डाक्तरकडे जा. त्याला प्रकृति दाखवून सर्व हकीगत सांग. ''

तसें करण्याबद्दल कान्सीनेंही आग्रह चालविला. तेव्हां होय ना करितां करितां मोठ्या नाखुशीनें डनबारनें दुसऱ्या दिवशीं सिव्हिल सर्जनला बोलाविण्याचें कबूल केलें.

त्या रात्रीं म्हातारा फेरल व त्याची मुलगी ह्या उभयतांसही लवकर झोंप लागेना. डनबारला हा काय विकार झाला, ह्याबद्दल त्या दोघां बाप-लेकींचें पुष्कळ वेळ बोलणें चाललें होतें. म्हातारा म्हणे—'' पाहिलेंस ना हें ! तरी मी आधींपासून म्हणत होतों कीं हें बरें नव्हे. आतां घ्या. हा ईश्वरी क्षोभ ! ईश्वरानें त्याला थोडीशी परलोकसौख्याची चुणुक दाखविली आणि त्याची शंका घालवून त्याचें समाधान केलें खरें, परंतु ह्याच्या मुळाशीं कारण जो त्याचा अविश्वास त्याबद्दल हें शासन ! आतां ह्याला दुसरें कोण काय करणार ? त्या दयाघन परमेश्वरालाच जेव्हां ह्याची करुणा येईल, आणि तोच कृपा करील तेव्हांच ही पीडा दूर होईल ! ''

'' तथास्तु. '' असें कान्सीनें मोठ्या भाविकपणानें व कळवळ्यानें म्हटलें.

# प्रकरण १८ वें,

## अमीराचा विसराळूपणा; झीनावशीं एकांत.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अमीर जागा झाला तोंच त्याला कालच्या वर्तनाबद्दल वाईट वाटूं लागलें. झीनाबच्या मनांत जो हेतु आहे, तो पूर्ण होण्याची आशा उत्पन्न होईल अशा तऱ्हेनें आपण काल तिच्याशीं बोललों चाललों ह्याबद्दल त्याचें मन त्याला खाऊं लागलें. तिच्या स्वरूपाला पाहून आपण मोहित झालों असें तर आपणच तिला स्पष्ट कळविलें हें त्याला आठवत होतें. आपली पत्नी म्हणून तिच्याशीं आपण भाषण केलें आणि लग्नविधीची पूर्णता जो देहसंबंध त्याचा प्रश्न तिनें काढिल्याबरोबर कांहीं तरी चाळवाचाळवी करून ती वेळ आपण मारून नेली ही गोष्ट खरी; पण असें किती दिवस चालणार ? नुसत्या वरवरच्या किंवा शाब्दिक प्रेमाशिवाय अधिक प्राप्ति मजकडून तुला होणार नाहीं असें कालच स्पष्ट सांगावयास पाहिजे होतें. पण तसें न केल्यास अमीराचें मन खाऊं लागलें. झीनावशीं जसें आपण वागावयास पाहिजे तसें वागत नाहीं, असें लोक तरी खात्रीनें म्हणणार. तेव्हां आतां काय करावें, ह्याचा त्याला मोठा विचार पडला. तिचा उपभोग घेऊं नको असें त्याचें मन त्याला जागें करी आणि मागें ओढी; त्याचीं सर्व इंद्रियें जी गोष्ट करण्यास सांगत होतीं, ती न करण्याविषयीं त्याची सदसद्विवेकबुद्धि त्याला निक्षून बजावित होती. कांहीं वेळानें तो आपल्याशींच मोठ्यानें बोलूं लागला, " माझें खरें प्रेम क्लीन्सीवर बसलें आहे, तेव्हां ईश्वराच्या दृष्टीनें मी तिला मनानें वरिली असल्यामुळें तिचें माझें मानसिक तरी लग्न लागलेलें आहे, व तीच माझी खरी बायको आहे. पण ह्या माझ्या सध्यांच्या शरीरावर मालकी झीनावची आहे. माझीं इंद्रियें मला सांगतात कीं, तिला अशी फसवूं नको, तिची इच्छा तृप्त कर. पण मन सांगतें कीं, ह्या करण्यानें जरी तुला पाप लागलें नाहीं, तरी तेवढ्यानें तूं खऱ्या सुखाला कायमचा अंतरशील. " ह्या मनाच्या टोंचणीला दाद न देतां हल्लींच्या आलेल्या स्थितीप्रमाणें वागण्यानेंच आपल्याला सुख लागेल अशी त्याची

समजूत घालण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. तो म्हणे— " नुसतें शरिसौंदर्य पाहिलें तर कॉन्सीपेक्षां झीनाच अधिक लावण्यवती आहे, ह्यांत संशय नाहीं. आज नाहीं, पण कांहीं कालानें, रोज झीनाबचा सहवास घडल्यानें कॉन्सीची विस्मृति पडेल आणि तें प्रेम झीनाबवरही बसेल. कारण कांहीं झालें तरी कॉन्सी आतां मला मिळणें अशक्यच आहे, ती माझ्या हातची कायमची गेली. त्या हरामखोराची ती आतां बायको होणार खास. " अशा विचारसरणीनें त्यानें पुष्कळ वेळ मनाला थापटून धरण्याचा यत्न केला, तरी त्याची बुद्धि त्याला म्हणे कीं, " ह्या सर्व सबबी आहेत, त्या खोट्या असून त्यापासून तूं आपली भ्रामक समजूत घालावयास पहात आहेस. "

अशा विचारांत तो गर्क असतां अली आंत येऊन त्यानें न्याहारीची तयारी झाल्याची सूचना दिली. अमिराला डनबारनें जो ठोंसा मारिला होता, त्यानें अद्यापही अमिराचें डोकें ठणकत होतें. निदान आपली स्मरणशक्ति नाहींशी झाल्याचें निमित्त सांगण्यास तें त्याला चांगलें कारण सांपडलें होतें. त्याचें वर्तन पाहून त्याच्या नोकरचाकरांना त्याच्याबद्दल फार चिंता वाटूं लागली. प्रथम उठल्याबरोबर धर्मिष्ठ मुसलमानाप्रमाणें त्यानें प्रातर्विधि केला नाहीं; शिवाय मधल्या वेळीं काय पाहिजे म्हणून विचारितां अंडीं आणि डुकराचें मांस आणून द्या असें तो म्हणूं लागला. हे शब्द ऐकून अली तर आश्चर्य आणि भीति ह्यानीं अगदीं गांगरून गेला, आणि वेड्यासारखा नबाबाच्या तोंडाकडे पाहूं लागला. अमिराला वाटलें कीं, आपण सांगितलेले शब्द अलीनें नीट ऐकिले नसावे, म्हणुन तो त्याच्या अंगावर ओरडून म्हणाला, " अरे सांगितलें ना तुला, डुकराचें मांस आणि अंडीं घेऊन ये म्हणून ! "

तें वाक्य पुनः ऐकतांच अलीला शिसारी आली आणि ओकायला आल्यास त्यासाठीं तो इकडे तिकडे पाहूं लागला. तो म्हणाला " हुजूर, आपलें बोलणें मी ऐकलें नव्हतें असें नाहीं, पण—पण—पण — "

" तुझें हें पण संपणार केव्हां ? काय तुझें म्हणणें ? नीट सांग कीं ! "

" हें काय हुजूर ? जें मांस खाऊं नये, अशी अल्लानें सक्त ताकीद देऊन बंदी केली, तेंच हुजूरनीं खाल्लें तर पाप लागेल—आपण पातकी व्हाल. "

" पातकी ! अग आई ! " असा उच्चार करून अमिरानें आपलें मस्तक हातानें दाबून धरिलें. " अरे अली ! काय म्हणतोस बाबा ? बकऱ्याचें मांस

कां खाऊं नये ? त्याला कोणीं मनाई केली ? "

" नाहीं हुजूर. त्या मांसाला बंदी केली आहे, असें मीं म्हटलें नाहीं."

इतकें बोलून अल्ली तेथून निघून जाऊं लागला, पण तो जातां जातां आपल्याशीं पुटपुटला, " डुकराचें मांस आण असें नवाबसाहेब स्पष्ट म्हणाले. काय म्हणावें आतां ह्या धनीसाहेबांना ? " आपल्या धन्यानें आज डुकराचें मांस मागितलें ह्याबद्दल अल्लीनें दुसऱ्या कोणापाशीं एक अवाक्षर सुद्धां काढिलें नाहीं. तथापि त्या सगळ्या दिवसांत नवाब पागल किंवा वेडा झाला आहे, असें वाटण्याजोग्या किती तरी गोष्टी दिसून आल्या. पूर्वीपेक्षां अधिक बेगमसाहेबांकडे नवाबाचें लक्ष जाऊं लागलें, ह्याबद्दल सर्वांनाच बरें वाटलें, परंतु ह्याचें कारण म्हणजे नवाबावर किंवा झीनावर कोणा नोकराचें विशेष प्रेम होतें, असें मात्र नाहीं; त्यांत स्वहिताचा सारा खेळ होता. एखाद्या घराण्याची बेअब्रू झाली तर तेथें असलेल्या नोकरांकडे त्या प्रकाराचा दोष देण्याची वहिवाट पडलेली होती. बदनामीच्या कुळांत नोकरी करणाऱ्याचें स्वतःचें नुकसान होत असे. उदाहरणार्थ–एखाद्या ठिकाणीं पंच नेमण्याची वेळ आली, किंवा जमातीचें मंडळ जमलें, तर ज्या कोणा घराण्यांतील स्त्रीपुरुषाचें नांव बद्दू झालें असेल, तेथील नोकरचाकरांस त्या सभेमध्यें घेत नसत. " हा त्या कमअस्सल घराण्यांतला आहे. " हें दूषण त्याच्यावर येत असे. ह्या कारणानें आत्महिताच्या दृष्टीनें नवाबाच्या वर्तनांत पडलेल्या फरकानें ह्या नोकरांना कांहीं बरें वाटलें. परंतु नवाबाचे चाळे दिवसेंदिवस वाढूं लागले, तें मात्र कोणास आवडेना. नवाबानें एक नवीन फैटण गाडी बांधावयास सांगितली. तिला पडदे किंवा अडोसा कांहीं नको अशी ताकीद झाली होती, आणि त्यामध्यें आपल्या बेगमला बरोबर घेऊन नवाब फिरावयास जाणार असेंही जाहीर झालें. ! तेव्हां मात्र जो तो टकमका पाहूं लागला ! अल्ली म्हणाला कीं, " अशा गोष्टींनीं जुने नवाब लोक आपलें घर वाळीत टाकतील, येणें जाणें बंद करतील. ! "

त्यावर नवाबानें उत्तर केलें, " करीनात बंद, न येईनात ते ! कुसुंबी बेगम नाहीं कां तशी बाहेर पडत ? शिवाय पूर्वी पडदा घेतल्याशिवाय कधीं बाहेर न पडणाऱ्या कित्येक स्त्रिया आतां तशाच बाहेर फिरावयाला जातात. मीच हें उदाहरण घालून दाखवून इतर नवाबांना हीच चाल सुरू करावयास लाव–

णार आहें. आतां कोणी जास्त बोलूं नका. मी सांगितल्याप्रमाणें गाडी आलीच पाहिजे. उद्या संध्याकाळचा माझा बेत नक्की ठरला आहे. त्याप्रमाणें वेळेवर गाडी घेऊन या, उशीर होतां उपयोगी नाहीं."

नबाबानें डुकराचें मांस मागितलें, त्या वेळीं त्याला उपयोगीं पडलेली युक्ति आज कामीं येईल असें अल्लीस दिसेना. त्या वेळीं नबाबानें माघार घेऊन तेव्हांच बोलणें फिरविलें होतें. पण ह्या बाबतींत तो आपला हट्ट सोडीना. तेव्हां अल्लीनें अशी समजूत करून घेतली कीं, ह्यानें जरी असे चाळे केले तरी बेगमनेंच ऐकिलें नाहीं किंवा तिनेंच कांहीं हरकत घेतली, म्हणजे मग ह्याचें काय चालणार?

नित्यनियमाप्रमाणें त्या दिवशीं अमिराची टमटम दुपारी ४ वाजतां त्याच्यासाठीं आली. पण त्यानें ती परत लाविली आणि सांगितलें कीं, मी आज बाहेर फिरावयास जात नाहीं. पण अल्लीला त्यानें ताकीद दिली, "मी घरींच रहाणार; पण कोणी भेटायला आलें तर मी घरीं नाहीं असें सांगत जा." इतकें बोलून तो बागेंत फिरावयास गेला आणि तेथें आपल्या मनाची करमणूक करावयास पहात होता. झनानखान्यांतल्या ज्या भागांत स्त्रियांशिवाय दुसऱ्या कोणास जावयाची परवानगी नसे, त्या बाजूनेंच मोठ्यानें खिदळण्याचा आवाज ऐकूं येत होता आणि तेथल्या संगमरवरी हौदांत उतरून बायका जलक्रीडा करीत असल्याचाही पाण्याचा शब्द मधूनमधून कानीं पडे. अमीर तिकडेच वेड्यासारखें लक्ष लावून कांहीं वेळ फिरत होता. बागेंत सर्व प्रकारचीं फुलें आपल्या सुवासानें वहरून मधुकरवृंदास आमंत्रण देत होतीं. त्या ऋतूंत येणारीं अनेक प्रकारचीं फुलें पाहून एखादा गालिचा पसरल्याप्रमाणें वाटे. त्या फुलांच्या योगानें फ्रान्सीविषयींचे त्याचे विचार मूर्त स्वरूप पावून त्याच्या ओंठावाटे बाहेर पडूं लागले. "हीं फुलें पाहण्यास फ्रान्सी असती तर तिला किती आनंद झाला असता; आतां ती काय करीत असेल बरें? तिची माझी नुसती दृष्टिभेट तरी कशी होणार? ह्या वेळीं तो लबाड डनबार तिच्याशीं गुलगुल गोष्टी करीत असेल; त्याला माझा काय उपाय? त्याच्या देहावर मला हात टाकवेना. कारण वास्तविक पाहिलें तर तो माझा देह आहे; त्याच्यावर माझा हात कसा चालणार? परंतु त्या देहांत हल्लीं रहात असलेल्या लबाडाचें जर मला कांहीं करतां

येईल तर किती मौज होईल ! "

इतक्यांत त्याच्याकडे हळूहळु चालत येणाऱ्या अल्लीकडे त्याची दृष्टि गेली. तेव्हां अल्ली तो जवळ येऊन म्हणाला, " नबाबसाहेब, बेगमसाहेबांकडून निरोप आला आहे कीं," आपण त्यांच्या महालावर पायधूळ झाडावी आणि थोडी काफी आणि उपहार तेथेंच घेण्याची मेहेरबानगी करून दासीला कृतार्थ करावें. "

सूर्य अस्ताचलावर चालला होता आणि हवेंत हळूहळू जास्त गारठा येऊं लागला होता. वाराही मंदमंद वहात असून क्षणक्षणाला अधिक झोंबूं लागला. हिंवाळ्याचे दिवस लहान असल्यामुळें संध्याकाळीं पांच वाजल्यानंतर लवकरच दिसेनासें होतें; संधिप्रकाश फार वेळ रहात नाहीं. त्यामुळें चोहों-कडे आतां अंधकाराचें साम्राज्य पसरूं लागलें होतें. अमिरानें अल्लीला उत्तर केलें, " हो. जा, सांग जा, मी अर्ध्या तासानें तिकडे येतों म्हणून. "

उतर मिळतांच अल्ली मागच्या पायींच परतला, परंतु अमीर तेथेंच बागेंत राहिला; कांहीं वेळ तो नुसता इकडून तिकडे खेपा घालीत होता. आतां आपली बायको म्हणविणाऱ्या स्त्रीबरोबर कसें वर्तन ठेवावें ह्याबद्दल कांहीं तरी निश्चय करण्याचा तो प्रयत्न करीत होता. अर्ध्या तासानें बेगमकडे जाण्याचें त्यानें कबूल केलें होतें. परंतु तो तसाच केव्हां गेला तें त्याला समजलें नाहीं. इतका वेळ विचार करूनही त्याचें कांहीं ठाम मत ठरेना. शेवटीं त्यानें बेगमच्या महालाचा रस्ता धरिला आणि हळुहळू तेथें जाऊन पोहोंचला. तो थोरल्या दरवाज्यापाशीं गेला तों तेथें अत्यंत सुंदर पोषाख केलेल्या दोन दासी त्याची वाट पहातच तेथें उभ्या होत्या. त्यांनीं अमिराला सलाम केला आणि त्या पुढें चालूं लागल्या. त्यांनीं गच्चीवरून त्याला बेगमच्या महालांत नेलें. जाण्याच्या वाटेला जिकडून तिकडून हंसत खिदळत असलेल्या स्त्रियांचे शब्द ऐकूं येत होते. काफीच्या पेल्यांचा नाद आणि सतार वगैरे तंतुवाद्यांचे सुस्वर ध्वनि ह्यांनीं तो सर्व भाग दुमदुमून गेला होता. तक्तपोशीला लागून असलेल्या झरोक्यांतून अमिरानें सहज खालीं डोकावलें, तों खालच्या दिवाणखान्यांत दिव्यांचा लखलखाट असून तेथें सहा दासी गप्पा मारीत बसल्या होत्या. त्यांच्यापुढें एक मोठें काफी भरलेलें भांडें

असून त्या बरचेवर त्यांतून पेले भरभरून घेऊन पीत होत्या. अमिरानें त्या बरोबर येणाऱ्या दासींना विचारिलें, " ह्या परी कोण आहेत ? "

नगीननें उत्तर केलें, " खाविंद, ह्या साऱ्या बेगमच्या दासी आहेत. त्यांना आज कामाची सुट्टी आहे, आणि म्हणून त्या एकत्र जमून स्वस्थपणानें एकमेकींला पाहुणचार करीत खेळत आहेत. "

त्या दासीच्या मागोमाग चालतां चालतांच अमीर म्हणाला, " हो, त्यांच्या तोंडावरून हें स्पष्ट दिसतेंच आहे. ह्या वाड्यांत जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसत आहे. "

ती हजरजबाबी दासी म्हणाली—" होय, कालपासून तरी असें आहे खरें. " ती तसें कां म्हणाली हें अमीर तिला विचारणार होता, इतक्यांत त्या दासीनें पुढचें दार उघडून दिलें आणि ती मागें सरली. नबाबाच्या जनानखान्यांतील मुख्य महालाचें तें दार असल्यामुळें अमिरानें आंत पाऊल टाकतांच त्या मागें फिरल्या.

ह्या वेळचा झीनाबचा पोषाख फारच उंची होता. तिनें अंगांत तंग काचोळी घातली होती, ती तलम रेशमाची बुट्टेदार असून तिच्यावर भिंगाच्या टिकल्या बसविल्या होता व रेशमी काशिदा काढिला होता. तिच्या उघड्या हातांत सुंदर सोनेरी आणि मोत्याच्या बांगडया होत्या. तिनें गळ्यांत एकेरीच मोत्यांच्या सर घातला होता, पण त्याचीं मोतींच मोठालीं म्हणजे एक एक बोरायेवढालीं होतीं. तो सर गळ्याभोंवतीं घट्ट असा नसून लांब माळेसारखा होता. परंतु फक्त स्तनावर लोंबेल इतक्याच बेताचा तो असून त्याच्यामध्यें गुंफलेलें एक हिरेजडित पदक होतें. तिच्या चक्रवाकाच्या अंगासारख्या उन्नत स्तनांमधील अंतरालांत तें जणूं काय लोंबत असल्यामुळें तिच्या श्वासोच्छ्वासाबरोबर त्यावरील रत्नेंहि झळकत होतीं. तिच्या पायांत नुसत्या सपात्या व होत्या; पण त्यांवर सुद्धां रेशमी वेलबुट्टी काढलेली असून त्यावर हिरकण्या व मोतीं बसविलेलीं होती. तिनें आपल्या डोळ्यांत सुर्मा वगैरे इतर मुसलमानी स्त्रियांप्रमाणें घातला नव्हता किंवा नखांना मेंदी वगैरे लावून कृत्रिम तांबूसपणा आणला नव्हता.

अशा वेषांतील आपल्या बायकोचें तें सौंदर्य पाहून नबाब अगदीं गारच झाला आणि आश्चर्यानें तिच्याकडे टक लावून पहात दारांतच उभा राहिला.

त्याला पहातांच झीनाब उभी राहिली आणि हंसत त्याच्यापुढें येऊन त्याला तिनें मुजरा केला आणि त्याच्या हाताला धरून एका मंचकाकडे घेऊन चालली. अमिरानें लगेंच तिला आपल्याजवळ ओढून घेऊन घट्ट आलिंगन दिलें आणि तिला म्हटलें—"प्रिये झीनाब, किती मनोहर आणि सुंदर तुझें रूप हें! त्याप्रमाणें तुझी आकृतिहि किती मनमोहन आहे म्हणून सांगूं! अहाहा! त्याप्रमाणेंच तुझा स्वर सुद्धां किती मंजुळ हा! इकडच्या स्त्रियांचे आवाज असेच मधुर असतात अं! परंतु त्यांतही तुझा कंठस्वर केवळ मंजुळवाद्यनिनादच आहे असें वाटतें."

त्यावर झीनाबनें धैर्यानें उत्तर केलें, "तें खारं खरं. बायका कितीहि सुंदर असल्या तरी त्याचा त्यांना काय उपयोग? इकडे मी सुंदर वाटत आहे ना? झालं तर मग. मी आपल्याला कृतार्थ समजतें, आणि अल्लानं मला जी अशी रमणीय बनविली आहे, त्याबद्दल त्याला मी शतशः धन्यवाद देतें. ह्या सौन्दर्याचा एवढा उपयोग झाला, हा काय थोडा आहे! माझे पति, माझे धनी मला परत लाभले, ते ह्या सौन्दर्यामुळेंच ना? मला आणखी तें काय पाहिजे? मला जरा सोडावी गडे, मी आपल्यासाठीं एक लहान गादी तयार केली आहे, ती आणून दाखवितें." इतकें बोलून ती चटकन उठली आणि मंचकावर घालण्याजोगी एक लहानशी गादी घेऊन आली.

अमिरानें ती गादी हातांत घेतली आणि त्यावरील नक्षीकाम पाहून म्हटलें, "प्रिये, माझ्यासाठीं किती काळजी घेतेस ही? ह्याच्यावरील कशिदा तरी किती उत्तम काढिला आहे? झीनाब, सखि! तूं तर फार चतुर दिसतेस! ह्यावरून आपलें आतां चांगलें जमेल असें वाटतें."

झीनाबनें काफीचें भांडें घेऊन त्यांतील काफी एका पेल्यांत ओतली आणि तो पेला नवाबाच्या पुढें करून म्हणाली, "दासीला माफी असावी. मी आपल्यासाठीं आणखी एक मौज करण्याची तयारी केली आहे. आज्ञा होईल तर—"

"काय बरें असें हें? हल्लीं आहे ही मौज काय कमी आहे? त्यापेक्षां आणखी जास्त कांहीं गम्मत असणें शक्यच वाटत नाहीं. माझी बायको अत्यंत सुंदर आहे, ही गोष्ट आज मला समजली; सुंदरी, त्यापेक्षां अधिक आणखी मला कांहींहि नको."

" पुरे पुरे. हद्द झाली बाई ! स्तुति करावी तरी किती ? हरबऱ्याच्या झाडाला शिडी लावून झाडं मोडायला लागतील, म्हटलं ! पण नको. चालूं द्या आपलंच. मला तरी ह्यांत बरंच वाटतं आहे म्हणा ! ह्या आपल्या बोलण्यावरून आपलं लक्ष ह्या दासीकडे कसं लागत चाललं आहे, याची मला साक्षच—"

एकदम अमीर मध्येंच ह्मणाला—" किती वेळ गेला हा ? आतां जेवणाची वेळ झाली नाहीं कां ? बरें तर, आतां मी जातों. उद्यांपासून तूं माझ्याबरोबर जेवायला बसलें पाहिजे हो ! त्याप्रमाणेंच संध्याकाळीं आपण दोघे गाडींत बसून फिरायला जाऊं. पण पडदा बिडदा कांहीं घ्यावयाचा नाहीं. सांगून ठेवतों ! "

झिनाबनें लाजून तोंड खालीं घातलें; ती ह्मणाली–" पडदा टाकायला माझी हरकत नाही. पण मग लोक माझ्याकडे असे टवकारून बघतील, आणि मला तें कसं सोसेल कोण जाणे ? "

" होय, तसें होईल थोडे दिवस. पण मग एकदां तशीच संवय झाली म्हणजे मग तुला उलट हौस वाटेल. " इतकें बोलून अमीर उठून उभा राहिला. झिनाबही उठली व त्याच्या अगदीं अंगाला बिलगली. अखेर तिनें आपले दोन्ही हात त्याच्या खांद्यांवर टाकून प्रश्न विचारिला. " आज रात्रीं ह्या दासीला पुन: दर्शन होईल काय ? "

तिचें तें सौंदर्य पाहून अमिराचें देहभान नाहींसें झालें आणि तिला ' होय ' म्हणून उत्तर द्यावें असा विचार क्षणभर त्याच्या मनांत आला. तरी पण त्याच्या अंतःचक्षूपुढें कोन्सी उभी राहिली. आपल्या शरीरावर झिनाबचा हक्क आहे असें त्याच्या मनानें घेतलें होतें, तरी कोन्सीचें स्मरण त्याच्या तोंडांतून होकार बाहेर पडूं देईना. ह्या वेळीं तिला एकदां ' हो ' म्हणून उत्तर दिलें तर त्याच्या शरीरानें कांहीं पातक केलें असें जरी होणार नव्हतें, तरी एकपत्नी–व्रताचा त्याच्या मनाचा पवित्रपणा मलिन होईल असें दिसूं लागतांच पुढें काय करावयाचें हें त्यानें कायमचें ठरविलें. तिला तो फार प्रेमळ शब्दानें ह्मणाला–" प्रिये, छबकडे, आज मला माफ केलें पाहिजे. पण तूं अगदीं दुःखी कष्टी होऊं नकोस. पहा, माझें प्रेम तुझ्यावर आहे; यासाठीं तेवढ्यावरच सध्यां आपलें समाधान मानून घे. तुझ्या जिवाला सर्व

प्रकारांनीं सुख द्यावयाचें असा मीं बेत केला आहे. ”

परंतु असल्या शाब्दिक, औपचारिक सौख्यापेक्षां अधिक प्रकार झनिाबला पाहिजे होता. तिला असलें कोरडे प्रेम नको होतें. सर्वस्वदान, दुसरा विचार न येऊं देणारा प्रेमळपणा, शरीरास उल्लू करणारी मानसिक स्थिति, उच्छृंखल वासना ह्या गोष्टी तिला पाहिजे होत्या. तिला प्रेमाची काय ओळख होती ? कामवासना, मदनसंचार ह्यालाच ती प्रेम समजत असे. देदिप्यमान प्रखर सूर्यप्रकाशाप्रमाणें तिला प्रेम म्हणजे मदनदाहशांति हेंच वाटत होतें. तिच्या नेत्रांकडे पहातांच तिची काय चलबिचल होऊन गेली ती अमिराच्या लक्षांत आली. तिनें आपल्या अंगावरील शाल फेकून देऊन काचोळीचे बंद सोडून आपले उरोज उघडे केले आणि अशा अर्धवट नग्न स्त्रीला पाहून तरी ह्याचा थंडपणा दूर होतो कीं नाहीं हें पाहतां पहातां तिनें तशा प्रकारें पुरुषत्वाच्या संबंधाचा प्रश्न केला. ह्या वेळीं आपण अगदींच स्वस्थ बसलों तर विपरीत अर्थ होऊन आपल्याकडे मूर्खपणा येईल असें अमिरास वाटलें, आणि त्यानें तिला घट्ट आलिंगन दिलें व तिचें चुंबनही घेतलें !”

तो म्हणाला–“छबिले, तुला काय सांगूं ? तुझी प्रेमयाचना बरोबर आहे. तुझी कांहीं चूक नाहीं. पण माझ्या या वर्तनाच्या खऱ्या इंगिताची तुला कल्पना होणार नाहीं. कांहीं दिवस दम धर. तुझ्या मनाप्रमाणें सर्व कांहीं होईल. माझा हा असा संयमपणा कायमचा राहील असें मानूं नको. परंतु कांहीं दिवस–निदान थोडे दिवस तरी तुला थांबलें पाहिजे.”

झीनाबनें हळूंच त्याच्या बाहुपाशांतून आपलें अंग काढून घेतलें आणि काचोळी सांवरून चादर अंगावर घेतली. ती म्हणाली–“बरं बाई, माझा हट्ट कसा चालणार ? मी दम न धरून कोणाला सांगूं ? ” तिच्या तोंडांतून हे शब्द येत होते खरे, पण तिच्या आवाजाच्या स्वरावरून ते फार कष्टानें ती उच्चारीत होती असें दिसलें. ती आणखी म्हणाली— “ पण इकडच्या शब्दाबाहेर मी कधींच नाहीं. ”

तिच्या गुलाबी गालावरून हात फिरवून तिला गोंजारीत अमीर म्हणाला, “ असेंच शहाणपण धरावें. माझी परी ती ! माझ्या अशा ह्या वागण्याला कांहीं तरी कारण आहे आणि तें तुला जेव्हां मी सांगेन, तेव्हां मग तुला इतकें वाईट वाटणार नाहीं. सलाम अं ! रात्रभर माझ्याबद्दल सुस्वप्नें तुला

पडोत म्हणजे झालें "

झनानखान्यांतून अमीर बाहेर पडला आणि बाहेरची थंडगार हवा लागतांच जरा हुशार होऊन बागेंतून सावकाश चालूं लागला. वाटेंत कारंजें लागलें. तेथें तो थोडा वेळ थांबला. नंतर आकाशाकडे पाहून तो आपल्याशीं म्हणाला:— " ईश्वरा, आज तुझी माझ्यावर खरोखर कृपा म्हणूनच मला इतकें आत्मसंयमन करतां आलें. " अशा प्रकारें त्यानें ईश्वराचे धन्यवाद गाऊन तो परत आपल्या निजावयाच्या खोलींत आला.

# प्रकरण १९ वें.

## दोन विस्कळित जोडपीं

झीनाबला उघड्या गाडींत बसवून अमीर फिरायला जाणार, हा अपूर्व प्रकार पाहण्यासाठीं अमिराचे सारे नोकर खालीं येऊन उभे राहिले. आजचा पहिलाच प्रसंग, बेगम बुरख्याशिवाय बाहेर पडण्याचा, त्यामुळें पुरुष नोकरांपैकीं कोणाच्याही दृष्टीस ती आजवर पडलेली नव्हती; तिचें तें अप्रतिम लावण्य पाहून त्या सर्वांना फारच नवल आणि अभिमान वाटला. पण झीनाबला लाजतां लाजतां पुरेवाट झाली. तिला कसेंसेंच वाटून ती अगदीं खजिल झाली आणि मधून मधून बुरख्याचा पदर थोडासा तरी तो तोंडावर ओढून घेऊं लागली. पण अमिराचें सर्व लक्ष तिच्याकडे असल्यामुळें तो लगेंच मागें सारी. तिची ही भांबावलेली वृत्ति पाहून ' अशी भिऊं नको ' असें अमीर तिच्या कानांत सांगे. वाटोळ्या रस्त्यानेंच अमिरानें गाडी काढली. तिकडे फारशी लोकांची गर्दी नसल्यामुळें त्या बाजूला हवा मोकळी असून स्वच्छ होती. बेगमला एकदमच फार धिटाई करायला लावून उपयोग नाहीं असें त्यानें ठरविलेलें होतेंच. मोतीमहालाच्याजवळ त्यांची गाडी थोरल्या रस्त्याला लागली, आणि पशुसंग्रहालयावरून पुढें गेल्यावर त्यांना नदी लागली. नदी त्यांच्या डाव्या हाताला रस्त्यालगतच होती. ही वेळ सहल करण्यास फारच मौजेची असल्यामुळें झीनाबला फार आनंद झाला. येथें गाडींतून उतरून ह्या बागेंत थोडा वेळ फिरूं, असें अमिरानें झीनाबला

म्हटलें, परंतु तिनें त्याला रुकार दिला नाहीं. ती म्हणाली— " आजच गडे इतकी घाई नको. मला आज माफ करा. " तेव्हां आलेल्या रस्त्यानें गाडी परत फिरली आणि पुनः नदीच्या काठानें ती हळुहळु चालुं लागली. वाटेंत समोरुन एक स्त्रीपुरुषांचें येणारें जोडपें त्यांनीं पाहिलें, त्यांतील स्त्री तर अमिरानें लगेंच ओळखली. डनबार व क्विन्सी दोघें पायींच चाललीं होतीं. त्याना पाहून अमीर थक्क झाला.

झीनाब म्हणाली— " ती कोण बरं ? खचित फॅरलताईच त्या."

अमीरः—" होय. तिच्यापाशीं बोलत बसावयाचें असलें तर चल आपण खालीं उतरूं. अजून रात्र पडायला पुष्कळ अवकाश आहे."

झीनाबः— " होय आहे खरा. पण त्या पुरुषाला आपण तिच्या जवळून काढून दूर न्यावा तेवढा."

अमीरः—" पण तें कसें होईल ? अग, त्याच्याशीं तर तिचें लग्न ठरलें आहे. त्याचा कांहीं आपल्याला त्रास नाही होणार. खरें म्हणशील तर त्याच्याशीं बोलावयाचें नाहीं असेंच मीं ठरविलें आहे. "

झीनाब दृष्टीस पडतांच क्वीन्सीच्या मुखांतून आनंदाचे उद्गार बाहेर आले. डनबारनें अमीराला ओळखिलें होतें; आणि म्हणून तो तसाच पुढें जाण्याच्या विचारांत होता, पण इतक्यांत नबाब खालीं उतरला आणि झीनाबला हात देऊन तिलाही त्यानें खालीं उतरून घेतलें. त्या दोघींना परस्पर भेटीमुळें आनंद झाला. डनबारनें अमीराकडे पाठच फिरविली; परंतु झीनाबचें रूप पाहून त्यानें पुष्कळ नको म्हटलें तरी त्याचे नेत्र पुनः पुनः तिच्याकडे वळूं लागले. तो आपल्या मनाशीं पुटपुटूं लागला—" अरे च्या! हीच का ती झीनाब! हिचें सौंदर्य इतकें अप्रतिम असेल अशी मला कल्पनासुद्धां नव्हती. "

क्वीन्सी नबाबाला म्हणाली—' हें फार छान केलें. हा असला धीटपणा केल्याबद्दल मला आपल्याला शाबासकी दिलीच पाहिजे. तुमचं हें एक उदाहरण झालं म्हणजे तुमचे भाईबंद, देशबांधव, तुमचं अनुकरण करूं लागोत अशी मी त्या प्रभूपाशीं प्रार्थना करीत जाईन; आणि तसं होईलही असं मला वाटतं. "

तेव्हां डनबारला वाटलें कीं, आतां मध्यें बोलल्याशिवाय गति नाहीं. तो

म्हणाला—" पुरे असल्या प्रार्थना! तसें कधीं सुद्धां होणार नाहीं, समजून ठेव. आपली गृहस्थिति शुद्ध आणि पवित्र रहावी असें जर त्यांना खरोखर पाहिजे असेल, तर त्यांनीं जुनी पुरातन पडद्याची चाल सोडूं नये, हेंच बरें!"

असलें भाषण डनबारच्या तोंडांतून निघेल, अशी कल्पनासुद्धां कीन्धीला शिवली नव्हती. त्यामुळें तिला तर अत्यंतच आश्चर्य वाटलें! डनबारकडे पाहून थोडेंसें हंसून अमीर म्हणाला—" पण ह्या विषयावर बोलण्याचा मला जास्त अधिकार आहे. मी ह्या देशचा राहणारा असल्यामुळें ह्या पडद्याच्या चालीच्या सर्व गोष्टी मला माहीत आहेत. हें पहा— मी सांगतों तें ऐकून घ्या. आमच्या बायका आपलीं तोंडें पडद्यांत दडवून बसतात—म्हणून त्यावरून त्या विशेष विनयसंपन्न असतात—किंवा त्यामुळें पवित्र रहाण्याचें त्यांचें शील बनतें, किंवा तसलें व्रत त्या धरितात असें समजूं नका; किंवा त्या योगानें त्या सगळ्याच कांहीं विकाररहित होतात, अशांतलाहि प्रकार नाहीं! असल्या ह्या आमच्या झनानखान्यांतसुद्धां परपुरुषांचा शिरकाव होतो आणि त्याचा बिलकूल बोभाटहि होत नाहीं, नी ही गोष्ट प्रत्यक्ष घरच्या मालकासही कळत नाहीं. सारांश काय, ज्याप्रमाणें तुमच्या पूर्वज आद्य-स्त्रीला हें फळ खाऊं नको म्हणून बजाविलें होतें, त्याप्रमाणेंच येथें प्रकार घडत आहे. ईव्हला तें खाऊं नको असें सांगितलें, म्हणूनच तिला तें खावेंसें वाटलें. आमच्या बायकांना हल्लींपेक्षां जास्त स्वतंत्रता द्या आणि पहा-आमच्यांत हल्लीं होत असलेला अनाचार, खात्रीनें पुष्कळ कमी होईल."

डनबार—" होय होय. आहेत ठाऊक तुमच्या स्वातंत्र्याचे पोवाडे! लंडन, प्यारीस, नाहीं तर न्यूयॉर्क या शहरांत जाऊन प्रत्यक्ष काय होतें आहे तें पहा! ह्या बायकांना हव्या तशा स्वतंत्र वागूं दिल्यानें कसे कसे थेर चालले आहेत ते तिथें पहाण्यास सांपडतील तिथल्या बायकांत किती पाति-व्रत्य आणि नीतिमत्ता राहिली आहे, ती मग कळून येईल!"

"ह्यांत काय आहे? गांव तेथें महारवाडा हा असणारच! तेवढ्यावरून सगळ्यांनाच दोष देतां येणार नाहीं. स्वातंत्र्य जर पुरुषांना हितावह होतें, तर तें बायकांना कां होऊं नये? पण अगोदर ह्याचा दोष पुरुषांकडे आहे. स्त्रियांच्या हातून वाकडें पाऊल पडण्याला कारण पुरुष आहेत. आपल्या

बायकोनें पातिव्रत्यानें रहावें अशी नवऱ्याची इच्छा असेल तर त्यानें अगोदर आपण स्वतः धुतल्या तांदुळासारखें राहिलें पाहिजे."

हें नबाबाचें आवेशाचें भाषण ऐकून क्रिन्सी मोठ्यानें म्हणाली:-"खूप केली नबाबसाहेब! मला नव्हतं ठाऊक येवढे आपण स्त्रियांचे कैवारी आहांत ते! आणि चार्ली, हें काय पण बाई? तुमचीं स्वतःचीं म्हणून जीं मतें होतीं तीं ह्या नबाबसाहेबांच्या तोंडांतून येऊं लागलीं! हें हो काय हें? इतका फरक आपल्या मतांत पडण्याला कारण तरी काय झालं बाई!"

डनबार तर संतापानें लाल झाला. तो म्हणाला, "पुरे हा विषय बुवा! ह्याच्याशिवाय दुसरा कांहीं विषय सुचतच नाहीं का बोलायला?"

इतक्यांत शेजारच्या झाडींतून एक पोरगा धांवत धांवत आला आणि रस्त्यावर उभा राहिला. त्याला पहातांच अमीर आणि क्रिन्सी ह्या दोघांच्या तोंडांतून "प्यारीलाल" हें नांव निघालें. त्या दोघांनींही त्याला ओळखिलें. पण तें पोर कांहींच बोललें नाहीं. त्यानें लगेंच तोंड फिरविलें आणि नदीच्या उतरत्या कांठानें धांवत जाऊन पाण्यांत उडी घेतली. तें पहातांच क्रिन्सी आणि झीनाब दोघीही घाबरून ओरडल्या. डनबार मोठ्यानें हंसूं लागला. तो म्हणाला: "मरूं दे कीं कारटा. गेला असेल आपल्या टाम्याला भेटायला. जा म्हणावें. खुशाल मर जा!"

क्रिन्सी त्याच्याजवळ गेली आणि म्हणाली, "हें काय असं करायचं, चार्ली! आधीं धांवत जाऊन त्या पोराचा प्राण वांचवा कीं!"

डनबार:-"माझें काय अडलें आहे खेटर! त्या पोरासाठीं मी आपला जीव धोक्यांत घालूं वाटतें?"

आतां क्रिन्सी फारच घाबरली. तिनें डनबारकडे पाठ फिरविली तों इकडे नबाब नदीकडे निघालेला तिच्या दृष्टीस पडला. त्यानें नदींत उडी घेतली. हें पाहून ती त्याच्यामागें धांवत नदीच्या कांठापर्यंत गेली. प्यारीलालनें एकदां डोकें वर काढिलें आणि पुनः बुडी मारिली. त्याच्या धोरणानें नबाबानेंही बुडी मारिली. कांहीं वेळ कोणीच वर येईना, तेव्हां क्रिन्सीच्या तोंडचें पाणी पळालें! तिला भीति पडली कीं, दोघेही बुडून तळाशीं तर गेले नाहींत! आणि म्हणून पुनः डनबारची विनवणी करावी म्हणून ती मागें पाहूं लागली. तों तो तिकडे झीनाबबरोबर खुशाल गप्पा मारीत बसला

होता. त्याच्या भाषणांत हास्यरसही पिकलेला तिच्या कानीं आला. तेव्हां तिनें पुनः नदीकडे तोंड फिरविलें, तों अमीर तीराकडे पोहत येत होता, आणि प्यारीलालही त्याच्याबरोबर पोहतच होता. कीन्सीनें आपला हात पुढें करून दोघांनाही वर येण्यास मदत केली आणि नंतर एखाद्या वाघिणीसारखी चवताळून ती प्यारीलालच्या अंगावर खेकसली आणि मोठ्यानें म्हणाली:–"हें रे काय मूर्खा ? पुनः आणखी प्राण द्यायला कां गेलास तूं ?" प्यारीलालनें लज्जेनें मान खालीं घातली नाहीं किंवा ओशाळल्याचें कांहीं चिन्ह दाखविलें नाहीं. तो नुसता हंसत सुटला. नबाबानें येवढें धैर्य केल्याबद्दल कीन्सीनें त्याला शाबासकी दिली. पण अमीर बोलूं लागला, "मी ह्यांत येवढें काय केलें शाबासकीसारखें ? मला कांहीं विशेष करावें लागलें नाहीं. मीं प्यारीलाल धरिला आणि आपला बेत फसला असें जेव्हां एकदांचें त्याला समजलें, तेव्हां तो मुकाट्यानें पोहत माझ्याबरोबर तीराला आला."

प्यारीलाल:–"होय, झालें असेंच. मीच आपण होऊन पोहत परत आलों. आज मुळीं प्राण देण्याचा माझा बेतच नव्हता. मला जो संशय आला होता, तो फेडून घेण्यासाठीं मीं हें सारें सोंग केलें. माझा संशय मी आतां सांगणार नाहीं; पण येवढेंच सुचवून ठेवितों कीं, नबाबसाहेब आणि डनबारसाहेब ह्या दोन हुजुरांपैकीं माझ्यासाठीं पाण्यांत उडी कोण घेतो ह्याची परीक्षा मला पहावयाची होती आणि माझ्या तर्काप्रमाणें डनबारसाहेबांनीं केलें."

कीन्सी–"अहा रे ! येवढी कां ओळख विसरलास ? चुकलास तूं. अमीरांनीं तुझ्यामागें पाण्यांत उडी घेतली. डनबारसाहेब तर..." इतकें बोलून तिनें वाक्य पुरें केलें नाहीं. तिनें आपलें तोंड वळवून डनबारकडे पाहिलें. प्यारीलाल इतक्यांत कांहीं बोलणारही होता, परंतु अमिरानें त्याच्याकडे पाहून त्याला गप्प बसण्याची खूण केली.

पण प्यारीलाल कां असा ऐकणार ? तो तसाच बोलूं लागला–"बस, बस ! माझा संशय फिटला. माझी परीक्षा बरोबर ठरली." आणि आनंदानें खिदळत उड्या मारीत तो तेथून निघून गेला.

डनबार नबाबाच्या जवळ येऊन त्याच्याकडे पाहून म्हणाला–"हं हं ! असें काय ? एकूण त्या चावट पोराचा आपण पुनः प्राण वांचविला म्हणायचा ! पण पहा तुमची काय दशा झाली ती ! ह्या असल्या धूळखाऊ

कारण्यासाठीं मीं आपला हा असला पोषाख खराब करून घेतला नाहीं, हा माझा शहाणपणाच म्हणायचा ! तुम्हांला काय सांगूं ? तुमच्या अंगावर हे कपडे आहेत ना ? ह्यांना सातशें रुपये खर्च आला, सातशें हो ! "

अमीरः—" अहो सातशेंच काय, दहा हजार म्हणा किंवा त्याच्याहून जास्तीसुद्धां रुपये गेले तरी मी घालवीन ! पण एक जीव माझ्या हातून वांचला तर त्यांतच मी अधिक समजेन. "

क्विन्सीः—" मी सुद्धां बाई, असंच केलं असतं ! आपल्या जीवावर उदार होऊन जो दुसऱ्याचा जीव वांचविण्यासाठीं मदत करायला धांवून जात नाहीं, त्याला मी भित्रा समजतें. नबाबसाहेब, तुम्ही अगदीं भिजून चिंब झाला आहांत, तरी लवकर घरीं जाऊन हे ओले कपडे काढून टाकून दुसरे गरम घाला. ह्यामुळें कदाचित तुम्हांला खूप तापसुद्धां येईल. सलाम, बहुत सलाम. चला आपणही जाऊं चालीं ! "

क्विन्सीनें प्रथम नबाबाशीं हस्तांदोलन केलें, आणि नंतर बेगमबरोबरही तोच विधि केला.

झीनाब तिला म्हणालीः—" हें काय बरें ? आतांशीं आमच्याकडे येणं अगदींच टाकल्यासारखं केलं आहे. आतां मुद्दाम एक दिवस बसायला या, बरं कां ? विसरूं नका. "

तिचा आग्रह पाहून क्विन्सीनें " होय " म्हटलें.

अमीराकडे डनबारनें पाहिलें सुद्धां नाहीं, परंतु त्यानें झीनाबचें हस्तांदोलन केलें आणि तिला हळूच म्हणाला—" मी काय बोललों, त्याचा नीट विचार करून काय तें ठरव ! "

घरीं गेल्यावर निजायला जाण्यापूर्वीं झीनाबनें डनबारचें जें कांहीं बोलणें झालें होतें, तें सर्व नगीबनला सांगितलें. ती म्हणालीः—" नगीबन ! हें बघ, आपण केलेला सर्व बेत फसला. नबाब माझ्याशीं बोलतो, बसतो, हंसतो, खेळतो, पण हें सर्व निरुपयोगी आहे. माझ्या अंगाचा झालेला भडका अशानें कां शांत होणार आहे ? तो अगदींच थंड, ढिला ! जणूं काय आपली बहीणच तो मला समजतो. मी त्याची उपभोगाची स्त्री आहें, अशा प्रकारचा विकार तो आपल्याला शिवूंच देत नाहीं. मला तो अंजिराचं झाड मानितो, मी द्राक्षवेल आहें अशी त्याची भावना नाहींच. अंजिराचीं फळं

चाखूं नयेत अशी अल्लाची आज्ञा आहे, आणि म्हणून माझं तो सर्व प्रकारांनीं कौतुक करितो, परंतु फळांचा उपभोग घेण्यास कचरतो. ”

नगीबनः—“ पण बाईसाहेब, त्यांचं मन मोठं कोवळं दिसतं. शिवाय ते मोठे शूर आहेत. आपला गाडीवाला सांगत होता कीं, फेरल ‘ मिशी ’ बरोबर लग्न ठरलेल्या हुजूरनीं नदींत उडी टाकण्याचं नाहीं म्हटल्याबरोबर इकडे ह्या नबाब—”

झीनाबला लज्जेनें तोंड खालीं घालावें लागलें. परंतु डनबारचा कैवार घेऊन ती म्हणाली—“ पण डनबार हुजूरनीं निराळंच काम योजिलं होतं—”

“ हं हं ! असं काय ? समजल्यें मी—आपल्याशीं गप्पा सांगण्याचंच कीं नाहीं तें ? ”

“ होय गडे, नगीबन. प्रेमाचं भाषण कसं करावं, हें त्यांनाच समजतं गडे ! नुसता बोलाचा स्नेह आणि कोरडं शूरत्व करायचं काय बाई ? त्याच्याबरोबर प्रेम हें अवश्य पाहिजेच. हें बघ पोरी, तुलाच कसं वाटेल सांग ? तुझ्यावर खरं प्रेम करणारा कोणी माणूस नसला तर तुला कांहीं सुख वाटेल कां ह्या जगांत ? ”

नगीबननें मानेनेंच नाहीं म्हणून उत्तर दिलें. तिनें आजपर्यंत असे कित्येक प्रेमी पुरुष जोडलेले होते. झीनाब पुढें बोलूं लागली—“ मग माझंही तसंच झालं आहे. ह्या डनबार हुजूरचं प्रेम मजवर बसलं आहे बाई ! ”

“ पण त्यांचं लग्न ठरलं आहे ना व्हायचं ? ”

“ होय, होईना लग्न झालं तर ? तें कसं थांबेल ? पण त्या पोरीचं लक्ष दिसत आहे नबाबसाहेबांवर, आणि त्यांचंही प्रेम दिसतं आहे तिच्यावर !”

“ काय म्हणतां ? ”

“ हें त्या हुजूरनींच मला सांगितलं, आणि मी ह्या डोळ्यांनीं ज्या कांहीं गोष्टी पाहिल्या त्यांवरून तरी तेंच खरं ! बरं असो म्हणा. हुजूर त्या पोरीशीं लग्न तर लावणारच; पण इकडे नबाबांनीं जसं माझ्याशीं वर्तन केलं तसंच तिकडेहि ते करणार ? ”

“ आणि खराखुरा संबंध आपल्याशीं ठेवणार ? कां, असंच ना ? ”

“ होय, पण मी कबूल झाल्यें तर ! ”

“ काय म्हणतां ? तर मग आपला निश्चय व्हावयाचा आहेच अजून ?”

" त्या वेळीं तेथल्या तेथें लगेच होय म्हणून उत्तर माझ्यानं देववेना. "

" पण त्यांच्या म्हणण्याप्रमाणं कबूल करायचं आपल्या मनांतून आहेना?

" अग खरं, परंतु त्यांना आपल्या जनानखान्यांत कसं आणतां येईल?"

" बाईसाहेब, हें तर अगदींच सोपं. नबाबसाहेब रात्रीं इकडे कधींच येत नाहींत. त्यांना येथपर्यंत येऊं द्या ह्मणजे मी दार उघडून आंत घेईन."

हें ऐकून झीनाबनें आपल्या दासीच्या गळ्यांत मिठी घातली आणि तिचें चुंबनही घेतलें.

ती म्हणाली—" माझं मन थोडंसं डळमळत होतं. पण तूं आतां अशी मदत करायला तयार आहेस, हें पाहून माझा निश्चय झाला आतां."

" अल्ला, या अल्ला! बाईसाहेब, माझ्याबद्दल आपल्याला शंका कां बरं वाटली? माझ्याइतकी आपल्यावर कोणाची तरी भक्ति आहे कां? अहो, अशा एकालाच कां, आपण हूं म्हणण्याचा अवकाश, मी एक सोडून हजार पुरुष इकडे आणून देत्यें कीं!"

ह्याबद्दल मात्र शंका नव्हती. तिनें तसें केलेंही असतें!

नबाबावर क्लिन्सीचें प्रेम आहे, हें जें डनबारनें झीनाबला सांगितलें तें निव्वळ खोटें होतें. परंतु तिच्या मनांत डनबारविषयीं द्वेष, निदान दुजाभाव तरी उत्पन्न झाला होता, येवढी गोष्ट मात्र खरी होती. डनबारच्या एकंदर वर्तनांत उघड दिसण्याइतका फरक पडला असल्यामुळें तो क्लिन्सीच्या लक्षांत आल्यावांचून राहिला नाहीं; आणि आज जो नदीवर प्रकार घडला त्यामुळें असल्या भित्र्या आणि क्षुद्र विचाराच्या इसमाबरोबर एक महिन्याच्या आंत आपलें लग्न व्हावयाचें ठरलें असल्याबद्दल तिच्या मनाला वाईट वाटूं लागलें. त्याप्रमाणेंच नबाबाच्या स्वभावांतही पालट पडला आहे, हें तिनें ओळखिलें. त्याचें मन आतां किती तरी प्रेमळ बनलें होतें! डनबारची व तिची प्रथम गांठ पडली, त्या वेळच्या त्याच्या वर्तनाची साम्यता आतां नबाबाच्या वर्तनांत तिला भासूं लागली आणि नबाबाच्या डोळ्यांत एक प्रकारचें विलक्षण तेज चमकूं लागलेलें पाहून तिला त्याच्यावरून दृष्टि हालवेना; आणि हाही प्रकार खाणावळींत प्रथम डनबारची भेट झाली त्या वेळेसारखाच होता.

घरीं गेल्यावर क्लिन्सीनें ह्या सर्व गोष्टी बापाजवळ सांगितल्या; परंतु आज म्हातारा रोजच्यासारख्या स्थितींत नव्हता. त्याची प्रकृति अस्वस्थ होती. आज

दोन दिवस त्याला बरें वाटत नव्हतें, तरी सुद्धां ह्या दोहोंपैकीं एक दिवस सुद्धां डनबार त्याच्या खोलींत त्याच्या समाचाराला आला नाहीं. तेव्हां कीन्सीला हातारा ह्मणाला–"बाळे, मला सुद्धां तसेंच वाटतें. चार्लीमध्यें पहिल्या-पेक्षां पुष्कळ फरक झाला आहे, ही गोष्ट माझ्यासुद्धां ध्यानांत आली आहे. पण त्यानें जो परलोकज्ञानाचा प्रयोग करून घेतला, त्यांत त्याच्या मेंदूला कांहीं तरी श्रम पडले असतील आणि त्याचा हा परिणाम असेल, असें मला वाटत होतें. समजलीसना, मी काय म्हणतों तें ? पण बाळे, तो विकार सदोदित रहायला कां बसला आहे ? तो हळूहळु कमी होत जाऊन अखेर अगदीं नाहींसा होईल."

"पण बाबा, मला तर असं वाटूं लागलं आहे कीं, मजवर त्याचं मुळींच प्रेम नाहीं. आज तो नबाबाच्या बिबीपाशीं किती रंगांत आला होता म्हणून सांगूं! जर आपण आज आमच्याबरोबर असतां, तर आपल्यासुद्धां लक्षांत हें आलं असतं. आणि ती बया तरी–होय गडे, आत्तां माझ्या लक्षांत आलं–मघाशीं मला त्याचं भानच नव्हतं. नबाब जर तिच्याशीं कोणच्याच प्रकारचा संबंध ठेवीत नाहीं, तर मग ती तरी अशी कशी राहील ? ती दिस-ण्याला फारच सुरेख आहे, पण तिची कृति चांगली नाहीं आजपर्यंत मी तिला फार चांगली समजत होत्यें."

"पण चार्लीला तर तुझ्याशीं लग्न लावण्याची घाई झाली आहे ह्मणतेस!"

"होय बाई. त्याची त्याबद्दल एकसारखी टुमणी लागली आहे. आज पुनः त्यानं तीच गोष्ट काढली होती, आणि उद्यां लग्न लावून टाकूं या, उगाच आढेवेढे घेऊं नको, असं त्याचं म्हणणं चाललं होतं. पण बाबा, तुम्ही कांहीं म्हणा, त्याचं माझ्यावर आतां प्रेम नाहीं खास. निदान मला तरी असं वाटतं. काय करूं हो बाबा! त्याची माझी मुळीच ओळख झाली नसती आणि त्यानं माझं प्रेम असं लावून घेतलं नसतं, तर बरं झालं असतं. बाबा, त्याच्याबरोबर सुंदर संसार थाटीन, ह्मणून मी काय काय बेत केले होते! पण देवाच्या मनांतच तें नाहीं असं दिसतं. बाबा, मी असं कोणचं पातक केलं कीं, देवानं असं मला तोंडघशीं पाडलं तें!"

"छे छे, बाळे! असें काय भलतेंच बोलतेस ती ? देवाला दोष उगाच कां लावावा ? आपल्याला अनन्यभावेंकरून शरण असलेल्याचें रक्षण

करण्यास तो तर नेहमीं तिष्ठत उभा आहे. त्याच्यावर तूं पूर्ण विश्वास ठेव. किती रडशील मुली? बस कर आतां. चल, इकडे ये कशी. डोळे पूस आधीं. ये अशी जवळ आणि पुन: असें देवाला नांव ठेवून कुरकुर करणार नाहीं असें मला सांग पाहूं?"

म्हातारा अगदींच ऐकेना. तेव्हां कीन्सी डोळे पुसून त्याच्याजवळ गेली, आणि पित्याच्या हाताचा स्पर्श झाल्याबरोबर ती एकाएकीं भ्याली आणि म्हणाली— "बाबा, हें हो काय? तुमच्या अंगांत किती भयंकर ताप आहे हा! माझ्या हाताला विस्तव लागल्याप्रमाणें झालं!"

"होय बाळे, मला फार ताप भरला आहे, पण आज तूं माझ्यासाठीं जागत बसूं नको. अशानें तुझी प्रकृति बिघडायची!"

"मग मी काय दुसरं करूं? डाक्तर गिल्बर्टना बोलावून आणूं का, म्हणून मी विचारलं तर तुम्हीच नको म्हणतां. पण आज मी ऐकायची नाहीं; त्यांना आणतें, म्हणजे पहा ते आत्तां तुमचा ताप घालवितील!"

"बरें, बरें. उद्यां सकाळीं त्यांना आणवितों असें मीच कबूल केल्यानंतर आतां तर जागत बसण्याचा हट्ट सोडशील ना? जा, आतां स्वस्थ जाऊन नीज कशी!"

"होय, मी जाऊन निजतें! पण रात्रीं जर कांहीं जास्त घाबरल्यासारखें वाटलं, तर मला हांक मारून जागं करण्याचं कबूल करा आधीं! तसं नकोच पण. मीच आपलं अंथरूण तुमच्या खोलींत घेऊन येतें आणि तुमच्याजवळ झोंपतें. हाय रे देवा! बाबा, तुमच्यावांचून मला मायेचं असं कोणी-कोणी उरलं नाहीं कीं हो!"

"उगी, उगी बाळ! असें पुन: पुन: रडूं नये! जा, आण अंथरूण या माझ्या खोलींत. मला जास्त कमी कांहीं घाबरल्यासारखें वाटलें तर मी तुला हाक मारून उठवीन. आतां तर झालें ना तुझ्या मनासारखें?"

---

# प्रकरण २० वें,

## कुसंबी बेगमचा प्रवास.

सिव्हिल सर्जनेनें येऊन फेरेलची तपासणी केली आणि सांगितलें कीं, " विशेष भिण्याचें कारण नाहीं. त्याचा ताप साधाच असून तोही इतका मोठा वाढलेला नाहीं, आणि मीं हें दिलेलें औषध घेतलें म्हणजे तो आतां कमी होईल. " डॉ. गिलबर्ट आणखी म्हणाले, " मी आतांच नबाबाच्या वाड्यांतून आलों. नबाब फार आजारी आहे. एका पोराचा जीव वांचविण्यासाठीं त्यानें नदींत उडी टाकल्यामुळें थंडी ताप भरला असून त्यांना ' निमोनिया ' होण्याचाही संभव आहे. तेव्हा मला त्याचें ठीक चिन्ह दिसत नाहीं. "

कॅनिंग्ज म्हणाली–" ईश्वर करो आणि ह्या दुखण्यांतून तो बरा होवो. "

फेरेल म्हातारा ह्मणाला—" आपल्यासारखाच दुसऱ्याला जीव प्यारा आहे, म्हणून तो वांचविण्यासाठीं जो कोणी आपल्या जिवाची पर्वा करणार नाहीं, त्याच्या ठिकाणीं खरी भूतदया आहे असें समजावें. "

डाक्तर—" होय, तुम्ही म्हणतां तें खरें आहे. अलिकडे नबाबाच्या स्वभावांत फारच फरक पडला आहे. मी तर ह्या धंद्यासंबंधानें त्याच्याकडे नेहमीच जातों. तें माझें कायमचें गिऱ्हाईक आहे. ह्यापूर्वीं अमिराविषयीं माझें मत चांगलें नव्हतें, पण हल्लीं त्याच्या वर्तनामध्यें इतका बिलक्षण पालट झाला आहे कीं, त्याची आतां आमच्या बरोबरीनें सभ्य लोकांत गणना करण्यास हरकत नाहीं. आतां तो फार कनवाळू आणि परहितदक्ष बनला आहे. त्याचें वाचनही बरेंच दांडगें दिसतें. आज सकाळींच पहा, मी त्याची प्रकृति पहाण्यास गेलों होतों, त्या वेळीं माझ्याशीं किती तरी वेळ बोलत होता, आणि 'मृत्यूनंतर जीवात्म्याचें काय होत असेल,' या विषयावर चांगलें मुद्देसूद भाषण त्यांच्या तोंडचें ऐकावयास मिळालें. मला स्वतः या विषयाची आवड आहे. बोलतां बोलतां नबाबानें मला आणखी एक चमत्कारिक सूचना करून ठेविली आहे. तो मला ह्मणाला, ' एक अभूतपूर्व बिलक्षण प्रकार घडून आला आहे; परंतु कांहीं कारणास्तव तो इतक्यांत उघड सांगतां येत

नाहीं.' ह्यावरून त्याच्या मनांत कांहीं तरी घोंटाळत आहे खास. त्यासाठीं मीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ती गोष्ट त्याच्याकडून मला थोडीसुद्धां काढितां आली नाहीं. "

कॅन्सी मोठ्या कळवळ्यानें म्हणाली—" पण त्याची शुश्रूषा नीट करायला कोणी आहे कां हो ? "

" बलरामपुराहून वैथिल दाईला मुद्दाम आणविली आहे. ती नर्स फार निष्णात असून तिला असल्या कामाचा फार वर्षांचा अनुभव आहे. हो, बरी आठवण झाली. मला नबाबानें सांगितलें आहे कीं, त्यानें नदींतून काढलेल्या प्यारीलालचा शोध लागला तर काढा म्हणून. पण आतां तें पोर शोधावें तरी कुठें ? "

कॅन्सी—" डनबारच्याजवळून तो निघून गेला तेव्हां मला भेटला होता. त्या वेळीं तो मला म्हणाला कीं, मी बेगम कुसंबीकडे जातों. "

" तर मग तिकडे त्याचा तपास करितों. माझी बेगमची चांगली ओळख आहे. मी तिच्या जहागिरीच्या बंगल्यावर कितीदां तरी गेलों आहें. आज ती इथेंच लखनौंतील आपल्या महालांत आहे, असें मला समजलें आहे. बरें झालें, ही प्यारीलालची बातमी तुम्हीं मला सांगितली. अरेरे ! गरीब बिचार नबाब ! त्याच्या मनांतलें कांहीं तरी काम माझ्या हातून घडो अशी माझी फार इच्छा आहे. "

कॅन्सी—" पण तुमचे उद्गार सारे निराशेचे दिसतात कीं हो ? ह्या दुखण्यांतून नबाब आतां उठणार नाहीं असं कां तुमचं म्हणणं आहे ? "

" होय तसेंच ! त्याच्या रक्ताशयाची क्रिया बरोबर चालत नाहीं. ह्यापेक्षांही त्याचा ताप चढणार आहे. बरें तर मी येतों आतां ! मला पुष्कळ ठिकाणीं जायचें आहे. तुमचे बाबा आज संध्याकाळला चांगले बरे होतील. पण हें पहा ! ह्या औषधाचा हा दुसरा भाग देऊन झाल्यावरही कांहीं वेळानें ताप उतरला तर मला एक दोन बोटाची चिठ्ठी पाठवा म्हणजे झालें. मी आतां अगोदर त्या प्यारीलालचा तपास लावितों. "

कॅन्सी म्हणाली—" पहा पहा ! तुम्हांला तो सांपडून, तुमच्या तरी हाताला यश येवो ! "

अमीराचें व माझें पूर्वीप्रमाणें सख्य नाहीं, असें आतां डनबारनें सांगि-

तल्यावरून कॉन्सीलाही तसेंच वाटूं लागलें होतें. पण ती मैत्री कमी होण्याचें ? कारण त्यानें सांगितलें तें मात्र चमत्कारिक होतें. कॉन्सीला मागें पळवून नेलें होतें, त्या कामांत मुख्य अंग नबाबाचें होतें, असें तो आतां म्हणूं लागला होता. ह्यावरून अमीराचें दुखणें जिवाबरचें आहे, असें कॉन्सीनें डनबारला सांगितल्यावर त्याला त्याबद्दल विशेष कांहीं वाटावयाला नको होतें. परंतु ती हकीगत त्यानें ऐकतांच त्याच्या मुखावर चिंतेचेंच नव्हे, तर दुःखाचेंसुद्धां स्पष्ट चिन्ह दिसूं लागलें. तें कॉन्सीनें पहातांच तिला त्याचें फार नवल वाटलें. म्हणून ती त्याला म्हणाली—" असं काय ? तर मग माझा तर्क अगदींच चुकला. अद्यापही अमीराबद्दल आपल्या मनांत मित्र-भाव जागृत आहे म्हणायचा ? "

डनबारनें कॉन्सीला पुरतें बोलूं दिलें नाहीं. तो मध्येंच ह्मणालाः–" छे, छे ! तसें कांहीं नाहीं. मला तो तर दृष्टीसमोर सुद्धां नको. मला त्याच्या-बद्दल कांहींच वाईट वाटलें नाहीं. पण त्याच्या बिचाऱ्या बायकोची स्थिति माझ्या मनांत उभी राहते. बरें, पण तें जाऊं दे ! मीं तुला म्हटलें होतें, त्याचें तूं काय ठरविलेंस ? कोठवर आली आहे लग्नाची तयारी ! "

तेव्हां कॉन्सी चपापून म्हणाली—" त्याचं होय ? माझं आतां अगदीं नक्की ठरलं आहे त्याबद्दल बरं कां ? आपला जो पहिला बेत ठरला आहे, त्या दिवसाच्या आधीं मला लग्नच करायचं नाहीं. आतां पुनः या बाबतींत प्रश्न काढूं नये गडे ! "

" अरेरे ! बरें तसें कां होईना ? त्यांत कांहीं मोठेंसें बिघडत नाहीं. बरें तर मी आतां जातों. रागाऊं नको ! कोणी तरी माझ्याकडे आलें आहे तें बघ, खाबूर कोणालासा घेऊन येतो आहे. "

खाबूरबरोबर येणाऱ्या दासीला आपण कोठें तरी पूर्वीं पाहिली असावी असें कॉन्सीला वाटलें, आणि थोड्या वेळानें तिनें तिला पक्की ओळखली. ती तर ' नगीना '–झीनायची दासी ! तें पाहतांच कॉन्सी तेथून उठली आणि आपल्या खोलींत निघून गेली. ती आपल्याशीं ह्मणाली–" असं असं ! हं, आतां आलं सारं ध्यानांत. ह्मणूनच चार्लीची स्वारी इतकी आज परक्या-सारखं वागत होती ती ! तरीच बरं ! ती दासी खास बेगमकडून कांहींतरी निरोप घेऊन आली असेल न् दुसरं काय ? "

× × × × × × ×

कुसुंबी बेगमच्या महालाच्या पुढच्या दरवाज्याशीं डाक्तरसाहेब जातात तों तेथें घोड्याची गाडी तयार केलेली उभी होती, आणि तेथून थोड्याशा अंतरावर बैलाचा एक खटारा होता. त्यांत कांहीं पेट्या आणि वळकट्या भरून दोरीनें आवळल्या होत्या. बेगमची एक खूपसुरत दासी चांदबीबी तिथेंच उभी होती. तिनें डाक्तरसाहेबांना पहातांच मुजरा केला आणि त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर ह्मणून ती बोलूं लागली—"बेगमसाहेब आंत आहेत, पण आपण अगदीं भलत्या वेळेला आलां. ह्या वेळीं त्यांची तब्बेत तितकी चांगली नाहीं. आज आपण आल्यानं त्यांना मुळींच बरं वाटण्यासारखं नाहीं."

तिच्या उत्तराचें आश्चर्य वाटल्यासारखी बतावणी करून गिल्बर्टसाहेब ह्मणाले—"ह्मणजे काय ? आज आमच्यावर इतका रुसांवा का झाला आहे ? दुसऱ्या एखाद्या गुलचमनकडे उगीच वाकड्या नजरेनें आम्हीं पाहिलेलें बेगमसाहेबांनीं पकडलें आहे कीं काय ? काय सांगूं तुला ? पण माझें प्रेम एकटे तिच्यावर, आहे, आणि तें तिला ठाऊकही आहे !"

डाक्तरांच्या ह्या उत्तराला मोठ्यानें हंसून चांदबीबी ह्मणाली—"छे छे ! तसं कांहीं नव्हे. आपल्या प्रेमाची बेगमसाहेबांना खात्री आहे. आपण ह्मणतां त्यापेक्षां पुरुषांनीं आणखी तें काय करायचं बाई ? पण आज हें कांहींच मुळीं नाहीं. त्या आज फार घाईत आहेत. त्यांची लांबच्या प्रवासाला जाण्याची अगदीं तयारी झाली आहे."

"अरेच्या ! असें कां कांहीं आहे ? आतां माझा जीव थोडासा खालीं झाला. सारांश, तिचें माझ्यावरच प्रेम आहे ह्मणायचें ?"

"असेल तर !"

"बरें बरें, जाऊं दे तें ! हा नाजूक विषय कशाला घ्या उगीच वादाला ? चल पुढें, बेगमसाहेब कोठें आहेत त्या मला दाखीव ! माझें काम फारसें नाहीं; पांचचार मिनिटांत मी काम संपवून जाईन."

चांदबिबीनें डाक्टरसाहेबांस एका मोठ्या दिवाणखान्यांत नेलें; तो फारच उत्तम शृंगारलेला होता, तेथें चोहोंकडे सुंदर आरास केलेली होती. विलायती व देशी दोन्ही तऱ्हेचें सामान तेथें मांडिलेलें होतें. जमिनीवर मोठा थोरला जाड गालीचा अंथरला होता. कांहीं खुर्च्या व कोचें ठेवलेलीं होतीं,

आणि एकदोन भिंतीच्या जवळ उंच उंच पराच्या गाद्या घातल्या असून भिंतीला टेंकून तक्के व लोड मांडलेले होते. दिवाणखान्याच्या बाहेर जाळ्या लावून त्यावर जाईजुई वगैरे सुगंधी पुष्पांच्या वेलांस ताटवेवजा आकार दिला होता. त्या ऋतूंतलि कांहीं पुष्पें विकास पावल्यामुळें दिवाणखान्यांत त्यांचा सुगंध दरवळला होता. अशा ठिकाणीं साधारण माणूस उत्तेजित होऊन दंग होणें साहजिक आहे. भिंतीवर टांगलेल्या चित्रांत प्यारीसहून मुद्दाम आणविलेलीं अर्ध्यामुर्ध्या नग्न स्त्रियांचींहि चित्रें होतीं, परंतु ह्या वेळीं डाक्टरसाहेबांचें लक्ष तिकडे वेधण्याच्या स्थितींत नव्हतें. नदीमध्यें स्नान केल्यानंतर अर्धविगलित वसनें सांवरून उन्हामध्यें अंग वाळवीत बसलेल्या युवतींचा समूह किंवा खडकाला साखळदंडानें बांधून टाकलेल्या अंद्रोमेडाचें अप्रतिम सौंदर्य पाहण्याकडे डाक्टरसाहेबांचें मन ह्या वेळीं लागेना. एकतर ह्यावेळीं त्यांच्या डोक्यांत निराळेच विचार चालले होते, आणि दुसरें असें कीं, ह्या दिवाणखान्यांत येण्याची डाक्टरसाहेबांची पहिलीच खेप नव्हती. त्यांतल्या कांहीं तसबिरी तर डाक्टरसाहेबांनीं सुचविल्यावरूनच आणविलेल्या होत्या. डाक्टरसाहेब तेथल्या एका गादीवरच आडवे झाले आणि बेगमचें कुलुंगें कुत्रें तेथें होतें त्याच्याशीं ते खेळूं लागले. इतक्यांत बेगमसाहेब आल्या; त्याबरोबर डाक्टर उठून उभे राहिले आणि बेगमसाहेबांचा हात धरून त्यांनीं त्यांच्याशीं हस्तोलंदन केलें. ते म्हणाले— " माझे हृदयजोत्स्ने, आज कळी अशी कां कोमेजली आहे ? "

बेगमः— " मला जरा बरं वाटत नाहीं."

" काय होतें बरें ? हें ऐकल्याबरोबर मला चैन पडेनासें झालें. पाहूं आपली जीभ ? "

बेगम स्मितहास्य करून त्याच्याकडे वांकड्या नजरेनें पाहून म्हणाली— " जीभ पाहायची इच्छा आहे किंवा तिची कृति ऐकायची आहे ? "

" तिच्यापासून उगम पावणाऱ्या मधुर गायनास नको कोण ह्मणेल ? "

" तर मग बसायचं जरा, हुजूर. आज सर्व हें औपचारिक भाषण सोडून देऊन थोडंसं सरळ बोलतें. मला कांहीं निकडीचं काम आहे. एक तासाच्या आंत लखनौच्या बाहेर पडेन तरच तें साधेल. अजून माझी सारी बांधाबांधसुद्धां झाली नाहीं. आपलं काय काम आहे बरं ? कांहीं तरी विशेष

कामासाठीं आपलं येणं झालं आहे असं मला समजलं आहे."

" नवाब आजारी आहे,ही बातमी आपल्या कानावर आली असेलच."

बेगमनें होय म्हणून मानेनेंच सुचविलें.

डाक्टरसाहेब पुढें बोलूं लागले— " आज सकाळीं मी त्यांच्याकडे गेलों होतों. त्यांनीं मला सांगितलें कीं, प्यारीलाल नांवाचें पोर आहे. तेवढें शोधून घेऊन या. मी त्याच्याबद्दल चौकशी केली, त्यांत तें पोर आपल्या-कडे आलें आहे, असें समजलें."

" होय. तें सारं खरं; पण तो प्यारीलाल कांहीं महत्वाच्या कामासाठी काशीस गेला आहे, आणि उद्यां रात्रीच्या आंत तो परत येण्याचा संभव नाहीं. मी जी इथून आज निघणार आहें, ती माझा भाऊ काश्मीराहून दिल्लीस हुमायूनच्या कबरीपुढं प्रार्थना करण्यासाठीं आला आहे, त्याच्या-कडे जात आहें. मीसुद्धां बहुधा उद्यां रात्रीं परत येईन. तेव्हां त्यानंतर आपण इकडे येऊन भेट द्यावी, पण तोंपर्यंत तरी कसंही करून नवाबाला मरूं देऊं नका."

" हें मीं कसें कबूल करूं ? माझ्या अजमासाप्रमाणें त्याला इतक्यांत भीतिसारखें कांहीं झालेलें नाहीं परंतु ह्या आठवड्याच्या पुढें तो साफ जगत नाहीं, हें मात्र खास."

" कांहीं असो. आपण वरचेवर त्याचा समाचार घेत जा. प्यारीलाल तरी त्याच्या कामालाच गेला आहे आणि मीसुद्धां त्याच्यासाठींच प्रवासाला जात आहे. ह्याच्यापासून कांहीं तरी विलक्षणच गोष्टी घडून येणार आहेत. काय, आपलं लक्ष आहेना मी बोलतें त्याकडे!"

" होय, आहे तर ? पण हें असें सारें संदिग्ध भाषण कां ? मला त्या-तलें थोडें बहुत स्पष्ट सांगितलें तर चालण्यासारखें नाहीं काय ? "

"अशक्य ! अशक्य ! अशक्य ! तें गूढ कांहीं इतकें चमत्कारिक आहे कीं, तें चटकन आपल्या लक्षांत येणार नाहीं, आणि त्यासाठींच तर मी आपल्या भावाकडे निघालें आहें, माझी त्याची गांठ पडून तो जर माझ्या-बरोबर आला, तर मग मी उद्यां माझ्यावरील आपल्या प्रेमाची--पण तों-पर्यंत कांहीं विचारूं नका. आतां जावं अगोदर, चलावं आधीं ! "

डाक्टर जायला निघाले होते, इतक्यांत चांदबिबीनें एक चिठ्ठी आणून

बेगमच्या हातांत दिली. ती वाचून पाहून ती मोठ्यानें म्हणाली--
" अरेच्या ! हें तर फार उत्तम झालं. हुजूर, उद्यां जी आपल्याला विनंति करणार होते, ती आतांच करून ठेवतें. उद्यां डनबारला आपण असं कांहीं तरी झोंपेचं औषध द्या, कीं, त्याला आम्ही उचलून नेलं तर मुळींच समजणार नाहीं."

डाक्तरसाहेब चपापले आणि मोठ्यानें म्हणाले, " अरे बापरे ! हें हो तुह्मी काय सांगतां ? "

बेगमनें त्याला विश्वास उत्पन्न होण्यासारख्या स्वरानें म्हटलें ! " हं. हं. इतकं कांहीं भ्यायला नको बरं ! मीं जें एक मोठें काम करण्याचं हातीं घेतलं आहे, त्याचाच हा उपक्रम आहे. ( पुनः विचार करून ) असो म्हणा. आतां मला वाटतं कीं, तुमच्या त्या झोंपेच्या औषधाचं कारण पडणार नाहीं. ह्या चिठ्ठींत काय बातमी आहे, सांगा पाहूं ? आज रात्रीं आठ वाजल्यावर डनबारसाहेब कोणास न कळवितां गुपचुप नबाबाच्या बिबीच्या महालांत जाणार आहेत; समजलां ? "

डॉक्टरसाहेबांना फारच आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " काय, म्हणतां तरी काय हें ? एक महिन्यापूर्वींचा डनबार आतां अगदींच उरला नाहीं, असें म्हणायला मी सुद्धां तयार आहें. तरी पण आपण बोलतां ही गोष्ट अगदीं अशक्य."

" हं, बरोबर म्हटलंत. एक महिन्यामागचा डनबार राहिला नाहीं खराच. आतां आज तो तिकडे जातो कीं नाहीं हें प्रत्यक्षच आपल्या दृष्टीस पडेल, मग झालं कीं नाहीं ? त्या वेळीं आपण नबाबाकडे मुद्दाम जा, ही माझी विनंति आहे. तुम्ही तेथें बसलेले असतांनाच एक नोकर तुम्हांला सूचना द्यायला येईल, त्याच्याबरोबर तुम्ही झनानखान्याकडे जा आणि तिकडे जाऊन डनबार सांपडला कीं त्याला पकडून ठेवा. "

" पण माझें काय काम आहे ? मी कशाला पाहिजे तेथें ? "

" आपण असलांत म्हणजे उगाच जास्त कमी प्राणहानि होणार नाहीं. न जाणों डनबार दांडगाईला आला तर ? तो जर तक्रार करूं लागला तर तुम्ही त्याला सांगा कीं, मुकाट्यानं ह्यांच्याबरोबर जा; तुमचे कोणी हाल करणार नाहीं आणि तुमची लवकरच सुटकाही होईल. "

" म्हणजे? त्याला अटकेंत ठेवायचा बेत आहे होय?"

" होय. पण त्याबद्दल आपल्याला मी कांहीं दोष लागूं देणार नाहीं, त्याची सर्व जबाबदारी मीं पतकरली आहे. डनबारला कुरकुर करायला कांहीं जागा रहाणार नाहीं अशी व्यवस्था मीं केली आहे. तो घरांत शिरून जो गुन्हा करील, त्याच्याबद्दल त्याच्यावर फौजदारी करण्याचा विचार नाहीं; आणि 'बेगमच्या महालांत मी गेलों होतों; तिथं मला धरलं' असं सांगायला त्यालाहि पण तोंड कसं असेल?"

तथापि डाक्तरसाहेबांची मुद्रा प्रसन्न झाली नाहीं; ते खिन्नतेनें म्हणाले, " मला ह्या कामांत कां घालतां? मला नको हें. परंतु मला असें वाटतें कीं, डनबार तिकडे जाणारच नाहीं आणि मला तुमच्या हुकमाप्रमाणें वागण्याचें कामच पडणार नाहीं; तेव्हां मग उगीच, हो, म्हणायला काय जातें, म्हणूनच मी होय म्हणतों."

" बरं, तसं कां होईना. ही तरी मेहेरबानीच म्हणायची आपली. आतां मला वेळ नाहीं; माझी नटि बांधाबांधी झालेली नाहीं; तेव्हां सलाम, अनेक सलाम."

त्या दिवशीं डाक्तर गिल्बर्ट हे अमिराची प्रकृति पहाण्यासाठीं कित्येकदा खेपा घालून आले; आणि रात्रीं तर ते तेथेंच बसून राहिले. रात्रीचे अकरा वाजले तरी कोणी बोलवायला आलें नाहीं, त्यावरून डाक्तरना वाटूं लागलें कीं, ही बहुधा खाबूरनें कुसुंबी बेगमला बातमी दिली असावी आणि त्यांत खाबूरचा गैरसमज होऊन कांहीं तरी चूक झाली असावी. असा त्याचा विचार चालला आहे, इतक्यांत एक मनुष्य आलाच. त्याला पहातांच डाक्तर चमापले; ते म्हणाले, " अरेच्या, हें कांहीं चुकत नाहीं. मला आतां गेलेंच पाहिजे. पण ह्या कामांत मी मुळींच पडलों नसतों तर फार बरें झालें असतें."

तो मोठ्या नाखुषीनें त्या बोलावणाऱ्याच्या मागोमाग निघाला; झनानखान्याच्या दाराशीं ते गेले, तो तेथें नगीबन उभी होती; डा. गिल्बर्ट साहेब ह्यांना पहातांच तिनें रागाचें सोंग आणून " पुढें येऊन नको, निघून जा" असें ती सांगूं लागली. हे कांहीं आपलें ऐकत नाहींत आणि आतां आंत शिरल्याशिवाय रहात नाहींत, असें समजतांच ती जिन्याकडे धांवत

निघाली; परंतु तेथें अगखी गिल्बर्टसाहेबाबरोबर आलेला मनुष्य अल्ली होता; त्यानें धांवत जाऊन तिला अडविली आणि तिच्या तोंडांत बोळा देऊन तिचे हातपाय बांधून टाकिले. आणि तिला जिन्याच्या खालीं ठेवून दिली. तो गिल्बर्टना म्हणाला, " माडीवर दोन जबान मी दबा धरून बसविले आहेत, आपण आंत शिरल्याबरोबर ते धांवून येतील. आणि डनबार हुजूरला धरतील."

गिल्बर्टनें कांहींच उत्तर केलें नाहीं; अल्लीच्या मागोमाग जिना चढून ते गेले. वर गेल्यावर एक बोळासारखी वाट लागली: तेथून पुढें गेल्यावर दारावर पडदे सोडलेली एक खोली आली. आंत कोणी तरी माणसें बोलत आहेत असें ऐकूं येत होतें. अल्लीनें पडदा बाजूला केला, तों आंतील महालांत दिव्यांचा लखलखाट होता, डनबार आणि झनिाब दोघे एका मंचकावर बसलीं होतीं. डनबारनें तिच्या कमरेला हाताचा विळखा घातला होता, आणि तिच्या तोंडाकडे पहातां पहातां तो मोठ्या रंगांत आला होता. डाक्तरसाहेब आणि अल्ली एकदम खोलींत शिरले, त्यांना पहातांच झीनाबनें एक किंकाळी मारली आणि ती पलंगावरून उठून पुढें आली. डनबार उठून तोहि दोघांच्या अंगावर आला, पण दुसऱ्या वाटेनें तेथें लपलेले शिपाई धांवत आले आणि त्यांनी डनबारला धरलें. अल्लीनें पुढें धांवत जाऊन त्या दोघांना मदत केली.

डाक्तरसाहेब म्हणाले, " विनाकारण गडबड करूं नका. येथून मुकाट्यानें ह्या लोकांबरोबर जाल आणि हे ठेवतील तेथें कांहीं दिवस बंदींत रहाल, तर ह्या गोष्टीची बाहेर कांहीं परिस्फुटता होणार नाहीं."

हें ऐकतांच बेगम ओरडून म्हणाली, " हें सगळं खोटं. ह्यांच्यावर विश्वास ठेऊं नका. हें आतां आपल्या गळ्याला फास लावून ठार मारतील ! पण मी त्यांना येथून नेऊं देईन तेव्हां ना ? अगोदर माझा प्राण घ्या, त्यानंतर त्यांचा विचार."

तिनें आपल्या कमरपट्ट्यांतून एक कट्यार बाहेर काढिली आणि डनबारला धरून ठेवणाऱ्या लोकांच्या अंगावर ती धावून गेली. तेव्हां अल्ली तिच्यापुढें उभा राहिला; त्यानें आपले दोन्ही हात यावेळीं उरावर आडवे ठेविले होते.

बेगम त्याच्या अंगावर ओरडून म्हणाली, " बऱ्या बोलानं मला जाऊं दे अं ? " परंतु अल्ली जागचा हालला नाहीं. गिलबर्ट तिची विनवणी करून म्हणूं लागला, तुम्ही असा अविचार करूं नका. हे करीत आहेत तें तुमच्या बऱ्यासाठीं आहे; तुम्ही गप्प बसा. " इतकें तो बोलला खरा, तरी पण ह्या प्रसंगाला हजर रहाण्याचें कुसुंबी बेगमजवळ आपण कबूल केलें ही चूक झाली, म्हणून डाक्तरसाहेब आपल्यास्वतःलाच दोष लावून घेऊं लागले.

झिनाब त्याच्याकडे वळून त्याच्याकडे पहात पहात म्हणाली, " ह्याचे हाल होतील किंवा मला ह्यांत मरण येईल, ह्याची मला मुळींच भीति वाटत नाहीं. " ती बोलतां बोलतां रागानें लाल झाली. ती पुढें बोलूं लागली, " परंतु मीं जें कांहीं केलें त्याबद्दल ह्यांना काय म्हणून त्रास व्हावा ? सोडा त्यांना, मला जाऊं द्या त्यांच्याकडे. " इतकें बोलत बोलतच ती पुढें पाऊल टाकूं लागली. अल्ली तिला आडवा झाला; तेव्हां तिनें त्याच्यावर कट्यार उगारिली, तरी अल्ली भ्यायला नाहीं !

" भोग तर मग " असें बोलून तिनें ती बर्ची त्याला मारिली आणि त्याचें पातें अल्लीच्या खांद्यात शिरलें. झीनाबनें तचि कट्यार उपसून घेऊन गिलबर्ट तिचा हात धरावयास जाणार इतक्यांत तचि कट्यार आपल्या उरांत मारून घेतली. पण तिचें हें कृत्य पहाण्यास डनबार तेथें नव्हता, त्याला धरणाऱ्या जबानांनीं त्याला खोलींतून बाहेर ओढून नेलें होतें, तथापि बरची उरांत शिरल्यानंतर तिनें जी मृत्यूची किंचाळी मारिली, ती त्याच्या कानीं आल्यावांचून राहिली नाहीं. तेव्हां त्याच्या मनाला मोठा धक्का बसला आणि त्याला मूर्छा आली. गिलबर्टसाहेब चटकन झिनाब जवळ गेलें, पण काय ? त्या तीव्र शस्त्रानें आपलें घातुक काम पार पाडिलें होतें, तिचा प्राण कुडींतून निघून गेला होता. डाक्तरसाहेब अल्लीच्याजवळ गेले, पण अल्लीनें आपणच आपली जखम बांधिली आणि त्यांत कांहीं विशेष नाहीं असें तो म्हणूं लागला.

नंतर झिनाबकडे पाहून तो म्हणाला:—" हें एक बरेंच झालें, हुजूर ती तर गेलीच, पण आतां हें दुसरे कोणास कळूं न देतां तिचें दफन उरकून घेतलें पाहिजे. नबाबसाहेब बरे होईपर्यंत त्यांना हें कांहीं कळवितां न.

नाहीं. पण हुजूर, माझी आपणांस विनंति आहे. आमची अब्रू सर्वस्वी आपल्या हातांत आहे; तिचें आपण रक्षण करावें. ह्या गोष्टीचा बाहेर बभ्रा होऊं देऊं नका!"

"होय! पण डनबारला कोणच्याही प्रकारें कोणी कांहीं करतां कामा नये. असें जर होईल तर मात्र मी कोणाजवळ कांहीं बोलणार नाहीं, असें कबूल करितों."

अलीनें उत्तर केलें—"छे छे! त्यांना कांहीं सुद्धां धक्का लागणार नाहीं. त्यांना सोडून द्यावें असा निरोप कुसुंबी बेगमकडून आल्याबरोबर आम्ही त्यांना बाहेर हाकलून देऊं. आम्हांला हो काय करायचें आहे? तेव्हां हुजूर, आपण येथून जा; येथें आलां होतां ही गोष्ट सुद्धां विसरा. इथल्या नोकर-लोकांची आपल्याला काळजी नको; कोणाच्याही तोंडून अवाक्षर बाहेर पडणार नाहीं.

दुसऱ्या दिवशीं तेथील स्थानिक वृत्तपत्रांत नबाबाच्या दुखण्याची बातमी दिली होती; आणि नबाबाच्या बेगमच्या हृदयाची क्रिया एकदम बंद पडल्यामुळें तिचा अंत झाला व हें कळविण्यास वाईट वाटतें; असेंही त्यांत म्हटलें होतें.

# प्रकरण २१ वें,

## गिलबर्ट साहेबांची धांदल!

खाबूरसारखा प्रामाणिक नोकर क्वचितच आढळतो. तो सहसा कधींही खोटें बोलत नसे. पण त्याच्या धन्याच्या हिताचा संबंध आला म्हणजे मात्र गोष्ट निराळी; तशा वेळीं तो पाहिजे तें बोलण्यास मागें घ्यावयाचा नाहीं. आतां त्याचें म्हातारपण झालें होतें आणि इहलोकांतील पाश त्याला कांहीं उरला नव्हता. आपण मेल्यानंतर पुढें काय होईल इकडे त्याचें लक्ष लाग-लेलें असे. रात्रीं सगळीकडे शांतता झाल्यावर स्वर्गातील झाडाला टांगलेल्या घंटा वाजलेल्या ऐकूं येतात असा त्याला भास होई. अल्लाच्या सिंहासना-पासून वायु उत्पन्न होतो आणि सद्धर्मी लोकांना मंजुळ नाद ऐकण्याची

इच्छा होईल त्या त्या वेळीं त्या स्वर्गांतील घंटा वाजतात, असें कुराणांत लिहिलेलें आहे; त्यांचाच हा आवाज असावा असें त्याच्या मनाला वाटे.

डनबार कोठें आहे, हें खाबुरला ठाऊक होतें. त्याला अटक करण्याचा जो घाट घालण्यांत आला होता, त्यांत खाबूरचें अंग होतें परंतु त्यानें अशी कबुली अगोदर करून घेतली होती कीं, ह्या कामांत डनबारच्या केंसालाही धक्का लागणार नाहीं. तुझ्या धन्याच्या अंगांत भूत शिरलें आहे, तें काढून टाकून त्याला पूर्ववत करून देऊं, अशी जेव्हां कबूली त्यानें घेतली, तेव्हांच तो ह्या त्यांच्या गुप्त बेताला कबूल झाला होता.

पूर्वीसारखा डनबार राहिला नाहीं अशी त्याच्या मनाची खात्री झाल्या-पासून तो आपल्या मनाशीं कित्येक वेळां तरी म्हणाला असेल, " पहा ! मी सांगून सांगून दमलों, व ह्या गुप्त विद्येच्या पिशाच्चभुताटकीच्या— नादीं लागूं नका असेंहि मीं कितीदां तरी म्हटलें, पण माझें ऐकतो कोण ? झाली एवढी अल्लानें खैर केली, आतां तरी तो बरा होवो म्हणजे झालें."

हें त्याच्या मनांत होतें आणि त्याला तर खोटें बोलायचें नव्हतें, म्हणून त्यानें त्या दिवशीं किन्सीचीहि गांठच पडूं दिली नाहीं. डनबार कां आला नाहीं असें तिनें साहाजिकच विचारिलें असतें आणि मग आपण तिला काय उत्तर द्यावें हेंहि त्याला समजेना. परंतु मौज अशी कीं डनबार न आल्याबद्दल किन्सीला त्या दिवशीं इतकें कांहीं वाटलेंच नव्हतें; कारण तिच्या मनांतच तेढ उत्पन्न झाली होती. एक तर तिच्यादेखतच बेगमकडून निरोप घेऊन दासी आली होती, तेव्हां तो तिकडेच गेला असेल, असें तिनें आपल्या मनाशीं ठरविलें होतें. तिला त्याच्या न येण्यानें खेद झाला नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या दिवशीं तो सकाळींसुद्धां तिच्याकडे आला नाहीं, ह्यामुळें तिला थोडेसें बरेंच वाटलें. कारण त्याच्याशीं लग्न ठरलेलें मोडून टाकण्याचें तिच्या मनानें ठरविलें होतें आणि संध्याकाळीं तो परत आल्यावर तशी त्याला चिठी पाठवावी असाहि तिचा बेत होता.

त्या दिवशीं फेरेल म्हाताऱ्याचा ताप बहुतेक नाहींसा झाल्यासारखाच होता, आणि त्याला बरें वाटल्यामुळेंच किन्सी बापाला घेऊन गाडींत बसून फिरावयाला गेली. मोकळ्या स्वच्छ हवेंत हिंडल्यानें बापाला अधिक

हुशारी वाटेल अशी तिला आशा वाटत होती. बागेंतून पलीकडे गाडी गेली. रेसिडेन्सींत पोहोंचल्यावर सुमारें दोन तास तेथें गेले. म्हातारा खालीं उतरून एका पिंपळाच्या झाडाखालीं बसला. शिपायांच्या बंडाच्यावेळीं हें झाड होतें आणि त्याच्या सावलींत दमल्याभागलेल्या मार्टिनीवर शिपायांना उन्हांपासून आश्रय येथें मिळाला म्हणून ती जागा चिरस्मरणीय झाली होती. त्या वेळच्या सर्व गोष्टी पाहिलेला आणि त्या बंडाचे वेळी प्रत्यक्ष लढलेला असा एक हॅमूटन नांवाचा म्हातारा तेथें भेटला; त्याच्याबरोबर क्लीन्सी त्या सगळ्या पडक्या आवारभर हिंडली. हॅमूटननें वेढ्याच्या आणि लढाईच्या गोष्टी मोठ्या मौजेनें आणि चटका लावण्यासारख्या रीतीनें सांगितल्यामुळें तिची त्यावेळीं बरीच करमणूक झाली.

फिरणें झाल्यावर लेक आणि बाप दोघे घरीं परत आलीं, तेव्हां त्यांनीं स्थानिक वृत्तपत्र हातीं घेतलें, तों त्यांत बेगम इहलोक सोडून गेल्याची बातमी त्यांच्या दृष्टीस पडली. तें एकतांच क्लीन्सीच्या मनाला बराच धक्का बसला, आणि डनबारचें काय झालें असेल ह्याबद्दल नाना तर्कवितर्क तिच्या पुढें खेळूं लागले. ती आपल्याशीं म्हणाली, " तर मग डनबारला बोलावणं तरी कशासाठीं आलं होतं ? ह्या तिच्या मरणाशीं डनबारच्या जाण्याचा कांहीं संबंध आहे कीं काय ?" खरोखर पहातां डनबार ह्या व्यक्ती-विषयीं प्रेमाचा लवलेशही तिच्या मनांत उरला नव्हता, तथापि त्याला कांहीं देहदंड झाला असेल अशी तिला उगीच हळहळ वाटूं लागली. तिच्या मनांत ज्या कांहीं गोष्टी आल्या त्या तिनें सर्व बापाजवळ सांगितल्या.

म्हातारा म्हणाला:-"होय; मागें अशा गोष्टी घडत असत. झनानखान्यांत परपुरुष सांपडल्यास त्याची विल्हेवाट लावणारे लोक पूर्वी हिंदुस्थानांत होते. परंतु ती गोष्ट ह्या दिवसांत शक्य नाहीं. ब्रिटिश अमलाचा चांगला दरारा आहे. कदाचित तूं म्हणतेस तसें डनबारनें केलेंच नसलें तर ! किंवा बेगम फार आजारी झाल्यामुळेंच तिनें डनबारला बोलावणें धाडलें असण्याचाही संभव आहे. तो झनानखान्यांत सांपडला असला तर त्याला बहुतकरून अटकेंत ठेविला असल. कांहीं झालें असलें तरी त्याला तूं किंवा मी काय करणार ? उद्यां आपण नबाबाच्या समाचाराला म्हणून जाऊं आणि मग तिथेंच कांहींतरी गोष्टी काढून याचा तपास लावूं."

परंतु वडिलांच्या ह्या असल्या धीर देण्यानें कॉन्सीचें मन स्वस्थ झालें नाहीं, म्हणून आपली टोपी घालून नबाबाच्या वाड्याकडे जाण्यासाठीं तिनें तयारी केली. ह्या जाण्याबद्दल तिला कोणी कांहीं विशेष नांवें ठेविलीं नसतीं. कारण तिचा आणि बेगमचा चांगलाच परिचय होता, तेव्हां तिच्या देहाला अखेर डोळ्यांनीं पाहण्यासाठीं आपण आलों आहों असें तिनें सांगितलेलें शोभलें असतें. परंतु याचें कारणच उरलें नाहीं; इतक्यांत डाक्तरसाहेबच आले. फेरेल म्हाताऱ्याची प्रकृति इतकी चांगली सुधारलेली पाहून त्याबद्दल त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें आणि म्हताऱ्याला गाडींत बसवून फिरावयास नेलें होतें हें चांगलें झालें असेंही ते म्हणाले. इकडच्या तिकडच्या गोष्टी होतां होतां बेगमच्या मरणाचा विषय निघाला.

कोणीसा प्रश्न विचारला' तेव्हां उत्तर म्हणून डाक्तर साहेब ह्मणाले:- "हो बुवा, मरण अगदीं तात्काळ आलें खरें! "

म्हातारा:- " कशानें ? कांहीं रक्ताशयाचा—"

" होय, होय. रक्ताशयाचाच—"

आणि हें खोटेंही नव्हतें. झीनाबनें आपल्या उरांत जी बरची भोंसकली, ती रक्ताशयालाच जाऊन भिडली होती.

कॉन्सीनें मध्येंच विचारिलें:- " आपण गेला होतां कीं काय पहायला ?"

" होय. मी नबाबाची प्रकृति पाहण्यास गेलों होतों. कारण त्यावेळीं एक नोकर धांवत मला बोलवायला आला होता म्हणून मी लगेंच गेलों पण माझा कांहीं उपाय उरला नव्हता. "

" डनबार तेथें असेलच ! "

असला प्रश्न अनपेक्षित आल्यामुळें गिलबर्टसाहेब चपापले. पण तितक्यांत सावरून मुख्य प्रश्नाचें उत्तर सावधगिरीनें टाळण्यासाठीं ते म्हणाले:- " हें काय हो भलतेंच विचारणें ! ह्यांच्या झनानखान्यांत पुरुषांचा प्रवेश होत नाहीं— आमच्यासारख्या युरोपस्थ लोकांचा काय आणि कोणाचाच काय–कोणालाच आंत जातां येत नाहीं, हें कांहीं मी सांगायला नको. आम्हां डाक्तर लोकांना सुद्धां कित्येक वेळां आंत जाण्याची बंदी असत्ये. "

कॉन्सी:- " तें काय मला माहीत नाहीं ! पण काल डनबारकडे तिकडून कांहीं निरोप आला होता, आणि तो घेऊन येणारी बेगमची दासीच होती

म्हणून मी हें विचारलें पण तुमचं तर म्हणणं कीं, डनबार तिथें नव्हताच ! ”

आतां खोटें बोलल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. डाक्तरसाहेबांच्या धंद्याच्या कामांत त्यांना खोटें बोलल्यावांचून चालत नसल्यामुळें हा प्रसंग त्यांना अपरिचित होता असें नव्हे. शिवाय खोटें बोलणेंच अवश्य आहे, अशीच ही वेळ होती. पण त्यांच्या मनांत आलें कीं, पुढें मागें सारी हकीगत क्रीन्सीला कळेल आणि मग डाक्तरसाहेबांना सत्याची चाड फारशी नाहीं असें क्रीन्सीचें मन बनेल म्हणून ती गोष्ट त्यांना इष्ट नव्हती, पण आतां ह्या वेळीं खोटें बोलल्याशिवाय मार्गच उरला नव्हता आणि म्हणून त्यांनीं साफ सांगितलें, कीं, “ छे छे, डनबार तेथें नव्हते.” ह्यापुढें आणखी प्रश्न जे निघतील त्यांना उत्तर देण्यापेक्षां ते टाळावे म्हणून त्यांनीं घाईघाईनें बोलून टाकिलें.” काल रात्रीं जरूरीच्या कामासाठीं ते कानपुराला गेले आहेत, ते एक दोन दिवस परत येणार नाहींत. परंतु ह्याबद्दल तुमच्याजवळ ते कांहींच बोलले नाहींत कसें, ह्याचें मात्र मला नवल वाटतें. ”

“ खरेंच बुवा ! मला सुद्धां त्याचें नवल वाटतें ! ” असें फेरल ह्मातारा आश्चर्याची मुद्रा करून म्हणाला. हा विषय इतकाच संपविलेला बरा, असें ठरवून ‘ मला दुसरीकडे कामाला जावयाचें आहे. ’ अशी सबब सांगून डॉ. गिलबर्टसाहेबांनीं त्यांचा निरोप घेतला.

त्यांचें दुसरें काम म्हणजे कुसुंबी बेगम परत आली असल्यास तिची भेट घ्यावयाची हें होतें. संध्याकाळच्या डाक गाडीनें ती परत आली आहे, असें त्याला समजलें होतें. म्हणून ती आणि प्यारीलाल कोणच्या कामाला गेलीं होतीं आणि त्याचें काय झालें, हें ऐकण्याची त्यांना उत्सुकता उत्पन्न झाली होती. त्याप्रमाणें कुसुंबीच्या महालाकडे ते गेले, परंतु त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें योग जमून आला नाहीं. बेगम परत आली होती, हें कांहीं खोटें नव्हतें; परंतु आतांपर्यंत तिनें गुप्त ठेविलेल्या गोष्टी आतां स्पष्ट सांगावयाच्या, त्याच्या ऐवजीं तिनें त्यांना जास्तच संदिग्ध भाषणानें बुचकळ्यांत पाडिलें.

ती म्हणाली:—“ आपल्याला नाहीं कां दिसत, मी किती थकूनभागून आलें आहें ती ? आतां अगोदर मला झोंप घेतली पाहिजे ! उद्यां सकाळीं आपण लवकर या, म्हणजे सर्व कांहीं कळेल. ”

“ माझी जिज्ञासा मात्र या योगानें वाढली, बेगमसाहेब. उद्यां काय

होणार ह्याबद्दल थोडासा खुलासा आज नाहीं कां सांगतां येणार ? "

" छे छे ! आतां कांहीं सांगितलं तर तें खरं वाटायचं नाहीं. आमच्या इकडच्या लोकांचे विचार आणि शास्त्रीय शोध तुमच्या त्या पश्चिमेकडच्या लोकांच्या डोक्यांत लवकर शिरणार नाहींत. तुह्मांला सारं त्रैराशिकानं कां काय म्हणतात तें, बे आणि बे चार, असं मांडून दाखवलं तर बरं होय ना ! प्रत्यक्षच प्रमाण पाहिजे. उदाहरणानं मांडून तुमच्या प्रत्यक्ष डोळ्या पुढं गोष्टी होतील तर खऱ्या ! नाहीं तर तुम्ही त्याला अज्ञानाचं खूळ आणि धर्मभोळ्यांना फसवणं म्हणणारना ? असो. ह्यांत एक आनंदाची गोष्ट येवढीच आहे कीं, तुमच्यासारख्याला ह्याविषयीं थोडीबहुत जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. तेव्हां आपण आतां उद्यां या ! विसरूं नका बरं ! खात्रीनं तुमची करमणूक होईल. पण काय हो, नवाबाची प्रकृति कशी काय आहे ? "

" खंगत चालली आहे. फार फार तर अठेचाळीस तास वांचला तर मिळविली ! "

" पुरे पुरे ! चोवीस ताससुद्धां बस आहेत. तोंपर्यंत तरी त्याला मरूं देऊं नका ! जा, आतां अगोदर त्याच्यावर नीट लक्ष ठेवा, माझं हें सगळं करणं डनबारच्या हिताचं आहे, आणि म्हणून मी आपल्याला ह्या कामांत घेतलं आहे समजलं ? ह्याच्या उलट गोष्ट ह्यांत नाहीं, हें मी सांगत्यें येवढ्यावरंच खरं माना ! तसाच विश्वास ठेवून चाला ! माझं तुम्ही ऐकलं ह्याबद्दल त्याला तुमचे उपकार वाटल्यावांचून रहाणार नाहींत. "

" मला ह्यांतला कांहींच उमज पडला नाहीं. "

" होय, तें खरं. पण मी तरी कुठें ह्मणत्यें आहे कीं, हें तुम्हांला सगळं समजलं ह्मणून ? उद्यां सर्व कळेल. जा आतां. मी किती म्हणतां थकून गेल्यें आहें ! "

डाक्तरसाहेब जिना उतरून खालीं गेले, तों तेथें त्यांना चांदबिबी भेटली. तिच्या तोंडावर निराळ्याच प्रकारचा विकार पाहून डाक्तर म्हणाले:—

" अरे, हे रे काय ? चांद, तूं अशी घाबरलीस कां ? कांहीं तरी गडबडींत आहेस वाटतें ? त्या खोलीकडे एकसारखी पहात आहेस, तर त्यांत कोणी माशुक लपवून ठेवला आहेस होय ? माझ्या येण्यानें तुमच्या एकांतांत कांहीं

व्यत्यय तर आला नाहीं ? ”

चांदबिबीनें लगेंच उत्तर दिलें नाहीं. ती हंसत हंसत त्याच्याकडे पाहून म्हणाली:-“ होय गडे, या चला ! मी कोण माणुक लपविला आहे, तोच आपल्याला दाखवितें, मग तर झालं कीं नाहीं ? ” असें बोलत बोलत तिनें समोरच्या खोलीपाशीं डाक्तर साहेबांना नेलें, आणि दारावरचा पडदा दूर सारून ती म्हणाली:—“ नेहमीं आपली माझी थट्टाच करायची ? पहा पहा, हा दिसतो का माझा आशक ? ”

“ अरे बापरे ! हा तर फकीर आहे ! ”

“ होय, हेच ते फकीर, ज्यांना मौनी अवलिया म्हणतात ते हे ! ”

“ हे कशाला इथें आले आहेत ? ”

“ अल्ला जाने ! बेगमसाहेब परत आल्यावर अर्ध्या तासानं ह्यांची स्वारी आली, आणि त्यांच्या मागून कांहीं वेळानं प्यारीलाल आला. त्यानंही एक माझा प्रियकर आणला आहे. चला, आतां कमी कशाला ? तो माझा मनुष्य तुम्हांला दाखवित्यें चला ! ”

इतकें बोलून तिनें डाक्तरसाहेबांचा हात धरून त्या बोळांडीसारख्या वाटेच्या दुसऱ्या टोंकाला दुसरी खोली होती तिकडे नेलें. गिलबर्टसाहेबांनीं आंत डोकावून पाहून म्हटलें:-“ अग हें ग काय ? हा एक दुसरा फकीर, हाही त्याच्यासारखाच अबोल्या आहे कां ग ? ”

चांदबिबी खुदकन हंसली आणि म्हणाली:—“ छे छे, नाहीं हो ! ही स्वारी बोलकी आहे. हा फकीर आपण कसा पाहिलेला नाहीं ? हा इकडे नवीन नाहीं आलेला. हा पुष्कळ वेळां लखनौस असतो, आणि इथें आला म्हणजे स्नानघाटाच्या वरच्या अंगाला जी झोंपडी आहे, तिच्यांत तो रहातो.”

“ अग, म्हणूनच तर मला वाटलेंच कीं, मीं ह्याला कोठें तरी पाहिला असावा! तोच तो. अंगानें कसा भरभक्कम आहे. बरें असो. त्या दुसऱ्या फकीराला तूं मौनी कां म्हणालीस ? ”

“ तो कांहीं अवाक्षरसुद्धां तोंडांतून काढीत नाहीं, तरी पण त्याला कांहीं लागलं सवरलं, कीं तें दुसऱ्याला आपोआप कळतं. मीच त्याच्या सेनातीला आहे परंतु त्यानं कांहीं न बोलतां त्याला काय हवं आहे, हें माझ्या ध्यानांत येतं. कित्येक वेळां ह्यामुळं मला फार भीती वाटते. त्या-

खोलींत मी गेलेली आहे आणि तिच्यावर पक्की पटई केलेली मी पाहिलेली आहे. तिथें वर घंटा नाहीं हें मला ठाऊक आहे तरी पण वरच्या पटईतून खोलींत घंटा वाजल्याचा आवाज येतो. तो किती मंजूळ असतो म्हणून सांगूं ? एखादी सुंदर परीच गात आहे असं वाटतं. तसा घंटेचा नाद झाला म्हणजे हे अवलिया मस्तक वर उचलितात आणि कान देऊन ऐकिल्यासारखं करितात. कधीं ते नुसती मान डोलवितात, एखादे वेळीं हुंकार देतात. हा दुसरा फकीरसुद्धां मोठा विलक्षण दिसतो. खोलींत कोणी नसतांना तो कोणाशीं तरीं बोलल्यासारखं करीत असतो. ह्याच्याइकडे सुद्धां अशीच घंटा वाजते.: पण काय हो हुजूर, ह्या गोष्टी कशा होतात ? "

" सुंदर चांदणी ! मला काय विचारतेस तूं ? मी काय सांगूं ? मीं जर घंटा ऐकलीच नाहीं, तर काय बोलूं ? कदाचित् ह्यांत कांहीं लबाडी असेल. आमच्या देशांत अशा गोष्टी घडणें संभवनीय आहे, असें सुद्धां कोणी ह्मणणार नाहीं, आणि तुमच्याकडेसुद्धां तसेंच झालें असतें; परंतु तुमचे लोक पडले भोळे, अज्ञानी. तेव्हां तुमच्या भाबडेपणाचा फायदा हे लोक घेतात, दुसरें काय ? हे फकीर इथें कशाला आले आहेत, ह्याचें कारण तुला कोणी सांगितलें आहे कां ? "

" मुळींच नाहीं. पण आमच्या सगळ्यांच्या मनांत येतं कीं, कांहींतरी चमत्कार घडून येणार आहे, आणि मला तर बाई–केव्हां केव्हां फारच भय वाटूं लागतं." इतकें बोलून चांदबिबीनें भ्यायल्यासारखें दाखवून गिलबर्टचे अंगाशीं फारच लगट केली; त्यामुळें डाक्टरसाहेबही जरा रंगांत येऊन त्यांनीं तिच्या कंबरेला हाताचा विळखा घातला.

ते म्हणाले— " मेरा चांद, तूं अगदीं वेडी ग वेडी ! कांहीं भिऊं नको बरें ! हें–"

" ऐका, ऐका." इतकें बोलून चांदबिबीनें डाक्टरच्या पाशांतून आपल्यास सोडवून घेतलें आणि मौनी अवलियाच्या खोलीकडे पाहून म्हटलें— " ती पहा, आली कां ऐकूं ? तीच घंटा हो ! "

गिलबर्ट डाक्टरांनींही घंटेचा आवाज स्पष्ट ऐकला, आणि ते आश्चर्यानें थक्क होऊन उभे राहिले. अशा प्रकारच्या घंटेचा आवाज त्यांनीं आजपर्यंत कधीं ऐकिला नव्हता. नाद फारच गोड परंतु अगदीं बारीक वायूच्या लहरी-

सारखा होता तरी डाक्टर उभे होते तेथें तो स्पष्ट ऐकूं येऊन त्या वाटेभर दुमदुमून राहिला होता.

चांदबिबी म्हणाली— " मला अवलिया हाक मारीत आहेत."

" काय म्हणतेस ? तुला बोलावण्याची खूण म्हणून कां ती घंटा वाजली ? "

" नाहीं."

" मग तुझें कांहीं काम लागलें आहे, हें तुला कसें कळलें ? "

" माझ्या मनाला तसं वाटूं लागलं. गेलंच पाहिजे हो. " असें बोलून ती धांवतच त्या खोलीकडे गेली."

त्याचा परिणाम डाक्टरसाहेबांच्या मनावर झाल्यावांचून राहिला नाहीं. त्यांनाही आतां तेथें उभें राहण्यांत भीति वाटूं लागली म्हणून ते चटदिशी तेथून बाहेर पडून बागेंत आले. तेथें गार हवा लागल्यावर मोठा सुस्कारा टाकून ते म्हणाले— " हा हा ! आतां किती बरें वाटतें हें. अरे देवा, माझ्या हातापायाला कसें ओढल्यासारखें वाटूं लागलें होतें.

# प्रकरण २२ वें,

## दोघां फकीरांचें युद्ध.

त्या रात्री क्वीन्सीला झोंप आली नाहीं. आतांशीं बरेच दिवस तिला चैन पडत नव्हतें, कारण तिचें मनच अगदीं उदास झालें होतें. डनबारचें आपल्यावर प्रेम आहे हें कळल्याबरोबर तिला जो आनंद झाला त्याची सर जशी दुसऱ्या आनंदास येण्यासारखी नव्हती, त्याप्रमाणें तिच्या दुःखासारखें आतां दुसरें कोणास दुःख नव्हतें, म्हणजे तिच्या दुःखाला सीमा राहिली नव्हती. परंतु आपली मानसिक व्यथा आपल्या वृद्ध पित्याच्या बहुतेक नजरेस न येऊं देण्याची तिनें खबरदारी घेतली होती. पण ह्यावरून म्हाताऱ्याला कांहींच समजलें नव्हतें असें मात्र नाहीं, आपली कन्या वरून वरून जरी हास्यमुख असते, तरी तिच्या मनांत आग पेटली असावी, हें त्याच्या लक्षांत आलें होतें. परंतु हें सगळें कळूनही तो कांहीं बोलला नाहीं. कारण अशा प्रकारच्या

झालेल्या दुःखाच्या जखा भरून येण्यास कालप्रतीक्षेशिवाय दुसरा उपाय नाहीं असें त्याचें मत होतें. कीन्सीनें आपलें सर्वस्व प्रेम डनबारला वाहिलें होतें, त्याच्यापूर्वी तिचें प्रेम कोणावरहि बसलें नव्हतें आणि ह्यापुढें बसेल अशी आशा करण्यास जागाहि नव्हती. काठीनें मारलेला चेंडू जसा वेगानें जातो, त्याप्रमाणें तिचें प्रेम उत्पन्न झालें होतें. तें फारच त्वरेनें त्याच्याशीं एकरूप झालें. अशा प्रकारें तिच्या प्रेमाचा ओघ जरी फार वेगाचा होता तरी तो प्रवाह सतत वहात राहिला असता. खाणावळींत प्रथम त्याची गांठ पडतांच त्याच्या नजरेपुढें आपली गाळण उडाली. तो डनबार, तिला पळवून नेण्याचा बेत करणाऱ्यांच्या हातून सुटका करणारा डनबार, त्याची आठवण तिच्या मनांतून बुजली नव्हती पण त्या वेळचा डनबार आतां उरला नव्हता. हा असा फरक डनबारमध्यें कसा पडला ह्याचें तिला मोठें कोडें पडलें होतें. फकिराचा प्रयोग होण्याचें ठरून त्याप्रमाणें डनबार तिकडे गेला त्या दिवसाची तिला पूर्ण आठवण होती; त्यापासून कांहीं तरी संकट येणार अशी आपली मनोदेवता सांगत होती, ह्याचेंही तिला स्मरण होतें, आणि तिला वाटलेल्या भीती-प्रमाणेंच विपरीत प्रकार घडूनहि आला.

ती रात्र तिनें झोंपेंशिवाय काढली. म्हणून सकाळीं लवकर उठून ती फिरावयास गेली आणि बागेंत हिंडत असतां डाक्तरसाहेबांची गांठ पडली.

"सुप्रभातम्-कीन्सीताई!" डाक्तर म्हणाले, "आज आपण अगदी लवकरच हिंडायला आलां?"

ती म्हणाली, "आज फारच मौज वाटत आहे. आजची हवाच अशी गमतीची आहे कीं, अगदीं निरुपाय असेल तर गोष्ट निराळी, पण बाकीच्या सर्वांना अशी हवा खायला येण्याची बुद्धि व्हायलाच पाहिजे."

"बरोबर! पण आपलें मात्र तसें दिसत नाहीं. या सुंदर हवेनें आपल्या कपोलावरील गुलाब जास्त खुलावे पण ते उलट पांडुरकेच झाल्यासारखे कां वाटावे?"

कीन्सीनें तें बोलणें हंसण्यावारी नेलें; ती म्हणाली, "काय हो, डाक्तर लोकांची दृष्टि इतकी बारीक असत्ये हें मला बाई नव्हतं ठाऊक. पण काय हो, नबाबसाहेबांची प्रकृति कशी काय आहे?"

"थकत चालली आहे."

" अरेरे; मला वाईट वाटतं बाई त्याच्याबद्दल. अम्मळशानें आम्ही दोघे त्याच्या समाचाराला येऊं असं म्हणतों. तुमचा कसा काय सल्ला आहे ? यावं कि आम्ही ? "

" अलबत. मी तरी आपणांस तें सांगणारच होतों. काल रात्रीं नबाबच आपल्या नोकराला म्हणत होता कीं, तुम्ही दोघें त्याला भेटायला याल तर बरें होईल. हा निरोप मी कळविणारच होतों. असो, मला दुसरें काम आहे. येतों मी. सुप्रभातं ! "

कीन्सीनें त्यांना अडवून म्हटलें, " जरा थांबा. पण काय हो ! त्यानंतर डनबारची कांहीं हकीगत आली कां आपल्या कानावर ? "

डाक्तरना खरोखरच कांहीं कळलें नव्हतें. डनबारला नबाबाच्या वाड्यांत ठेविला असावा हें त्यांना वाटतच होतें. तेव्हां त्यांनीं कांहीं चौकशीच केली नव्हती. परंतु गिलबर्टसाहेबांनीं हंसत हंसत म्हटलें, " आपण अगदीं काळजी करूं नका, ते अगदीं खुशाल आहेत. आज नाहीं तर उद्यां ते परत आल्यावांचून रहावयाचे नाहींत. "

ह्यांना डनबार कोठें गेला आहे हें माहीत असल्यामुळें हें असें बोलत आहेत, किंवा मला उगीच काळजी न वाटावी म्हणून समाधानासाठीं व धीर देण्यासाठीं, हे कांहीं तरी बोलत आहेत कीं कसें, ह्याचा कीन्सीला उलगडा पडेना. आज डनबार परत आलेला पहावा असें तिला वाटे खरें; पण कशा-साठीं ? नबाबाच्या वाड्यांत त्याचें कांहीं कमजास्त झालें नाहीं, ह्याची खात्री करून घेण्यासाठींच, दुसरे काय असणार ? "

× × × × × ×

कीन्सीपासून गिल्बर्टसाहेब निघाले ते थेट कुसुंबी बेगमकडे गेले. तेथें त्यांची मार्गप्रतीक्षा करीत एक नोकर उभा होता; तो त्यांना एका बारा-दारीकडे म्हणजे बागेच्या मध्यावर बांधलेल्या एका जलमंदिराकडे घेऊन गेला. ह्या बंगल्यांतील सर्व काम संगमरवरी दगडाचें असून त्याच्या मधो-मध एक मोठा दिवाणखाना होता. त्याच्या चोहीं बाजूला वर माडी असून तेथें झनानखान्यांतील स्त्रिया बसल्या तरी त्यांना खालून कांहीं दिसूं नये म्हणून जाळ्या बसविल्या होत्या. हा दिवाणखाना गारोडी वगैरे लोकांचे तमाशे करविण्याच्या उपयोगांत आणीत असत; आणि तमासगीर पुरुष

असले तरी दिवाणखान्यांतील खेळ वरून पाहण्यास बायकांना कांहींच हरकत नव्हती. त्या चौकाशींच चांदबिबी होती, तिनें डाक्तरसाहेबांना वर नेलें, तों तेथें बेगमसाहेब भेटल्या.

डाक्तरसाहेबांना पहातांच बेगम म्हणाली, " बरं झालं बाई. मी म्हटलं तुम्ही येतां की नाहीं कोण जाणे ? "

आतां पुढें काय तमाशा दिसणार आहे ह्याबद्दल डाक्तरसाहेबांनीं पुष्कळ तर्क चालविला, पण त्यांच्या कांहींच ध्यानांत येईना त्यांतून आणखी आपल्याला ह्या वरच्या माडीवर कां आणून बसविलें त्याबद्दल तर त्यांना कांहींच उलगडा होईना. बेगमनें मुकाट्यानें अंगुलीनिर्देश करून त्यांना एक खुर्चीवर बसावयास सुचविलें. त्यांनीं ती खुर्ची पुढें ओढून घेतली व ते बसले, आणि खालीं काय होणार तें डोकावून पाहूं लागले.

आतां मात्र प्रश्न केल्यावांचून त्यांना रहावेना. ते म्हणाले, " अहो, कांहीं सांगा तर खरें काय होणार आहे तें ? एकादा नाचबीच आहे कीं काय सांगा पाहूं ? "

बेगमच्या मुखावर फार गंभीरता दिसूं लागली. ती म्हणाली—" थांबा जरा, म्हणजे सर्व कांहीं समजेल;" असें ती बोलत आहे, तोंच उत्तरेच्या दरवाजानें तो काश्मीरचा अवलिया आंत आला. त्याच्याकडे डाक्टरसाहेब पहात आहेत तोंच बेगमनें त्यांच्या खांद्याला हात लावून त्यांना दक्षिणेकडच्या दरवाज्याकडे पहाण्यास सांगितलें; तों तिकडून सावकाश पावलें टाकीत मान खालीं घालून तो लखनौचा फकीर आला. ते दोघे एकमेकांकडे येत होते. पण ते दोघेही बिचकत बिचकत आणि थबकत पावलें टाकीत होते. जवळ येतां येतां त्यांच्यामध्यें सहा-सात फुटांचें अंतर राहिल्यावर, ते दोघेही थांबले; आणि दोघांनींही एकदमच वर माना करून एकमेकांकडे पाहिलें. काश्मीरच्या फकिराच्या मुखावर विजयश्रीचें तेज झळकत होतें; लखनौच्या फकिराच्या मुखावर तिरस्कार आणि द्वेष ह्यांचें स्पष्ट प्रतिबिंब दिसलें. दोघांपैकीं तो मौनी अवलिया प्रथम बोलूं लागला. त्याच्या तोंडांतून शब्द निघतांच गिलबर्टजवळ उभी असलेली चांदबिबी म्हणाली—"अगबाई, ह्याला वाचा आहे तर म्हणायची!" परंतु डाक्टरसाहेबांनीं तिला कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांचें सर्व लक्ष त्या फकीरांच्याकडे लागून राहिलें होतें.

आणि आतां पुढें काय होणार ह्याबद्दल त्यांना फार उत्सुकता उत्पन्न झाली होती. त्या दोघां फकीरांच्या मनांत एकमेकांविषयीं पूर्ण द्वेष भरलेला होता हें उघड दिसत होतें; आणि आज हे सहज येथें आलेले नाहींत, कांहीं तरी विशेष कारणासाठीं ह्यांची ही गांठ मुद्दाम घालण्यांत आली आहे, असें गिलबर्टसाहेबांनीं तेव्हांच ओळखिलें. तो लखनौचा फकीरही मुकाट्यानें बसला नव्हता.

"अरेच्या, आलास तर तूं! तूं इतका लवकर येशील असें मला वाटलें नव्हतें."

दुसऱ्यानें उत्तर केलें—"आलों बरें; मी खुद्द काश्मीराहून आलों. वावटळीच्या वाऱ्यावर स्वार होऊन आलों, समजलास? मला आकाशस्थ देवतांनीं वाट दाखविली हेंही पण लक्षांत ठेव. प्राणिमात्रांवर उपकार करावा आणि त्या कामीं उपयोग व्हावा, म्हणून तुला जी मीं विद्या शिकविली, ती तुझ्यापासून मी बळजोरीनें काढून घेणार आहें. त्यासाठीं तर मुद्दाम येथें आलों! कारण, त्या सामर्थ्याचा—त्या सिद्धीचा दुरुपयोग करून तूं आपलें ऐहिक हित साधण्याचा यत्न केलास."

ते दोघेही खालीं बसले. त्यांनीं खुरमांड्या घातल्या होत्या. त्या दोघांमध्यें फार अंतर नव्हतें. त्यांनीं एकमेकांकडे नजर लावून काम चालविलें.

लखनौचा फकीर म्हणाला, "खोटें! खोटें, मनुष्यमात्राचें हित व्हावें म्हणून जें सामर्थ्य तूं मला दिलेंस, त्याचा त्याच कामासाठीं उपयोग करीन असें मीं मुळींच कबूल केलें नव्हतें. माझा बेत प्रथमपासूनच निराळा होता. मीं जें उत्तम कार्य म्हणून योजिलें होतें, त्यासाठीं मला ती विद्या पाहिजे होती. माझ्या मनांत माझ्या देशाचें कल्याण करावयाचें आलें आणि ह्यापेक्षां उच्च ध्येय कांहीं असेल असें मला वाटत नाहीं."

"बरोबर. देशकल्याणापेक्षां दुसरी चांगली गोष्ट नाहीं हें खरें. पण त्या हेतूनें तूं जी गोष्ट केलीस, जी तुझ्या मनानें जरी चांगली ठरली, तरी तिनेंच फार अकल्याण होऊं पहात आहे."

"हा केवळ मतभेद आहे. येवढेंच कां काम? मग अहो बुड्डेबाबा, आपण येथपर्यंत येण्याची तसदी विनाकारण घेतली. जा तर, आतां परत जा, आणि आपल्या दरीगुहेंत जाऊन अल्लाचें नामस्मरण करीत खुशाल

बसा, आणि स्वस्थ मनानें तेथें समाधि लावा. माझ्या वाटेस जाऊं नका. मी आपल्या मनानें जें कांहीं करावयाचें ठरविलें, तें काम मी सोडणारच नाहीं. त्याच्यापासून काडीइतका इकडे तिकडे सरकणार नाहीं. जा बाबा, आपला उद्योग आपण पहा."

"वाहवा ! महमद पैगंबरसाक्ष मी त्या उद्योगासाठींच तर येथें आलों आहे. तुझ्या सिद्धीचा नायनाट केल्याशिवाय मी सोडणार नाहीं."

"पाहूंच तर मग. करा कसा नाश करतां तो! ह्या कामांत आपण आपल्या प्राणांना मात्र व्यर्थ मुकाल. आतां सांगतां ही अट प्रथमच मला कां सांगितली नाहीं? ऐकाच तर माझी प्रतिज्ञा जी शक्ति, जी विद्या आपण मला दिली ती माझ्या देहांत जीव आहे तोंपर्यंत मी परत देणार नाहीं. आपण मात्र संभाळा ! शिष्याच्या हातून म्हणजे गुरूचा पराजय होणारच नाहीं अशा घमेंडींत मात्र राहूं नका, असें बजावून सांगतों."

"आजचाच हा पहिला गुन्हा नाहीं. मागें अनेक वेळां मी माफी केलेली आहे. पुष्कळ वेळां ताकीद दिली आहे. कल्याण करावयाच्या संधि प्रत्यक्ष प्राप्त झाल्या असूनही पापकर्में करुन तूं त्या चिखलांत लोळत पडला आहेस !"

"ज्याला तुम्ही पाप ह्मणतां, तें मी आपल्या देशाचें कल्याण समजतों."

"आणि असें तुझें मत आहे, म्हणूनच मी तुझा नायनाट करून टाकितों."

हें ऐकतांच तो शिष्य-फकीर सांवरून बसला आणि ह्मणालाः-"पाहूंच तर आतां ? असल्या घमकावणीला मी भिणार नाहीं !"

ह्यावर ते मौनी गुरू कांहींच बोलले नाहींत. जिकडे तिकडे अगदीं शांतता झाली. कांहीं वेळानें बेगमनें गिलबर्टचा कोट ओढून त्याला घाईघाईनें खुणविलें, आणि उत्तरेकडील दरवाज्याकडे पहावयास सांगितलें. तों त्या दारानें एक मोटा पिंवळा रसरशीत नाग येत होता. तो हळूंच आंत आला. तो चालतां चालतां मध्येंच फणा वर काढून चोंहीकडे बघे, तेव्हां त्याच्या गळ्यावरील दहाचा आंकडा स्पष्ट दिसे. दोघेही फकीर आतां अगदीं स्तब्ध होते; त्यांच्याकडेच तो जाऊं लागला.

गिलबर्टसाहेब मोठ्यानें म्हणाले:—"अरे बापरे ! आतां हा नाग ह्यांना चावला कीं दोघेही मरतील. ते तर त्याच्याकडे बघतही नाहींत." इतकें

बोलून तो उठून खालीं जाऊन त्याला मारण्याची तयारी करूं लागला. बेगमनें त्याचा कोट धरून त्याला अडविलें.

ती त्याला हळूच ह्मणाली:—" गप्प बसा ! त्या नागाची दोघांनाही भीति नाहीं. सर्प वगैरे सर्व विषारी प्राण्यांवर त्यांची सत्ता चालते."

तो नाग, त्या मौनी गुरूच्या जवळून पुढें जाऊन दोघां फकिरांच्या मधोमध बसला. आतांपर्यंत तो लखनौचा फकीर खालीं मान घालून स्वस्थ होता, परंतु त्या नागाचे फूत्कार ऐकूं येऊं लागले, त्याबरोबर त्यानें मान वर केली. तो एकदां दचकला, पण पुनः त्याच्या मुखावर दृढ निश्चयाचें चिन्ह दिसूं लागलें. इतक्यांत एक चांदीची घंटा वाजल्याचा आवाज झाला आणि तो सगळ्या मंदिरभर दुमदुमून गेला !

तो मौनीगुरु म्हणाला:–" पहा, ह्या सर्व देवता हजर झाल्या ! आतां तुझ्याशीं दोन हात करितों संभाळ !"

" दोन हात ? " म्हणजे युद्ध करण्याचे शब्द ऐकतांच, डाक्टरसाहेबांना चमत्कारिक वाटलें. पण इतक्यांत त्यांच्या लक्षांत आलें कीं, हे प्रत्यक्ष लढणार नसून, हा नागच त्यांचें दोघांचें शस्त्र होणार आहे. ते दोघे आपल्या इच्छाशक्तीचा जोर त्याच्यावर टाकून त्याला आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर हल्ला करावयास लावणार ! त्याप्रमाणें त्यांचें युद्ध सुरू झालें; व तें फारच भयंकर होतें. गिलबर्टसाहेबांच्या मनांत खालीं जाऊन त्या नागाला मारावें असें पुष्कळ वेळां आलें. परंतु त्यांना तसें करण्याची कांहीं शक्ति उरली नव्हती. बेगम अगदीं स्वस्थ होती. ती घाबरली नाहीं, किंवा कोणच्याही प्रकारें तिनें गडबड केली नाहीं. ती शांतपणानें त्या फकीरांकडे पहात होती; पण नगीबनची स्थिति फारच विलक्षण झाली; तिनें जमिनीवर लोळण घेऊन लुगड्यानें तोंड झांकून घेतलें होतें !

तो नाग हळुहळू डोलूं लागला. तो रागानें फूत्कार सोडीत होता आणि त्याचा छळ करणाऱ्या त्या फकीरांच्या अंगावर एकदां ह्याच्याकडे, आणि एकदां त्याच्याकडे झांप टाकीत होता. परंतु अद्याप त्यानें कोणासही स्पर्श केला नाहीं; कारण त्या दोघांच्याही जादूचा म्हणा किंवा इच्छाशक्तीचा किंवा मारण्याचा जोर अद्यापही समसमानच होता असें वाटलें. दोघांपैकीं कोणाच्याही तोंडांतून शब्दोच्चार होत नव्हता. ते अगदीं स्तब्ध, निश्चल

बसल्यासारखे होते. होतां होतां त्या लखनौच्या फकीराच्या तोंडावर भीतीची छाया दिसूं लागली आणि तो दमल्यासारखा वाटूं लागला. त्याला आंतल्या आंत जे श्रम करावे लागत होते, ते आतां त्याच्यानें सोसवेनात असें उघड दिसूं लागलें. त्यामुळें त्या नागाची फणा मौनी गुरूपेक्षां त्या लखनौच्या फकिराकडे अधिक वेळां फिरूं लागली. आपली आतां वेळ भरली असें तो फकीर समजला आणि ह्या मौनी गुरूपुढें आपला निभाव लागत नाहीं, हें त्याच्या मनानें घेतलें. हळुहळू तो नाग आतां आपलें वेटाळें सोडून शेंपटी-पर्यंत उंच उभा राहून पाहूं लागला आणि आतां मात्र त्याची उंची त्या दोघां बैठ्या फकिरांपेक्षां अधिक होऊन त्याची फणा वर दिसूं लागली. ह्या स्थितींत क्षणभरच तो राहिला आणि चटकन लखनौ-फकिराच्या अंगावर झांप टाकली. त्याबरोबर तो फकीर भुईवर आडवा पडला ! लगेंच तो नाग चोर-ट्यासारखा तेथून निघाला आणि बाहेर जाऊन बागेंत गेल्यावर नाहींसा झाला !

तो मौनी फकीर उठून उभा राहिला आणि वरच्या माडीकडे पहात पहात म्हणाला– " संपलें."

डाक्टर गिल्बर्ट म्हणाले— " हें कसलें युद्ध हें ? हें पाहूनच माझें डोकें फिरून गेलें ! "

अवलियानें पुनः विचारिलें— " फिरंगीसाहेबानें हें सर्व पाहिलेंना "

बेगमनें उत्तर केलें— " होय, सारं पाहिलं."

' झालें तर मग. आतां ह्यापुढें माझें सामर्थ्य पाहण्यास तो तयार होईल आणि तें पाहिल्यावर त्याचे सर्व संशय दूर होतील."

" अवलिया महाराज ! आपण कसलें सामर्थ्य दाखविणार मला ? "

" बेटा ! जरा धीर धर. आतां फार वेळ लागणार नाहीं लवकरच सर्व कांहीं समजेल."

" आणि तो फकीर ? मेला कां तो ? "

" मरायचें कां जगायचें हें त्याच्यावरच मी ठेवणार आहें. तुम्ही सर्व येथून गेल्यावर त्या गोष्टीचा मी विचार करीन. त्याच्या रक्ताशयांत विष भिनलें नाहीं तोंपर्यंत त्याला मी वाटेल तेव्हां जिवंत करीन. त्याशिवाय–"

बेगमनें विचारिलें—" पण तो जर जिवंत राहिला तर पुनः असलं पापी

काम करण्याचें सामर्थ्य त्याचें कायमच राहील ना ? ”

“ होय, तें सामर्थ्य मला काढून घेतां येणार नाहीं. ह्या जीवात्म्याला जी विद्या एकदां अवगत झाली ती तो विसरणार कसा ? मरणसमयीं ज्या बऱ्यावाईट वासना घेऊन हा जीवात्मा देवाच्या घरीं जाईल, त्याच घेऊन पुन: तो ह्या मर्त्यलोकीं आल्यावांचून रहात नाहीं. म्हणून ह्याची दुष्ट वासना घालविण्याचा मी यत्न करून पाहणार आहें.”

डाक्टरसाहेब विचारूं लागले— “ हें तुमचें वेदांती बोलणें मला समजत नाहीं. पापी मनुष्याला देवलोकांत जातांच कसें येईल ? ”

“ देवलोकाच्या दारापाशीं पापी लोकांचें पाप गळून पडून राहतें. तेथें आंत गेल्यावर दु:खक्लेश कांहीं भोगावे लागत नाहींत. पृथ्वीवर त्यानें जें कांहीं पुण्यकर्म केलें असेल, त्याच्या मानानें तेथें त्याला सौख्य भोगीत रहावयास सांपडतें. ज्या जीवाच्या हातून कांहींच पुण्यकर्म घडलें नसेल तो लगेंच परततो. दारापाशीं त्याचें उतरलेलें ओझें पुन: त्याच्या डोक्यावर दिलें जातें. कारण, हें त्याचें पूर्वार्जित नाहींसें व्हावें कसें ? दुसऱ्या जन्मांत तो जीं कांहीं बरीं वाईट कृत्यें करील, त्याप्रमाणें त्याच्या पातकांत भर पडते किंवा तें कमी होत जातें. ह्याप्रमाणें त्यानें आपलीं सर्व पापें भोगिलीं किंवा प्रायश्चित्तानें किंवा ईश्वरास शरण जाऊन वगैरे तीं सर्व नाहींशीं झालीं आणि निव्वळ पुण्यकर्में उरलीं म्हणजे मग, त्याला अक्षयीं ईश्वरसंनिधान प्राप्त होतें. असो. बेटा तुम्ही आतां जा, ह्याचें काय करावयाचें तें मी पाहतों. ”

## प्रकरण २३ वें.

## मौनी गुरूचें सामर्थ्य.

गिल्बर्ट गडबडीनें घरीं गेला आणि उभ्या उभ्या न्याहारी घेऊन गाडी जोडून नबाबाकडे आला. क्लॅन्सी आणि तिचा वृद्ध बाप दोघेंही त्याच्या अगोदर तेथें येऊन बसलेलीं पाहून त्याला थोडेंसें नवल वाटलें. त्या दोघांचें हस्तांदोलन करून नंतर तो नबाबाच्याजवळ गेला.

त्यानें त्याची नाडी वगैरे पाहिली आणि साश्चर्य आनंदाची मुद्रा करून

म्हणाला—" कायहो ! आज तर तुमची प्रकृति चांगलीच दिसते. तुमची नाडी छान जोरानें चालली आहे ! "

अमिरानें उत्तर केलें--" दिवा जाण्यापूर्वी मोठा होत असतो, तसेंच हें असेल. आतां मी फार वेळ जगत नाहीं असें मला वाटूं लागलें आहे आणि म्हणूनच ह्या दोघांची विनवणी करून त्यांना कांहीं वेळ येथें बसवून घेतलें आहे. "

" बरें बरें, हें एक चांगलेंच झालें ह्मणावयाचें. ह्याच्या योगानें कां होईना, पण तुमच्या मनाला जरा आराम पडला आहे. प्यारीलालसुद्धां परत आला आहे ह्मणतात, आणि तो जर मला सांपडला असता–"

अमीर खिन्न होऊन म्हणाला—" तो मेला."

त्याची सर्व हकीगत सांगण्यासाठीं कॉन्सी बोलूं लागली– " तो नदींत बुडून मेला. आम्ही इकडे येत होतों, तेव्हां नदींत त्याचं प्रेत आमच्या दृष्टीस पडलं."

ह्या पोरानें असाच पूर्वीही प्राण देण्याचा प्रयत्न केला होता म्हणतात!"

" होय, अनेकवेळां. अखेर त्यानं आपल्या म्हणण्याप्रमाणें केलंच. त्याला वाचवावयाला गेल्यामुळं तर नबाबसाहेबांवर हा प्रसंग आला आहे."

" येवढेंसें पोर खरें, पण फार कृतघ्न होतें गुलाम !"

अमीर म्हणाला:--" छे, छे, असें म्हणूं नका. तें पोर फार चांगलें होतें हो ! तो आपल्या सोबत्याच्या भेटीला गेला, दुसरें काय ? "

इतक्यांत बाहेरच्या बाजूस कांहीं गडबड झाल्यासारखें ऐकूं आलें, आणि तिकडे पाहतात तों बेगम कुसुंबी आंत आली. ती सगळ्यांच्या ओळखीची होती म्हणून तिनें मान लववून सर्वांनाच सलाम केला. नंतर ती अमिराच्या पलंगाजवळ गेली आणि तिनें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें.

तिला अमीर म्हणाला–" आतां उशीर लावूं नका. माझी शक्ति क्षीण होत चालली आहे. " कुसुंबी बेगमनें बाकीच्या मंडळीकडे तोंड करून बोलण्यास सुरवात केली. तिची ती उभें रहाण्याची ढब आणि पहाण्याची ऐट लक्षांत येताच कॉन्सीला मोठें कौतुक वाटलें. ह्या अशा स्थितींतहि ती फारच सुंदर दिसत्ये असें कॉन्सीचें मत झालें. कुसुंबी ह्मणाली, " फेरेल-ताई आणि सभ्य गृहस्थ हो ! नबाबाच्या मनांत तुम्हां सर्वांस आणखी

थोडीशी तसदी घ्यावी अशी विनंति करण्याचं आलं आहे, आणि म्हणून मी सर्वांची प्रार्थना करितें कीं, त्याच्या इच्छेला ह्या वेळीं मान देऊन तुम्ही त्याच्या म्हणण्याप्रमाणें येथें थोडा वेळ थांबा. नबाबानें तुम्हास येथें बसवून कां घेतलं त्याचा हेतु काय होता, हें आतां तुम्हांस सांगण्यांत येईलच. येथें बसून जें कांहीं होईल तें मुकाट्यानं चित्त देऊन सर्वांनीं अवलोकन करावें. आश्चर्य वाटल्याबरोबर लगेच प्रश्न करीत सुटूं नये. त्याबद्दल कांहीं घाबरण्याचंही कारण नाहीं. इतकी ह्यापुढें होणाऱ्या नाटकाची प्रस्तावना पुरे आहे. आतां यांतील मुख्य पात्रांच्या मंडळीस मी घेऊन येत्यें, आपण बसून काय होतं तेवढं पहा."

इतकें बोलून तिनें टाळी वाजविली, तेव्हां सर्वजण दाराकडे पाहूं लागले. प्रथम ते मौनी गुरु आंत आले आणि त्या काश्मीरच्या अवालियाच्या मागोमाग डनबारहि आला. पण त्याला बंदीवानाप्रमाणें धरून आणला होता. क्वीन्सी उठून डनबारकडे धांवत जाऊन म्हणाली. "हें काय हें?" परंतु असें कांहीं तरी होईल असें बेगमला वाटलेंच होतें. म्हणून ती तयारच होती. तिनें क्वीन्सीला हात धरून मागें ओढली आणि म्हणाली, "जरा दम धरा, माझ्यावर भरंवसा ठेवा. पूर्वीचं तुमचं सुख तुमच्या स्वाधीन अर्ध्या तासाच्या आंत आणून देत्यें पहा—"

क्वीन्सीनें डाक्तरसाहेबांकडे पाहिलें तें अशा दृष्टीनें कीं, तुम्हीं मला डनबार संबंधानें खोटी बातमी सांगितली हें चांगलें ना? असेंच जणूं काय ती मूकपणानें बोलत होती. तिला त्यांचा फार राग आला होता. परंतु तिनें मुखावाटे एक शब्दही काढिला नाहीं. तिच्या त्या दृष्टीमुळें गिलबर्टसाहेबांना ओशाळल्यासारखें झालें. त्यांच्या मुखावर फिकटपणा आला आणि म्हणून त्यांनीं आपलें तोंडच दुसरीकडे फिरविलें. फेरेल म्हाताऱ्यानें आपला चष्मा बाहेर काढून तो साफ पुसून डोळ्यांना लाविला आणि ते डनबारकडे पाहूं लागले. त्याला प्रतिबंधांत कां ठेविलें आहे, ह्याचें कारण त्यांना समजेना. त्याच्या मनांत नसतांना त्याला तेथें आणिलें आहे हें उघडच दिसत होतें. डनबारच्या पुढील बोलण्यावरून तर म्हाताऱ्याला वाटलें तें खरें होतें ह्याबद्दल संशयच उरला नाहीं. डनबार म्हणाला, "हा काय तमाशा आहे? असा कैद्यासारखा मला धरून येथें कां आणिला आहे बोला?"

कीन्सीलाहि राग आला. " कैद्यासारखा म्हणजे काय " इतकें बोलून ती कोणी तरी ह्यावर उत्तर देईल म्हणून रागारागानें सगळ्यांकडे पाहूं लागली.

डनबार म्हणाला, " होय कैद्यासारखा ! मला धरून जुलमानें कोंडून ठेविलें होतें. "

" कोण निर्लज्जपणा हा ! " असें बोलून कीन्सी डनबारकडे जाऊं लागली.

बेगम ह्मणाली:—" कीन्सीताई, आणखी थोडा वेळ दम धरा. काय हो डनबारसाहेब, तुम्हांला कोणी आणि कशाकरितां कोंडून ठेविलें होतें तें सांगाना परत ? आहे कां उत्तर द्यायला कांहीं तोंड ? "

हें ऐकून डनबारनें मोठ्यानें विकट हास्य केलें. डनबार म्हणाला, " होय, कां बरें ? तोंड नसायला काय झालें ? त्यांत कसली आली आहे लाज. नबाबाच्या झनानखान्यांत मी गेलों होतों, तेथें सांपडलों. "

हें ऐकतांच कीन्सीनें भीतीनें किंकाळी ठोकली, आणि ती नबाबाकडे पाहूं लागली. परंतु नबाब उलट हंसूं लागला. हें पाहून तिला अगदीं चमत्कारिक होऊन गेलें.

डनबार पुढें बोलूं लागला:—" ह्यांत मी कांहीं कोणाचा गुन्हा केला नाहीं. खरोखर कायद्याच्या दृष्टीचा जर ह्यांत गुन्हा असेल, तर मग हा असा चोरटा कारभार कशासाठीं ? उघड पोलीसला हाक मारून त्यांच्या स्वाधीन मला करायचें होतें. येऊन जाऊन तुमची तोहमत माझ्यावरच काय ती येणार ? ती हीच कीं नाहीं, कीं, मी तुमच्या घरांत शिरून आगळीक केली, पण ह्यांत कांहींच होणार नाहीं. कारण मी बोलून चालून बोलावण्यावरून तिच्याकडे गेलों ! "

अमिराच्या मुखावर पुनः हास्याचेंच चिन्ह दिसूं लागलें. तें डनबारनें पाहिलें, तेव्हां तो अधिकच चिडला. दांतओठ खाऊन तो त्याच्या अंगावर धावून गेला आणि म्हणाला:—" कुत्र्या ! दुष्टा ! ही सर्व तुझी मसलत आहे. ही सगळी मंडळी येथें बोलावून आणून त्यांच्यादेखत माझी फजिती करावी, हाच तुझा बेत असावा ! हा तमाशा पहाण्यांत तुम्हांला मौज वाटते काय ? वहावा ! ( आणि कीन्सीकडे तोंड करून तो पुढें म्हणाला, ) आणि तूंही येथें कां आलीस ! शाबास ! आम्हां पुरुषांप्रमाणें तुम्हां

बायकांनाही सूड घेण्याची इच्छा उत्पन्न व्हावी अं ! सूड, सूड ! नबाबड्या ! मी तुला पक्का ओळखतों, समजलास ? तूं हा प्रसंग कशाकरितां आणला आहेस, तेंही माझ्या ध्यानांत आलें महा लबाडा ! तूं कांहीं जरी बडबड केली आहेस, तरी पण ती ह्या सर्वांना खरी वाटेल, असा तुला भ्रम असेल ? पण— असो. तुला ज्यानें मदत केली असती, असा एक पुरुष ह्या पृथ्वीवर होता; पण मला वाटतें कीं, तो आतां हा लोक सोडून गेला असावा ! आणि तूं तरी काय ? फार झालें तर कांहीं तासांचा सोबती ! तेव्हां आतां सर्व विसरून जाऊन स्वस्थ मनानें मरायला तयार कां होत नाहींस ? जें आतां फिरण्यासारखें नाहीं, त्याबद्दल उगाच घडपड कां ? आहे त्यांत सुख मानून घे ! माझा किंवा इथल्या कोणाचाही तुला उपयोग होण्यासारखा नाहीं. तेव्हां आतां आपल्या पूर्वीच्या मित्रत्वाचें कांहीं स्मरण कर ! आणि सर्व विसरून जाऊन, झालें तें झालें असें म्हणून स्वस्थ मन कर, दुसरें काय ?"

फेरल म्हाताऱ्यालाही बोलल्यावांचून रहावेना. तो म्हणाला:—" अगदीं बरोबर. नबाबसाहेब ! आतां तुम्हांला या जगांत फार वेळ रहावयाचें दिसत नाहीं, तेव्हां दुसऱ्याचें वाईट कां चिंतितां ? तुम्हीं दोघांनींही आतां परस्परांस आलिंगन देऊन पूर्वीप्रमाणें स्नेहभाव धरावा म्हणजे झालें." नबाब अगदीं मरायला टेंकला आहे, अशी म्हाताऱ्याची पक्की समजूत झाल्यामुळें तो आपल्या पूर्वीच्या व्यवसायानुरूप वर लिहिल्याप्रमाणें साहजिक बोलून गेला. परंतु ज्या परपुरुषानें आपल्या झनानखान्यांत शिरून आपल्या अब्रूची माती केली, त्याला क्षमा करण्याइतकी शांति बहुतेक कोणांतच सांपडणार नाहीं, हें त्याच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं.

आतां बेगम बोलावयास उठली. ती पुढें येऊन म्हणाली:—" सर्व मंडळींना मी हात जोडत्यें, त्यांनीं माझं बोलणं ऐकून घ्यावं. हा मनुष्य ( डनबारकडे बोट करून ) किंवा डनबारचा देह धारण करणारा जो आत्मा हल्लीं ह्या देहांत आहे तो निव्वळ सैतान आहे. त्यानं अत्यंत—परंतु हें कशाला ? आतां सर्व दिसेलच. आपण आणखी कांहीं वेळ स्वस्थ बसा, म्हणजे मी काय म्हणत्यें ह्याचा अर्थ आपणांस समजेल." इतकें बोलून तिनें मौनीगुरूंना खूण केली. त्यानें डनबारकडे तोंड करून त्याला हुकमतीच्या स्वरानें म्हटलें:—" खालीं बैस !"

डनबारनेंही एखाद्या जड यंत्राप्रमाणें त्याचा हुकूम मान्य केला. "नीज" असा दुसरा हुकूम अवलियाच्या तोंडून निघाला! लगेंच डनबारनें डोळे मिटले. त्याच्या मुखावर पांडुरता आली, आणि बोलतां बोलतां त्याच्यावर झोंपेचीं, नव्हे प्रेतकळेचीं चिन्हें दिसूं लागलीं! नंतर तो फकीर अमिराकडे वळला आणि म्हणाला, "नीज;" आणि तत्काळ डनबारप्रमाणेंच नबाबाचीही तंद्री लागली! कॉन्सीची दृष्टि डनबारकडे सारखी खिळून राहिली होती. पहातां पहातां त्याची ती अवस्था पाहून तिला भीति वाटूं लागली, आणि तेथून निघून जाणें बरें, असें तिच्या मनांत आलें. परंतु जणूं काय कोणी तरी आवळ्यास तेथें धरून ठेवल्यासारखें वाटून ती तेथून कांहीही करण्यास समर्थ नव्हती.

आतां खोलींत अगदीं सामसूम झालें होतें. इतक्यांत एक घंटा वाजली, आणि असला आवाज ज्यांनीं पूर्वीं कधीं ऐकला नव्हता, त्यांनाहि त्याचें फार आश्चर्य वाटलें. घंटेचा आवाज तर स्पष्ट ऐकूं येत होता; पण ती कुठें आहे, किंवा तिचा नाद कुठून येतो हें कांहींच समजेना. खोलीमध्यें हळुहळू अंधकार पडत चालला. सूर्यप्रकाशच नाहींसा झाला कीं काय? फेरल म्हातारा, खिडकींतून बाहेर तरी सूर्य दिसतो कीं नाहीं, म्हणून डोकावून पाहूं लागला; पण बाहेरसुद्धां रात्र पडल्यासारखें झालें होतें. नंतर खोलींत हळुहळू कुजबुजल्यासारखा शब्द होऊं लागला, आणि डनबार आडवा पडला होता, तेथून एक दिव्य ज्योत निघाली; आणि ती तेथेंच वर अधांत्रीं तरंगूं लागली. अमिराच्या पलंगाकडे पहावें असें सर्व मंडळीला एकदम वाटल्यासारखें झालें. तो पलंगावर निजला होता, तेथूनही तशीच दुसरी एक ज्योत निघाली आणि तीही तशीच अंतराळीं तरंगूं लागली.

कॉन्सीनें बापाच्या खांद्यावर मान टाकून म्हटलें—"बाबा, काय हो हें? मी अगदीं भिऊन गेल्यें बाई!"

म्हातारा म्हणाला:—"गप्प बैस! हा खरोखरच चमत्कार आहे! तुला ह्याची भीति कां वाटते, कोण जाणे? काय मौज आहे ती तर बघ!"

काळोख दाट पडत चालला. आतां मागच्याप्रमाणें एक नव्हे, अनेक घंटांचे मंजुळ नाद ऐकूं येऊं लागले. त्या दोन्ही प्राणज्योति आपल्या जाग्यावरून हलावयास लागल्या. डनबारच्या देहावरील ज्योत अमिराच्या

पलंगाकडे, आणि अभिराच्या पलंगावरील ज्योत डनवारच्या देहाकडे जाऊन तेथें उभ्या राहिल्या, आणि मग खालीं उतरूं लागल्या. आतां घंटांचे आवाज पूर्वीपेक्षां मोठ्यानें होऊं लागले आणि एकदम सर्व अंधकार नाहींसा झाला.

क्लिन्सी म्हणाली, "इथें आतां मला दम निघत नाहीं. मला मूर्च्छा येईल असं वाटायला लागलं आहे."

म्हातारा तिच्याकडे काळजीयुक्त मुद्रेनें पाहूं लागला. क्लिन्सीच्या कपोलांची कांति निर्जीव स्फटिकासारखी दिसूं लागली. तो म्हणाला, "वत्से, मला वाटतें कीं, इथला सर्व प्रकार आतां आटपला; आणि येवढा वेळ ज्या गूढ गोष्टी घडून आल्या त्यांचा सर्व खुलासा आतां होईल, तेव्हां म्हणतों कीं, कांहीं वेळ तरी आणखी तुला बसवेल कीं नाहीं?"

"बाबा, बाबा, पहा! डनबार आतां सावध होऊं लागला पहा."

आतां मात्र क्लिन्सीची भीति अगदीं उडाली. डनबारच्या गालावरची पांडुरता नाहींशी झाली. कांहीं वेळानें त्यानें डोळे उघडले. विलक्षण दृष्टीनें त्यानें चोहींकडे पाहिलें आणि शेवटीं नबाबाकडे दृष्टि दिली. बेगमनें आपल्या ओंठावर बोट ठेवून कोणी बोलूं नका अशी सर्वांना सूचना केली.

अबालिया उठून उभा राहिला. येवढा वेळ त्याच्या मुखावर गंभीरपणा दिसत होता, परंतु आतां त्यानें स्मित हास्य केलें. त्यानें आपले बाहु वर उभारून मोठ्या अवाजानें पुढील शब्द उच्चारिले, "शांति. शांति. अल्ला हो अकबर. देवाचा महिमा अगाध आहे. मानवांनीं कांहीं चुका केल्या तर त्या सुधारण्याची शक्ति त्यालाच आहे."

पुनः घंटा वाजूं लागल्या आणि मोठ्या आनंदानें डोलत डोलत अबलिया तेथून निघून गेले. नबाब तसाच पडून होता, त्यानें डोळे मिटले होते. आजचा हा प्रयोग त्याच्या थकलेल्या शक्तीला सोसला नसेल असें क्लिन्सीला वाटलें आणि मुकाट्यानें स्वस्थ बसण्याबद्दल बेगम खुणावीत असतांही ती उठली आणि नबाबाच्या पलंगापाशीं गेली; तिनें नबाबाला हातानें हालविलें. नबाबानें त्या स्पर्शाबरोबर डोळे उघडिले.

क्लिन्सीनें त्याला विचारिलें, "फार थकल्यासारखं वाटतं काय?"

नबाबानें तिच्याकडे दृष्टि फिरविली. त्यांतून खरोखर विस्तवाच्या ठिणग्याच पडत आहेत काय असा तिला भास झाला. तो संतापानें म्हणा-

ला, " मी थकलों, त्रासलों, मेलों ! होय, होय, होय ! घ्या मिटवून आपले डोळे ! आतां मी मरणार, पण काय करूं ? मी असा मेलों नसतों, मी चांगला जिवंत राहिलों असतों. पण हीं तुम्हीं सर्व पिशाच्चें लागलीं आहांतना माझ्या राशीस हात धुवून ! काय तुम्हांला मिळणार ह्यांत ? हाय हाय! अरे तुम्ही इंग्रज लोक असले हलकट, असलेच कुतरडे ! तुमची चांगलीच खोड जिरवावी म्हणून मीं प्रयत्न केला आणि त्यांत मला यशही आलें होतें, पण ह्या दुष्ट फकिरानें त्यांत मोडा घातला ! "

क्लॅन्सी भिऊन येऊन आपल्या बापाच्या गळ्यांत मिठी घालून बसली ! नबाबाच्या तोंडचे ते शब्द ऐकून फेरेल म्हाताऱ्यालाही फार नवल वाटलें. बेगम मात्र मोठ्यानें हंसूं लागली. ती म्हणाली, " ह्यांत कोणीही भिण्याचें कारण नाहीं. आतां जो बोलत आहे, तो खरा नबाब; आणि त्याचप्रमाणें खरे डनबारसाहेब ते हे इकडे आहेत."

आतां डनबारच्या तोंडावरही हास्य झळकत होतें. त्याच्यांत झालेला फरक आतां स्पष्ट दिसत होता. मधल्या कांहीं दिवसांपूर्वींसारखा डनबार दिसूं लागतांच क्लॅन्सीच्या प्रेमालाही भरती आली. तिनें पुनः नबाबाकडे पाहिलें आणि ज्या निष्ठुर हृदयाचा तिला अनुभव आला होता, त्याचेंच प्रतिबिंब त्याच्या मुखावर तिला दिसूं लागलें.

आतां डनबारनें बोलावयास सुरवात केली. " फेरेल बाई आणि इतर सभ्य गृहस्थ हो ! इतका वेळ मी स्वस्थ बसून आहें कारण मी आपले विचार व आठवणी व्यवस्थेनें लावीत होतों. मला तर पुनः पुनः असेंच वाटतें कीं, मला फार वेळ झोंप लागली होती आणि त्यांत एक अत्यंत भयंकर आणि विलक्षण स्वप्न पडलेलें मी पहात होतों."

डाक्तरसाहेब म्हणाले:—" म्हणजे काय ? झोंप म्हणतां ती तर आमच्या देखत थोड्या वेळापूर्वीं आणण्यांत आली होती. झोंप म्हणा, कीं, गुंगी म्हणा, पण ती फारच थोडा वेळ होती, आणि ती फार वेळ होती, असें तुम्हीं म्हणतां, हें काय गूढ ? " हा जो प्रयोग डाक्तरसाहेबांच्या देखत दाखविण्यांत आला, त्याचें त्यांना फार नवल वाटलें होतें आणि त्याबद्दल तो फकिराला कांहीं प्रश्नहि विचारणार होता.

फेरेल म्हातारा मधेंच बोलूं लागला, " छे छे हो ! आतांची झोंप काय

घेऊन बसलां आहां ? आज कित्येक दिवस डनबार झोंपेंतच आहे. मला वाटतें कीं, हा सारा महिना तुमचा झोंपेंतच, किंवा निदान गैरशुद्धींत, अथवा तुम्ही देहभानावर नसतांना गेला हें खास !"

ह्या वेळीं डनबार कॉन्सीकडे पाहूं लागला. ती त्याची दृष्टि आणि त्याच्या मुखावरील सुहास्य तिला पूर्वीप्रमाणें दिसलें. तो म्हणाला–" मी अगदीं असेंच म्हणणार होतों. मी दुसराच कोणीं झालों होतों. हा असा पालट एका रात्रींत घडून आला. ती कोणची रात्र हाणाल, तर ज्या रात्रीं नबाब आणि मी मिळून घाटावर फकिराच्या भेटीस गेलों होतों, त्या दिवसापासून असें झालें. "

नबाब ह्या वेळीं मोठ्या आवेशानें डनबारच्या अंगावर खेंकसारून ह्मणाला– " बोल, बोल, चालूं दे ! तुला काय वाटेल तें सांग, बडबड ! तूं पुष्कळ सांगितलेंस, तरी तें ह्यांना खरें कसें वाटणार ? त्यांतून ही माझी बायको बेगम हिच्या महालांत तूं आला होतास, हें मात्र सांगावयाचें गाळूं नकोस ! तिच्याशीं तूं बायकोप्रमाणें व्यवहार करीत होतासना ? "

हे शब्द ऐकतांच कॉन्सी रडूं लागली. तिची ती स्थिति पाहून येवढा वेळ शांत असलेल्या डनबारनें संतापानें उत्तर केलें, " दुष्टा, आंता मरायला टेंकला आहेस, तरी खोटें बोलण्याची शरम किंवा भीति कशी वाटत नाहीं ? "

इतकें बोलून त्यानें कॉन्सी आणि तिचा बाप ह्यांच्याकडे तोंड वळवून आपली हकीगत सांगण्यास सुरवात केली. ती पुढील प्रकरणावर टाकणें भाग आहे.

# प्रकरण २४ वें

## प्रेममीलन.

डनबार म्हणालाः—" स्त्रियांनो आणि सभ्य गृहस्थहो ! मी आतां तुम्हांला सर्व हकीगत सांगणार आहें, त्यावरून मी निर्दोषी आहें, असें तुम्हांस दिसून येईल. परंतु माझा मलाच संशय येतो, कीं, माझी हकीगत तुह्मांला खरी तरी कशी वाटावी ? तुम्ही म्हणाल कीं, तें सारें स्वप्नच पडत होतें किंवा मी देहभान नसलेल्या वृत्तींत होतों. पण मी पुनः पुनः विचार करतों

तरी मला तें तसें नसेल असें वाटतच नाहीं. ही गोष्ट संभवनीय वाटत नसल्यामुळें ह्याला भयंकर स्वप्नच म्हणावें असेंच माझ्या मनांत येतें."

हें ऐकून नवाब हंसूं लागला. तो म्हणाला, " ह्यांत काय संशय ? सांग, सांग सारी हकीगत आणि म्हणूं दे ह्यांना काय ह्यांच्या मनांत येतें तें. पाहूं बरें ! आतां मी गप्प बसतों; मध्यें बोलून तुला अडविणार नाहीं."

डनबार पुनः बोलूं लागलाः—" मी तरी पुनः तेंच सांगतों, कीं, मला अजूनसुद्धां वाटतें, कीं, हा सर्व स्वप्नाचा खेळच झाला असावा. परंतु तुमचा सर्वांचा अनुभव असा आहे कीं, माझ्यामध्यें आणि नबाबामध्यें विलक्षण फरक झाला होता. होय, असेंच ना ? आणि शिवाय पुराव्याला दुसऱ्याही गोष्टी आहेत. त्यावरून ही कांहीं निव्वळ स्वप्नसृष्टि नव्हती हें उघड आहे. ह्यावरून मी ज्या गोष्टी आतां सांगणार आहें, त्या प्रत्यक्षच घडलेल्या आहेत, ह्यांत शंका नाहीं. '

" तुम्हां सर्वांना ठाऊकच आहे कीं, लहानपणीं नबाब आणि मी एकत्र खेळलों, वाढलों व शिकलों—सवरलों; सारें आमचें बरोबरीनें चाललें होतें. आम्हां दोघांनाही ह्या शास्त्राचें, ह्या गुप्त विद्येचें वेड लागलें. ह्या लोकांच्या सिद्धीच्या सामर्थ्यानें अमुक अमुक गोष्टी घडतात असें लोक म्हणत, पण मला तें खरें वाटेना. पुढें आम्ही दोघे विलायतेलाहि गेलों होतो, पण त्याच्यापूर्वींच आमची एका फकिराची ओळख झाली. त्याच्याकडे जाऊन आम्ही पुष्कळ वेळ गोष्टी बोलत बसावें, आणि तोही आम्हांला ह्या विद्येतले कांहीं चमत्काराचे प्रकार सांगत असे. या आपल्या जीवात्म्याला ह्या शरीराच्या बाहेर निघतां येतें,आणि दुसऱ्या लोकांत किंवा हा लोक सोडून गेलेले जीवात्मे जेथें असतात तेथें त्याला संचार करतां येतो, असें त्या फकीराच्या बोलण्यांत येई. "पण मला ती गोष्ट शक्य वाटेना, कारण प्रत्यक्ष अनुभव दाखवा" असें मी त्यास म्हणें. परंतु 'आम्ही फार लहान आहों,' अशी सबब सांगून त्यानें ती करून दाखविण्याची टाळाटाळ केली. पुढें कांहीं दिवसांनीं मी पुनः ह्या देशांत आलों; नबाबाची माझी गांठ पडली आणि नबाबानें ह्या जीवात्म्याच्या स्वातंत्र्याबद्दलच्या, परकायाप्रवेशाच्या, व शरीर सोडून जाण्याच्या गोष्टी काढल्या. ह्या करण्यांत नबाबाचा कांहीं तरी लबाडीचा हेतु असेल असें त्या वेळीं माझ्या लक्षांत आलें नाहीं. त्यानें त्या फकिराचा शोध लाविला आणि प्रयोगाचा दिवसही मुकरर केला.

ठरल्याप्रमाणें दिवस मावळल्यावर आम्ही दोघे त्याच्याकडे गेलों. फकिरानें आम्हां दोघांनाही झोंप आणिली, आणि मला असें दिसूं लागलें कीं, माझा जीवात्मा ह्या देहांतून निघून अधांत्रीं तरंगूं लागला आहे. मी खालीं पाहिलें, तों ज्या शरिरांत मी होतों तें शरीर खालीं जमिनीवर पडलेलें स्पष्ट दिसत होतें. मला नबाबाचा जीवात्माही दिसत होता, आणि आमच्यासारखे दुसरे असंख्य जीवात्मे संचार करतांनाहि दिसले. आम्हांला एकमेकांशीं बोलतां येत होतें, पण त्यांत भाषेचा किंवा प्रत्यक्ष वाचेचा उपयोग होत नव्हता. सर्व व्यवहार आणि विचार मनानेंच एकमेकांला कळत होते. आमचा हिंडण्याचा वेग विद्युत्शक्तीपेक्षांही अधिक होता. पूर्वीं न पाहिलेल्या अशा कित्येक देशांत मी जाऊन आलों. वर आकाशांत तारामंडळापर्यंतहि गेलों. आणि पुनः खालीं मृत्युलोकावर आलों.

"ही माझी समाधि, किंवा तंद्री म्हणा, उतरल्यावर मीं नबाबाकडे पाहिलें; त्याचीही माझ्याप्रमाणेंच आश्चर्यानें स्थिति झाली होती. आम्हीं पाहिलेल्या गोष्टी एकमेकांस सांगितल्या आणि दोघांनाही आलेला अनुभव एकसारखा होता. फकिराचा निरोप घेऊन आम्ही निघालों. वाटेनें मीं नबाबाला म्हटलें कीं, ह्यांत सर्व प्रकार शक्तिपाताच्या साहाय्यानें झालेला होता. तो मला हंसला. त्यानें माझी थट्टा केली. तो म्हणाला, तुला पाहिजे तर फकिराकडून पुनः हा प्रयोग करवितों, आणि त्यांत तुझे सर्व संशय दूर होतील असें मी करितों. मला तर ह्यासंबंधानें कांहींच शंका राहिलेली नव्हती.

"त्याप्रमाणें प्रयोगाचा दुसरा दिवस ठरला. ह्या वेळींही सर्व प्रकार पूर्वीप्रमाणेंच घडला. परंतु मागच्यापेक्षां ह्या वेळीं नबाबाचा जीवात्मा अगोदर खालीं आला. मी जों परत आलों, तों मागच्या प्रयोगाप्रमाणें माझा देह स्वस्थ पडलेला नव्हता; तो उठून बसला होता. तेव्हां हें काय झालें तें माझ्या लक्षांत आलें.

"ही समाधि संपून मी जागा झालों, तों मी किंवा माझा आत्मा नबाबाच्या देहांत, आणि आजपर्यंत जें शरीर मी आपलें मानीत होतों त्यांत नबाबाचा आत्मा, अशी अदलाबदल झालेली माझ्या लक्षांत आली. ह्या प्रयोगामुळें "परकायाप्रवेशा"संबंधानें माझे संशय नाहींसे झाले, ही गोष्ट खरी. त्या फकीराच्या अंगांत खरें सामर्थ्य आहे असाही मला अनुभव आला.

आणि ह्याची ही परकाया पालट होऊन मला पुनः आपल्या शरीरांत परत केव्हां जाण्यास मिळेल, याची मी वाट पहात बसलों. परंतु त्या नवाबानें किंवा नवाबाच्या आत्म्यानें म्हणा मला सांगितलें कीं, आतां पहिली स्थिति येणार नाहीं; आणि तो फकीर तर कोठें दिसेना! तेव्हां मात्र मी थक्क होऊन माझी अक्कल गुंग झाली. मी नवाबाशीं भांडलों, तेव्हां त्यानें मला गुद्दा मारून जमिनीवर लोळविलें आणि मी बेशुद्ध झालों. कारण, आतां माझ्या कसलेल्या शरीराचा मालक किंवा चालक नवाब होता. त्यामुळें ही अशी गोष्ट घडली. कांहीं वेळानें मी शुद्धीवर आलों, तेव्हां तो नवाब किंवा डनबारच्या देहांतला नवाब निघून गेल्याचें कळलें. त्याच्या मागोमाग येथें घरीं यावें असें प्रथम माझ्या मनांत आलें, परंतु पुनः विचार केल्यावर असें वाटलें कीं, माझी स्थिति फार चमत्कारिक झाली आहे. त्या वेळीं मीं ही हकीगत कोणास सांगितली असती, तरी ती कोणीं सुद्धां खरीच मानली नसती; आणि सर्वांनीं मला वेडा ठरवून इस्पितळांत पोहोंचवून कोंडून टाकविलें असतें. तेव्हां निरुपायानें मी नवाबाच्या वाड्यांत गेलों; मला सर्वजण नवाब समजूनच व्यवस्था ठेवूं लागले. तेथें माझ्या हातून प्रथम कांहीं चुका झाल्या; परंतु माझ्या डोक्याला लागल्यामुळें माझें स्मरण नाहींसें झालें आहे, अशी मीं बतावणी केली आणि नवाबाच्या सर्व नोकरांना ती खरीही वाटली. इतर गोष्टींचें मला कांहीं वाटलें नाहीं, पण एक गोष्ट मात्र माझ्या मनाला त्रास देत होती. ती अशी कीं, क्वीन्सीनें माझ्याशीं लग्न करण्याचें कबूल केलें असल्यामुळें तिला ही झालेली जीवांची अदलाबदल समजण्यासारखी नव्हती. कारण डनबारदेहविशिष्ट नवाबच तिला आपला प्रियकर—वल्लभ वाटणार ह्यांत संशय नव्हता. पुढें त्याच्या चमत्कारिक वर्तनामुळें क्वीन्सीचें मन त्याच्यावरून उडालें आहे हें जेव्हां मला समजलें, तेव्हां मला किती तरी बरें वाटलें म्हणून सांगूं!

" नबाबानें मघाशीं माझें वैगुण्य बाहेर काढून तुम्हांला माझा दोष दाखविला पण तसें बोलण्यांत त्याचा हेतु मात्र कपटाचा होता. तो म्हणाला होता, कीं, पर्वा मेलेल्या बेगमला मी बायकोप्रमाणें वागवीत होतों म्हणून? परंतु ह्या सर्व मंडळीला मी ईश्वरसाक्ष सांगतों कीं, तिच्याशीं मी माझी बहीण समजून वागत असें. नबाबानें आपल्या जातींतील चालीरीती मोडून टाकण्याचा

जो उपक्रम केला होता असें दिसलें, त्याचा तुम्हां सर्वांस साश्चर्य विस्मय झाला असेल. परंतु तें सर्व काम माझ्या आत्म्याचें होतें. नबाब म्हणून आतां सर्व जन्म काढल्याशिवाय मला गत्यंतर नाहीं अशी माझ्या मनाची निराशा जनकस्थिती झाल्यावर झनानखान्याचा सर्व प्रकार मोडून टाकावा, असें मीं ठरविलें होतें, आणि त्याप्रमाणें ह्या सर्व गोष्टी मीं बेगमकडून अमलांत आणविल्या. तिच्याशीं ज्याप्रमाणें मीं तिचा नवरा म्हणून वागावें असें तिच्या मनांत होतें, त्याप्रमाणें मीं वागलों असतों तर ती माझ्याशीं बेइमान झाली नसती; पतिव्रताच राहिली असती, ह्यांत कांहीं शंका नाहीं. परंतु तसें मीं केलें नाहीं आणि डनबार-नामधारी नबाबाच्यावर तिचें मन बसलें. वास्तविक पहातां तोच तिचा खरा नवरा होता, पण हें तिला माहीत नव्हतें. माझा–डनबारचा–देह पुन: आपल्याला मिळेल अशी आशा पुन: पुन: मला वाटेनाशी होई आणि त्या वेळीं बेगमबरोबर नवरेपणानें वागावें असेंच मन घेई. इकडे नबाबानें आपल्या वर्तनानें डनबार–नांवाची जी बदनामी करून ठेविली होती, त्यामुळें पुन: डनबार होणें नको, नबाबाच्या देहांतच प्राणोत्क्रमण झालेलें बरें, असाही कित्येक वेळां माझा विचार झाला. पण पुढें ह्या कुसुंबी बेगमसाहेबांना आमचा हा देह झाला, हें कसें समजलें कोण जाणे ? पण तिनें मात्र ही सारी खटपट केली. काश्मीरच्या आपल्या भावाला तिनें येथें आणिलें; जो अवलिया एवढा वेळ येथें होता तोच तो तिचा भाऊ त्यानें मला मृत्युमुखांतून त्याच्या दाढेंतून वांचविलें, आणि माझ्या आपल्या पहिल्या देहांत माझा आत्मा आणून घातला. कुसुंबी बेगमसाहेबांनीं मला एक अंगठी दिली होती, ती ही माझ्या बोटांत आहे. माझ्यावर कांहीं संकट आलें तर हीं अंगठी बेगमकडे पाठवून देण्याबद्दल त्यांनीं मला मागें एकदां बजाविलेंहि होतें.

" ह्या अंगठीची खूण पटतांच हा अवलिया धांवून येईल आणि माझ्या दु:खाचा परिहार करील असें तिनें मला सांगितलें होतें. परंतु त्या वेळीं ही अंगठी डनबारच्या देहाच्या बोटांत राहिली आणि मी तर नबाबाच्या देहांत अडकून पडलों होतों.

" त्या वेळीं मीच बेगमसाहेबांकडे जायला पाहिजे होतें, पण तिला माझें बोलणें खरें वाटेल अशी खात्री येईना. आतां वाटतें कीं, त्या वेळीं मीं ही मोठी चूक केली. हाय हाय ! बेगमसाहेब, तुमच्या उपकाराचा माझ्या डो-

कयावरील भार कमी होणें शक्यच नाहीं."

बेगमनें स्मित हास्य करून म्हटलें:–"तरी देखील तुमचा माझ्यावर प्रथम विश्वास बसला नाहीं. माझी तुम्हांला एक प्रकारची भीतिच वाटत होती. मी तुम्हांला आपल्या जाळ्यांत गुंतवून टाकीन असं आपल्या मनांत येत होतं. आतां उगीच नाहीं म्हणूं नका. उगीच खोटं बोलण्यांत काय अर्थ आहे ? पहिल्या आपल्या भेटीच्या वेळीं माझ्या मनांत तसा हेतु होता हें खरं, मी तें अगदीं कबूलहि करत्यें; परंतु जरी आपण माझा अव्हेर केला तथापि कोणच्याही प्रकारानें मला आपल्याविषयीं संताप किंवा द्वेष उत्पन्न होईना."

डनबारनें मोठ्या अदबीनें आपली मान लववून तिला सुचविलें कीं, हे आपले खरोखरच फार उपकार आहेत; आणि तिला म्हटलें सुद्धां, कीं, "आपलें एकंदर वर्तनहि फारच वाखाणण्यासारखें आहे."

इतकें झाल्यावर क्लिन्सी प्रथम उठली आणि डनबारच्या जवळ गेली. त्यानें आपला हात पुढें केला. 'चार्ली!' "क्लिन्सी!" असे प्रेमळ शब्द दोघांच्या तोंडांतून आले आणि वडील व इतर मंडळीच्या देखत म्हणून ह्यापेक्षां अधिक प्रेमाचें आविष्करण झालें नाहीं. परंतु दोघांच्या तोंडांतून एकमेकांच्या नामोच्चारापेक्षां अधिक शब्दच येईनात. दोघांचेही कंठ भरून आले! त्यांच्या सुखाला पारावार राहिला नाहीं. पूर्वीप्रमाणें सौख्यानें आपल्यावर पाखर घातली असेंच त्यांस वाटलें.

फेरेल म्हातारा उठला आणि त्यानें मोठ्या प्रेमानें डनबारचें हस्तांदोलन केलें. तो म्हणालाः—"तुम्हीं जी हकीगत सांगितली ती खरोखरच विलक्षण आहे. अजून सुद्धां त्याच्यावर चांगलासा भरंवसा ठेवण्याला माझें मन तयार नाहीं. दोघांचे आत्मे आपआपले देह सोडून दुसऱ्याच्या शरिरांत प्रवेश करिते झाले, असें जें आपण सांगितलें, ती गोष्ट अद्यापही मला खोटीच वाटते, परंतु तेव्हां तुम्ही पहिले डनबार राहिला नव्हतां ह्यांत शंका नाहीं. ती गोष्ट कशी घडून आली, हें मोठें गूढ आहे; आणि तुमच्यावर त्या फाकिरानें कांहीं तरी शक्तिपाताचा प्रयोग केला होता असें धरून चालल्यासच कांहीं उलगडा होईल."

डाक्टरसाहेब म्हणाले—"बस् बस्! तसेंच कांहीं तरी झालें असावें असेंच समजलें पाहिजे. मी पुनः त्या वृद्ध अवलियाची गांठ घेतों. त्याला पुष्कळ प्रश्न विचारावयाचे आहेत; परंतु येवढें मात्र मला कबूल केलें पाहि-

जे कीं, त्याचे जे दोन प्रयोग मीं पाहिले, त्यांनीं माझी अक्कल अगदीं गुंग होऊन गेली !"

नंतर बेगम उठली. तिच्या चेहऱ्यावर गंभीरपणा दिसत होता. ती ह्मणाली--" आतां आपण सर्वांनीं येथून जावं हें बरं. तें पहा तिकडे, नबाबाचा प्राण जाऊन त्याचा देह पडला आहे. तेव्हां आतां आपण जा. मी त्याच्या नोकरांना बोलावून पुढें काय करावयाचं तें सर्व करून टाकतें."

हें ऐकतांच डाक्टरसाहेब उठून नबाबाच्या पलंगाजवळ गेले; त्यांनीं त्याची तपासणी केली आणि ह्मटलें--" खरेंच कीं हो ! नबाब तर गेले."

त्या मृत्यूबद्दल तेथील एकालाही दुःखाचा लवलेशही वाटला नाहीं; तथापि त्या प्रेताच्या आतां शांत झालेल्या मुद्रेकडे सर्वजण क्षणभर पहात होते. नंतर डाक्टरसाहेबांनीं म्हाताऱ्या फेरेलचा हात धरून ते दोघे बाहेर निघून गेले."

डनबारनें बेगमपुढें आपला हात केला आणि म्हटलें-" तुमच्या ह्या उपकाराची फेड माझ्या हातून होणें शक्यच नाहीं."

"छे, छे! असं कां म्हणावं ? मीं ह्यांत विशेष काय केलं आपल्याला सर्वांना सुख व्हावं म्हणूनच मीं हें केलं. मला तरी ह्यांत खरोखरच आनंद होणार होत. म्हणूनच मी हें केलं," असं बेगम म्हणाली. आणि नंतर क्रीन्सीकडे पहाता पहात बेगम पुनः बोलूं लागली.-" मला आपलं उभतांचें चुंबन घ्यावंस वाटतं. येवढीच एक माझी इच्छा आहे. क्रीन्सीताई, आपण माझा राग धरूं नका, किंवा मत्सरहि करूं नका. कारण माझं ह्या हुजूरवर देखील अत्यंत प्रेम आहे; परंतु 'यांचं प्रेम आपल्यावरहि असल्यामुळं मी त्याची अपेक्षा करणं शक्यच नाहीं; तशा प्रकारें होणं आणि शक्य आहे, असं जरीं असतं, तरी देखील मी तसा हीन प्रयत्न मी केला नसता."

तिनें म्हटल्याप्रमाणें डनबारचे ओठाला आपले ओठ लावून यथच्छ चुंबन घेतलें आणि तिच्या म्हणण्याला उत्तर म्हणून क्रीन्सीनें बेगमच्या गळ्याला घट्ट मिठी मारिली आणि तिचेंहि मोठ्या प्रेमानें चुंबन घेतलें.

———

# उपसंहार

वरील गोष्ट घडल्यावर एका आठवड्यांतच क्विन्सी व डनबार यांचें ग्न झालें व त्या लग्नप्रसंगीं बेगमनें भेट म्हणून त्या उभयतांना एक ाटाची मेजवानी देऊन क्विन्सीला एक मूल्यावान मोत्यांचा कंठा बक्षीस देला. त्याचा स्वीकार करतांना क्विन्सीनें म्हटलें, " एवढी तसदी कशाला तां? आपलें आमच्यावर प्रेम आहे तेवढें बस्स नाहीं कां झालें? राणखीं हा मोलवान हार कशाला?" त्यावर बेगम म्हणाली, "नबाबाच्या स्टेटींत असे शेंकडों हार धूळ खात पडले आहेत. तूर्त तरी त्यांचा उपयोग कोण घेणार? आपल्यासारख्या इष्ट व प्रेमी माणसांनीं त्यांचा उपयोग केलेला पाहण्यांतच मला आनंद वाटणार आहे. तरी आमची आठवण म्हणून त्याचा स्वीकार कराच!"

मि. डनबार मध्येंच म्हाणाले, "थँक यू बेगम साहबा! आम्ही उभतां आपल्या इच्छेनुरूप या देणगीचा आभारपूर्वक स्वीकार करतों. ाझा आत्मा मला परत मिळवून देऊन, आपण मजवर जो अत्यंत ुपकार केला आहे, त्याचें स्मारक म्हणूनच हा मौक्तिकहार क्विन्सीच्या ाळ्यांत सदैव झळकत राहिल! पण बेगमसाहबा! आपल्या त्या मौनी ुरूची, हवेंतर तुमच्या भावाची म्हणा, पुनः एक वेळ भेट होईल कां? ाणि त्याच्यापासून, ती आत्म्याच्या अदलाबदलीची विद्या मिळवून देण्याचे ामीं तुम्हीं मला मदत कराल काय?"

" छे! छे! ती गोष्ट आतां घडणें शक्यच नाहीं. केवळ माझा अत्यंत ाग्रह व शिष्यानें नबाबाच्या सांगण्यावरून केलेलें कारस्थान हाणून पाडयासाठींच म्हणून मौनी गुरुनें, तुमचा आत्मा तुम्हांला परत दिला. रवीं हे अवलिया लोक कशानेंच वळणें मुष्कील! आणि त्यांतून असे टु अनुभव वेळोवेळीं शिष्याकडून त्यांना आलेले असल्यामुळें, तो मौनी ुरु आतां यापुढें कोणालाच ही आपली गूढ विद्या शिकविणार नाहीं. व्हां डनबारसाहेब, तुम्ही आपला हा हेका आतां सोडून द्या!"

" अरेरे! तर मग ही एक उत्कृष्ट विद्या त्या अवलियाबरोबरच ष्ट होणार तर! ही विद्या शिकून घेऊन त्याचे प्रयोग आमच्या

त्या युरोप अमेरिका खंडांतील पाश्चात्य राष्ट्रांपुढें करून दाखवावेत व भरतखंड म्हणजे सर्वतोपरी एक अत्यंत श्रेष्ठ देश आहे, असें त्यांच्या निदर्शनास आणावें, असा माझा व आमच्या सोसैटीचा हेतु होता; पण सांप्रत तरी तो हेतु विफल होणार! पण काय हो बेगम साहबा! ही असली विद्या या अवलियाला तरी कोठून लाधली?"

"हिमालयांतील एका हिंदू संन्याशानें त्याला ती दिली होती, असें ते कधीं कधीं सांगत." बेगम ह्मणाली.

"मग हिमालयाकडे असे आणखी संन्यासी आहेत म्हणायचे!" डनबार ह्मणाला.

"हो हो आहेत तर! माझ्या या भावानें तुमचे आत्म्याचें परिवर्तन कदाचित् जर केलें नसतें, तर मग मला बदरीकेदारानजीकच्या आश्रमांतील तपस्वीबोवांना येथें आणवावं लागलं असतं आणि त्यांच्याकडून हें कार्य सुधारून घ्यावं लागलं असतं!" बेगम ह्मणाली.

"तर मग अद्यापहि ते साधु हिमालयांत आहेत ह्मणतां? मग ठरला आमचा पुढील बेत. आम्ही लौकरच हनीमूनसाठीं हिमालयांतील बद्रिकाश्रम नामक रम्य प्रदेशाकडेच आतां लौकर जाणार! कसं क्लीन्सी? आहे ना तुला हें मान्य?" डनबार ह्मणाला.

"जें आपणांस इष्ट तें मलाहि सर्वतोपरी इष्ट!"

लौकरच त्या नवविवाहित पतिपत्नींनीं बेगमसाहेबांचा निरोप घेऊन ते आपल्या बंगल्याकडे आले व श्वशुर फरेल साहेब यांना लखनौसच आणखी थोडे दिवस राहण्य ची उत्तम प्रकारें शिस्त व सोय करून देऊन, या पूर्वात्य गूढ विद्येचा शोध करण्यास हिमालयाकडे ते रवाना झाले.

समाप्त

सरसवाङ्मय रत्नमालेचें ८४ वें रत्न.

१ राजसत्तेवर हल्ला उर्फ प्रजेच्या एकीचें अजब बळ!

(फ्रेंच राजकारणावरील एक सुरस व वीररसप्रधान कादंबरी.) किंवा

२ सहधर्मिणी, ३ मानवी राक्षस, ४ राज्याभिलाष.

या चार कादंबऱ्यांपैकीं कोणतीहि एक कादंबरी प्रसिद्ध होईल.

॥ ॐ श्रीगणेशाय नमः ॥

# आर्यवनौषधालय—मुर्डी

## चालक—विष्णुशास्त्री पेंडसे वैद्य

# मदनामृतसंजीवनी

यांच्या सेवनानें स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, कडकी, गर्मी-संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, धुपणी, छातींतील रोग, हात, पाय, मूत्रभाग व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग, स्वर, जीर्ण-ज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मधुमेह, जुनाट परमा इत्यादि खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची शुद्धि होते. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. याला पथ्य-सेवनाची गरज मुळींच नसून पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्या वर कितीहि घेणारांस टपालखर्च माफ आहे. दर—एकदम ३५ गो. १ रु. ७५ गो. २ रु. १६५ गो. ४ रु. २७५ गो. ६ रु. ५५० गो. १० रु.

१ अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच इ० नेत्रांचे सर्व रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. डबी १ रु.

२ परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणताही नवा जुना परमा, दाह, तिडीक, मूत्र, लाली, पूयस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते! १। भार २ रु.

सर्व सामानाचा मोठा क्याटलॉग मागवा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टि-फिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर नवीन औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सो. ट. ख. वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोगांचें निदान व चिकित्सा कळवूं.

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,—मुर्डी, पो. हर्णै, जि. रत्नागिरी.**

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर त्याचप्रमाणें जाग्रणें,
मानसिक काम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी.

नकले-बद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध रहावें.

मानसिक श्रम करणारे विद्यार्थी, वकील, वैद्य, डाक्टर, न्यायाधीश व गिरणीकामगार वगैरे व जाग्रणाचीं कामें करणारे नाटकी सर्कसवाले, तारमास्तर, स्टेशनमास्तर वगैरे लोकांस हें तेल वापरण्यास अत्यंत उपयोगी आहे. १ बाटली किंमत रु. १८२, मध्यम ८१०, लहान ८६

## बाळबाळंतिणीकरितां औषधें.

बाळंतकाढा—नं. १. पहिले दहा दिवसांत घेण्याचा. किं. ८१४.
बाळंतकाढा—नं. २. दहा दिवसांनंतर घेण्याचा. किं. ८१४.
बाळकडु—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य. किं. रु. ८८.
कुमारी आसव—मुलांकरितां बाटली. किं. ८१४.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतुंत घेण्यास
अत्यंत मधुर व आरोग्यकारक

# द्राक्षासव

एक रत्तल रु. १८१० अर्धा रत्तल ८१४.
दीड रत्तल रु. १८४. ट. पॅ. ख. निराळा.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें भस्में, वगैरे ५०० वर औषधें तयार असतात. त्यांचे माहिती मोठा क्याटलॉग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां " रुग्णपत्रिका " ही सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

ब्राह्मी तेलाचे व टिकाऊ तयार काढ्याचे मूळ कल्पक व शोधक

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स,
आर्यौषधी कारखाना चेंबूर, जि. ठाणें.
प्रमुख दुकान—दवाखाना, ठाकुरद्वार—मुंबई नं. २

ॐ श्रीरामचंद्राय नमः !

# आर्यमहौषधालय, मु. पोष्ट आंजलें

## प्रो. डॉ. रंगनाथ कृष्णशास्त्री विवलकर

L. H. M. S. M. B. A.

## मदनविलासामृतसंजीवनी

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धिकांतिवर्धक व पूर्ण धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक-मौक्तिक कस्तूरी-प्रवालादिमिश्र अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग, संततीस अपाय करणारे गर्भाशयस्थ विकार, संधिवातादि अनेक वातरोग, कवडी, नेत्रविकार, कटिशूल इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग तावडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साह, बुद्धि आणि कांति वाढते व अंगांत परिपूर्ण शक्ति येते. शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्यमान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिष्ठेचें औषध होय. यामुळें यांचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या १ रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून जास्त घेणारास टपालखर्च माफ. त्याच्या आंत घेणारांस ट. ख. वेगळा ७ आणे पडेल. ३२ गोळ्यांस १ रु. ७० गो. २ रु. १६० गो. ४ रु. २६० गो. ६ रु. ५२० गोळ्यांस १० रुपये.

थंडगार नेत्रांजनः—यानें वडस, सारा, फूल, खुपऱ्या, बिंदु, काच, इत्यादि डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबी किं. १।। रुपया.

**दंतरक्षक पूड:**--ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तात्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिशेची आहे.

१ डबी. किं. ८ आणे.

**स्वर्णधात्री तैल:**--हे चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें आणि उपयुक्त तैलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलेलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ. रोगांस जलद आराम पडतो. केंसास चोळिल्यानें केस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक, लांब व मृदू होऊन मेंदू शांत आणि रोगरहित बनतो. मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो ! खरूज, शिबें, गजकर्ण वगैरे त्वचेचे कोण-तेहि विकार होत नसून, ते जडलेले असतील तर जलद नाहींसे होतात तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बाट-लीची किं. १॥ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास— इत्यादि बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई, वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसास लावण्याची हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं विकत मिळतील.

**सूचना**—वरील औषधें वगैरे माल पूर्ण खात्रीचा असल्यामुळें आज पन्नास वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला असून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खर्ड्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें तो खालील बिनचूक पत्त्यावर मागवावा.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य**

मु. पो. आंजर्लें, ता० दापोली जि० रत्नागिरी.

अनेक सर्टिफिकिटें व सुवर्णपदकें मिळालेला

## सरकारांत रजिष्टर झालेला

रक्तशुद्धि व धातुवृद्धिकारक जगविख्यात.

# द्राक्षार्कमधु.

हा अक्षयवल्ली द्राक्षार्कमधु, कोकणांतील अनेक वनस्पतींच्या रसांत द्राक्षांचा रसार्क मिश्र करून स्वदेशी यंत्रसाह्यानें तयार केला आहे.

हा मधु महौषधी असून फार गोड व स्वादिष्ट आहे आणि तो खाल्ल्यानें वात, पित्त, कफ या त्रिदोषांच्या मिश्रणानें होणाऱ्या व्याधि जातात. ६०-७० वर्षांच्या वृद्धांनाहि [illegible] तरुणाप्रमाणें प्राप्त होतो. ( खरोखर एक सप्ताहांतच दाखला पटतो ), [illegible] यांतील शक्ति जाऊन प्राप्त झालेली दुर्बलता नाहींशी होते. लघ्वीच्या पूर्वी अगर नंतर स्रवून जाणारें वीर्य बंद होतें. स्वप्नावस्था होत नाहीं. वीर्यवृद्धि होते. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. तीनच दिवसांत गुण येतो; तरुण स्त्रिया व पुरुष यांनींहि द्राक्षार्कमधूचें सेवन करून यांतील खरी मजा पहावी. यानें क्षयरोग, उदररोग, दमा यांचा नाश होतो. दिवसांतून तीन वेळ जेवलें तरी अन्न पचून भूक चांगली कडकडून लागते. याचा अनुभव पहिले दिवशींच येतो. शौचास साफ होतें. [illegible] वर्षांची मुरलेली कडकी असो, एका सप्तकांत तिचा [illegible] या औषधास पथ्य नाहीं [illegible] वर्ज्य करण्याचेंहि कारण नाहीं. [illegible] दहा दिवसांत पु[illegible]या एका बाटलीनें [illegible]ण येतो; व [illegible] तीन बाटल्यांनीं गुण येतो. एका बाटलीची किंमत १। रु. तीन बाटल्यांची [illegible] रु. ३॥४. तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं म्हणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. डझन बाटल्यांची किंमत १२ रु. शिवाय एक बाटली मोफत. टपालखर्च वेगळा पडेल. एजंटामार्फत १ बा. १। रु. [illegible] बाटल्या ३॥ रु. डझनास १३रु.

मुंबई एजंट [illegible]दास एजन्सी, लालबाग परेळ.

## मॅनेजर–द्राक्षार्कमधु ऑफिस.

पो. निपाणी, जि. बेळगांव.